# श्रीज्ञानेश्वर महाराज




यद्वस्तुनस्मच्चिदकापकारी ।
भक्त्यर्थमेवावयवीवभूतम् ।
ज्ञानेश्वराचार्यपदं हृदब्जे ।
विभ्राजते तन्मुनयो विशन्ति ॥

यद्वस्तुतस्सच्चिदकापकारि । भक्त्यर्थमेवावयवीव भूतम् ॥
ज्ञानेश्वराचार्यपदं हृदब्जे । विभ्राजते तन्मुनयो विशंति ॥ १ ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

श्रीगुलाबरावमहाराजकृत

## सूक्तिरत्नावलि–तृतीय यष्टि.

# प्रियलीलामहोत्सव.

## आमंत्रणविलास.

श्रीमद्भागवत प्रथमस्कंधावरील
प्राकृत गद्यपद्यान्वित टीका.

हें पुस्तक

प्रकाशक

श्रीनिवास रामचंद्र हरिदास
यांनीं

नागपूर येथें
"श्रीज्ञानेश्वर मुद्रणालय" मध्यें छापिलें.

आवृत्ति १ ली.

कार्तिक शके १८३२.

(सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.)

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

# परिचय.

॥ श्लोक ॥

निवृत्ततर्षैरुपगीयमानाद्भवौषधाच्छ्रोत्रमनोभिरामात् ।
कउत्तमश्लोकगुणानुवादात्पुमान्विरज्येतविनापशुघ्नात् ॥
[ श्रीमद्भागवत. ]

॥ अभंग ॥

हरिनाम वेली पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार वोल्हावली ॥ १ ॥
तेथें माझ्या मना होइ पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या ॥ २ ॥
मुळींचिया बीजें दाखवीली गोडी । लवकरचि जोडी जाली याची ॥ ३ ॥
तुका म्हणे क्षणक्षणा जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥ ४ ॥

हरि, हरिभक्त व हरिनाम हीं भक्तीच्या नंदनवनांतील अलौकिक रसाळ फळें होत. यांचें त्रैविध्य केवळ नाममात्र असून वस्तुतः अत्यंत ऐक्य आहे. किंबहुना हीं फळें रसमयच असून यांची रसप्रवाह माधुरी नित्य नूतन असल्यामुळें ती सेवन करणारास यांच्या त्रैविध्याचें भान न राहतां अखंडैकरसांत त्याची अहंकृति विरून जाते. त्याचा संपूर्ण जगदाभास मावळून त्याच्या दृष्टिकटाहांत भक्तीच्या निस्सीम नंदनवनाचा उदय होऊन तेथील अपूर्व रसप्रभावानें त्याचे संपूर्ण क्लेश नाश पावतात, कर्मांचा क्षय होतो, स्मृति शास्त्र पुराणांचा पदपांसुवत् त्याग होतो, परमेष्ठ्यादि पदें तृणवत् तुच्छ वाटूं लागतात, विषयांचा सुप्तिवत् विसर पडतो, कर्तव्य संपतें, त्याच्या सहज क्रिया पुण्यात्मक होतात, श्वासोच्छ्वास हरिनाममय होऊन त्याचे सहज बोल श्रुतिशिरोमय होतात, व तेच प्रेममय प्रणवबीजरूपानें सर्वत्र संचार करून आपल्या दिव्य प्रभावानें अनंत जड जीवांचा उद्धार करितात.

भक्तीच्या ह्या दिव्य उपवनांतील वनश्रीची बहार अनुपमेय आहे. तेथील प्रेमवृक्षांचे दाट निकुंज, त्यांवरील टवटवीत फलपुष्पयुक्त हरिनाम वेली, सुमनमधुकरांचा गुंजारव, शुद्धसत्वमय पुष्पवाटिका, मधून मधून वाहणारे अष्ट सात्विक भावांचे निर्झर, शुद्धांत:करणरूपी सरोवरें, त्यांतील अत्यंत स्वादु हरिगुरु भक्तीचें जीवन, त्यावरील शीतल विचार लहरी, शांतीचीं प्रफुल्ल सुवर्ण कमळें, शुद्ध भावनाजल-प्रपूरित व नवविध भक्तीचे रत्नसोपानयुक्त पुष्करिणी, सद्बोधरूपी कारंजांतून उडणारे तुषार, तेथें मंदगतीनें चालणारे समाधिनिष्ठ तपोधन राजहंस, भक्ति तुळसींचीं रत्नखचित वृंदावनें, ठिकाठिकाणीं उमललेलीं अवताररूपी मधुरपुष्पें, त्यांतील मधुर रसावर टपलेल्या मत्त भ्रमरांचे गुंजारव, सांख्य, योग, वेदांताचीं दूरवर लागून गेलेलीं महावनें, भगवच्चिंतन, कथन, व अन्योन्यप्रबोधन करणारे चकोर व शिखी आदि करून नयन मनोहर देखाव्यांनीं भरलेलें हें नंदनवन सुप्रसन्न व अदृष्टपूर्व असें आहे. या स्थानीं मिळणारें सुखही नित्य असल्यामुळें अर्थातच स्वर्गादि सुखें ह्मणजे मुलांचीं खेळणीं होत. कारण आब्रह्म भुवनें सगळीं सकाम लोकांचीं मिरासी होत. स्वर्गांत अमरत्वाचें सिंहासन असूनही एका दिवसांत १४ इंद्र होतात, तर भक्तीच्या ह्या स्थानांत स्वत: कालाचाच अंत होतो. स्वर्गांत ऐरावताचें वाहन आहे, तर येथें गमनागमनाच्या नांवानेंच पुज्य आहे. स्वर्गांत अमरावती राजधानी आहे, तर येथें येणारे स्वत:च सदेह सच्चिदानंद होतात. तेथें स्वर्गांत महासिद्धींची भांडारें आहेत, तर येथें सर्व सिद्धींची स्वामिनी जी लक्ष्मी ती संतचरण रजाची अपेक्षा करून असते. तेथें अमृताचीं कोठारें आहेत, तर येथें येणारे प्रभूचें अधरामृत पान करून स्वत:च अमृत होतात. स्वर्गांत कामधेनूचीं खिल्लारें आहेत, तर येथें श्रुतिमातेच्या दुग्धाची पुष्टी असते. स्वर्गांत देव सेवक असतात, येथें स्वत: परमात्मा भक्तांच्या मागेंपुढें असतो. स्वर्गांत चिंतामणीची भूमी आहे, येथें अखंडैकरस आत्मभूमी आहे. स्वर्गांत सुरतरूंच्या वनवाटिका आहेत, येथें प्रेमवृक्षांचीं कुंजवनें आहेत. स्वर्गांत रंभा उर्वशी आदिक अप्सरा उपभोगार्थ मिळून कल्प कल्प काम पुरा होत नाहीं, येथें सर्व

जगत् अंबामय होऊन निष्कामतेशीं नित्य सुलग्न लागतें. स्वर्गात मदन पलंगावर येऊन निजतो, येथें मदनतात भक्तांच्या हृदय पलंगावर अखंड जागत राहतो. स्वर्गात बृहस्पतिप्रमुख स्वास्तिश्रियेचे ब्राह्मण आहेत, येथील स्त्रियांचे शद्र श्रुतीनें अभिनंदन करण्यासारखे असतात. स्वर्गात गंधर्व गाणीं गातात, येथें भक्तांचे श्वासोच्छ्वास नवे प्रबंध होतात व कृष्ण वेणुगीताची धुमाळी चालू असते. स्वर्गात सकामांचा सुकाळ असतो, येथें निष्कामप्रेमळांचा सुकाळ असतो. तात्पर्य स्वर्गादि सुखाला कुत्र्याच्या सडलेल्या मांसाची जी उपमा तातादिकांनीं दिलेली आहे, ती अगदीं यथार्थ आहे. असो. हें उद्यान ह्मणजे देवभक्तांचे एक अजब क्रीडाभुवनच होय. सच्चिदानंद परमात्मा ह्या ठिकाणीं केवळ भक्त्यर्थ अवयवी इव होऊन शुद्धसत्वमय सुकुमारगात्र हरिहररूपानें भक्तांबरोबर नित्य क्रीडत असतो. व्रजवनितादि स्त्रिया व शुकसनकादिक संतमंडळ देवाचे खेळगडी असून ज्ञान व वैराग्य येथील व्यवस्थापक होत. येथील देवभक्तांच्या क्रीडा प्रेमरसपरिप्लुत असल्यामुळें ह्यांनां रासक्रीडा हें अन्वर्थक नांव मिळालें असून त्या सर्व हरिनाममय असतात. ह्मणून ह्या तिघांचें ऐक्य वर सांगितलें आहे. ह्यांतून एकाची जरी प्राप्ति झाली तरी ओघानें दुसऱ्या दोघांची सहज होते. कारण जेथें हरि आहे तेथें हरिभक्त व हरिनाम आहेत, जेथें हरिनाम आहे तेथें हरि व हरिभक्त आहेत व जेथें हरिभक्त आहे तेथें हरि व हरिनाम आहेत. निर्दोष नामस्मरण केल्यावांचून भगवत्कृपा नाहीं, भगवत्कृपेवांचून सच्छास्त्र व सद्गुरु यांची प्राप्ति नाहीं व सद्गुरु कृपेवांचून प्रभूचें यथार्थस्वरूप व नाममहिमा कळत नाहीं. ह्या प्रेमलीलांत देवाला देवपणा स्फुरत नाहीं व भक्तांनां भक्तपणा स्फुरत नाहीं, परंतु हरिनाम मात्र सर्वांना दृष्ट आहे. ह्या प्रमाणें भक्तीच्या नंदनवनांत हें प्रेमवर्धनाचें कार्य सतत चाललेलें असतें. येथल्या रंगभूमीवर प्रभूचें भक्तवात्सल्य व भक्ताचें प्रभुविषयक निर्हेतुक प्रेम पाहण्या सारखें असतें. भक्तसंतोषार्थ प्रभु कोठें सर्पशय्येवर निजतो, तर कोठें सर्पाचें भूषण मिरवितो. कोठें गरुडावर स्वार होऊन भक्तांसाठीं धांवतो, तर कोठें

नंदीवर सवारी करून युद्धार्थ निघतो. कोठें मत्स्य होऊन वेदांचा उद्धार करितो, तर कोठें वराह होऊन पृथ्वी दाढेवर धरतो. कोठें सिंह होऊन दैत्याचें पोट फाडतो, तर कोठें फारच लहानपणा दाखवून एखाद्या दानशूराला तोंडघशीं पाडतो. कोठें पुत्र पचवून खावयाला मागतो, तर कोठें व्याघ्र होऊन भक्ताची स्त्रीच हरण करितो. कोणा बरोबर कण्या खातो, तर कोणाचें उच्छिष्ट भक्षण करितो. कोणासाठीं सावकार होऊन हुंडी भरतो, तर कोणाचीं मेलेलीं ढोरें ओढतो. कोणाच्या घरीं पाणी वाहतो, तर कोणासाठीं माहार होऊन यवनाला "जोहार मायबाप" ह्मणतो. कधीं स्त्री होऊन भक्तांचा काम पुरवितो, तर कधीं पति होऊन निष्काम करतो. जीवंतपणींच यानें भक्तांचे लळे पाळिले असें नाहीं, तर मृताकरितां श्मशानांत शोक केला. स्वहस्तानें भक्तांच्या शवांला दहन केलें, पूतनेचें रक्त प्याला व शंखासुराचें कलेवर अजून हातांत वागवीत आहे. तुकाराम म्हणतातः—

॥ अभंग ॥

मांस चर्म हाडें । देवा अवघींच गोडें ॥ १ ॥ जे जे हरिरंगीं रंगले । कांहीं न वचे वायां गेले ॥ २ ॥ वेद खाय शंखासुर । त्याचें वागवी कलेवर ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा । बराडी हा भक्तरसा ॥ ४ ॥

प्रभूच्या भक्तवात्सल्याविषयीं तात ह्मणतातः— "म्हणोनि गा नमस्कारूं । तयातें आह्मी माथां मुकुट करूं । तयाची टांच धरूं । हृदयीं आह्मी ॥ तयाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणी । तयाचीं कीर्ती श्रवणीं । आह्मी लेऊं ॥ तो पाहावा हे डोहळे । ह्मणोनि अचक्षूसी मज डोळे । हातींचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥ दोवरी दोनी । भुजा आलों घेउनि । आलिंगावया लागुनी । तयाचें आंग ॥ ( ज्ञानेश्वरी १२।२२१ ते २२४ ) एवढेंच नव्हे तर भक्तानें लात मारली असतांही देवाला त्याची केवढी आवडी वाटली पहाः—"प्रिया लक्ष्मी डावलोनि केली परौती । फेडोनि कौस्तुभ घेतला हातीं । मग वोढविली वक्षस्थळाची वांखती । चरणरजां ॥ (ज्ञाने० ९।४८०.) इतके भक्तांचे लळे आवडीनें पुरविणारा प्रभू अन्य कोण आहे? भक्तांवर इतका देवाचा प्रेम अस-

ण्याचें कारण देवांनीं स्वतःच सांगितलें आहे. भगवान म्हणतात ' भक्त हे माझे आत्मे आहेत.' मग स्वतःच्या आत्म्यावर कोण प्रेम करणार नाहीं? परंतु सर्व देवांचाही देव, योगियांचा राव, व जीवांचा जीव असा हा परमात्मा असून सर्व देव, साधक, सिद्धांचे संघ व ब्रह्मनिष्ठ पुरुषही ज्याला नित्य नमस्कार करतात अशा प्रभूनें आपला आत्मा म्हणावयाला केवढें भाग्य पाहिजे? याविषयीं तुकाराम म्हणतात:—

'मस्तकीं सहावे टांकियासी जाण । तेव्हां देवपण भोगावें गा ॥१॥ आपुलिये स्तुती निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ॥ २ ॥ सद्गुरुसेवन तेंचि अमृतपान । करुनी प्राशन बैसावें गा ॥ ३ ॥ आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाकूं नये ॥४॥ तुका म्हणे आतां सांगूं तुला किती । जिण्याची फजिती करूं नये ॥ ५ ॥'

इतका जबरदस्त स्वार्थत्याग, व भगवंताविषयीं निस्सीम प्रेम ज्याच्या अंतःकरणांत असेल तोच भगवंताचा आत्मा होण्याला पात्र होईल. वस्तुतः ह्याच्या व्यतिरिक्त पदार्थावर प्रेम तरी काय म्हणून करावा? सर्व विषयांनां रमणीयता ह्याच्याचमुळें आली आहे. ब्रह्मादिकांचे आनंद ह्याचा एक अंश आहेत असें श्रुति सांगते.

'मोरनकी चंद्रकला शीश मुकुट सोहै । केशरको तिलक भाल तीन लोक मोहै ॥ कुंडलकी झलकन कपोलपर छाई । मानो मीन सरवर तजि मकर मिलन आई ॥ ललित भृकुटि तिलक भाल चितवन में टौना । खंजन अरु मधुप मीन भूले मृग छोना । सुंदर अति नासिका सुग्रीव तीन रेखा । नटवर प्रभु वेश धरे रूप अति विशेषा । हसन दशन दाडिमद्युति मंदमंद हांसी । दमकि दमकि दामिनि द्युति चमकी चपलासी '॥

अशा प्रकारचें ह्यानें भक्त्यर्थ धारण केलेलें मदनमनोहर मोहकरूप पाहतांच भराभर डोळ्यांनीं त्याचा घोंट घेऊं, कां जिभेनें चाटून घेऊं, कां नाकानें हुंगत राहूं, कां चुंबनच घेत राहूं, का दोन्हीं हातांनीं कवटाळून सगळें हृदयांत साठवून ठेवूं असें होऊन जातें. मानवी प्राण्याला असें होत असेल ह्यांत आश्चर्य नाहीं पण पशूंनांही

असेंच होतें. गोकुळांत ब्रह्मदेवानें वत्सहरण केलें असतां श्रीकृष्ण ज्यावेळेस सर्व वत्स व गोपाळ आपण स्वतः झाले होते तेव्हां त्या वत्सांवर गाईंचा तितक्याच कालांत असा कांहीं विलक्षण प्रेम दिसून येत असे कीं चारी खुरांवर उडत, पुच्छें वर करून हंबरत, त्यांनीं त्या आपल्या वत्साकडे पर्वतावरून धाव घ्यावी, व जवळ जाऊन त्यांनां चाटावें. इतक्या चित्तवृत्ति ओढून घेणारा दुसरा जर कोणींच नाहीं तर प्रियाची परम सीमा हाच ठरत नाहीं काय? मग व्रजस्त्रियांनीं आपलें जीवितसर्वस्व ह्याच्यावरून ओवाळून टाकले, शुकादिकांसारखे निर्ग्रंथ आत्मराम मुनी ह्याचे विषयच वर्णन करण्यांत भाट झाले, व मोठ मोठे तपोधन मुनी ह्याच्या प्राप्त्यर्थ अरण्यवास पतकरून कंदमुळें भक्षण करूं लागले यांत नवल काय?

सारांश, प्रभूच्याठायीं भक्त हे अनन्यगतिक असतात व त्या व्यापकाला त्यांचें चित्त गवसणी होते. त्यांच्या वृत्तिभ्रमरी भगवंताच्या पदकमळसौरभाला लुब्ध होऊन निमेषभरही माघार घेत नाहींत. त्या सुखापुढें स्वर्ग, पारमेष्ठ्य तर काय परंतु प्रत्यक्ष भगवंताचें षड्गुणैश्वर्यही त्यांनां नको असतें. मग इहलोकच्या कनककांतादि बेड्या व नांवलौकिकांचा बडेजाव त्यांनां काय होय? म्हणजे भक्त जसे देवाचे आत्मे आहेत तसा देवही भक्तांचा आत्मा आहे. यामुळें दोघांचें शीळही सारखें जुळतें, व सनातनधर्माच्या उत्कर्षासाठीं दोघेही वेळोवेळीं अवतार घेऊन येतात. देवाचीं जन्मकर्में जशीं दिव्य आहेत तशीं भक्तांचींहि आहेत. तुकाराम म्हणतातः– 'देवासी अवतार भक्तासी संसार। दोहींचा विचार एकरूप ॥' देवाला भक्ताचा विरह सहन होत नाहीं. भक्ताला देवाचा विरह सहन होत नाहीं. देवाला भक्तांचीं चरित्रें आवडतात, भक्ताला देवाचीं चरित्रें आवडतात. देवाला भक्तद्वेषी नको असतो, तर भक्ताला हरिहरद्वेषी नको असतो प्रभू जसा भक्तांच्या हाकेसरसा उडी घालतो तसे संतही दीनाच्या हाकेसरसे उडी घालतात. कोणत्याही परिस्थितींत देवाची जशी समता असते तशी भक्तांचीही असते. सावतामाळी ह्मणतातः–

' विठोबा यावें । समयाला सादर व्हावें ।।ध्रु०।। कोण्यादिसीं माडी उप्पर माडी । कोण्यादिसीं बसायाला घोडी । कोण्यादिसीं गवताची झोंपडी । त्यांत रहावे ।। समयाला सादर व्हावें ।। १ ।। कोण्यादिसीं बसले हत्तीवर । कोण्यादिसीं पालखि सुभेदार । कोण्यादिसीं पायाचे चाकर । पाई चालावें । समयाला० ।। २ ।। कोण्यादिसीं बसले चिंता-क्रांत । कोण्यादिसीं धान्य नाहीं घरांत । कोण्यादिसीं द्रव्याची हे मात । कोठें ठेवावें ।। ३ ।। कोण्यादिसीं काळ येईल चालून । कोण्यादिसीं प्राण जाईल घेऊन । कोण्यादिसीं श्मशानवासी जाण । एकटें रहावें ।। समयाला० ।।४।। कोण्यादिसीं होईल गुरुची कृपा । कोण्यादिसीं चुक-तील जन्मखेपा । कोण्यादिसीं सावतामाळ्याच्या बापा । लवकर यावें ।। समयाला सादर व्हावें० ।। ५ ।। '

तुकाराम ह्मणतातः—

' कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ।।१।। जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ।। २ ।। कैं भोज्य नानापरी । कैं कोरड्या भाकरी। ।। ३ ।। कैं बसावें वहनीं । कैं पायीं अन्हवाणी ।।४।। कैं उत्तम प्रावर्णे । कैं वसनें तीं जीर्णे ।। ५ ।। कैं सकळ संपत्ती । कैं भोगणें विपत्ती ।। ६ कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशीं योग ।। ७ ।। तुका म्हणे जाण । सुख दुःख तें समान ।। ८ ।। '

देवानें वेद आणि गीता निर्माण करून आपल्या प्राप्तीचे अनेक मार्ग लोकांनां दाखवून दिले. भक्तांनीं त्याच्याच अनुरोधानें वागून सुलभ साधनमार्ग प्रगट केला. तात ह्मणतातः—

' ते पाहांटेवीण पाहावित । अमृतेंवीण जीववित । योगेंवीण दावित । कैवल्य डोळां ।। परि राया रंका पाडधरूं । नेणती सानेयां थोरां कडसणी करूं । एकसरे आनंदाचें आवारू । होत जगा ।। ... ... ... कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामांचे निखिल प्रबंध । माजीं आत्मचर्चा विशद । उदंड गाती ।। मग वाड धाकूटे न ह्मणती । सजीव निर्जीव नेणती । देखिलिये वस्तु उजू लुंठिती । मीचि ह्मणोनि ।। आपुलें उत्तमत्व नाठवे । पुढील योग्यायोग्य

नेणवे । एकसरें व्यक्तिमात्राचेनि नांवें । नमूंचि आवडे ॥ अखंड अगर्वता होऊनि असती । तयांची विनय हेचि संपत्ति । जे जयजयमंत्रें अर्पिती । माझ्या ठायीं ॥ नमितां मानापमान गळाले । ह्मणोनि अवचितां मीचि जाहाले । ऐसे निरंतर मिसळले । उपासिती ॥ (ज्ञानेश्वरी अ० ९-२०१-२०२-२१०-२२२-२२३-२२६-२२७.)

प्रभूनें भक्तांकरितां केलेल्या लीला जशा इतिहासांत प्रसिद्ध आहेत तसें भक्तांनींही प्रभुप्रेमाकरितां अनेक जन्म देहसमर्पण करून साधनाचे कष्ट सोसून देवाला ऋणी केल्याचें पुराणादिकांत वर्णन आहे. 'येथ प्रतिफळे भावना आपुलाली' ह्या तातवचनाप्रमाणें किंवा 'सेवानुरूपफलदोऽसियथामहीप:' ह्या कन्यापंचकांतील आद्य कन्योक्तिप्रमाणें परमात्मा जसा भावनानुसार फल देणारा आहे तसे संतही भावनेंप्रमाणें फळ देणारे आहेत. याविषयीं तुकारामवचन प्रसिद्धच आहे:— 'मऊ मेणाहुनी आह्मी विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ १ ॥ मेले जित असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥ २ भले तरि देऊं गांडीची लंगोटी । नाठ्याळाचे काठी देऊं माथां ॥ ३ ॥ मायबापाहुनि होऊं कृपावंत । करूं घातपात शत्रुहूनि ॥ ४ ॥ अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ५ ॥ तुका ह्मणे आह्मी अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचें परि' ॥ ६ ॥ देवाच्या लीला जशा 'विमोहायकुधियां' ह्मणजे मूढ लोकांनां व्यामोह उत्पन्न करणाऱ्या असतात तद्वत संतांच्या लीलाही असतात. एकंदर अभिप्राय हा कीं 'एका अंगीं दोन्ही जाली हीं निर्माण। देवभक्तपण स्वामिसेवा ॥ तुका ह्मणे येथें नाहीं भिन्न भाव । भक्त तोचि देव देव भक्त' ॥ या संतवचनानुसार देवभक्त दोघेही समरस असून त्यांच्या ऐक्यानें प्रेमवर्धनाचें प्रयोजन सिद्ध होतें.

ह्या देवभक्तांच्या अंतरंग वृत्तींचें दृष्ट स्वरूप ह्मणजेच हरिनाम होय. ह्यांची प्रेमवर्धनाची उत्कट इच्छा व ह्यांचा सत्यसंकल्प ह्यामुळेंच हरिनामांत प्रबल मंत्रशक्ति व ओजस्विता आली आहे. ती इतकी कीं नामप्रभावापुढें पापकरण्याची पाप्यांत शक्तीच नाहीं. नामस्मरणांत चित्तवृत्ति

रंगल्यामुळें कर्मलोप झाल्यास अन्यत् प्रायश्चित्तांचें शास्त्रांत वैय्यर्थ्य सांगितलें आहे. प्रायश्चित्ताचाच अर्थ मुळीं स्मृतींत असा केला आहे:—

'प्रायोनामतपःप्रोक्तंचित्तंनिश्चयउच्यते ।
तयोर्निश्चयसंयुक्तंप्रायाश्चित्तमितिस्मृतम् ॥'

वेदपुराणादि समस्त ग्रंथ व संतांचे ग्रंथ ह्या देवभक्तांच्या वाङ्मयी तनू होत. त्यांच्या चित्तवृत्तीच ह्या रूपानें प्रेमदानार्थ परिणाम पावल्या आहेत. हेंच संतबीज होय. जीवांच्या कल्याणार्थ ह्याचें अत्यंत महत्व आहे. हें बीज जीवांच्या वासनेंत जेव्हां संस्काररूपानें आरूढ होतें तेव्हां चित्तांतून विषयचिंतनरूपी भवबीज नष्ट होतें, सद्वासनेचा अंकूर फुटून हरिनामीं आवडी उत्पन्न होते व नीतीचें आणि सदाचरणाचें खत व शुद्ध भावनेचें जीवन मिळून प्रेमवृक्ष वाढीला लागतो व प्रेमाचींच त्याला मधुर फळें येतात. असें ह्या बीजाचें फलीभवन झालें कीं सनातन धर्माचा प्रादुर्भवनकाल प्राप्त होऊन हरीचे व हरिभक्तांचे अवतार प्रगट होतात. याप्रमाणें कल्पाकल्पांत धर्मरक्षणाची व्यवस्था चालू असते. 'संतबीज पलटे नहीं जावे जुग अनंत । उंच नीच घर आवे अखिर संतका संत ॥' हें वचन याविषयीं प्रसिद्धच आहे. हरिप्रमाणें हरिनामही सगुण निर्गुण आहे असें तुकारामांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे. हरिनामप्रभावाविषयीं कलिसंतरणोपनिषद् साक्ष देत असून महाभारतांत पुढील वचनें आहेत:—

"प्राणकांतारपाथेयंसंसारच्छेदभेषजम् ।
दुःखशोकपरित्राणंहारिरित्यक्षरद्वयम् ॥
सर्वाश्रमाभिगमनंसर्वतीर्थावगाहनम् ।
नतथाफलदंसौतेनारायणकथायथा ॥"

हरिकीर्तनप्रभाव तात येणेंप्रमाणें वर्णन करतातः— 'तरी कीर्तनाचेनि नट नाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे । जें नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥ यमदमा अवकळा आणिली । तीर्थें ठायावरूनि उठविलीं । यमलोकींची खुंटिली । राहाटी आघवी ॥ यम ह्मणे काय यमावें । दम म्हणे कवणातें दमावें । तीर्थें म्हणती काय खावें । दोष औषधासि

नाहीं ॥ ... ... तो मी वैकुंठीं नसें । वेळ एक भानुबिंबींही न दिसें । वरी योगियांचींही मानसें । उमरडोनि जाय ॥ परी तयांपाशी पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥ ... .... नाम जपयज्ञ तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म । नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ॥' [ज्ञा० अ० ९।९७ते९९, २०७, २०८. अ० १० । २३३.]

हरिकीर्तनप्रसंगीं संतांच्या अमृतमय वाणीनें सहज आधिकारिकत्व देणारे असे मंगल आशिर्वाद मिळत असतात:—

'वर्षत सकळ मंगळीं । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥ चला कल्पतरूचे अरव । चेतना चिंतामणीचे गाव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु' ॥ [ज्ञा० अ० १८।१७९७ ते ९९.]

'तुम चिरंजीव कल्याण रहो हरिकथा सुरस पीयो । हरिकीर्तनके साथि सज्जन बहुत बरस जीयो ॥ ध्रु० ॥ सस्ता दाना पानी निर्मल गंगाजल गहेरा । राजरंग और बागबगीचे रुपय होन मोहरा ॥ १ ॥ ऊंचा मंदिर महेल सुनेरी मुलुख खूब वस्ती । पुत्र पौत्रा सुंदर कांता सुगुणरूप मस्ती ॥२॥ अमृतरायके अमृत बचनसे सदा सुखी रहियो । धष्ट पुष्ट आरोग्य काया आनंदमें रहियो ॥ तुम चिरं० ॥ ३ ॥'

हरि व हरिभक्त जसें भावनेप्रमाणें फळ देतात तसें हरिनामही भावनेप्रमाणें फळ देणारें आहे. रजस्तमयुक्त चित्तानें नामस्मरण करणारे जगाला भयंकर तापदायक झाले आहेत व शेवटीं आपल्याच कर्मानें नाश पावले आहेत. त्यांचीं उदाहरणें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. अशुद्ध चित्तानें उपासना करणारांस आसुरलोकांची प्राप्ति होते असें श्रुति सांगते. 'नाम स्मरतां म्हणुनी आचराल दोष । तरी श्रवण मनन भक्ति पडली ओस ॥' असें नाथ म्हणतात. 'इंद्रियांसी नेम नाहीं । मुखीं नाम करील काई ॥' असें तुकारामांनीं म्हटलें आहे. म्हणून नुसत्या नामस्मरणानें भवसागर तरून जाण्याची

इच्छा असेल तर 'सन्निंदादि' दशापराध टाळून शुद्ध सात्विक भावनेनेंच नाम घेतलें पाहिजे. अत्यंत दुराचरणी पुरुषही नामानें पावन होतो ही गोष्ट खरी; परंतु भगवन्नामारूढ होण्याबरोबर नियमबद्ध वागून ' आणिक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलीया चित्तापासुनीयां ॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ पडली वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दूजा ॥ ' इतका दृढ निश्चय झाला पाहिजे, दुराचार सुटत गेला पाहिजे व भगवत्प्रेम उत्तरोत्तर वाढत गेला पाहिजे तरच तें नाम फलद्रूप होतें. राजमार्गानें जावयाचें असेल तर संतसंग हेंच आद्य साधन आहे असें ' तद्विज्ञानार्थंसद्गुरुमे-वाभिगच्छेत्समित्पाणिःश्रोत्रियंब्रह्मनिष्ठं' । 'तद्विद्धिप्रणिपातेनपरिप्रश्नेनसे-वया' । 'सतांसंगतिरेवात्रसाधनंप्रथमंस्मृतम्' । 'संतसंगें अंतररंगें नाम बोलावें' ॥ इत्यादि श्रुतिसंताभिप्रायबोधक वचनावरून स्पष्ट दिसतें. संपूर्ण चित्तवृत्ति सद्गुरूच्या स्वाधीन करून गुरुसेवाच सर्व कांहीं देईल अशा निश्चयानें शतशः जन्म त्यांचेंच दास्य करण्याचा कृतसंकल्प झाला कीं त्या करुणावत्सल सद्गुरुकृपादृष्टिप्रभावानें समस्त प्रतिबंध जळून जातात, यमनियमादिक साधनें आपोआप प्राप्त होतात व हरि आणि हरिनाम हें फळ ओघानेंच हस्तगत होतें.

एवं हरि, हरिभक्त व हरिनाम यांचें ऐक्य व भक्तीच्या नंदनवनां-तील त्यांच्या लीलांचा प्रभाव वर्णन केला. यांतील अभिप्राय हाच कीं जे '**निवृत्ततर्ष**' झाले त्यांनांच एवढें भाग्य प्राप्त होतें. अथवा येथील सुखाचे आत्यंतिक अधिकारी तीव्र मुमुक्षु असतात. त्यांनां संपूर्ण जगत् दुःखमय वाटत असल्यामुळें त्यांतून ' झडझडून ' निराळे निघून, कनककांतादि जड बिड्या तटातट तोडून, मानापमानाचे गोवे गुंडाळून

---

१ 'सन्निंदाऽसतिनामवैभवकथाश्रीशेशयोर्भेदधी-
रश्रद्धाश्रुतिशास्त्रदेशिकगिरांनाम्न्यर्थवादभ्रमः ।
नामास्तीतिनिषिद्धशास्त्रविहितत्यागोहिधर्मान्तरैः
साम्यंनाम्निजपेशिवस्यचहरेर्नामापराधादश ॥ १ ॥'

ठवून त्या करुणाकर हरिगुरुमाउलीच्या नांवानें गाऱ्हाणीं देण्याकरितां ते आपल्या जीवितावर पाणी सोडून धांवत असतात. ती अनुपम भक्तवत्सल करुणाकर हरिगुरुमाउली केव्हां पान्हा पाजून आपलें शांतवन करील असें त्यांनां होऊन जातें. त्या माउलीचें स्तनपान मिळेल तरच वांचूं नाहींतर मरूं इतके ते अत्यवस्थ होऊन जातात. त्यांनां दुसरें कांहींच नको असतें. ह्या स्थितीचें तुकाराममहाराज वर्णन करतात:—

'कोणता उपाय करूं भेटावया । जाळावी हे काया ऐसें वाटे । १ । सोडुनीयां गांव जाऊं वनांतरा । रुखमादेवीवरा पहावया ॥ २ ॥ करूं गा उपास शोषूं हे शरीर । न धरवे धीर नारायणा ॥३॥ जाती आयुष्याचे दिवस हे चारी । मग केव्हां हरी भेटसी तूं ॥ ४ ॥ तुका ह्मणे कांहीं सांगा विचारूनी । विठोबा तुमचे मनीं असेल तें ॥ ५ ॥'

'काय देह घालुं कर्वतीं कर्मरीं । टाकूं या भीतरीं अग्निमाजीं । १ । काय सेवूं वन शीत उष्ण तान । साहों कीं मोहन धरुनी बैसों ॥ २ ॥ काय लावूं अंगीं भस्म उद्धळण । हिंडूं देश कोण खुंट चारी ॥ ३ ॥ काय त्यजूं अन्न करूनि उपास । काय करूं नास जीवित्वाचा ॥ ४ ॥ तुका ह्मणे काय करावा उपाव । ऐसा देईं भाव पांडुरंगा ॥ ५ ॥'

इतकी उत्कंठा झाल्यावर मग त्या श्रीगुरुमाउलीला धीर कसा निघेल? ती आपल्या देहाचेंही भान विसरतें व मनपवनाहून चपल गतीनें एकदम उडी घालून आपल्या बाळकाला दिव्य नंदनवनाच्या शीतल छायेंत आणून सोडते. मग तेथील मधुर रसाच्या यथेच्छ पानानें त्याचे समस्त श्रमपरिहार होऊन तुंद होत्साता मत्तभ्रमरवत् गुंजारव करीत भगवच्चरणाशीं नित्य संलग्न होऊन राहतो. याप्रमाणें निवृत्ततर्ष सत्पुरुषांच्या हातून जसें सनातनधर्मस्थापनेचें कार्य निर्हेतुक घडत असतें तसें ह्या भवश्रांत पुरुषांच्या हातूनही घडूं लागतें. आतां तिसरे 'श्रोत्रमनोभिराम' ह्यांचें भाग्य मात्र वरील दोघांपेक्षां हीन असतें. हे 'उत्तमश्लोकगुणानुवादाला' लुब्ध असतात, परंतु वैकुंठ कैलासादि लोकांतील वैभवाच्या लालचीनें लुब्ध असतात व आपल्याच कर्मरूपी

द्रव्यानें तयार केलेल्या मार्गानें यावयाला निघून येथें येऊन पोहचतात. परंतु त्यांच्या अभिलाषभावनेमुळेंच हें अपूर्व नंदनवन त्यांनां त्या त्या लोकांसारखें प्रतीत होतें. तथापि येथपर्यंतही येऊन पोहचणारे थोडेच असतात. बहुतेक मंडळी दिशाभूल होऊन स्वर्ग संसार नरकावस्थेच्या खड्यांतच पडणारी असते. यद्यपि भगवत्कथेचा एवढा दुरुपयोग त्यांच्या हातून घडतो तथापि फार झालें तर सनातन धर्माचें स्वरूप मलीन करण्यापलीकडे त्यांच्या हातून कांहीं अपकार घडत नाहीं. परंतु सनातन धर्माला अजिबात बुडवूं पाहणारी मंडळी ह्मटली ह्मणजे 'पशुघ्न' वर्ग होय. 'असत्यमप्रतिष्ठंतेजगदाहुरनीश्वरम्' । हें यांचें आद्य सूत्र होय. ह्या वर्गालाही ताळ्यावर आणण्याचा श्रुतिसंतांचा प्रयत्न दयार्द्र बुद्धीनें चालला असतो. कणाद गौतमादि आचार्यांनीं अवतार घेऊन ह्यांच्या मताचें खंडन केलें आहे, व तात तुकारामादि संतांनीं ह्यांचे दोष स्पष्ट दाखविले आहेत. त्या सर्वांच्या ह्मणण्यांतील मथितार्थ हाच कीं 'पशुघ्न'वर्ग हा समस्त पातकांची राशी आहे. 'पशुघ्न' ह्मणजे आत्महत्यारी किंवा देहाला आत्मा मानणारा. देहालाच आत्मा मानणें हें सर्वांत मोठें पाप होय. ह्याच्या पलीकडे पापाची अवधी राहिली नाहीं. देहच 'मी' ह्मणणाराला इह लोकही धड मिळत नाहीं तर परलोक कोठला? अशा अर्थाचें भगवद्वचन गीतेंत आहे. 'बळें देह मी ह्मणतां। कोटी ब्रह्महत्या माथां!' असें तुकारामांनीं ह्मटलें आहे. ह्याचें कारण उघडच आहे. इहलोक झाला तरी तेथील भोग भोगण्याला देहस्वास्थ्य पाहिजेच व त्याच्याचवर नास्तिकांची येवढी भिस्त आहे; परंतु ज्या देहाच्या सुखाकरितां नास्तिकाचा एवढा खटाटोप असतो तें शरीरस्वास्थ्यच मुळीं त्याला अतिपातकास्तव लाभत नाहीं असें स्वत: भगवान् अग्निवेशाचार्यच चरकसंहितेंत ह्मणतात. तें वचन असें:--

'नास्तिकस्यास्तिनैवात्मायदृच्छोपहतात्मन: ।
पातकेभ्य:परंचैतत्पातकंनास्तिकग्रह: ' ।।

(सूत्रस्थान तिस्रैषणीयप्रकरण अध्याय ११ श्लोक १६.)

ह्या वचनाचा संबंध शरीरस्वास्थ्याशींच असला पाहिजे. एऱ्हवीं नास्तिकवादाचा वैद्यशास्त्राशीं दुसरा संबंध दिसत नाहीं. तात्पर्य,

ज्यांना आत्महिताची चाड असेल त्यांनीं तडाक्यासरशी देहबुद्धि टाकून द्यावी. निदान अशा लोकांचा संसर्ग तरी न करतां प्रयत्नपूर्वक त्यांचा परित्यागच करावा; व विशेषत: त्यांच्या दूरीकरणार्थच श्रुतिसंतांनीं त्यांच्या दोषांचें आविष्करण केलेलें दिसतें.

'खलानांकण्टकानांचद्विविधैवप्रतिक्रिया ।
उपानन्मुखभङ्गोवादूरतोवाऽपिवर्जनम् ॥'

असें एक अपर वचनही त्याविषयीं प्रसिद्ध आहे. असो.

उपरि निर्दिष्ट केलेले पामर व विषयी पुरुष यद्यपि योग्य मार्गापासून भटकलेले आहेत तथापि दु:खनिवृत्तीची व नित्यसुखप्राप्तीची इच्छा त्यांनां आहेच. ह्मणून त्यांचे ठिकाणींही मुमुक्षुतापत्ति सिद्ध होत असल्यानें मुक्तिबोधक शास्त्रैकशरणता त्यांच्या गळीं येते. अखंड-परमानंदप्राप्ति ह्मणजेच मोक्ष. 'ज्ञानादेवतुकैवल्यं' असें यद्यपि श्रुतिवचन आहे तथापि भक्तीच्या नंदनवनांतलि नित्यनूतनरसप्रवाह-माधुरी सेवन केल्याशिवाय अखंडपरमानंदप्राप्तिरूप मोक्ष त्रिकालांतही मिळावयाचा नाहीं हा श्रुतीचा शुद्ध सिद्धांत आहे.

'यस्यदेवेपराभक्तिर्यथादेवेतथागुरौ ।
तस्यैतेकथिताह्यर्था:प्रकाशन्तेमहात्मन: ॥'

ही श्वेताश्वतर श्रुती ह्याच अर्थाचें प्रतिपादन करते. पुन्हा ज्ञान-प्राप्त्यर्थही कर्म उपासनादि साधनांस भक्तीची अपेक्षा आहेच. स्वतंत्र भक्ति जननी मात्र 'क्रियासिद्धि:सत्वेभवतिमहतांनोपकरणे' या कव्युक्तिप्रमाणें कोणाच्याही साह्याची अपेक्षा न करितां लीलेनेंच आपल्या बाळकास कडेवर घेऊन आपल्या नंदनवनांत क्रीडनार्थ घेऊन जाते. हेंच सनातन धर्माचें रहस्य होय; व हेंच (रहस्य) लुप्तप्राय झालें असतां जीवांच्या अंत:करणांत भवभ्रांतीचा लीलाविलास चालू राहून पामर व विषयी पुरुषांचे संघ निर्माण होत असतात, व त्यांच्या भंजनार्थ व तीव्रमुमुक्षूंच्या प्रेमप्रदानार्थ वेळोवेळीं हरीचे व हरिभक्तांचे अवतार प्रगट होऊन सनातन धर्माचें पुनरुज्जीवन होत असतें. 'संसृतिरेषामभक्ति:स्यान्नाज्ञानात्कारणासिद्धे:' हें शांडिल्यसूत्र व 'जीवन्मुक्ति:पराभक्तिस्तद्सिद्धिस्तुसंसृति:' हा टीकाश्लोकही असेंच सांगतात.

विदर्भदेशीय **श्रीगुलाबराव** महाराज यांच्या सिद्धप्रज्ञवाणींतून प्रगट होत असलेले विचारही वरील तत्वाचेंच श्रुति, युक्ति व अनुभवपूर्वक प्रतिपादन करीत आहेत व तेच 'सूक्तिरत्नावली' या नावानें प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न चालू आहे. ह्या सूक्तिरत्नावलीच्या प्रथम यष्टींतील 'श्रीमद्भगवद्गीतासंगति' नामक ग्रंथांत महाराज ह्मणतात:— असो ऐसें जरी कांहीं । तरी सुखता चेतनावीण नाहीं । आणि जगीं तंव सुख नाहीं । ह्मणूनि प्रवृत्ति इकडे ॥ वृत्तिस्थ सुख पूर्वी वळिलें । ह्मणूनि वृत्त्याश्रय सुख पाहिजे वहिलें । तें अनुभवा नाहीं आलें । चेतनाविण ॥ तें नाहीं ह्मणतां दुःख न सुटे । दुःखनिवृत्तिइच्छाही प्रकटे । शशशृंगादिइच्छा कोणा न घटे । ह्मणोनि आहे चित्सौख्य । हें चित्सौख्य परम निधान । तेंचि शुद्धवृत्तित्वें **श्रीकृष्णपण** । अशुद्ध वृत्तित्वें जगपण । जाहलें कीं ॥ (पृष्ट ६९ ओ० ५५ ते ५८ )

अशा प्रकारचें श्रीकृष्णाचें सच्चिदानंदस्वरूप सांगून तोच श्रीकृष्णपरमात्मा भक्त्यर्थ अवयवीइव कसा झाला हें सिद्ध करण्याकरितां 'अनध्यस्तविवर्त' ही नवीन परिभाषा महाराजांनीं तयार केली आहे. तें अनध्यस्ताविवर्तलक्षण येणेप्रमाणें आहे:— 'अभिन्नसत्ताऽपररूपत्वेसति भेदाभानपूर्वकमधिष्ठानज्ञानानावरकत्वेसतिच प्रीतिमात्रत्वादधिष्ठानज्ञानाऽनिवर्त्यमनध्यस्तविवर्तलक्षणम् ।' ( यष्टी १ पृष्ठ १३९ ) याचा भावार्थ असा:— ज्ञानेंकरून प्रीत्यनुसार वस्तूचें विशेष याथार्थ्य तो 'अनध्यस्तविवर्त'. याप्रमाणें वेदांत आणि भक्ति यांचा समन्वय करण्याकरितां भगवच्छरीराची सिद्धि करून अद्वैत भक्तीचे प्रतिपादन सर्वत्र केलें आहे. हाच यांच्या सूक्तिरत्नावलींतील विशेष होय. इतर विषय याच्या अनुषंगानें वर्णन केले आहेत. ह्यांत आलेले अद्वैत भक्तीचें प्रतिपादन कोठें महावाक्याच्या रीतीनें, कोठें शास्त्रीय पद्धतीनें, कोठें अलंकारदृष्टीनें, कोठें वृत्तिदृष्टीनें, कोठें अन्य रीतीनें असें अनेक प्रकारचें आहे. प्रथम यष्टींतील आद्य ग्रंथ जो '**भक्तिपदतीर्थामृत**' त्यांत महावाक्याच्या रीतीनें भक्तीचें वर्णन असून ग्रंथाचें प्रयोजन येणेंप्रमाणें सांगितलें आहे:— तरी तुमचे कृपाबळें । परम प्रीतिच्या कल्लोळें । पतिपत्नीभक्तीचे डोहळे । कीं सोहळे स्वानंदसुखाचे । ते आपण एकीचि

न भोगावें । कांहीं दुजियासीही द्यावें । हें उदारपण स्वभावें । तुमचा प्रसादू । (प्रथम तरंग ओ० ५।६) पुढें त्याच तरंगांत नुसत्या ज्ञानानें उपाधीचें निरसन होत नाहीं असें सांगून श्रुतिप्रामाण्यानें भक्तीची आवश्यकता सिद्ध केली आहे; व नारद आणि शांडिल्य यांच्या सूत्र-प्रामाण्यानें भक्त्युत्कर्ष निरूपण केला आहे. द्वितीय तरंगांत तत्पदार्थे-लक्षणद्वयनिरूपणानुरूप श्रीकृष्णसाक्षात्कारजन्य भक्त्युपदेश सांगून तृतीय तरंगांत त्वंपदनिरूपणपूर्वक ज्ञानगर्वनिषेधसहित हरिभक्त्युपदेश-निरूपण आहे. चतुर्थ तरंगांत संकेतदृष्टिमय असिपदविवरण करून ऐक्य भजनाची खूण, अकृत्रिम भक्तिचें स्वरूप, भक्ति सकळ रसांची जननी कशी? इत्यादि प्रकारें भक्त्युपदेशाचें निरूपण केलें आहे. शेवटी-ल पंचम तरंगांत प्रेमलक्षणा भक्तीचें स्वरूप, सर्व वर्णाश्रमधर्म प्रत्याहार धारणाध्यानादि योगाचा तिच्यांत अन्वय, गोपिकांची माधुर्यभक्ति, स्वतःची तल्लीन वृत्ति, हरि, हरिभक्त व हरिनाम यांचें प्रेमरसांत ऐक्य व गुरुपरंपरा याविषयीं निरूपण केलें आहे. येणेंप्रमाणें भक्तिपदतीर्था-मृतांतील विषय असून 'चौसष्टींत' ज्ञान व वृत्तीचें भक्तींत ऐक्य कसें होतें याविषयीं निरूपण केलें आहे. [ पृष्ठ २८ ते ३२ ] त्यापुढें सामान्य वाचकांकरितां 'पत्रांतील' कर्म उपासना व ज्ञानमार्गाचें कथन, मनोवृत्त्यनुसार निरनिराळ्या कक्षेतील जीवांचे अधिकार व तदनुसार विक्षेपनिवृत्त्यर्थ भक्तीचे प्रकार, सद्गुरूपासनेचें महत्व, गुरु-पुत्राचीं लक्षणें, साधनचतुष्टयनिरूपणपूर्वक ब्रह्मबोध इत्याद्यनेक विषय सुलभ रीतीनें वर्णन केले आहेत. [ पृष्ठ ३२ते६० ] नंतर 'श्रीमद्भगव-द्गीतासंगतीं'तील विषय विशेष महत्वाचे असल्यामुळें त्यांचें स्वरूप लक्षां-त येण्याकरितां येथें त्यांचा अनुक्रम देतों:—

मंगलाचरण व वेदांतशास्त्राविषयीं प्रवृत्तिकथन [ पृष्ठ ६१ ]. जगांतील समस्त लोक विषयी असल्यामुळें वेदांतश्रवणाकडे कोणाचीच प्रवृत्ति होत नाहीं अशी शंका व तिच्या निरसनार्थ सर्वांची मुमुक्षुतापत्ति-सिद्धी [ ६२ ]. श्रौतकैवल्याचें लक्षण व वेदांताचें मुख्य प्रयोजन [ ६३ ]. श्रवण मननादि करून रचलेल्या ग्रंथांचा अधिकारानुसार उपयोग व ब्रह्मनिष्ठांच्या वाणीची श्रेष्ठता (६३). श्रवण मननादि

ज्ञानांतील वैगुण्य, ब्रह्मसाक्षात्कृत कवीची पूर्णता, श्रवण मननादिकांचीं लक्षणें, असंभावनादिकांचीं लक्षणें, व श्रवणादिकांचें फल ६४. बद्ध, पामर, विषयी, व साधक यांचीं लक्षणें, साधकाच्या अंत:करणाची उत्क्रांत स्थिती, त्याला प्राप्त होणारी विवेकानुसार विरक्ति व निग्रहादि साधनसंपत्ति ६५. साधकाला मुमुक्षुदशा प्राप्त झाल्यावर सद्गुरूची प्राप्ति, महावाक्याच्या श्रवण मननादिकांनीं येणारी समाधिदशा व समाधिक्रमनिरूपण ६६. ब्रह्मनिष्ठांची अखंड समाधि, त्याच्या वाणीची वेदरूपता व श्रवण मननादि करून रचित ग्रंथांचें जिव्हादिकांनीं होणारें कार्य ६६. इंद्रियादिकांच्यां ज्ञानांतील तारतम्यकथन, आत्मज्ञानियाची योग्यता व त्याला वेदांतसिद्धांताचें निर्भ्रम ज्ञान ६७. श्रवण मननादि करून रचित ग्रंथांतील विषयांचें तारतम्य, ब्रह्मसंपन्नराचित ग्रंथाचें सर्वतोपरी पूर्णत्व व श्रीकृष्णाच्या पूर्णब्रह्मत्वामुळें गीतेची सर्व प्रकारें पूर्णता ६७. न्याय वैशेषिकादिकांचा जडवादखंडन व चित्सौख्याची सिद्धि ६८।६९. चित्सौख्यालाच शुद्धवृत्तित्वामुळें श्रीकृष्णपण व अशुद्धवृत्तिमुळें जगपण. वृत्तीची अव्यक्त दशाच कारणाविद्या व ज्ञानानें तिची सकार्य निवृत्ति हें गीताशास्त्राचें प्रयोजन. ज्ञानकाळाची बाधितानुवृत्तिगम्यता, जीवन्मुक्ति आणि विदेहमुक्ति यांचा ब्रह्मांत अन्वय, ज्ञानालाच वस्तुत्व व प्रमाणांचें वैय्यर्थ्य ६९. अविद्यानिरसनार्थ वेदाचें प्रामाण्य व ब्रह्मदर्शनाला श्रवण, मनन, ध्यानाचें हेतुत्व ७०. कोणत्याही परिस्थितींत सर्वांनां साधनसहित परमात्मप्राप्ति करून देणारी गीतारूपी नवीन प्रक्रिया, तिचे महावाक्यबोधक काण्डत्रय व कोणत्याही काण्डानें ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होण्याचा प्रकार ७१. गीतेविषयीं ज्ञानेश्वरतातांचें व मधुसूदनसरस्वतींचें म्हणणें, व फलत्यागाचें लक्षण ७२. कर्ममार्गीतील व ज्ञानमार्गीतील विघ्नें व तन्निवारणार्थ दोहोंच्यामध्यें भक्तीची योजना. भगवद्भक्तांच्या मतानें त्रिविध भक्तिनिष्ठा व भाष्यकारांच्या मतानें गीतेच्या तीन षट्कांत महावाक्याचें स्पष्टीकरण, वैदिक धर्माहून भक्तीची श्रेष्ठता ७३. हरिनामाची शक्ति व नामरूपांचें ऐक्य ७४. अनादिपुण्यसंचय कृष्णार्पण करण्यासंबंधीं तीन शंका व त्यांचें समाधान:—

श्रुति, युक्ति व अनुभवानें परमात्म्याचें सर्वज्ञत्वनिरूपण व प्रारब्ध-भिन्न संचितपुण्य भगवदर्पण केलें असतां चित्तशुद्धि ७५. नामाचे दशापराधनिरूपण ७६. आधुनिक जंतुवादादि अनेक नास्तिकवाद-खंडनपूर्वक पुनर्जन्माची सिद्धि ७९ ते ८०. संचित अदृष्ट पुण्यकर्म देवतास्मृतिगत असल्यामुळें तें कर्त्याच्या तंत्रांत नसतें म्हणून तें ईश्वरार्पण करितां येत नाहीं या शंकेचें उत्तर ८०।८१. मन शुद्ध होऊन एकाग्र होण्याकरितां पश्चात्तापपूर्वक नामस्मरण करण्याची प्रक्रिया. एकाग्रता वाढूं लागली असतां चित्ताला येणारी विवेकयोग्यता. नित्यानित्यवस्तुविवेकविवेचन ८१. विदेहप्रकृतिलयादि वर्णनपूर्वक वशीकारादि वैराग्यनिरूपण ८१ । ८२. दृढ मोक्षेच्छा झाली असतां सद्गुरुसेवनप्रकार ८३. महावाक्यदृढीकरणार्थ श्रवण-मननादिकांकरितां शारीरकसूत्राभ्यासनिरूपण. न्याय, सांख्य व योग यांतील श्रुतिविरुद्धांशत्यागपूर्वक वेदांतैक्य व मननिदि-ध्यासनार्थ त्यांचें ग्रहण ८३. ब्राह्मीस्थिती व संचितक्रियमाण-कर्मांचा ज्ञानानें नाश ८३. योगियांच्या मतानें प्रारब्धभोगाची व्यव-स्था व कायव्यूहाचें प्रयोजन. जीवन्मुक्तीला विरक्ति, उपरति व तत्व-ज्ञानाची आवश्यकता. [वसिष्ठमत]. ज्ञानोत्तरभक्तीनें दृष्टदुःखसहन-शक्ति व दृष्टसुखप्राप्ति. निरनिराळ्या आचार्यांच्या मतांतील भक्तीचें स्वरूप. जीवन्मुक्तिस्थित भक्तीचें त्रैविध्य, जविन्मुक्त ज्ञानी भक्ताची योग्यता व अद्वैतभक्तीचें लक्षण ८४. मनोनाश व वासनाक्षय होण्या-करितां संयमसिद्धीची अपेक्षा व ईश्वरप्रणिधानानें त्वरित संयमसिद्धि साधून त्रिभूमिक असंप्रज्ञात समाधीची प्राप्ति. भगवद्भक्ताची कृतकृत्य-ता व अभेदभक्तिकथन ८५. सर्वावस्थांत भगवद्भक्तीची आवश्यकता-निरूपण ८६. भक्तीवांचून जीवन्मुक्तीची दुर्लभता. भक्तांनां ईश्वर बुद्धियोग देतो. पूर्वजन्मसंस्कारानें अथवा कांहीं अचिंत्य प्रकारानें ज्ञानसिद्धि मिळाली असतां अहैतुक भक्तिच करावी. भक्तिविरहित साधनांनीं भगवत्कृपा मिळत नाहीं [ ८६ ]. अकृत्रिम भक्तीविषयीं श्रुतिसंताभिप्रायनिरूपणपूर्वक गीतागततत्वकथन ८६।८७. उपसं-हार ८७.

ह्या एकाच ग्रंथांतील विषयप्रतिपादनावरून सर्वांना सारख्या प्रमाणानें ज्ञानदान करण्याविषयीं महाराजांची उत्कंठा व सामर्थ्य दिसून येते. याच्या पुढें 'निदिध्यासनप्रकाश' हा ग्रंथ असून त्यांतील हरिनामप्रक्रियेनें ब्रह्मभावनिरूपण, प्रणवोपासनाप्राक्रियाभेदनिरूपण, दृष्टिसृष्टिवादपूर्वक शुद्धानुभवरहस्य व परमप्रेमलक्षणाभक्त्यैकवर्णन. भगवद्भक्तिपूर्वक गूढाभिसंधिसमाधियोगकथन. पंचकोशविवेकद्वारा ज्ञानोपरति विरक्ति भगवद्भक्त्यादिनिरूपण, ज्ञानकर्तृतंत्रवस्तुतंत्रतया सच्चिदानंदपदत्रयविवरण, सांख्ययोगवेदांतसमन्वयपूर्वक योगवेदांतमेलनोपयोगी बहुविध योगप्रक्रिया व सांख्ययोगांतील वेदांतगत फलनिरूपण, भगवद्भक्तिनिष्ठापूर्तिनिरूपण. इत्याद्यनेक प्रक्रिया साधकांना निदिध्यासनार्थ उपयोगी आहेत. व पुष्प ग्रंथांतील भक्तिसदनाचें वर्णन. स्वानंदप्राप्त्यर्थ भक्तीची श्रेष्ठता, ब्रह्माचें भक्त्यर्थ विष्णुरूपानें आविर्भवन, ज्ञानप्राप्तीकरितां शांकरपदार्थषट्कांचें निरूपण. अनादि भ्रमाची गुरुवाक्यानें निवृत्ति इत्यादि विषय मुमुक्षूंच्या मननार्थ आहेत. याप्रमाणें प्रथम यष्टींतील विषयांचें साधारण स्वरूप असून द्वितीय यष्टींतील पूर्वार्ध व उत्तरार्धांत आलेल्या विषयांचें स्वरूप त्या त्या ग्रंथाच्या विषयदिग्दर्शनावरून व 'परिचया'वरून कळण्यासारखें आहे. त्यासंबंधानें विशेष एवढेंच सांगावयाचें कीं पंचपदी, सद्वैजयंती, बाराखडी, चित्तोपदेश, त्रिकांडसार, तुंबडी, चिरंजीवपदाभ्यास, मणिमंजूषा, अलौकिकप्रवास, स्त्रीगीत, अपराधक्षमापनस्तोत्र, पत्रें, मातृपितृभावनाष्टक, इत्यादि ग्रंथ सामान्य जनतेला फार उपयोगी असून सोपानसिद्धि, नित्यतीर्थ, प्रियपाहुणेर, ध्यानयोगदिवाकर हे ग्रंथ उत्तरभूमिकास्थ साधकांच्या उपयोगी आहेत. भगवद्भक्तीचा सौरभ व 'प्रीतिनर्तन' ह्यांत भक्तीचा अगदीं कळस झालेला असून महाराजांनीं आपला केवळ स्वानुभवच त्यांत व्यक्त केलेला असल्यामुळें 'सोहंभावपारंगत व प्रेमळ' सज्जनच त्यांतील रस ग्रहण करण्याचे अधिकारी आहेत. महाराजांच्या ग्रंथांचे यद्यपि वर सामान्यतः वर्गीकरण केलेलें आहे तथापि प्रत्येक ग्रंथांत कांहीं सर्वसामान्य भाग आहेच; व तो सर्वांच्या उपयोगी पडण्यासारखा असून विचारी

वाचकांस बराच बोधप्रद होण्यासारखा आहे. एकंदरीत महाराजांच्या वाणींतील बोधाची योग्यता फार मोठी असून ती त्यांच्याच शद्बांनीं सांगूं लागल्यास अशी आहे:–

वेदांचें रहस्य शास्त्रांचें माहेर । पुराणांचें सार हेंचि एक ॥ १ ॥
भक्तीचा शेवट योगाचें शिखर । ज्ञानाचा आधार हेंचि एक ॥ २ ॥
कर्माचें सत्यत्व वेदाचा सिद्धांत । येथें होय अंत वासनेचा ॥ ३ ॥
जेथें जेथें मन जाऊनियां पाहे । तेथें तेथें आहे ज्ञानेश्वर ॥ ४ ॥

( प्रथम यष्टि पृष्ठ ५७ )

' तूं ह्या पुरुषाला सोडून अन्याकडे जाऊं नकोस ' ही महाराजांची आज्ञा पावल्यामुळें ' हीरा ' नामक वेश्येला जर अंतकाळीं श्रीज्ञानेश्वर महाराजांची स्मृती राहून ज्ञानेश्वरनामस्मरणांत तिनें सद्गति साधली तर त्यांच्या वाणींतील सद्बोध ग्रहण करणारांचें कोट कल्याण कां होऊं नये? अवश्यमेव होईल यांत संशय नाहीं. असो.

आजपर्यंत निघालेल्या यष्टींतील विषय विशेषेंकरून शुद्धांतःकरणाच्या मुमुक्षूंनांच उपयोगी पडण्यासारखे आहेत, परंतु आज प्रसिद्ध होत असलेला " प्रियलीलामहोत्सव " सर्वांचें सारखें मनोरंजन करून ज्ञानामृताचें पान करविणारा आहे. किंबहुना ' अध्यात्मशास्त्रीं इये । अंतरंगचि अधिकारिये । परी लोक वाक्चातुर्यें । होईल सुखिया ॥ ' हे ज्ञानेश्वर तातांचे शद्ब या प्रियलिलामहोत्सवाला उत्तम लागूं पडतील. श्रीमद्भागवताची पुण्यपावनता व सनातनधर्माचें पुनरुज्जीवन करणारा त्याचा अलौकिक प्रभाव सर्वविश्रुत आहे. ' स्वर्गेसत्येचकैलासेवैकुंठे नास्त्ययंरसः ।' अशी ज्याची दुर्लभता प्रत्यक्ष शुकाचार्यांनीं सांगितली, ज्याचा पुण्यप्रतापाविषयीं स्वतः व्यास भगवंताची ' श्रीमद्भागवतेमहामुनिकृतेकिंवापरैरीश्वरः । सद्योहृद्यवरुद्धयतेऽत्रकृतिभिःशुश्रूषिभिस्तत्क्षणात् ॥ ' अशी प्रतिज्ञा आहे, व जें श्रीहरीची प्रत्यक्ष वाङ्मय तनु आहे त्या भागवताची विशेष महती वर्णन करण्याला कोण समर्थ आहे ? त्याचाच आधार घेऊन हा ' प्रियलीलामहोत्सव ' ग्रंथ महाराजांनीं आरंभ केला. व प्रथमस्कंधाच्या आधारानें तयार केलेला हा त्याचा प्रथम भाग ' **आमंत्रणविलास** ' या नांवानें आज प्रसिद्ध होत आहे.

येथें इतकें अवश्य लक्षांत ठेवावें कीं आधाराला मूळ ग्रंथांतील कथा मात्र घेतलेली असून निरूपणाचा भाग नवीनच फार आहे. ह्यांत स्वग्रंथाचा उपक्रम महाराजांनीं येणेंप्रमाणें केला आहे:—

‘ विषयि मुमुक्षु मुक्तजन जेकीं । वासुदेव पारायण शेखीं ।
त्या सकलांनां शुकमुख वाणी । करि सुखि दाउनि भवभयवाणी ॥
ते श्रीमद्भागवत पुराणीं । कथित अधिष्ठुनि व्रजपतिराणी ।
साक्षि होउनि मी नित्य तियांची । सुनि वर्णिलि प्रख्याति जयांची ॥
प्राकृत सुंदर मंद जनाला । वाटे करूं मंदीर मनाला ॥ ’ (पृष्ठ११)

श्रीधर स्वामींनीं जे भाव विशेष स्पष्ट केले नाहींत त्यांचें स्पष्टीकरण करण्याचा ह्या ग्रंथांत यत्न केला असून भक्ति व वेदांत यांच्या समन्वयार्थ महाराजांनीं श्रीकृष्णशरीराचें अनध्यस्तविवर्तत्व जागजागीं सिद्ध केलें आहे व “श्रीकृष्ण भक्त्युद्बोधनार्थच या ग्रंथाचा प्रादुर्भाव आहे.” असें तृतीय सखी प्रेषणाचें ठायीं सांगून ठेवलें आहे. (पृष्ठ५१ खालून ३ री ओळ पहा ) हा यांचा यत्न सामान्य आहे असें कोणास वाटेल तर वाटो परंतु “ कथित अधिष्ठुनि व्रजपतिराणी । या त्यांच्या शब्दावरून त्यांचें आधिकारिक श्रीकृष्णपत्नित्व दिसून येतें. व “प्राकृत सुंदर मंद जनाला । वाटे करूं मंदीर मनाला ।” यावरून सर्वांच्याठायीं समान पुत्रवात्सल्य व्यक्त होतें. ह्या अलोट पुत्र प्रेमामुळें व भक्तीच्या नंदनवनाचें स्वामिनीत्व स्वत:कडेच असल्यामुळें त्यांना ‘ वृंदारक द्रुमाचें रसमय दिव्य फळ ’ महाराष्ट्रभूमीवर आणून मंद जनांला भक्तीचें मंदीर बांधून द्यावेसें वाटलें. दुसरें हा त्यांचा यत्न अनादि परंपरेला अनुसरूनच आहे कारण ‘ देहादिकाचे ठिकाणीं ज्यांचा अभिमान आहे अशांनां व विरक्तांनां पावन करणारें विमळभगवद्यश व त्याची लीला वर्णन करून सर्वांनां मार्ग दाखीव. ’ असें नारदांनीं व्यासाला पंचमसखीप्रेषणांत म्हटलें आहे. [ पृष्ठ ७१ ] हें प्राकृत सुंदर मंदीर अझून संपूर्ण तयार झालें नसल्यामुळें त्याच्या भव्यतेची व सौंदर्याची योग्य कल्पना करतां येणें यद्यपि अशक्य आहे तथापि भक्तीच्या नंदनवनांतील संपूर्ण चमत्कार यांत दृष्टिगोचर होतील

असें अनुमान होतें. ह्या आमंत्रणविलासाचे एकंदर सोळा अध्याय असून प्रत्येकाला ' सखीप्रेषण ' असें नांव दिलेलें आहे. ह्या नांवाची ' सखी परीक्षिती प्रश्नोक्ति । ती आजवरी प्रेषिली होती ॥ आतां उत्तरें प्रगटतील यादवपती । तो पुढती आगमन विलासू ॥ ' अशी उपपत्ती सोळाव्या प्रेषणाचे शेवटीं [ पृष्ठ ३२३ ओं० ४६९ ] सांगून नंतर ह्या आमंत्रणविलासावर हें षोडश खणांचें वृंदावन । येथ तुळसी सप्रेम अंतःकरण । तळीं बैसला मज मोहन । भाविक जन पूजक ॥ [ पृष्ठ ३२४ ओं० ४७६ ] असें सुंदर रूपक केलें आहे.

ह्या षोडश खणांचीच शोभा व त्यांतील दिव्य पदार्थ अगदीं अपूर्व आहेत. अनेक हृदयंगम पद्यांचे पुष्पगुच्छ, विचित्र शद्बांचे सुमनहार, अनुप्रासमय चूर्णिकांचीं परिमळ द्रव्यें, श्रुति युक्ति व अनुभवांचीं वायनें, नाना शंकासमाधानाच्या चित्रविचित्र रंगवल्लथा, भक्तीच्या नाना प्रक्रियांचीं कुंकुम केशरादि सौभाग्यद्रव्यें, प्रयत्नादि वाद निरूपणांचीं पंचामृतें, आख्यानोपाख्यानांचे वस्त्रालंकार, हरिनाम वर्णनाचे नैवेद्याकरितां मधुर पदार्थ आदिकरून पदार्थांची सुंदर रचना, श्रीकृष्ण स्वरूपाची व त्याच्या चरित्राची शृंगारयुक्त छबी, राधिकादि गोपबाळा व रुक्मिण्यादि स्त्रिया यांचा मधुर भाव, मधून मधून सत्संगमहिमावर्णनांचा सौरभ, कुंतीस्तुती, भीष्मस्तुती, गंगापंचरत्न इत्याद्यनेक मनोहर स्तोत्रें ह्यांची मोठ्या काळजीपूर्वक मांडणी करून ठेविली आहे. अभिप्राय हाच कीं भाविक पूजक जनांस कोणतीही अडचण न पडतां सुंदर शाम मूर्तीच्या पूजनानेंच त्यांच्या संपूर्ण इच्छा तृप्त व्हाव्या. सोळाव्या प्रेषणांतील शुकसमागमवर्णनाची हातवटी मात्र सगळ्यांहून अजब आहे. स्वतः वाचूनच त्याचा आनंद घेतला पाहिजे. ह्या षोडश सखीप्रेषणांतील समस्त पदार्थांचा [ विषयांचा ] व निवडक पद्यांचा अनुक्रम दुसरीकडे निराळा छापला आहे. त्यावरून त्यांचें स्वरूप लक्षांत येईल.

महाराजांच्या विषयप्रतिपादनाचा रोख मुख्यतः भगवत्प्रेमाकडे असून सर्व संतांच्या गुरुस्थानीं असणाऱ्या व्रजगोपिका त्याविषयीं

मुख्य प्रमाण होत. ह्मणून यांच्या संबंधीं वारंवार मार्मिकरीतीचें प्रतिपादन यांत आढळतें गोपिकांच्या भगवद्विषयक प्रेमाचें लक्षण महारा. जांनीं असें केलें आहे:—

संयोगेनसुखंयस्यवियोगेऽपिसुखंभवेत्।
पुन:संयोगसंप्राप्तौसुखंतस्मैनमाम्यहम्॥

[ प्रे० ११ पृष्ठ १६३ ]

अशा प्रकारचें निरपेक्ष प्रेम संपादन करण्याकरितां वैराग्यपूर्वक प्रयत्नाचा उपदेशही यांत ठिकठिकाणीं मोठ्या कळकळीनें केलेला आहे. सोळाव्या सखीप्रेषणांत परीक्षिच्चरित्र वर्णन करतानां महाराज ह्मणतात:— अपराधें देह प्रारब्ध झालें । तेणें बुद्धिस्वातंत्र्य नाहीं हरिलें । यालागीं मरणसमयींही रायें मांडिलें । वैराग्ययत्नें हरिभजन ॥ [ पृष्ठ २७३ ]. तसेंच चवदाव्या प्रेषणांत :— भगवत्सहायें प्रयत्नाधीन । कालही वश होय पूर्ण । यालागीं कलियुग आहे म्हणून । धर्म खंडन न कीजे ॥ ‘सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परी तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ या श्री समर्थ वचनीं । विश्वास ठेवावा आवडी करूनी । बळेंचि मन इंद्रियें रोधुनी । आणावा धरणी जगत्पती ॥ युगाचें पाहोनि बळ । सज्जनीं यत्न करावा प्रबळ । तेणें अवश्य वैकुंठपाळ । प्रगटे हृदयीं ॥ मग जो व्यष्टि हृदयीं प्रगटे । तोचि समष्टि ब्रह्मांडीं थाटे । तेथ कालबल नेटें । कांहीं न करी ॥ ह्मणोनि काल दैवादि वाद । स्वयें जाणोनि असिद्ध । भगवत्सहायें प्रयत्न वाद । नित्य सिद्ध आश्रयिती ॥ [ पृष्ठ २५९. ] याप्रमाणें प्रयत्नबळ वर्णन केलें आहे. अशा प्रकारचा दृढ प्रयत्न ज्या निरपेक्ष प्रेमाकरितां करावयाचा त्या भगवत्प्रेमाला धर्मादिकांची अपेक्षा नाहीं हें सिद्धकरण्याकरितां पुन्हा गोपिकांचा दृष्टांत:—

क्षत्रधर्मयुक्त भक्ति । करोनी पावले भगवंतीं ।
येथ आश्चर्य नाहीं निश्चिती । परी धर्मरहित भक्तींही उद्धरिले ॥

मदन विगतनयनगोपि गोकुळीं किती । त्यजुनि पती भजती त्या दिधलि सद्गती ॥ ध्रु० ॥ ललित गमन हसितमंद वदन साजिरें । पाहुनियां शङ्खवेत्रऽहंकृती जिरे ॥ १ ॥ पाहुनियां अलकावति कांतकन्यका । पावल्याचि ब्रह्मचिति परम धन्यका ॥ २ ॥

अति सुंदर गमन । तेंचि ज्यांचें मार्गदर्शन । मंदहास्यें रम्य वदन । प्रसाद चिन्ह तेंचि ज्यांचें ॥ प्रेमेंकरोनि पाहे गोविंद । तोचि ज्यांचा ब्रह्मानंद । घडी घडी ये गृहा मुकुंद । आदर तोची कल्पिती ॥ परम सदांध असूनी । भक्तिनिष्ठत्वें शार्ङ्गपाणी । सुंदर मंद हासादि करोनी । अत्यंत मानी जियातें ॥ एवं संयोगीं आनंद भरिता । वियोगीं लीलाविष्ट चित्ता । ज्ञानें ब्रह्माहमस्मि प्रत्यय येतां । तरी कृष्णादि स्वतः पैं होती ॥ स्वतः कल्पित लीलाकरोन । करिती अहंग्रहोपासन । परी जयांचा उपकार गहन । न पारयेहमापण हरि म्हणे ॥ त्या पर्णित सकळ गोपनारी । हा तंव धर्मार्थ अवतारी । परी जारबुद्ध्या भजोनियां पूतनारी । ब्रह्म सुंदरी पावल्या ॥ एवं जीवब्रह्मैक्यपण । पावल्या निश्चयें करोन । आणि अंतःकरणादिकें पूर्ण । कृष्ण स्त्रीपण पावल्या ॥ [प्रे. ९पृष्ठ१३३]

सारांश, कामक्रोधादिविकारांनीं जरी त्या परमात्म्याकडे चित्त लागलें तरी निरपेक्ष भगवत्प्रेमच त्याला प्राप्त होतें. 'कामक्रोधाभिमानादिकंतस्मिन्नेवकरणीयम् ।' असें याविषयीं भगवान नारदाचार्य ह्मणतात. तेसही असेंच म्हणतात:– ' अगा मी एक लाणीचे खागे । मज येवों ये सलसेनि मार्गें । भक्ति कां विषयविरागें । अथवा वैरें ॥' (ज्ञाने०) यांतील रहस्य स्वतः भगवंतांनींच आपल्या वाणीनें असें सांगितलें आहे:– 'नमय्यावेशितधियांकाम:कामायकल्पते । भर्जिता:क्वथिताधाना: प्रायोबीजायनेष्यते ॥' व ' धर्माविरुद्धोभूतेषुकामोस्मिभरतर्षभ ' असें ह्मणून धर्मअविरुद्ध कामाला आपली विभूति म्हटलें आहे. इतक्या श्रेष्ठ वचनांकडे डोळेझांक करून गोपिकांचा काम 'आसुरी संपत्ति' म्हणणें हें फार मोठें धाडस होय. व ह्या सिद्धांताचें प्रतिपादन करून कामक्रोधेचें स्वरूप लोकांपुढें मांडूं पाहणारांनां तें स्वरूप मुळींच कळलें नाहीं असें आम्ही स्पष्ट म्हणतों. मग त्यांतलें बीज प्रत्यक्ष उमा-

कांतानीं सांगितलें असलें तरी तें केवळ फोल होय यांत संशय नाहीं.

तात्पर्य परमात्म्याचेठिकाणीं कोणत्याही प्रकारानें चित्त लावलें असतां त्याची प्राप्ति होते हें अगदीं निर्विवाद आहे. मात्र तें चित्त अगदीं अनन्यगतिक असलें पाहिजे म्हणजे झालें. सुंदरदास म्हणतात—

होई अनन्य भजै भगवंतही और कछू उरमे नहीं राखे। देविरु देव जहांलग है डरके तिनकूं वही दीन न भाखे ।। जोग अरु जज्ञ क्रिया व्रतादिक तूं सपनेमे नहीं अभिलाखे। सुंदर अमृतपान कियो तब तौं कहुं कौन हलाहल चाखे ।। असो.

याप्रमाणें महाराजांच्या वाणींतील बोध सर्वांच्या अंतःकरणास पटून श्रीज्ञानेशचरणीं त्यांची अखंड रति वाढो अशी प्रार्थना करून ज्ञानेश्वरनामस्मरणांत ह्या परिचयाचा उपसंहार करतों.

।। श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।।

कार्तिक १८३२.
श्रीज्ञानेश्वर प्रेस, नागपूर.

प्रकाशक.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# विषयानुक्रम.

## मंगलाचरण. ( पृष्ठ १-१० )

श्रीगुरुहरिहरवंदन पृष्ठ १. शिवपंचाक्षरी आर्या २. द्वादशाक्षरी आर्या२. गुरुसंत महिमावर्णन ३. हरिहर भक्ति माहिमा वर्णन ६. हरिभजन महिमा७. सज्जनवंदन ८. खलजन वंदन९. हरिकथा कोणाला आवडत नाहीं? ९. श्रीकृष्णप्रार्थना ९-१०.

---

## सखीप्रेषण १ लें.

### ऋषिप्रश्नवर्णन. ( पृष्ठ ११-१८ )

गुरुदेववंदन ११. भागवतमहिमाकथनपूर्वकग्रंथारंभवर्णन ११. ' जन्माद्यस्येति ' प्रथमश्लोकव्याख्यानः— श्रीवेदव्यासांचें मंगलाचरण १२. भागवताची अद्वैतपरता १२. भागवतप्रतिपाद्य ईश्वराचें निर्गुणत्व सगुणत्वकथन १२. भारतभागवतऐक्य व हरिहरसाम्यकथन पूर्वक भागवत शास्त्राचाआशय १३. मंगलाचरण प्रकार १३. 'धर्मः प्रोज्झितकैतवेति' द्वितीयश्लोकव्याख्यानः-भागवताची वेदवत्प्रमाणता १३. कर्मोपासनादिकांडांहून भागवताची श्रेष्ठता १४. भागवताला समाधिभाषा ह्मणण्याचें कारण १४. भागवतांत प्रभुसंवित्, सुहृत्संवित् व कांतासंवित् असा तिन्ही प्रकारचा उपदेश आहे१५. 'निगमकल्पतरोरिति' तृतीय श्लोकव्याख्यानः— भागवताला वृंदारकद्रुमाचेंफळ ह्मणण्याचें कारण१५. या फळाची रसरूपता व सकलशास्त्रांहून श्रेष्ठता१६ ऋषींनीं सूताला विचारलेले प्रश्न १६.

---

## सखीप्रेषण २ रें.

### ऋषीच्या १ ल्या व २ ऱ्या प्रश्नाचें उत्तर. ( पृष्ठ १८-२७ )

गुरुदेवतास्मरण १८. ग्रंथारंभीं मंगलाचरणाचें प्रयोजन १९. सूताचें गुरुदेवतावंदनरूप मंगलाचरण १९. ऋषींच्या प्रश्नाचें अभिनंदन

करून सूतानें दिलेलें उत्तरः— ज्याच्यायोगानें निष्कामभक्ति उत्पन्न होते तोच सर्वांचा परमधर्म होय. २० निष्काम भक्तीचें लक्षण २० द्विविधधर्मांचें लक्षण २०. परमधर्मांचें लक्षण २०. धर्म भक्तीला उत्पादक कसा? या प्रश्नाचें उत्तर २०. भक्तीला योग ह्मणण्याचें कारण२०. भक्तियोगाचें सगुण व निर्गुण स्वरूप२०. भक्तीनेंच ज्ञानविरक्ति उत्पन्न होते या विषयीं अन्वयव्यतिरेकप्रतीतिपूर्वक निरूपण २०—२१. स्वर्गासाठीं धर्म करावा असें जल्पणारांची निंदा २१. भगवद्भक्तांच्या दृष्टीनें श्रौतधर्मांचें यथार्थस्वरूप २१. वांचण्याचें फळ व तत्वलक्षण२१. वेदांतश्रवणादिकानें ज्यांची भक्ति दृढ झाली अशा महात्म्यानांच आत्मस्वरूप दृष्ट होतें २२. श्रीकृष्णगुणांचे ठिकाणीं आवडी ठेवण्याविषयीं सुताचा उपदेश २२. भक्तिसमाधान सहज मिळण्याचा उपाय २२. चित्ताला हरिकथा रुचत नसली तर काय करावें? या प्रश्नाचें उत्तरः— चित्तशुद्धीचा उपाय व भक्तिद्वारा भगवत्तत्वज्ञानप्राप्तीचा क्रमनिरूपण २३. तत्वज्ञानाचें व भगवद्भक्तीचें फळ २३-२४. सृष्टिकार्य व्यवस्थेकरितां प्रकृतीच्या आश्रयानें भासणारें परमात्म्याचें त्रैविध्य २४. ब्रह्मदर्शन होण्याकरितां सत्वगुणाचें श्रेष्ठ्य व महाभारतान्वयानें शिवनारायणाचें ऐक्यकथन २४. भागवतशास्त्रांत विशेषेंकरून नारायणाचें प्रशंसन व वेदयज्ञादिकांचें नारायणपरत्व २५. ऋषींच्या द्वितीय प्रश्नाचें उत्तरः— नारायणाचें निमित्तोपादानकारणत्वनिरूपण २५. (पृष्ठ १५० ओ० ५८।५९ पहा.) परिणामी उपादान जी माया तिचें नित्यत्व, अनित्यत्व व सदसद्वैलक्षण्यनिरूपण २५. परमेश्वराचें जगज्जन्मादिमत्व [अज्ञबोधार्थ] मायेनें आरोपित आहे २५. नारायणाचें अध्यस्तविवर्तत्वनिरूपण २५—२६. नारायणाचें हरिहररूपानें अनध्यस्तविवर्तत्व व वृक्षरूपकदृष्टांतानें पूर्वसिद्धांतकथनपूर्वक अनध्यस्तविवर्ताची फलोपमतानिरूपण २६. [आपेक्षिक बिंबोपम ईश्वराचें अनध्यस्त विवर्तरूप श्रीकृष्णमूर्ती आहे या विषयीं विशेष निरूपण पुढें कुंती स्तुतींत केलें आहे पृष्ठ १०४ ते १०६]. उपसंहार २६.

# सर्वप्रेषण ३ रें.

## अवतारचरित्रवर्णन. ( पृष्ठ २७–६२. )

पूर्वकथानुसंधान. ऋषींच्या तृतीय प्रश्नाचें उत्तर २७. विराट्स्वरूपवर्णन २७. अवतारशरीर अत्यंत भौतिक नसून त्याला विराटधर्म उपासकार्थ सांगितले आहेत २७. विराटाच्या शुद्धसत्वविग्रह स्वरूपाचें ( आदिनारायणाचें ) वर्णन २८. विराट पुरुषाच्या अव्यक्तस्वरूपाचें वर्णन २८. आदिनारायणाचें अवतारबीजत्वनिरूपण २८. सनत्कुमारादि अवतार कथन २९. नारदपंचरात्रांतील वेदबाह्य अंशाविषयीं शिष्याची शंका व पांचरात्राच्या प्रामाण्याप्रामाण्याविषयीं पूर्वाचार्यांच्या वादात्मक मतांचा साधारणसमन्वयपूर्वक श्रीगुरूचें उत्तर:- पांचरात्रादि तंत्रांच्या मुख्य सिद्धांताविषयीं चतुर्धराचार्यांचें मत २९ पांचरात्रप्रामाण्याविषयीं ब्रह्मविद्याभरणकार [स्वामी अद्वैतानंद] यांनीं केलेल्या दोन उत्थाप्य शंका-३०. प्रथम आक्षेपावर स्वामींनीं दिलेल्या उत्तराची असंबद्धताकथनपूर्वक स्वमतानुसार पूर्वपक्षाचें सयुक्तिक खंडन ३०. 'ईश्वराच्या निश्वासापासून वेद झाले' या ह्मणण्याचा वास्तविक अर्थ ३१. 'ममैवांशो जीवलोके' हा गीतेंतील श्लोक श्रुतिविरुद्धासारखा आहे, या विद्यारण्यमताचें खंडन ३२. पूर्वपक्षकाराच्या दुसऱ्या आक्षेपाचें अद्वैतानंदस्वामींनीं केलेलें समाधान व पाशुपततंत्राविषयीं स्वमतकथन ३२. पद्मपुराणांत अद्वैतवादाला पाखंडमतांत गणलें आहे या शिष्यशंकेंतील दोषाचा परिहार ३३. पांचरात्राच्या अप्रामाण्याविषयीं वाद निरूपण:- ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्याभिप्रायानुसार पांचरात्रांतील श्रुत्यनुसार अंशनिरूपण ३३. शांकरभाष्यांतलि 'भागवत' शब्दाच्या अर्थाविषयीं दोन भिन्न मतें व त्यांतील आनंदगिरीच्या अर्थाची सप्रमाण ग्राह्यता ३३. भगवत्पादभाष्याभिप्रायानुसार पांचरात्रांतलि श्रुतिविरुद्धांश व वल्लभमतासह त्याचें खंडन ३४. उपरिनिर्दिष्ट भगवत्पूज्यपादाचार्यमताचा बहूश: बाध करणारा रामानुजभाष्याचा आशय ३५।३७. रामानुजांनां अडविणारा ग्रंथकाराचा प्रश्न व श्रीभाष्यकारांचें समर्थन ३६. उपर्युक्त

दोन्ही भाष्यांचें आलोचनपूर्वक स्वमतकथन, व शिष्यप्रश्नाचें उत्तर ३७. भगवंताचें नरनारायणादि अवतारवर्णन. ३८।४२ आपापल्या उपासनेविषयीं निरनिराळ्या प्रकारानें वाद करणाऱ्या वादियांच्या मतांचें एकदेशीयत्व व विष्णुशिवात्मक शुद्धसत्वोपहित एकच ईश्वर उपास्य आहे या सिद्धांताचें श्रुति, युक्ती व अनुभवपूर्वक निरूपण:– एकाच परमात्म्याचें सृष्टिकार्यार्थ त्रिगुणोपहितत्व व स्वभक्तानुग्रहार्थ शुद्धसत्वगुणेंकरून त्रिमूर्त्युपहितत्वनिरूपण ४२. किंचिज्जीवधर्मप्रतीतिस्तव हिरण्यगर्भाचा ज्ञानकांडाचेठायीं ईश्वरत्वेंकरून अंगीकार नाहीं या मताचें महाभारतप्रामाण्यानें समर्थन ४२. शैववैष्णवामधील वादांचें एकदेशीयत्व, पंचेश्वरकल्पनेची उत्पत्ती व तिचें युक्तीनें, तुकाराममहाराजांच्या वचनानें व वेदांतमतसमन्वयानें खंडन ४३. श्रीमच्छंकराचार्यांनीं उपासनार्थ सांगितलेल्या पंचायतनपूजेचें एकेश्वरमूलकत्व व त्याविषयीं गणेशपुराणाचें प्रामाण्य ४४. आपापल्या उपास्य मूर्तीविषयीं शैववैष्णवांचें वादात्मक ह्मणणें व त्याच्या प्रमाणभूत श्रुतिस्मृतींचें एकदेशीयत्व ४५. उपर्युक्त विवेचनाचें सारभूत तात्पर्य, ज्ञानाचा विचार, व उपासनेविषयीं निष्ठा ठेवल्यानें फलप्राप्ति, व येथें संक्षेपतः उपासनेची मीमांसा करण्याचें कारण ४५. ह्या विष्णुशिवात्मक शुद्धसत्व कारणब्रह्मापासून सर्व अंशकलावतार होतात ह्याविषयीं गर्गसंहितेंतील प्रक्रिया [ संक्षेपतः ] कथन ४६. अंशकलावताराविषयीं प्रस्तुत ग्रंथांतील प्रक्रियाकथन ४७. श्रीकृष्णमूर्तीत सर्वावतारांच्या शक्ती समान दिसतात याविषयीं 'विवक्षितगुणोपपत्तेश्च' या ब्रह्मसूत्राचा अभिप्रायनिरूपण:– ईश्वरी विभूती व देवता यांच्या ठिकाणीं आवडीच्या गुणांचा आरोप चालत नाहीं ४८. श्रीकृष्णलीलांचें सर्वमयत्वनिरूपण ४९।५१. श्रीकृष्णावताराच्या पूर्णत्वाची सिद्धि, त्याविषयीं तातवचनप्रामाण्य व 'अव्यक्त' शब्दाचें स्पष्टीकरण ५१. ग्रंथप्रादुर्भावकथन ५१. सनातनाचार्यांचा अभिप्राय, श्रीमद्भगवद्गीता, नारदभक्तिसूत्रादिप्रामाण्यावरून श्रीकृष्णावताराचें मुख्यप्रयोजननिरूपण ५२. श्रीकृष्णस्वरूपाची विष्णुशिवात्मकता ५४. अवतारचरितपठनचिंतनाची फलश्रुती ५४. नारायणचरितानें शिवदर्शनाची फलश्रुती ५५. जीवाची

स्वाभाविक बद्धस्थिती असल्यामुळें जीवब्रह्माचें ऐक्य संभवत नाहीं या मताचें युक्तिपूर्वक खंडन ५५. जीवाला बंधन कसें होतें याविषयीं जीवाच्या देहद्वयरूप उपाधीचें अध्यारोपापवादेंकरून[1] निरूपण:— अविद्या भगवदाश्रित कशी? या शिष्यशंकेचें लिंगपुराणवचनसमन्वयपूर्वक समाधान ५५. जीवाच्या भेददृष्टीमुळें अविद्या ही त्याला परमेश्वराचे-ठायीं प्रतीत होते याविषयीं सोदाहरणस्पष्टीकरण ५६. लिंगशरीराचें स्वरूप, त्याला अव्यक्त ह्मणण्याचें कारण व लिंगशरीररूप उपाधीचें अर्थापत्तिप्रमाणानें अनुमेयत्व ५७. लिंगशरीराच्यापूर्वी जीवाची सिद्धि नसल्यामुळें तें परमेश्वरानें आरोपित केलें काय? या प्रश्नाचें अनादि-षट्पदार्थकथनपूर्वक उत्तर ५७. लिंगशरीर 'आरोपित' ह्मणण्याचें कारण व ब्रह्माहून त्याची गौण सत्यता ५८. ज्ञानानें ब्रह्माचा बाध होतो किंवा नाहीं या प्रश्नाचें युक्ति, अनुभव व शास्त्रप्रतीतिपूर्वक उत्तर ५८. ब्रह्माचे-ठायीं वृत्तिव्याप्तिस्वीकार आहे आणि वृत्ति अविद्याजन्य आहे मग ब्रह्म-साक्षात्कार कसा होतो? या शंकेचें समाधान व मुक्तिद्वयलक्षणकथन-पूर्वक ब्रह्माची त्रिकालाबाध्यता ५९. जीवेश्वरांच्या जन्मकर्मांतील भेद व परमेश्वराच्या जन्मकर्मांची वर्णनयोग्यता ५९. जन्मकर्मादि लीलां-च्यायोगानें परमेश्वर संगी होतो किंवा नाहीं या प्रश्नाचें उत्तर व प्रभूला अमोघलील ह्मणण्याचें कारण ६०. सृष्ट्यादिक जीवकल्पित आहेत तर अनध्यस्तविवर्त तरी कसा होतो या प्रश्नाचें उत्तर ६०. प्रभूच्या सृष्ट्यादि लीला तर्कानें कोणीच जाणूं शकत नाहीं तर भक्तां-नां तरी त्या कशा समजतात या शंकेचें समाधान ६१.

उपसंहार:— रमारमणचरणमधुपान करणाऱ्या भगवद्भक्तांची धन्य-ता व आपल्याला भागवताचें श्रवण कोठें व कसें घडलें याविषयीं भागवतस्तवनपूर्वक सूताचें आत्मवृत्त ६१.

---

१ अध्यारोपापवादाचें सविस्तर निरूपण पृष्ठ १४८ ओ० २४ पासून पहावें.

# सर्वप्रेषण ४ थें

## भागवतारंभाचें कारणवर्णन. ( पृष्ठ ६२–६७ )

मंगलाचरण व शौनक मुनीचे सूतास प्रश्नः—

(१) भगवान व्यासांची भागवत वर्णन करण्याकडे प्रवृत्ति कां झाली? पृष्ठ ६२. (२) शुकाचार्य परम वैराग्यशील व समबुद्धि असून जड-मूकवत् हास्तिनपुरांत संचार करीत असतां लोकांनीं त्यांना कसें ओळखलें? शुकसमबुद्धिवर्णन ६३. श्रीमद्भागवताचें अपौरुषेयत्व ६३. शुकांची पावनता व निस्पृहतावर्णन ६३. (३) गृहस्थांचें घरीं गोदोहनमात्र-काल राहणारे शुक संपूर्ण भागवत सांगतपावेतों कसे राहिले? ६३. (४) महाराज परीक्षितीचे जन्मकर्म विवरून सांगण्याविषयीं ६४. परीक्षितीच्या सद्गुण, शौर्य, व प्रजावात्सल्यादि गुणांचें वर्णन ६४. (५)अशा पराश्रय तनूचा परीक्षितीनें कां त्याग केला?६४ सूताला वेदाधिकार नसूनही पुराणद्वारा सकल वेदार्थ जाणत असल्यामुळें त्याचें वैदिकत्व व ब्रह्मासनाला पात्रताकथनपूर्वक प्रश्नांचीं उत्तरें देण्याविषयीं ऋषींची विनंती ६४. सूताचें उत्तरः- व्यासावतारकथन ६४. व्यासांनीं केलेले वेदाचे विभाग, त्यांचें शिष्यांकरवीं अध्यापन व महाभारताख्यान रचण्याचें कारण ६५. महाभारतादि इतिहासपुराणांचें शूद्रांनीं पठन करावें अथवा करूं नये याविषयीं दोन पक्षांचें म्हणणें ६५. भगवान व्यासांची जगद्धिताविषयीं उपायचिंतनार्थ खिन्नमानता व तत्र [सरस्वतीतटीं] नारदस्वामींचें आगमन ६७.

---

# सर्वप्रेषण ५ वें.

## व्यासचित्तप्रसादनार्थ नारदांचें हरिकीर्तनगौरववर्णन.

## ( पृष्ठ ६८–८० )

श्रीगुरुनमन, व्यासांच्या खेदाविषयीं नारदाचा प्रश्न व व्यासांचें उत्तर ६८. व्यासांच्या असंतोषाचें नारदांनीं सांगितलेलें कारण व

व्यासकृतींतील न्यूनता ६९. हरिगुणवर्णनावांचून कवितेचें वैयर्थ्य ६९. भक्तिवांचून ब्रह्मज्ञानही अभिमान उत्पन्न करतें व कृष्णार्पणावांचून निष्काम कर्मही अधर्म होतो ७०. उपायांतरें टाकून कृष्णलीला वर्णन करण्याविषयीं व्यासांनां नारदांचें स्नेहपूर्वक सांगणें ७०. महाभारतांतील धर्मादिकांच्या निरूपणांतील दोष व कर्मत्यागपर निवृत्तिधर्माची कठीनता ७०. भगवल्लीलायशगानरूपी परमधर्माची सुलभता ७१. स्वधर्मनिष्ठतेहून धर्मादिरहित भगवद्भक्तीचें श्रेष्ठत्वनिरूपणः— स्वधर्माला भगवद्भक्तीची अपेक्षा आहे तद्वत् भगवद्भक्तीला स्वधर्माची अपेक्षा नाहीं ७२. स्वकर्मावांचून शरण आलेल्या दीनांचें रक्षण केलें असतां परमेश्वर वैषम्यादि दोषास पात्र होत नाहीं ७२. भक्तीला अडथळा येत नसला तर भगवदर्पणबुद्धीनें निष्काम कर्में करावीं पण पूर्णता भक्तीनेंच होतें ७२. अष्टकादिकांच्या कर्मप्रदानानें भक्तिअपेक्षेवांचूनच ययातिराजा स्वर्गास गेला व कर्माचीं पितृलोकादि फळें मिळतातच या शंकेचें समाधान ७२. सर्व संसार प्रारब्धावर टाकून परमार्थाविषयींच यत्न करावा याविषयीं महाभारताचें प्रमाण व अशा व्यवस्थेनें प्रयत्नवादी व प्रारब्धवादी यांचा विरोधपरिहार ७२. भगवद्भक्त कोणत्याही योनींत गेला तरी कर्मनिष्ठासारखा खालीं पडत नाहीं याविषयीं सप्रमाण निरूपण ७३. भगवद्भक्ताला जशी जातीची अपेक्षा नाहीं तसें पातित्यशास्त्रही त्याचेविषयीं लागू नाहीं, मात्र पतिताचा दुराचार भक्ति करतांनां सुटत गेला पाहिजे ७४. अन्वयव्यतिरेकानें परमात्मस्वरूपाचें अनुवादपूर्वक कथन करून व व्यासांनां त्यांच्या आधिकारिकत्वाचें स्मरण देऊन प्रभूच्या लीला व पराक्रम वर्णन करण्याविषयीं नारदांचें स्नेहानें सांगणें ७६. तपःशास्त्रश्रवणाध्ययनादिकांचें फल उत्तमश्लोकगुण वर्णन करणें हेंच आहे ७६. भगवत्कथा सत्संगानें कळते याविषयीं नारदांचें स्वानुभवपूर्वक प्राग्जन्मवृत्तकथन ७६. संतांच्या उच्छिष्टसेवनानें व सभक्तिक श्रवणविवेकानें नारदांनां शुद्ध त्वंपदार्थ ज्ञात होऊन निष्काम भक्ति प्राप्त झाली तो क्रमनिरूपण ७७. कार्योपाधि व कारणोपाधि निरसनार्थ उपाय (या कार्यकारणोपाधीचें स्पष्टीकरण १४२ व्या पृष्ठावर दृष्टांत-

पूर्वक केलें आहे. ) गमनसमर्यी मुनींनीं नारदाला अधिकारी जाणून केलेला ब्रह्मात्मैक्यबोध व त्याचा प्रभाव ७७. भगवंताला कर्में सकर्तृक अर्पण केलीं असतां तीं बंधनिवर्तक होऊन त्रिविधदु:खनिवृत्ती व अखंडपरमानंदप्राप्तीला कारण कशीं होतात याविषयीं वैद्यशास्त्रीयदृष्टांतपूर्वक निरूपण ७७. मागें ( पृष्ठ ७१ ते ७४ ) भगवद्भक्तीला कर्मांची अपेक्षा नाहीं असें सांगून आतां कर्मसापेक्षी भक्ति कां सांगतात या शंकेचें समाधान ७८. कर्मेंही करावयाचीं नाहींत व भगवद्भक्तीही नाहीं अशा उभयभ्रष्टांची चांडालसमता व ईश्वरार्पणकर्मांनीं चित्ताची शुद्धता ७८. चित्ताला जतूची उपमा, संस्कारांनां स्थायी ह्मणण्याचें कारण व मन विषयांत कठीण करून भगवच्चरणीं द्रुत केलें असतां परमानंदप्राप्ति ७८. सभक्तिक ज्ञान प्राप्त होण्याकरितां शास्त्रोक्त साधनक्रमनिरूपण ७८. भक्तांनां भगवत्कृपेनें सर्वज्ञत्वादि गुणांची अनायास प्राप्ति ७९. भक्तिरहित ज्ञानियाहून सभक्तिक ज्ञानियाची श्रेष्ठता व अनिर्वचनीय भगवत्प्रेमानें त्याची स्थिती ७९. कर्मानें कर्माचें निर्हरण कसें होतें ? ७९. भगवदाज्ञानुसार ब्रह्मार्पणत्वानें क्रियानिरूपण व त्यापासून भगवदनुग्रहसहित भक्तीची प्राप्ति ७९. भक्ति उत्पन्न झाली असतां चतुर्व्यूहोपासनाद्वारा अनध्यस्त भगवंताचें दर्शन व ब्रह्मबोधानें परमानंदप्राप्ति ८०. याप्रमाणें सज्जनमुखांतून ऐकलेल्या ज्ञानाचें अनुष्ठान केलें असतां नारदांनां झालेला भगवत्प्रसाद व लोकोद्धारार्थ भक्तिसहित हरियश निरूपण करण्याविषयीं व्यासांनां त्याचें सांगणें ८०.

---

## सखीप्रेषण ६ वें.

### नारदांचा व्यासांनां आपला पूर्वजन्म व स्वभाव कथन.

### ( पृष्ठ ८१–८९ )

आत्मचरित पुढें सांगण्याविषयीं व पूर्वकल्पाच्या स्मृतीचें कारण सांगण्याविषयीं व्यासांचा नारदांस प्रश्न ८१. नारदांचें उत्तर:—चातुर्मास्य

संपवून विप्रवर्य गेले असतां (नारदांचें) भगवच्चिंतनांत कालक्रमण. त्यांची परिस्थिती. मातृस्नेहबंध व भगवद्दर्शनाविषयीं तळमळ ८१. मातेचें निधन झालें असतां भगवदनुग्रह मानणें. तुकारामवचनाचें प्रामाण्य. विरोधीश्रुतिसमन्वयपूर्वक शंकासमाधान. ( नारदांचें ) उत्तरदिशेप्रत गमन ८२. मार्गांतील नाना समृद्ध देश व वनोपवनादिकांचे ठिकाणीं समदृष्टि ठेवून संतुष्ट मनानें पुढें जात असतां निर्जनमहारण्यांत [नारदांचा] प्रवेश. महारण्याचें वर्णन ८२. जीवनऱ्हदांत स्नानपानादिकानें श्रमपरिहार झाला असतां अश्वत्थ वृक्षातळीं बसून भगवद्ध्यानांत [ नारदांचें ] निमग्न होणें ८३. ध्यानांत प्रगट झालेल्या मूर्तीचें वर्णन व योगाहून भक्तीची सुलभता. हळु हळु नारायण हृदयांत प्रगटला असतां अंत:करणाची स्थिती ८३. समाधींत मग्न असूनही आनंदेंदंतारूप भगवंताचें रूप प्रगट होणें ८४. येथें योजलेल्या समाधी शद्बाचें स्पष्टीकरण व भगवद्रूप तिरोधान पावलें असतां विकल होण्याचें कारण. नारदाला उद्देशून भगवंताचें भाषण:— अनिष्पन्न योग्यांनां माझें दर्शन कठीण आहे. यद्यपि महावाक्येंकरून ज्ञान झालें तथापि माझें रूप दिसण्याला माझा अनुग्रहच हेतु आहे. माझे ठिकाणीं लब्धानुराग झालें असतां हृदयांतील कामादिमल दग्ध होतात ८४. तुला अल्प सत्संगती व यथाशक्ति सत्सेवा घडल्यामुळें तूं मद्भक्त झालास व हें अमंगळ भौतिकशरीर टाकल्यानंतर ब्रह्मज्ञ व शुद्ध असा दिव्यदेही संत होशील ८५. अंतकाळीं माझी स्मृती कशी राहील अशी भीति बाळगूं नकोस कारण माझ्या भक्तांची स्मृती माझ्या कृपेनें प्रलयकालींही नष्ट होत नाहीं. एक माझेंपण असलें म्हणजे भवकटक निश्चयानें निर्दलन होतें ८५. भगवद्रूप अंर्तहित झाल्यानंतर [नारदांचा] पुढील क्रम व प्रारब्धसंपल्यानंतर हरिजनशरीरीं गती. हरिजनशरीर कर्मारब्ध नसून शुद्ध व नित्य आहे [ श्रीधरमत ] ८५. कल्पांतसमयीं श्वासद्वारा ब्रह्मदेवाच्या हृदयांत प्रवेशून सृष्टिकालीं त्याच्या प्राणांपासून मरीच्यादि प्रजापतींसह [ नारदांचें ] उत्पन्न होणें ८६. कर्मी आणि उपासकांची अनुक्रमेंकरून ब्रह्मांडावरणाच्या आंत व बाहेर गती व नारदांची आवरणांतर्बाह्य गती व स्वातंत्र्यभगवदाज्ञेचें पालन व ब्रह्म-

वीण्याची उपपत्ती. गायनानें भगवत्प्राप्ति होते याविषयीं सप्रमाण निरूपण ८६. सर्व वर्णांचा गायनाविषयीं अधिकार [ ग्रंथ कर्त्याचें मत] ८७. प्रेमपूर्वक भगवद्गान केलें असतां नारायण आनंदानें नाचतो याविषयीं [ नारदांचा ] स्वानुभवकथन, व तृष्णा डाकिनीनें ज्यांना झडपलें आहे त्यांच्याकरितां दयापूर्वक कृष्णगुण वर्णन करण्याविषयीं व्यासांनां सांगणें ८७. श्रीहरीचें गुण वर्णन करणें हीच सर्वांची शाश्वती नौका होय याविषयीं श्रुतिसंतांचीं वचनें स्वानुभव व युक्ति-पूर्वक निरूपण ८७–८८. नारदचरिताचा उपसंहार, आपल्या अ-नुभवानें दुसरा भक्तिसंपन्न होत असेल तर स्वचरितही वर्णन केलें अ-सतां अभिमान बाधत नाहीं ८८. इतकें सांगून नारदांचें जगत्क-ल्याणार्थ गमन. संतांच्या हातानें जगत्कल्याणही वासनारहित होत असते ८८. उपसंहार:-नारदांची व त्यांच्या भक्तिभाग्याची धन्यता ८९.

---

## सर्वीप्रेषण ७ वें.

### परीक्षिज्जन्मकथेचा उपक्रम व द्रौणीनिग्रहवर्णन.

( पृष्ठ ८९–१०० )

श्रीगुरुनमन. भगवान् नारदांच्या गमनानंतर व्यासांनीं पुढें काय केलें तें सांगण्याविषयीं शौनकांचा प्रश्न व सूताचें उत्तर:– आपल्या शम्याप्रास आश्रमांत स्वस्थचित्त बसून नारदांनीं सांगितलेल्या गोष्टीं-कडे भक्तिपूर्वक मन लावून समाधिनिष्ठ प्रज्ञेनें व्यासांचें सर्व कांहीं जाणणें ८९. सांख्याचें 'सत्कार्य' वेदांतांत मिथ्या असून ज्ञानियाला कसें कळतें ? ९० व्यासांनीं समाधींत पाहिलेल्या गोष्टी. सात्वत शद्बब्रह्माचा संक्षेपतः विषय कथन. त्याचाच विस्तर सात्वतश्रुति होय व हिलाच भागवत किंवा समाधिभाषा हीं अपर नांवें आहेत. भागवत-संहितेच्या प्रेमपूर्वक श्रवणाचें फळ. ९० भागवती संहिता शुद्ध करून व्यासांचें शुकाला पढविणें ९०. परमात्म वस्तू जाणली असतां शास्त्रीय द्वैताचा निःशेष त्याग करावा असें श्रुतिस्मृति सांगत असतां व

महाराज शुक स्वयं आत्माराम असतां भागवत कां पढले ? या शौनक प्रश्नाचें सूतानें दिलेलें उत्तर ९१. भगवद्भजन हा मुक्तांचा स्वभाव व भूषण असून भगवंताचे गुण मुक्तीहून गोड आहेत याविषयीं नाना-प्रमाणपूर्वक निरूपण ९१. ऋषींनीं मागें (पृष्ठ ६४) परीक्षिज्जन्मकर्मा-विषयीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तरः— परीक्षिताचें जनन, पांडवांचें महाप्रस्थान व परीक्षिताचें मोचन हीं हरिकथासंगतित्वास्तव सांगण्याचा सूताचा उपक्रम ९३. भीमगदेंकरून दुर्योधन रणीं पडला असतां त्याच्या संतोषार्थ अश्वत्थाम्यानें द्रौपदीपुत्रांचीं शिरें तोडून नेऊन त्याला दाखविलीं असतां दुर्योधनानें त्याचा केलेला धि:कार. अश्वत्थाम्याचें कर्म पाहून दुर्योधनाला संतोष वाटला या महाभारत-कथेचा समन्वय ९३. याज्ञसेनीचें सांत्वन करण्याकरितां अर्जुनानें केलेली प्रतिज्ञा, अश्वत्थाम्याच्या वधार्थ रथारूढ होऊन त्याचा केलेला पाठलाग व त्यानें (अश्वत्थाम्यानें) ब्रह्मास्त्र सोडलें असतां त्या भयंकर तेजानें भयचकित होऊन श्रीकृष्णाचें केलेलें स्तवन ९४. ( ७१ व्या ओंवीवर शंका ) मायारहित परमात्मा मायेला वश न होऊन मूढ जीवांनां जशीं कर्मफळें देतो तशीं मुक्तांनां देतां येतात किंवा नाहीं व परमेश्वराच्या चिच्छक्तीनेंच जर मायेचा अभिभव होतो तर तिची निवृत्ती होऊन फलदातृत्व परमात्म्यावर वास्तविकच आलें पाहिजे ह्या शंकेचें रज्जुसर्प व लवणकणदृष्टांतानें समाधान व मायामोहित जीवांनां स्वपराक्रमानेंच कर्मफलें देत असल्यामुळें ईश्वराचें श्रेष्ठत्व ९५. कर्माप्रमाणेंच फळ होतें अथवा ईश्वर देतो तर ईश्वराकडे श्रेष्ठत्व कोणतें? असा प्रश्न व त्याच्या उत्तरार्थ थोड्या कर्माचें अनंत फल देण्यामध्यें ईश्वरी पराक्रमाची योजना व जीवकर्माची अपेक्षा याविषयीं निरूपण ९६. अर्जुनाची स्तुती व हें भयंकर तेज कशाचें आहे हा प्रश्न ऐकून श्रीकृष्णानें दिलेलें उत्तर व आपल्या ब्रह्मास्त्रानें अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्राचें निवारण करण्याविषयीं आज्ञा. अर्जुनानें ब्रह्मास्त्र सोडलें असतां दोन्ही अस्त्रांचा तेजकल्लोळांत प्रजानाशसमय ओढवलेला पाहून अर्जुनानेंच भगवंताची इच्छा जाणून दोन्ही अस्त्रांचा केलेला उपसंहार व कोपून अश्वत्थाम्याला बांधून शिबिरांत नेण्याकरितां उद्युक्त होणें ९६.

त्याला मारण्याविषयीं श्रीकृष्णाचा अर्जुनाला उपदेश—मद्यपान केलेला, असावध इत्यादि दोषयुक्त शत्रूला यद्यपि धर्मवेत्ते मारीत नाहींत तथापि दुसऱ्याचे प्राण घेऊन जो आपले प्राण पुष्ट करितो त्याला मारणेंच उचित आहे याविषयीं स्मृतिप्रामाण्यपूर्वक निरूपण ९७. राजानें अपराधांची क्षमा करावी किंवा नाहीं या प्रश्नाचें नृपनीतिविवेचनपूर्वक उत्तर ९७. निद्रेंत बाळांचा घात करणें हें अश्वत्थाम्याचें अत्यंत गर्ह्यकर्म व द्रौपदीजवळ अर्जुनाची प्रतिज्ञा ह्या दोन्ही कारणांस्तव अश्वत्थाम्याला मारून टाकण्याविषयीं ( अर्जुनाच्या परीक्षेकरितां ) भगवान् बोलिले असतांही त्याला मारणें अर्जुनाला योग्य वाटलें नाहीं याचीं कारणें व शिबिरास आल्यावर द्रौपदीपुढें आणलें असतां शोक करीत असतांही त्या साध्वीनें अश्वत्थाम्याला सोडून देण्याविषयीं केलेलें न्यायाला व धर्माला अनुरूप असें भाषण व भीमाचें त्याला मारण्याविषयीं भाषण ९८. याप्रमाणें भीमानें अश्वत्थाम्याच्या वधाविषयीं अर्जुनाला प्रवर्तविणें व द्रौपदीचें निवारण करणें पाहून 'ब्रह्मबंधुर्न हन्तव्य' इत्यादि ब्राह्मणाला न मारण्याविषयीं धर्मशास्त्रवचनरूप आज्ञा व 'आततायिनमायांतं' इत्यादि ब्राह्मणाला मारण्याविषयीं स्मृतिवचनरूप आज्ञा ह्या आपल्या दोन्ही आज्ञांचें, द्रौपदीजवळ केलेल्या प्रतिज्ञेचें व भीमादिकांच्या व आपल्या इच्छेचें अर्जुनानें पालन करण्याविषयीं श्रीकृष्णाचें भाषण व त्याप्रमाणें अश्वत्थाम्याला अर्जुनानें केलेली शिक्षा ९९. उपसंहार. १००.

---

## सर्गप्रेषण ८ वें.

### कुंतीस्तुती व युधिष्ठिरानुताप वर्णन. ( पृष्ठ १००–११८ )

मंगलाचरण. अष्टम प्रेषणांतील विषयांचें संक्षेपेंकरून कथन १००. धृतराष्ट्र व गांधारी आदिकरून स्त्रियांसह श्रीकृष्णाला बरोबर घेऊन

पांडवांचें गंगातीरीं गमन व मृतांस जल देऊन शोकाकुलित होणें. ऋषींसहवर्तमान श्रीकृष्णांनीं त्यांचें केलेलें सांत्वन. असत् नृपांचा घात, युधिष्ठिराचें राज्य परत देवविणें आदिकरून कृत्यें संपादून द्वारकेला जाण्याकरितां श्रीकृष्णाचें रथारूढ होणें १०१. श्रीकृष्णानें उत्तरा भयाभीत होऊन धांवत आलेली पाहून आपल्या सुदर्शनानें तिचें, तिच्या गर्भाचें व पांडवांचें अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून रक्षण करणें १०२. श्रीकृष्णाला राहविण्याकरितां स्तवार्थ कुंतीचें उद्युक्त होणें. सूतानें शौनकादिकांनां सांगितलेलें ज्ञान करून घेण्याचे दोन प्रकार, त्यांतील दुसऱ्या प्रकाराचें वैशेष्य व त्याचें कुंतीनें केलेलें अवलंबन. मूर्त्युपहित श्रीकृष्णाची स्तुती करणें कनिष्ठ असून तिजपासून कुंतीला उच्चतर ज्ञान कसें झालें ? या शिष्य प्रश्नाचें ईश्वराचीं पांच रूपें निरूपणपूर्वक उत्तर. ( याविषयीं विशेष निरूपण २५–२६ पृष्ठावर पहावें ) १०२. पांचवें रूप ( हरिहरत्व ) शुद्धाचे ठिकाणीं प्रीतियोगानें होतें असें म्हणण्याचें चारी मूर्तीचे ठिकाणीं जरी भूमिरूप ब्रह्माचाच आनंद आहे तथापि त्याची परम व्यक्तता या फलोपम हरिहर पुरुषांत आहे – हें कारण १०३. शुद्धाचे ठिकाणीं तिन्ही कालीं सर्वांचाच अभाव असल्यामुळें शबलादि चारी रूपें जीवकल्पितच असलीं पाहिजेत अशी शंका व त्या रूपांचें विवर्तत्वनिरूपणपूर्वक उत्तर १०३. श्रीकृष्णशरीराची सप्रमाण नित्यता व प्रतिबिंबवाद आणि आभासवाद यांतील भेदकथनपूर्वक दृष्टिसृष्टिवादानुसार शबलादि तीन रूपांचें जीवमय अध्यस्तविवर्तत्व व हरिहररूपाचें अनध्यस्तविवर्तत्वनिरूपण १०४. 'नारायण कल्पांतरीं नाश पावतो' या महाभारतांतील वचनावर शंका व तिचें समाधान १०४. 'अशा प्रकारचें जें शुद्ध ब्रह्म त्याला जाणून तेंच हें अनध्यस्तविवर्त कृष्णरूप आहे म्हणून त्याची स्तुती करून कुंतीनें ज्ञान करून घेतलें' या वाक्याचा अर्थ सुवर्णालंकार दृष्टांतानें व श्रीतातनाथ वचनप्रामाण्यानें सम्यक शिष्यबुद्धिस्थ करून देणें १०५ कुंतीस्तुती:– 'तूं आदि पुरुष शुद्ध साचार । तूं ईश्वर प्रकृतिपर । सर्वभूतां सबाह्यांतर । व्यापूनि असती ॥' या ओवीच्या अर्थाचें दृष्टिसृष्ट्यन्वयें विवेचन १०६. भगवंताच्या अनध्यस्त-

स्वरूपाचें व अचिंत्य गुणांचें स्तवन. कृष्ण व वासुदेव नामांची व्युत्पत्ति व त्यांचें सगुणनिर्गुणत्व १०६–१०७ श्रीकृष्णाच्या अखंड बाल्यरूपाला नमन १०७. देवकीमातेहून आपल्यावर असलेल्या प्रेमाधिक्याचें वर्णन. श्रीकृष्णाच्या नाना उपकारांचें वर्णन १०७. स्वतःचें अनन्यगतिकत्ववर्णन १०८. भक्तिहीन उत्तमजन्म व ब्राह्मणशरीराचें वैय्यर्थ्य कथन. धनदुर्मदांधवर्णन १०८. धनत्यागप्रशंसा १०९. निर्धन पुरुषाची भक्तीला पात्रता ११०. भगवंताची नित्यतृप्तता, प्रेमवशता, भक्तवात्सल्य, व त्याचें काल, ईशान, व अनादि अनंत स्वरूप ११०. भगवंताचें समत्व १११ कुंतीवचनावरून निघणारें कृष्णावताराचें मुख्य प्रयोजन व श्रीकृष्णाचें अकर्तृत्वकथन. भगवच्चरित्राचा अगाधपणा १११ श्रीकृष्णावतारप्रयोजनाविषयीं मतांतरें ११२. ब्रह्मनिष्ठांच्या मतानुसार श्रीकृष्णावताराचें प्रयोजन व नित्य वर्तमानता ११३ इतर मतांहून ब्रह्मनिष्ठांच्या मताचें परमप्रामाण्य. श्रीकृष्णगुणगायनवर्णनचिंतनानें भगवत्पदाची प्राप्ती. श्रीकृष्णाला राहण्याविषयीं कुंतीची सकारण विनंती ११३ सृष्टीची श्रीकृष्णैकोपजीविता ११४ श्रीकृष्णगमनानें पांडवांचें अकल्याण व राहण्यानें यादवांनां उद्वेग होणार हें पाहून अति व्याकुल चित्त झालेल्या कुंतीनें श्रीकृष्णाच्या निर्गुणस्वरूपाचें व हरिहरात्मक सगुणस्वरूपाचें केलेलें स्तवन व अनन्यभक्तीचें याचन ११४–११५ याप्रमाणें कुंतीनें स्तुती केली असतां भगवंतानें मंदस्मित करून दिलेला प्रसाद व गजपुरांत प्रवेश ११६. तेथें कांहीं दिवस राहून सुभद्रादि स्त्रियांस पुसून पुन्हा द्वारकेस जाण्याकरितां निघाले असतां पांडवांचा आक्रांत व त्यांच्या विनंतीवरून देवांचें तेथें आणखी कांहीं दिवस राहणें. व्यासादि मुनी व श्रीकृष्ण यांनीं अनेक प्रकारें बोध केला असतांही धर्माचा शोक निवृत्त कां झाला नाहीं या शंकेचें समाधान ११६. श्रीकृष्णाचा अभिप्राय व्यासादिकांनां समजला नाहीं या श्रीधराचार्यांच्या म्हणण्याचा भारतवचनाशीं विरोध ११७. कौरवादि गोत्रजांच्या वधाविषयीं युधिष्ठिराचा शोकवर्णन. उपसंहार ११७

# सखीप्रेषण ९ वें.

## भीष्माचा युधिष्ठिरास उपदेश, भीष्मस्तुती, भीष्ममुक्ति व युधिष्ठिराला राज्यप्राप्ति वर्णन. ( पृष्ठ ११८–१३६ )

मंगलाचरण. शोक निवृत्त्यर्थ भीष्ममुखानें ज्ञान श्रवण करण्याकरितां कुरुक्षेत्रीं जाण्याचा धर्मराजाचा विचार, त्याला श्रीकृष्णाचें अनुमोदन, व सर्वांचें (श्रीकृष्णासह) भीष्मशरशय्येपाशीं समागमन ११८. भीष्माचा समागम व श्रीकृष्णाचें अनायासदर्शन या दोन्ही लाभांच्या आशेनें समस्त देवर्षि आदिकरून ऋषीमुनींचें शिष्यसह तेथें आगमन व श्रीकृष्णासहवर्तमान सर्वांचें पूजन केल्यानंतर युधिष्ठिरादिकांनां उद्देशून स्नेहसजल नेत्रानें भीष्मांनीं केलेलें भाषणः— धर्म, विप्र व भगवान् श्रीकृष्ण यांचा आश्रय असतां पांडवांनीं शोकग्रस्त असावें याविषयीं सखेदाश्चर्य व सर्व प्रकारचें पाठबळ असतांनां ज्याअर्थीं दुःखें प्राप्त होतात त्याअर्थीं हें सर्व कालकृत असून कालगतीच अनिवार आहे अशा शद्बांनीं पांडवांचें सांत्वन ११९. सर्वाला काल कारण आहे तर प्रयत्न कां करावा ? अशी शंका व तिच्या समाधानार्थ कालादिकांची ( काळ, दैव, परेशेच्छा ) साधारण अपेक्षा सर्वांनां असून विशेष अपेक्षा प्रयत्नाचीच आहे याविषयीं भीष्माच्या ह्मणण्यांतील अभिप्राय सयुक्तिक निरूपण १२०. परमात्म्याची भक्तिवशता व तो ( परमात्मा) कर्मफलदाता असूनही कोणाच्या कालदैवादिकांचें निवारण न करण्याचें कारण १२०. बीजवृक्षाचा व गवळ्यांचा दृष्टांत, कर्म तत्फलदाता ईश्वर व जीव यांचा अनादि संबंध, गुरु, शास्त्र, आणि विचार यांच्या साह्यानें प्रयत्नाची शक्यता व ईश्वराचीं पर्जन्यवत् साधारणकारणता १२१. दैवालाही प्रयत्नानें वळवितां येतें असें वासिष्ठमत, ब्रह्मसूत्र व शारीरभाष्यानुसार परमात्म्याचें कृतप्रयत्नापेक्षित्व, श्रीकृष्णपरमात्म्याच्या गूढकर्तव्याची अगम्यता व पूर्वी झालेलें दुःख दैवादिकांवर टाकून श्रीकृष्णाचा अनुचर होऊन प्रयत्नानें स्वधर्म साधण्याविषयीं आज्ञा १२१. दैव शद्बाचें यथार्थलक्षण व प्रयत्नाची योग्य दिशा १२२. परमात्म्याचें शरीर मायेनें झालें आहे व सच्चिदानंदरूपच पर-

मश्वरशरीर आहे असें मधुसूदन स्वामींनीं गूढार्थदीपिकेंत दाखवि-
लेले दोन पक्ष व पतिव्रतेच्या दृष्टांतानें त्यांचा समन्वय १२२. भगव-
च्छरीरापासून सुख, दुःख, व मोह हे तिन्ही होत असल्यामुळें तें
त्रिगुणात्मक म्हणजे प्रकृतिजन्यच असलें पाहिजे याविषयीं भक्तिर-
सायन, पंचदशी व सांख्य भाष्याचें प्रमाण देऊन शिष्याची शंका व
तिच्या निरसनार्थ श्रीकृष्णाचें ब्रह्मानध्यस्तविवर्तरूप त्यापासून मूढांना
त्यांच्या त्यांच्या गुणारोपाप्रमाणें सुखादिकांची प्राप्ती व संतप्रत्ययभिन्न
मूढांच्या सुखाचा अर्थया विषयीं सदृष्टांत निरूपण १२३. आपल्या
भक्तांच्या ठिकाणीं परमात्म्याचें ब्रह्मत्वच प्रगट आहे याविषयीं भगव-
द्गीतेंतील वचनांचा भावार्थनिरूपण १२४. याचा प्रभाव जाणणारे
याचें अपरस्वरूप असे महात्मे याचें अनन्य भजन कसें करतात
ती रीति १२५. पांडवांनीं श्रीकृष्णाच्या ठिकाणीं सोयरेपणाचें नातें
ठेवून अनेक प्रकारचीं कामें करवून घेतलीं याविषयीं निषेध व त्यानें
केलेल्या उपदेशांतील वर्म न कळण्याचें कारण. असा हा परमात्मा
असून आमचा सारथी कसा झाला अशी शंका आल्यास तिच्या निर-
सनार्थ श्रीकृष्णाची सर्वात्मक अद्वैतस्थिति निरूपण १२५।१२६.
देवानें अर्जुनाला विश्वरूप दाखविलें त्यावेळीं " या कौरवांनां मी मार-
लें आहे तूं निमित्त मात्र हो " असें ह्मटलें व अर्जुनाला आपला भक्त
ह्मटलें यावरून श्रीकृष्णाचेठायीं विषमत्व येतें अशी कोणी शंका के-
ल्यास तिच्या निरसनार्थ हा परमात्मा कर्माप्रमाणें फल देतो, एकाला
वैर व दुसऱ्याला भक्ति असें वैषम्य त्याचे ठिकाणीं नाहीं याविषयीं
म्लेंच्छांपासून अर्जुन आपलें रक्षण करूं शकला नाहीं ही महाभारत-
कथानिरूपणपूर्वक विवेचन १२६. या प्रभूला लोकांत भक्तिवश कां
ह्मणतात यांतील वैशेष्य पतिव्रतेच्या दृष्टांतानें निरूपण व वंद्यासंसक्ती-
चा आश्रय करून परमात्मा भक्ताधीन कसा असतो याविषयीं दृष्टांत
१२६. ईश्वराच्या वंद्यासंसक्तिविषयीं शिष्याची शंका व तिच्या निर-
सनार्थ वंध्यासंसक्तीची बंधनरूपता, भक्तीवांचून इतर जीवन्मुक्तांनां
तिचा सोसावा लागणारा त्रास भक्तीसहित जीवन्मुक्तांच्या ठिकाणीं वं-
ध्यासंसक्तीचा अभिभव व यावदधिकार वंद्यासंसक्तीची संप्राप्ती परमे-

श्वराचा अनध्यस्तविवर्तरूप देह नित्य असल्यामुळें त्याच्या प्रेमवर्धक-त्वादि वंद्यासंसक्तीची नित्यता अनध्यस्तविवर्तत्वामुळें त्यांची नित्यमुक्ति व परमार्थाचें यथार्थ लक्षण याविषयीं सप्रमाण निरूपण १२७. हा परमात्मा विषमरहित असूनही एकांत भक्तावर अनुग्रह करणारा आहे याविषयीं भीष्मांनीं स्वत:आपलेच दिलेलें उदाहरण १२८. या-प्रमाणें भाषण करून भीष्माची झालेली स्थिती व भक्तिगंगेंत देह ठेव-ण्याचें महत्वनिरूपण १२८. जडशरीराचा स्वेच्छेनें त्याग करीपर्यंत तो प्रेमळ सखा आपल्या समोर उभा राहो अशी भीष्माची याचना व भगवन्मूर्तीचें ध्यानवर्णन १२९. ह्या भीष्माच्या स्थितीविषयीं मयूर-पंतवचन व "गीतामृतनिधी" या शद्बाचा भावकथन. पितामहाला या प्रमाणें कृपासंपन्न पाहून युधिष्ठिरानें विचारलेले नाना धर्म व ते सम-स्त सांगत असतांनां उत्तरायणाची संप्राप्ती १२९. नंतर वाणीचा उप-संहार करून भगवंताच्या ठिकाणीं विशुद्ध धारणा केली असतां भीष्मा-च्या सकल श्रमांचा परिहार व त्यांनीं श्रीकृष्णाचा केलेला प्रेमळ स्त-व:— तटस्थ व स्वरूप लक्षणें करून भगवंताचें स्तवन व साहित्यशा-स्त्रदृष्ट्या 'रति' शद्बाचें लक्षण. श्रीकृष्णाचें सगुणध्यानवर्णन १३०. युद्धसमयीं श्रीकृष्णाच्या सारथ्यस्वरूपाचें वर्णन १३१. अर्जुनाचे ठि-काणीं श्रीकृष्णाचें सख्यप्रेम व शिष्यप्रेमवर्णन. गीतोपदेशामुळें श्रीकृ-ष्णाचें जगद्गुरुत्व व गीतेचें औदार्य १३१. स्वत:ची प्रतिज्ञा सोडून स्वभक्ताच्या ( भीष्माच्या ) प्रतिज्ञेचें रक्षण करण्याकरितां हातीं चक्र घेऊन ( भीष्मवधार्थ ) श्रीकृष्ण धांवले असतां त्या प्रसंगीचें श्रीकृष्ण-ध्यान व स्वत:चा आततायीपणा यांचें हृदयद्रावक वर्णन १३२. भग-वन्मुखश्री अवलोकन करीत युद्धांत मेलेल्या वीरांची उत्तम गती व श्रीकृष्णाचा अहेतुक अनुग्राहक स्वभाववर्णन १३२. धर्मरहित भगव-द्भक्तीनेंही हा परमात्मा उद्धार करितो याविषयीं गोपीभक्ति वर्णन १३३. गोपिकांचें जारत्वीं पतिव्रतापण व सत्कार्यदृष्टीनें हरीस्त्रीत्वाची नित्यता १३३. इतरांचें अंत:करणही तत्समान असून अभिभूत होण्याचें कारण १३४. मिश्र सत्वगुणामुळें अभक्त ज्ञानियांची विदेहमुक्ति व श्रीकृष्णप्रेमानें शुद्धसत्वगुणामुळें गोपिकांची नित्यमुक्तिवर्णन. आचार्य

व तातवचनप्रामाण्यानें गोपिकांची अभेदभक्तिनिरूपण १३४. हरि-हरत्वैक्येंकरून जगत्पूज्य अशा श्रीकृष्णाचें स्तवन व भीष्माचे स्वानू-भूतिविषयीं उद्गार १३५. भीष्माला प्राप्त झालेल्या पूर्ण ब्रह्मात्मैक्य स्थितीचें सूतानें केलेलें वर्णन १३६. भीष्ममुक्तिदर्शनानें तिन्ही लोकांत आनंद व मंगलोत्सव. उपसंहार:— श्रीकृष्णास घेऊन युधिष्ठिराचें गजपुरास आगमन व प्रजेचा उत्कर्ष. श्रीज्ञानेश्वर चरणीं प्रणाम करून भगवन्नामस्मरण.

---

# सखीप्रेषण १० वें.

## श्रीकृष्णाच्या द्वारकागमनसमयीं पुरस्त्रियांनीं केलेलें श्रुतिमनोहर स्तवन व श्रीकृष्णाचें द्वारकेप्रत गमन. पृष्ठ ( १३७–१६० )

मंगलाचरण. दशम प्रेषणांतील विषयांचें संक्षेपेंकरून कथन. आपल्या पुरीप्रत येऊन युधिष्ठिर राजा काय करिता झाला या विषयीं शौनकांचा प्रश्न व सूताचें उत्तर:— परीक्षिद्रक्षणाच्या योगानें पांडवांचा वंश अंकुरित करून व युधिष्ठिराला राज्य देऊन परमात्मा श्रीकृष्णाचें प्रसन्न होणें व भीष्माच्या व भगवंताच्या बोधानें धर्मनिष्ठ झालेल्या युधिष्ठिरानें समुद्र वलयांकित पृथ्वीचें पालन करूं लागणें· युधिष्ठिराचा सत्वप्रभाव व त्यामुळें कृतयुगसंज्ञक कालप्रादुर्भाव वर्णन १३७. हास्तिनपुरांत कांहीं दिवस राहिल्यावर पांडवांची अनुज्ञा घेऊन द्वारकेस जाण्याकरितां श्रीकृष्ण परमात्मा रथारूढ झाले असतां समस्त स्त्रीपुरुष मंडळीला विरह सहन न होणें. भगवद्यश महिमा, पांडवांनां श्रीकृष्णाची अपरोक्ष संगती, सख्यभक्ति व महात्म्यज्ञानवर्णन १३८. श्रीकृष्णाचा वियोग होणार या विचारानें पांडवांच्या व बांधवस्त्रियांच्या अंत:करणाची स्थिती. १३८. गमनसमयींच्या महोत्सवाचें वर्णन. श्रीकृष्णाच्या तेज सौंदर्यादिकांमुळें कांहीं स्त्रिया विस्मित झाल्या असतां दुसऱ्या स्त्रियांनीं त्यांनां श्रीकृष्णस्तुतिमिषानें केलेलें परमार्थ

कथन:—श्रीकृष्णमाहात्म्य वर्णन. परमात्म्याचें सत्यस्वरूप वर्णन. १३९. ' सृष्टीच्या आदिअंतीं जीव परमात्म्यांत लीन होतो ' यावर जीव ब्रह्म असून लीन कसा होतो ? अशी शंका व तिच्या समाधानार्थ अविद्या–आभासें करून ब्रह्माला जीवत्व, अविद्येचें कार्यानुमेयत्व, जीवाचें एकत्व, प्रमातृसंज्ञक जीवाभासाचें अनेकत्व, बंधमोक्ष जीवाभासालाच आहेत व प्रलयकालीं जीवाची स्थिती या विषयांचें निरूपण. १४०. शंका:—(१) जीवाभासासच जर बंधमोक्ष आहेत तर अंत:करणामध्येंच ब्रह्माचा आभास मानून अनेक जीववाद कां स्वीकारूं नये. [२] बंधमोक्षार्थ जर अंत:करणस्थ जीवाभासाचा स्वीकार केला तर अविद्यागत आभासरूपी एकजीव सांगण्याचें प्रयोजन काय ? [३] जीवाभासालाच जर बंधमोक्ष आहेत तर अविद्येमध्यें असलेला ब्रह्माभासरूपी एकजीव केव्हांच मुक्त होणार नाहीं, शुकवामदेवादि मुक्तिबोधक शास्त्राला वैय्यर्थ्य येईल व एक ' ब्रह्म ' नित्य व दुसरी 'अविद्या' नित्य अशी द्वैतापत्ती येईल. १४१. समाधान:—शंकेस्तव अभिनंदन ज्या ज्या प्रक्रियेनें जीवाला ब्रह्मबोध होतो त्या त्या प्रक्रियेचें उत्तमत्व व अनेकत्व सप्रमाण निरूपण. १४१. अनेकजीववाद व एकजीववाद या दोन्ही प्रक्रियांविषयीं जाग्रच्छ्रुतीचें वचन प्रामाण्य. १४२. पहिल्या शंकेचें उत्तर:—कारणरूप आणि कार्यरूप दोन प्रकारचा उपाधी. पहिल्या उपाधीगत आभास बंधाला पावत नाहींत व दुसऱ्या उपाधिगत आभास बंधाला पावतात व द्वितीय उपाधीचे ठिकाणीं येणारे आभास जीवाचेच आहेत ब्रह्माचे नाहींत याविषयीं दृष्टांतपूर्वक विवेचन. अथवा साक्षी आणि आनंदमय असा उभयात्मक प्रमाता भोक्ता आत्म्याला ठरवून दृष्टिसृष्टिवादांत उत्तर. १४२–१४३. दुसऱ्या शंकेचें उत्तर:—अंत:करण कार्यरूप असल्यामुळें कारणाविद्येचा स्वीकार व तिचेठायीं ब्रह्माभास जीव न मानल्यास जडाचें स्वातंत्र्य व ब्रह्माला कर्तृत्व या दोन अतिप्रसंग दोषांची प्राप्ती. मायेचे ठिकाणीं आभास ईश्वर मानून व तिचें कार्य अंत:करण त्याचे ठिकाणीं ब्रह्माचे आभास जीव मानून अंत:करणाच्या नाशानेंच जीवाची मुक्ति संभवनीय मानल्यास येणारे खडतर दोष व तन्निवार-

णार्थ अविद्येचेठायीं मिथ्याप्रतिबिंबरूपी ब्रह्माभासजीवाची, तदपेक्षी बिंबत्वारोपावच्छिन्न अनध्यस्तईश्वराची व तदुपदिष्टवेदजन्य महावाक्यानें उद्भूत होणाऱ्या विशेष चैतन्यज्ञानाची आवश्यकता. १४३–१४४. तिसऱ्या शंकेचें उत्तर:—बंधमोक्ष जीवाभासरूपी प्रमात्याला वास्तविक वाटत असून जीवाचे ठिकाणीं कल्पित आहेत याविषयीं जलाकाशाचा व घटाकाशाचा दृष्टांत, स्वामी विद्यारण्यांचें मत व तातवचनप्रामाण्य. तातवचनाचा भावार्थनिरूपण. १४५. मी ब्रह्म मी ब्रह्म अशा वृत्तिवाचाळपणाचें वैय्यर्थ्य. १४६. मुख्य जीवाचे ठिकाणीं बंधमोक्ष कल्पित असूनही आपेक्षिक बिंबत्वारोपावच्छिन्न ब्रह्मरूपी गुरुस्थानीय परमेश्वराच्या भक्तीची तातवचनप्रामाण्यानें आवश्यकता व ह्या ईश्वर लक्षणाला अर्थदीपिकार दिवाकर महाराजांची सम्मति. अद्वैतभक्तिविषयीं तातवचनप्रामाण्य. १४६. उपर्युक्त एकजीव व अनेकजीव प्रतिपादक गीतावचनांचें दृष्टिसृष्टिवादपर आनयन व शुकवामदेवादिकांच्या मुक्तिबोधक वचनांची व्यवस्था व त्यांच्या मुक्तीचें भिन्न भिन्न दृष्टीनें निरीक्षण. १४७. शुकादिकांच्या कृष्णार्पणतारूप भक्तिविषयीं श्रीमद्भागवताचें व तातवचनाचें प्रामाण्य. अद्वैतानंतर भक्त्यर्थ भासणारा द्वैतपणा बाधक नाहीं याविषयीं श्रुतिसंताभिप्राय निरूपण व अशा भक्तीची श्रेष्ठताकथन. १४७. ' हा परमात्मा श्रीकृष्णब्रम्हस्वरूपी होता ' या वचनावरून सत्तात्रयवादाची जीवाभास दृष्टीनें सिद्धि. १४८. त्या स्त्रियांनां महावाक्यावांचून एवढें ज्ञान कसें झालें या प्रश्नाचें उत्तर. परमेश्वराचे ठिकाणीं कोणत्याच प्रकारचा विस्मय न करितां केवळ ब्रम्हरूप होऊन राहणेंच इष्ट आहे या विषयीं आपल्या सखियांनां स्त्रियांचें सांगणें व विस्मय हा रसास्वाद विघ्नाला उत्पन्न करतो याविषयीं सप्रमाण निरूपण. ब्रम्हबोध झाल्यानंतर परमात्म्याच्या स्तुतिरूप भाषण जीवाभासाच्या दृष्टीनें पुन्हा झालें तरी महात्म्यज्ञानरक्षकत्वास्तव त्याचें अबाधकत्व. १४८. परमात्मा अखंड निष्प्रपंच असून अध्यारोपापवादानें प्रपंचयुक्त भासतो याविषयीं निरूपण:—आरोपापवादाचें लक्षण. आरोप सांगण्याकरितां परमात्म्याला कारणावस्थानिरूपण. आरोप कोण करतो ? या प्रश्नाचें

उत्तर. १४८. ' जन्माद्यस्ययतः ' या सूत्रांत सांगितलेलें ईश्वरकर्तृत्व अविद्येविषयीं नाहीं. १४९. भ्रमाला अधिष्ठानाची अपेक्षा, सत्तात्रय वादियांच्या ईश्वराचें आरोपजन्यत्व, व सत्ताद्वय वादांत ब्रम्हाधिष्ठानावर आरोपित जीवाला कर्तृत्वसिद्धि १४९. भ्रमोत्पत्तीचा असंभव निरूपण व आधीं भ्रमाभाव पाहून भ्रम निवर्तल्यावर भ्रमाचा आदि कळणें शक्य आहे या शंकेचें उत्तर १४९. मूलाविद्येचें अनादिसांतत्व, आरोपदृष्टीनें ब्रह्माला जीवत्व, व जीवाची कारणावस्थानिरूपण १५०. अविद्येचा फळभाव व ब्रह्माचें उपादान व निमित्तकारणत्व निरूपण १५०. सत्तात्रयवादाचें प्रयोजन निरूपणः– कारणावस्थेंत जीवाला मुक्तीचा असंभव व त्याच्या मुक्त्यर्थ ईश्वरानें त्याला नामरूपें देऊन ब्रह्मबोधार्थ वेदनिर्माण करणें १५१. मिमांसक सांख्य व वैय्याकरण यांच्या निरीश्वरमताचें खंडन व वेदाचें ईश्वरप्रणितत्व १५१. दृष्टिसृष्टिवादानें कारणारोपनिरूपणः– अज्ञानानें ब्रह्माला जीवैकपण, आपेक्षिक बिंबारोपावच्छिन्न अनध्यस्तविवर्त ब्रह्माला ईश्वरत्व व त्याच्या आश्रयानें जीवसंकल्पाचा खटाटोप १५१. महास्वप्नस्थ जीवकल्पित कर्तृत्वगुणामुळें ईश्वराच्या अथवा गुरूच्या वेदवचनानें जीवाची मुक्ति १५१–१५२ वेदवचनाचें अबाधित्व १५२ गीतेच्या स्तुत्यर्थ वेदाचें सौषुप्त, श्रुतित्व, व गीतेचें जाग्रच्छ्रुतित्व कथन व वेदाहून गीतेची अत्यंत सेव्यमानता १५२ गीतेच्या वेदसम प्रामाण्याची सिद्धि १५३ मुकुंदकथागायनाशिवाय योगादि साधनें चित्त शुद्ध करूं शकत नाहींत. योगियांनां मिळणारी गती भक्तांना सहज मिळते. भगवंताच्या प्रेमळ भजनानें बुद्धि शुद्ध व सूक्ष्म झाली असतां आत्मदर्शन होतें १५३. आत्मा मनोवागगोचर आहे व आत्मा बुद्धिगोचर आहे या विरोधिवचनांसंबंधीं शंका व तिचा परिहार १५३–१५४ वृत्तिव्याप्ति व फलव्याप्ति सदृष्टांत निरूपणपूर्वक वरील शंकेचें उत्तर व सगुण निर्गुण भेदानें प्रश्नांतील अर्थद्वयाची व्यवस्था १५४ ईश्वराचें एकत्वनिरूपणः– नानेश्वरापत्तिबोधक वाचस्पतिमताचा अंशतःसमन्वय १५४ वाचस्पतिमताचें सयुक्तिक खंडन १५५ साधारणासाधारण

प्रपंचनिरूपण व अनेक जीववाददृष्टीनें एकेश्वरसिद्धि. दृष्टिसृष्टिमता-नें एकेश्वरसिद्धि व ईश्वराकडे जीवकल्पित कर्तृत्व. ज्ञानीदृष्ट्या परमेश्वराचें अकर्तृत्व व प्रेमदानार्थ श्रीकृष्णाचें अनध्यस्तविवर्तत्व निरूपण. श्रीकृष्णमहिमा वर्णन. १९५ अधर्म प्रादुर्भवनकालीं सत्वगुणानें भगवंताचें अवतीर्ण होणें १९६. शंका —अवतारमूर्ती शुद्धसत्वमय आहे किंवा मिश्रसत्वमय आहे ? समाधान —श्रीकृष्णपरमात्मा शुद्ध-सत्वावतार असून मिश्रसत्वासारखा भासतो. मिश्रसत्व असता तर मारलेले असुर मुक्त न होते. सूर्यदृष्टांतानें प्रभूचा सत्वप्रभाव व अन-ध्यस्तविवर्तत्व निरूपण १९६ परमात्म्याचें षड्गुणैश्वर्यकथन परमात्मा कर्माप्रमाणें फळ देतो तथापि सर्वांवर त्याची सारखी कृपा कशी आहे याविषयीं निरूपण १५६ भक्त जेव्हां जेव्हां आठवण करतात तेव्हां तेव्हां परमात्मा प्रगट होतो १९७ नामाग्नीनें ज्यांचें अघतणार जळालें ते ईश्वराच्या कृपामृतानें भिजून भवपार होतात. कृष्णावताराची विशेष रीति व यदुकुलाची मधुवनाची व रुक्मिण्यादि स्त्रियांची धन्यतावर्णन १५७ व्रजस्त्रियांचें परमगुरुत्व, त्यांच्या सेवनानें रुक्मिण्यादि स्त्रियांची धन्यता व प्रभूचें अधरामृत मिळण्याकरितां त्यांचें गुरुत्वेंकरून सेवन करण्याविषयीं सर्व स्त्रियांनां उपदेश १५८ व्रजवनितांचा त्याग व श्रीकृष्णाविषयीं आवडी पाहून रुक्मिण्यादि स्त्रियांनीं श्रीकृष्ण प्राप्ती-विषयीं केलेल्या उपायांचें व्यक्तिशः वर्णन. श्रीकृष्णाची एकपत्नित्व स्थिति व सामर्थ्यवर्णन १५८ स्त्रियांची अशुचिस्थिति व भगवत्प्रे-मामुळें तिला आलेली विचित्र शोभा सदेहब्रह्मनिष्ठदृष्टांतानें वर्णन १५० श्रीकृष्णधनानें महाधनिका झालेल्या रुक्मिण्यादि स्त्रियांचें भाग्यवर्णन व त्यांनां वंदन. ह्या स्त्रीस्तवाच्या श्रवणपठनाची फलश्रुती युधिष्ठिरादि पांडवांची "मभैवासौ" भक्ति व विरहातुरतावर्णन. पांड-वांचें सांत्वन करून परत पाठविल्यावर श्रीकृष्णाचें स्वनगरीं निघणें व कुरु जांगलादि देश ओलांडून आनर्त समीप आल्यावर रथाखालीं उतरून सांयसंध्योपासन करणें १५९ उपसंहार १६०.

# सखीप्रेषण ११ वें.

## पृष्ठ [ १६०–२०३ ]

**श्रीकृष्णाचा स्वपुरप्रवेश, द्वारकस्थ प्रजाजनांनीं केलेलें स्तवन, श्रीकृष्णस्त्रियांचा भगवद्विषयक प्रेम, व भूतकार्यरहित स्वलीलामय मायाशरीरधारी भगवच्चरणाच्या नित्यनूतनप्रकार वर्णन.**

मंगलाचरण:—हरिहरस्तवन व हरिभजन उपदेश. १६०. एकादश प्रेषणांतील विषय संक्षेपतः कथन. १६१. द्वारका प्रदेशांत आल्यावर श्रीकृष्णानें केलेला शंखनाद व शंखाचें वर्णन. शंखनाद ऐकून प्रजाजनांचें सामोरे येणें व भेट अर्पण करून त्यांनीं प्रसन्न मुखानें केलेलें भाषण. १६१. गुरु, माता, प्रिय आदिकरून भावना श्रीकृष्णाचे ठिकाणीं स्वानुभवानें पूर्ण करून प्रजाजनांनीं देह, जीव व आत्मबुद्धीनें त्याचें केलेलें स्तवन. १६२. प्रजाजनांचें देवभाग्याहून स्वभाग्याधिक्य वर्णन. १६३. सुखरूप परमेश्वराला नमन. प्रभूच्या वियोगामुळें प्रजाजनांस एक एक पळ कोटी वर्षासमान गेला. शंका—दृष्टिसृष्टिसिद्धांतानें बाहेर गेला असतांनां वा दृष्टि आड झाला असतांनां मृत समजावा आणि भक्तींत तर भगवंताचा नाश इष्ट नाहीं. मग प्रजाजनांनां जो पळ पळ कोटी वर्षासमान भासला तो भगवंताच्या मरण प्रत्ययामुळें कीं काय ? १६३. समाधान:– मूळांतील ‘यर्हि’ पदाचा अभिप्राय कथन पूर्वक दृष्टिसृष्टिवादाला धरून केलेल्या शंकेचें दोन रीतीनें उत्तर:—( १ ) अनध्यस्तविवर्त परमेश्वराचे ठिकाणीं दृष्टिसृष्टि स्वीकृत नाहीं ह्मणून श्रीकृष्णगमन द्वारकावासी जनांनां मरणप्रत्ययबोधक झालें नाहीं व त्यांच्या भक्तीचा छेदही घडला नाहीं (२) अथवा दृष्टिसृष्टिस्वीकृत स्वगोचर विद्यामय भगवच्छरीराचा किंवा श्रीमधुसूदनमताप्रमाणें प्रेम्णैकत्वेऽपि पृथग्चिदानंदभानरूपी भगवच्छरीराचा व्यय/लय संभवनीय नसल्यामुळें अत्युत्कट भक्तीनें साक्षात संयोगी वा वृत्तिमात्र संयोगी वियोगोपलालन प्रेमास्तव पल कोटिवर्षसम वाटण्याची शक्यता १६४ श्रीकृष्णाचा द्वारकेंत प्रवेश. द्वारका नगरीचें वर्णन १६४–१६५ नगरींत श्रीकृष्णाचें आगमन ऐकून वसु-

देव अक्रूर उग्रसेनादिकांचें समारंभानें सामोरे जाणें. श्रीकृष्णानें सर्वांचा केलेला सम्मान. गुरुविप्रवृद्धादिकांचा आशीर्वाद ग्रहण करीत राजमार्गानें गमन करीत असतांनां श्रीकृष्णाचें मंदिरारूढ पुरस्त्रियांनां दर्शन. द्वारकावासी स्त्रीपुरुषांची धन्यता व नित्य अच्युतदर्शन घेत असूनही त्याच्या नयनाची अतृप्ति. शंका:—विषय आपात रमणीय असून व साकार श्रीकृष्ण स्वतःविषयच असून त्याच्या दर्शनानें द्वारकावासी जन तृप्त कां झाले नाहींत ? १६५ समाधान:—भगवंताला विषय ह्मणण्याचा निषेध. विषयांची तुच्छता व विषयांहून आपल्या आवडीची श्रेष्ठता. भगवच्छरीराची अनध्यस्त विवर्तता व वैराग्यपूर्वक श्रीगुरुभजनाचा उपदेश १६५—१६६ भगवन्माहात्म्यवर्णन व त्याच्या हृदयालिंगनानें कामपूर्ति होऊन जीवपणाचा नाश १६६ आतपत्रव्यजनादिकांनीं व मार्गांतील पुष्पवृष्टीनें दिसणारी श्रीकृष्णाची शोभा व त्यांचें पितृगृहीं जाऊन देवकीप्रमुख मातांनां वंदन १६६ वंदनाभिप्रायकथन १६७. देवक्यादि मातृवर्गाचे पातिव्रत्य ओज व शुद्धबुद्धि निरूपण. "स्नेहस्नुतपयोधरा: " पदाचा भाव निरूपण. भगवंताचें स्वगृहाप्रत गमन. श्रीकृष्ण देशांतरास गेले असतां त्यांच्या स्त्रियांनीं आचरलेलें द्वादशमासिक व्रत निरूपण १६७ श्रीकृष्णाला दुरून येतांनां पाहून त्यांच्या स्त्रियांची झालेली स्थिती १६८. पति ग्रामीं नसतां स्त्रियांनीं कसें वागावें याविषयीं याज्ञवल्क्यवचन व तदनुसार श्रीकृष्णपत्न्यांचें आचरण. कृष्णदर्शना पूर्वी त्यांची भगवदाकारवृत्ति व अन्वयव्यतिरेक ज्ञान १६८. शंका:— अन्वयानें जग ब्रह्मरूप पाहणाऱ्या श्रीकृष्णपत्न्यांस हाच एक श्रीकृष्ण आपला पती असें वाटून "पतिव्रता नेणें आणिकांची स्तुती' या तुकाराम वचनाप्रमाणें पतिव्रता धर्म कसा रक्षण करतां आला ? १६९ समाधान:—शंकेस्तव शिष्याचा सरोष निषेध. श्रुतिस्मृति प्रमाणानें श्रीकृष्णालाच पतित्व व इतर जगाला स्त्रीत्व. अन्वयानें जग परमेश्वरच आहे तथापि वर्तन यथायोग्यच संभवतें याविषयीं नाना दृष्टांतपूर्वक निरूपण १६९—७०. अनंत जन्मीच्या धर्माचरणामुळें संभवणारें ब्रह्मज्ञानीयाचें धर्मयुक्तच वर्तन व निषिद्धाचरणाची निंदा १७० श्रीकृष्णपत्न्यांचें सगुण

प्रेम व भगवच्चरणाची नित्यनूतन स्थिती निरूपण १७०–७१. कुतर्कांबद्दल शिष्याचा पुनर्निषेध कैमुतिकन्यायानें भगवच्चरणाचा सुंदरपणा वर्णन १७१ श्रीकृष्णाच्या भूमिभारउतारण प्रयोजनाचें आनुषंगिकत्व व शस्त्र हातीं न घेतां परस्पर द्वेष उत्पन्न करून असतांचा संहार. शंका—संतांच्या ठायीं द्वेषवृत्ति सर्वथा नसतां श्रीकृष्ण ती कशी उत्पन्न करूं शकेल ? समाधान:—वस्तुत: द्वेषवृत्तीची दुर्जनांचे ठायीं उत्पत्ति व तीमुळें त्यांचाच नाश. सज्जनांस ईश्वराचें सहाय्य असल्यामुळें दुर्जनद्वेषानें त्यांचा अनभिभव १७१–१७२ भक्तियोषित्कदंबीं रमण हें भगवंताचें मुख्य प्रयोजन १७२ श्रीकृष्णाचें शरीर भूतकार्य असून धर्माधर्मजन्य आहे म्हणून श्रीकृष्ण हे जीव आहेत व रज्जुकृत बंधनाभावशक्ति त्यांचे ठिकाणीं योगानें आल्या आहेत ह्याच्या सिद्ध्यर्थ प्रति पक्षाचे चार आक्षेप:—( १ ) अनुगीतापर्वांत श्रीकृष्णानें आपल्याच मुखानें मला ज्ञान व ऐश्वर्य योगानें आलें होतें असें कबूल केलें आहे. ( २ ) मोक्षधर्मांत "या नारायणाच्या शरीराची ईश्वराच्या आठव्या अंशापासून उत्पत्ति असून तें कल्पांतीं परिवर्तते असें भीष्माचार्यांनीं म्हटलें आहे व 'परिवर्तते' म्हणजे नाश पावतें असा चतुर्धराचार्यांनीं अर्थ केला आहे. ( ३ ) योग वार्तिकांत विज्ञान भिक्षूंनीं वामनादि अवतार शरीरांचा प्रकृत्यापूरणानें विश्वरूपादि परिणाम त्यांच्या योगैश्वर्यास्तव सांगितला आहे व तें प्रकृत्यापूरण धर्माधर्मादि सापेक्ष बोलिलें आहे. ( ४ ) 'तान्यहंवेदसर्वाणि' या श्लोकांत श्रीकृष्णांनीं सांगितलेली सर्वज्ञता मधुसूदन स्वामींनीं समष्टि जीवांविषयीं सांगितली आहे व दृष्टिसृष्टिवादांत ह्यावांचून निर्वाहही लागत नाहीं. आनंदगिरींनेंही मांडुक्यभाष्यटीकेंत असेंच म्हटलें आहे १७२ ते १७३. समाधान:—१ ल्या आक्षेपाचें उत्तर– अर्जुन पूर्ण होता असें आपलें मत असूनही पुढें आलेल्या वाक्यानुसार विचार करण्याची आवश्यकता १७३. 'माझें शरीर मायामय असून माझें जन्मकर्मही दिव्य आहे' असें भगवंताचें गीतेंतील वाक्य व भगवच्छरीर भूतमय नाहीं असा भाष्यकारांनीं त्याचा केलेला अर्थ. ह्या वचनांच्या अनुसार अनुगीतावचनाचा विचार १७३–१७४ योगियांच्या शरी-

राचें शुक्लकर्मजन्यत्व. योग मोक्षेच्छा साध्य असल्यामुळें योगियांनां जीवत्वापत्ति व मोक्षेच्छा परमेश्वराचे ठिकाणीं संभवत नसल्यामुळें त्याचें शरीर योगजन्य नाहीं अतएव तें भूतकार्य नाहीं. १७४ भगवद्गीता वचनाचा अनुगीतेंतील वचनानें अभिभव होण्याची अशक्यता १७४--१७५ भगवद्गीतावचनानें अनुगीतावचनाचा अभिभव निरूपण:—१७५ भगवद्गीतेंतील वचनाची मुख्यता व अनुगीतेंतील वचनाची गौणता. स्वमताप्रमाणें अनुगीतावचनाचा अभिप्राय. "तूं आतां लवकरच द्वारकेंत जाणार" या अनुगीतावचना वरून अर्जून श्रीकृष्णाचें ईश्वरत्व विसरला होता असें ग्रहण व यावरून ज्ञान सांगणाऱ्या सद्गुरूचे ठिकाणीं मूर्ख शिष्यांनां अतिपरीचयास्तव होणारी जीवबुद्धी व त्याला भ्रमात्मक उपदेश करण्याची आवश्यकता. मूळ अनुगी[illegible] वचनावरून परमात्म्याचें सर्वदा युक्त योगित्व. युंजान योगी व [illegible] योगी याचीं लक्षणें. "तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन" भगवदाज्ञेचा अर्जुनानें केलेला अवमान १७५ जो वेदाज्ञा [illegible]त नाहीं त्याला त्याच्या आज्ञाभंगरूप कर्माचें मिळणारें [illegible] १७६ भगवदाज्ञाभंगाचा अर्जुनावर परिणाम व आपले [illegible] अर्जुनाची जीवत्वबुद्धि पाहून अनुगीतेंतील वाक्य श्रीहरीनें [illegible] असा अभिप्राय १७६ तातांनीं अर्जुनाची प्रशंसा केली [illegible]ल्यामुळें अर्जुनाला विस्मृति संभवनीय नाहीं असें मानल्यास अनुगीतेंतील वाक्याची विसरलेल्या शिष्याकरितां योजना. [illegible]तेंतील वाक्याचें परमार्थ प्रसंगोचितत्व आणि अनुगीतेंतील वाक्याचें व्यवहार प्रसंगोचितत्व व भगवद्गीतेंतील वाक्यानुसार अनुगीतेंतील वाक्याचा समन्वय.

२ ऱ्या आक्षेपाचें उत्तर:—[illegible]स पुराणांचा सारखेपणा असल्यामुळें महाभारतवचना [illegible] "[illegible]कृष्ण:क्वापि नोगत:" या पद्मपुराणांतील वाक्याचा समन्वय क[illegible]ची आवश्यकता. भगवंताचें शरीर मायामय असून नित्य आहे [illegible] चतुर्धराचार्यांचें मत व प्रलय कालीं भगवच्छरीराच्या नाशा[illegible] अ[illegible] १७६ भगवन्मायेचा प्रलय कालीं लय मानल्यास येणारी अन[illegible]परंपरा निरूपण व भगवच्छरीराची नित्यता सिद्धि १७७ [illegible]च्या द[illegible] भगवंताच्या शुद्धमायामय शरीराची

भगवद्भक्तांनां व सृष्टिकार्यार्थ देवांनां भिन्न भिन्न होणारी प्रतीति १७७–१७८ देवकार्यप्रतिबंध निवृत्त झाल्यावर सृष्टैतीह दृष्टीनें भगवच्छरीर तिरोभूत होत असल्यानें त्या शरीराचा नाश झाला अशी कर्मी पुरुषाला होणारी बुद्धि व तदनुसार मोक्षधर्मवचनाची व भारत भागवतांतील श्रीकृष्ण निजधामगमन कथेची व्यवस्था व भगवद्भक्तांच्या दृष्टीनें पद्मपुराणांतील वचनाची व्यवस्था १७८ आक्षेपांतील मोक्षधर्मवचन श्रीकृष्णाला लागून होण्याचें कारण व श्रीकृष्ण परमात्मा भक्तांनां अझूनही प्रतीत होतो याविषयीं नामदेवाचें वचन व स्मृतींचें प्रामाण्य. श्रीकृष्णाच्या लघुमूर्तीला चतुर्थराचार्यांनीं दिलेला फलाचा दृष्टांत व त्याला तातवचनाची सम्मती १७८ ही भगवन्मूर्ती नित्य आहे असें तातांचें वचन १७९ तिसऱ्या आक्षेपाचें उत्तर:—पंडितांनीं लिहिलेल्या हिंदीटिकेवरून आक्षेपांतील विधानाचें अनुमान असावें असें ग्रंथकाराचें मत. पंडित उदासी मताचे असल्यामुळें विज्ञानाभिक्षूच्या म्हणण्याचा त्यांनीं केलेला विपर्यास. विज्ञानभिक्षूच्या म्हणण्याचा समन्वय. विज्ञान भिक्षूहून भाष्यकारांचें अधिक प्रामाण्य. परमेश्वर संकल्पानें प्रकृत्यापूरण होतें म्हणण्यापेक्षां भगवत्संकल्पमयच भगवच्छरीर आहे या म्हणण्यांत परमेश्वराचें अधिक स्वातंत्र्य द्योतन व भाष्यकारादिकांच्या वचनाची अधिक ग्राह्यता १७९ चवथ्या आक्षेपाचें उत्तर:— १८० मधुसूदन स्वामींच्या विद्येची प्रशंसा व त्यांच्या ग्रंथांतील वचनांचें परस्पर विरोध वैचित्र्य. १८०. मधुसूदन स्वामींनीं स्मृतिपुराणोक्त भक्तीचा श्रुतीनें केलेला बाध. १८१. ' यं सर्वेदेवा नमंति ' या श्रुतीची व ' मुक्ताअपिलीलया विग्रहं कृत्वा भजंत ' या भाष्यकार वचनाची वाट वरील प्रतिपादनांत न लागल्यामुळें स्वामींच्या मुक्तिप्रतिपादक निरूपणाचें वैयर्थ्य. ही भक्ति खंडन करण्याची लहर स्वामीला नेहमींच नव्हती या विषयीं गूढार्थ दीपिकेंतील " ध्यानाभ्यास वशीकृतनमनसा " या श्लोकाचें प्रमाण व मुक्तीच्छा स्वामील एखादे वेळींच असते असा निष्कर्ष. १८१. श्रुतिस्मृतींवरून व स्वामींच्या कांहीं वचनांवरून दृष्टिसृष्टिवादांतही परमेश्वर शरीराची व परमेश्वर भक्तीची व्यवस्था

लागते यावरून अद्वैतसिद्धींतील स्वामींच्या वचनाचें निरुपयोगित्व. १८२. अवताराविषयीं प्रमाण असलेल्या श्रुतींचा निर्देश व केन श्रुतीवरील शांकर भाष्य. १८२. शंका—" स एकधा भवति त्रिधा भवति " इ० छांदोग्य श्रुतीचा अर्थ आचार्यांनीं शारीरक भाष्यांत ईश्वरपर लाविलेला असून छांदोग्य भाष्यांत याच श्रुतीचा अर्थ उपासकपर लाविला आहे ह्मणून मधुसूदनांच्या ह्मणण्याप्रमाणें समष्टि जीवच ईश्वर होऊं शकतो. १८२–१८३. समाधान:—सर्व कल्पांत सृष्टि करण्याला समष्टि जीव नित्य सन्निहित राहूं शकत नाहीं. शारीरक भाष्यांचें न्यायानुगृहीतत्व व बृहदारण्यक भाष्याचें विद्यास्तुतिपरत्व. न्यायानुगृहीत भाष्याचें अधिक प्रामाण्य. दोन्ही भाष्यांचा समन्वय, ईश्वराची बिंबभूतता व अवतार शरीराचे मायामयत्व. १८३. शंका—उक्त प्रयोजनांच्या सिद्धिकरितां शारीरावश्यकता. शरीर पुण्यपापें करून उत्पन्न होत असल्यामुळें त्याचें भूतका[illegible]र्यत्व. तसें शरीर भगवंताला मानलें असतां जीवत्वप्राप्ति व [illegible] कर्मांचा भोग. अथवा ब्रह्मज्ञानी जीव असल्यामुळें भोग होण[illegible] तथापि ज्ञानी पुरुषाला यथेष्टाचरणाचा निषेध व तो नि[illegible] नसतां बद्धापुढें गुणगान करण्याला त्याची अपात्रता. [illegible]— परमेश्वराचें शरीर भूतकार्य नसून मायामय आहे [illegible]— [१] भगवद्गीतेंत व तिच्या भाष्यांत तसें ह्मटलें आहे. [illegible]कृतबंधनाभावादिक भूतकार्य शरीराचे ठिकाणीं संभव[illegible] (३) यद्यपि योगियाचे ठिकाणीं संभवतात तथापि सि[illegible] निषिद्ध कर्मानें त्याचें सामर्थ्य क्षीण होतें. १८३ [illegible]वत् क्षीणपुण्य जनितही भगवच्छरीर नाहीं. १[illegible]मताप्रमाणें श्रीकृष्णाला निषिद्धाचरणाचा भोग होतो [illegible]त्यांच्या अनेकांत प्रतिज्ञेची हानी व कलियुगांतील संत[illegible]लेल्या श्रीकृष्णाच्या प्रतीतीची असिद्धि. इतिहासाविषयीं संशय[illegible]स भक्तियुक्त लक्षणानें भक्ति करून पाहण्याविषयीं उपदेश. [illegible] परमेश्वरावतारत्वास्तव श्रीकृष्णाला भोगाची अशक्यता. [illegible] ' इमं विवस्वते योगं ' इत्यादि श्लोकावरून मागील सर्व ज[illegible] येणारें श्रीकृष्णाचें गुरुत्व व

साधक दशेचा अभाव. १८४. यावरून रज्जुकृत बंधनाभावादिकांची सिद्धि श्रीकृष्णाला योगानें आलेली नाहीं असा निष्कर्ष व परमेश्वर शरीर भूतकार्य नाहीं ह्याची सिद्धि. १८४–१८५. श्वासोच्छ्वासादिकें करून वाय्वादि भूतकार्य परमेश्वर शरीराचे ठिकाणीं आहेत अशी शंका घटत नाहीं, कारण त्यांनां भूतनियति लागू नसून भानमात्र आहेत. तथापि स्वप्नवत् भानमात्र तें शरीर नाहीं तर अघटित घटनापटु मायेनें भासविलेलें असें आहे. १८५. आनंदगिरीनें जें भगवच्छरीर. भूतकार्य म्हटलें त्याचा भगवत्पूज्यपादवचनांनीं, गीतावचनांनीं, व स्वतः त्यांच्याच वचनानें बाध. श्रीकृष्णाचें शरीर भूतकार्य नसल्यामुळेंच धर्माधर्मजन्यही नाहीं. योगवासिष्ठ व भावार्थ रामायण या दोन्ही ग्रंथांतील विष्णुशिवाला व रामाला प्रारब्ध सांगणाऱ्या वचनांची व्यवस्था. शंका—भागवत टीकेंत श्रीधरांनीं भक्तांच्या इच्छेनें व निश्चल दासांनी आपल्या ग्रंथांत साधूंच्या पुण्यानें व दुर्जनांच्या पापानें भगवच्छरीरोत्पत्ति सांगितली आहे यावरून परमेश्वर शरीर धर्माधर्मजन्य ठरूं पाहते. १८५–१८६. समाधानः–भगवंताचें मायाजन्य शरीर अज अव्यय आहे असा चतुर्धराचार्यांचा श्रीधर स्वामीचा व निश्चलदासांचा अभिप्राय अन्यथा परकर्मानें परशरीर जीवाचेंही होत नाहीं तर ईश्वराचें कसें होईल असा प्रश्न. १८६. शंका—पुत्राच्या उत्तर कर्मानें पित्याला परलोकांत उत्तम शरीर मिळतें ह्मणून तें परकर्मजनित आहे. समाधानः— श्राद्धकर्मफल मीमांसा:—पुत्राचे कर्म ग्रहण करण्याचा पित्याला स्वकीय अधिकार, योग्यता, व पुण्यलेश. आईबापांचा अधिकार ( ऋणदातृत्व ) निरूपण, श्राद्धादिक कर्मफल मिळण्याला स्वतःचा अधिकार योग्यता व पुण्यलेश या तिहींची आवश्यकता १८६ "अनाथ प्रेतसंस्कारात् कोटियज्ञफलं लभेत्" या वचनाची व्यवस्था संन्यासी आणि अतिपापी यांचें प्रेतसंस्कार करण्याविषयीं शास्त्रीय निषेध १८७ पुत्राच्या कर्मानें पित्याच्या अंतःकरणांत अदृष्ट उत्पन्न होतें असें सांख्य सूत्रकाराचें व तद्भाष्यकाराचें म्हणणें, त्या अदृष्टाला संबंधाची अपेक्षा, संबंधाची क्रियासाध्यता, व अदृष्टाला संपादक त्याचा अधिकार आहे असा

निष्कर्ष. ह्या म्हणण्याशीं सांख्यशास्त्राचा अविरोध. या सर्व विवेचना-वरून परमेश्वराचें शरीर मायामय आहे अशी सिद्धि. दृष्टिसृष्टि वादा-नुसार परमेश्वराची नित्यमुक्ति व त्याचें शरीर त्याला ब्रह्मरूपच भासत असलें पाहिजे या विषयीं निरूपण. १८७–१८८. चिन्मय दृष्टीची यथार्थता व भगवच्छरीराची अनध्यस्त विवर्तता निरूपण. " सएष नरलोकेऽस्मिन्नवतीर्णः स्वमायया " या श्लोकाचें सान्वय व्याख्यान. ' स्वभगवान् ' व ' प्राकृत ' शब्दांचें स्पष्टीकरण. १८८. शंका:— माया परोक्षत्वात् परमेश्वराची सर्वदा परोक्षता असल्यामुळें श्लोकांतील 'स एष' शह्वानें ईश्वरविषयक प्रत्यभिज्ञा संभवत नाहीं ह्मणून श्रीकृ-ष्णाला जीवत्वप्राप्ति होते. समाधान:—श्रुतीवर तर्क काढण्याविषयीं निषेधपूर्वक उत्तर. १८९. माया परोक्ष असल्यामुळें परमेश्वर सर्वदा परोक्ष असतो या ह्मणण्याची असंबद्धता. मायेचें प्रत्यक्षादि प्रमाण-गोचर कार्यानुमेयत्व. १९०. मायेचा विक्षेपशक्त्यात्मक कार्यांश व आवरणशक्त्यात्मक कारणांश व दोहोंची प्रत्यक्षता. परमेश्वर विक्षेप शक्त्यात्मक मायावच्छिन्न आहे किंवा आवरण शक्त्यात्मक मायाव-च्छिन्न आहे असा प्रश्न. प्रथमपक्षीं परमेश्वराचा अपरोक्षानुभव येण्या-ची शक्यता. द्वितीय पक्ष स्वीकारल्यास वेदांत मतांत येणारे दोष व ते टाळण्याकरितां ईश्वराला नित्य ज्ञानी मानण्याची आवश्यकता. १९०. ईश्वर शुद्धसत्वात्मक मायाप्रतिबिंबित असल्यामुळें मायापरोक्षत्वास्तव परोक्षच आहे या ह्मणण्याचें खंडन. १९०–१९१. जीवापेक्षां ईश्वरच सत्वनिष्ठांनां अपरोक्ष होण्याची अधिक शक्यता. १९१. शुद्ध सत्वगुण साक्षिभास्य असल्यामुळें त्याची व तदवच्छिन्न परमेश्वराची अनुभवग-म्यापरोक्षता व परमेश्वराचा अनुभव येऊन स्मृतिहोण्याची शक्यता. अनुभवगम्य मायेचाही ज्ञानानें बाध व तीच सर्व समर्थ असल्यामुळें परमेश्वराची अपेक्षा नाहीं या ह्मणण्याचा मायेच्या जडत्वास्तव बाध. ईश्वर व त्याचे अवतार वास्तविक नाहींत असें निश्चल दासांचें ह्मणणें व ह्या चारपक्षांनीं त्याचें खंडन:— (१) परमेश्वर निद्रेंतून उठविणारा आहे हा सर्वांचा अनुभव. १९१–१९२. (२) परमेश्वराच्या सत्य संकल्पानेंच जीवन्मुक्तांचे प्रारब्ध नियत होतें ही युक्ति. १९२.

(३) अनेक श्रुती. १९२-९३. व [४] विचार सागरादि ग्रंथांत ईश्वराचें अस्तित्व स्वत: त्यांनींच कबूल केलें असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं येणारा अनिश्चयावच्छिन्नोन्मत्तप्रलाप हा दोष. १९३. ईश्वराचा अवतार होत नाहीं ह्या [ निश्चल दासांच्या ] ह्मणण्याची संशयात्मकता. दृष्टिसृष्टि वादांतील जीवकल्पितेश्वर मताचें रहस्य निरूपण:—परमेश्वराचा चैतन्य भाग जीवानें कल्पिलेला नसून ऐश्वर्यच मात्र जीवानें कल्पिलेलें आहे. ईश्वरांतील चैतन्य भाग जीव कल्पित मानल्यास जीवाकडे ईश्वरत्व व ईश्वराकडे जीवत्व येऊन शब्दमात्र होणारा वाद. १९३–१९४. अथवा ईश्वरांतील चैतन्य चैतन्यभास्य मानावें लागून दोन्ही चैतन्यांचें ऐक्य किंवा भास्यचैतन्याला जडत्वापत्ति. परमेश्वराचें चैतन्य जीवकल्पित नाहीं याची स्वप्नांतील राजाच्या दृष्टांतानें सिद्धि. घटाकाश दृष्टांतानें जीवकल्पितेश्वर वादाचा यथार्थ अर्थ. जीवाच्या वासनारूप कल्पनेवर परमेश्वराची स्थिती. व आपेक्षिक बिंबत्वारोपावच्छिन्न बिंबभूत परमात्म्याची दृष्टिसृष्टिवादांत सिद्धि. ह्या ह्मणण्याला मधुसूदन स्वामीची सम्मति १९४ तो परमात्माच अनध्यस्त शरीररूप अवतार धारण करितो ह्या सिद्धांताचें श्रुतिस्मृतिवरून, युक्तीवरून व ऐतिहासिक अनुभवावरून कथन १९४–१९५ स्वत:अलिप्त परमात्म्याचे ऐश्वर्य तातवचनावरून कथन १९५ उपासक जीवही षड्गुणैश्वर्यवान् होऊं शकतो तथापि त्याचे ठायीं जगत्कर्तृत्व येऊं शकत नाहीं. श्रीकृष्णाचें ब्रह्मदेवात्मकत्व, हिरण्यगर्भांतील जीवधर्माचा त्यांचें ठायीं असंभव व ह्यामुळें षड्गुणश्वर्यवान् असूनही अलिप्तता. उपासक पुरुषांकडे षड्गुणश्वर्याचें भोक्तृत्व व परमेश्वराकडे साक्षित्व. यद्यपि षड्गुणैश्वर्याचे साक्षी जीवन्मुक्त राहूं शकतात तथापि त्यांनां विदेहमुक्तीची अपेक्षा असते तशी परमेश्वराला नाहीं. ह्यावरून परमात्म्याकडे जगत्कर्तृत्वादि तटस्थ सत्यसंकल्पासाहित षड्गुणैश्वर्याचें साक्षित्व व साक्षीचे ठायीं आरोपित संचोपकत्व. त्या संचोदकत्वावच्छिन्न बिंबभूत साक्षी ईश्वराचें षड्गुणैश्वर्याला आपल्या ताब्यांत ठेवून उत्तम स्त्रीसमुदायाचे ठिकाणीं रममाण होणें. या प्रमाणें अनुभवानें ईश्वरानुभवता सिद्ध होत असल्यामुळें 'सएष' शब्दानें ईश्वराची प्रत्यभिज्ञा सिद्धि व जीवाप्रमाणें

प्रकृतीच्या आधीन होऊन स्त्रियांचे ठायीं परमात्म्यानें रमण केलें नाहीं असा निश्चित अभिप्राय १९५ श्रीकृष्णाचें पूर्णब्रह्मत्व जनांला कळण्या करितां बाह्य चिन्हांचें निरूपण व हरिमायेनें मूढ झालेल्या लोकांनां त्यांचा ( बाह्यचिन्हांचा ) उपयोग. ब्रह्मविज्ञान दृष्टीनें शमदमादि विराग विषयक शद्बांनां बाह्यचिन्हता व शरीरापेक्षेनें आंतर चिन्हता. विषयरोध न करितां जीवन्मुक्तांनाहीं अघटमान अशा इंद्रियांची परमात्म्याच्या ठिकाणीं सहज अचल स्थिति. स्त्रीसंगाची सकळ विषयांहून दुस्तरता व स्त्रीसंग निंदा १९६–१९७ श्रीकृष्णस्त्रियांचे ठिकाणीं भगवद्विषयक प्रेम, पातिव्रत्य तेज, गांभीर्यादि गुण असून श्रीहरीचें मन वळविण्या विषयीं त्यांचें असामर्थ्य. शिष्याच्या दोन शंका:—( १ ) विश्वामित्र पराशरादिक जर स्त्रियांचे ठिकाणीं वशीभूत झाले तर रोज दहीं भात जेवणारे पुरुष इंद्रिय निग्रह काय करूं शकतील या ह्मणण्याचा इंद्रिय-निग्रह सर्वथाच कोणाकडून व्हावयाचा नाहीं असा अर्थ करावयाचा काय ? ( २ ) तृतीय सर्गापेषणाचे ठायीं हरिहर उपासना समान वर्णन केली असून आतां ( ११४ व्या ओवींत ) शिवाची गौणता दाखवितां यांत पूर्वापर विरोध येतो १९७ समाधानः— १ ल्या शंकेचें उत्तर:— अग्निचूर्ण करणाऱ्या मनुष्याचा दृष्टांत व शास्त्रांत जी ऋषींचीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांचा विषय निवृत्तिपर अर्थ १९७–१९८ दुसऱ्या शंकेचें उत्तर:—कारण ब्रह्माचें लक्षण व भिन्न भिन्न रूपानें सर्व श्रुतींत सांगितलेली कारण ब्रह्माची उपासना व सर्व पुराणांत अभिगमन रूपानें उपासना. त्या परमात्म्याचेंच स्वभक्तार्थ शुद्ध सत्वरूपानें हरिहरत्व व सृष्टिकार्यार्थ त्रिगुणोपहितत्व. निष्काम व सकाम भक्तांनां व निष्काम उपासकांनां मिळणारीं स्थानें. उपासना व भक्तिमधील भेद १९८ कारणब्रह्मास हरिहरत्व सांगणारें महाभारत वचन १९८–१९९ महत्त-त्वोपहित हिरण्यगर्भ संज्ञक कार्यब्रह्माला सृष्टिकार्यार्थ हरिहरत्व सांग-णारीं अनुगीतेंतील व मात्स्यपुराणांतील वचनें १९९ हिरण्यगर्भाचे ठिकाणीं गमन करणाऱ्या निष्काम हरिहर उपासकांनां ब्रह्मलोकच हरिहरलोकांप्रमाणें भासतो व जे निष्काम हरिहरभक्त कारणब्रह्माचे ठिकाणीं गमन करितात त्यांनां एकच परमेश्वरस्थान मिळतें १९९ या

विषयीं पुष्पदंत वचन २०० हैरण्यगर्भस्थ हरिहरांनां पुराणांत जीवंधर्म सांगण्याचें कारण. पुराणांतील कार्यकारणब्रह्मपर निंदास्तुतिवाक्यांचें प्रयोजन व ह्या वचनांची कार्यकारणब्रह्मदृष्टि निरूपण. युक्ति व अनुभव दृष्टीनें शिवाचे व विष्णूचे समान कृपालुत्वादि धर्म २०० शिवभक्तांची शिवाचे ठिकाणीं व विष्णूभक्तांची विष्णूचे ठिकाणीं आईच्या दृष्टांतानें कारणब्रह्मदृष्टि व विष्णूपुराणांत शिवाची व शिवपुराणांत विष्णूची निंदा सांगण्यांत पुराणरूप श्रुतिमातेचें तात्पर्य निरूपण २००–२०१ पुराणाचें खरें तात्पर्य न जाणतां आपापल्या मताचा अभिमान धरून शालशुनकन्यायानें परस्पर द्वेष करणाऱ्या शैववैष्णवांचा निषेध २०१ शालशुनकन्याय कथन. या पुराणांत कारण ब्रह्मत्वेंकरून श्रीकृष्णाची विशेष स्तुती व कारण ब्रह्मरूप विष्णूशिवात्मक श्रीकृष्ण रूपाचें तृतीय सखीप्रेषणाचे ठायीं निरूपण केल्याचें स्मरण. त्या परमात्म्याला माया-सजातीय अशा स्त्रिया वश करूं शकल्या नाहींत या म्हणण्यांतील भाव निरूपण २०१ परमात्म्याच्या मनरूप सत्य संकल्पा पर्यंत किंवा चैत-न्यापर्यंत स्त्रियांची धाव जात नाहीं या विषयीं तातवचन प्रामाण्य २०१–२०२ यावरून भगवंताचें अवतार शरीर पुण्यापुण्यजन्य नाहीं असा निष्कर्ष. आपले दुर्गुण भगवंतावर आरोपित करून त्याला विषयी म्हणणाऱ्या मूढ जनांचा निषेध व परमेश्वराचें अवतारत्व कथन २०२ अवतारशरीराचे ठिकाणीं सांगितलेलें ऐश्वर्य. भक्तिदृढीकरणार्थ कारण-ब्रह्माशीं ऐक्यभावानें निरूपण:— प्रकृतींतील गुणधर्मांच्या सुखादि-कांनीं परमात्म्याचा अभिभव न होणें हेंच त्याचें खरें ऐश्वर्य २०२–२०३ अवतारकाळीं स्त्रियांनां वश न होणें व मूळस्थानीं प्रकृतीला वश न होणें हे दोन्ही धर्म श्रीकृष्णाचे ठिकाणीं समान असल्यामुळें त्यांचें कारण-ब्रह्मत्व. सत्ताद्वयवादाचें वैशेष्य. परमात्म्याचें परमानंदरसत्व. कृष्ण प्रभावानें कृष्णस्त्रियांच्या साक्षित्वाचा अभिभव व शेवटीं पृथगिवानंद-भानरूपानें प्रेमसंपन्न अंत:करणाचें समर्पण. प्रेमप्रभाववर्णन. श्रीज्ञाने-श्वर नामस्मरणांत उपसंहार २०३

# सखीप्रेषण १२ वें.

## परीक्षिज्जन्माद्युत्कर्ष वर्णन. पृष्ठ ( २०४–२१० )

मंगलाचरण:— हरिगुरुवंदन. परीक्षिच्चरित्राविषयीं शौनकांचा प्रश्न २०४ द्वादश प्रेषणांतील विषय कथन. सूताचें उत्तर:— हरिजनांस माया बाधत नाहीं. उक्तप्रकारें श्रीकृष्णाचे ठिकाणीं राजा धर्माची अनन्यभक्ति व प्रजावात्सल्यवर्णन २०४–२०५ पांडवांच्या अनन्यगतिकत्वास्तव उत्तरागर्भाचें श्रीकृष्णानें केलेलें रक्षण २०५ 'छांदोग्य'-कथित डोळ्यांत दिसणारा पुरुष तोच हृदयांतील अंगुष्ट प्रमाण परमात्मा होय. शंका:— श्रुतींत सांगितलेला डोळ्यांतील पुरुष परमात्माच आहे कशावरून ? समाधान:— श्रुतींत सांगितलेले अमृतत्वादिक गुण शब्दाच्या मुख्य वृत्तीनें परमात्म्याच्या ठिकाणींच संभवतात २०५ परमात्म्याचें स्मृतिप्रामाण्यानें अनध्यस्तविवर्तत्व, उपासकांच्या प्रीत्यनुसार चतुर्भुजाद्याकारवत्ता व सगुण असूनही षड्विकाररहितत्व २०६ गर्भगत भगवन्मूर्तीची सगुणशोभावर्णन, तिच्या गदाप्रहारानें अस्त्रतेजाचा लोप व दर्शनानें गर्भगत परीक्षितीला झालेला विस्मय २०६ शंका:— सामान्य जीवालाही जन्मसमयीं अनेक जन्मांचें ज्ञान होऊन तो परमात्म्याची स्तुती करतो असें श्रीमद्भागवतांत ह्मटलें आहे, मग पुण्यवान् जो उत्तरागर्भ त्याला भगवंताविषयीं संशय कां वाटला ? २०६ समाधान:— जन्मसमयीं स्वाभाविक प्रगट झालेल्या सत्वामुळें जीवाला अनंत जन्माचें ज्ञान होतें व मरणसमयीं गमनमार्गदर्शन होतें असें "बृहदारण्यकाचें" म्हणणें, गर्भामधें जीवाला होणारें परमात्म्याचें सामान्य निर्गुणात्मक आनुमानिक ज्ञान व उत्तरागर्भानें साकार परमात्मा पाहिल्यामुळें त्याचा वितर्क २०७ परमात्म्याचें तातवचनानुसार अप्रमेयत्व निरूपण, व अस्त्राचा उपसंहार करून अंतर्हित होणें २०७ परीक्षिताचा जन्म. धर्मराजानें विप्राकरवीं बालकाचें मंगलवाचन व जातक करवून दिलेलीं नाना दानें २०८ मंगल गीत. बालकाचें 'विष्णुरात' असें नामकरण व ब्राह्मणांचा आशीर्वाद. हें बाळ पूर्वजांप्रमाणें

पराक्रमी व गुणवान् होईल काय? असा युधिष्ठिराचा प्रश्न २०८ उत्तर:— परीक्षिज्जातकवर्णन २०९ शंका:— हा कृष्णभक्त होईल असें जें ब्राह्मणांनीं सांगितलें त्यांत प्रयत्नहानी होत नाहीं काय? सामाधान:— सत्प्रवृत्तीचा प्रयत्नानें रोध करूं नये असा विधी निरूपण. हा बालक निश्चयानें कृष्णप्रिय होईल याविषयीं अनुमान २०९ गर्भांतून बाहेर आल्यानंतर परीक्षितीचें अनुध्यानवर्णन २१० धर्माची अश्वमेधकरणइच्छा, द्रव्याची अडचण, व तीचें श्रीकृष्णानें निवारण करून यज्ञाची केलेली सिद्धि. तेथें कांहीं दिवस राहून हृषीकेशाचें स्वपुरगमन. श्रीज्ञानेश्वर वंदनांत उपसंहार २१०.

---

## सखीप्रेषण १३ वें.

पृष्ठ (२११–५४६)

**विदुरानें धृतराष्ट्राला व नारदानें धर्माला कथन केलेले परमार्थविषयक प्रयत्नाचें महत्व व सौलभ्य. मोक्षविषयक प्रयत्नाचें जीवाला पूर्ण स्वातंत्र्य परमेश्वराचें दयालुत्व व न्यायित्व मांसभक्षण निषेध, ससाधन हरिगुरुभजनप्रक्रिया ज्ञानोत्तर देशकाल प्रतीति खंडनार्थ व विदेहमुक्ती प्राप्त्यर्थ द्वारें सगुणमयघनीकरण प्रक्रिया प्राणसत्वमयकरणप्रक्रिया. गंगामहात्म्यादि विषयवर्णन.**

मंगलाचरण:— गोविंदनाममाहात्म्य. भगवती अंबेचें स्तवन २११ कथानुसंधान. श्लोक 'विदुरस्तीर्थयात्रायाम्'। आंगीं साधनचतुष्टयसंपत्ति असून सद्गुरूजवळ असल्यावर मुमुक्षूला महावाक्यगतीवांचून सृष्ट्युत्पत्त्यादिविषयक प्रश्न सुचत नाहींत याविषयीं दृष्टांतपूर्वक निरूपण व ह्याच नियमानुसार मैत्रेयापासून भगवद्भक्ति प्राप्त झाली असतां विदुरानें पुसणें सोडलें २११ विदुर आलेले पाहून धर्मधृतराष्ट्रादिकांचें सहर्ष सामोरे जाणें व सत्कार पूजनादि झाल्यावर धर्मराजांचे त्यांना उद्देशून भाषण २१२ विदुरकृत उपकारांचें स्मरण करून विदुरस्तवन पूर्वक स्वानुभवानें साधूंची दीनवत्सलतावर्णन व तीर्थाटनांत

पाहिलेलें आश्चर्य सांगण्याविषयीं विनंती २१२–२१३ सिद्धांस साधनांची अपेक्षा नसूनही ते तीर्थाटन करतात याचें प्रयोजन निरूपण २१३–२१४ युधिष्ठिराचा श्रीकृष्णविषयक कुशल प्रश्न. अंत्य प्रश्न गाळून युधिष्ठिराच्या इतर प्रश्नांचीं उत्तरें दिल्यानंतर धृतराष्ट्राला उपदेश करीत विदुरांचें कांहीं दिवस तेथें राहणें २१४ शंका:—विदुरांनीं 'शूद्रयोनावहंजातो' असें उद्योगपर्वीत म्हणून आपला उपदेशाविषयीं अनधिकार दाखविला आहे व प्रस्तुत त्यांनीं धृतराष्ट्राला उपदेश केला आहे असा त्यांच्या दोन वाक्यांत विरोध येतो. समाधान:—या शंकेच्या अनुरोधानें 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' व 'अंत्यादपि परंधर्मं' या दोन स्मृतींचा समन्वय व अत्यंत तीव्र मुमुक्षूला देहाभिमानबोधक वर्णाश्रमविषयक वाक्य निषेध करूं शकत नाहीं असा सिद्धांत २१४. विदुराच्या दोन वाक्यांतील विरोधपरिहार:– विदुराच्या प्रथम वाक्यांतील अभिप्राय निरूपण २१४-१५. धृतराष्ट्राची आतांची स्थिती तीमुळें तीव्र मुमुक्षा व उपदेशाला पात्रता २१५. ह्याशिवाय विदुर हे भगवान यमधर्मच असल्यामुळें याही दृष्टीनें त्यांचा उपदेशाधिकार. शिष्यवचन:– विदुरानें धृतराष्ट्राला बोध कसा केला तो ऐकण्याविषयीं उत्कंठा. श्रुतिप्रामाण्यानें नित्य वेदांतचिंतनाची व गुरुसमागमाची आवश्यकता. वेदांतश्रवणाचेठायीं अलंबुद्धि मानल्यास रसास्वाद विघ्नाची प्राप्ती २१५. ब्रह्मानंदाचे ठिकाणीं नवी नवी रुची घेणें हेंच जीवन्मुक्तीचें रहस्य. अन्यथा विषयानंदाहून ब्रह्मानंदाला येणारी नीचता २१६. आचार्यांचें उत्तर:– विदुरांचा धृतराष्ट्राला उपदेश निरूपण:—— पुढें येणारा जन्मजरादु:खादि अनिष्ट काल जाणून वेळींच सावध होण्याविषयीं विदुरानें धृतराष्ट्राला सुचविलेला हरिभजनाचा उपाय. २१६. अमृतरायवचनप्रामाण्य— जीवदशावर्णन. २१६—२१७. शंका:——प्रयत्नानें जर सर्वांचेंच निराकरण होतें तर "यत्न करुनि यन्निराकरण नच होये कवण्या मिषें" या वचनांत काळाची कोणाकडूनच प्रतिक्रिया होत नाहीं असें कसें ह्मटलें ? समाधान:– ब्रह्मज्ञानी असून ज्यांनीं रस किंवा योग यांच्या योगानें हरगौरीसृष्टींतील नूतन देह उत्पन्न करून घेतला आहे त्यांच्या काळाचें प्रयत्नानें हरण

होण्याची किंचित् शक्यता व विषयांधाचा काल प्रयत्नानें हरण हो-ण्याची अगदींच अशक्यता. २१७–२१८. हरगौरीसृष्टींतील देहाची यावत्प्रारब्ध नित्यता. सर्वच ब्रह्म आहे अशी शंका केल्यास ग्रहण क्रिया अनुकूल व त्याग क्रिया प्रतिकूल मानणें ब्रह्मनिष्ठाच्या दृष्टीनें शोभत नाहीं असें उत्तर. व्यष्टिप्रयत्नानें काळाचें हनन होण्याची अशक्यता व ब्रह्मज्ञानाची शक्यता. व्यष्टि समष्टि दोहोंचेंही चैतन्याचे ठिकाणीं भ्रमरूपत्व व व्यष्ट्यधिष्ठानज्ञानानेंच ससमष्टिप्रपंचाची विनिवृत्ति. संसारविषयक प्रयत्नाहून परमार्थविषयक प्रयत्नाचें सौलभ्य. २१८ वैराग्य धारण करण्याविषयीं धृतराष्ट्राला उपदेश व त्याच्या श्वानवृत्तीचा निषेध. २१८–२१९. ज्ञान, वैराग्य, लाज, भीती, यांतून कोणत्याही रीतीनें आवडीपूर्वक भगवद्भजन केलें असतां निजसुखप्राप्ती. (२१९) विषयांत दोष पाहून भगवद्दर्शनार्थ झटणाराची धन्यता वर्णन. २१९–२२०. आत्महितार्थ न झटणाऱ्या मूढाविषयीं तुकारामवचनप्रामाण्य. २२० धृतराष्ट्राला त्याच्या व आपल्या पूर्वजन्मकथनानें सुहृत्प्राप्ति सूचित करून ब्रह्मप्राप्तिकरितां उत्तर दिशेला जाण्याविषयीं विदुराचा निर्वाण उपदेश. [२२०] विदुराच्या उपदेशानें भक्तिज्ञानवैराग्ययुक्त प्रज्ञाचक्षुयोग धारण करून धृतराष्ट्राचें गांधारीसह गमन. २२१ गांधारीचा अधिकार व तिनें धृतराष्ट्राबरोबर जाण्याचें कारण. धृतराष्ट्र, विदुर व गांधारी या तिघांच्या वंदनार्थ धर्म आला असतां त्या तिघानांही न पाहून त्याचें शोकाकुलित होणें व त्यांचे उपकार आठवून संजयास त्यांचा शोध विचारणें. २२१ धर्मराजाच्या प्रश्नानें दुःखित झालेल्या संजयाचें उत्तर. २२२ तुंबुरूसह नारदमुनींचें आगमन व संतदर्शनमहिमावर्णन. नारदांस वंदनादि सत्कारपूर्वक युधिष्ठिराचा प्रश्न व सज्जन स्वतः अत्यंत निस्पृह असतांनां गमनागमन कां करतात याचें प्रयोजन कथन. युधिष्ठिराचा प्रश्न ऐकून जगत् ईश्वरवश आहे व भूतांचा संयोग वियोग ह्या प्रभूच्याच आधीन आहे असें जाणून शोक न करण्याविषयीं नारदांचा उपदेश. शंकाः—सर्व जगत् ईश्वरवश मानलें असतां प्रयत्नाची हानी होते व केलेल्या कर्माचें फळ ईश्वर देतो तर तो नैर्घृण्य वैषम्य दोषादि-

युक्त असला पाहिजे. २२२. समाधान:— या शंकेचें अनेक वेळां समाधान केलें असून पुन: शंका करीत असल्यामुळें शिष्याचा कनिष्ठाधिकारद्योतन. यत्न म्हणून जो तूं स्वीकार करितोस तो काय जड स्वीकार करितोस किंवा चैतन्यस्पंद स्वीकार करितोस असा प्रश्न व उभयपक्षीं येणाऱ्या अडचणी. आपण वादी या दृष्टीनें विचारीत नसून अशा अडविल्यानें जिज्ञासा शांत होत नाहीं अशी शिष्यानें विनंती केल्यावरून शंकेचें सयुक्तिक समाधान:— जगत् परमेश्वरवश सांगणाऱ्या व ईश्वर सहाय घेऊन जीवाला प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य सांगणाऱ्या श्रुतिवचनांचा निर्देश. २२३–२२४. ह्या श्रुतींचा परस्पर विरोध प्राप्त झाला असतां सत्तात्रय व सत्ताद्वय वादांच्या रीतीनें त्यांचा समन्वय. २२४. सत्तात्रय वादाच्या रीतीनें समन्वय:— फलभोगकालीं भूतांचा संयोग वियोग परमेश्वराच्याच आधीन असून कर्मकर्तृकालींमात्र जीवाचा प्रयत्न चालत असतो. याविषयीं वास्तविक समाधान निरूपण:— ईक्षणापासून प्रवेशापर्यंत ईश्वराची सृष्टी व जागृतीपासून मोक्षापर्यंत जीवकल्पित संसार. ईश्वरसृष्टींत जीवाची मनोमय सृष्टी, तिला आधीन करण्याचा जीवाला अधिकार व मनोमय प्रपंचच जीवाच्या सुखदु:खास कारण होतो याविषयीं सोदाहरण स्पष्टीकरण. मनोमय सृष्टी जीवाला जशी करतां येते तशीच ती मोडण्याचाही अधिकार त्यालाच असल्यामुळें वासना जिंकण्याविषयीं प्रयत्नाचाही त्यालाच अधिकार. २२४. सत्ताद्वयवादाच्या रीतीनें याहून विशेष समाधान—२२५. सर्व प्रपंच जीवकल्पितच असून त्याची प्रातिभासिकसत्ता व ब्रह्माची पारमार्थिक सत्ता. रज्जुसर्पदृष्टांतानें ब्रह्माच्या सामान्य सत्तेचें प्रपंचसत्तेला साधकत्व व विशेषचैतन्यसाक्षात्कारानें प्रपंचविनिवृत्ति. रज्जुसर्पन्यायानें प्रपंचाध्यासास्तव जगत्सादृश्यादि दोष ब्रह्माचे ठिकाणीं स्वीकारावे लागतील अशी शंका आल्यास तिच्या निराकरणार्थ आकाशनीलताध्यासदृष्टांतानें ब्रह्मसत्तेचें प्रपंचानुमंतृत्व व विशेष स्वरूपचैतन्यज्ञानानें प्रपंचाची निवृत्ति कथन. जीवकल्पनातीव्रसंवेगजन्य कर्मफल विनिवृत्त करण्याला कालाची आवश्यकता व फलप्राप्त होण्यापूर्वी प्रयत्न केला असतां त्याचा फलसमयीं परिणाम होण्याचा संभव २२५

भुक्तभोग व वर्तमानभोगनिवृत्तीविषयीं प्रयत्न करण्याचें वैय्यर्थ्य व भविष्यद्भोगविनिवृत्तीविषयींच यत्न करण्याचें महत्व सप्रमाण निरूपण २२५–२२६ असा प्रयत्न करण्यांत भुक्तदु:खाविषयीं शोक न करणें, वर्तमान दु:खाविषयीं सहनशीलता धरणें आदिकरून सद्गुणांच्या भूषणाची प्राप्ति व अशा गुणसंपन्न पुरुषालाच भगवदनुमोदनानें नित्य सुखाची सहज प्राप्ती. आपणच कल्पिलेला प्रपंच केव्हां तरी आपल्याच हातून सुटेल असें धैर्य धरून मोक्षार्थ सारखा प्रयत्न करण्याविषयीं युधिष्ठिराला नारदांचा उपदेश व ह्याविषयीं ब्रह्मसूत्राचें प्रामाण्य. व्यसनाच्या दृष्टांतानें प्रपंचाविषयीं यत्न करण्याची अयुक्तता. युधिष्ठिराला त्याच्या बापानें ( धृतराष्ट्रानें ) जें सोडलें तें भगवद्वशतेनें झालें असल्यामुळें शोक न करितां पुढें उत्तम गती मिळण्याविषयीं यत्न करण्याचा उपदेश २२६ कर्तृकालीं जीव स्वतंत्र असला तरी फलभोगकालीं भगवदीक्षणानुसारच वागणें भाग पडतें याविषयीं दामबद्ध गाईच्या दृष्टांतानें निरूपण. फलभोग ईश्वरतंत्र असल्यामुळें भोगकालीं लागणारी प्रवृत्तीही ईश्वरतंत्रच आहे म्हणून त्यावेळेस प्रयत्न संभवत नाहीं या म्हणण्याची अंशत: सत्यता, त्या प्रवृत्तीला लागणाऱ्या अहंदेहात्मक अज्ञानाचें अनादित्व व ज्ञाननाश्यता, व मी या प्रवृत्तिनिवृत्तीहून वेगळा आहे अशा अज्ञाननिवर्तक ज्ञानाविषयीं प्रयत्नाचा संभव २२६ परमेश्वराकडून मोक्षप्रयत्नांत प्रतिबंध होणें शक्य नाहीं असें यांतील तात्पर्य कथन २२६–२२७ भोगाच्या दृष्टीनें भूतांचा संयोग वियोग परमेश्वरइच्छेवर अवलंबून असतो याविषयीं बाहुल्यांचा दृष्टांत २२७ मिथ्या जीवांनां सुखदु:खांत टाकतांनां परमेश्वराला दोष लागत नाहीं म्हणून जीवांनां परतंत्र मानावें या शंकेचें वैय्यर्थ्य व " लोकवत्तु लीलाकैवल्यम् " या सूत्रानें सार्थ कर्म करून अलिप्त राहणें हें परमेश्वराचें लक्षण निरूपण. दुसऱ्या रीतीनें युधिष्ठिराचा शोक निराकरण करण्याकरितां किंचित् स्थूल दृष्टीनें निरूपण:— जग सत्य, मिथ्या किंवा अनिर्वचनीय मानलें असतां तिन्ही दृष्टीनें शोक करण्याचें वैय्यर्थ्य २२७–२२८ अनन्यगतिकांचा योगक्षेम भगवान् चालवितो या विषयीं नाना दृष्टांत व भगवत्स्तवनपूर्वक भगवंताचें दयालुत्व निरूपण.

शंका:— अशक्तौ दुग्धनिर्मातृतेवरून भगवंताचे ठिकाणीं दयालुत्व अनुमित मानल्यास त्याच्याकडे नैर्घृण्यवैषम्य दोष येतात २२८ समाधान:— जीवसामान्यतापक्षीं परमात्मा दयाळू असून जीव जें कर्म करितो त्याचा उत्तम परिणामच व्हावा म्हणून श्रौतशासनान्वयें जीवाच्या कल्याणार्थ परमेश्वराला न्याय करावा लागतो याविषयीं आईच्या दृष्टांतानें निरूपण २२८-२२९ आवश्यकारोप व कल्पनारोपनिरूपणपूर्वक या विषयाचें दृष्टिसृष्टिवादांत स्थापन २२९ आवश्यकारोपाचें व कल्पनारोपाचें लक्षण, कल्पनारोप अत्यंत तीव्र झाला असतां आवश्यकारोपतुल्य दृढता व जीव मुक्त झाल्याबरही भगवंताचें दयालुत्व असतेंच याविषयीं निरूपण २२९ त्या दयाळू परमेश्वरावर जिज्ञासुदशेंत किंवा ज्ञानीदशेंत अवलंबून राहून विदुरादिकांविषयींची विकल वृत्ति सोडून देण्याविषयीं नारदांचा उपदेश २२९–३० देहावरून अभिमान सोडणें जितकें सुलभ आहे तितकें त्याला चिरजीवी करणें सुलभ नाहीं याविषयीं विषमिश्रित अन्नाच्या दृष्टांतानें निरूपण व जडदेहाचें सार्थक्य करण्याकरितां ईश्वरभजनाचा उपदेश २३० " अहस्तानि सहस्तानामपदानि चतुष्पदाम्। फल्गूनि तत्र महतां जीवो जीवस्य जीवनम् ॥ १ १३ ४६ या श्लोकांतील भाव निरूपण:— अहस्तानीत्यादि पदांवरून जीवहिंसा विहित आहे असें अनुमान काढूं पाहणारांच्या मताचें खंडन व ईश्वर विहित वृत्तीची सर्वत्र सुलभता २३०–३१ निवृत्तिकथनालाच विधित्व. सत्वादि गुणांच्या योगानें होणारे अन्नाचें तीन भाग कथनपूर्वक मांसभक्षणनिषेध व हिंसा ईश्वरविहित नाहीं असा सिद्धांत. तृणधान्यादिकांचें सेवनही केवल ईश्वरभजनार्थ प्राण वांचविण्याकरितांच करावें असा विधि २३१ 'अहस्तानीत्यादि' पदांचा श्रुत्यनुसार अभिप्राय व 'जीवो जीवस्य जीवनम्' या पदावरून दृष्टिसृष्टिवादानुसार जीवाकडे लयकारणत्व अथवा जीवाधिष्ठान बिंबरूप ब्रह्माकडे आरोपित लयकारणत्वकथन २३२ अविद्येनें भासविलेलें संपूर्ण जगत आपणासहित भगवन्मय पाहण्याकरितां ससाधन हरिगुरुभजनप्रक्रियानिरूपण २३२–२३३ सच्चिदानंद परमात्मा आपणाहून भिन्न नसून भोक्ताभोग्यभेद अविद्येनें भासविलेला आहे या-

विषयीं स्वानुभवपूर्वक उपपत्ति कथन करण्याकरितां ' सोऽयमद्य महाराज भगवान्भूतभावनः । कालरूपोऽवतीर्णोऽस्यामभवाय सुरद्विषाम् ॥ ' १-१३-४८ या श्लोकार्थाचें निरूपणः— तातवचनप्रमाण्यानें व युक्तीनें सत्, चित् व आनंद या पदत्रयांचें ऐक्य २३३–२३४ जग साक्षीभास्य आहे हें सत्तात्रयवादियांचें मत खंडनपूर्वक भोक्ता व भोग्याची सच्चिदानंदरूपता २३४–२३५ अंधकारदृष्टांतानें अज्ञानाचें व सत्, चित् आणि आनंद यांच्या भेदाचें मिथ्यावगमन २३५ सिद्धाला अज्ञानाची अप्रतीति व सत्, चित्, आनंद यांच्या अभेदकथनप्रक्रियेचा साधकाला निदिध्यासनार्थ उपयोग, त्यापासून अद्वैतभक्तीची प्राप्ति व मुक्तीची तुच्छता. ज्ञानप्राप्तौ देशकालप्रतीतिखंडनार्थ व विदेहमुक्तिप्राप्त्यर्थ भक्तीची आवश्यकता निरूपणः— ज्ञानोत्तर वृत्तीवर दृष्टि गेली असतां संधिगत ब्रह्माची विस्मृति होऊन विश्वसत्ता कशी उपजूं लागते याविषयीं सागरतरंगदृष्टांतानें विवेचन. २३५–२३६. ज्ञान झाल्यावर भक्तिपंथानें वृत्ति जाऊं लागली असतां देशप्रतीति होऊं नये ह्मणून वृत्तीला सगुणमय घनरूप करण्याची प्रक्रिया व एकवटलेल्या वृत्तीला अवतारत्व. २३६. ज्ञानोत्तरवृत्तींच्या लयोत्पत्तिमध्यें होणारी कालप्रतीति व तिच्या खंडनार्थ वृत्ति सगुणमय घनरूप करण्याचा उपाय. २३६–२३७. श्लोकांतील ' अद्य ' पदाचा व ' भगवान् ' पदाचा अर्थ. सगुण अखंड राहणें हेंच ज्ञानानंतर कालप्रत्ययखंडन, व कालद्वेष न व्हावा ह्मणून भगवंताची कालरूपता. 'सोऽयम्' पदानें तत्पद अपरोक्षता व 'अस्याम्' पदानें अपरोक्ष हृदयभूमि बोधन. व्यष्टिहृदयांतील प्रेमवृत्तीलाच समष्टिहृदयांत कृष्णव्यक्तित्व व तिचें नित्यत्व. सुरद्विषांचा अभव कथन. २३७. भगवान् कालरूप ह्मणण्याचें कारण. २३७—२३८. व्यष्टिसमष्टिहृदयांत श्रीकृष्ण मूर्तीची प्रेमवर्धकता सिद्ध करण्याकरितां " निष्पादितं देवकृत्यमवशेषं प्रतीक्षते । तावद्यूयमवेक्षध्वं भवेद्यावदिहेश्वरः । [१.१३.४९] या श्लोकार्थाचें निरूपणः—दृष्टिसृष्टिवादानुसार व्यष्टि सदसन्मनोवृत्तींच्या तीव्रतेलाच देवदैत्यसमुदायादि समष्टिकार्यत्व, व प्रेमवृत्तीची तीव्रता तीच कृष्णतनु. तीव्रप्रेमहरितनूपुढें तीव्रकामादिअसुरांचा

नाश. कामक्रोधादिक धर्मानुकूल झाले असतां तेच ज्ञानप्राप्तीला साधक होतात याविषयीं भगवद्गीत.वचनाचें व मुक्तेश्वरवचनाचें प्रामाण्य व शुद्ध परमात्मभक्तीनें देव आणि असुर दोघांनांही मोक्ष-प्राप्ती. देवकार्यार्थ प्रभूचा अवतार होतो या मताचें सयुक्तिक खंडन व स्वानुभवानें श्रीकृष्णावताराची प्रेमवर्धनप्रयोजनसिद्धि. २३८. विरोधाभास अलंकारानें देवाचें भक्तप्रेम हेंच प्रारब्ध व त्या प्रारब्धाची नित्यता. २३९. मूळ श्लोकांतील ' भवेद्यावदिहेश्वरः ' या चतुर्थ पदाच्या अर्थाचें विवेचन, अवतारशरीराची नित्यता व निजधामगमनाची हृदयद्योतकता. ' यावत् ' शब्दानें नित्यानुरागपूर्वक ईश्वरभजन-बोधन. ब्रह्मनंदनोद्गाराची सप्रेम प्रणवता. प्रणवाचे कर्ममय प्रणव व प्रेममय प्रणव असे दोन भेद. कथानुसंधानः— धृतराष्ट्र विदुर व गांधारी यांच्या समवेत हिमालयाच्या दक्षिणेस सप्तश्रोत तीर्थांत राहत आहे असें नारदांचें सांगणें. सप्तश्रोत तीर्थाची उपपत्ति व मंदाकिनि-स्तवन. २३९. सप्तश्रोत तीर्थांत राहिलेल्या धृतराष्ट्राच्या योगगति-वर्णनाचा उपक्रमः—२४०. ज्ञानानंतर ब्रह्मवेत्त्यांनां भक्तिमिश्र अष्टांग-योगाभ्यासाची अपेक्षा. जीवन्मुक्ति व विदेहमुक्ति यांमधील भेद व विदेहमुक्तींत भक्ति राहते याविषयीं श्रुतिवचनप्रामाण्य. प्राणस्थीर करण्याकरितां ज्ञानोत्तराभ्यसनाचें प्रयोजन. जीवन्मुक्ताला प्राण सत्वसं-पन्न करण्याची आवश्यकता. विदेहमुक्तांची समाधी करण्याचा हेतु. २४०. आळंदी येथील ज्ञानेश्वर तातांच्या समाधीचें माहात्म्य, आळं-दीची मुख्य तीर्थता व तातांचें जगद्गुरुत्व. २४१. तातांच्या हृदयाचें सिद्धसूर्यकांतत्व व इतर मुक्तांच्या हृदयाचें साध्यसूर्यकांतत्वकथन. प्राण सत्वसंपन्न केला असतां हृदय साध्यसूर्यकांत होतें. प्राण सात्वि-कीकरणप्रक्रियानिरूपणः— कार्य सात्विक होण्याला कारण सात्विक होण्याची अपेक्षा. श्रुतिवचनावरून 'आप' हें प्राणाचें कारण व तीर्थां-नां सात्विकता. विशेष सात्विक जीवन कोणतें याविषयीं श्रुतिप्रामा-ण्याची ग्राह्यता व गंगामहिमा सांगणाऱ्या ऋग्वेद श्रुतीचा निर्देष. २४१. श्रुत्यंतर्गत 'सिता' शब्दाचा अभिप्राय व गंगास्नानपानाचें व गंगेंत शरीर अर्पण करण्याचें फल. याविषयीं ' कुतोर्वीचिर्वीचिः '

या जगन्नाथ पंडिताच्या वचनाचें प्रामाण्य व तदर्थनिरूपण:—' कुतो-वीचि: ' या वचनानें नरकशद्वार्थाला शशशृंगत्व. ' पीतांबरपुर ' शद्वानें विष्णूचें ग्रहण. २४२. ' शातक्रतवपद ' शद्वानें विष्णुपदाचें ग्रहण व त्याचा ' इंद्रपद ' असा अर्थ करणारांच्या म्हणण्याची अयुक्तता. २४३. याला अर्थवाद म्हणणारांनां उत्तर:—कृष्ण आणि गंगा यांचें ब्रह्मत्वेंकरून ऐक्य व हरिकीर्तन, हरिप्रसादभक्षण व गंगास्नान यांच्या योगानें शरीर, मन व प्राणाला सर्वत्र हरिरूपता २४३. गंगास्तवन— गंगापंचरत्न. २४३–४४. धृतराष्ट्राच्या भक्तिमिश्र अष्टांग योगाभ्यासाचा क्रम निरूपण व शेवटीं [ विद्यारण्यमताप्रमाणें ] समाधीनें सूर्यवदपरोक्षज्ञान प्राप्त होऊन त्याचें स्थाणुवत् अचल होऊन राहणें. २४४–२४५. धृतराष्ट्राच्या देहाचें लवकरच होणारें योगाग्नीनें दहन, गांधारीचा त्यांत प्रवेश व विदुराचें तेथून देशाटनास गमन याविषयीं धर्मराजाला नारदांचें सांगणें. २४५. यासंबंधीं महाभारतांतील भिन्न कथेचा कल्पभेदानें समन्वय. शंका:—" धातायथापूर्वमकल्पयत् " या श्रुत्यर्थावरून प्रतिकल्पांत कथाक्रम भिन्न असणें शक्य नाहीं. समाधान:— प्रतिकल्पांत कारणसृष्टींत सादृश्य असून कार्यसृष्टींत भिन्न प्रकार भासतात तथापि कार्यत्वजाति नाशत नाहीं. भिन्न कल्पांत कथाक्रम भिन्न असूं शकतो परंतु कर्मफळांत मात्र भेद नसतो, यांविषयीं धान्यमापन व वृक्षबीजदृष्टांतानें विवेचन. २४५. स्वप्नदृष्टांतानें सृष्ट्यादिकांची मिथ्यता व अधिष्ठानज्ञानाची सत्यता. युधिष्ठिराचें सांत्वन करून तुंबुरुसह भगवान् नारदांचें हृदय स्वर्गांत अंतर्धान व अखंड सद्गुरुवचन हृदयांत धरल्यानें धर्मराजाला नित्यसुखप्राप्ती. श्री ज्ञानेशप्रसादयाचनांत उपसंहार. २४६.

# सखीप्रेषण १४ वें.

## पृष्ठ ( २४६–२६२ )

**भगवन्निजधामगमनबोधक वाक्याची स्वविषयाहून अन्यत्र गति· परीक्षितीचा दिग्विजय व धर्मपृथ्वीसंवादवर्णन.**

मंगलाचरण:— भगवल्लीलावर्णन २४६. वाणी, पवन, मनाची भगवद्भजनार्थ प्रार्थना २४७ पूर्वकथानुसंधान:— भगवान् श्रीकृष्णानें भक्तहृदयांत व भागवतांत प्रवेश केल्यावर व पांडव भगवच्चरणीं मिळाल्यावर परीक्षितीला राज्यप्राप्ति २४७ शंका:— 'श्रीकृष्णानें भक्त-हृदयांत प्रवेश केला' ह्या वरील वचनांत भागवतानुरोधानें भगवन्निज-धामकथेचा विपर्यास होऊन इतिहासाचा लोप होतो २४७–२४८ समाधान:— मुख्यवाक्यगौणवाक्यलक्षण व उदाहरणानें स्पष्टीकरण २४८. परस्परविरोधी व्यासवचनांचा वाक्यमुख्यगौणव्यवस्थेनें व सत्कार्यवादानें समन्वय २४९–२५० पद्मपुराणांतील वचनांची ग्राह्यता. श्रीकृष्णनिजधामबोधक गौण वाक्यांची व कापिलांच्या सांख्यसूत्राची स्वविषयाहून अन्यत्र गति २५० सन्निधिमात्रेंकरून गौण वाक्याचा उपसंहार मुख्य वाक्यांत होऊं शकत नाहीं याविषयीं सप्रमाण विवेचन व भगवान् श्रीकृष्णाची नित्यसन्निहितत्वसिद्धि २५१ परीक्षितीचा इरावतीशीं विवाह, जनमेजयादि चार अपत्यांची प्राप्ति, तीन अश्वमेधांचें यजन, व दिग्विजयकालीं गोवृषभांच्या मागें त्यांना मारण्याकरितां धांवत असलेल्या कलीचा त्यानें केलेला निग्रह यांचें संक्षेपत: कथन. कलीनिग्रहाचें कारण व ते गायवृषभ कोण होते एतद्विषयक कथेमधून कांहींतरी हरिकथानुसंधान निघेल अशा रीतीचें निरूपण सांगण्याविषयीं ऋषींची सूतास विनंती २५१ लौकिक व वैदिक विषयी जनांच्या कथांची निंदा व त्यांच्या चरित्रवर्णनाचा निषेध २५१–२५२ हा यज्ञ-प्रयत्न हरिकथाश्रवणार्थ असून येथें सूर्यनंदन आहे तोंपर्यंत कोणी मरणार नाहीं असें ऋषींचें वचन. शंका:— प्रारब्ध संपल्याबरोबर देह पडावा असा नियम असून तो मोडणें यमराजांनां शक्य आहे काय ?

समाधान:— प्रश्नाबद्दल शिष्यांचें अभिनंदन २५२ मृत्यू नसूनही विषयीजन तो आपल्यावर ओढून घेतात याविषयीं विषयी जनांची रीति वर्णन २५२–२५३ हरिचरित्राचे ठिकाणीं ज्यांचें अनुसंधान आहे त्यांचें आयुष्य वाढविण्याकरितां यज्ञांत सूर्यनंदनाला आणलें असा मुनिवचनाचा अभिप्राय २५३ मुमुक्षूच्या तीव्र सात्विक प्रयत्नानें क्षणापुरती आधिकारिकत्वप्राप्ति व तितक्या क्षणांत लोकांनीं भगवच्चिंतन करावें याकरितां श्रीकृष्णकथा ज्यांत आहे असें चरित्र सांगण्याविषयीं ऋषींची सूतास विनंती. श्रीहरिप्राप्तिवांचून कर्मधर्मादिकांचें भ्रमरूपत्व २५३ हरिभजन न करितां संसारसुखार्थ झटणाऱ्या विषयी जनांच्या रीतीची सदोषतावर्णन २५३–२५४ ऋषींच्या सच्चर्येचें अभिनंदन करून सूतानें दिलेलें उत्तर:— परीक्षितीच्या दिग्विजयाचें व भगवच्चरणप्रीतीचें वर्णन २५४ दिग्विजयकालीं राजानें पाहिलेलें आश्चर्य २५५ अधिदैवसृष्टींतील धर्म व पृथ्वी यांचीं लक्षणें. धर्मपृथ्वीसंवादनिरूपण:— वृषरूपधारी धर्मानें रुदन करित असलेल्या धेनुरूपधारी पृथ्वीला नाना आशंकापूर्वक विचारलेलें शोकाचें कारण २५५–२५७ श्रीकृष्णविरह आपल्या शोकाचें कारण आहे हें सांगण्याकरितां भगवंताची गुणपात्रता आठवीत पृथ्वीनें दिलेलें उत्तर:— भगवंताचें कारुण्य, शुचित्व, दयालुत्वादि गुणवर्णन २५७–२५८ भगवान् आपल्याला सोडून गेले एतदर्थ पृथ्वीचा शोक २५८ भगवच्चरणरजसंपत्तीनें आपल्याला ( पृथ्वीला ) आलेली शोभा, तीमुळें झालेला अभिमान व भगवद्विरहदंडकथन २५८–२५९ आपल्याला भार झाला असतां दुष्टांचा संहार करून धर्माला चतुष्पाद करण्याविषयीं भगवंताचा प्रयत्नकथन २५९ कालदैवादिवाद असिद्ध जाणून भगवत्सहायानें प्रबल यत्न केला असतां कालही पूर्ण वश होतो असा ह्या पृथ्वीवचनाचा अभिप्रायनिरूपण २४९–२६० का वा सहेत विरहं पुरुषोत्तमस्य प्रेमावलोकरुचिरस्मितवल्गुजल्पैः। स्थैर्यं समानमहरन्मधुमानिनीनां रोमोत्सवो मम यदंघ्रिविटङ्किताया:॥ १-१६-३५ या श्लोकानुसार स्वानुभवानें भगवद्विरहासाहिष्णुतानिरूपण :— भगवत्स्वरूपाची मोहकता व स्त्रीशूद्रादिकांनां स्वचरणविषयक प्रेमदानतत्परतावर्णन.

स्रियांनां मधुमानिनी म्हणण्याचें कारण व श्लोकांतील 'समान' पदाचा ध्वनितार्थकथन. कृष्णलीलेचें प्रयोजन २६० स्रियांनां पतिभक्तीनें कृष्णभक्तिप्राप्तीची प्रक्रियानिरूपण २६०–२६१ मन पूर्णपणें हरिमय होण्याला विरहभक्तीची आवश्यकता व शुद्धप्रेमलक्षणकथन. पृथ्वीवचनाचा भाव निरूपण. 'वासुदेवः पुमानेकः' या स्मृत्यनुसार समस्त विश्वाला कृष्णपत्नीत्व. भगवच्चरणसमागमानें पृथ्वीची दृष्ट भौतिक स्थिती, भगवद्विरहानें संतप्त स्थिती व दुःखमोचन होण्याला श्रीकृष्ण भेटीची अपेक्षा. धर्मपृथ्वीचा संवाद श्रवण करीत राजा परीक्षितीचें पूर्ववाहिनी सरस्वतीचें तीरीं आगमन. उपसंहार २६१–२६२

---

# सखीप्रेषण १५ वें.

. नानामतदिग्दर्शन व खंडन, कलिनिग्रह व प्रबल प्रयत्नापुढें कालबलाची क्षीणतावर्णन. ( पृष्ठ २६२–२७० )

श्रीगुरुचरणमहिमावर्णन २६२. कथोपक्रमः—सरस्वतीतीरीं राजानें पाहिलेला प्रकार. गाय व वृषभ दुःखित पाहून राजा परीक्षितीचा स्वतःविषयीं धिःकार २६२. परीक्षितीनें आर्तरक्षणाविषयीं केलेली प्रतिज्ञा. गाई वृषभांनां राजाचें अभयदान व दंडधारी शूद्राला तर्जन. २६३—२६४. राजानें वृषरूपी धर्माला आपल्या कुळाची रीति व दीनरक्षणाविषयीं स्वतःचें ब्रीद कथन करून तूं कोण व तुझ्या दुःखाचें कारण कोण म्हणून विचारलें असतां त्यानें पंडुवंशाची प्रशंसा करून आपल्या स्वरूपाच्या निर्धारासाठीं नाना वाद निर्माण करणाऱ्या नास्तिकमीमांसकादिमतांचें दिग्दर्शनपूर्वक दिलेलें उत्तर. २६४. हीं सर्व मतें प्रतिषेधपर्यवसायी असल्यामुळें कोणतें खरें हा निश्चय होत नाहीं म्हणून वैणयिकादिमतांतून एखाद्या मताचा स्वीकार करणें बरें अशी शिष्याची शंका. २६४. श्रीगुरूचें उत्तरः— वैणयिकमत व त्यांतील दोषकथन. २६५. प्राचीन स्याद्वादाचें दिग्दर्शन व खंडन. २६५-२६७ स्याद्वादखंडनानेंच पंचास्तिकायवादाचें खंडन. अर्वाचीन संशयवादाचें

खंडन. अज्ञेय वादाचें खंडन. परमात्म्याचें सच्चिदानंद स्वरूप जे जाणतात त्यांचाच निश्चय खरा आहे असें धर्माच्या म्हणण्यांतील तात्पर्यकथन. २६७. राजाच्या द्वितीय प्रश्नाचें धर्मानें दिलेलें उत्तर. त्या उत्तरावरून तो धर्म आहे असें ओळखून व त्याचें अभिनंदन करून राजानें केलेलें भाषण:—धर्माचे चार पाद व त्रेतादि युगांत एक एक पाद क्षीण होण्याचें कारण. २६८. अवशेष राहिलेला 'सत्य' पाद क्षीण करूं पाहणाऱ्या कलीला व दीन झालेल्या पृथ्वीला ओळखून धर्म व पृथ्वी यांनां राजानें दिलेलें आश्वासन व कलीचा निग्रह. कली शरण आला असतां शरणागताला न मारण्याविषयीं राजाची प्रतिज्ञा. २६८—२६९. स्थानत्याग करण्याविषयीं कलीला राजाची आज्ञा व त्याला राहण्याकरितां दिलेलीं स्थानें. राज्यांत तपादिकांची प्रवृत्ति करून व धर्माला पूर्ववत् चतुष्पाद करून राजाचें यशवर्धन. कृतयुगादिकालप्रवर्तक राजाच असतो असा या कथेचा अभिप्राय व याविषयीं महाभारतांतील कुंतीवचनार्थनिरूपण. कृतयुगप्रवृत्ति व कृतयुगकालाचें वर्णन. प्रश्न:—कृतयुगांत वर्णव्यवस्था होती असें आपण म्हणतां ( ओवी ७० ) व कृतयुगांत एक हंसवर्णच होता असें भागवताच्या एकादशस्कंधांत सांगितलें आहे म्हणून विरोध प्राप्त होतो. २६९. उत्तर:— भारतभागवतसमन्वयकथन. २७०. त्रेताद्वापरादियुगप्रवृत्तिवर्णन व तत्प्रवर्तक राजांनां मिळणारें फळ. कालबल प्रयत्नानें क्षीण होतें असें महाभारतवचनाचें तात्पर्य व याविषयीं परीक्षिदुदाहरण. परीक्षित्प्रभाववर्णन. आत्मयत्नवर्धकाला आशीर्वचन. श्रीज्ञानेशस्तवनांत उपसंहार. २७०.

---

# सखीप्रेषण १६ वें.

स्वयत्नप्रभाव, परमार्थविषयक यत्नाची व्याप्ति, भगवत्स्मृतीचा सत्यप्रभाव, कर्मकाण्डाचें अहंकारमूलकत्व, भगवद्गुणांची पावनता, तीव्र मुमुक्षूची मानसस्थिती, गंगावर्णन, परस्परविरोधी कथांचा

**समन्वय, अंतस्त्यागाची सर्व आश्रमांत समान आवश्यकता, सत्संगमहिमा व संतांचा अखंड परोपकाररतस्वभाव, पुण्यरूप व पापरूप कर्मांचें व प्रारब्धकर्माचें रहस्य, शुकांची मनोहर सगुण मूर्ति, शुकरंभासंवाद, नारायणतुष्टीचीं चिन्हें इत्याद्यनेक विषयांचें वर्णन व आमंत्रणविलासाचा उपसंहार. ( पृष्ठ २७१—३२४. )**

मंगलाचरण:—श्रीगुरुकृपेचें महत्व व देहबुद्धि टाकून वैराग्यपूर्वक सद्गुरूचें सेवन करण्याविषयीं मनास उपदेश. देहबुद्धिनिंदा, सद्गुरूचे ठिकाणीं सर्वमय भावना ठेवण्याविषयीं उपदेश व स्वत:ची उपासनाकथन. २७१. नित्यचरणप्रेमदानार्थ श्रीकृष्णस्तवन. २७२. श्रीगुरुपाउलें न विसरण्याविषयीं चित्तास उपदेश व पंचायतनवंदन. २७३. कथानुसंधान:—साध्वपराधामुळें परीक्षितीला आलेला मृत्यु व साध्वपराधरूपी पापाची तीव्रता. आपणाला तारक मारक स्वयत्न असून तेथें ईश्वरेच्छेचा उपाय चालत नाहीं असा या कथेचा अभिप्रायकथन. ‘ ईश्वर कर्ता करविता ’ या ह्मणण्याचा यथार्थ अर्थ निरूपण. परीक्षितीच्या साध्वपराधाचें प्रारब्धरूपानें फलीभवन व त्याचा परिहार होऊं शकत नसल्यामुळें राजानें केलेला वैराग्ययत्नाचा आश्रय. देहप्रारब्ध बुद्धिस्वातंत्र्याचें हरण करीत नाहीं ह्मणून संसारसुख प्रारब्धानें दुर्मिळ असतांही परमार्थयत्न सोडूं नये असा याचा अभिप्राय कथन. परीक्षितीनें साधूचा केलेला अपराध व त्याचें फल याविषयींची कथा भागवतांत पहावी असें वक्त्याचें सांगणें. २७३. संसार अनित्य आहे हें मरणकथेचें तात्पर्य आह्मांस कळलें ह्मणून ती न सांगतां सर्वत्र गायन करण्यास योग्य अशा कल्याणनिधान श्रीकृष्णविषयक कथाच सांगण्याविषयीं श्रोत्यांची विनंती. २७३—२७४. वक्त्यानें त्यांचें केलेलें अभिनंदन व भगवद्यशमहिमा, परीक्षितीच्या अनुतापाचें फल, त्याच्यावर शुकांची कृपा, त्याच्या समस्त कर्मांचा क्षय व मोक्षप्राप्तिवर्णन. सर्पविषानें स्मृतिनाश होतो मग परीक्षिती मुक्त कसा झाला अशी शंका आली असतां तिच्या परिहारार्थ भगवत्स्मृती सत्वमय असल्यामुळें विषतमाचा बाध व नित्य श्रीकृष्णयशगान करणारास मृत्यूची बाधा होत नाहीं याविषयीं निरूपण. भगवद्यशक-

थानुसंधानपूर्वक ऋषिप्रश्नाचाउपक्रमः—भगवत्प्रियपात्रांनां अनेक शुभ-फलचिंतन व हे समस्तगुण सूताच्या ठिकाणीं असल्यामुळें भगवद्यश वर्णन करण्याविषयीं विनंती. २७४. सूताची प्रशंसा, श्रीकृष्णयशानें यज्ञाला पवित्रता, एऱ्हवीं कर्माचे ठिकाणीं फळाचा अनिश्चितपणा, अंत-र्बाह्य अभद्रता, कर्मप्रवृत्तीची भ्रमरूपता, शामित्र कर्माची गहनता व इतकेंही पारखेपण असून अहंकारामुळें वाटणारी त्याची सुफलता वर्णन. सूता-ला वैद्याची उपमा त्यानें मधूरिपुपदकमळमधुरासव पाजून केलेला उप-कार. त्यामुळें स्वर्गाची उपेक्षा व सत्संगाविषयीं आवडी. आवडीचें मुख्य लक्षण व शिवब्रह्मादि योगी ज्याचा अंत जाणत नाहींत त्या परमा-त्म्याचें प्रियत्वकथन. २७५. शिष्यप्रश्नः— योगेश्वर भगवद्गुणांचा अंत जाणत नाहींत हे आपल्याला चांगलें समजलें याविषयीं योगशास्त्राच्या रीतीनें भाष्यवार्तिकसमन्वयपूर्वक विवेचन व शिव आणि ब्रह्मा हे ईश्वररूप असून त्यांनांहीं भगवद्गुणाचा पार कळत नाहीं हें वाक्य विरुद्ध आहे किंवा नाहीं असा प्रश्न २७६. श्री-गुरूचें उत्तरः— शिव आणि ब्रह्मा ज्या मताचेठायीं कार्य-ब्रह्म आहेत त्या मतांत कारणब्रह्माचें गुण जाणण्याला त्याचें असामर्थ्य व ज्या मताचेठायीं ते कारणब्रह्म आहेत त्या मताचे दृष्टीनें आपल्या अनंत कल्याणगुणांला जाणण्याची त्यांनां अनपेक्षा ह्या विषयीं निरूपण. २७६. ऋषींचें भगवन्माहात्म्यवर्णन व परीक्षितीचें पुण्यपावन बोधप्रद आख्यान सांगण्याविषयीं सूताला विनंती. सूताचें उत्तरः—स्वतःचें नीच कुलांत जनन, गुरुसेवामहिमेनें आपल्याला आलेली कृष्णगुणगायनयोग्यता व गोविंदगुणगायनानें दौष्कुल्य-परिहारकथन. २७६. सूताचा हरिभजनोपदेश व ऋषीस्तवनपूर्वक आपलें यथाबुद्धि निरूपण प्रेमानें ऐकण्याविषयीं विनंती. २७६–२७७. परीक्षितीची धन्यता, संतांचें सहिष्णुत्व, शापवरासंबंधानें साधकाचें व सिद्धाचें मत व तदनुसार शुकापूर्वी व शुकभेटीनंतर राजाच्या चि-त्ताची समाधानस्थितिकथन, व ह्यासंबंधीं कथा सावधान ऐकण्या-विषयीं विनंती २७७ परीक्षितीची तीव्र मुमुक्षा व कृतकर्माविषयीं अनुतापवर्णन २७७–२७८ पुन्हां आपल्याला द्विजदेवछलक बुद्धि

होऊं नये व कृतापराधाचा दंड याच देहानें भोगावा अशा उद्देशानें ऋषिपुत्राकडून स्वत:ला शाप मिळण्याविषयीं परीक्षितीचें चिंतन व शापवचन ऐकल्यानंतर त्याचा संतोष २७८ राजाचे वैराग्यविषयक विचार :— शुद्ध चित्तालाही भोगप्राप्ति घातक होते याविषयीं नाना दृष्टांत २७८–२७९ ज्या कर्मांनीं परमात्मा दुरावतो तीं सर्व कर्में पापरूप आहेत याविषयीं तातवचनप्रामाण्य. या लोकाहून स्वर्गलोकाची बद्धता वर्णन. धननिंदा व दारिद्र्यप्रशंसा. धनानेंच अन्नपाणी मिळतें असें म्हणणारांचा निषेध. क्षुधेहून धनतृष्णेची दुस्तरता २७९ धनाविषयीं विरक्ति धारण करून भगवद्भजन करण्याचा चित्ताला उपदेश २८०. मातृसेवन सोडून स्त्रीसेवन करणाराचा निषेध. धनवंताची कावळ्याहून नीचता. स्त्रीसंगनिंदा, पुत्रापासून मुक्ति होते या म्हणण्याचें वैयर्थ्य व स्त्रियांचें कपटपाटववर्णन २८० भगवत्प्राप्तिविषयक पुरुषार्थाची श्रेष्ठता, श्रीकृष्ण दृष्टीपुढें नाहीं याविषयीं तळमळ व गंगागमननिश्चय २८०–२८१ गंगेचें स्तवन. सर्व राज्यभार सोडून राजाचें गंगातीरीं राहणें. गंगामाहात्म्यवर्णन:— गंगेचें सगुण व निर्गुण स्वरूप व गुरुतीर्थनिषेवणानें ज्याला निर्गुण स्वरूपाची प्राप्ति झाली त्याला कृष्णपादोदकानें गंगेची सगुणप्राप्तिकथन २८१. जगाला अंतर्बाह्य पावन करण्याची गंगेची शक्ति व मूळांतील 'मरिष्यमाण' ( १-१९-६ ) शब्दाचा अभिप्रायकथन २८२ संसारासक्ति सोडून गंगातटीं राहण्याविषयीं उपदेश व तत्र राहिलेल्या परीक्षितीची नित्यचर्या. शंका:— परीक्षितीनें स्तंभमंदिरीं वास केला होता या महाभारतकथेंत व त्यानें गंगातीरीं वास केला या प्रस्तुत कथेंत विरोध प्राप्त होतो. समाधान:— कल्पभेदानें विरोधपरिहार. कल्पांतरीच्या कथा या कल्पांत सांगणें वृथा आहे असें म्हणणारांकरितां वेदपुराणेतिहासकथांचें प्रयोजननिरूपण २८२. व भारतभागवतकथांचा समन्वय २८३. वेदपुराणेतिहासांची लोकत्रयाला वाटणी करितांना भलत्या लोकाला भलता इतिहास जाण्याचा संभव. दृष्टिसृष्टिवादानें, सत्कार्यवादानें, बृहदारण्यक, योगवासिष्ठ ग्रंथांतील प्रामाण्यानें व योगांतील कायव्यूहसिद्धांतानें भारतभागवतकथांचा समन्वय निरूपण २८३–८४.

विषयांची आसक्ति सोडून व भगवच्चिंतनतत्पर होऊन राजाचें प्रायोपवेषणास बसणें २८४. विषयासक्ति हीच सकल दुःखांस कारण आहे याचें स्मृतिप्रामाण्यानें निरूपण. मनांत किंचितही विषयवासना राहिली असतां थोरथोर बद्ध होतात याविषयीं ' विश्वामित्रपराशरादिमुनयो ' या स्मृतिवचनाचें प्रामाण्य, वस्तुतः श्रेष्ठांची विषयांहून अलिप्तता व इतर जन विषयांत फसूं नये असा त्यांच्या निंद्याचरणाचा अभिप्रायनिरूपण २८४–८५. विषयांत आसक्त राहून वेदांत बकूं नये असा उपर्युक्त स्मृतीचा अर्थ व याच अभिप्रायानुसार एकनाथांचें वचन२८५ मोठ्यांचें निषिद्धाचरण पाहून तदनुसार वागूं पाहणारास पतन होतें म्हणून विषयांतून सर्वथा विरक्त होण्याविषयीं उपदेश २८६. 'प्रपंचांत परमार्थ करावा' या मताचें खंडन व त्या वचनाचा यथार्थ अभिप्राय निरूपण. अंगीं समता न येतां स्त्रीपुत्रादिकांत आसक्त राहून परमार्थाच्या गोष्टी सांगणारांचा स्मृतिसंताभिप्रायानें चांडालवत् निषेध २८६–८७. मनांत नुसती भक्तीची आवडी असून बाहेर लोकांच्या भीतीनें अथवा आळसानें उघड साधन न करणारांचा किंवा नामस्मरण करून संतांची निंदा करणारांचा एकनाथतुकारामवचनाभिप्रायानुसार निषेध व नामाचे दशापराधनिरूपण २८७. गृहस्थ अथवा सन्यासी या दोघानांही अंतस्त्यागाची समान आवश्यकता२८८. परीक्षितीनें गृहादिकांचा त्याग करून गंगाजलसेवन करीत राहण्याचें कारण. शिष्यसह मुनींचें गंगातीरीं आगमन व संत आणि गंगा या भांवडांची पावनता वर्णन. शंकाः-- सर्व आपापल्या कर्मानुसार फळें भोगीत असल्यामुळें साधूंच्या दयेचा तेथें काय उपयोग होतो ? समाधान--भोगाचें स्वरूपकथन २८८. पुण्यभोगकाळीं बुद्धींत स्वातंत्र्य राहतें याविषयीं सोदाहरण स्पष्टीकरण २८८–८९. ' कर्म कितीही वर्षे राखून ठेविलें तरी भोगलेंच पाहिजे ' व ' प्रयत्नानें प्रारब्ध जिंकितां येतें ' या परस्पर विरोधी वचनांचा दृष्टांतपूर्वक समन्वय व महात्मे पुरुष आपल्या पुण्यजन्य स्वातंत्र्यामुळें दयेनें सदैव परोपकार करीत असतात ह्या तत्वाचें कथन. दुःखी जन हे पापकर्मफलास्तव परतंत्र असतात ह्मणून त्यांनां साधुदयाकृत फल मिळूं शकत नाहीं ह्या वचनाचा समन्वय सांगण्या-

कारितां पापी पुरुषाच्या हातून घडलेलें किंचित् सत्कर्म महात्म्यांच्या अनुग्रहानें तीव्र होऊन त्यास प्रयत्नयोग्य कसें करितें ह्यांतील रहस्य-कथन २८९. उपर्युक्त रहस्य माझी बुद्धि नीट ग्रहण करूं शकत नाहीं अशी शिष्याची विनंती व त्याच्या समाधानार्थ तेंच रहस्य वादपूर्वक विस्तारानें निरूपण:— २८९–९०. जन्म, आयुष्य व भोग या तीन्ही प्रकारच्या विपाकाला वासना व कर्म ह्या दोहोंची आवश्यकता. बृहद्वासिष्ठांतील लवणादिकांच्या कथेवरून व स्वप्नादिकांत मानसकर्मानेंच फळ होतें अशा अर्थाच्या महाभारतवचनावरून मानसकर्म म्हणजेच वासना असा अर्थ घेऊन केवळ वासनेनेंही फळ होऊं शकते अशी कोणी शंका केल्यास तिच्या निरसनार्थ शांकरभाष्य, महाभारत, योगवासिष्ठ व पातंजलयोगदर्शन यांतील वचनांचा समन्वयपूर्वक, युक्तीनें व अनुभवानें, वासना व मानसिक कर्म यांतील भेदनिरूपण २९०–२९१ वरप्रमाणें वासना व शारीरिक कर्म यांतही भेद आहे याविषयीं श्रुतीचें व तातवचनाचें प्रामाण्य २९१ व वासना आणि कर्म ह्या दोहोंच्या योगानेंच विपाक होतो असें तात्पर्य, कर्माच्या विपाकोत्पादनाविषयीं उत्पन्न होणाऱ्या चार विकल्पाचें कथन, त्यापैकीं पहिल्या तीन विकल्पांचा संभव मानल्यास येणारे दोष व अवशिष्ट चतुर्थ विकल्प जो एकभविक कर्माशय त्याची ग्राह्यता २९१–२९२ एकभविक वादाचें स्पष्टीकरण व तो सर्वत्र लागू पडत नाहीं याविषयीं कर्मानुशयबोधक छांदोग्यश्रुतीचें, जन्मकर्म व गुणकर्मदृष्टींनीं अर्थदर्शनपूर्वक विवरण २९२ या श्रुतीवरून ब्रह्मसूत्र व योगभाष्य यांतील व्यासवचनांत परस्पर प्राप्त होणारा विरोधाभास व एकभविक कर्माशय क्वचित् ठिकाणीं घेऊन दोन्ही वाक्यांचा समन्वय २९२–२९३ शंका:— "तस्मिन्यावत्संपातमुषित्वा" या छांदोग्यश्रुतीवरून निरनुशय पुनरागमन सिद्ध होत असल्यामुळें एकभविकवादाची सर्वत्र हानी होत नाहीं. समाधान:— 'यावत्संपातम्' या शब्दावरून सर्व कर्मांचा क्षय घेतल्याबद्दल निषेध व अशा अर्थाचें वैपरीत्य. 'यावत्' शब्दाची यथार्थ योजना व 'रमणीयचरणा' या श्रुतीला मुख्यत्व. जाग्रच्छ्रुतीची व आपस्तंब स्मृतीची याला सम्मति व कोणत्याही प्राण्याला या लोकीं जन्मापासूनच

भोग असतात अशी सर्वांची अनुभूती २९३ 'यावत्संपातम्' या छांदोग्यश्रुतीवरून निरनुशय पुनरागमन सिद्ध करूं लागल्यास योगभाष्यकारांच्या व शंकराचार्यांच्या म्हणण्याला बाध येऊन देवांनां मनुष्यजन्मारंभक कर्म न राहतां ज्ञानावाचून मोक्षप्राप्तीही होणार नाहीं याविषयीं निरूपण:— स्वर्गभोगानें या लोकांतील कर्मांचा क्षय झाला आहे व स्वर्गलोकांत कर्म उत्पन्न होत नाहीं असें एकभविकवाद समर्थन करणाऱ्या योगभाष्यकारांचें म्हणणें व मनुष्यलोकांतच कर्म निष्पन्न होणारी वर्णव्यवस्था आहे असें गीताभाष्यांत शंकराचार्यांचें म्हणणें २९४ देवताधिकाराधिकरणामध्यें देवांनां ज्ञानाधिकारी कर्मांचा अधिकार सांगणारें वचन. इंद्रतपबोधक छांदोग्यश्रुतिवचन, भगवत्स्तुत्यादि कर्माधिकार इंद्रादिकांनां सांगणारीं व मनुष्यजन्माविषयीं देवांची इच्छा दर्शविणारी पुराणवचनें यांचा समन्वयकथनपूर्वक देवांनां कर्माधिकार नाहीं याविषयीं विवेचन, २९४ व क्षीणपुण्यपुरुषांनां प्राप्त होणारी अडचण २९४--९५. इंद्रांनां कारागार सांगणाऱ्या वचनांची व्यवस्था व एकभविकवाद क्वचितच लागू करावा अशी सिद्धि २९५. एकभविकवाद क्वचित् लागू करण्याचा प्रकार:-- कर्मांचे नियतविपाकी व अनियतविपाकी असे दोन प्रकार व त्यांपैकीं नियतविपाकी कर्मालाच एकभविकवाद लागू करण्याचा विधि. एकभविककर्माशयाविषयीं नंदीश्वराचें व नहुषाचें उदाहरण. नियतविपाकी कर्मांची क्रममुक्तिप्राप्तीविषयीं आत्यंतिक योजना, इतरांविषयीं अनुमापकरूपानें योजना व ह्याचें ( नियतविपाकी कर्माशयाचें ) बहुधा दृष्टजन्मवेदनीयत्व व क्वचित् अदृष्टजन्मवेदनीयत्वकथन. अनियतविपाकी कर्मांची तीन प्रकारची गती, श्रुतिप्रामाण्य व श्रुत्यभिप्रायकथनपूर्वक निरूपण २९५-९६. तिसऱ्या प्रकारांत सांगितलेलें पुण्यकर्म एखाद्या बलवान नियत कर्मांच्या योगानें दडपून राहिलें असतां काय करावें असा प्रश्न व तीव्र यत्नानें त्या पुण्याला नियतविपाकी करावें असें उत्तर व नियतविपाकी शब्दाचें स्पष्टीकरण. तीव्र यत्न कसा करावा असा प्रश्न व शक्य तेवढी शास्त्रीय शुभ कर्मांच्या तीव्र यत्नाची रीती उत्तरार्थ निरूपण २९६. तीव्रयत्नाचे दोन प्रकार. पहिल्या प्रकाराची फार कठीणता व दुसऱ्या

प्रकाराची बरीच सुलभता. दुसऱ्या प्रकाराचीं उदाहरणें. गंगास्नानाची व भगवन्नामस्मरणाची शक्ति. अनियतविपाकी कर्में कोणतीं व नियतविपाकी कर्में कोणतीं याचा निर्णय, परमेश्वराला अर्पण केलेल्या कर्माचा अत्यंत नियतविपाकीपणा व ह्याविषयीं तुकारामाचें ह्मणणें २९६-९७. नियतविपाकी कर्माशयाच्या एकभविकत्वामधील सूक्ष्मभेदकथन. उपर्युक्त सर्व विवेचनाचें सार:—लोकांच्या अनियतविपाकी पुण्याशयाला नियतविपाकी पुण्याशयारूप करण्यामध्यें गंगास्नान व भगवन्नामस्मरणादिकांप्रमाणेंच सज्जनांच्या दयारूप अनुग्रहाची समानता व सज्जन महावाक्योपदेश करूं शकतात हा त्यांच्या महात्म्यामधील विशेषभेदकथन. सर्वांवर निरपेक्ष प्रीति करणाऱ्या दयावान् पुरुषालाच सर्व त्याग सहज कसा साधतो, कर्मवाद हा दयेला घातक नसून उलटा साधक कसा आहे व एतदर्थच तीर्थांच्या ठिकाणीं महात्म्यांचें आगमन असतें याविषयीं विवेचन व महात्म्या परीक्षितीला वैराग्य झालें हें जाणून सर्व महात्म्यांचें गंगातीरीं आगमन झालें असें कथन २९७. तीर्थांसही तीर्थरूप करणारी सज्जनांची स्थिति व त्यांचें तीर्थांत नहाण्याचें कारणवर्णन२९८ तेथें प्राप्त झालेल्या मुनींचा नामनिर्देश, राजानें त्यांचें केलेलें पूजन व सर्व श्रेष्ठासनीं बसल्यानंतर आपल्या प्रायोपवेषणाला त्यांची अनुमती मिळण्याविषयीं राजाची विनंती. सर्वस्व सांडून संतचरणीं जो लीन झाला त्याचें भाग्यवर्णन २९८. संतदर्शनामुळें राजाचे धन्यतेचे उद्गार व शापाविषयीं अनुग्रह मानणें २९९. राजाची प्रशंसा व वैराग्यप्रभाववर्णन. सर्पविषाचें ठिकाणीं राजाची उत्कृष्ट भावना, त्यानें गंगेचें केलेलें स्तवन व संतापाशीं मागितलेलें वरदान २९९-३००. राजाला उद्देशून मुनींची वरद्वाणी व देवांनीं दिलेलें अनुमोदन, ज्ञानांत विघ्न करण्याचा देवांचा स्वभाव व विष्णुभक्तीनें त्यांचें निवारण ३००. देवांच्या अनुमोदनानें अदृष्ट विघ्नांचा नाश व ऋषींच्या अनुमोदनानें दृष्ट विघ्नांचा नाश. दृढ वैराग्यामुळें राजास मुनींच्या आशीर्वादाची प्राप्ति व जशी ज्याची भावना असेल तशीच त्याला सामुग्री मिळते असा निष्कर्ष. चित्तांत विषयवैराग्य नसतांनां "आम्हांस सद्गुरु भेटत नाहीं" असें म्हणणारांचा निषेध व

पूर्ण वैराग्य झालें असतां सद्गुरुसमुदाय घरीं येतो ह्याविषयीं तात-वचनाचें प्रामाण्य व अनेक ऐतीह्य दृष्टांत ३०० राजाच्या हरिपदानु-सरणचर्येचें ऋषींनीं केलेलें वर्णन:— अंत:करणांत श्रीहरिविषयक प्रेम वाढूं लागला असतां विषयवासना व तर्ककट्टकटीं आटतात व संसारांत दोष पाहणाराच हरिचरणाला विनटतो याविषयीं सदृष्टांत निरूपण ३०१. याकरितां धनकामिनीवर थुंकून नित्य चक्रपाणी आठवावा असा तातकबिरादिसंतवचननिर्देशपूर्वक उपदेश ३०१–३०२ वैराग्यपूर्वक हरिभक्तिविषयीं परीक्षितीचें आनुवंशिक शील व भगवंताच्या प्रेमगोडीचा प्रभाववर्णन ३०२ 'हा हरिरूपीं मिळपर्यंत आम्ही अवघे येथेंच राहूं' असा आपसांत निश्चय करून राजाला ऋषींनीं दिलेलें अश्वासन व संतांच्या आश्चर्यकारक भूतदयेचें वर्णन ३०२–३०३ 'तुला नारायण भेटेल' असें साधूचें आश्वासन मिळणाराचें भाग्यवर्णन व सत्संग-महिमाबोधक संतांचीं वचनें ३०३ ऋषींचें पक्षपातरहित, सत्य व प्रसादभरित वचन ऐकून राजाला झालेलें समाधान व त्यांच्या चरणां-वर दंडवत घालून भगवच्चरित्रें ऐकविण्याविषयीं विनवणी ३०४ मुक्ती-हूनही भगवद्गुणानुवाद गोड असतात याविषयीं राजाचे विचार ३०४. संतांचें मूर्तिमंत वेदत्व वर्णन ३०५ संतांची दीनवत्सलता व वचनामृ-तानें आपणांस निवविण्याविषयीं राजाची त्यांच्या चरणीं लडिवाळप-णाची विनंति. ऋषींनीं राजाला सांगितलेलें तपदानादिक उपाय व मुनिसभेंत भगवान् शुकांचें अकस्मात आगमन ३०५–३०६ शुकांचे वैराग्यब्रह्मचर्यादिगुणवर्णन ३०६ शंका:— भगवान् शुक बाल-ब्रह्मचारी आहेत असें प्रस्तुत वर्णन असून देवीभागवतांत शुकांचा विवाह सांगितला आहे, असा दोन पुराणांचा परस्परविरोध येतो ३०६ समाधान:— अपय्य दीक्षितांचें मतखंडन ३०६–३०७ ज्ञानोत्तर प्रारब्ध भोगण्याची आवश्यकता. ज्ञानरहित योगियाकडून खरें प्रारब्ध भोगलें जाण्याची अशक्यता. ज्ञानी आणि योगी पुरुषांच्या संचित क्रियमाण कर्मांचा ज्ञानानें नाश व प्रारब्धाचा कायव्यूहानें नाश. प्रारब्धभोगार्थ कायव्यूहानें निर्माण केलेल्या शरीरस्थ चित्तांनां गौणता व त्या चित्तांत ज्ञान निर्माण करण्याविषयीं योग्यांचें असामर्थ्य.

योगाची कर्तृतंत्रता ३०७ आसुरी मायेनें उत्पन्न केलेल्या भीम, भास, व दृढ या दैत्यांनां निर्वासनिक स्थिति सांगणाऱ्या योगवासिष्ठांतील कथेचा विरोधपरिहार व योगज कायव्यूहव्यवस्थेनें शुकाचा विवाह व शुकाचें ब्रह्मचर्य सांगणाऱ्या कथांचा समन्वय ३०८ यावर पूर्वपक्ष-उपासनेनें आधिकारिकत्व मिळणारांचें प्रारब्ध सुखरूपच असलें पाहिजे अशा अभिप्रायाचें मधुसूदनस्वामीचें म्हणणें व आधिकारिकांनां दु:खही होत असतें अशा अर्थाचीं निम्बार्कभाष्यांत घेतलेलीं पुराणवचनें व त्याला वसिष्ठांनीं पुत्रार्थ शोक केला हें उदाहरण. या विरोधावरून उत्पन्न होणाऱ्या तीन शंका ३०८ व कायव्यूहसिद्धांतानें वरील शुकविषयक कथांचा विरोधपरिहार होण्याची अशक्यता ३०९ समाधान:— उपासनेनें समाधिस्थ झालेल्या पुरुषांचे ठिकाणीं रज:प्रवृत्तीचा असंभव, आधिकारिक व ईश्वराचे अवतार यांमधील भेद, एकजन्मारंभक व अनेकजन्मारंभक असें दोन प्रकारचें प्रारब्ध ३०९. अनेकजन्मारंभक कर्माचें दोन प्रकार ३१०. सृष्टिनियमनसहकारी आधिकारिकांनां कायव्यूहानें एकदम प्रारब्ध भोगून टाकण्याची अशक्यता, आधिकारिकांचाही लोकानुग्रहसहायार्थ केव्हां केव्हां असणारा कायव्यूह याविषयीं विवेचनपूर्वक पूर्वपक्षाचें खंडन व कोणत्याही अनेकजन्मारंभक कर्माच्या योगज व्यवस्थेनुसार शुकाचे ब्रह्मचारी व विवाहित जन्म सांगणाऱ्या पुराणाचा विरोधपरिहार ३१०. शिष्याची शुकमहिमा वर्णन करण्याविषयीं विनंती व सज्जनमहिमाप्रभाववर्णनपूर्वक श्रीगुरूचें उत्तर:— ३१० शुकांच्या देहावर वर्णाश्रमचिन्ह न दिसण्याचें कारण सांगण्याकरितां जगाची आत्मसदृशता व देहाची ब्रह्मरूपता निरूपण ३११ याविषयीं शुकांचा अभिप्राय निरूपण व त्यांच्या अवधूतवेषाचें वर्णन. शुकांच्या श्यामसुंदर मनोहर मूर्तीचें श्रीकृष्णाशीं सादृश्यानें वर्णन ३११–३१२ ती पुण्यपुंजमय आर्तजननी मुनिसभेंत प्राप्त झालेली पाहून सर्व मुनींनीं केलेला सादरसन्मान, पूजाद्युपचारांनीं राजानें केलेलें सप्रेमपूजन, देवब्रह्मर्ष्यादिकरून सर्व मुनींचा आनंद, व शुकांचें श्रेष्ठासनीं विराजमान होणें, राजानें त्यांनां लोटांगण घालून साभिप्राय अंत:करणानें तच्चरणीं ध्यान लावून हात

जोडून उभें राहणें व चरणदर्शनानें समाधान पावणें. शुकमहिमेचें अमृतपान करविण्याविषयीं शिष्याची विनंती व त्याची प्रशंसा करून वैराग्यभरित मनोहर शुकमाहिमानिरूपणपूर्वक श्रीगुरूंचें उत्तरः— जन्मतांच संसार मिथ्या मानून तपोवनांत भगवान शुकाचार्य जाऊं लागले असतां व्यासांनीं विरहातुर होऊन त्यांच्या मागें धांवणें, तरुपाषाणांतून शुकांचें उत्तर देणें ३१३ शुकांच्या मागें नदीपार जातांनां नदींतील नग्न स्त्रियांनीं व्यासांनां पाहून वस्त्र नेसणें ३१४ त्यासंबंधीं स्त्रियांचा व व्यासांचा संवाद. लोकहितार्थ शुक तपाला बसून कांहीं दिवस लोटले असतां इंद्राला पडलेली भीति, सकाम लोकांची रीति, त्यांनीं निर्मिलेल्या नानादेवता, निरुपद्रवी जनांस पीडा करण्याचा त्यांचा स्वभाव, इंद्राच्या ह्या स्वभावामुळें स्वर्गाचा येणारा वीट ३१४ शुकनियमभंगाविषयीं इंद्रानें मदनाचा घेतलेला विचार, आपला प्रवेश तेथें अघटमान आहे असें त्याचें उत्तर, इंद्र चिंतातुर झाला असतां रंभेनें स्वतःच्या स्वरूपाची प्रशंसा करून केलेली प्रतिज्ञा, तिला गौरवून वसंत व मदनासह शुकतपभंगार्थ पाठविलें असतां शुकांच्या हृदयांत आपल्या तातांनां [ श्रीकृष्णाला ] पाहून मदनाची त्रेधा, रंभेचें गायन व नृत्य व त्याचा प्रभाव, तें सुरस गायन ऐकून शुकांची समष्टिअनाहतनादाविषयीं अथवा श्रीकृष्णवेणूगीताविषयीं कल्पना होऊन डोळे उघडणें व रंभारूपाला पाहून श्रीकृष्ण म्हणून नमस्कार करणें, तें पाहून रंभेचें चुकीचें अनुमान व ती चुकी मदनाच्या लक्षांत येणें, हृदयीं भगवंत लोपल्यावांचून विकाराचा अप्रवेश, शुकाचें ध्यान व रंभेचें चाळे पाहून मदनाचें आश्चर्य ३१५. रंभेनें शुकाचें केलेलें स्तवन व कोकशास्त्रसमन्वित नीतिचें कथन ३१६. शुकांनीं तिचा धिःकार करून वेदांतशास्त्रसमन्वित दिलेलें उत्तर ३१६-१७. सुरतसमाधीचें महत्व व श्रीकृष्णाचे सोळाहजार स्त्रियांचें पतित्व वर्णन करून तपाचा निषेधपूर्वक रंभेचें प्रश्न, व स्त्रीसंगनिंदा, सुरतसमाधीचे दोष, विरक्ति न सोडण्याविषयीं निश्चय ३१७. स्त्रीकुचांची प्रेतशरीरमांसग्रंथींशी समता, सोळासहस्र स्त्रीयांची हरिमयता, श्रीकृष्णाची निष्कामता ३१८. श्रीकृष्णमहात्म्य व अद्वैतभक्तीचें स्वरूपकथनपूर्वक

शुकाचें उत्तर. उत्तर ऐकून मिथ्या संसाराचा द्वेष करण्याविषयीं शुका-चा निषेधपूर्वक रंभेचें संतापयुक्त भाषण व क्रोधानें शस्त्र घेऊन उदर चिरलें असतां त्यांतून सौरभ निघणें ३१८. सुगंधाची किंचित् सत्व-संपन्नता ३१९. सत्वाच्या न्यूनाधिक्यामुळें ब्रह्मलोकादिस्थानीय शरी-रांचें तारतम्य, रंभाउदरस्थ सौरभभांडाराचें कारण, त्या सौरभाचा प्रभाव, शुकाला तपगर्विष्ठ म्हणून रंभेचें त्याला वर देण्याला उद्युक्त होणें, शुकांनीं उठून तिची स्तुती करणें, शुकांचा भाव ओळखून मद-नाचे विचार, श्रीज्ञानेशचरण आवरण नाहीं तोंपर्यंत भक्तांचें मूळमायेला-ही वश न होणें, मिथ्या संसाराचा द्वेष करूं नये परंतु त्याचा राग धरल्यानेंही अतिबंधन चुकत नाहीं याविषयीं विवेचनपूर्वक शुकाचें भाषण ३१९. रंभेच्यापोटीं असलेलें पूर्ण मातृत्व न जाणतां व तिच्या सारख्या जगज्जननी असतां, कांहींच्या पोटांत विष्ठा पाहून लोकांत मातृभाव व्यर्थ मानल्याबद्दल शुकाचे सखेद भाषण ३१९-२०. तिच्या स्तनाला मांसग्रंथी ह्मटल्याबद्दल मागितलेली.क्षमा, स्तनांतलें अमृता-कार दुग्ध सत्वर पाजण्याविषयीं विनंती, शुकवचनानें गलिताभिमान होऊन व देवशरीर विसरून रंभेचें त्याला साष्टांग नमस्कार घालणें व शुक नांव चित्तांत असावें ह्मणून पृथ्वीवर केळी होणें. रंभेचें पश्चा-त्तापयुक्त सविनय भाषण, स्वतःचा धिःकार व शुकांनां गुरुत्वभावनेनें शरण जाऊन वात्सल्ययोगानें तरी पावन करण्याविषयीं विनंती स्त्रीपुरुषांनां पावन करून स्वतः नारायण होण्याची संतांची रीति. ३२१. शुकांचें तिला आश्वासन व भगवच्चिंतन करण्याविषयीं आज्ञा. रंभा स्वर्गास परत गेल्यावर तिला गर्वरहित पाहून ऋषींनां झालेला हर्ष. मदनानें व रंभेनें इंद्राला शुकांचें माहात्म्य व निस्पृहता वर्णन करणें. तें ऐकून इंद्राचे हर्षभरित उद्गार व तपोवनांत जाऊन त्यानें शुकांचें केलेलें पूजन याप्रमाणें शुकांचीं सुखदचर्या निरूपण करून त्यांच्या सर्वज्ञतेची व परीक्षितीच्या भगवद्भक्तीची श्रीगुरूंनीं केलेली प्रशंसा ३२१. शुकां-च्या आगमनानें हर्षित झालेल्या परीक्षितीचे उद्गार निरूपणः—३२२. संतदर्शनानें स्वतःचा भाग्योदय, सज्जनांच्या चिंतनाचें व त्यांच्या अवचित भेटीचें फळ, नारायण तुष्टल्याचीं चिन्हें, भगवं-

ताचें दीनरक्षणब्रीद, त्याचें आपल्याला वंशपरंपरा सहाय्य, व त्याच्या कृपेनें अत्यंत दुर्लभ असें शुक भगवंताचें अवचित् दर्शन. ३२२. भगवान् शुकांची अव्यक्तीं गती व जन्मदकर्मरहित स्थिती असून त्यांच्या व्यक्त दर्शनाविषयीं आश्चर्य व आपल्या शापदग्ध स्थितींत अशा दर्शनाचें महत्व. ३२३. " स पूर्वेषामपि गुरुः " या सूत्रानें शुकांचें परम गुरुत्व, व त्या सग्दुरु जननीला अनन्य शरण होऊन तिच्या दर्शमात्रानेंच आपण पावन झालों असा निश्चयकथनपूर्वक राजाचें परिप्रश्न. तिच्या [ शुकांच्या ] दर्शनाची दुर्लभता व उत्तरें ऐकण्याविषयीं उत्कंठा. ३२३. आमंत्रणविलासाचा उपसंहारः— ' सखीप्रेषणाची ' उपपत्ति. ३२३—३२४. ग्रंथकर्तृत्वनिरूपण. आमंत्रणविलासाला ' विलास ' म्हणण्याचें सकारणत्व व षोडश स्वणांच्या तुलसीवृंदावनाची त्याला उपमा. श्रीज्ञानेशचरणीं ग्रंथसमर्पण व आगमनविलासाचा उपक्रम. श्रीज्ञानेश्वरनामस्मरणांत उपसंहार. ३२४.

---

वाचकांच्या सोयीकरितां ह्या ग्रंथास जोडलेला " परिचय " व " विषयानुक्रमाणिका " तयार करण्यांत **रा. राजेश्वरराव त्रिपुरवार** यांनीं बरेच परिश्रम घेतले, ह्याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहोंत.

**प्रकाशक.**

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥



# ॥ प्रियलीलामहोत्सव ॥

[ आमंत्रणविलास. ]

मंगलाचरण.

॥ गुरुपादछंद ॥

जगदेतज्जातं यत्(स्मात्) येनाप्तं स्थितिमत्र विलयमेति .
परमद्वैतं शांतमनंतं ज्ञानं निगमगमृतमेकम् ॥
भजकप्रेम्णा भाति विवर्तं साकारं सकरुणमिष्टम् ।
गुरुमज्ञानध्वांतविनाशं श्रीज्ञानेश्वरपदमीडे ॥ १ ॥

॥ श्लोक ॥

बहु ज्ञानें केली सकल महि आक्रान्त मनुजा ॥
बहु श्रांता कांता करुनि रति त्वल्लब्धतनुजा ॥
बहु स्वर्गामध्यें मिळविलि सुधापूर्ण नदकें ॥
सख्या चित्तालंदीपतिपद समानंद वदकें ॥ २ ॥

यस्य ध्यानात् स्थैर्यतामेति चित्तं यस्य ज्ञानान्मुक्ततां याति जीवः ।
यद्धर्मेणावाप्यते चित्तशुद्धिस्तद्ब्रह्मैकं पार्वतीशं नमामि ॥ ३ ॥
शशिशिररतिपात्रं शुद्धचैतन्यमात्रं विमलसुगुणगात्रं भक्तसंछिन्नरात्रं[1]।
निगमगतिविहारं संभृतांधांधभारं व्रजयुवतिविलासं व्रीडहासं प्रणौमि ।४।

---

१ रात्र=तामस ज्ञान.

॥ आर्या ॥ ( शिवपंचाक्षरी. )

नगणी श्रम करि सेवा मज्जनपदपंकजाचि जो भावें ।
तद्यश तें कुंतिसुता कृष्ण ह्मणे सर्वदाचि म्यां गावें ॥ ५ ॥
महि सलिल दहन पवन ख मिळुनी जी जाहली असे काया ।
ती कृष्णनामस्मरणें होउनि हरि सेवि सद्गुरूपायां ॥ ६ ॥
शिद्धानुवाद हा कीं श्रेष्ठ ज्ञानाहुनीहि हरिभक्ति ।
श्रीमन्महाभारतीं बहुशा ऐसीच वासुदेवोक्ति ॥ ७ ॥
वागवि निजहृदयीं जो सद्गुरुचरणांबुजास भावानें ।
त्याचा जन्मोजन्मीं हरि होये दासचि स्वभावानें ॥ ८ ॥
यम दूतांप्रति सांगे विष्णुपुराणांत वैष्णवांलागीं ।
नाणावें कीं त्वां जे झाले क्षिराब्धिजापदविभागी ॥ ९ ॥

॥ आर्या ॥ ( द्वादशाक्षरी. )

ॐकाररूप विश्वा जन्मवुनी जो दशांगुली राहे ।
तो नाथ धेनुलोकीं राधेचा कांत जाहला आहे ॥ १० ॥
नभसम व्याप्त असोनी नभमय घेवोनियां शरीरा हो ।
राधासुखार्थ झाला साकाराचि मुक्तिदानि धीरां हो ॥ ११ ॥
मोठा ह्मणति जयातें निगमागम आणि सर्वही शास्त्रें ।
घेतां नाम तयाचें झाकी विश्वास प्रीतिमय वस्त्रें ॥ १२ ॥
भवभय काय बापुडें स्मरतां यदुनाथपाउलां विमळा ।
त्यागुनि वैभवगर्वा ज्यासाठीं दासि जाहली कमळा ॥ १३ ॥
गति नाहीं वाणीची ज्या रूपीं तोचि गोकुळीं आला ।
बाळ यशोदेचा परि माधुर्ये पाळि गोपिका बाला ॥ १४ ॥
वमनासम सांडिति हे इंद्रिय विषयांस पाहतां ज्यातें ।
अपवर्गाहि इच्छिति ना आलिंगुनि हृदयिं कुंजराजातें ॥ १५ ॥
ते तूंच असासि ऐसें उद्दालक बोलिले स्वपुत्रातें ।
मोठें सगुण वचन मनिं प्रेमळ पाहती जया पवित्रातें ॥ १६ ॥
वामा त्यागुनि वामा पतिहृदया वाणि करूनियां राधा ।
न पडुनि वादामध्यें ध्या यद्वामांकि नांदते राधा ॥ १७ ॥

सुत धन दारा मुनिजन सोडोनी राहती अरण्यांत ।
ज्यास्तव तो प्रभु खेळे होउनियां सान गोपकन्यांत ॥ १८ ॥
देउनि यागफळां जो यागीं घेना कधींहि अवदान ।
तो नाथ गोपिकांतें निरिया सोडूनि मागतो दान ॥ १९ ॥
यागेन ज्यारिती तूं सांगसि तैसाचि शिक्षका मातें ।
पदिं कर्महि अर्पुनियां ना इच्छू इंद्रस्वर्गकामातें ॥ २० ॥
यतिवर अथवा होकां सदनीं वर्णी तसाचि हीन परी ।
नाम तुझें गोविंदा पावन सर्वांस सारिखेंच करी ॥ २१ ॥

॥ चौपाई ॥

जे पोळति भवजनितप्रतापें । ते जीवति गुरुचरणप्रतापें ।
यदुपतियजन सुजनमनहारी । स्वमनशुद्धि पावति अधिकारी ॥ २२ ॥
यत्करुणादीनाऽभयदा कीं । कीर्ति ज्याचि श्रुति हाकि सदा कीं ।
ज्ञानदेव वदनीं जपसारा । त्यजुनि करिति भवाविभवपसारा ॥ २३ ॥
तुमहि गनेस सकलमतिदाता । तुम सरसई मुदित जनमाता ।
मम शिर कर धरि कृपानिधाना । कृष्णभक्तिमय करब जहाना ॥२४॥
सद्गुरुचरन परम सुखदायी । जे अनुपम भुवनत्रयमांही ।
सुजनमुकुटमणि देशिकरावू । प्रभुपद मिलन न आन उपाऊ ॥ २५ ॥
ब्रह्मरूपतनु रघुपति जोही । धरत वसिष्ठचरण शिर सोही ।
सत्‌चित्‌सुख केवल जदुरावू । गुरुवर बहत बिटप समुदावू ॥ २६ ॥
निगम अगम अति तर्क निहारा । बिन गुरु कोउ न तारनहारा ।
सो सिस परम मोर मन भावा । जिन गुरुबिन सिर आन न नावा २७
चरण चारु सद्गुरु कृति देवा । तनुमनबचन कर्म करि सेवा ॥
मग जगदघभयभंजन सहजें । मिळत ज्ञान मुनिरंजनरहु जें ॥ २८ ॥
अति विचित्र गुरुवचन सुखाचें । श्रवण करुनि न पडे भवखाचें ।
श्रुतिस्मृति कथा भाव विधि नाना । सहज नेत निज मुक्ति प्रयाणा २९

---

१ अलकावतिपतिचरणसरोजा । स्मरणसात मिळती *सुपरोजा ।
( पाठांतर )

* ( उत्कृष्ट प्रकारचें जें ओज त्याला )

गुरुसम जानि सकल गुरुनंदन । करउं सदा सज्जनपद वंदन ।
मंगल परम सुजान समुदायू । गमत सजीव तीर्थगणरायू ॥ ३० ॥
माधवभक्ति हरिचरणकन्या । ब्रह्मबुद्धि विधिनंदिनि मान्या ।
श्रौतस्मार्त नीतिकृतिसारी । पावन वहनि तमारिकुमारी ॥ ३१ ॥
ते देखत देखत शिव जाहाले । जे या वेणिविमळजळिं नाहाले ।
ज्यांपासुनि जनते भय नाहीं । देति अभय जे थोर हिनांहीं ॥ ३२ ॥
जे मतिरोधक्लेश अति साहुनि । पावन सत्पदजीवनिं नाहुनि ।
चिंतिति हृदयिं सुयश हरि पाहुनि । राहि तेथ प्रभु दुष्कृत दाहुनि ३३
वाहुनि कर्म सकल हरिपायीं । करिति भजन बहुविध सदुपायीं ।
तत्पद वंदुनि नंदनंदना । बैसवुं आणुनि हृदयस्यंदना ॥ ३४ ॥
अजित चित्तिं जिंकुनि जे धाले । निजकरुणे जन निववुं निघाले ।
ते सज्जन शिवप्रभृति कृपार्णव । [1]जे वारिति मायाकृत पाटव ॥ ३५ ॥

॥ दोहा ॥

शिव विधि नारद व्यास शुक पुंडरीक प्रह्लाद ।
बिभिषण वसिष्ठादि सुजन नमितां परमाल्हाद ॥ ३६ ॥
विचरति निर्भय पाहुनि अक्षय वट विश्वास ।
रामकृष्णहरिनाममय ज्यांचा श्वासोच्छ्वास ॥ ३७ ॥

॥ चौपाई ॥

जे हरिसुखमय विषय विसरती । भवमोचनसूचनि अनुसरती ।
ते अति धन्य धन्य भगवंत । झाडिन तत्पद कचि अनुसंत ॥ ३८ ॥

॥ दोहा ॥

संत कृपा करितील तरी ना न ह्मणे यदुराज ।
यास्तव तनुमनवाणि सदा सेविन सुजन समाज ॥ ३९ ॥

॥ आर्या ॥

उदधींत मधुर लहरी तेवीं हरिमूर्ति संत अवतरती ।
त्यांच्या सहजोक्तीनें कांतमती जन अनंत भव तरती ॥ ४० ॥

---

१ नमित हरे मायाकृत पाटव ( पांठातर )

श्रमला दशशतफणि ही चाळवुनी जीभ संतमहिमानीं ।
यत्सुखमूर्ति प्रकटतां असुनि असुर करि उसंत महिमानी ॥ ४१
संसृति पिंपळें उडवी झांकुनि जीवां अनंत पर्णरजें ।
यास्तव असंगवस्तू घ्या जाणुनि नमुनि संतचरणरजें ॥ ४२ ॥

॥ चौपाई ॥

मतिगतिभूति वाणि श्रुति करिमा । सकलहि सज्जनसंगतिगरिमा ।
नरतनु कनकसमान सुखाची । सत्संगतिवांचुनि यम जाची ॥ ४३ ॥
संतसंग तारक भवमोहीं । कृष्णकृपेविण मिळत न तोही ।
परम अमोघ भक्ति रसदानी । अशि विभु नाभि जलजजवाणी ४४

॥ दोहा ॥

मूर्तितीर्थसूरपूजनी फळ याया बहुकाळ ।
सज्जन वंदनमात्रतः भेटविती व्रजपाळ ॥ ४५ ॥

॥ छंद ॥

पळ एक तरि भावें वेळ काढुनि साधुपाय निहाळिती ।
रजधूळि अंगलगेंचि ते जन पापपर्वत जाळिती ।
त्यजुनी रमा गरुडादि तद्हृदि येउनी हरि राहतो ।
जणु होउनी शिवनयन जान्हविजळ शिरस्थित नाहतो ॥ ४६॥

॥ पद ॥

सज्जन चरण शिरीं । पूजुनी । मानस कीर्तनिं धैर्य धरी ॥ धृ.॥
येन्हविं ठावुक मज मम विद्या । लिहिली श्री न करीं ॥ १ ॥
योग याग जप तप मी नेणें । जनन नचि उदरीं ॥ २ ॥
ज्ञानेश्वरजननीकरलालन । काय सुलभ न करी ? ॥ ३ ॥४७॥

॥ चौपाई ॥

सुर मुनि नर गोखर जड नाना । सज्जनसंगति वंद्य जनांना ।
योग विवेक आणि निजधर्म । सुजन विना दाखविति न वर्म ॥४८॥

---

१ सामर्थ्य.

॥ छंद ॥

निरुपाधिकें गिरिजा पुरारि नमो तदीय पदांबुजें ।
जगरूप बालक उपजवुनि उदरीं न पावति भेद जे ।
निजनंदनार्थचि नयनगोचर विमलतरतनुधारकें ।
हिमनगसुता पुरहरदयेविण । हरिपदांबुज पारखें ॥ ४९ ॥

॥ श्लोक ॥

अनलनयन शुद्ध त्वत्पदाब्जाभिलाषी ।
हिमगिरिवरि राहे भस्म सर्वांग साशी ।
मग मम मति देवा केंवि अन्यायि होते ।
चरण हृदयिं घेतांऽयोग्य तें काय होतें ? ॥ ५० ॥

॥ चौपाई ॥

शंभुचरणि ज्याची रति नाहीं । त्या न मिळे हरिभक्ति कदाही ।
सद्गुरु ज्यास नाथ शशिमौळी । त्या न कदा भव अकदव कवळी ॥ ५१
ज्यावरि कृपा करी त्रिपुरारी । त्याच्या हृदयिंच वसत मुरारी ।
तातमात शुळपाणिभवानी । तत्पद वंदुं कायमनवाणी ॥ ५२ ॥

॥ दोहा ॥

रुंडमाल गळधारकू शशिशेखर अविकार ।
गंगाजटा विहारि तो वारी दासविकार ॥ ५३ ॥
कृष्णदास शिवद्रोहि जे कृष्णद्रोहि शिवदास ॥
ते जन करिती कल्पवरी रौरवनरकिं निवास ॥ ५४ ॥

॥ श्लोक ॥

शिवपदकमलेंही कृष्णभक्तीस देती ।
हरिपदकमलेंही शंकरा भेटवीती ॥
शिवविमुख नरांना विष्णु दे दुःखबेडी ।
हरिविमुख जनांतें शंकरू तेंवि ताडी ॥ ५५ ॥

---

१ समोर न येणारे.

॥ दोहा ॥

राम भजे तो शंकरू शिव स्मरे तो राम ।
जो शिवराम भजे तया दोन्हिहि आत्माराम ॥ ५६ ॥
गंगायमुनासंगमीं दोन्ही तीर्थ प्रयाग ।
तेवि विष्णुशिवभक्तिनदीसंगमि ब्रह्म सुयाग ॥ ५७ ॥
शंकरविन्मुख वैष्णवां विघ्न सुषुप्तीभान ।
विष्णु विमुख शैवांस तसा अति संवित्यभिमान ॥ ५८ ॥

॥ पद ॥

शंभु जरि देतिल उपदेशू । तरिंच मग कांतहि कमलेषू ॥ धृ ॥
पिता जैं काळजिनें पाळी । तरिच घे पतिसौख्यहि बाळी ॥ १ ॥
ठेवितिल जरि गुरु कर माथां । तरिच ये करुणा जगनाथा ॥ २ ॥
ज्ञानेश्वरगुरुशिवकरुणा । वरिलें व्रजराजा तरुणा ॥ ३ ॥ ५९ ॥

॥ श्लोक ॥

हरिपदभजनानें भाव जैं चित्तिं वाढे ।
तुटति सकल तेव्हां संसृतीबंध गाढे ।
सुखघन करुणाब्धी भेटतो येउनीया ।
व्रजजनरमणीनां खेळवी जो वनीं या ॥ ६० ॥
नवघनवपु साची पूर्णसौंदर्यपुष्टी ।
मुनिजन मन युक्ती पाहती दिव्यदृष्टी ।
निजकरिं हरि येतां भीति कांहीं नसावी ।
जनिं सगुणगुंण्हा श्याममूर्ती दिसावी ॥ ६१ ॥
निजगुरु तरि तोची कृष्णि जो प्रीति लावी ।
भजन करुनि भावें श्रीहरी दृष्टि दावी ।
मन पवन परात्मा अर्पुनी विष्णुपायां ।
हरिगुणस्मरणानें शोभवी सर्व काया ॥ ६२ ॥
स्मरण तरि असो हें कृष्ण गोविंद वाणी ।
स्मरकुसुमशराचें शौर्य मा कोण वाणी ।
स्मरहरगडि जो तो चित्तिं बांधोनि ठेवीं ।
भवभय मग कांहीं साधिना देह गोवी ॥ ६३ ॥

न कळत मज कांहीं वेद शास्त्रादि युक्ती ।
न गणित मम बुद्धी साधनें मोक्ष मुक्ती ।
हरिचरणसरोजीं घेउं विश्रांति धावे ।
वदनिं मधुरिपूचीं साजिरीं गाय नांवें ॥ ६४ ॥
हरिचरणगुणांची आवडी चित्ति जेव्हां ।
जडल भवभयातें सोडुनी भाव तेव्हां ।
हरि मुख निजहासा भेटुनी तेंचि होतें ।
बहुविध श्रुति सांगे कृष्ण जै कृष्ण होते ॥ ६५ ॥
अगणित तव नामें बोलती वेदवाणी ।
परि मम मन तें कीं कृष्णनामास मानी ।
निजसुख असुनी ही दुःखत्रैविध्य भासे ।
परि तव गुण गातां कल्पनाविघ्न नाशे ॥ ६६ ॥
जंव जंव मति कल्पी पाय तूझे दयाला ।
तंव हि त्वरित सोडी संसृतीच्या भयाला ।
सुलभ मग हि वाटे मुक्ति सर्वत्र मातें ।
भजन करुनि पावे सोडुनी आक्रमातें ॥ ६७ ॥
हृदयिं उदय होये प्रेमसंपर्के जेव्हां ।
यशोमतिसुत वारी तापत्रैविध्य तेव्हां ।
जळति पुढति पूर्वी जाहलीं सर्व पापें ।
मिळत सकळ शांती श्रीगुरूच्या प्रतापें ॥ ६८ ॥
जडल जडल बुद्धी कृष्णपायीं झटूनी ।
पडल पडल तेव्हां संसृती ही तुटूनी ।
मग गुरुकरुणेचा बिंदु जीवीं विलासे ।
पराचितिसुखसिंधू विश्विं तैं पूर्ण लासे ॥ ६९ ॥

॥ चौपाई ॥

वंदु श्रोतृजनकमलपदांही । जे हरिसुयशानिमग्न सदाही ।
परम चतुर मतिविमल विचारी । निगमागम यदीय श्रुति चारी ॥ ७० ॥

---

१ पाप.

वंदु खलहि जे मम हित करिती । निंदुनि सकल पाप शिरिं धरिती ।
त्यागन कारन सुनहु बिरागी । कवन कवन नहि कथानुरागी ॥ ७१ ॥
जो निशिदिनि कामिनिपह जागे । ता उर चरित सूलसम लागे ।
नारी पराद देखि मनमानी । कामाबिबश सठ अपनिहि जानी ॥ ७२ ॥
कोपाबिबश परअनहितकारी । लोभबिबश धनहेतु बिकारी ।
अनहित सठ अपनो नहि बूझैं । मनसि जुगति पर हननकि सूझैं । ७३
जाकि जुवतिमह कोउ न माता । अरिगण पुरुष कोउनहि ताता ।
केतुउदयसम जनन जयाचें । पूजुनि देव अन्य मृति याचे ॥ ७४ ॥
जिन पुनि यहहि साच करि माना । पिशितरुधिरमय आतम जाना ।
सुजननबिखे परम कटुताई । कामिनिमोहनपर पटुताई ॥ ७५ ॥
नारिथूक पीयूख उपावहीं । मूत्रसदनपथ अनुदिन धावहीं ।
गुरुउपदेश अमीय नहि पागे । कुवदन मधुर नरकरस लागे ॥ ७६ ॥
कर्ता सबहि ईश अस भाखे । करि अति जतन बिखयरस चाखे ।
पल पल बकत दैवबिभुताई । सो नहि सुधरहि श्यामदुहाई ॥ ७७ ॥
कोउक श्रोतृसभामह आवे । लोकलाज गणिका चित लावे ॥
पढि निगमांत गुरुहि अवमाना । देखि तदीय मुख सचिर न्हाना ।७८
कहि हम ब्रह्म परन धन मांगे । श्वानसमान जुवतिमुख सूंगे ।
कुंभिनि सुरश्रुति बदन न गाई । महिपति तदपि प्रजा बिलखाई ।
वैश्य कृपण अति धनअभिमानी । सूद जनम अरु द्विजअवमानी ७९

॥ दोहा ॥

जुवति होइ नहि भजत पती करत रूपअभिमान ।
तनुज मातुपितु भजत नही लखि मनमह मदमान ॥ ८० ॥

॥ चौपाई ॥

यह जनगण नहि कथा सहारा । जिन सब जग धनहेतु निहारा ।
व्याघ्र अनल फणि गरहि विकारी । होति कुसंग समन हितहारी ।८१।
कृपा करुनि यदुवल्लभ देवा । कुधिपथिं आड सुदर्शन ठेवा ।
धरसिल तूं करिं जरि ब्रजराजू । काय करिल मग कुजनसमाजू । ८२ ।

---

१ कहत (पाठांतर) २ सुधरत (पाठांतर ३ कृष्ण, नाथ. (पाठां०)

॥ श्लोक ॥

निगमगणहि शब्दीं वर्णुनी नेति नेति ।
धरुनि सहज मौना लक्ष्यता दाखवीती ।
शिवमतिगति मूर्ती आश्रयीली सये ती ।
व्रजयुवति मिळाया धावुनी जीस येती ॥ ८३ ॥
सदयहृदय देवा तापला देह माझा ।
लवकर हरि आणी सिद्धसाधूसमाजा ॥ ८४ ॥
तंववरि परितापू त्वत्पदा जों न सेवी ।
ह्मणवुनि करुणार्द्री मस्तकीं हस्त ठेवी ॥ ८५ ॥

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

मंगलाचरण समाप्त.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण १ लें.

॥ दोहा ॥

नत्वा श्रीगुरुचरणरज आणिक व्रजपतिपाय ।
भाषागत भागवत घडो मध्यमसुजनउपाय ॥ १ ॥
सुरमुनि तपकरि थकित भये तदपि न मिलन हुलास ।
तिनके जसुमतिसदनमह लीलाललितविलास ॥ २ ॥

॥ चौपाई ॥

विषयि मुमुक्षु मुक्त जन जे कीं । वासुदेवपारायण शेखीं ।
त्या सकलांनां शुकमुखवाणी । करि सुखि दाउनि भवभयवाणी ॥ ३ ॥
ते श्रीमद्भागवत पुराणीं । कथित अधिष्ठुनि व्रजपतिराणी ।
सखि होउनि मी नित्य तियांची । मुनि वर्णिति प्रख्याति जयांची ॥४॥
प्राकृत सुंदर मंद जनाला । घाटे करुं मंदीर मनाला ।
वेद जननि गायत्री माता । करित तृप्त जे अखिल अनाथा ॥ ५ ॥
ती होउनि आरंभी पहिली । कृष्णकथा वर्णितातित वहिली ।
सुजनचरित प्रऱ्हाद अधिष्ठी । यादव गोपति कृष्ण समष्टी ॥ ६ ॥
यास्तव ब्राह्मणादि सकलांते । भागवतचि ने सुख अकलांते ॥
श्रवणमात्र करितां दृढ वृत्ती । सहजचि दुःखत्रयविनिवृत्ति ॥ ७ ॥

॥ दोहा ॥

यापरि येथिल महिमता नेणे विधि श्रुति शेष ।
ते शिवकरुणा किंचित प्राकृत वदूं विशेष ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट्
तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः ॥
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥

॥ ओव्या ॥

जो सर्वज्ञ सर्वशक्तिमान । सामान्यचैतन्य विश्वाधिष्ठान । श्रुतिसमन्वय प्रमाण । जाणावया जयातें ॥ ९ ॥ जगदुत्पत्तिपालनलय । तटस्थलक्षणें जेथोनि होय । जयाचें स्वरूपलक्षण संत स्वयें । व्यतिरेकान्वयें जाणती ॥ १० ॥ मृगजळासमान जगदसत्य । तें यत्सत्ता वाटे सत्य । जें आनंदघन चैतन्य नित्य । परब्रह्म ॥ ११ ॥ जें आधि निर्मोनि विधातिया । उपदेशिलें वेदा तया । अधिष्ठोनि तद्‍हृदया । विस्तरिले श्रुतिजात ॥ १२ ॥ तया परब्रह्माचें । मायापर कूटस्थ सत्याचें । आह्मी साक्षित्वें जाणोनि साचे । सगुणत्वें ध्यान करितसों ॥ १३।

॥ अभंग ॥

जगाची उत्पत्ति स्थिति आणि लय । ज्यापासुनी होय सहजची ॥ १ ॥ व्यतिरेकें जो कीं तटस्थलक्षण । अन्वयेंकरून स्वरूप जो ॥ २ ॥ स्वराट् ह्मणोनी श्रुति वर्णिताती । विधिये प्रतीति आद्य ज्याची ॥ ३ ॥ तिन्ही लोक जेथें भासती अन्यथा । मृगजळसत्ता जयापरी ॥ ४ ॥ निजतेजें जो कां मायाविरहीत । 'सत्य ज्ञानाऽनंत' परब्रह्म ॥ ५ ॥ मिळोनिया आह्मीं करूं त्याचें ध्यान । ज्ञानेशवचन मानुनीया ॥ ६ ॥

॥ ओव्या ॥

यापरी श्रीवेदव्यास । मंगल करिती ग्रंथास । आणि ब्रह्ममीमांसार्थही विशेष । जन्मादिसूत्रें दर्शविला ॥ १४ ॥ ह्मणोनी धर्ममीमांसानंतर । हें भागवत पहावें परिकर । येथें चिदानंद सविस्तर । भक्तिज्ञानें मिळतसे ॥ १५ ॥ आणि या भागवतीं प्रतिपाद्य देवो । तो निर्गुण सगुण इंदिरारावो । निर्गुण ज्ञान सगुण भक्तिभावो । बोलिला पहाहो रसिकजन ॥ १६ ॥ रुद्रादिगीतेंकरून । प्रतिपादिला उमारमण । दशमस्कंधादिकेंकरून । रमारमण बोलिला ॥ १७ ॥ जे ब्रह्मा विष्णु शंकर । येशास्त्रीं तिघेही ईश्वर । परि विष्णूविषयीं वारिष्ठ्यनिर्धार । तो उपासनाप्रकार जाणावा ॥ १८ ॥ एवं रुद्रादिगीतीं पाहतां । शिवोपासनाही बोलिली तत्वतां । आणि यें भागवतीं वार्ता । शिवविष्णुसाम्यता तेहि लाभे ॥ १९ ॥ भारतीं उपमन्यूतें क्षीरसागर । देता झाला

पिनाकधर । हे भारतकथा निर्धार । शिवोत्कर्ष द्योती ॥ २० ॥ येथ सुदामातें सोनियाची । नगरी दिधली साची । ह्मणूनि भागवतीं साम्यता शिवाची । भारतप्रमाणें ॥ २१ ॥ एवं भारतभागवतऐक्यता । जुनीचि आहे हरिहरसाम्यता । तेचि मुख्य मानोनि चित्ता । भक्तिपंथा लागावें ॥ २२ ॥ हा या शास्त्राचा आशयो । वाद न करोत महाशयो । असो आतां प्राकृत भाव । मुमुक्षुमंदार्थ वर्णिला ॥ २३ ॥ यापरी 'जन्माद्यस्य यतो' याशद्बेंकरून । निर्गुणवस्तुनिर्देशमंगलाचरण । 'तेने ब्रह्म हृदा य' इत्यादिकेंकरून । सगुणनिर्देशमंगलाचरण बोलिलें ॥ २४ ॥ ब्रह्म हृदा य आदिकवये' इत्यादिशद्बीं । मंगल आणिलें आशिर्वादीं । 'सत्यं परं धीमहि' इत्यादि शद्बीं । नमस्काररूप मंगल ॥ २५ ॥ 'तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गो' इत्यादिशद्बेंकरून । जगन्मिथ्यात्वप्रबोधन । 'सत्यं' इत्यादिशद्बेंकरून । ब्रह्मसत्यता बोलिली ॥ २६ ॥ विवेकविरागादि चारी । साधनेंही निघती निर्धारी । परी ग्रंथविस्तारभयें सारी । न बोलिलीं ॥ २७ ॥ पंडित जे कां होती । ते नाना अर्थ काढिती । मी अज्ञोनी मंदमती । उल्हास चित्तीं वर्णावया ॥ २८ ॥ तरी ज्ञानेश्वर गुरु माता पिता । गणेश शारदा संत तत्वतां । कृपावंत होऊनि मच्चित्ता । स्फूर्ति देऊनि ग्रंथा चालविजे ॥ २९ ॥ एवं प्रथमश्लोकनिरूपण । आतां कर्म उपासना आणि ज्ञान । सांगोनि भागवतवरिष्ठपण । निरूपण द्वितीय श्लोकीं ३०

॥ श्लोक ॥

धर्मः प्रोज्झितकैतवोऽत्र परमो निर्मत्सराणां सतां
वेद्यं वास्तवमत्र वस्तु शिवदं तापत्रयोन्मूलनम् ॥
श्रीमद्भागवते महामुनिकृते किंवा परैरीश्वरः
सद्यो हृद्यवरुध्यतेऽत्र कृतिभिः शुश्रूषुभिस्तत्क्षणात् ॥

॥ ओव्या ॥

त्रयी त्रिकांड वेद पिता । तद्रूप भागवत तत्वतां । यालागीं वेदवत्प्रमाणता । गमिली याची ॥ ३१ ॥ तेवीं याचें श्रेष्ठपण । तेंही ऐका भगवज्जन । तुह्मी बोलविला मी बोलेन । यावी शिकवण जननी-

परी ॥ ३२ ॥ येथ स्वर्गमोक्षादिफळें । आविद्यकें त्यागोनि सकळें । ईश्वराराधनें निखळें । साधिजे धर्मू ॥ ३३ ॥ ऐसें कर्मकांडाहोनि वरिष्ठ । हें भागवत बोलिजे स्पष्ट । आतां ज्ञानकांडाहोनि वरिष्ठ । बोलिजे सें ऐकिजे श्रोतीं ॥ ३४ ॥ तरी जगन्माया जीवपण । हें सकळ अध्यस्त ह्मणोन । जयासी सर्वदा भिन्न । तें वस्तुज्ञान बोलिलें ॥ ३५ ॥ एऱ्हवीं द्रव्यगुणक्रियादिकें । हीं ज्ञानें किडाळें अनेकें । बहु असती परी निके । न होती सुखदें ॥ ३६ ॥ येथ बोलियलें ज्ञान । तें परमानन्द-प्राप्तिकर पूर्ण । आणि त्रिविधदु:खनिरसन । येणेंचि होय ॥ ३७ ॥ सकारणदु:खनिवृत्ति । आणि परमानन्दप्राप्ति । ययालागीं वेदान्ती । ह्मणती मोक्ष ॥ ३८ ॥ तो निजरूपाचि ह्मणून । येथ मिळवाया अव-काश गहन । मागां केलें जें उपेक्षण । तें ब्रह्मलोकमोक्षाचें ॥ ३९ ॥ आणि चतुर्वेदसार । ब्रह्मया श्लोक चार । जे बोलिले सर्वेश्वर । कल्पा-दिसमयीं ॥ ४० ॥ तयाचाचि यथार्थार्थ । बोलिले सत्यवतीसुत । परी होवोनि समाधिगत । ह्मणोनी समाधिभाषा नाम यातें ॥ ४१ ॥ ह्मणोनी जो कांहीं विस्तर । तोही परमेश्वरोक्त समग्र । यावांचोनि शार्ङ्गधर । अन्यसाधनें न सांपडे ॥ ४२ ॥

॥ पद ॥

गारे श्रीव्रजपतिपद उमागारे । नातरि शिमगारे ॥ ध्रु० ॥
सेवितसां कां विभयविषाला । घेउनि कामफणीच उशाला ।
ऐकित ना कां सहज अशाला । करुनी श्रवण उगारे ॥ गारे० ॥ १ ॥
येथचि यदुपति सहज सांपडी । व्हावें याचे वाटकापडी ।
इतर शास्त्र तीं काय बापुडीं । शिणचि वाउगारे ॥ गारे० ॥ २ ॥
इतर साधनीं श्रीहरी हृदयीं । येतो झडकरि सांगा कायी ? ॥
येथें तव उशिर किमपी नाहीं । सिद्धचि कनकनगारे ॥ गारे० ॥ ३ ॥
अलकावतीपतिचरणसरोजा । वंदुनि निज शरिरीं घ्या ओजा ।
सांडुनि धनकामिनिसुतवोझा । करा देव सगारे ॥ गारे० ॥ ४ ॥ ४३ ॥

॥ ओव्या ॥

एवं उपासनाकांडाहुनी । याची श्रेष्ठता वर्णिती मुनी । ऐकण्याची

इच्छाही पुण्यावांचुनी । नव्हे ह्मणूनी सुदुर्लभ ॥ ४४ ॥ यास्तव सांडोनि सकळ व्यापारू । येथ श्रवणीं असावा आदरू । सप्ताह करूनी तरी साचारू । ऐकावा प्रेमें ॥ ४५ ॥ एवं उक्त हें भागवत । वेद पुराण शास्त्र समान्वित । आणि काव्यगुणही येथ । लखलखीत डोळ्यापुढें ॥ ४६ ॥ वेदोपदेश प्रभुसंमित । पुराणोक्त सुहृत्संमित । कांतासंमित काव्योक्त । श्रीभागवत संमितत्रयमय ॥ ४७ ॥

॥ श्लोक ॥

निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ।
पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः ॥

॥ ओव्या ॥

तरी सकळ प्रमाणामाजी वरिष्ठ । जो प्रभूचा निश्वास स्पष्ट । तो महाराज वेदनिर्दिष्ट । वृन्दारकद्रुम ॥ ४८ ॥ कर्मकांडांतील क्रियाश्रवण । उपासनाकांडांतील सगुणध्यान । उपनिषदांमधून अद्वैतज्ञान । आणि आनंदरूप जाण पक्क भक्ती ॥ ४९ ॥ ऐसें या सुरद्रुमाचें । सर्वपुरुषार्थरूप साचें । फळ बोलिजे सुखाचें । श्रीभागवत हें ॥ ५० ॥ तेंचि वैकुंठाहुनी । श्री महाराज नारदमुनी । मज देता झाला आणोनी । व्यासवाणी इतिविध ॥ ५१ ॥ आणि माझिये करीं । फळ गेलें शुकवक्त्रीं । तेथूनि पुढें परंपराकारी । पृथ्वीवरी विस्तारिलें ॥ ५२ जैसें मागूनि आलें । तैसें पुढें नित्यचि ठेविलें । पुढील आख्यानींही बोलिलें । ये शास्त्रीं ह्मणूनी ॥ ५३ ॥ आणि जें अनागत । आख्यान झालें समस्त । तें घेऊनि प्रवृत्त । शास्त्र हें यत: ॥ ५४ ॥ असो, ऐसें हें फळ । वैकुंठापासोनि आलें केवळ । परी फुटलें नाहीं ह्या प्रबळ । नित्यपणा ययाचा ॥ ५५ ॥ आणि वास्तवीक तरी पाहतां । आम्रादिफळा शुकमुख स्पर्शतां । तरी तयाची मधुरता । विशेष वाढे ॥ ५६ ॥ तरी आधींच हें अमृत । वरी शुकमुनी वक्ता कृपावंत । आणि ऐकणार हरिरसभरीत । परिक्षिन्नृपनाथ मुमुक्षु ॥ ५७ ॥ एवं मुमुक्षूसाठीं प्रवृत्ति । आणि शुकाची न वर्णवे विरक्ती । यरी या निगमफळाची स्थिती । समस्त जाणती सुरमुनी ॥ ५८ ॥ एवढें ही असूनी । येथ

वर्णिला कैवल्यदानी । जो भक्तवत्सल शार्ङ्गपाणी। पिनाकपाणी तैसाची ॥ ५९ ॥ यालागीं झालियाही मुक्ती । हें फळ न टाकिजे संतीं । वरी रसिकत्वाची स्थिती । जयाचिये अंगीं ॥ ६० ॥ कां सुवर्णी जैसी हिरकणी । तैसें रसिक रतिभावज्ञमुनी । तयासांठी हें वाक्य प्रमाणीं । धिवसा होय ॥ ६१ ॥ जैसे बाळें मायबापा उपदेश करितां । तरी त्या शिष्यांचि ह्मणाव्या तत्वतां । तेवीं तुह्मां श्रोतया फळ सेवा म्हणतां। प्रमाद होवो पाहातसे ॥ ६२ ॥ परी तान्हें बाळ कवतुकी । ग्रास घाली पितृमुखीं । तेणें मातापिता सुखी । अधिकचि होती ॥ ६३ ॥ तेवीं तुह्मा संतांचा पढियावो । वरी बाळपणाचा ठावो । आणि बोबडा प्राकृत प्रवाहो । मग कां न आवडेल तुह्मां ॥ ६४ ॥ आणि हें फळ सेवितां चांग । त्यागावा न लगे कठिण भाग । हें रसरूपचि सैंघ । जाणिजे फळ ॥ ६५ ॥ रसासी असतां पातळपण । तो हातांतूनि जाईल गळून । ऐसें नाहीं फळासमान । ह्मणोनी फळ बोलिलें मूळ श्लोकीं ॥ ६६ ॥ आणि सोडावा नलगे कठिण भाग । यालागीं रसरूप हें फळ चांग । येणें हृदयीं गोपिकारंग । सहज प्रकाशे लीलया ॥ ६७। एवं सकळ शास्त्रवरिष्ठ । ह्मणोनी श्रवण याचेंचि श्रेष्ठ । तरी रसिक रतिज्ञ भक्तिनिष्ठ । मधुर पान करावें ॥ ६८ ॥ एवं ऐसें हें फळ । परी येथ माझी वाणी कठोर केवळ । त्यांतील कठोरभाग गाळूनि सकळ । निज फळ सेवा आनंदें ॥ ६९ ॥ आतां कथानुसंधान । नैमिषारण्यीं मुनिजन । शौनकादि तपःसंपन्न । हरिप्राप्तिहेतु यज्ञ करिती ॥ ७० ॥ एकदां ते मुनिजन । नित्य नैमित्तिक कर्म सारून । सूताचा सत्कार करून । पुसते झाले आदरें ॥ ७१ ॥

॥ अभंग ॥

ऋषी ह्मणताती पुण्यवंत सूता । इतिहास कथा पुराणादी ॥ १ ॥
तुजपासुनीया ऐकियल्या आह्मी । आणि शास्त्रधर्मी प्रमाण जे ॥ २ ॥
तेंहि आह्मी केलें सखया श्रवण । परी एक प्रश्न आहे आतां ॥ ३ ॥
कलीयुगीं लोक सारे अल्पायुषी । अत्यंत आळशी मंदमती ॥ ४ ॥
हतभाग्य मूढ तयासांठी आधीं । आह्मी लीलासंधी ऐकावया ॥ ५ ॥
ऐसें कांहीं सार सोपें मोक्षदानी । सांगाया वेंचूनी तूंचि योग्य ॥ ६ ॥

आणिकही एक पुसतों आवडी । प्रेमळांची उडी जयापायीं ॥ ७ ॥
तो हा नारायण देवकीचा बाळ । आश्चर्य केवळ वाटे आम्हां ॥ ८ ॥
जया जाणावया 'नेति' ह्मणे वेद । त्या यशोदा नंद माय बाप ॥ ९ ॥
समाधींत ज्याची सुकृतानें भेटी । वसुदेवापोटीं तो हा कैसा ? ॥ १० ।
जयाच्या अज्ञानें भासती विषय । तो हा यदुराय गोपी भोगी ॥ ११ ॥
सहजही नाम ज्याचें मुखीं येतां । होतसे पतीता प्रायश्चित्त ॥ १२ ॥
तो हा नारायण गोपीनिरियां फेडी । सांडोनी उघडी जनलाज ॥ १३ ।
विधि त्रिपुरारी जया मनीं ध्याती । तो हा विश्वपती गायी चारी ॥१४
नारदादिमुनी नित्य गाती ज्यास । निजे सावकाश मातृगीतीं ॥ १५ ।
विष्णुसत्रादिकीं न घे अवदान । तो विश्वमोहन माति खाय ॥ १६ ॥
निर्विषय मुनी यत्पदाश्रयानं । जगास पावन करीताती ॥ १७ ॥
जयाच्या अंगुष्ठीं जाली मंदाकीनी । पावन म्हणूनि करी जगा ॥ १८ ॥
तोही प्रभु आहे वश सज्जनांना । श्रेष्ठत्व तयांना ह्मणूनीया ॥ १९ ॥
सामवेद गाय होऊनीया भाट । न जाय अचाट शीघ्र झोंप ॥ २० ॥
थापटूनि तया जागवी यशोदा । गोपाळा गोविंदा आळवोनी ॥ २१ ॥
ज्याची लीलाकृत्यें नारदादि गाती । ब्रम्हादिविभूति कला ज्याच्या । २२
बळिरामासह तो हा श्रीकेशव । नानालीलाभाव दाखवीता ॥ २३ ॥
आह्मांसी विस्मय ब्रह्मरूप हरी । लीलाभाव तरी दावी कैसा ? ॥ २४
तरी आम्हां येथ एक समाधान । सज्जनोद्धरण कारण कीं ॥ २५ ॥
भक्तानुग्रहानें लीलामयतनू । येर तो निर्गुणू निर्विकारू ॥ २६ ॥
तो हा नारायण जगन्मायबाप । चारित्रें सांक्षेप सांगे त्याची ॥ २७ ॥
कलीयुग आह्मी लागलें जाणोनी । राहिलों येऊनी नैमिषीं या ॥ २८ ॥
धर्मासाठीं आहे प्रभूचा अवतार । अवकाश फार आम्हांलाही ॥ २९ ॥
हरितिरोधानीं स्वामी धर्मराया । कोणाचा आश्रय धर्में केला ॥ ३० ॥
पुण्यश्लोक देवो त्याची लीलाकीर्ति । ऐकतानां तृप्ति नाहीं मना ॥ ३१

वरी तुजसम तारक श्रीगुरु । यालागीं निर्धारू पुसिला हा ॥ ३२ ॥
एवं ऋषिप्रश्नीं सूता येती डोल । उत्तर देईल सुखें पुढें ॥ ३३ ॥
ज्ञानेश्वरकन्या सज्जनां वंदोनी । मिळा अवधानीं विनवी ऐसें ॥ ३४ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीप्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे ऋषिप्रश्नं नाम प्रथम सखीप्रेषणम् ॥

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण २ रें.

॥ पद ॥

चेतो भज राधाकांतं ॥ धृ० ॥
ज्ञानेप्लवेन भवमतिक्रम्य सेवय एकांतम् ॥ चेतो० ॥ १ ॥
संयमवन्हाविन्द्रियहोमं कृत्वा विषयांतम् ॥ चेतो० ॥ २ ॥
व्रजजनप्रेमलरूपविशेषं मनुते वेदांतम् ॥ चेतो० ॥ ३ ॥
स्मर तज्ज्ञाभायैव मुमुक्षो अलकावतिकांतम् ॥ चेतो० ॥ ४ ॥ १

॥ चूर्णिका ॥

एवं ऋषिजनप्रश्नातें । परिसुनी सहर्षचित्तें । चिंतोनी सत्यवतीसुतातें । विद्या दिधली जया तातें । विभवविभवसहजहतातें । हृदयीं दावी अखंड सतातें । मग चिंतोनी हृदयस्थातें । आणि पाहोनी सर्वगतातें । अधिष्ठोनी व्यासमतातें । मधुर गीतातें ऐकवितां झाला ॥ २ ॥

॥ ओव्या ॥

जो श्रुतिकवळ कमलाकांत । जो सत्यवतीगर्भ कृपावंत । तो श्रीव्यास असें बोलत । येथ माझें किंचितही नोहे ॥ ३ ॥ व्यास वद-

---

१ ज्ञाननौकया ( पाठांतर )

ती श्रोतियांतें । एवं पुसलें सूतातें । तेणें हर्ष पावोनी मुनींतें । बोलतां झाला उग्रश्रवा ॥ ४ ॥ परी ज्ञान सांगावया आधीं । पाहिजे गुरुदेवता-नमनसिद्धी । अन्यथा ग्रंथकर्तेरीं प्रसिद्धी । नास्तिकभ्रांति होतसे । ५ ।

॥ पद ॥

तो दीनजनतरण नमिला ॥ धृ० ॥
त्यजुनि सकल जो परब्रह्माणि । अक्षय चित्सुखीं रमला ॥ तो० ॥ १ ॥
जन्मतांचि जो जननिउदरींरहुनी । नाहीं कदा भयीं भ्रमला ॥ तो० २ ॥
जाउनि जो गुरुजवळीं मुंज करी । ह्मणुनी नाहीं श्रमला ॥ तो० ३ ॥
कर्तव्य न ज्या कर्तृबुद्धिचें । कर्मविकर्महि थमला ॥ तो० ४ ॥
तातभयें सुत ह्मणुनी बाहतां । सकलतरूत्तरीं गमला ॥ तो० ५ ॥
अलकावविपतिबालावदनीं । पुण्यकीर्ति यद्विमला ॥ तो० ६ ॥ ६ ॥

॥ अभंग ॥

'ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं' । तुकारामवाणी प्रमाण ही ।१।
ज्ञानी तैसा जो कां अंतरीं निवाला । हरिभक्ति केला देह ब्रह्म ॥ २ ॥
श्रुतीचेंही सार स्वानुभवगम्य । योगिया विश्राम्य सुखरूप ॥ ३ ॥
तेंचि देहाकारें मुसे आलें वाटे । हृदयीं प्रगटे ध्यातां ध्यातां ॥ ४ ॥
स्मृतिगामी आणि पुराणाचें गुह्य । बोलिला जो स्वयें सर्वहिता ॥ ५ ।
तमोऽन्ध जनाला अध्यात्मप्रदीप । लावोनी साक्षेप तिष्ठत जो ॥ ६ ॥
कृपेनें जो करी सच्छिष्यरक्षण । देतसे शिक्षण परीक्षूनी ॥ ७ ॥
तो हा कृपावंत स्वामी शुकमुनी । प्रणाम चरणीं सद्भावानें ॥ ८ ॥
ऐसें बोलोनीया उग्रश्रवासुत । ऋषींतें सांगत गुह्यज्ञान ॥ ९ ॥
ज्ञानेश्वरकन्या सुख कृपावशा । महाराष्ट्रभाषा वाणी वदो ॥ १० ॥ ७ ॥
नारायण नर नमूं उभयतां । जनाचियांहिता नृशरीरी ॥ १ ॥
आणि सरस्वती चहुंवाणीमाता । तिचें चरण माथां प्रेमें वंदू ॥ २ ॥
सत्यवतीसुत व्यासोनारायण । साष्टांग नमन तच्चरणीं ॥ ३ ॥
सर्वांच्या स्मरणें संसारापासोनी । मुमुक्षु पावोनी जय निघे ॥ ४ ॥
ह्मणोनियां आधीं यांचेंचि स्मरण । आपण करून करा म्हणे ॥ ५ ॥
ज्ञानेश्वरकन्या तयापरी जाली । बोलतां हे वोली यथामती ॥ ६ ॥ ८ ।

॥ ओवी ॥

मग तो सूत मुनींचे प्रश्न । प्रेमभावें करोनी श्रवण । बोलतां बोलतां अभिनंदन । आदरें करी ॥ ९ ॥

॥ दोहा ॥

उत्तम पुसलें तुम्ही आजी सकललोककल्याण ।
कृष्णकथेचा प्रश्न असे ब्रह्मप्रतीतिप्रमाण ॥ वृन्दपति० ॥१०॥

॥ चौपाई ॥

परम धर्म तो सकल जनाला । जो उत्पादक हरिभजनाला ।
परि ती भक्ति परम अकामा । अक्षयरूप अकल गुणधामा ॥ ११ ॥

॥ दोहा ॥

जिच्यामुळें निजरूप तें करतलसुफलसमान ।
आणि परमानंद मिळे निवडुनि दृढ अभिमान ॥ १२ ॥

॥ ओव्या ॥

येऱ्हवीं द्विविध धर्म जाण । प्रवृत्तिनिवृत्तिलक्षण । स्वर्गफलावसायी प्रवृत्तिलक्षण । निवृत्तिलक्षण ज्ञानदाता ॥ १३ ॥ त्यामाजींही परमधर्मू । जेणें भेटे पुरुषोत्तमू । श्रवणादिरूप भक्तिप्रेमू । उपजे जेणें ॥ १४ ॥ येथ चतुर श्रोते आशंकिती । धर्म ज्ञानहेतु बोलिला वेदान्तीं । वेदयज्ञतपादिकीं मुमुक्षायेती । ऐसी श्रुति बोलतसे ॥ १५ ॥ तरी धर्म भक्तिकारण । येथ काय आहे प्रमाण । तयाचें हेंचि समाधान । कीं भक्तिद्वारें ज्ञान उपजवी धर्मू ॥ १६ ॥ भक्तीनेंही चित्तवृत्तिरोध । यालागीं भक्तियोग शुद्ध । किंवा जीवपरमात्मवियोग अशुद्ध । तो भक्तीनें संयोग शुद्ध म्हणोनि भक्तियोगू ॥ १७ ॥ तो आनंदरूप निर्गुणीं । आणि परमप्रेमरूप सगुणीं । नियुक्त करितां श्रीकृष्णीं । जनकजननी होय ज्ञाना ॥ १८ ॥ एऱ्हवीं भक्तीचें तों भक्तीच फळ । परि ज्ञान जें उपजे केवळ । तो तंव परमात्मप्रकाश प्रबळ । म्हणोनियां ॥ १९ ॥ आणि तेंही ज्ञान । मिळे शुष्कतर्कावीण । कीं आत्मप्रीतीनें सिद्ध म्हणोन । तर्कापेक्षा न लगे ॥ २० ॥ आणि तैसीच विरक्ती । सहज वाढो लागे चित्तीं । श्रीवासुदेवे भगवति । भक्तियोग योजालिया ॥ २१
एवं भक्ति तेथें ज्ञानविरक्ति । ही झाली अन्वयप्रतीती । आतां व्यतिरेक-

स्थिती । बोलिजेत ॥ २२ ॥ धर्माचें उत्तम अनुष्ठान । जरी भगवंतीं न लावी मन । न करवी तत्कथाश्रवण । तरी कष्ट जाण केवळ ते २३ वांचोनिया कांतभक्ति । कदापि नोहे ज्ञानविरक्ति । विना ज्ञानें घडेल मुक्ति । सहन ही उक्ति श्रुति न करी ॥ २४ ॥ आणि हरिप्राप्तिविण स्वर्गगमन । तें तंव अप्सरामूत्रपात्रावघ्राण । जैसा कर्मलोक हा होय क्षिण । तैसा फळलोकही जाणिजे ।२५। आणि वेदीं बोलिलें स्वर्गफळ । तें मुख्यत्वें नोहें केवळ । जैसी जननी दाऊनि गूळ । औषध चाटवी बाळकां ॥ २६ ॥ परि हें नेणोनि मूढमति । स्वर्गचि एक मुख्य म्हणती । आणि धर्म करावा बोलती । स्वर्गासाठीं ॥ २७ ॥ धर्मानें मिळवावें धन । धनें होवावें भोगसंपन्न । भोगें इंद्रियांवरी प्रीति दारूण । पुनः तेणें धर्मादि वाढवावे ॥२८॥ एवं आश्रवुनी श्रुति । भोगार्थ अवघे जल्पती । परि जे भगवद्भक्त यती । ते न ऐकती गोष्टी या ।२९। कर्में होय चित्तशुद्धि । उपासनया स्थिरबुद्धि । ज्ञानें साधे मोक्षसिद्धि । ऐसी प्रसिद्धी श्रौतधर्मीं ॥ ३० ॥ तया धर्माचें फळ । जड धन बोलती केवळ । ते मूढची गा प्रबळ । न होती वेत्ते ॥ ३१ ॥ म्हणोनी धर्माचें फळ । अर्थ तो नव्हे केवळ । आणि धर्मसहित अर्थाचें फळ । कामही न म्हणावा ॥ ३२ ॥ आणि कामाचें फळ इंद्रियप्रीति । ऐसें सत्पुरुष कदा न ह्मणती । तरी शरीर वांचेल करावया ईश्वरभक्ति । इतुकाचि घ्यावा अर्थू ॥ ३३ ॥ आणि वांचलियाचेंही फळ । नव्हे काम्यजविषयजाळ । किंतु तत्वज्ञानेच्छा प्रबळ । जीविताचें फळ असे ॥ ३४ ॥ तत्व ह्मणजे स्वर्गद कर्म । एसें ह्मणती त्या न कळे वर्म । उपनिषद जया ह्मणती ब्रह्म । तत्ववेत्त्यांचें तत्व तें ॥ ३५ ॥ जयानें सकळधर्मप्रकाशू । जें भ्रमअधिष्ठान अविशेषू । जें कळलिया विशेषू । भ्रम निवर्ते ॥ ३६ । तें चैतन्य तेंचि ज्ञान । तें सत्य तें अनंत पूर्ण । तें प्रेमास्पद तें आनंदघन । सगुण निर्गुण तेंचि कीं ॥ ३७ ॥ उपासिती जे हिरण्यगर्भू । ते ह्मणती हा परमात्मा स्वयंभू । आणि सात्वत भगवद्भक्त प्रभू । भगवंत ह्मणती ॥ ३८ ॥ ‘शब्द्यते’ हें वचन । वेदवत्प्रमात्वें उपपन्न । मूळीं आहे एकवचन । यास्तव श्रुतिसमान संतवाणी ॥ ३९ ॥

॥ दिंडी ॥

ज्ञान आहे परोक्ष जयांना कीं ।
दोष पाहती जे येथ आणि नाकीं ॥
असे ज्यांनां वैराग्य ज्ञान युक्ति ।
श्रवणमननाद्यैः करिति विष्णुभक्ति ॥ ४० ॥

॥ ओंवी ॥

ऐसे संत जे महामती । ते आपण आपणयातें पाहती । वेदान्त-श्रवणादिकीं भक्ति । जाहली दृढ जयांची ॥ ४१ ॥

॥ पद ॥

ह्मणोनी तुह्मांला ठावें असो ॥ धृ० ॥
ब्राह्मणवर हो सावध होउनि । शरीरीं कांहिंच गर्व नसो ॥ १ ॥
निजवर्णाश्रमकर्मविभागीं । करितां साधन हरिच दिसो ॥ २ ॥
अलकावतिपतिनंदिनीप्रियकर । सकल जना हृदयीं विलसो ।३।४२।

॥ पद ॥

रे मन भज यास्तव भगवान । मना भज प्रेम धरुनि भगवान ।धृ०।
श्रवणकीर्तनध्यानपूजनें । मुक्त होय अघवान ॥ १ ॥
यादवपतिप्रभु गोकुळीं असतां । अभिषेकी मघवान ॥ २ ॥
ज्ञानेश्वरपदकमलसुगंधा । सेवुनि त्यज मदमान ॥ ३ ॥ ४३ ॥

॥ अभंग ॥

कोणा नावडतील श्रीहरीचे गुण । जाहला सगुण भक्तहिता ॥ १ ॥
ज्याचें ध्यानखड्ग वारि रिपुदळ । कर्म अमंगळ तेंही तुटे ॥ २ ॥
चिज्जडाची ग्रंथी अहंमति दृढ । तेही अवघड तुटे ध्यानें ॥ ३ ॥
ज्ञानेश्वरकन्याकान्त नारायण । वाटे मोक्षाहून आवडीचा ॥४॥४४॥

॥ ओंव्या ॥

तरी विषयीं कठिण मन । आणि हरिपदीं प्रेमसंपन्न । करितां भक्ति-समाधान । सांपडे सहज ॥ ४५ ॥ ऐसी कर्मनिर्मूळिनी हरिकथा । समर्थ परि न रुचे चित्ता । ऐसी आशंका घेसील श्रोता । तरी समाधान आतां ऐकावें ॥ ४६ ॥ गंगा यमुना सरस्वती । गौतमी नर्मदा दृषद्वती ।

प्रयाग काशी मथुरा द्वारावती । हरिद्वार हिमालयू ॥ ४७ ॥ इत्यादिकें पुण्य क्षेत्रें । जीं स्मरतांचि पापें जळतीं विचित्रें । तीं सेविलिया सत्पात्रें । भेटतीं सहज ॥ ४८ ॥ मग आणिक जाहलिया सद्दर्शन । न तरेल ऐसा आहे कोण । पुण्यतीर्थींचें घडतां सेवन । सज्जनभजन आवडे ॥ ४९ ॥

॥ पद ॥

ज्याला सज्जनपदअभिलाष ॥ धृ० ॥
सत्सेवेनें आवडती मग गोपीरमणविलास ॥ १ ॥
श्रवण जयाचें पुनित करी मन कीर्तन वारि भवास ॥ २ ॥
तो प्रभु स्वकथा ऐकत यांच्या हृदयीं करि रहिवास ॥ ३ ॥
निजप्रेमळ संतांच्या करितो दुष्कृतसुकृतविनाश ॥ ४ ॥
कृष्ण राहि हृदयीं जरी वळतां ज्ञानेश्वर अविनाश ॥ ५ ॥५०॥

॥ ओव्या ॥

एवं आवडी कृष्णगुणीं । तेणें मळविक्षेप न राहती मनीं । यद्यपि ज्ञान होतांक्षणीं । अविद्या नाशी ॥ ५१ ॥ तदपि मरणोन्मुख जैसें । अविद्येचें राहणें तैसें । ज्ञान जाहलिया आपैसें । सकळ नासे अकल्याण ॥५२॥ ऐसी झालिया शुद्धवृत्ती । भागवतशास्त्र सेवा निगुती । करितां उत्तमश्लोक भगवंतीं । भक्तिनिष्ठा वृद्धी पावे ॥ ५३ ॥ तेव्हां भक्तीचेंनि बळें । कामलोभांचीं पाळेंमुळें । मोडोनी पडती सकळें । क्षणामाजीं ॥ ५४ ॥ हें कामलोभादिक । रजस्तमोगुणात्मक । चित्त यापासुनी सुटतां सम्यक । सत्वामाजि स्थिर होय ॥ ५५ ॥ एवं गेलिया रज तम । सत्व प्रकाशे अतिउत्तम । तेणें चिंताखेदादि धर्म । जळती सकळ ॥५६॥ मग प्रसन्न होय चित्त । भगवद्भक्ति वृद्धि पावत । तिया भक्तीनें त्वरित । भगवत्तत्वज्ञान होय ॥ ५७ ॥ जें जें दिसों लागे भूत । तो तो चैतन्य भगवंत । आत्मप्रीतीचि यथार्थ । प्रेमभक्त्यानंदू ॥ ५८ ॥ या नांव भगवत्तत्वज्ञान । तें सहजची होय तयाकारण । जो या संसृतिसंगाहून । मोकळा झाला ॥ ५९ ॥ मग तया ज्ञानें निश्चिती । तुटे हृदयींची चिदचिद्ग्रंथी । मग संशयाची पाती । औषधाही मिळेना ॥ ६० ॥ आणि कर्में प्रारब्धभिन्न । जळती संचित क्रियमाण ।

प्रारब्ध तंव भोगेंकरून । समाप्त होय ॥ ६१ ॥ तथापि भगवद्भक्ति-भावो । करी प्रारब्धाचा अभिभवो । ब्रह्मसाक्षात्कार साविवो । सभक्तीक झालिया ॥ ६२ ॥ याचिलागीं सकलजन । अतिआवडी मानसीं धरून । भगवंतीं लावूनि मन । आत्मप्रसादिनी करिती भक्ती ॥ ६३ ॥ एवं सकळ संता भजन । जया वैकुंठीचें राज्य । यद्भक्ता गाजाबज्य । प्रलयींही न घडे ॥ ६४ ॥ सत्वरजस्तमोगुण । हे प्रकृतीचे तीन । तयाचा आश्रय होऊन । त्रिविध होय परमपुरुषु ॥ ६५ ॥ तेथ स्थित्युपाधि नारायणू । उत्पत्त्युपाधि कमलासनू । लयोपाधि उमारमणू । परी सत्वतनू श्रेयस्करी ॥ ६६ ॥ काष्टाचिया ठायीं । अग्नी न दिसे कांहीं । परी मंथन करितां लवलाहीं । धूममय उत्पन्न होय ॥६७॥ तेथ किंचितसा प्रकाश । आणि अग्नी जयीं उमटे विशेष । तयीं संपूर्ण होय प्रकाश । कर्माग्नीचा ॥ ६८ ॥ एवं गुप्त प्रकाश तमापासोन । किंचित्प्रकाश रज उत्पन्न । परी तेथ विक्षेप बहुत ह्मणोन । ब्रह्मदर्शन घडेना ॥ ६९ आणि त्याहुनी सत्य अतिश्रेष्ठ । तेथ ब्रह्मदर्शन घडे स्पष्ट । ह्मणोनी सत्वोपाधिविशिष्ट । वासुदेव वरिष्ठ ह्मणती मुनी ॥ ७० ॥ परी हे सृष्टिकार्यव्यवस्था । महाभारतान्वयें पाहतां । उमाकांतरमाकांता । सात्विकता दोघांतें ॥ ७१ ॥

॥ श्लोक ॥

रुद्रो नारायणश्चैवेत्येकं सत्वं द्विधाकृतम् ॥
लोके चरति कौंतेय व्यक्तिस्थं सर्वकर्मसु ॥ १ ॥"

( महाभारत. )

॥ ओव्या ॥

एकचीं सत्व दोन भाग । उमारंग रमारंग । ह्मणूनी विचरती कृपांग । सर्व कर्मीं लोकत्रयीं ॥ ७२ ॥ ह्मणवुनी माधव महादेव । दोघेही भजनीय स्वयमेव । भेद पाहती ते मूढभाव । अंधतामिस्र पावती ॥ ७३ ॥ परी ध्यानीं जे धरिली व्यक्ति । उमापती वा रमापती । हे सात्विक ह्मणूनी भजती । मुमुक्षू ययातें ॥ ७४ ॥ एऱ्हवीं जैसी जयांची मती । ते तैसेचि देव कल्पिती । भूत पितृ प्रजापति । कामार्त भजती सकाम ॥ ७५ ॥ तयांच्या पूर्ण होती कामना । परी जे मुमुक्षू

जननमरणा । विटले ते कल्याणनिधाना । शिवनारायणा भजती ॥७६
एवं दोन्ही मिळून एक । शिव आणि वैकुंठनायक । परी येशार्थी वि-
शेषें सम्यक । नारायण प्रशंसिला ॥ ७७ ॥ वेद यज्ञ क्रिया योग । तप
ज्ञान धर्म चांग । पुण्यफळ लोकविभाग । नारायणपर सकळ ॥७८॥
जया आनंदाच्या लेशेंकरून । ब्रह्मदेवादींचे आनंद पूर्ण । वेदशास्त्र-
समन्वयेंकरून । जाणती जया ॥ ७९ ॥ ह्मणोनी नारायणावीण ।
कांहींच नाहीं उपपन्न । यालागीं प्रेमेंकरून । नारायण स्मरावा ॥८०॥
निमित्त आणि उपादान । जो जगा उभयकारण । श्रुतितात्पर्य प्रमाण ।
जयाठायीं ॥ ८१ ॥ तो गुणातीत सर्वव्यापकू । तोचि जगातें स्थापकू ।
सकळ जगप्रयंकू । तेथूनी जाहला ॥ ८२ ॥ येथ विवर्तोपादान नारा-
यण । आणि तयातेंचि निमित्तपण । परिणामी उपादान । बोलिजे
माया ॥ ८३ ॥ ती माया त्रिगुणात्मिक । जी जाहली विश्व सकळिक ।
कारणत्वें नित्य देख । यावज्ज्ञान ॥ ८४ ॥ आणि कार्यदृष्टया अनित्यता ।
या मायेसी तत्वतां । दृष्टिसृष्टिवाद प्रतिपादतां । अद्वैतसिद्धींत बोलिले
॥ ८५ ॥ आणि हे अनादि अनंतू दिसे । परी ज्ञानें समूळ नाशें ।
यालागीं सदसद्विलक्षण ऐसें । नाम इयेचें ॥ ८६ ॥ हिच्या योगें जग-
त्कर्तृता । ती या सामान्यचैतन्यवंता । आरोपेंचि भगवंता- । वरी
आली ॥ ८७ ॥ ह्मणोनी तो परमेश्वरू । जगज्जन्मस्थितिसंहारू । करी
हा डगरू । अज्ञबोधार्थें ॥ ८८ ॥ असो जगज्जन्मादिक । ते कार्यविष-
यींच देख । कारणाज्ञान तंव निश्चंक । यावच्चिज्ज्ञान नित्य असे ॥ ८९ ॥
असो ऐसीया आरोपगुणी । आंत प्रविष्ट होउनी । परमात्मा कैवल्य-
दानी । गुणाभिमानी भासतो ॥ ९० ॥ एऱ्हवीं प्रकाशवंतू कहीं । तमा
आतुळला कीर नाहीं । परी बोलणें जें कांहीं । अज्ञान तें ।९१। एवं जो
शुद्ध तो मायोपहित । आरोपेंचि भासत । एकजीववादी समस्त ।
जीव ह्मणती जयाते ॥ ९२ ॥ अनेकजीववादी परिकर । जयातें ह्मणती
ईश्वर । तो अंतःकरणोपहित निर्धार । होऊनि साचार नानात्व पावे
॥ ९३ ॥ किंवा अनेकजीववादमतें । नानारूपाऽविद्योपहितें । नानात्व
आलें जीवातें । मिथ्यादृष्टी ॥ ९४ ॥ एक असूनी हुताशन । इंधनोपा-

धिना थोर लहान । तेवीं आश्रवोनी मायागुण । नारायण भासतो ॥ ९५ ॥ परी आघवी ही लिला । सूत्रें श्रीव्यास एवं बोलिला । 'लोकवत्तु लीला कैवल्यम्' या वचनाला । प्रमाण ह्मणती श्रुतिवेत्ते ।९६। अंत: करणेंद्रियादि समस्त । निके असती गुणविकृत । हा प्रभु लीलेनें होऊनि तदुपहित । विषय भोगी ॥ ९७ ॥ किंवा घेतां ईश्वर गुण । तरी ह्याचि करी पाळण । ऐसेंही एँक प्रमाण । श्रीधरोक्त ॥ ९८ ॥ एवं शुद्ध ब्रह्म मायावशें । झांकोळलें ऐसें दिसे । तेंचि अविद्यया अंत:करणवशें । जीव वा हिरण्यगर्भ ॥ ९९ ॥ तेंचि इंद्रियाद्युपहित । विराट अथवा भोक्तृस्थित । एवं हा अध्यस्तविवर्त । वाखाणिला । ॥ १०० ॥ आतां प्रेमळाची चौकडी । जी सुंदर मूर्ति रोकडी । विष्णुशिवत्वें एकेखडी । उदया आली ॥ १ ॥ जें अनुग्रहार्थ फळ । सकलपालक केवळ । जयाचे अवतार सकळ । देवतिर्यङ्नरादिपु ॥ २ ॥ हें अवतारा सामान्यकारण । परी येथूनि कृष्णा जें विशेषपण । तें करिजेल निरूपण । कुंतीस्तुतौ ॥ ३ ॥ तरी पुन्हा एकवेळू । दृष्टांते हा सिद्धान्तगोळू । करावा निका मेळू । निजहृदयासी ॥ ४ ॥ येथ भूमिरूप शुद्धचेतन । बीजरूप मायोपहितपण । अंकुर अविद्या अंत:करणावच्छिन्न । जीवू वा हिरण्यगर्भू ॥ ५ ॥ समष्टिविराड्वा व्यष्टि भोक्ता । तो तरुशाखादिरूप तत्वतां । विष्णुशिवत्वें जो अनुग्रहकर्ता । तो अनध्यस्तविवर्तता फलोपम ॥ ६ ॥ जयाची वाङ्मयी मूर्ति भागवत । तयाचें फळत्व पूर्वे व्याख्यात । तैसें प्रत्यक्षमूर्तीसही येथ । फलत्व बोलिलें ॥ ७ ॥ चतुर श्रोतियांपुढें स्मरण । अर्थ तंव त्यांचेंचि अंत:करण । ह्मणोनी मी सायखडियाप्रमाण । निमित्त जाहलो ॥ ८ ॥ एऱ्हवीं सायखडियाचें सौंदर्य । तें प्रत्यक्षाचेंचि सौभाग्य होय । आणि नाचविता आळंदीराय । ज्ञानेश्वरप्रभु ॥ ९ ॥

---

१ ( नानागुण ) पाठांतर.

॥ दोहा ॥

श्रीज्ञानेश्वरचरणरजीं वाहुनि अष्टहि अंग ॥
प्रेमज्ञानें भवूनि लसू चेतनसिंधुतरंग ॥ ११० ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे सूतदत्तोत्तरं नाम द्वितीयसखीप्रेषणम् ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ३ रें.

॥ ओव्या ॥

आतां तृतीय प्रकरणीं । अवतार सांग या प्रश्नीं । उत्तर द्यावया वाणी । उदित सूताची ॥ १ ॥ पूर्व प्रकरणीं अनुसंधान । शौनकादिकीं पुसिला प्रश्न । कीं श्रीहरीचे अवतारगुण । सांगे सूता बुद्धिमंता ॥ २ ॥ तेंचि उत्तर द्यावया सूत । पुरुषादि अवतार यथास्थित । आवडीकरोनी निरोपित । सावध श्रवणार्थ व्हावें श्रोतीं ॥ ३ ॥ बुद्धि अहंकार आणि शद्ब । स्पर्श रूप रस आणि गंध । एवं सात प्रकृतिविकृति प्रसिद्ध । आणि षोडश कलाही ॥ ४ ॥ आणि अकरा इंद्रियें पांच भूतें । हे सोळा विकार अंश जेथें । ऐसिया विश्वरूप देहातें । परमात्मा आधारकू ॥ ५ ॥ यद्यपि भगवद्विग्रह फलोपम । तो नोहे भौक्तिक शरीर परम । तथापि हा विराड्धर्म । उपासकार्थ बोलिला ॥ ६ ॥ विराडुपासना जया । हा विराट् परमात्मा तया । समष्टि भौतिक शरीरा यया । घेवोनि राहतो ॥ ७ ॥ जो विराट् जीवांचिया अंतर्यामीं । जो विराडुपासकांही ने अंतर्यामीं । तो शुद्धसत्वविग्रहें अनूर्मी । एकार्णवीं राहतो ॥ ८ ॥

---

१. भवूनि=होऊनि.

॥ अभंग ॥

तोचि नारायण जीवनसिंधूत । पापपुण्य धूत स्वभक्तांचें ॥ १ ॥
सुषुप्तिरहित विषयअभावीं । जेथ सृष्टि व्हावी संकल्पाची ॥ २ ॥
ऐसी योगनिद्रा करितां आवडी । निजसुखगोडी विसरेना ॥ ३ ॥
नाभीपासूनियां उपजला विधी । जो कां वेदबुद्धि अधिष्ठाता ॥ ४ ॥
ज्ञानेश्वरकन्या नारायणनामीं । जाह्ली निष्कामी विश्वासानें ॥ ५ ॥ ९ ॥

ह्मातीं पायीं ज्याच्या ब्रह्मांडरचना । निगमवचना सत्यपण ॥ १ ॥
सृष्ट्यर्थ विराट् उपासका सत्व । सर्वत्र हें तत्व वेदांताचें ॥ २ ॥
पहाती तें रूप ज्ञानडोळां योगी । नाहीं जयांलागीं विषयाशा ॥ ३ ॥
अनंत अपार अनंतलोचन । संसृतिमोचन बहुबाहू ॥ ४ ॥
सर्वत्रचि पूर्ण अनंत चरण । अनंत करण नाना मुखें ॥ ५ ॥
अनंत नासिकें अनंत भासक । अनंतत्रासक अनंतू ह्मा ॥ ६ ॥
सहस्रशीर्षादि बोले ज्याला वेद । ब्रह्मांडाचा भेद रोमावळी ॥ ७ ॥
विश्वरूपलीला उपासकां सिद्ध । सर्वदा अबुद्ध नेणती जे ॥ ८ ॥
सकुंडल कान सतेज तीं मुखें । दिसती अनेकें जया रूपीं ॥ ९ ॥
ज्ञानेश्वरकन्या गुरुकरुणेनें । जाणुनी उगाणें चित्त केलें ॥ १० ॥ १० ॥

॥ ओव्या ॥

तरी विराटादिकां कारण । तो ह्मा आदिनारायण । आविर्भावतिरोभावादि निर्वाण । नसती यया ॥ ११ ॥ हें नित्य विग्रहस्वरूप । अनध्यस्तविवर्तरूप । हें कूटस्थ भुवनदीप । अवतारबीज ॥ १२ ॥ येथूनि अवतार होती जाती । येथूनि धर्माची रक्षणीय स्थिती । फलोपम भक्तानुग्रहमूर्ती । शुद्धाची ही ॥ १३ ॥ हें बीज असोनि अव्यय । परिणामी कदा न होय । विवर्तत्वें बीजत्व स्वयें । रूपा यया ॥ १४ ॥ हें केवळ अवताराचेंचि बीज । ऐसें नाहीं हें प्राणियांचेंहि निज । जयापासोनि सहज । ब्रम्हा जाह्ला ॥ १५ ॥ आणि ब्रह्मयापासोनि मरीच्यादिक । ते जगा उपजविती सकळिक । ह्मणवोनि निष्कलंक । बीज तें हें ॥ १६ ॥ एवं रूप सांगोनि सुंदर । आतां तयाचे जे जे अवतार । ते सांगावया परिकर । उत्साह सूता ॥ १७ ॥

॥ अभंग ॥

ब्राह्मण तपस्वी प्रथम अवतार । श्रीसनत्कुमार ब्रह्मचारी ॥ १ ॥ रसातळामाजीं भूमी गेली जेव्हां । बराह तो तेव्हां द्वितीय कीं ॥ २ ॥ तृतीय अवतार नारद पवित्र । शुद्ध पंचरात्र केलें जेणें ॥ ३ ॥ निगमानुकूल हें तंत्र जेवढें । शंसिलें तेवढें भारतादी ॥ ४ ॥ निगमीं संक्षेप या तंत्रीं विस्तार । भक्तिचा प्रकार तोचि घ्यावा ।५। वेदबाह्य अंश नाहीं-च प्रमाण । न लगे सांगण त्या विषयीं ॥ ६ ॥ आणि भक्तिसूत्रें निर्मिलीं सुंदर । विरोध साचार जेथ नाहीं ॥ ७ ॥ ज्ञानासह भक्ति दाखविली साची । ज्ञानेशकन्येची जननी जे ॥ ८ ॥ १८ ॥

॥ गद्य ॥

**शिष्यः**- माझी शंका योग्य आहे किंवा नाहीं हा संशय असल्यामुळें मला विचारण्याचें धैर्य होत नाहीं, परंतु तिनें चित्ताला अगदीं व्यापून टाकलें असल्यामुळें निरास न करितां पुढील सिद्धांत देखील माझ्या ध्यानांत येणार नाहीं असें मला वाटतें. ह्मणून मी शतशः प्रणाम करून विचारण्याचें धैर्य करितों. पंचरात्रागमाविषयीं आपण जी वरील अभंगांत व्यवस्था सांगितली, तिची आवश्यकता आहेसें मला वाटत नाहीं कारण पंचरात्रनिर्माते भगवान महर्षि नारद भगवदवतार असल्यामुळें आणि स्वतः नारायणानेंच हें पंचरात्र निर्माण केलें आहे असें भारतांत सांगितलें असल्यामुळें यांत वेदविरुद्धांश असण्याचा संभव नाहीं.

**श्रीगुरुः**—वेड्या! तुला ही शंका विचारण्याविषयीं भय वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. तूं ह्मणतोस तसें सर्वशः नसलें तरी पुष्कळ अंशीं माझें मत आहे, तथापि याविषयीं पूर्वाचार्यांनीं जें म्हणून ठेविलें आहे, तें गुंतागुंतीचें व वादात्मक असल्याळें माझ्या मत्यनुसार साधारण तुला त्याचा समन्वय सांगतों. हा समन्वय सर्वच बरोबर म्हणतील असें मला जरी वाटत नाहीं, तथापि मी ज्या युक्तीनें समन्वय करील त्याहून प्रबल युक्तीनें खंडन केल्यावाचून उगीच मी आपलें मत मागें कशाला घेऊं ? चतुर्धराचार्यांनीं मोक्षधर्मांच्या टीकेंत एकें ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, जरी पंचरात्रादि तंत्रांच्या प्रामाण्याविषयीं पुरुषप्रणितत्वादि विवाद आहेत, तरी विवादास्पद स्थळें अवांतर

सिद्धांताविषयींचीं आहेत. मुख्य सिद्धांतांत सर्वांचें तात्पर्य एकच आहे. आणि हें चतुर्धरांचें म्हणणें मला सम्यक् वाटतें. आतां पांचरात्रप्रामाण्याविषयीं ब्रह्मविद्याभरणकार अशी उत्थाप्य शंका करितात कीं, वेद व पंचरात्र यद्यपि दोन्ही नारायणानेंच केलीं आहेत, तथापि वेद अबुद्धिपूर्वक अशा निश्वासापासून उत्पन्न झाले असून पंचरात्र देवानें बुद्धिपूर्वक रचिलें आहे, ह्मणून वेदापेक्षां त्याला अधिक प्रामाण्य आहे. आतां पाशुपततंत्रहि शिवरूपी ईश्वरानें केलें असल्यामुळें अधिक प्रमाण आहे, असें मात्र ह्मणूं नका. कारण शिव ईश्वरच नाहीं; तो जीव आहे; असाही या पूर्वपक्ष करणाऱ्यांना भ्रम आहे, अशी एक शिवी देऊन 'ब्रह्मविद्याभरण'कार या शंकेचें समाधान सांगतात. प्रथम ते पूर्वपक्षकाराला ह्मणतात, वेदाऱ्यापेक्षां पंचरात्र अधिक प्रमाण असो, परंतु पंचरात्राचा कर्ता जो वासुदेव तो सर्वज्ञ आहे हें प्रथम सिद्ध झालें पाहिजे. त्याचें सर्वज्ञत्व सिद्ध करण्याकरितां अल्प असें प्रत्यक्ष व अनुमान समर्थ नसल्यामुळें अर्थातच शब्दप्रमाणांची आवश्यकता आहे. तें शब्द-प्रमाण काय पांचरात्र घ्यावयाचें ? कीं वेद घ्यावयाचा ? कारण पहिल्या पक्षीं अन्योन्याश्रय दोष येतो. वासुदेवाच्या सर्वज्ञत्वा-स्तव पांचरात्राला प्रमाणता, आणि पांचरात्राच्या प्रामाण्यास्तव वासु-देवाची सर्वज्ञता, हेंच त्या दोषाचें स्वरूप. दुसऱ्यापक्षीं वेदप्रमाणावरून वासुदेव सर्वज्ञ सिद्ध झाला तर श्रुत्युपजीव्यत्व पंचरात्राला प्राप्त झालें, ह्मणून वेद बलवान आहे. याप्रमाणें शंकाकाराच्या प्रथमाक्षेपाचें समा-धान अद्वैतानंदस्वामींनीं केलें आहे. तें माझ्यामतें 'तुला ना मला आणि घाल कुत्र्याला' ह्या ह्मणीप्रमाणें आहे. कारण जो दोष स्वामींनीं पूर्वपक्ष-कारावर घातला आहे तोच दोष पायावर धोंडा पाडून घेतल्याप्रमाणें त्यां च्यावरही येतो. स्वामी आमच्या मताचे आहेत. शांकरभाष्याचे टीका-कार आहेत. त्यांनां असंबद्ध ह्मणणें ह्मणजे गृहछिद्र बाहेर काढण्यासारखें आहे खरें, परंतु काकस्वभाव छिद्रान्वेषी असल्यामुळें, घरचें व बाहेरचें तो पाहत नाहीं. तशीच माझी स्थिति आहे. परंतु काकजन्मांतही भृशुंडमुनि श्रीज्ञानेश्वरनामानें मी होईन व आहेच असें मी आपल्याला

समजतो. स्वामींनीं जसें पूर्वपक्षकाराला विचारिलें आहे तसेंच स्वामी जरी या वेळीं नाहींत, तथापि त्यांची मूर्ति समोर घेऊन कदाचित् उत्तर देतील तर त्या मूर्तीलाच विचारून पाहतों. आपण जसें पंचरात्राचें प्रामाण्य खंडन केलें त्याच आपल्या युक्तीनें वेदप्रामाण्यही दूषीत होतें, कारण वेद प्रमाण आहेत काय ह्मणून? सर्वज्ञईश्वररचित आहेत ह्मणून. ईश्वर सर्वज्ञ कशावरून सिद्ध करावयाचें ? अर्थात् वेदाशिवाय दुसरा मार्ग नाहीं. आणि तो मार्ग स्वीकारला ह्मणजे आलाच आपल्या पायावर धोंडा. ईश्वर सर्वज्ञ आहे ह्मणून वेद प्रमाण व वेद प्रमाण आहेत ह्मणून ईश्वराची सर्वज्ञता. तात्पर्य, हें समाधान बरवर आहे. स्वामींच्या मूर्तीकडून उत्तर न मिळाल्यामुळें, माझ्यामतें या शंकेचें समाधान तुला सांगतों. त्याला स्वामीही मुलाचें वचन ह्मणून आईप्रमाणें अनुमोदन देतील. तें समाधान असें. पूर्वपक्षकार प्रथम ह्मणाला कीं, वेद हे परमेश्वरानें श्वासापासून अबुद्धिपूर्वक निर्माण केले आणि पंचरात्र बुद्धिपूर्वक निर्माण केलें या बोलण्यांतच पूर्वपक्षकार ठार झाला. कारण श्रुति, स्मृति, इतिहास, पुराण आणि इष्टयुक्त्यनुभव यावरून परमेश्वर सर्वदा सर्वज्ञ आहे असें सिद्ध होतें. त्याला एका कालीं अबुद्धिपूर्वकत्व व दुसऱ्या कालीं बुद्धिपूर्वकत्व मानलें तर जीवत्वप्राप्ति होईल. निश्वास शब्दाचा अर्थ असा आहे कीं, निश्वासाला जसे श्रम लागत नाहींत तसे युक्तयोगी अशा परमेश्वरानें अप्रयत्न वेद निर्माण केले.

॥ ओंवी ॥

"तरी जयाच्या निश्वासीं । जन्म झाला वेदराशी ॥
तो सत्यप्रतिज्ञ पैजेसी । बोलिला स्वमुखें ॥ १ ॥

( ज्ञानेश्वरी अ० १८ ओं० १४२८ )

॥ गद्य ॥

असें तातांनीं गीतेला वेदापेक्षां मोठेपण देऊन ह्मटलें आहे. आणि तातवाक्यप्रामाण्यावरूनच मी तिला जाग्रच्छ्रुति असें ह्मटलें आहे. हें आमचें दोघांही बापलेकांचें ह्मणणें पूर्वपक्षकाराच्या ह्मणण्यासारखें तूं समजूं नको. कारण पूर्वपक्षकारानें परमेश्वराला वेद करितानां जसें

अबुद्धिपूर्वक केलें असें ह्मटलें, तसें आह्मी दोघेही ह्मणत नाहीं. पैकीं तातांच्या ह्मणण्याचा हा अर्थ आहे कीं, जो प्रभु अप्रयत्नपूर्वक वेद निर्माण करितानां देखील सत्य सांगण्यांत चुकला नाहीं तो प्रभु प्रयत्न करून गीता सांगतानां सत्य प्रतिपादन करण्यांत कसा चुकेल? पुनः गीतेमध्यें वेदविरुद्धही कांहीं नाहीं. यद्यपि ' ममैवांशो जीवलोके ' हा श्लोक श्रुतिविरुद्धासारखा आहे असें विवरणप्रमेयसंग्रहांत विद्यारण्य-स्वामींनीं सांगितलें आहे, तथापि ' अंशो नानाव्यपदेशात् ' असें भगवान बादरायणाचार्यांचें सूत्र असून त्यावर भगवत्पूज्यपादाचार्यांचें जें भाष्य आहे त्यांत जीवांशत्ववादाचें खंडन नसून मंडन केलें आहे, आणि या श्लोकावरच जें आचार्यांचें भाष्य आहे त्यांतही अंश-वादाचें खंडन केलें नाहीं. स्वामी विद्यारण्यांचें म्हणणें भाष्यकारापेक्षां अधिक प्रमाण नाहीं. दृष्टिसृष्टिवादानुसारें स्वामींनीं ह्मटलें असावें असें ह्मणावें तर अंशवादांत अंशाविषयीं प्रतीतिवाद स्वीकारला ह्मणजे वरील श्लोकाचा समन्वय होत असल्यामुळें गीता अंशतः देखील श्रुति-विरुद्ध आहे असें ह्मणण्याला स्वामी विद्यारण्य अनधिकारी आहेत. याप्रमाणें तातवाक्याची व्यवस्था झाली. आतां माझ्या ह्मणण्याचा अर्थ असा आहे कीं, श्वास जसा अव्यक्त ध्वनि असतो, तसा वेद हा अव्य-क्तार्थबोधक असून भगवद्गीता ही स्पष्टार्थबोधक आहे. ह्मणून मी तिला जाग्र-च्छ्रुति म्हणतो. तात्पर्य, पूर्वपक्षकाराचें जसें मी समाधान केलें तें समाधा-न माझ्या पायावर धोंड्या प्रमाणें येऊन पडत नाहीं. आतां पूर्वपक्षका-राच्या दुसऱ्या आक्षेपाचें समाधान स्वामी अद्वैतानंद असें करितात कीं, नारायण ईश्वर आहे तर मग शिव कां ईश्वर असूं नये ? म्हणून पंचरात्र प्रमाण आहे तसें पाशुपतही प्रमाण आहे. हें समाधान ह्मणजे निवळ चुकीचेंच आहे असें म्हणतां येणार नाहीं; तथापि यापासून कांहीं विशेष लाभ आहे हेंही सांगणें कठीण आहे. माझ्या मतें पांच-रात्रांतील जितकी नारायणभक्ति प्रमाण आहे तितकीच पाशुपतांतील शिवभक्तिही प्रमाण आहे. परंतु इतर अंशाविषयीं विचार करितांनां असें दिसतें कीं शिवांनीं पाशुपत निर्माण करूनही स्वतः आपणच त्या

पाशुपत शास्त्राची पाखंडमतामध्यें गणना केली आहे. हें पद्मपुराणांतील 'प्रथमं हि मयैवोक्तं शैवं पाशुपतादिकम्' इत्यादि वाक्यावरून सिद्ध आहे, तशी पांचरात्राची पाखंडमतामध्यें स्वत: नारायणानें गणना केली आहे असें मला कोणत्याही पुराणांत आढळलें नाहीं. कोणत्या पुराणांत असलें तरी पांचरात्रांत श्रुत्यनुकूल अंश अधिक आहे ह्मणून तें पाशुपतापेक्षां अधिक प्रमाण आहे, हें शांकरभाष्यावरून सिद्ध होतें.

शिष्य:–महाराज, तेथें अद्वैतवादालाही पाखंडमतांत गणलें आहे.

श्रीगुरु:–खरें, पण कूर्मपुराणांत अद्वैतवादाची महति सांगितली असून तत्प्रतिपादक आचार्यांना वरिष्ठत्व दिलें आहे, आणि भागवत, भारत, योगवासिष्ठ, यांमध्यें अद्वैतवादाचा जय दिसत असून युक्ती व अनुभवानें तें सिद्ध होत असल्यामुळें, पद्मपुराणांतील पाखंडमतांत शांकर अद्वैत गणलें नसून महानिर्वाणादि तांत्रिकांचें, प्रत्यभिज्ञावादियांचें, माया न स्वीकारून ब्रह्मविकार जग मानणाऱ्यांचें अद्वैत त्यांत निवेशिलें आहे, असें समज. भारतादिकांत जी पाशुपताची स्तुति आढळते तिची व्यवस्था वर सांगितलीच आहे. याप्रमाणें पांचरात्राच्या प्रामाण्याविषयीं वाद असून तें प्रमाण कां नाहीं याविषयींचे वाद आतां तुला सांगतों. ब्रह्मसूत्र अ० २ पाद २ सूत्र ४२ पासून सूत्र ४५ पर्यंत सूत्रावर भाष्य करितांना आचार्य ह्मणतात, 'जगाला निमित्त व उपादान कारण परमेश्वरच आहे. हा भागवतांतील अंश श्रुत्यनुसार असल्यामुळें विसंवादी नाहीं.' या ठिकाणीं भागवताचा अर्थ आनंदगिरीनें 'पांचरात्र' केला असून ब्रह्मविद्याभरणकारांनीं 'विष्णुभागवत' असा केला आहे. 'देवीभागवत' एक दुसरें असल्यामुळें यांनीं 'विष्णुभागवत' पुराण येथें घेतलें आहे, असें धरलें तर भागवतांत पुढील खंडनायोग्य विषयच नसल्यामुळें ब्रह्मविद्याभरणकारांचा अर्थ सम्यक् आहे ह्मणावेंसें वाटत नाहीं. ह्मणून आनंदगिरींचा अर्थच घेऊन चालणें बरें. अधिकरणमाला-कारांचेंही म्हणणें आनंदगिरीसारखेंच आहे. असो. वरीलप्रमाणें वासु-देवपरमात्मा एकच अनेक रूपें धरितो, हेंही म्हणणें आम्हाला खोडण्याची आवश्यकता नाहीं. कारण, 'स एकधा भवति त्रिधा

भवति ' 'त्वं जातो भवसि विश्वतोमुख:' ' संभवामि युगे युगे ' इत्यादि श्रुति भगवंताचें अनेकरूपत्व सांगतात. तसेंच अनन्य जें परमेश्वराचें आराधन तंत्रांत सांगितलें आहे, त्याचेंही आम्ही निराकरण करीत नाहीं. कारण, श्रुतिस्मृतीमध्यें देखील परमेश्वराचें प्रणिधान पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे. परंतु कांहीं अंश पांचरात्रामध्यें श्रुति-विरुद्ध आहे, तो खंडनीय वाटतो. तो अंश हा कीं, ' न जायते म्रियते वा विपाश्चित् ' ' जीवभूत: सनातन: ' इत्यादि श्रुतीमध्यें जीव अनादि सांगितलेला असून पांचरात्रांत तो वासुदेवसंज्ञक परमेश्वरापासून संक-र्षणसंज्ञक उत्पन्न होतो, असें सांगितलें आहे; व त्यापासून प्रद्युम्नसंज्ञक मन व मनापासून अनिरुद्धसंज्ञक अहंकार उत्पन्न होतो असेंही म्हटलें आहे. हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, ज्याची उत्पत्ति होते त्याला नाश असतो. मग महावाक्यलक्ष्यरूप ऐक्य किंवा भगवत्प्राप्तिरूप मोक्ष संभवणार नाहीं. दुसरें कर्मावाचून परमेश्वरानें जीव उत्पन्न केला ह्मणावें तर नैर्घृण्य वैषम्य दोष येतात. हे दोष येऊं नयेत ह्मणून, 'आपल्या सृष्टींत त्याला निर्दयता व विषमता कशाची' ? असें वल्लभाचार्य आपल्या निबंध ग्रंथांत प्रतिपादन करितात तें योग्य नाहीं. कारण आह्मांला जर दु:खप्रतीति होते तर आमच्या दु:खानें तरी परमेश्वर सुख मानणारा आहे असें म्हटलें पाहिजे. पुन:, आह्मी जर परमेश्वराचें सत्य कार्य असूं, तर मग आह्माला सुखदु:खेंही सत्यच झालीं पाहिजेत. मग परमेश्वराला निर्दय व विषम नाहीं ह्मणण्यांत काय अर्थ आहे? बरें, आह्मी मिथ्या असलों तर मृत्पुत्त-लिका करण्यांत व मोडण्यांत जसा दोष नाहीं, तसा परमेश्वर निर्दोष राहूं शकेल. पण सत्य परमेश्वरापासून आह्मी मिथ्या कार्य उत्पन्न कसे झालों? मायेनें झालों म्हणावें तर माया परमेश्वरानें मिथ्या कशी उत्पन्न केली? अनादि आहे ह्मणशील तर, तिच्यावर ज्याची स्थिति अवलंबून आहे तो आभासरूपी जीव, तुला अनादि मानण्याला कोणता प्रत्यवाय आहे? दुसऱ्यापक्षीं कर्मानुसार परमेश्वर जीव उत्पन्न करितो, असें ह्मणावें तर उत्पत्तीपूर्वी जीवाचा अभाव असल्यामुळें कर्मकर्त्या जीवाची स्थिति नाहीं; आणि ईश्वराचें कर्म स्वीकारावें तर परमेश्वराला जीवपणा येतो. तात्पर्य, पांचरात्रांतील जीवोत्पत्ति श्रुतिविरुद्ध असल्यामुळें प्रमाण

नाहीं. तसेंच करण जे मनादिक, तेही जीवापासून उत्पन्न होणें शक्य नाहीं. कारण कर्त्यापासून करण उत्पन्न होतें, असा नियम दिसत नाहीं. आपणच उत्पन्न केलेल्या कार्यांनें करण बद्ध होत नसल्यामुळें मनादिकांच्या वासनेनुसार जीव बद्ध न झाला पाहिजे. या युक्तीवरूनही मनादिक करण जीवापासून उत्पन्न होणें शक्य नाहीं. 'एतस्माज्जायते प्राणा मनस्सर्वेन्द्रियाणिच' या श्रुतींत सर्व मनादिकरणांची उत्पत्ति ईश्वरापासून सांगितली आहे, ह्मणूनही पांचरात्रांतील जीवापासून मनादिकांची उत्पत्ति सांगणें श्रुतिविरुद्ध आहे. आतां, संकर्षणादि शब्दांनीं आम्ही जीवादिक घेत नसून,वासुदेव,संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध, हे चार तुल्यधर्मी ईश्वरच आहेत, असें पांचरात्री सिद्धांती म्हणेल तर तें सम्यक् नाहीं. कारण, एका ईश्वरानें सर्व कार्य होत असल्यामुळें अनेकेश्वरकल्पना असंगत आहे. पुनः, चारच परमेश्वराचे व्यूह आहेत असें कां? आब्रह्मस्तंभपर्यंत जेवढे पदार्थ आहेत तेवढे परमेश्वराचे व्यूह आहेत. सारांश, हाही अंश पांचरात्रांतील अप्रमाण आहे. शांडिल्य ऋषि चाऱ्ही वेदांमध्यें कल्याणप्रद तत्व न जाणून या तंत्रांचें अध्ययन करून कृतकृत्य झाला; या कथेवरूनही वेदांमध्यें पुरुषार्थ नाहीं, अशी निंदा करणारें हें तंत्र अप्रमाण आहे. याप्रमाणें भगवत्पादभाष्याचा आशय असून याच चार सूत्रांवर जें रामानुजाचार्यांचें भाष्य आहे तेंही विचारणीय असल्यामुळें त्याचा आशय तुला सांगतो. या चार सूत्रांपैकीं दोन सूत्रें रामानुजांनीं पुर्वपक्षकाराच्या म्हणण्यांत घेऊन दोन सूत्रांनीं आपला सिद्धांत सांगितला आहे. त्या सिद्धांतांत भगवत्पूज्यपादाचार्यांचें म्हणणें सम्यक् नाहीं असें दाखविलें आहे. रामानुज म्हणतात, 'ज्या वचनावरून पांचरात्रावर अनेकेश्वरकल्पना लादली आहे, त्या वचनाचा अर्थ वास्तविक तसा नसून 'अजायमानो बहुधा विजायते' या श्रुतींत सांगितल्या प्रमाणें,एकच परमात्मा चार रूपांनीं झालेला आहे,' आणि भगवत्पूज्यपादाचार्यांनींही या अंशाचें निराकरण करण्याची आवश्यकता नाहीं म्हणून म्हटलें आहे. यद्यपि सर्व पदार्थ परमेश्वरव्यूहरूप आहेत, तथापि विभूतिनिर्णयाप्रमाणें उपासनार्थ एका परमेश्वराचे चार व्यूह मानणें निवळच वाईट नाहीं. (या वाक्यांतील 'आणि'

पासून 'वाईट नाहीं' या शब्दापर्यंतच्या निरूपणांत चुका असल्यास त्या माझ्या आहेत; रामानुजांच्या नाहींत. ) उपासनेसाठीं जीवादिकांचें अधिष्ठान परमात्माच जीवादिशब्दांनीं बोलिला गेला आहे. जसा आकाश व प्राणादिकांचें अधिष्ठान परमात्मा, आकाश व प्राणादि शब्दांनीं बोलिला गेला आहे, तसा प्रथम अहंकाराधिष्ठान परमात्म्याचें चिंतन करून, नंतर त्यापेक्षां सूक्ष्म मनसोपहित परमात्म्याचें चिंतन करावें; नंतर त्यापेक्षां सूक्ष्म जीवोपहित परमात्म्याचें चिंतन करून, पुढें सूक्ष्म, शुद्ध, अशा परमेश्वराचें चिंतन करावें. हा क्रम अधिकारानुसार सांगितला आहे. ' पुष्करसंहिता ' व ' सात्वतसंहिता ' यांतही असेंच सांगितलें आहे.

श्रीगुरु ह्मणाले, येथें इतकें मात्र ध्यानांत ठेव कीं, चाऱ्ही व्यूह जर तुल्यधर्मी असतील, तर एका व्यूहावरून दुसऱ्या व्यूहावर जाण्यांत काय लाभ आहे? या प्रश्नाचें उत्तर रामानुजांनां देतां येत नाहीं; व तुल्यधर्मी नसतील तर मग ते केवळ अधिकारानुसार उपासनार्थच मानल्यास, श्रीभाष्यकार चुकले असें मला वाटत नाहीं. आतां, जीवोत्पत्तीविषयीं रामानुज म्हणतात कीं, पांचरात्रागमांत मुळीं जीवोत्पत्ति सांगितलीच नाहीं; उलट खोडली आहे. परमसंहितेंत पहा. प्रकृतीचें रूप सांगून,

> व्याप्तिरूपेण संबंधस्तस्याश्च पुरुषस्यच ।
> सह्यनादिरनंतश्च परमार्थेन निश्चिः ॥

या श्लोकाचा अर्थ रामानुजांच्या अभिप्रायानुसार असा होतो— 'त्या प्रकृतीचा व पुरुषाचा संबंध आहे; तो पुरुष निश्चयेंकरून परमार्थतः अनादि अनंत आहे ' आणखीही पंचरात्रांतील सर्व संहितांमध्यें जीवाच्या उत्पत्तीचा निषेधच केला आहे. जों जीवोत्पत्त्याभासाचीं पंचरात्रवाक्यें आहेत तीं वास्तविक सिद्धांतबोधक नसून, दृष्टजननमरणानुसार पूर्वपक्षमात्र आहेत. सिद्धांत तर पांचरात्राचाही जीवानादित्वबोधकच आहे. पुनः, वेदनिंदक असल्यामुळें हें तंत्र प्रमाण नाहीं

असेंही ह्मणणें चांगलें नव्हे. कारण, वेदाची निंदा वेदांतच कोठें कोठें आढळते; जसें:-

प्रातःप्रातरनृतं ते वदन्ति ॥
पुरोदयाज्जुह्वति येऽग्निहोत्रम् ॥

श्रुत्यर्थः-'जे सूर्योदयाच्यापूर्वी अग्नींत हवन करितात ते प्रतिदिवशीं प्रातःकालीं खोटें बोलण्याचें पाप करितात'. या श्रुतींत 'अनुदिते जुहुयात्' या श्रुतीनें सूर्योदयापूर्वी सांगितलेल्या होमाची निंदा केली आहे. त्या निंदेचें निंदेंत तात्पर्य नसून सूर्योदयानंतर होमाच्या स्तुतींत तात्पर्य आहे, किंवा छांदोग्य उपनिषदांतील भूमाविद्येंत नारदांनीं सनत्कुमाराला ह्मटलें कीं, 'मी चाऱ्ही वेद पढलों, नाना शास्त्रें पढलों, परंतु माझा शोक दूर झाला नाहीं. त्या वेदांतील आत्मज्ञान मला मिळालें नाहीं. मी त्या वेदांतील मंत्राला मात्र जाणणारा झालों'. हा जो नारदाच्या मुखांतून निघालेला वेदाचा दुर्बळपणा तो वेदनिंदार्थ नसून भूमाविद्यास्तुत्यर्थ आहे. त्याप्रमाणें कठीण जो वेदाचा अर्थ तो कांहीं कारणामुळें शांडिल्याला समजला नसला, आणि पांचरात्रांतून तो सुलभ रीतीनें समजला ह्मणून हें शास्त्र पढून त्याला ज्ञान झालें, असें पांचरात्राचें ह्मणणें वेदनिंदक होत नाहीं. परमसंहितेंतही असेंच सांगितलें आहे. याप्रमाणें दोन्ही भाष्यांचें आलोचन केलें असतां स्वपक्षीय लोक नांवें ठेवतील, हें जाणत असूनही, बुद्धिदौर्बल्यास्तव किंवा आणखी कोणत्या कारणास्तव कोण जाणे, एवढ्याच प्रसंगीं ग्रंथकर्ता रामानुजमती नसूनही त्याचें मत पुष्कळच अंशीं शांकर अभिप्रायापेक्षां रामानुज अभिप्रायाकडे धांव घेते. असो. या विवेचनावरून वर रामानुज जेथें अडतात ह्मणून सांगितलें तदादिकरून जीं स्थानें आहेत, तीं स्थानें शांकरमती ह्मणतात तशींचअसलीं तर प्रमाण नाहींत; आणि नसलीं तर प्रमाण आहेत. शांकरमतार्थ घेऊन अभंगांतील वाक्य आहे असें समज.

शिष्यः-भगवन्! माझी शंका निःशेष निवृत्त झाली. आतां पुढील आवतारचरितामृतपिपासा स्वामीवांचून कोण शांतवील?

श्रीगुरु:— श्रवण कर.

॥ अभंग ॥

धर्मवंशीं झाला चवथा अवतार । नारायणनरऋषिरूप ॥ १ ॥
आत्मशांतिसाठीं तप आचरलिा । जनां दाखवीला मार्ग तोची ॥ २ ॥
पांचवा अवतार कपिल सिद्धेश । जयाचा सच्छिष्य आसुरी कीं ॥ ३ ॥
आसुरीस सांख्य सांगितलें पूर्ण । तत्वांचा संपूर्ण निवाडा जें ॥ ४ ॥
नानाविध तत्व ब्रह्मप्राप्तिसाठीं । त्यागावें शेवटीं मोक्षामार्जी ॥ ५ ॥
एकचि तें तत्व पुरुषसंज्ञक । तेंचि ब्रह्म देख वेदांताचें ॥ ६ ॥
ऐसें शुद्ध सांख्य सांगितलें जेणें । कपिल प्रमाण पांचवा तो ॥ ७ ॥
सहावा सुंदर सर्व विश्वा गुरु । अत्रीचा कुमरु दत्तात्रेय ॥ ८ ॥
अनुसूयातपें जहाला जो प्राप्त । जीवां उद्धरीत एकसरां ॥ ९ ॥
न होय जयाचें मोघ दरुशन । कृपावंत पूर्ण दीनानाथू ॥ १० ॥
अवघड लीला जयाची व्यापक । नाहीं सुख दुःख जयारूपीं ॥ ११ ॥
नाना अवतार होऊनियां गेले । दत्तत्व संचलें जैसें तैसें ॥ १२ ॥
अनंत काळाचा अनंत भावाचा । अनंत जीवांचा कनवाळु ॥ १३ ॥
अलर्कराजाला दिलें आत्मज्ञान । प्रल्हाद ही जाण शिष्य ज्याचा ॥ १४ ॥
यदु हयहय मत्स्येंद्र गोरक्ष । संप्रदाय साक्ष जेथुनीयां ॥ १५ ॥
महाराज तोचि सहावा अवतार । कार्तवीर्या वर ज्याचा होता ॥ १६ ॥
जमदग्निपुत्रावरी ज्याचि कृपा । जो कां मायाबापांसम दीनां ॥ १७ ॥
महाराज तोचि सहावा अवतार । आम्हा ज्ञानेश्वररूप दिसे । १८ । १९ ।

॥ ओव्या ॥

रुचीपासूनि आकुतीचे पोटीं । यज्ञावतार सातवा जगजेठी । तो यामादि देवांसह शेवटीं । पाळिता जाह्ला स्वयंभू मनू ॥ २० ॥ आणि मेरुदेवीचें उदरीं । नाभीपासोनि निर्धारीं । प्रभु आठविया अवतारीं । ऋषभदेव जाह्ला ॥ २१ ॥ सकळ आश्रमां वंद्याश्रम । तो पारमहंस्य आचरला परम । जो ब्रह्मनिष्ठांलागीं धर्म । शांतीलागीं दाखविला ।२२। आणि जहीं पापी वेन । ब्राह्मणशापें पावला मरण । तेव्हां प्रार्थिला नारायण । अराजकभयनिवृत्तये ॥ २३ ॥ तैं पृथु जाह्ला गोविंद ।

पृथ्वी दोहूनि काढिलें दुग्ध । तेंचि अन्न तेंचि औषध । ऐसा प्रसिद्ध हा अवतारू ॥ २४ ॥ आणि चाक्षुष मन्वंतरीं । सकल व्यापिलें समुद्रीं । तेव्हां पृथ्वीच्या नौकेवरी । सत्यव्रत बैसविला ॥ २५ ॥ वस्तुतः मन्वंतरांतीं । प्रलय न होय निश्चितीं । परी सत्यव्रताप्रति । दाविली माया ॥ २६ ॥ तो हा मत्स्यावतारू । वैवस्वतमनु पालनकारू । दहावा जाहला शार्ङ्गधरू । भक्तानुग्रहा ॥ २७ ॥ आणि देवदैत्यीं मंथिला सागर । तेव्हां रवी जाहला मंदर । तया पाठीचा दिधला आधार । अकरावा अवतार कूर्म तो ॥ २८ ॥ बारावा अवतार धन्वंतरी । जेणें सुधा दिधली सुरकरीं । तेरावा अवतार मोहिनी नारी । जिणें असुरीं प्रेरिला मोह ॥ २९ ॥ जया प्रेमळाचे गुणें । दैत्य असूनिही देवत्व उणें । जयाचियासाठीं लेणें । नृसिंहत्व ॥ ३० ॥ तया प्रऱ्हादाचिया रक्षणा । आलें नृसिंहत्व होणें नारायणा । ब्रह्मवरें अजिंक्य दैत्यराणा । तो नखेंकरूनि विदारिला ॥ ३१ ॥ तो अवतार चौदावा । जो वारी स्वभक्तभवदावा । यालागीं प्रऱ्हादवरद वदावा । जय जय साम्राज म्हणोनी ॥३२॥ असज्जनमदमर्दनू । पंधरावा अवतार वामनू । करोनि बलियज्ञमथनू । जेणें स्वर्ग दिधला अखंडला ॥ ३३ ॥ आणि सोळावा भार्गव कोदंडपाणी । जेणें विप्रद्रोही नृप पाहोनी । एकवीस वेळ धरणी । निःक्षत्रिय केली ॥ ३४ ॥ मनुष्य पाहोनि मतिहीन । सत्यवतीउदरीं पराशरापासून । सतरावा अवतार द्वैपायन । होऊन केल्या वेदशाखा ॥ ३५ ॥ जो मनुष्यांमाजीं मुकुटमणी । जो सुरकार्यों चापपाणी । जो साधुरक्षणा कैवल्यदानी । एकपत्नी रघुराणा ॥ ३६ ॥ जो जनकजाहृदयपद्मभृंग । जो जमदग्निकुमर गर्वभंग । जयातें ध्यातो उमारंग । एकांतस्थित होउनी ॥ ३७ ॥ जो असुरगजमथनपंचानन् । जो सत्यसाम्राज्य करुणाघनू । जो श्री कौसल्यादशरथनंदनू । सेतुबंधनकारकू ॥ ३८ ॥ जो सुग्रीवसखा वालिदलन । जो ताटिकांतक रावणमर्दन । जो हनुमत्प्रिय जगज्जीवन । बिभीषण शरण जया ॥ ३९ ॥ जो वाल्मीकिहृदयआदिपीठ । जो निजनामग्राहकप्रद-

१ अग्नि. २ इंद्र.

वैकुंठ । जो त्र्यंबकधनुभंग अचाट । राजधर्मीं नीट वीर गाढा ॥ ४० ॥ जो आजानुबाहु अपवर्गदानी । जो क्षत्रिय असूनि महामुनी । जो वासिष्ठाधिष्ठित ब्रह्मज्ञानी । निरभिमानी रघुराणा ॥ ४१ ॥ तो अठरावा महापुरुष । पूर्णावतार हृषीकेश । जयाचें नांम उमानिवास । घेतां निर्विष जाहला ॥ ४२ ॥ सकळ विश्व जयाधीन । तो एकोणवीस संकर्पण । वेद ब्रह्मसूत्र जेथें प्रमाण । तो श्रीकृष्ण विसावा ॥ ४३ ॥ जो संतांचा प्राणविसांवा । तोचि हा अवतार विसावा । जेथ पूर्णत्वाचा ठेवा । उपेगा आला ॥ ४४ ॥ जो ब्राह्मणासी रक्षकू । जो दुर्जनासी भक्षकू । जो शूर वीरपरिक्षकू । दीनबंधू ॥ ४५ ॥ जो वैश्यशूद्रादिकां भक्तां । गोपत्वें झाला संरक्षिता । रास खेळोनि समस्ता । तारिल्या स्त्रिया ॥ ४६ ॥ अनेक विरुद्ध खेळोनि खेळ । ईश्वरपण दाविलें विमळ । जो पाहोनियां निज प्रेमळ । चाऱ्ही भुजां आलिंगी ॥ ४७ ॥ जेणें पार्थाचें करुनि व्याज । ब्रह्मत्वें विश्वाचि रक्षिलें सहज । जयाचें निकें साम्राज्य । द्वारकें आणि भक्तहृदयीं ॥ ४८ ॥ रामावतारींचें एकपत्नीपण । तेंचि येथ विस्तरोन । रासादिक हें खेळोन । ब्रह्मचारी राहिला ॥ ४९ ॥ जो प्रियप्रेमकलानिधी । जो प्रेमळजीवितसुधाब्धी । जो श्रौतसिद्धांत ब्रह्मबुद्धी । संधीसमाधीमाजीं दिसे ॥ ५० ॥ जो अनध्यस्तविवर्तू । जेथें नोहे भवावर्तू । जो भक्तहृदयसंवर्तू । प्रवृत्तु निवृत्तु नव्हे कदा ॥ ५१ ॥ जो कटीस बांधी आपुलें वस्त्र । प्रेमळ वस्त्र स्कंधावर । जो विवाहस्त्रिया सोडूनि समग्र । गोपिकार्थ व्रजीं आला ॥ ५२ ॥ जो वसुदेवदेवकीउदरीं आला । परी आधीं मरण आलें सहा बाळा । आणि कुमारीसाठीं व्रजीं गेला । तो हृदयीं राहिला नित्यचि ॥ ५३ ॥ जड गुरुदक्षिणा देती इतर । जेणें दिधला चेतन गुरुपुत्र । जो अवाप्तविद्यापि विद्यामात्र । संदीपनशिष्य जाहला ॥ ५४ ॥ जेणें गोपी तारिल्या कामें । कंसादिक भयसंभ्रमें । शिशुपाळादी वैरधर्मे । तारिले जेणें ५५ ॥ जो पांडवपाळण जगद्गुरु । जो रुक्मिणीरंग करुणाकरू । राधारमण शार्ङ्गधरू । पार्थसारथी श्रीकृष्ण ॥ ५६ ॥ जी शिवादींची ध्येय मूर्ती । जे नारदादींची गेय कीर्ती । जे यशोदादींची पुत्रवृत्ती । जी पतिप्रीति गोपिकांची ॥ ५७ ॥ जो दुर्जनांचा यम । जो सज्जनां

आराम । जो निष्कामाचा काम । पूर्णकाम स्वानंदू ॥ ५८ ॥ जो निर्गुण निराकार । प्रेमवर्धनार्थ साकार । जो पूर्णब्रह्म परात्पर । पिनाकधर ध्यात जया ॥ ५९ ॥ जो उपनिषद्धेनुपयोमथिता । जो पांचाळी वस्त्रें पुरविता । जो दुर्योधनादिकां फिरविता । दुर्गर्वें मुरविता रिपुदमन॥६०॥ जो गोपीकृपें अस्मत्पती । श्रीज्ञानेश्वर जयाप्रती । मातें देऊन यथानिगुती । पावन केलें कृपाजळें ॥ ६१ ॥ जो अनाथाचा नाथू । जयाचा प्रेमळ शिरीं हातू । चारी वेद मातू । गाती ज्याची ॥ ६२ ॥ जयाचे वर्णितां गुण । तदाकार होय मन । तो अवतार न धरूनि अवतरण । विसावेंपण पावला ॥ ६३ ॥ जो न जन्मूनि जन्मता । जया धर्मरहिता धर्मता । परी नैष्कर्म्यरूप वर्मता । न मोडे ज्याची ६४ यद्गुण ऐकतां संसार कटू । जो प्रेमळमोहनीं अतितरपटू । जो कांताभक्तिचटुलचाटू । विशद यशस्वी ॥ ६५ ॥ जो संयोगीं योग पुरविता। वियोगींही योगक्षेम करिता । संयोगीं वियोगीं पाहतां । दुरी न जाय ॥ ६६ ॥ जया साहेना अभिमान । जो स्वयें निरभिमान । परी जयाच्या भक्तीचा अभिमान । मोक्षदायकू ॥ ६७ ॥ जयाची लवकणमात्र भक्ति । होतां कर जोडूनि ये मुक्ती । यत्पदीं जडालिया आसक्ती । तरी उपेक्ष्य मुक्ति होऊं पाहे ॥ ६८ ॥ अहो शुकादिक अतिविरक्त । परी यद्विषयवर्णनीं भक्त । जे आत्माराम जीवन्मुक्त । ते यत्प्रेम वर्णिती । ६९ असो हा तात गुरु कांत । स्वामी सच्चिदानंद अनंत । श्रीकृष्ण गोविंद मुकुंद भगवंत । गोपिकाकांत नंदसूनु ॥ ७० ॥ पुढें प्रवृत्त झालिया कली । जो असुरांलागीं मोह घाली । तो बौद्धावतार वनमाळी । पाखंडापासोन रक्षो आह्मां ॥ ७१ ॥ हा अवतार जरी धरी एकविसावा । परी करुणेचा पूर्ण विसावा । अहिंसेचिया पूर्ण भावां । प्रकटविलें जेणें ॥ ७२ ॥ क्षत्रियचि महा शूर । राजे परी अतिक्रूर । जैसे कां आपआपसांत तस्कर । कलिकृतसंधींत होतील कीं ॥ ७३ ॥ तदा श्रीविष्णुयशप्रभावें । कल्की अवतार हा संभवे । मग मारोनि दुष्टां निजप्रभावें। धर्म स्थापिता मागुती ॥ ७४ ॥ तो बावीसावा अवतारू । कल्की झाला शार्ङ्गधरू । जेथूनि पुनः उद्धारू । कृतयुगाचा ॥ ७५ ॥ सूत ह्मणे ऋषीप्रती । जी हरिहरमय सत्वमूर्ती । सकळ आगम कीर्ती । गाती

जयाची ॥ ७६ ॥ ब्रह्मा विष्णु आणि रुद्र । याहुनि जो पर । तो एक कर्पूरगौर । ह्मणती शैव ॥ ७७ ॥ किंवा ब्रह्माविष्णुरुद्रापरौता । वैष्णव मानिती जिया रमाकांता । सकळ श्रुति जिया भगवंता । ईश्वर ह्मणती ॥ ७८ ॥

॥ दोहा ॥

परि या स्थलीं बोलती ठेवुनि मतअभिमान ।
शैव शिव वैष्णवहि हरी ते तंव चिन्त्य प्रमाण ॥ ७९ ॥

गद्यः—समस्त श्रुतिसमन्वयेंकरून श्री शुद्धसत्वोपहित परमात्मा उपास्य आहे. ज्याप्रमाणें एकच पुरुष स्त्रीचेठायीं निर्लज्ज होतो, वडिलाचेठायीं सलज्ज होतो, आणि पुत्रादिकांचेठायीं कृपानिष्ठ होतो, त्याप्रमाणें एकच परमात्मा सृष्टिकार्यार्थे यद्यपि त्रिगुणोपहित होतो, तथापि स्वभक्तानुग्रहार्थ ब्रह्मा, विष्णु, रुद्र या तीन्ही देवांचीं रूपें सत्वगुणानेंच धारितो. तो परमात्मा दंडकमंडलुविशिष्टमूर्त्युपहित होत्साता ब्रह्मा[1] होतो. श्रीवत्सलांछनादिविशिष्टमूर्त्युपहित होत्साता विष्णु होतो आणि गंगामृगाङ्कमस्तकादिविशिष्टमूर्त्युपाहित होत्साता शिव होतो. ह्मणून ह्या तिघांतून कोणाचेंही भजन केलें असतां फल समान होतें. परंतु हिरण्यगर्भला जीवत्वधर्म श्रुतींत सांगितला असल्यामुळें, आणि अधमप्रादुर्भवनकाळीं ब्रह्मदेव शिवविष्णूला शरण गेला, हें पुराणांत सांगितलें असल्यामुळें, ब्रह्मदेवाचा यद्यपि कर्मकाण्डाचें ठायीं ईश्वरत्वेंकरून स्वीकार आहे, तथापि किंचिज्जीवधर्मप्रतीतिस्तव ज्ञानकाण्डाचें ठायीं उपासनार्थ स्वीकार नाहीं असें कोणी मानतात, तेंही योग्य असूं शकतें. कारण, महाभारतांत.

॥ श्लोक ॥

" रुद्रोनाराणश्चैवेत्येकंसत्वंद्विधाकृतम् ।
लोकेचरतिकौन्तेयव्यक्तिस्थंसर्वकर्मसु " ॥

असे दोनच भवरंग देवोपासनार्थ सांगितले आहेत. ह्मणून

---

१ हिरण्यगर्भ ब्रह्मा नाहीं हें सिद्धांतबिंदूतील मधुसूदन स्वामीचें ह्मणणें याच अभिप्रायाचें असावें.

त्यांची ईश्वरत्वेंकरूनच उपासना होते. ह्या ठिकाणीं वादी निरनिराळ्या प्रकारें वाद करितात. ते सर्व एकदेशीय आहेत. कारण विष्णुद्वेष करणाऱ्या शिवभक्तांला आणि शिवद्वेष करणाऱ्या विष्णुभक्तांना कूर्मपुराणादिकांत पतन सांगितलें आहे. तें पाहूनच कांहीं वादी गणेश, विष्णु, शक्ति, सूर्य आणि शिव असे पांच ईश्वर कल्पितात; तेंही सम्यक् नाहीं. कारण, पांच ईश्वर कल्पिले असतां परस्परेश्वरनिष्ठ अन्योन्याभावास्तव भेदसिद्धि होत असल्यामुळें प्रत्येक ईश्वर अव्यापक होईल. आणि पांचही व्यापक मानिले असतांनां सांकर्य होईल. तसेंच पांचांनांही सृष्टि करण्याची सारखीच सत्ता मानिली, तर त्या पांचही ईश्वरांची इच्छा आपापल्यापरी स्वतंत्र आहे, किंवा परस्परापेक्षी आहे? पहिल्या पक्षीं गणेशेश्वरानें लय करण्याचें मनांत आणलें, तर शिवेश्वरानें उत्पत्ति करण्याचें मनांत आणलें असतां, तितक्यांत शक्तीश्वरानें स्थिति करण्याचें मनांत आणावें, हें पाहून विष्णु ईश्वरानें सर्व देव करण्याचें मनांत आणावें, व सूर्येश्वरानें सर्व असुर करण्याचें मनांत आणावें, आणि सर्वांच्याही इच्छा सफल व्हाव्या. असा स्वीकार केला असतां सर्वत्र सर्वोत्पत्ति, सर्वस्थिति, सर्वलय, सर्वदेव, सर्वासुरत्वादि सृष्टि एकसमयावच्छेदेंकरून झाली पाहिजे. ती जर स्वस्कंधारोहणन्यायवत् मनांत देखील कल्पितां येत नाहीं तर दृष्ट होणार कोठली? आणि दुसऱ्यापक्षीं सर्वही ईश्वर जीवरूप होतील. ह्मणून पंचेश्वरकल्पना व्यर्थ आहे. आणि तुकाराम महाराजांनांही हा पंचेश्वरवाद संमत नाहीं. ते म्हणतात:– "शिव शक्ति आणि सूर्य गणपति । एकचि ह्मणती विष्णूसहीं" या वचनांत परपक्षोपन्यास करून 'राजस भजनें वायां जाती'। असें पुढील वचनांत ह्मटलें आहे. ह्या अभंगांत जो 'एक' शद्ब आहे तो एकेश्वरमूलक पंचायतनवाचक नसून, पांचा व्यक्तींचें ठिकाणीं एकच ईश्वरत्व जाति आहे, या पंचेश्वरकल्पनेचा दर्शक आहे. म्हणूनच तुकाराम महाराजांनीं अभंगांतील 'एक' शद्बाला पूर्वपक्षाच्या हातीं दिलें आहे. त्यांनीं एकेश्वरमूलक पंचायतन खंडन केलें असा 'एक' शद्बावरून कोणी अर्थ काढील तर 'हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ॥ १ ॥ एक एकांचें हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥ २ ॥ भेदकासी

नाड । एक वेलांटीच आड ॥ ३ ॥ उजवें वाम भाग । तुका ह्मणे एक अंग' ॥ ४ ॥ इत्यादि हरिहरांचें ऐक्य सांगणाऱ्या तुकाराम महाराजांच्या अभंगाशींच येणाऱ्या विरोधाचा त्याच्याकडून परिहार होणार नाहीं. कांहीं वेदांतमतांत प्रत्येक जीवाची सृष्टि व ईश्वर निरनिराळे मानले आहेत खरें; पण त्या मतांत देखील एका सृष्टीला एकापेक्षां अधिक ईश्वर मानिले नाहींत. वेदांतांत जीवाच्या एकत्वनानात्वाविषयीं जरी वाद आहे, तरी ईश्वर सर्व एकच मानितात; आणि ईश्वरामध्यें आवरण कोणी स्वीकारीत नाहींत. अतः, गौरवदोषास्तवही पांच ईश्वर कल्पिणें व्यर्थ आहे. यद्यपि श्रीमच्छंकराचार्यांनीं उपासनार्थ पंचायतनपूजा उपदेशिली आहे, तथापि ती एकेश्वरमूलक आहे. पृथक पांच ईश्वर मानिले नाहींत. अशाविषयीं गणेशपुराणांत व्यासोक्तिही आहे.

॥ श्लोक ॥

' शिवेविष्णौचशक्तौचसूर्येमयिनराधिप ।
याऽभेदबुद्धिर्योगःससम्यग्योगोमतोमम ' ॥

गणेश ह्मणतातः— हे वरेण्य राजा, शिव, विष्णु, शक्ति, सूर्य आणि मी, या पांचांचेंही ठिकाणीं एकेश्वर बुद्धीनें, ह्मणजे हे शुद्धसत्त्वरूप कारणब्रह्म आहेत, अशा अभेद भावनेनें चित्त स्थिर होण्यालाच मी उत्तम प्रकारचा योग ह्मणतों. ह्मणून एकच ईश्वर पांच रूपांनीं भक्तानुग्रहार्थ झाला हें सिद्ध आहे. त्यांतही शिवविष्णूपासना सत्त्वनिष्ठ पुरुषांचें ठायीं बहुतेक दिसतात. पुन्हा येथेंही वाद आहेच. शैव ह्मणतात, 'ब्रह्मा, विष्णु, रुद्र, यांहून वेगळी एक शिवमूर्ति आहे;' आणि वैष्णव ह्मणतात, 'ब्रह्मा, विष्णु, रुद्रांच्या पलीकडे एक वासुदेव आहे. तोच मुख्य उपास्य आहे.' हे वैष्णव आणि शैव आपल्या इष्ट मूर्तीला कारणरूप समजत नाहींत, असें त्यांच्या दुसऱ्या मताशीं केलेल्या विरोधावरून दृष्टीस पडतें. हे दोघेही वादी आपापल्या मतांनां श्रुतींचें एकदेशीय प्रमाणही देतात. परंतु त्या श्रुतींचें इतर तर्कानुगृहीतसर्वश्रुतिसमन्वयबलेंकरून कारणब्रह्मपर तात्पर्यानयन घडतें. ह्मणून त्रिमूर्तिविरहित शैवांनीं कल्पिलेला शिव आणि वैष्णवांनीं कल्पिलेला वासुदेव याविषयीं

प्रमाण चिंत्य आहे. कारण श्रुतिभिन्न तंत्रादिकांनां स्वतंत्र प्रामाण्य नाहीं; आणि युक्ति व अनुभव यानांही तसें जुळत नाहीं. म्हणून एकच ईश्वर भक्तानुग्रहार्थ विष्णुशिवरूप होतो हें सिद्ध आहे. तरी पुन्हा स्वमतीय कोणी ह्मणतात कीं, विष्णूपासना प्रत्यक्ष मोक्षसाधन आहे; आणि शिवोपासना तर किंचित्कालेंकरून मोक्षसाधन आहे.

॥ श्लोक ॥

''आरोग्यंभास्करादिच्छेच्छ्रियइच्छेद्धुताशनात् ।
ज्ञानंमहेश्वरादिच्छेन्मोक्षमिच्छेज्जनार्दनात् '' ॥

' सूर्यापासून आरोग्य मिळण्याची इच्छ करावी, कल्याणाची अग्नीपासून करावी, ज्ञानाची शिवापासून व मोक्ष मिळण्याची विष्णूपासून करावी. ज्ञान हें मोक्षाचें साधन व मोक्षज्ञानाचें फळ आहे. ह्मणून फल लौकर देणाऱ्या विष्णूचीच उपासना श्रेष्ठ आहे.' ही स्मृति ते आपल्या ह्मणण्याला प्रमाण देत असतात. परंतु या ह्मणण्यांतही रुची वाटत नाहीं. कारण ' रुद्रो नारायणश्चैवेत्येकं सत्वं द्विधा कृतम् ' ' उमासहायं त्रिपुरान्तकं विभुम्' 'नारायणाख्यम् ' ' यो ब्रह्माणं विदधाति पूर्वम् ' ' एको नारायणो देवो ' इत्यादि श्रुतिस्मृतीवरून वरील स्वमतीयाचेंही ह्मणणें बाधित होतें; आणि प्रमाण घेतलेल्या स्मृतींचें अर्थांतर होणें शक्य आहे, किंवा श्रुतिविरुद्ध असल्यास तिचा बाधही होणें शक्य आहे. म्हणून शिवविष्णूची उपासना समान फलदात्री आहे. तथापि, या विषयांत वाद करण्यांत अर्थ नाहीं. दुसऱ्याचा द्वेष न करितां मुमुक्षूला आवडेल त्याची उपासना ग्रहण करावी; आणि तिच्यावर विश्वास ठेवावा. उपासनेची मीमांसा करण्यांत कांहीं तिच्या फलाची प्राप्ती नाहीं, केवळ मनोरंजन मात्र आहे; आणि ज्ञानाची मीमांसा करण्यांत त्याची प्राप्ति आहे ह्मणून ज्ञानाचा विचार करावा, व उपासना निष्ठेनें करावी. 'एको देव: केशवो वा शिवो वा' असें अपर वचनही आहे. तथापि, आपण जी उपासना करितों, तीच शिष्यादिकांनीं करावी असा कोणत्याच गुरु म्हणवून घेणाऱ्या पुरुषानें आग्रह करूं नये. ह्मणून उपासनेची मीमांसा करणें हितावह आहे, आणि ती

येथें संक्षेपानें केलीही आहे. विशेष विस्तार 'आगमरहस्यपर्याप्ति' ग्रंथांत करीन. असो. हें विष्णुशिवात्मक शुद्धसत्व कारणब्रह्म ध्येयलिंगत्वें-करून पौरुषेयरूप असल्यामुळें, तळ्यापासून निघणाऱ्या लहान लहान प्रवाहाप्रमाणें सर्व अंशकलावतार येथूनच होतात.

श्री गर्गसंहिता गोलोक खंड अध्याय १ श्लोक १३, १४, व १६ ते २६.

॥ श्लोक ॥

श्रीनारदउवाचः—

'गोसाधुदेवताविप्रवेदानांरक्षणायवै ।
तनुंधत्तेहरिःसाक्षाद्भगवानात्मलीलाया ॥
यथानटःस्वलीलायांमोहितोनपरस्तथा ।
अन्येदृष्ट्वाचतन्मायांमुमुहुस्तेनसंशयः ॥
... ... ... .... ...
... ... ... ... ...
अंशांशोंऽशस्तथावेशःकलापूर्णःप्रकथ्यते ।
व्यासाद्यैश्चस्मृतःषष्ठःपरिपूर्णतमःस्वयम् ॥
अंशांशस्तुमरीच्यादिरंशाब्रह्मादयस्तथा ।
कलाकपिलकूर्माद्याआवेशाभार्गवादयः ॥
पूर्णोनृसिंहोरामश्चश्वेतद्वीपाधिपोहरिः ।
वैकुंठोऽपितथायज्ञनरनारायणाःस्मृताः ॥
परिपूर्णतमःसाक्षाच्छ्रीकृष्णोभगवान्स्वयम् ।
असंख्यब्रह्मांडपतिर्गोलोकेधाम्निराजते ॥
कार्याधिकारंकुर्वतःसदंशास्तेप्रकीर्तिताः ।
तत्कार्यभारंकुर्वतस्तेंऽशांशाविदिताःप्रभोः ॥
एषामंतर्गतोविष्णुःकार्यंकृत्वाविनिर्गतः ।
तानावेशावतारांश्चविद्धिराजन्महामते ॥
धर्मंविज्ञायकृत्वायःपुनरंतरधीयत ।
युगेयुगेवर्तमानःसोऽवतारःकलाहरेः ॥

चतुर्व्यूहोभवेद्यत्रदृश्यंतेचरसानव ।
अत:परंचवीर्याणिसतुपूर्ण:प्रकथ्यते ॥
यस्मिन्सर्वाणितेजांसिविलीयंतेस्वतेजसि ।
तंवदंतिपरंसाक्षात्परिपूर्णतमंस्वयम् ॥
पूर्णस्यलक्षणंयत्रयंपश्यंतिपृथक्पृथक् ।
भावेनापिजना:सोयंपरिपूर्णतम:स्वयम् ॥
परिपूर्णतम:साक्षाच्छ्रीकृष्णोनाऽन्यएवहि ।
एककार्यार्थमागत्यकोटिकार्यंचकारह ॥'

याप्रमाणें गर्गसंहितेंतील अवतारांची प्रक्रिया असून या ग्रंथांत ती संक्षेपानें सांगितली असल्यामुळें, सूत्रप्रायत्वास्तव विरोध शंकनीय नाहीं. या ग्रंथांतील प्रक्रिया अशी:—

ईश्वराचे कांहीं अंशावतार आहेत व कांहीं कलावतार आहेत. अंशावतार म्हणजे सर्वशक्तिमत्ता गुप्त असून उपयोगापुरतीच शक्ति प्रकट होणें; आणि कलावतार म्हणजे सर्वशक्तिमत्ता गुप्त नसून उपयोगापुरत्याच शक्तींचा आवेश मात्र होणें. त्यांत मत्स्यादि अंशावतार आहेत. आणि नारदवसिष्ठादि महर्षी, स्वायंभुवादि मनु, ब्रह्मादि देव, विवस्वत्प्रियव्रतादि महातेजस्वी मनुंचे पुत्र आणि कश्यपादि प्रजापति हे सर्व परब्रह्मपुरुषरूप हरीचेच कलावतार होत. ह्मणून यांचें ठिकाणीं उपभोगापुरताच शक्तीचा आवेश आहे. जसें, सनत्कुमारकपिलादिकांचे ठायीं उपयोगी ज्ञानशक्तीचा आणि पृथ्वादिकांचे ठायीं बलशक्तीचा आवेश आहे. परंतु श्रीकृष्णावताराची गोष्ट तशी नाहीं. उपयोगी आणि अनुपयोगी सर्व शक्तींचा विकास तच्चरितावरून दिसत असल्यामुळें अमृताच्या बिंदूंतही अमर करण्याची शक्ति जशी अमृतसिंधूसारखीच असते, तशा श्रीकृष्णरूप लदानशा मूर्तीतही सर्व शक्ती सारख्याच दिसतात. आणखी 'विवक्षितगुणोपपत्तेश्च' हें सूत्र याला प्रमाण आहे. या सूत्राचा अभिप्राय असा. ... ... 'विवक्षिता:' याचा अर्थ 'वक्तुमिष्टा:' ह्मणजे बोलण्याला योग्य असे;... ... आणि जी गोष्ट मनुष्याच्या मनास आवडणारी असेल तीच तो बोलत असतो.' मानस

ओळखिजे बोले' हें तातांचें वचन तुला माहितच आहे. पण मनास आवडणाऱ्या सर्वच गोष्टी बोलण्याला योग्य नसतात. जसें, मैथुन हें मनास आवडतें पण बोलण्याला योग्य नाहीं. ह्मणून मनास आवडणारे व बोलण्याला योग्य जे गुण असतील ते एका परमात्म्याच्याच ठिकाणीं कल्पून त्याचें ध्यान करणें जीवाला शक्य आहे. ह्मणून त्याची उपासना श्रुती सांगतात. ... ... ...

शिष्यः– महाराज, मनाला आवडणारे व बोलण्याला योग्य असे परमात्म्याचे कोणते गुण वेदांत सांगितले आहे?

श्रीगुरुः–ते गुण ह्मटले म्हणजे सत्यसंकल्पादयो गुणा': हे होत. ह्मणजे, उत्पत्ति, पालन, व संहार करण्याची अप्रतिहत अशी शक्ती. ... ... ... ... .... ... अशा रीतीनें आपल्याला आवडणारे गुण श्रीकृष्ण परमात्म्याचें ठिकाणीं संभवतात. ... ... म्हणूनच परमात्म्याची उपासना श्रुतींत सांगितली आहे. ... ... आतां, तुला येथें एक रहस्य सांगावयाचें राहिलें आहे. तें हेंच कीं विभूतीची उपासना जशीच्या तशीच उपयोगी पडते, ह्मणजे परमात्म्याचें ठिकाणीं आपल्या आवडीच्या गुणाचा आरोप केला असतां चालतो; पण विभूतींच्या ठिकाणीं तसें चालत नाहीं. मारुतीचें ध्यान करावयाचें आहे, तर ते त्याच्या ठरलेल्या गुणांप्रमाणेंच म्हणजे इतिहासांत वर्णन केल्याप्रमाणेंच केलें पाहिजे. तसें न करतां त्याच्या डाव्याहाताकडे बायकोचें ध्यान केलें तर नाश होईल. ह्मणून त्याला आपल्याला आवडतील ते गुण देतां येत नाहींत. तसेंच सूर्यनारायणाची मूर्ति काढावयाची आहे तर पाय नाहींत अशीच काढली पाहिजे. तिला पाय काढले कीं त्याचा नाश झालाच. ह्याप्रमाणेंच इतर सर्व देवतांचेही गुण ठरलेले आहेत. त्यांच्या ठिकाणीं ' विवक्षित ' ह्मणजे आपल्याला आवडतील त्या गुणांचा आरोप करतां येत नाहीं. .... ... पण श्रीकृष्णाचें ध्यान आवडेल तसें करावें. म्हणजे दोन्ही प्रकारानें त्यांचें ध्यान करतां येतें. निर्गुणाचें ठिकाणीं विवक्षितगुणोपपत्ति संभवत नाहीं. ह्मणून ' विवक्षितगुणोपपत्तेश्च ' हें सूत्र सगुणईश्वरपरच व त्यांतही श्रीकृष्ण परच आहे असें जोरानें ह्मणतां येईल. श्रीकृष्णानें

अर्जुनाला गुरु ह्या नात्यानें गीता सांगितली. ह्मणून गुरुरूपानेंही त्यांची उपासना चालते; पतिरूपानें तर ते आहेतच. जरी अगस्तिसंहितेंत रामाची उपासना पतिरूपानें सांगितली आहे, तरी ती शांत मधुररूपानें-च होते, तीव्र माधुर्यरूप होऊं शकत नाहीं. कारण त्यांचें कडकडीत एकपत्नीव्रत आहे. यावरून आपल्याला जे जे आवडते गुण आहेत त्याला आधार श्रीकृष्णमूर्तीच ठरते. ... .... कारण श्रीकृष्णाच्या बहुतेक लीला सर्वमयच आहेत ( जसें श्रीकृष्णाच्या मुरलीनादानें देवांगना मोहित झाल्या यावरून त्यांचें ठिकाणीं श्री ह्मणजे मनोहर शोभा सिद्ध होते. हनुमंतानें आणलेल्या द्रोणागिरी-चा पडलेला एक लहान तुकडा श्रीकृष्णानें उचलून धरिला असतांनां त्याला गिरिधर नांव पडलें, यावरून त्यांचें ठिकाणीं यश म्हणजे थोड्या कर्मानें अत्यंत कीर्ती व श्रेय मिळणें हें सिद्ध होतें. तसेंच सुदामाचे पोहे भक्षण करून त्याला सुवर्णनगरीप्रदान केल्यानें सामान्य औदार्य, ' परित्राणाय साधूनाम् ' ' संभवामि युगे युगे ' इत्यादि वचनांवरून अभयदान औदार्य, दैत्य व ऋषी यांनां समान मोक्षफल दिल्यामुळें अभेदौदार्य, गुरु व माता यांच्या इच्छानुसार पुत्रप्रदान केल्यामुळें दातृत्वौदार्य, असें चतुर्विध औदार्य त्यांचें ठायीं सिद्ध होतें. ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ' या वचनावरून व्यवस्थाकारी ज्ञान सिद्ध होतें. ' न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ' यावरून बंधनिवर्तक ज्ञान सिद्ध होतें. आणखी द्रौपदीच्या हाकेबरोबर भोजन सोडून धांवत जाणें, गोपिकांच्या अभि-मानास्तव रासांत गुप्त होणें, इ० विषयत्यागरूप वैराग्य, यादवपुरीला आपल्या इच्छेनें सोडणें हें संगत्यागरूप वैराग्य, विदुराच्या घरीं जाऊन कदान्न भक्षण करणें हें यदृच्छालाभ वैराग्य, आपण राज्यावर न बसतां उग्रसेनाला बसविणें हें इहफलभोगवैराग्य, सत्यभामेच्या वचनावरून स्वतः दान जाणें, रुक्मिणीवचनावरून तप करणें हें प्रारब्धावधारण वैराग्य, स्यमंतकमणि सत्राजितकन्येलाच देणें, पारिजातकवृक्षाशिवाय स्वर्गीय कांहींच न घेणें, हें अमुत्रफलभोग-वैराग्य, गोपिकांना निष्काम करणें, नारदाला माया दाखविणें, आनं-दाचें क्रीडास्थान गोलोक करणें, मुखांत अनंत ब्रह्मांड दाखविणें, आपलें

रूप व्यापक करून अर्जुनाला विश्वरूप दाखविणें, हें पूर्णता ऐश्वर्य, धर्माघरीं उच्छिष्ट काढणें, कालयवनाचे भीतीनें पळून जाणें, गांधारीच्या शापाचा अंगिकार करणें, पांडवाचें स्थळीं स्थळीं आपल्या प्राणाहूनही रक्षण करणें, हें ब्रिदावधारण ऐश्वर्य, भोग भोगून ब्रम्हचारी ह्मणून प्रेत उठविणें, इत्यादि अवशिष्ट लीलावरून कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं शक्ति-ऐश्वर्य, हीं भगवान गोपालकृष्णाचें ठायीं सिद्ध होतात. तसेंच 'कृष्णाय देवकीपुत्राय' ह्या सामवेदीय श्रुतीवरून, द्वापारांत झालेल्या 'ब्रह्मरात्रे उपावृत्ते' अशा रासलीलेवरून व कलियुगांत नरसिमेहता व अस्मादिकांनीं पाहिलेल्या, पाहत असलेल्या, व पुढें पाहणाऱ्या रासलीलेवरून, त्रिकालाबाध्यता सिद्ध होत असल्यामुळें, अस्मत्प्रभूच्या ठिकाणीं सत्यतास्वरूपलक्षण सिद्ध होतें; व 'पालिता गोपसुंदर्यः स कृष्णः क्वापि नो गतः' या पद्मपुराणांतर्गत वाक्यावरून व 'दिव्य दृष्टिबिन दृष्टि न आवे' या चरणदासजीच्या वचनावरून वृंदावनविहारीश्रीकृष्णलीला वाटेल तेव्हां पाहणें प्रेमळ भक्तांना शक्य असल्यावरूनही त्यांचें ठिकाणीं सत्यतास्वरूपलक्षण सिद्ध होतें. गीतादिवचनांनीं अविद्या दूर केल्यामुळें ज्ञानस्वरूपलक्षण सिद्ध होतें. यशोदेला भिंती, खांब, आकाश पृथ्वी, हे सगळे आपलेच स्वरूप आहे असें दाखविल्यामुळें, सर्व गोपींच्या समक्ष रासांत अनंतरूपें झाल्यामुळें, सोळाहजार स्त्रियांशीं एकाच वेळीं लग्न केल्यामुळें, व नारदांनां प्रत्येक घरांत आपलें स्वरूप दाखविल्यामुळें, अनंततारूपलक्षण सिद्ध होतें. अखंड रास करीत असल्यामुळें, व गोलोक, व्रज, व भक्तांचें हृदय, या ठिकाणीं उल्हासयुक्त राहत असल्यामुळें आनंदतारूपलक्षण सिद्ध होतें. वत्सहरणसमयीं नूतन गायीगोपाळ उत्पन्न केल्यामुळें, नंदाला वैकुंठ दाखविण्याचें वेळीं सर्व लोकांचें पालन केल्यामुळें, व विश्वरूपांत अर्जुनाला सर्वांचा लय दाखविल्यामुळें, श्रीकृष्णाचें ठिकाणीं तटस्थलक्षण सिद्ध होतें. याप्रमाणें श्रीकृष्णाचें ठिकाणीं वेदोक्त तटस्थलक्षण व स्वरूपलक्षण सिद्ध होत असून त्यांच्या लीला सर्वमय ठरतात. (ह्या विषय 'तुषार' ग्रंथांत सविस्तर अवलोकन करावा.) तसें इतराचें नाहीं. जसें, दत्तात्रयाचें ठिकाणीं पतिभाव चालणार नाहीं.

कारण ते ब्रह्मचारी आहेत. इतकेंही करून पतिभाव ठेविल्यास आपली भक्ती चुलींत जाईल व आपण मरून जाऊं. ह्मणून हें सूत्र दत्तात्रयपरही लागत नाहीं. तसेंच शंकरपरही तें कष्टानें लागेल. पण श्रीकृष्णपर मात्र 'विवक्षितगुणोपपत्तेश्च' हें सूत्र अगदीं तंतोतंत लागतें. व ह्या सूत्रप्रमाणावरूनही तें नारायणरूप कारणब्रह्मच कृष्णरूपानें आविर्भाव पावलें असें सिद्ध होतें. ह्मणजे श्रीकृष्ण हा स्वयं भगवानच आहे. तात ह्मणतात, 'पैं व्यक्त आणि अव्यक्त। हें तूंचि एक निभ्रांत। भक्तीं पाविजे व्यक्त। अव्यक्त योगें ॥' या ओवींतील 'अव्यक्त' शद्बाचा अर्थ, विश्वरूपाला पाहून अर्जुनाला प्रश्न उद्भूत झाला असें दाखविल्यामुळें विश्वरूपच करावा. तेंच रूप हें, हें वर सांगितलेंच आहे. हें रूप ध्येय असूनही देवादिकांनां दृष्टिगोचर नसल्यामुळें अव्यक्त होय; आणि यापासून निरुपाधिक चैतन्याचा बोध होतो, ह्मणून त्याला अव्यक्त ह्मणावें असें कोणी ह्मणेल, तर निरुपाधिक चैतन्याचा बोध श्रीकृष्णाच्या व्यक्त उपासनेपासूनही होतो. निरुपाधिक चैतन्याचा बोध श्रीष्णोपासनेपासून न मानला तर ती तुच्छ आणि त्याज्य होईल. तसा तातांचा आशय दिसत नाहीं. म्हणून या ओवींतील 'अव्यक्त' शद्बाचा अर्थ विश्वरूप करणेंच इष्ट आहे. अन्यथा श्रीकृष्णाचें रूपाचीही योगानेंच प्राप्ति होऊं लागेल, व मग 'भक्ती पाविजे व्यक्त' हें वाक्य व्यर्थ होईल. ह्मणून उपर्युक्त अर्थच सम्यक् आहे. पुन्हा तात ह्मणतातः—

॥ओव्या॥

'पै जे वानी श्यातुका। तेचि वेगळिये वाला एका।
तैसा एकदेशिया व्यापका। सरिसा पाड्र ॥
अमृताचिया सागरीं। जे लाभे सामर्थ्याची थोरी।
तेचि दे अमृतलहरी। चुळी घेतलिया ॥'

या एकंदर प्रतिपादनावरून श्रीकृष्ण हे पूर्णावतार आहेत हें सिद्ध झालें. हें निरूपण दशमविलासादि स्थळीं स्थळीं पुढेंही स्पष्ट होईल. कारण श्रीकृष्णभक्त्युद्बोधनार्थच या ग्रंथाचा प्रादुर्भाव आहे. यद्यपि इंद्रादिदेवशत्रुरूप असुरांचें मर्दन करून लोक सुखी करणेंच सर्व अवतारांचें प्रयोजन मुळांत सांगितलें आहे तथापि येथें हा विशेष आहे.

मुख्यतया प्रयोजन आहे हें कलावताराचें आणि अंशावताराचें हें सामान्य प्रयोजन आहे व सज्जनरक्षण हें मुख्य प्रयोजन आहे. म्हणूनच नृसिंहानें देवांनां भयक्लेशापन्न केलें आणि प्रल्हादाला भयरहित करून त्याचें रक्षण केलें. आतां पूर्णावतार जो श्रीकृष्ण त्याचें तर केवळ प्रेमवर्धनच प्रयोजन आहे, आणि इतर प्रयोजनें आनुषंगिक आहेत. ह्मणून सूर्याचें जसें प्रकाश देणें मुख्य प्रयोजन आहे आणि अंधार दूर करणें आपेक्षिक प्रयोजन आहे आणि पृथिव्यादि तापविणें हें आनुषंगिक म्हणजे गौण प्रयोजन आहे, तद्वत अद्वैतप्रेमवर्धन कृष्णावताराचें मुख्य प्रयोजन आहे. 'मी संयोगीं वियोगीं प्रेमच वाढवीत असतों' असें गोपिकांनां उत्तर देतांना श्रीकृष्णानें ह्मटलें आहे. सज्जनब्राम्हणादिरक्षण कृष्णावताराचें आपेक्षिक प्रयोजन आहे. तें मुख्य प्रयोजन असतें तर नारदांची नारदी केली नसती. स्त्री देऊन देखिल त्यांना संतुष्टच केलें असतें. ह्मणून प्रेमवर्धनच मुख्य प्रयोजन आहे. कोणी म्हणेल कीं नारदांनां मोह होऊं नये म्हणून स्त्री दिली नाहीं, तर त्याला आम्ही असें विचारितों कीं गुरूनें आपला पुत्र व देवकीनें आपली सहा बाळें मोहानेंच मागितलीं असतां तीं कां आणून दिलीं ? या प्रश्नाचें तूं काय उत्तर देतोस ? म्हणून आमचाच पक्ष यथार्थ आहे. अर्जुनादिकांचें रक्षण केलें म्हणून सज्जनब्राम्हणादिरक्षण आपेक्षिक प्रयोजनही सिद्ध होतें; आणि शिशुपाळादि असुरांचा नाश करणें हें मुख्य समजत नव्हतेसें दिसतें. करणें प्राप्तच आल्यास तो कसा तरी होऊन यावा एवढ्यापुरतेंच त्यांत त्याचें अंग असे. कांहीं असुरांचा नाश आपण स्वतः जरी केला, तरी पण कालयवनाचा नाश मुचकुंदाच्या हातून, जरासंधाचा भीमाचे हातून व शेवटीं तर शस्त्र टाकून सर्व भूभार आपण सारथी होऊन अर्जुनाच्याच हातानें उतरविला, म्हणून असुरनाश हें आनुषंगिक प्रयोजन सिद्ध होतें. स्वतः भगवंतांनींच तीन प्रकारचें आपलें प्रयोजन सांगितलें आहे. तें असें:—

॥ श्लोक ॥

'परित्राणायसाधूनांविनाशायचदुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थायसंभवामियुगेयुगे' ॥

यांत धर्मसंस्थापन ह्मणजे भक्तिवर्धन ( 'येतुधर्म्यामृतमिदं' इ० भक्तियोगाध्यायनिष्ठवचनांवरून ) हें मुख्य प्रयोजन, साधुपरित्राण आपेक्षिक प्रयोजन, आणि असुरनाश हें आनुषंगिक प्रयोजन. तथापि या श्लोकांत आणखी एक विशेष आहे तें हें:– 'परित्राणाय साधूनां' ह्मणजे सज्जनांच्या पुण्य कर्मांनेंच मी त्यांचें पालन करितो; व 'विनाशायच दुष्कृतां' ह्मणजे दुष्टांच्या पाप कर्मांनेंच मी त्यांचा नाश करितो, स्वत: करित नाहीं. ह्मणून माझें ठिकाणीं नैर्घृण्यवैषम्य नाहीं. परंतु मी दाखविल्यावांचून माझी भक्ति स्थापन करण्याला दुसरा कोणी जीव समर्थ नसल्यामुळें ती मात्र मी स्वत: स्थापन करितो. म्हणून मी अहेतुक अनुग्राहक आहे असें समज. ' हें ' धर्म संस्थापनार्थाय ' या वचनानें सांगितलें. ' युगे युगे ' म्हणजे भक्त इच्छा करतील तेव्हां तेव्हां.'तस्याहं सुलभः पार्थ' या वचनावरून हा अर्थ निघतो. सनातनाचार्यांनींही आपल्या बृहद्भागवतामृताच्या स्वकृत 'दिग्दर्शिनी' नामक टिकेंत कंसवधादिक प्रयोजनें उगीच असून प्रेमप्रदानच श्रीकृष्णावताराचें मुख्य प्रयोजन आहे असें स्पष्ट ह्मटलें आहे. सनातनाचार्य जरी आमच्या मताचे नाहींत, तरी या पक्षांत मी त्यांच्या मताचा आहे. एवं या मुख्य प्रयोजनावरूनही श्रीकृष्णाची पूर्णताच सिद्ध होते. पुन: 'गोप्य: कामात् भयात्कंस:' या वचनावरून कामक्रोधादिक-पुरुषार्थांचें साधन नसूनही ज्याच्या कृपेनें पुरुषार्थद झाले. यद्यपि अंशावतारही उद्धार करितात, तथापि पुरुषार्थसाधन जे धर्मादिक, त्यांच्या अपेक्षेनें करितात, आणि परमात्मा श्रीकृष्ण तर विपरीत साधनांनीं देखील तदेकनिष्ठापूर्वक असतां उद्धार करितो. 'तदेकनिष्ठापूर्वक' पद घालण्याचें कारण असें आहे कीं, विकार असोत, पण इतर विषयांकरितां नसोत ह्मणजे झालें. ' तदर्पिताऽखिलाचार: सन्कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयं' ( नारदभक्तिसूत्र ६५ ) या नारदसूत्रावरूनही हें समजून घे. आतां सूर्योदय झाला असतानां दिव्याच्या उजेडापुरतें कार्य सहजच होतें, त्याप्रमाणें पूर्ण श्रीकृष्णोदयामुळें अंशावताराचेंही कार्य सहजच होतें. तें कार्य पाहूनच श्रीकृष्ण अंशावतार आहे, अशी ब्रह्मादिकांनांही जर भ्रांती झाली, तर मग मूर्खांनां

झाली, यांत नवल काय? हें आवरणभंगकारांचें ह्मणणें मला प्रमाणतम वाटल्यामुळें, अस्मन्मतीयांचें नाहीं तथापि तुझ्या अथवा मी आपल्या समाधानार्थ घेतलें आहे; आणि असें एतद्ग्रंथरूपबिंदुमूलभूत श्रीमद्भागवतरूपसिंधूत वचनरत्न आहे.

॥ श्लोक ॥

'तमेव परमात्मानं जारबुद्ध्यापि संगताः ॥
जहुर्गुणमयं देहं सद्यः प्रक्षीणबंधनाः ॥

( श्रीमद्भागवत स्कंध १० अ० २९ )

अर्थः— गोपिका जारबुद्धीनेंही त्या परमात्म्याशीं समागम पावल्यामुळें त्यांचीं सर्व बंधनें तत्काल क्षीण होऊन या गौण देहाचा त्याग करित्या झाल्या. तात्पर्य, श्रीकृष्ण पूर्ण आहेतच आहेत.

दुसरें, हें श्रीकृष्णस्वरूप विष्णुशिवात्मक आहे. कारण आईला जेव्हां मुखांत विश्वरूप दाखविलें, तेव्हां तें सर्व ब्रह्मांडपालनात्मक होतें, ह्मणून श्रीकृष्णरूप विष्ण्वात्मक झालें; आणि अर्जुनाला जेव्हां विश्वरूप दाखविलें तेव्हां तें संहाररूप भयंकर कालरुद्रात्मक होतें, ह्मणून हें श्रीकृष्णरूप शिवात्मकही आहे. अर्जुन जसा विश्वरूपाला पाहून भ्याला, तसी यशोदा भ्याली नाहीं ह्मणून यशोदेला दाखविलेलें पालनरूप व अर्जुनाला दाखविलेलें संहाररूप सिद्ध झालें. आणि विष्णुशिवाचें मूल जें एकत्व ह्मणजे मूलसत्व, जें 'एकं सत्वं द्विधाकृतं' या वचनामध्यें सांगितलें, तें कारणब्रह्मच होय. ह्मणून श्रीकृष्ण हा कारणब्रह्मरूप पूर्ण अवतार आहे हें सिद्ध झालें, आणि 'संभवाम्यात्ममायया' ही जाग्रच्छ्रुतिही असेंच ह्मणते.।

॥ ओव्या ॥

एवं भगवदवतारचरित । जें अतिगुह्य श्रुतिख्यात । जो पठन चिंतन सायंप्रात । यत्नें करी तो ब्रह्म होय ॥ ८० ॥ सायंकाळीं चिंतन पठन । तेणें मध्यसंवेगें मन । रात्रौ भगवदाकार स्वप्न । सहज होय ॥ ८१ ॥ प्रातःकाळीं पठन मनन । तेणें दिवसभर होय स्मरण । एवं दिवारात्र मिळोन । जागृतीं स्वप्नीं श्रीरंगू ॥ ८२ ॥

अथवा प्रात:कालीं शिवदर्शन । तेणें यामिनीपाप जाय जळून । माध्यान्हकाळीं शिवदर्शन । तेणें आजन्मींचे दोष जळती ॥ ८३ ॥ सायंकाळीं शिव पाहती । तरी सप्तजन्म पापोपहती । आणि सप्तत्वोपलक्षणकृती । पापें नाशिती अनंत जन्मींचीं ॥ ८४ ॥ माधव आणि उमाधव । येथ सर्वथा नोहे भिन्न भाव । यास्तव शिवदर्शनें जो फलसंभव । तो नारायणचरितें मिळे ॥ ८५ ॥ ह्मणूनि सांयप्रात:काळ । हें चरित्र वर्णितां केंवळ । तरि ब्रह्माचि फळ । हातां चढे ॥ ८६ ॥ येथ कोणी बोलती । कीं जीवब्रह्मऐक्य म्हणजे मुक्ति । जीवाची स्वभावबद्धस्थिती । ह्मणूनी ती घडेना ॥ ८७ ॥ तरी हें बोलणें सकळ । मिथ्या जाणावें केवळ । कोणत्याही पुरुषाचा प्रबळ । स्वप्न स्वभाव कदा नोहे ॥ ८८ ॥ जीवाचा स्वभाव जरी बंधन । तरि दु:खनिर्वृत्तिइच्छा नसावी दारुण । ती तंव होत असे म्हणोन । बंधनस्वभाव नाहीं जीवा ॥ ८९ ॥ आणि स्वभावनाशे वस्तुनाशू । ह्मणोनि न संभवे उपदेशू । यालागीं जीवाचा बंधनविलासू । औपाधिक ॥ ९० ॥ तरी मग कैसें जीवा बंधन । तेंही ऐका श्रोते सज्जन । जीव स्वत: ब्रह्म असोन । बंधन होय देहद्वयें ॥९१॥ परी तीं दोन्ही देहें । अविद्याकल्पित पाहे । आणि अविद्या तंव लवलाहे । भगवदाश्रित ॥ ९२ ॥

॥ गद्य ॥

**प्रश्न**:— भगवन्, परमेश्वराचेठायीं कालत्रयींही अविद्याक्लेशाचा संबंध नाहीं असें लिंगपुराणांत सांगितलें आहे, आणि आपण तर अविद्या परमेश्वराधीन आहे असें म्हणतां, हें कसें ?

**उत्तर**:— तुला माझ्या ह्मणण्याचा अर्थ समजला नाहीं, आणि प्रमाण देऊन भलतीच बडबड चालविली आहेस. अरे ! लिंगपुराणांत जो परमेश्वराचेठायीं कालत्रयीं असंबंध सांगितला, तो परमेश्वरदृष्टीनें बरोबर आहे. परंतु आह्मीं जी परमेश्वराच्या आश्रित अविद्या म्हटली ती जीवाच्या भेददृष्टीमुळें, दुसरें कांहीं नाहीं. रज्जूवर जो भ्रांतीनें सर्प दिसतो, तो रज्जूच्या ठिकाणीं तिन्ही कालीं नसतो. परंतु सर्प पाहणाऱ्याला तरी त्याची भेददृष्टी असल्यामुळें तो रज्जूवरच दिसतो

कीं नाहीं ? तद्वत् जीवाच्या भेददृष्टीमुळें अविद्याही परमेश्वराचेठायींच त्याला प्रतीत होते. अतः, इला भगवन्माया म्हटलें आहे. हिच्याच योगानें बुद्धि व अहंकारानें युक्त अशीं स्थूल व सूक्ष्म शरीरें उत्पन्न होतात.

प्रश्नः— भगवन्, हें मला चांगलें समजलें; तथापि एखादा दृष्टांत देऊन पुन्हा चांगलें स्पष्ट केलें असतां दृढ होईलसें वाटतें.

उत्तरः—ऐक तर. ज्याप्रमाणें वायुच्या आश्रयानें असणारा मेघाचा ओघ आकाशाचें ठिकाणीं आहे असें मूढ लोक समजतात, किंवा पृथ्वीचे कण वायुचें ठिकाणीं आहेत असें समजतात, तसेंच तूं सिद्धांताविषयीं समज.

प्रश्नः— महाराज, हें माझ्या ध्यानांत नीट आलें नाहीं.

उत्तरः— अरे! मेघाचा ओघ हा आकाशाच्या आश्रित असता तर तो इकडून तिकडे गेला नसता. कारण आकाश कांहीं गतिमत् नाहीं, आणि त्याला दुसऱ्या पदार्थाला गती देण्याची शक्तीही नाहीं. म्हणून तो वाय्वाश्रितच आहे. परंतु आकाशाच्या एका भागांत उभा राहिलेला मनुष्य पुरोवर्त्यवाच्छिन्नाकाशाचेठायीं मेघौघाचा आरोप करतो, तद्वत् [ दुसरें उदाहरण (पृथ्वीकण) स्पष्ट आहे.] द्रष्टयाचें ठिकाणीं विश्व सत्वरूपानें झालें असतें, तर सुषुप्तिमूर्च्छासमाधिआदिस्थानीं त्याचा बाध झाला नसता, व ज्ञानानेंही बाध झाला नसता. ‘ अविद्याबंधन साच असतें । तरी ज्ञानाचे बापेंही न तुटतें ॥ ’ असें सत्पुरुषवचनही आहे. तो बाध तर होतो, असा तत्वज्ञानियांचा अनुभव आहे. म्हणून चैतन्यावर अनादि अविद्येनें कल्पित एकदेशी मूढ होत्सात्या जीवांनीं परमेश्वराला आपल्याहून भिन्न मानून पुरोवर्ती चेतनाचेठायीं स्वभ्रमज दृश्य आरोपित केलें आहे.

प्रश्नः—भगवन्, हें स्थूल विश्व ब्रम्हाचेठायीं मूढांनीं आरोपित केलें आहे हें मला कळलें.

उत्तरः— बरें मग, पुढें लिंगशरीराविषयीं ह्मणतोस कीं काय ? पण तेंही आरोपितच आहे.

**प्रश्नः**— महाराज, तें लिंगशरीर कसें आहे ?

**उत्तरः**— अरे ! तें हातपायादि अवयव ज्या गुणांच्या पंचीकृत भूतांचा परिणाम आहेत, त्या गुणांनींच अपंचीकृत अशा भूतांकडून रचलें गेलेलें आहे. म्हणूनच हातपायादिविशेषआकाररहित असें तें लिंग शरीर आहे. हें स्थूलशरीरादिकांसारखें दृश्य नाहीं, व इंद्रादिकांसारखें आनुश्रविकही नाहीं. ह्मणून याला अव्यक्त ह्मणतात.

**प्रश्नः**— तर, याविषयीं कांहीं प्रमाण नसल्यामुळें नाहींच ह्मणवयाचें काय ?

**उत्तरः**— हीं दोन प्रमाणें नसल्यामुळें आणखी कोणतींच प्रमाणें ह्याविषयीं नाहींत असें ह्मणणें चांगलें नव्हे. ह्याविषयीं अर्थापत्ति प्रमाण प्रसिद्ध आहे. जीवाला कोणी तरी उपाधि पाहिजे. तें लिंगशरीर होय.

**प्रश्नः**— महाराज ! जीवाची उपाधि नुसतें स्थूलशरीर होऊं शकणार नाहीं काय ?

**उत्तरः**— कां ? होऊं शकेल. पण प्रत्येक मनुष्य मरण पावला ह्मणजे मुक्त होतो असें मानावें लागेल, किंवा आत्मा नाहीं असा नास्तिकवाद तरी स्वीकारावा लागेल. कारण स्थूलशरीराचा पुनर्जन्म होत नाहीं हें आपल्यास स्पष्ट दिसतें, आणि कारणावांचून जन्मादिक मानले तर अकृताभ्यागमकृतप्रणाशादिदोष येतात. ह्मणून पुनः शरीर धारण करणें, इत्यादिक कार्यावरून लिंगशरीररूप उपाधीचें अनुमान होतें.

**प्रश्नः**— पण, लिंगशरीराच्या पूर्वी जीवाची सिद्धी नसल्यामुळें तें आरोपित कोणीं परमेश्वरानें केलें आहे काय ?

**उत्तरः**— अरे! तूं भलतेंच विचारतोस. जीव, ईश्वर, ब्रह्म, जीवेश्वरांचा भेद, अविद्या व तिचा जीवेश्वराशीं संबंध, हे सहा पदार्थ आमचे अनादी आहेत.

**प्रश्नः**—मग आपल्या आरोपित म्हणण्याचा अर्थ तरी काय ?

**उत्तरः**— आमच्या आरोपित ह्मणण्याचा अर्थ अपवादानें शुद्ध चैतन्यावांचून पांच पदार्थांचाच बाध होणें असा आहे. जसा रज्जूच्या

ज्ञानानें सर्पाचा बाध झाला म्हणजे तो खोटा आहे असें समजतो, त्या-प्रमाणें तत्वज्ञानानें हें स्थूल सूक्ष्म खोटें आहे असें कळतें; म्हणून तें अज्ञानीयाचे दृष्टीनेंच मात्र खरें आहे. परंतु तेथें हा विशेष आहे:— जसें स्वप्नांतील स्थूलशरीरांतील पदार्थ रोज निरनिराळे होतात, परन्तु तदुत्पादक मन एकच असतें, तद्वत्, मन:कल्पित व्यक्त स्थूलशरीरादि विश्व नित्य वासनानुसार निरनिराळें होत असतें; म्हणून ह्याला असत् म्हणतात. परंतु मरणानंतरही राहणारें पुनर्जन्मादि कार्यानुमेय अव्यक्त लिंगशरीर यावदविद्या तिष्ठत असल्यामुळें स्थूल विश्वापेक्षां तें सत्य आहे. तरी पण ब्रह्मासारखें त्रिकालाबाध्य नाहीं ह्मणून त्याची सत्यता गौण समजावी. हीं दोन्ही स्थूल सूक्ष्म रूपें अविद्येनेंच ब्रह्माधिष्ठानावर भासत असल्यामुळें श्रवणमनननिदिध्यासजन्य ज्ञानानें यांचा बाध झाल्यावर स्वसंवेद्य असा ब्रह्मसाक्षात्कार होतो.

प्रश्न:— पण ब्रह्माचाही बाध होतो कीं नाहीं ?

उत्तर:— गड्या! भलतीच बडबड करूं नकोस. तुला असें बोला-वयाचें असेल तर आपल्या घरीं चालता हो. अरे! अधिष्ठानानें भ्रमाचा बाध जसा होतो, तसा अधिष्ठानाचा बाध होतो, हें तुला तरी ठाऊक आहे काय?

शिष्य:— महाराज! नाहीं.

गुरु:—अधिष्ठानाचा बाध मानला तर त्या अधिष्ठानाला भ्रम मानावा लागेल, आणि मग त्याचा दुसऱ्या अधिष्ठानानें बाध करावा लागेल. अशी अधिष्ठानाची परंपरा मानल्यास अनवस्था येते. ह्मणून एक ब्रह्मच अधिष्ठान मानणें बरें. ह्या युक्तीनें जसें तुला पटलें तसें अनुभवानेंही पटण्यासारखें आहे. जागृत्स्वप्नप्रपंचाचा परस्पर बाध व सुषुप्तीमध्यें दोन्ही प्रपंचाचा बाध, आणि पुन: जागृत्स्वप्नामध्यें सुषु-प्तिचा बाध, हे अवस्थात्रयग्रहण ज्या ज्ञानानें कळतें त्याचा कोणत्याच अवस्थेंत बाध होत नाहीं. म्हणून तें ज्ञानच आत्मा आहे. शास्त्रामध्यें सत्यज्ञानानंतानंद हें ब्रह्माचें स्वरूप सांगितलें असल्यामुळें तिन्ही अव-स्थेंत बाध न होणारा असा सत्यज्ञानरुप आत्मा ब्रह्मरूपच आहे. आणि परमप्रेमास्पदत्वास्तव त्याची आनंदरूपता सिद्ध आहे.

प्रश्न:– भगवन् ! ब्रह्माचें ठिकाणीं वृत्तिव्याप्तिस्वीकार आहे. आणि वृत्ति तर अविद्याजन्य आहे. असें असतां ब्रह्मसाक्षात्कार कसा होतो ?

उत्तर:– अरे ! ज्याप्रमाणें विष हें वैद्याचे हातीं गेल्यावर मारक न होतां उलटें साधकच होतें, त्याप्रमाणें ईश्वरानुग्रह व गुरुशास्त्रें यांच्या योगानें ही सत्वनिष्ठ भगवन्माया संसारीचिदाभासरूपफल-चैतन्यावश्यकतारहित ब्रह्माकारवृत्तिरूपविद्यात्वानें परिणाम पावली असतां, स्वकार्य अविद्येचा नाश करून ब्रह्मसाक्षात्कार करून दिल्यावर काष्ठें जाळून अग्नी जसा शमतो, तद्वत् ही विद्या शांतीतें पावते. ह्या दशेला जीवन्मुक्ति ह्मणतात; आणि ही बाधितानुवृत्तिही जेव्हां प्रारब्ध क्षीण झाल्यावर नाश पावते, तेव्हां ह्याच दशेला विदेहमुक्ति ह्मणतात. पण हे बंधमोक्ष अध्यारोपापवादानें सिद्ध असल्यामुळें रज्जुस्थ-त्रिकालसर्पाभाववत् ब्रह्माचेठायीं कालत्रयींही नाहींत. एवं ब्रह्मरूप असूनही विवर्तरूपानें जसें जीवाचे जन्मादिक होतात, तसेंच अकर्ता अजन्मा अशा परमेश्वराचेही प्रतिबिंबापेक्षिकबिंबत्ववत् अनध्यस्त विवर्तरूपानें जन्मादिक होतात; परंतु यथा प्रतिबिंबाचे चांचल्यादिक धर्म आपेक्षिक असलेल्या बिंबावर घडत नाहींत, तद्वत् अनध्यस्तत्वा-मुळें जीवाप्रमाणें सुखदु:खादि आपेक्षितविवर्त अशा परमेश्वरावरही घडत नसून त्याचें अंतर्यामित्वही भंगत नाहीं. ह्मणून ' जन्मकर्म च मे दिव्यं ' या भगवद्वाक्याप्रमाणें परमेश्वराचीं जन्मकर्में वेदगुह्य असल्यामुळें, ह्मणजे ' त्वं जातो भवसि विश्वतो मुख: ' ॥ श्रुत्यर्थ:-- ' त्वं विश्वतो मुख: सन् जातो भवसि जात: अजोऽपि जात इव भासीत्यर्थ: '। या श्रुतींत गूढ रूपानें सांगितलेलीं परमेश्वराचीं जन्मकर्में सर्वज्ञ सत्पुरुष स्पष्ट रीतिनें जीवन्मुक्तिरक्षणार्थ जगत्कल्याणार्थ वर्णन करित असतात.

प्रश्न:-- भगवन् ! अशा स्थितींत ईश्वराचें स्वातंत्र्य कसें राहतें ?

उत्तर:-- तात ह्मणतात- 'ऐका' यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य' । हें साही गुणवर्य । वसती जेथ' ॥ असा हा परमात्मा षड्गुणांचा अधिपती असल्यामुळें त्याची लीलाही व्यर्थ न जाणारी अशी

आहे. ह्मणजे बाळांचा खेळ जसा व्यर्थ जात असतो, तशी परमात्म्याची लीला व्यर्थ जात नसून, सद्गुणी राजाची क्रीडा जशी प्रजेच्या हिताला कारण होते, तशी ह्या प्रभूची लीलाही जगत्कल्याणालाच हेतु होते. याला जगावर अनुग्रह करण्याला कष्ट पडत नाहींत, ह्मणून अमोघलील ह्मणतात.

प्रश्नः-- तर मग सृष्ट्यादिकांनीं हा बद्ध होतो कीं नाहीं ?

उत्तरः-- नाहीं. ते सृष्ट्यादिक जीवकल्पित असल्यामुळें त्यांनां परमेश्वराचा आधार असला म्हणजे पुरे. त्याच्या योगानें परमात्मा संगी होण्याची अवश्यकता नाहीं.

प्रश्नः-- असें आहे तर अनध्यस्तविवर्त्त तरी कसा होतो ?

उत्तरः-- सुवर्णालंकाराप्रमाणें तेथें भक्तांची आवडीच निमित्त आहे. तथापि भगवच्छरीरोपादान ब्रह्म अनुपसंहारी असल्यामुळें ब्रह्मज्ञानानें भगवच्छरीर निवृत्ति अपेक्षित नाहीं. ह्या प्रभूला कर्ता, हर्ता, पाळिता हीं विशेषणें जीव विकल्पित आहेत. तात ह्मणतात- 'तो सृजी पाळी संहारी । ऐसें बोलती जे चराचरीं । तें अज्ञान गा अवधारीं पंडुकुमरा ' ॥ आणखी 'कर्ता ऐसें ह्मणिपे । तरी कवणें कर्मी न शिंपे । जे हातपावो न लिंपे । उदास वृत्तीच्या ' । योग निद्रा तरी न मोडे । अकर्त्ते पणा सलु न घडे । परी महाभूतांचे दळवाडे । उभारी भले , ॥ हा परमात्मा सर्वांच्या अंतर्यामीं असल्यामुळें त्याला पहावयाला दूर जावें लागत नाहीं. केवळ प्रेमभक्ति असली ह्मणजे प्राप्त होतो. जसा अज्ञानी पुरुष बहुरुप्याची कृती जाणत नाहीं, तसा परमेश्वराची भक्ति न करणारा कुत्सित बुद्धीचा कोणीही प्राणी आपल्या इच्छेनें, चतुर्भुजादिरूपें व वेदवचनांनीं प्रणववासुदेवादि नामें विस्तृत करणाऱ्या प्रभूच्या सृष्ट्यादि लीला तर्कानें जाणत नाहीं. परंतु भगवद्भक्त ह्याच्या सृष्ट्यादि लीला बहुरुप्याप्रमाणें आहेत, असें जाणून सृष्ट्यादींचेठायीं कामना न ठेवितां अनुपसंहारी जें या प्रभूचें रूप तें सत्य आणि अमोघलील असल्यामुळें तेथेंच प्रेम ठेवितात.

प्रश्नः-- महाराज ! भक्ताला तरी हें कसें समजतें ?

उत्तरः-- ऐक. जागृतींत जरें मनांत किती शक्ति आहे हें

समजत नाहीं, परंतु स्वप्नांत पदार्थ प्रगट झाले ह्मणजे मनाची निर्माण शक्ति समजेत कीं नाहीं ? श्रुती ह्मणते, ह्मास्वप्नांत आत्मा स्वयंजोती असतो; आणि त्याचीच स्वाप्नांत निर्माण शक्ति आहे. ह्याप्रमाणें मिश्र सत्ववृत्ति असूनही जीवाला मध्यसंवेगानेंच जर आपली अचाट शक्ति प्रगटकरितां येते, तर जीवाचें मूल स्वरूप जो परमात्मा त्याचेठायीं शुद्धसत्वात्मकवृत्तीचा तीव्रसंवेग केल्यानें भगवद्भक्तांनां त्याच्या लीला कांहींच समजूं नयेत हें ह्मणणे कसें शोभतें ? ह्मणून निष्काम आणि निष्कपट होऊन प्रेमानें तें रमारमणचरणमधुपान करणेंच आत्यंतिक श्रेयस्कर आहे.

॥ ओवी ॥

'एथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें भज भजले । तया ऐलीच थडी सरलें । मायाजळ , ॥ ( तात. )

॥ दोहा ॥

इतिविध तातसुवचन सदा बाजत वेणु समान ।
श्रवण करुनि मति गोपिका धावति गत मदमान ॥

॥ पद ॥

जन्मूनी तो धन्य धन्य धन्य जाहला । वासुदेवचरणतीर्थ सलिलीं नाहला ॥ धृ० ॥ धन्य कूल तदीय धन्य जनकमाउली । वृत्ति ज्याचि अविकल रत कृष्णपाउलीं । जन्मुनी ॥ १ ॥ पाउनि जे चरण पुन्हा संसृती नये । अभजकजन नेणति जे साधुनिंही नये ( तर्क ) जन्मुनी ० ॥ २ ॥ लोकिं लोकनाथ पाहीं भेद सांडुनी । लोक लावीं भगवत्पथीं भजन मांडुनी । जन्मुनी० ॥ ३ ॥ तोचि देव त्या सच्चिदनंत फावलें । यद्‌भृदयीं अलकावतीकांतपाउलें ॥ जन्मुनी० ॥ ४ ॥ ९३ ॥

॥ अभंग ॥

त्याची श्रीहरीचें चरित्र ज्या स्थानीं । वरिष्ठ पुराणीं गणिलें जें ॥
वेदतुल्य ज्याचें प्रामाण्य प्रबळ । वरी घननीळ गाईलासे ॥ २ ॥
किंबहुना वेद भारतादिकांचें । सारमयसाचें अमृत हें ॥ ३ ॥
सत्यवतीसूतें शुका निजसूता । जगत्कल्याणार्थी पढविलें ॥ ४ ॥
त्यांनीं गंगातीरीं ही निगम माळा । परीक्षिन्नृपाला लेवविली ॥ ५ ॥

सौरभाच्या लोभें मीही गेलो तेथें । ऐकिलें विख्यात शुकमुखें ॥ ६ ॥
तेचि तुह्मीं सुज्ञ ऐका सविस्तर । हेंचि शार्ङ्गधर कलीमाजीं ॥ ७ ॥
ज्ञानेश्वरकृपें तें झाले मऱ्हाटें । वृत्तिभक्तिवाटे लावावया ॥ ८ ॥ ९४ ॥

॥ ओवी ॥

तें तृतीय सखीप्रेषण । आलंदीवल्लभचरणीं अर्पुन । चतुरक्षरी मंत्र जपून । भवनिर्दलन सहज करूं ॥ ९५ ॥

हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे सूतदत्तोत्तरं नाम तृतीयसखीप्रेषणम् ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ४ थें.

॥ दोहा ॥

अलकावतिपतिचरणरज आणि गोपिपतिपाय ॥
वंदुनि प्रेमें सचिन्हकें वाहु वचन मन काय ॥ १ ॥ वृंदपति० ॥

॥ चौपाई ॥

वासविसूनु वदती या परिचे । सौतिवचन जे सुजनास रुचे ॥
ते परिसुनि मुनिमाजि पुढारी । बहुहृच शौनक वचन उच्चरी ॥ २ ॥

॥ ओवी ॥

भो भो सूत भाग्यवंता । भो भो पंडित चतुर वक्ता । आह्मां सांगे भगवद्वार्ता । जे शुकें परीक्षिता बोलिली ॥ ३ ॥

॥ चौपाई ॥

भारत रचक व्यासचिवृत्ति । इकडे किंकृत तदीय प्रवृती ।
तत्सुत शुकहि परम विरागी । विगतमाय जो ब्रह्म विभागी ॥ ४ ॥

व्यास कधींहि विकल्प न लागे । पूर्ण परि जनीं अबुध सम वागे । ४

॥ ओव्या ॥

ज्याची समबुद्धी केवढी । जो पळत असतां लवडसवडी । पाठीं भेटीचे गोडी । धांवला व्यासू ॥ ५ ॥

॥ चूर्णिका ॥

तो धांवत असतां शुकमुनी । जळीं नग्न होत्या देवकामिनी । त्या वस्त्र न घेवोनी । प्रेमें शुकातें वंदिती मनीं । तंव व्यास आले मागुनी । तंव वस्त्र घेती कामिनी । व्यास पुसें तिया लागुनी । कां वस्त्र घेतले मज निरखुनी । तंव त्या उत्तर देती भामिनी । तुह्मासी दिसे स्त्रीपुरुष अज्ञुनी । तुमचा सुत परमहंस मुनी । जयातें मनीं भेद न दिसे ह्मणोनी । तदा आह्मी निःशंक कामिनी । आतां तुम्हातें पाहुनी सवस्त्रा जाहलो ॥ ६

गद्य

याप्रमाणें तो भगवान् शुकाचार्य कुरु जांगल देश फिरत फिरत तसाच जडमूकवत हस्तिनापुरांत संचार करीत असतांनां लोकांनीं त्यांनां कसें ओळखलें ?

॥ अभंग ॥

याहिवरी पुनः शुक परीक्षिता । समागम सूता झाला कैसा ॥
कैसा तो संवाद झाला अघटीत । जेथ ही सात्वत[१] श्रुती स्पष्ट ॥ २ ॥
श्रुति म्हटल्यानें वेद भागवत । पुरुषरचित न म्हणावे ॥ ३ ॥
आणि सांगावया लागे बहुकाळ । राहिला तोंवेळ शुक कवी ॥ ४ ॥
गोदोहनमात्र गृहस्थांचें घरीं । जाऊनिया करी पवित्रता ॥ ५ ॥
नाहीं भिक्षाचाड आवडी काह्यांची । तीर्थरूप साची करी स्थानें ॥ ६ ॥
घर गंगेसमपडतांचि धूळ । पवित्र तात्काळ होती सर्व ॥ ७ ॥
संताचि देताती तीर्थां तीर्थपण । याविषीं प्रमाण भक्तिसूत्र ॥ ८ ॥
ऐसे असूनिया भागवत कैसे । सांगितलें असे प्रश्न हा कीं ॥ ९ ॥
कृपा करूनी दे यथार्थ उत्तर । जेणें ज्ञानेश्वर मिळतील ॥ १० ॥

---

१ यत्रैषा सात्वती श्रुतिः । असें मूळांत वचन आहे त्याच्या स्पष्टीकरणार्थ हें वाक्य आहे.

॥ ओव्या ॥

आणि तो अभिमन्यूचा सुतू । महाराज परीक्षितू । सुजन महाभागवतू । ह्मणती जया ॥ ८ ॥ त्या परात्म्याचिया जन्मकर्मा । सूता विवरुनी सांग आह्मां । जो पंडुवंशकीर्ति परमा । वाढविता ॥ ९ ॥ तो महाराज प्रतापदिनकरू । जयातें धनकोश अर्पुनी शत्रू । जयाच्या आसना नमस्कारू । करिती प्रेमें ॥ १० ॥ वरी वयानें अतितरुण । धर्मात्मा आणि राज्यसंपन्न । जयाच्या योगें प्रजाजन । संतुष्ट सदा ॥ ११ ॥ आणि सज्जनांचें जीवित । आपल्यासाठीं नसते किंचित् । केवळ लोक कल्याणार्थ । वाचती ते ॥ १२ ॥ ऐसे असोनी सलक्ष्मी सप्राण । त्यागावयाची इच्छा धरुन । गंगेवरी बैसला येऊन । काय कारण निरूपी ॥ १३ ॥ सज्जनांचे जें जें धन । ते ते पराचेचि जीवन । यास्तव जरी विरक्त अर्जुनजजनन । तरी पराश्रय तनु कां त्यागिली ॥ १४ ॥ ज्यानें सहज परोपकार होत । ते त्यजणे सुजना अनुचित एवं हे प्रश्न समस्त । उत्तरे देऊनी परिहरी ॥ १५ ॥ तूं विप्र नृप वा वैश्य न होसी । ह्मणोनि वेदाधिकार नसो तुजसी । परी पुराणद्वारा वेदार्थासी । जाणसी सकळा ॥ १६ ॥ पुराणेतिहासे वेदोपबृंहण । ते न होय अवेदेकरून । एवं तत्वसंदर्भी वचन । सनातन नंदन बोलिला ॥ १७ ॥ इतिहास पुराण पंचम वेद । येथ छांदोग्यश्रुति प्रमाण प्रसिद्ध । पुराण भारत पंचम वेद । स्मृति हि ह्मणे ॥ १८ ॥ यादृष्टी तूं वैदिक पवित्र । आह्मां सांगावया पात्र । ह्मणूनि ब्रम्हासन दिधलें पवित्र । वरी वर संकर्षणाचा ॥ १९ ॥

॥ गद्य ॥

सूत ह्मणाला, हे शौनका ब्रह्मदेवाच्या दिवसांत कृत त्रेत द्वापार आणि कलि ही चार युगें फिरतां फिरतां तिसऱ्या वेळीं द्वापार युग प्राप्त झालें तेव्हां नारायणाच्या अंशानें पाराशर ऋषीपासून वासवीच्या ह्मणजे सत्यवतीच्या ठिकाणीं तपस्वी ज्ञानसंपन्न व योगी व्यास भगवंताचा अवतार झाला.

॥ चूर्णिका ॥

तो अतीतानागतज्ञाता । सरस्वतीजळीं स्नानादिक्रिया सम-

स्ता । सारुनी बदरिकाश्रमी चित्तैकाग्रता । करावया बैसला असतां । अगोचर वेगवान् जनकृतिप्रेरित कालेंकरून । जन बुद्धिशक्तिविपन्न । धर्मश्रद्धादिकेंकरूनी हीन । हे अमोघ दिव्य दृष्टीनें पाहून । चातुर्होत्रयज्ञादिक चालावे ह्मणून । एकाचि वेदातें ऋग्यजु साम अथर्व या नामें चतुर्धा विभागून । आणि पांचवा वेद इतिहास पुराण । स्वशिष्यातें पढविता झाला ॥ त्यांत पैलानें ऋग्वेद संपूर्ण । जैमिनीनें सामगायन । यजुर्वेदीं निष्णात वैशंपायन । अथर्व शिकला सुमंतू दारुण । आणि माझा पिता रोमहर्षण । तो शिकला इतिहास पुराण । पुढें या शिष्यांनीं वेदातें अनेकधा विभागून । परंपरागत शाखीपण चालविलें २०

॥ गद्य ॥

पूर्वी बुद्धिमंत ज्याप्रमाणें वेदधारण करित होते, तथा श्रीव्यासें वेद विभागिला.

॥ चूर्णिका ॥

स्त्रिया शूद्र आणि पतित त्रिवर्ण । यांनीं वेद न करावे श्रवण । ऐसिया निषेधास्तव तोचि अर्थ संपूर्ण । अत्यंत कृपावंत होऊन । स्त्रीशूद्रादि स्वस्वधर्म जाणून । येथचि साधोत मोक्षादिकल्याण । ऐसा कृपाआशिर्वाद देऊन । महाभारताख्यान रचियेलें ॥ २१ ॥

॥ गद्य ॥

या भारतादि इतिहासपुराणाचें शूद्रांनीं श्रवणच करावें पठन करूं नये. कारण 'श्रोतव्यमेवशूद्रेणनाध्येतव्यंकदाचन' शूद्रांनीं पुराणादिक ऐकावेत, पठण करूं नयेत, असा भविष्यपुराणांत कंठरवानें निषेध दाखविला आहे. श्रीमच्छंकराचार्यांनीं विष्णुसहस्रनामभाष्यांत पठनाच्या अधिकाराचा निषेध केला आहे, " नजपयज्ञेन " या वाक्यानें पुराणोक्त मंत्रपाठ शूद्राला विहीत नाहीं असें सांगितलें आहे. हा एक पक्ष झाला; दुसरा पक्ष असा आहे कीं, स्कंधपुराणांतील ब्रह्मोत्तरखंडांत मुमुक्षु स्त्री व शूद्र यांनीं शिवपंचाक्षरीमंत्र जपावा असें कंठरवानें सांगितलें असल्यामुळें पुराणोक्त मंत्रजपाचा शुद्रांना अधिकार आहे हें सिद्ध होते. "नियतंसर्ववर्णानाम्" या महाभारताच्या श्लोकांत सर्व

वर्णाला जें जप्य तें गायत्री शब्दानें बोलिलें जातें असें ह्मटलें आहे. या श्लोकाची टीका करताना चतुर्धरांनीं सर्व वर्ण ह्मणजे ब्राह्मणादि म्लेच्छांत असा अर्थ केला आहे. यावरून सर्वांना आपापल्या जपाचें गायत्रीतुल्य फळ होत असल्यामुळें दैवी संपदा उत्पन्न झाली असतां पुराणादिजन्य ब्रह्मज्ञानाविषयीं स्त्रीशूद्रांना अधिकार सिद्ध होतो. अपशूद्राधिकरणाच्या उपसंहारभाष्यांत ‘ इतिहासपुराणाधिगमेचातुर्वर्ण्याधिकारस्मरणात्’ असें श्रीमदाचार्यांनींही अनुमोदन दिलें आहे. याच अधिकरणाच्या उपसंहारभाष्यांत पुराणांचें अध्ययन करून शूद्रानें ब्रह्मज्ञान करून घ्यावें असें स्वीकारतां येणें शक्य आहे, असें विज्ञानभिक्षूनें ह्मटलें आहे. आणि ‘ शूद्रःसुखमवाप्नुयात् ’ ह्या विष्णुसहस्रनामांतील वाक्याच्या टीकेंत शूद्राला विष्णुसहस्रनामाच्या जपाचा अधिकार चतुर्धरांनीं सांगितला आहे. न्यायरक्षामणींत पौराणिक शिवविष्णूपासनेला शूद्रांना अधिकार आहे असें अपय्यादीक्षित ह्मणतात. तद्वत् सर्व वर्णांना गोपालमंत्र इच्छितफलदाता आहे, याप्रमाणें पंचरात्रांत नारदाचार्यांनीं सांगितलें असून सर्व तांत्रिक मंत्रांचा शूद्राला अधिकार ब्रह्मविद्याभरणांत अद्वैतानंदानें सांगितला आहे. शिवाय पौराणिक मंत्र श्राद्धादिकालीं शूद्रांनीं ह्मणावेत अशीं अनेक वचनें शूद्रकमलाकरांत घेतलीं आहेत. तेथेंच शूद्रांना कांहीं संस्कारहि सांगितले असून धर्मसिंधूत अमंत्रपूर्वक उपनयनही सांगितलें आहे. आणखी ‘ येरां स्तोत्रका नाममंत्र’ । असें तातांनीं ह्मटलें असून ‘हरिःॐ तत्सदिति’ या अभंगांत तुकारामानें प्रणवाचा उच्चारही केला आहे. सारांश, या एकंदर विवेचनावरून शूद्राला पुराणभारतादी पठन करण्याचा अधिकार आहे. ‘शूद्रमपिकुलगुणसंपन्नंमंत्रवर्ज्यमनुपनीतंध्यापयेत’ असें सुश्रुत संहितेच्या दुसऱ्या अध्यायांत आर्षवचनहि आहे, असें या दुसऱ्या पक्षाचें म्हणणें आहे. भविष्यपुराणादिस्थानीयनिषेध सर्वथा पुराणपठनाविषयींचा किंवा पौराणिकमंत्रभिन्नपुराणपठनाविषयींचा आहे असें प्रथमपक्षी ह्मणतात; आणि तो निषेध असच्छूद्रपर आहे, असें द्वितीयपक्षी ह्मणतात. याप्रमाणें हा विषय मूळ व्यासाचा नसून मी येथें आनुषंगिक निरूपिला आहे, ह्मणून ह्यांतील प्रमाद असल्यास ते माझेच समजावेत.

॥ ओव्या ॥

एवं जगत्कल्याणासाठीं । सर्वदां तनुमनें झटोनि शेवटीं । चित्तीं न पावोनि तुष्टी । सरस्वतीतटीं बैसले ॥ २२ ॥ बदरिकाश्रमीं एकान्ती । निजमनीं विचारिती । कीं मी रत भूतहितीं । तरी तोष चित्तीं कां न वाटे ॥ २३ ॥ मी ब्रह्मचर्यादि पाळिले व्रत । वरिष्ठांची आज्ञा पाळिली यथार्थ । महाभारतमिषें वेदार्थ । दर्शविला सकळ ॥ २४ ॥ ज्या महाभारतांतूनि । शूद्रादिजन आणि कामिनी । स्वस्वधर्म समजोनि । घेवों शकती ॥ २५ ॥ तथापि खेद वाटे मना । मी ब्रह्मज्ञानी जीवन्मुक्तराणा । असतांहि असंतुष्टपणा । मजप्रती कां ॥ २६ ॥ किंवा जें भगवंतातें प्रिय । जें परमहंसाचे बापमाय । तें पूर्ण भागवतधर्म स्वयें । न वर्णिलें ह्मणोनि काय अतुष्टी ॥ २७ ॥ ऐसा अंतरीं ब्रम्हपूर्ण । वरी सकृप आणि जगद्विास्तव खिद्यमान । उपाय चिंतित असतां द्वैपायन । तंव आश्रमीं ब्रह्मनंदन पातले ॥ २८ ॥ श्रीनारदस्वामी आले जाणूनि । सत्कारें पूजा करोनी । साष्टांग प्रणाम चरणीं । सद्भावें केला २९

॥ दोहा ॥

नारदव्याससमागमीं पुढें परम संवाद ।
श्रोते श्रवण करोत जो ऐकतांचि भवबाध ॥ ३० ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे प्रियलीलामहोत्सवे
आमंत्रणविलासे भागवतारंभकारणवर्णनं
नाम चतुर्थसखीप्रेषणम् ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ५ वें.

॥ दोहा ॥

चारु श्रीगुरुचरणनख प्रणमुनि मतिअनुसार ।
श्री पंचमसखिप्रेषणें आणवु जगदुद्धार ॥ १ ॥

॥ चौपाई ॥

सूत ह्मणे शौनकादि मुनिना । जो हरिभजनास्तव धरि वीणा ॥
तो विधिनंदन चंदनवचनें । पुसत कुशळ व्यासा मृदु रचने ॥ २ ॥

॥ दोहा ॥

भो ! भो ! पाराशर्यमुने संतुष्ट कीं मन काय ।
दिससि विचारीं मग्न तूं शोचिसि कवण उपाय ॥ ३ ॥

॥ ओवी ॥

तूं धर्मादिवेदवेत्ता । तैसा सम्यगनुष्ठाता ॥
यतस्त्वां परिपूर्णधर्मार्था । महाभारता निर्मिलें ॥ ४ ॥

॥ दोहा ॥

आणि सनातन ब्रह्म जें तें तुज महदुपलब्ध ।
तरि पण शोकीं मग्न कां दिससि जसा निर्बुद्ध ॥ ५ ॥
नारदासि तैं वदे मुनी सकल तव दयाऽशेष ।
परि पुसतो मी अतुष्ट कां वद जाणासि अविशेष ॥ ६ ॥

॥ चौपाई ॥

अजजज जाणसि प्रभु सकलाते । कवण हेतु मम मतिविकलातें ।
वरि त्वां भजनीं अजित जिंकिला । कोणि नाहिं रडका त्वदंकिला ।

॥ दोहा ॥

जो करि निजसंकल्पगुणें गुणमय जनविस्तार ।
तूंहि तन्मय होउनी कृत मृति जनि निस्तार ॥ ८ ॥

॥ ओव्या ॥

आणि सकल बुद्धीचा जाणता । चुकलिया जननीसम स्तनपानता । देउनी मार्गीं आणिता । तोचि एक ॥ ९ ॥ भवान् भवगजपंचानन । दीनजनतमा दिनकरण । यास्तव योगादि करूनी न्यून । माझें काय तें सांग आधीं ॥ १० ॥

॥ पद ॥

ऐकुनि मुनिवचन तदा ब्रह्मनंदनू । जो भवदवतप्तजनां परम चंदनू ॥ धृ० ॥ वदत कृष्णप्रीतिविना सकल निष्फल । तूंचि पाहि तप्त कसा विदित निष्कळ ॥ १ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष सकल कल्पना । यांचि आस व्यासमुने प्रभुस अल्प ना ॥ २ ॥ एक प्रेमळासचि तो अर्पि जीविता । त्यजुनि देवपणहि गोपपात्रिं जेविता ॥ ३ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष वर्णिले त्वया । जनि मृतिहर विष्णुगुणा वर्णिलें न या ॥ ४ आनुषंगिकत्व दिलें श्रीरमाधवा । केलें त्वां अकथितसम विष्णुवैभवा ॥ ५ ॥ हीच न्यूनता ह्मणोनि तोष होइना । ज्ञानेश्वरकरुणेविण शांति येइना ॥ ६ ॥ ऐकुनि मुनि वचन० ॥ ११ ॥

॥ पद ॥

नवल नवल हरिचे गुण वाटती जना । तन्मय करितातचि जे नित्य सज्जना ॥धृ० ॥ सुमन सुमन चरणनखीं जरि न वाहिलें । धर्म्यंहि तरि घेति न जे ब्राह्मिं राहिले ॥ १ ॥ हरिगुणविन मधुर काव्य न रुचतें कदा । परमहंस इच्छिति ना काकसंपदा ॥ २ ॥ ज्ञानेश्वरभजनीं जरि वृत्ति रंगती । सहज मिळे तोषद व्रजकांतसंगती ॥ ३ ॥ नवल नवल हरिचे गुण० ॥ १२ ॥

॥ आर्या ॥

यत्पदपद हरिगुणमय पवित्र तरि ती अशुद्ध ही कविता ।
तमनेता काय मळे मृगतोयानें प्रकाशमय सविता ॥ १३ ॥
यास्तव ज्या गीतीं हरिनामें ते साधु गाति ऐकविती ।
जे हरिगुण भवश्रांता सच्चित्सुखघन अखंड दाखविती ॥ १४ ॥
ब्रह्मज्ञान तथापि भक्तिविणा उपजवीच अभिमाना ।
मग कर्म केंवि उचली लाजेनें घातल्याच अधि माना ॥ १५ ॥

॥ ओवी ॥

जरी निष्काम असेल कर्म । तेथ ही कृष्णार्पणता वर्म ॥
हें नेणें जरी गर्विष्ठ अधम । तरी धर्म तो अधर्म सहजचि ॥ १६ ॥

॥ अभंग ॥

यास्तव तूं करी एकचित्त आतां । आळवि अनंता प्रेमभावें ॥ १
तुझी बुद्धी शुद्ध यथार्थदर्शनीं । पापविमर्शनी कृष्णलीला ॥ २ ॥
समाधीनें सर्व जाणूनीयां वर्णी । अक्षयाचि पर्णी चित्सुखता ॥ ३ ॥
गोविंद गुणांची सज्जना आवडी । विकारवावडी होय जेणें ॥ ४ ॥
ज्ञानेश्वरकृपें वर्णितां सद्गुण । चित्त समाधान होईल कीं ॥ ५ ॥

॥ ओवी ॥

कां आवर्ती सांपडतां नांव । तरी बुडणियाचाचि संभव ॥
वरी वायूचा चल स्वभाव । साह्य जाहला ॥ १८ ॥

॥ दोहा ॥

तेंवि उपायांतरें करी न करुनि हरिगुणगान ।
तरि चित्त न घे स्थैर्यता वाहुनि स्वजननीआण ॥ १९ ॥

॥ गद्य ॥

याप्रमाणें भगवद्यशावांचून भारताचें ठिकाणीं प्रतिपादन केलेले धर्मादि अकिंचित्कर आहेत, असेंच नाहीं तर विरुद्धही आहेत. कारण अति तुच्छ अशा काम्य कर्माला तूं धर्म ह्मणून वर्णन केलें आहेस. त्यामुळें हें काम्यकर्मच धर्मरूप आहे, असा प्राकृत जनांचा समज होऊन श्रुतिसंतादि निवारण करीत असतांही तुझ्या वाक्यावर विश्वास असल्यामुळें लोकांना तोच धर्म वाटतो; ह्मणून हा तूं अन्यायच केलास. मी जसा भारताचें ठिकाणीं प्रवृत्तिरूप धर्म सांगितला आहे, तसा मोक्षधर्म सनत्सुजातपर्व व ब्रह्मसूत्रादिकांचें ठिकाणीं कर्मत्यागरूप निवृत्तिपर धर्मही सांगितला आहे. त्याच्या योगानेंच मुमुक्षूला पूर्णता होते असें तूं ह्मणशील तर सम्यक् नाहीं. कारण या निवृत्तिमार्गानें देशकालवस्तुपरिच्छेद ज्याला नाहींत अशा अनंत परमेश्वराचें सुख जाणण्याला एखादाच समर्थ होतो. कारण 'क्लेशोऽधिकतरस्तेषां' इत्यादि श्लोकानें भगवंतानेंच तुझ्या त्या निर्गुणपर धर्मात कठिनता

सांगितली आहे. आणि ' मनुष्याणांसहस्रेषुकश्चिद्यततिसिद्धये । यततामपिसिद्धानांकश्चिन्मांवेत्तितत्वतः ' ॥ (भगवद्गीता अध्या० ७ श्लोक ३) याप्रमाणें साधनचतुष्टयसंपन्न आणि श्रुति युक्ति अनुभवाचें ठायीं अति निपुण एखादा पुरुषच मला जाणूं शकतो, असेंही भगवंतानेंच सांगितलें आहे; आणि " मांहिपार्थव्यपाश्रित्ययेऽपिस्युःपापयोनयः । स्त्रियो वैश्यास्तथाशूद्रास्तेऽपियान्तिपरांगतिम्" ॥ " किंपुनर्ब्राह्मणाःपुण्याभक्ताराजर्षयस्तथा" । " भक्तास्तेऽतीवमेप्रियाः " इत्यादि श्लोकांत बहुवचनानें माझें यश कीर्तन करणारे प्रेमळ भक्त मला सुलभ रीतीनें मिळतात, असें नवमद्वादशाध्यायांत भगवंतानेंच सांगितलें आहे. ह्मणून पोहुन जाणाऱ्या एखाद्या कष्टवानापेक्षां नौका जशी सर्वांना बसण्याला उपयोगी पडते, त्याप्रमाणें देहादिकांचें ठिकाणीं ज्यांचा अभिमान आहे अशांना व विरक्तांना पावन करणारे विमल भगवद्यश व त्याची लीला वर्णन करून सर्वांना मार्ग दाखीव. किंबहुना काम्यकर्मत्याग करून जसें परमेश्वराचें भजनच विहीत आहे, तसें नित्यनैमित्तिकादि सर्व कर्म त्यागूनही परमेश्वरभजनच करावें. परमेश्वराच्या भक्तीनें पूर्ण झाला असतां तर कांहीं चिंताच नाहीं. परंतु कर्मत्याग करून भजन करणारा पुरुष अपक्व दशेंतच मरण पावला तरी त्या कर्मत्यागदोषामुळें त्याला पतन होत नाहीं. हें ह्मणणें कर्मवाद्यांनां चांगलें वाटणार नाहीं हें खरें, परंतु त्यांनां तरी भगवद्भक्तीचा त्याग करून स्वधर्मनिष्ठेनें काय मिळतें ? दैत्य योनींत असलेला प्ऱ्हाद धर्मादिरहित अशा भगवद्भक्तीनें पूर्ण झाल्याचें उदाहरण प्रसिद्ध आहे. व तसेंच भगवद्भक्तीवांचून स्वधर्मादियुक्त नहुष, नृग, ययाति, ह्यांचें पतनही प्रसिद्ध आहे. तें ब्राह्मणशापामुळें झालें असें मात्र कोणी ह्मणूं नये. कारण ब्राह्मणशापापासूनही भक्तिनिष्ठ अंबरिषाचें रक्षण प्रभूंनीं केलें. आणि यद्यपि सनकादिकांच्या शापानें काम्य अपक्व जय विजय भक्तांना राक्षसयोनी प्राप्त झाली, तथापि स्वधर्मादिकांची अपेक्षा न करून प्रभूंनीं त्यांना आपलेंच पद दिलें. आणि पार्वतीच्या शापानें दैत्ययोनींत गेलेल्या चित्रकेतूलाही स्वपदच दिलें. यावरून देवांच्याही शापापासून परमात्मा आपल्या भक्तांनां रक्षण करितो असें दिसतें. स्वधर्मनिष्ठ

नृगाचाही श्रीकृष्णाच्याच हस्तानें उद्धार झाला. एवं स्वधर्माला भगवद्भक्तीची अपेक्षा आहे, तद्वत् भगवद्भक्तीला स्वधर्माची अपेक्षा नाहीं. आतां स्वकर्मावांचून भक्तांचें पालन करितो ह्मणून परमेश्वरावर वैषम्यादि दोष आणणारे मूढ आहेत, कारण उदार राजाकडे एखादा याचक गेला असतांनां त्या याचकाचें रक्षण करण्याला राजाला चाकरी आदिकांची अपेक्षा पाहिली पाहिजे काय? तितकें याचनच उदारापुढें त्याचें पुरें होतें. ही सामान्य उदाराविषयीं जर गोष्ट आहे, तर सर्वथा उदार परमेश्वराकडे दीन होऊन शरण आलेल्यांचें रक्षण वैषम्यादि दोषास कसें प्राप्त होईल? तथापि भक्तीला कर्मानें अडथळा येत नसला तर परमेश्वराची वेदांत आज्ञा आहे असें समजून निष्काम व भगवदर्पण बुद्धीनें तीं कर्में करावयाला प्रत्यवाय नाहीं. परंतु पूर्णता तर भगवद्भक्तीनेंच होते. याविषयीं नारदभक्तिसूत्रांत प्रमाण आहे. "त्रिसत्यस्यभक्तिरेवगरीयसीभक्तिरेवगरीयसी" ( सूत्र ८१. ) आणि तातही ह्मणतात, 'आणि मजचिमार्जीं असतां। जेणें मी तुम्हांवें पांडुसुता। तें पुण्य ऐसें ह्मणतां॥ जीभ न तुटे काई?' (ज्ञाने० अ० ९ ओवी ३१७. )

ननु, 'अष्टकादिकांच्या राजर्षींच्या कर्मप्रदानानें भक्तिअपेक्षेवांचूनच ययाती राजा स्वर्गास गेला, आणि कर्माची पितृलोकादिक फळें मिळतातच' अशी कोणी शंका करील तर पुनरावृत्ति न होणाऱ्या अखंडसुखाविषयींच जाणत्यानें यत्न केला पाहिजे, कारण विषयसुख तर देव व पशू या योनींतही सारखेंच आहे. ह्मणून जशीं दुःखें आपोआपच इच्छा न करितां येतात, तशीं सुखेंही यत्न न करितांच येतात. हा विचार करून सर्व संसार प्रारब्धावर टाकून यत्न परमार्थाविषयींच मात्र करावा. भारतांतही असेंच सांगितलें आहे.

॥ श्लोक ॥

'अप्रयत्नाऽऽगताःसेव्यागृहस्थैर्विषयाःसदा।
प्रयत्नेनोपगम्यश्चस्वधर्मइतिमेमतिः' ॥ १ ॥
( शांतिपर्वांतर्गतमोक्षधर्म अ० १२० श्लो० ३६ )

अशी व्यवस्था केली ह्मणजे प्रयत्नवादी व प्रारब्धवादी यांचा विरोध येत नाहीं. यद्यपि प्रयत्नानें संसार मिळविला तितका मिळतो, तरी परमार्थावांचून अशा अनित्य सुखार्थ यत्न करण्यांत अर्थ कोणता? दुसरें:— भगवद्भक्त नीच योनींत जरी गेला तरी त्याचा भक्तीविषयीं अधिकार नष्ट होत नाहीं. परंतु कर्मनिष्ठांची गोष्ट तशी नाहीं, ते तर याच जन्मांत कांहीं दोषामुळें पतित झाले असतां कर्माधिकारी रहात नाहींत; तर मग पुनर्जन्म मुळींच अधिकार नसणाऱ्या चांडालादि योनींत झाला असतां त्यांनां वर मान करण्याला सवड नाहीं, हें काय सांगावें लागते? सारांश, भक्तीचा अधिकार नष्ट होत नसल्यामुळें कोणत्याही योनींत गेलेला भक्त पुनः भक्तीविषयींच यत्न करून पूर्ण होतो, असें भगवंतांनींही सांगितलें आहे.

॥ श्लोक ॥

‘ यततेचततोभूयःसंसिद्धौकुरुनंदन ।
पूर्वाभ्यासेनतेनैवह्रियतेह्यवशोऽपिसः ’ ॥ १ ॥

अर्थः— हे अर्जुना, आणि पुनः मागला योग पूर्ण होण्याकरितां तो यत्न करितो. व निराळ्या परिस्थितींत असतांही पूर्वकृत अभ्यासानुसारच तो तिकडे ओढला जातो.

विष्णुपुराणांत प्रऱ्हादाचें असें वचन आहेः—

॥ श्लोक ॥

‘ नाथयोनिसहस्रेषुयेषुयेषुव्रजाम्यहम् ।
तेषुतेष्वचलाभक्तिरच्युतास्तुसदात्वयि ’ ॥ १ ॥

अर्थः— हे नाथ, ज्या ज्या अनेक सहस्रावधि योनींचें ठिकाणीं माझा जन्म होईल त्या त्या ठिकाणीं तुझी कधींही न ढळणारी अशी अखंड भक्ति मात्र मला असो.

॥ श्लोक ॥

‘ मांहिपार्थव्यपाश्रित्ययेऽपिस्युःपापयोनयः ।
स्त्रियोवैश्यास्तथाशूद्रास्तेऽपियांतिपरांगतिम् ’ ॥ १ ॥
( गी० अ० ९ श्लोक ३२ )

असें भगवंतांनींही सांगितलें आहे. या श्लोकावरील भाष्याच्या टीकेंत आनंदगिरींनींही ' भक्तिसाम्राज्येजातिनियमोनास्ति ' । असें ह्मटलें आहे. तात ह्मणतातः–

॥ ओव्या ॥

' म्हणोनि कुळ उत्तम नोहावें । जाति अंत्यजही व्हावें । वरी देहाचेंनि नांवें । पशूचेंही लाभो । ... ... ... अगा! नांवें घेतां ओखटी । जे आघवेया अधमाचिये शेवटीं । तिये पापयोनींही किरीटी जन्मले जे । ते पापयोनी मूढ । मूर्ख जैसे कां दगड । परी माझ्याठायीं दृढ । सर्वभावें ॥ ... ... ते पापयोनीही होतु कां । ते श्रुताधीत ही न होतु कां । परी मजसी तुकितां तुका । तुटी नाहीं ॥ एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें । इंद्रही सरी न लाहे उपरें । ह्मणोनी भक्ती गा येथ सरे । जाती अप्रमाण ॥ ह्मणोनी कुळ जाति वर्ण । हे आघवेंचि गा अकारण । येथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ '

॥ गद्य ॥

तात्पर्य कोणत्याही योनींत असला तरी भगवद्भक्त कर्मनिष्ठासारखा खालीं पडत नाहीं. "नास्तितेषुजातिविद्यारूपकुलधनक्रियादिभेदः " त्या भक्तजनांमध्यें जाति, कुल, विद्या, सौंदर्य, वंश, द्रव्य आणि क्रिया यांचा कोणत्याही तऱ्हेचा भेद नाहीं. याप्रमाणें भगवद्भक्ताला जशी जातीची अपेक्षा नाहीं, तसें पातित्यशास्त्रही त्याचेविषयीं लागू नाहीं. हें 'अपिचेत्सुदुराचारोभजतेमामनन्यभाक् । साधुरेवसमन्तव्यःसम्यग्व्यवसितोहिसः ' ॥ या श्लोकांत भगवंतांनींही सांगितलें आहे. परंतु त्यांत हा विशेष आहे. पतितांचा दुराचार भक्ति करितांना सुटत गेला पाहिजे. परंतु जाती कोणतीही असो, ती सुटण्याची आवश्यकता नाहीं. भगवान भक्तीनें त्याच जातींत पावन करतो. " भक्तिःपुनातिमन्निष्ठाश्वपाकानपिसंभवात् " असें भागवत स्कंध ११ अ० १४ श्लोक २१ यांत म्हटलें आहे; व,

॥ अभंग ॥

उंच नीच कांहीं नेणें भगवंत । तिष्ठे भावभक्ती देखोनीयां ॥१॥
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्याघरीं रक्षी प्रल्हादासी ॥ २ ॥

धर्मे रंगू लागे रोहिदासासंगें ।कबिराचे मागीं विणी शेले ॥ ३ ॥ सजन कसाया विकुं लागे मांस । माळी सावत्यास खुरपूं लागे ॥ ४ ॥ नरहरी सोनारा घडों फुंकूं लागे । चोखामेळ्यासंगें ढोरें ओढी ॥५॥ नामयाची जनीसवें वेंचि शेणी । धर्माघरीं पाणी वाहे हरी ॥ ६ ॥ नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानियाची भिंत आंगें ओढी ॥ ७ ॥ अर्जुनाची घोडी हाकी हा सारथी । भक्षी पोहे प्रीति सुदाम्याचें ॥ ८ ॥ गौळीयांचें घरीं गाई अंगें वळी । द्वारपाळ बळीद्वारीं झाला ॥ ९ ॥ यंकोबाचें ऋण फेडी हृषीकेशी । अंबऋषीचे सोशी गर्भवास ॥ १० ॥ मिराबाईसाठीं घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडे-वार ॥ ११ ॥ घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी मेहत्याची अंगें भरी ॥ १२ ॥ पुंडलीकासाठीं अझूनी तिष्ठत । तुका ह्मणे मात धन्य त्याची ॥ १३ ॥

॥ गद्य ॥

असें तुकाराम महाराज म्हणतात. म्हणून तूं प्रभूच्या लीला आणि त्याचें स्वरूप वर्णन कर. ( हें वरील व्याख्यान मी श्रीधरांच्या टिकेनुसार केलें आहे, तथापि प्रमाद असल्यास सत्पुरुषांनीं क्षमा करून योग्य तेवढेंच घ्यावें.) तो परमात्मा जसा अन्वयानें सर्वजगद्रूप आहे, आणि व्यतिरेकानें त्याहून निराळा आहे, तसाच जगज्जन्मस्थितिलयाला निमित्त आणि उपादानही तो परमात्माच आहे. ही गोष्ट तुला जरी ठाऊक आहे तरी मी थोडक्यांत तुला सुचविलें आहे. तूं ईश्वरावतार असल्यामुळें तुला आचार्यापेक्षा नाहीं. ह्मणून हे अमोघज्ञानसागरा ! त्या प्रभूचे पराक्रम आणि लीला तूं विस्तरपूर्वक वर्णव कर, असें मी तुला स्नेहानें ह्मणतों.

---

१ हा ग्रंथ केवळ बोधाकरितां लिहिला आहे. ऐतिहासिक-प्रीतीनें लिहिला नाहीं. आतां पूर्व कल्पांतील तुकारामाचें स्मरण करून नारदांनीं सांगितलें असें कोणी जुळवून घेईल तर त्याविषयीं मी उदा-सीन आहे.

जगत्कल्याणासाठीं मी परमात्मा अवतीर्ण झालों आहे असें जाणून जगच्छ्रेयस्कर त्या प्रभूच्या लीला व पराक्रम तूं विस्तारपूर्वक वर्णन कर, असें मी स्नेहानें ह्मणतों. कारण तपःशास्त्रश्रवणाध्ययनादिकांचें फल उत्तमश्लोकपरमात्मगुणवर्णन करणें हेंच आहे, असें ब्रह्मादि कवी ह्मणतात.

॥ ओवी ॥

एवं ही भगवत्कथा । सत्संगें कळे सर्वथा ॥
येविषयीं यथार्थता । मदनुभवचि प्रमाण ॥ २० ॥

॥ चूर्णिका ॥

मी पूर्वजन्मीं सत्यवतीनंदना । दासीपुत्र होतो जाणा । वेदविद्ब्राह्मणाच्या दासीउदरीं । माझा जन्म जाहला ही स्मृति मातें पुरी । मग वर्षाशरदृतूभीतरीं । एकत्र वास द्विजेश्वरीं । कर्तुमिच्छिला तत्सेवाकारी । नियोजिलें मातें । परी मी बाळपणापासुनी । एकनिष्ठ सेवागुणीं । चांचल्यरहित अल्पभाषणीं । ऐसिया मातें पाहुनी । जरी ते समदर्शी होते मुनी । तरी दीनदयालुत्वस्वभावेंकरूनी । अवचित कृपा उपजली मनीं । ह्मणूनि मातें अनुग्रहोनी । कृपालोचनीं अवलोकिलें । मग त्या मुनींच्या आज्ञेवरूनी । तदुच्छिष्ट प्रसाद भक्षुनी । मी एकभुक्त प्रतिदिनीं । राहता झालों ॥ २१ ॥

॥ ओव्या ॥

तेणें माझीं सकळें । पापें निरसिलीं किडाळें । झालों पुनीत गंगाजळें । धुतलों जैसा ॥ २२ ॥ आणि तिया पुण्यवशें सहजगती । सद्धर्मी रती उपजली पुरती । ऐकूनि श्रीभगवत्कीर्ती । श्रीकृष्णीं प्रीति उपजली ॥ २३ ॥ एवं श्रीकृष्णकथागायन । जंव जंव करीत होते मुनिजन । तंव तंव मी श्रद्धासंपन्न । आवडी श्रवण पैं केलें ॥ २४ ॥ तदा जयाचे गुण । भूषित करिती ब्रह्मविल्करण । या श्रीकृष्णीं संपूर्ण । उपजली रती ॥ २५ ॥ एवं क्षणोक्षणीं मति । स्थीर होतां भगवंतीं । वृत्ति पुनरावृत्ति । विसरली साची ॥ २६ ॥ तदा हें आपातरमणीय सकळ । चिद्गगनीं अविद्याजलदजाळ । ऐसें सभक्तिश्रवणविवेकें केवळ । जाणिलें मियां ॥ २७ ॥ एवं वर्षाशरत्काळीं । हरियश

ऐकोनि त्रिकाळीं । अंतरीं साठविला वनमाळी । प्रेमळ कळवळी कृपाळू ॥ २८ ॥ जाणोनि शुद्ध 'त्वंपदार्थ'। कार्योपाधि होय निवृत्त । कारणोपाधि निरसावया यथार्थ । भगवद्भक्ति पाहिजे ॥ २९ ॥ मग मिश्रसत्वगुणातें निवटी । आणि शुद्धसत्वातें अधिष्ठी । ऐसी भगवद्भक्ति गोमटी। उपजली मातें ॥ ३० ॥ 'त्वंपदार्थ' जाणल्यावांण । स्वव्यतिरेक नोहे जाण । स्वव्यतिरेक झालियावीण । निष्कामभजन कदा नव्हे ॥ ३१ ॥ कार्योपाधि जीवाप्रति । तंव कामना अवश्य उठती । सकामभजनें भगवत्प्राप्ती । दुर्लभ निश्चिती श्रुति सांगे ॥ ३२ ॥ 'त्वंपद' जाणतां अध्यास नाशे । मग भगवद्भक्तीनें आनंद विलसे । स्वामीश्रीधरमत ऐसें । तेंचि विशेषें बोलिलें ॥ ३३ ॥ परी या भक्तीचा विस्तरू । भक्तिपदतीर्थामृतादौ परिकरू । भाविक जनीं तो प्रकारू । जाणूनि घेइजे ॥३४॥ एवं 'त्वंपदार्थ' ज्ञात । आणि भगवद्भक्ति दृढ चित्त । वरी लेंकरूं मी अनाथ । सेवकैसें ॥ ३५ ॥ हें पाहुनी तदा सज्जनीं । गमनसमयीं कृपा करोनी । निजज्ञान सजलागुनी । उपदेशिते मुनि झाले ॥ ३६ ॥ मग तें परमात्मज्ञान । जें हृदयींचें 'तत्पद'शोधन । जेथ निरसे माया कारण । ब्रह्मात्म्यैक्यपण प्रत्यया ये ॥ ३७ ॥ जें पावोनि महामुनि । पाय न देतां भवजीवनीं । पावती सच्चिदानंदसंस्थानीं । सद्भावें नमुनी श्रीगुरूतें ॥ ३८ ॥

॥ दोहा ॥

त्या ज्ञानें मी जाणिली माया हरिचि अगाध ।
परि ते मातें बांधिना पाहुनि हरिप्रसाद ॥ ३९ ॥

॥ ओव्या ॥

तेंचि यथार्थ गुप्तज्ञान । सरहस्य ससाधन । सुचविलें संक्षेपेंकरोन । तुजला पराशरसूनो ! ॥ ४० ॥ कारणब्रह्माचियाठायीं । उपासनाद्वारा लवलाही । कर्म समर्पूनि पाही । ब्रह्मबोधें नाहीं समर्पकू ॥ ४१ ॥ एवं सकर्तृक भगवंतीं । कर्म अर्पितां यथारीती । मग बंधनाचिया नामें निश्चिती । कालत्रयीं तिलांजुली ॥ ४२ ॥ आणि त्रिविधदुःखविनिवृत्ति । अखंडपरमानंदप्राप्ती । ते येणेंचि सहजगती । होतु आहे ॥ ४३ ॥ कीं जड पदार्थ घृतादिक । ते केव्हां होती रोग-

जनक । परी रोगनिवर्तक । न होती कदा ॥ ४४ ॥ तेचि औषधादिकीं मिळवितां । रोगनिवर्तक होती तत्वतां । कीं विख भिषग्वर्यहातां । गेलिया होय भेषजची ॥ ४५ ॥ तेंवी कर्मे संसारमूलक । न होती भवनिवर्तक । तींचि कृष्णार्पणें सकळीक । संसारकलंक वारिती ॥ ४६ मागां कर्मानपेक्षा भगवद्भक्तिप्रती । निरूपिली असे रीती । येथ कर्मसापेक्षी भक्ति । एवमाशंकती सच्छ्रुति ॥ ४७ ॥ तरी आक्षेपीं समाधान । भक्ति दृढ जातया पूर्ण । कर्म करीत असेल विघ्न । त्यजावें तें तें ॥ ४८ ॥ नातरी कर्मत्याग आणि नव्हे भक्ति । मिष्ट भक्षी आणि वाणी मुक्ति । तरी त्या जाणोनी श्वपचोक्ती । त्यागिजे सज्जनीं ॥ ४९ ॥ कर्म त्यजी आणि न मिळे ब्रह्म । ऐसिया त्यागिजे श्वपचसम । ऐसें ब्रह्मविदुत्तम । वदले वसिष्ठ ॥ ५० ॥ यालागीं सकल कर्म करून । कीजे ईश्वरीं समर्पण । तेणें मळ जाती निघोन । शुद्ध मन सहज होय ॥ ५१ ॥ मन तों स्वभावता कठीण । परी जाणावें लाक्षासमान । तेंचि विषयतापकयोगेंकरून । द्रवत्व पावे ॥ ५२ ॥ दया स्नेह हर्ष शोक । काम क्रोध भयादिक । विकार चित्तजतूचे तापक । ते शमलिया कठिनात्मक होय मन ॥ ५३ ॥ द्रवीभूतसमयीं चित्तीं । जे जे विषयाकार जाती । चित्त कठीण होतां पुढती । ते संस्कार बैसती रुजूनी ॥ ५४ ॥ तेंचि आत्मप्रतिबिंब घेऊन । उठती रसरूप होऊन । यालागीं संस्कारांकारण । स्थायी ह्मणती जाणते ॥ ५५ ॥ एवं जयाच्या प्रतीकें विषयानंद । तोचि हृदयीं येतां ब्रह्मानंद । तरी त्याहोनि कृतकृत्यता सिद्ध । उरली कोणती ? ॥ ५६ ॥ यालागीं आपुलें मन । विषयीं तो करावें कठीण । आणि प्रेमपाझरसंपन्न । भगवच्चरणीं द्रुत कीजे ॥ ५७॥ शास्त्रीं जे उपाय बोलिले । क्रमें क्षणक्षणीं साधूनि तेतुले । सज्ञानपणें भगवत्पाउलें । भगवंत होउनी सेवावीं ॥ ५८ ॥ प्रथम उपाय संतसेवा । नंतर साधुकृपापात्र व्हावा । मग संत आचरती त्या धर्मी जडावा । विश्वास दृढ ॥ ५९ ॥ मग श्रीहरीचे गुणश्रवण । तेणें कृष्णीं रती उत्पन्न । तदा विषयविरक्त्यादिकरून । देहद्वयविवेचन घडे ॥ ६० ॥ तेणें कळे 'त्वमर्थ' शुद्ध । कार्योपाधि निवटे अशुद्ध । मग कारणाविद्यानिवर्तक प्रसिद्ध । उपजे भक्ति ॥ ६१ ॥ एवं भगवत्प्रीतिवर्धन । तदा परमानंद-

संपन्न । आणि अन्वयें भगवत्तत्वज्ञान । सच्चित्सुखघन प्रकाशे ॥ ६२ ॥ एवमखंड ब्रह्मज्ञान । आणि भगवन्मय अंतःकरण । म्हणोनि सर्वज्ञत्वादि गुण । आविर्भवन्ति भगवत्कृपें ॥ ६३ ॥ जे भगवद्भक्तीवीण ज्ञानी होती । त्यांनां नोहे सर्वज्ञत्वाद्याविर्भूती । ते न मागतां सज्जनाप्रती । अनायास प्राप्ती होतसे ॥ ६४ ॥ परी तेथही न गुंतती सुजन । मग अनिर्वचनीय प्रेमाचि पूर्ण । जेथ परमप्रेमास्पदात्मदर्शन । आणि भगवंतीं प्रेमकाष्ठा ॥ ६५ ॥ या सुखापुढें । समाधिसुखही बापुडे । तेथ कवण गणी कोरडे । शद्बानुमान ॥ ६६ ॥

॥ चूर्णिका ॥

सात्वस्मिन्परमप्रेमरूपा । यल्लब्ध्वापुमान्सिद्धोभवत्यमृतोभवतितृप्तोभवति । यज्ज्ञात्वामत्तोभवतिस्तब्धोभवत्यात्मारामोभवति । अनिर्वचनीयंप्रेमस्वरूपं । इत्यादिनारदीयसूत्रसंपत्ति । आणि ब्रह्मभूतःप्रसन्नात्मानशोचतिनकांक्षति । समःसर्वेषुभूतेषुमद्भक्तिंलभतेपरामित्यादि भगवदुक्तीही । प्रमाण येथ ॥ ६७ ॥

॥ ओवी ॥

एवं भक्त्यधीन ज्ञान । परी भक्ति भगवत्कृपेंकरून ।
ती कृपा कृष्णार्पणकर्माधीन । एवं कर्में निर्हरण कर्माचें ॥ ६८ ॥

॥ श्लोक ॥

'यत्करोषियदश्नासियज्जुहोसिददासियत् ।
यत्तपस्यसिकौंतेयतत्कुरुष्वमदर्पणम् ॥ १ ॥'

( भग० अ० ९ श्लो० २७ )

भावार्थः—क्रिया भोजन यज्ञ दान । तप इत्यादि मदर्पण । करी मग तूं भक्तिसम्पन्न । होशील हें वचन श्रीहरीचें ॥ ६९ ॥ एवं भगवदाज्ञानुसारें । कर्में आचरितां हरितें स्मरे । आधीं केशवादि नांवें सुंदरें । अंतीं अच्युतवंदन ॥ ७० ॥ देवस्वरूप नारायण । पितृस्वरूप जनार्दन । ब्रह्मार्पणमित्यादि श्रुतिवचन । कीं ब्रह्मार्पण कर्म तें ॥ ७१ ॥ यालागीं भगवदनुग्रहसहित । ऐसिया कर्में भक्ति मिळत । हें ससाधनज्ञान यथार्थ । दाविलें स्नेहें ॥ ७२ ॥ एवं कर्में करितां कृष्णार्पण । तदा उपजे कीर्तन स्मरण । पुढें चतुर्व्यूहोपासन । करूनि अभेद नमन करावें ।७३।

वासुदेव संकर्षण । प्रद्युम्न आणि अनिरुद्ध जाण । या चहूं नामें नारायण । प्रगटे मूर्तिमान् अनध्यस्तविवर्ती ॥ ७४ ॥ तयातें नमितां सद्भावें । चित्त उल्लसे ब्रह्मभावे । मग परमानंदें सुखावें । ब्रह्मबोधीं । ७५

॥ श्लोक ॥

" नमोभगवतेतुभ्यंवासुदेवायधीमहि ।
प्रद्युम्नायानिरुद्धायनमःसंकर्षणायच " ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

यालागीं हा उत्तमश्लोक । वेदरूप जपावा सम्यक । यांत ' धीमहि ' पद म्हणोनि देख । गायत्रीरूपही असे हा ॥ ७६ ॥ एवं सज्जनमुखांतून । हें भगवदुक्त नित्यज्ञान । ऐकोनि तदनुष्ठान । यथार्थ केलें ॥ ७७ ॥ तें जाणोनि भगवंत । होऊनियां कृपावंत । निजज्ञानादि भक्तिसहित । दिधलें समस्त मजप्रती ॥ ७८ ॥

॥ दोहा ॥

यास्तव तूंही व्यासमुने बहुश्रुत हरियश जाण ।
ज्याविण दुःखत्रिविधवशा दुसरें न परित्राण ॥ ७९ ॥
तेंचि निरुपण शुद्ध करी भक्तिसहित निःशेष ।
जें जाणुनि जन प्रेमवशें ब्रह्मणि करिति प्रवेश ॥ ८० ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे प्रियलीलामहोत्सवे
आमंत्रणविलासे नारदेन व्यासचित्तप्रसादाय
हरिकीर्तनगौरववर्णनं नाम
पंचमसखीप्रेषणम् ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ६ वें.

॥ दोहा ॥

श्रवण करुनि मुनिवाक्य तें सस्मय होउनि कृष्ण ।
कर जोडुनि अति आदरें करित सुचरितप्रश्न ॥ १ ॥
काल सकलकलनाशकू तत्कृत हा कल्पांत ।
गेला असतां काय ह्मणुनी निश्चल स्मृतिसिद्धान्त ॥ २ ॥

॥ दिंडी ॥

ऐकुनिया व्यासोक्ति मुनी बोले । दूर देशीं जैं विप्रवर्य गेले ।
तदा ऐसा त्यां कंठियला काळ । चिंतुनीयां अंतरीं मेघनीळ ॥ ३ ॥

॥ साकी ॥

श्रीहरिचरणीं ठेवुनि स्वमना करित मुखें गुणगाना ।
अच्युत नृहरि गोविंद ऐसें त्यजुनी मद अभिमाना ॥ ४ ॥

॥ अभंग ॥

एकलाचि होतो आपुल्या मायेचा । ह्मणुनियां तीचा स्नेह भारी । १
युवतींची जाती मंदमती आधीं । नाशियली बुद्धि मोहवशें ॥ २ ॥
माझेठायीं तीचा अनन्यची प्रेमू । माझा योगक्षेमू सदा इच्छी ॥ ३ ॥
परतंत्रा दासी वरी ईशाधीन । काष्ठमयी जाण स्त्री कां जैसी ॥ ४ ॥
तैसी दोहीपरी परतंत्र माता । जलान्नाची चिंता माझ्या नित्य ॥ ५ ॥
पांच वरुषांचा लहान मी बाळ । माताही प्रेमळ दृढतर ॥ ६ ॥
नेणें दिशा काळ ह्मणोनियां तेथ । राहिलों निश्चिंत ब्रह्मकूळीं ॥ ७ ॥
मातृस्नेहबंध सुटेल पैं जेव्हां । पाहीन मी तेव्हां नारायणा ॥ ८ ॥
आवडी अंतरीं राहिली लागून । दृढ तन मन नारायणीं ॥ ९ ॥
ज्ञानेश्वरनाथू करी मनाजोगें । रक्षी पुढें मागें निजदासा ॥ १० ॥ ५ ॥

॥ ओव्या ॥

असो माता एकें दिनीं । बाहेर गेली गोदोहनीं । तंव पाय लागला ह्मणोनी । कालप्रेरित फणी चावला ॥ ६ ॥ तेणें ती स्नेहवशें

कृपणा । मिळोनि गेली पंचपणा । मियां पाहोनि जननीमरणा । भगवदनुग्रह मानिला ॥ ७ ॥

॥ अभंग ॥

'नारायणीं घडे जेणें अंतराय । हो कां बाप माय त्यजावी ते ॥१॥
येरां प्रिय पुत्रां करी कोण लेखा । करिती ते दु:खा हितशत्रु ॥ २ ॥
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधू । तैसी माता निंदू भरतें केली ॥ ३ ॥
तुका ह्मणे सर्व धर्म देवपाय । आणिक उपाय दु:खमूळ ॥ ४ ॥'

(तुकाराममहाराज.)

॥ गद्य ॥

ननु मातृदेवोभव । पितृदेवोभव । आचार्यदेवोभव । अतिथीदेवोभव । इतिशिक्षायाम् । तस्माच्छ्रुत्युल्लंघनेनपतनंस्यादितिचेन्माशंक्यताम् । मातृदेवोभवेत्यादिश्रुतयस्तुनहिसाधनचतुष्टयसंपन्नाधिकारिदशायांकिंतुब्रह्मचारिदशायामेव । नारायणैकनिष्ठः — सर्वधर्मान्परित्यज्य मामेकंशरणंव्रज — ज्ञानसंपन्नःसन्भगवद्दर्शनेच्छयैवावातिष्ठत् । तथापि यावन्नजननीपंचत्वमापन्नातावत्तत्रैवासीत् । तद्देहपतनानंतरंतदासोऽपि दिशमुत्तरांजगाम । इतिश्रोतॄणामाशंकापरिहृताऽधुनाचनारदचेष्टितमेव विचिनुमहे ।

याप्रकारें मी जननीप्रत पाहून उत्तरदिशेप्रत जाता झालों.

॥ ओव्या ॥

तदा समृद्ध नाना देश । वनें उपवनें नि:शेष । पर्वत नद्या आरामविशेष । वापीकूपतडागादि ॥ ८ ॥ सर्वत्र ठेवुनि समदृष्टि । मी पुढें चालिलों धरूनी तुष्टी । तंव देखिलें तियेसृष्टीं । महारण्य ॥ ९ ॥ त्या वनांतूनीं । मी एकटा चालत असतां चरणीं । उलूकांचे शब्द कर्णीं । भयंकर पडलेती ॥ १० ॥ नाना सर्प नाना व्याघ्र । कस्तुरीमृग मत्त कुंजर । जेथ न दिसे दिवाकर । आच्छादिला तरुवरीं ॥ ११ ॥ कीं सख्या न जावें राती युवती । ह्मणूनि कुमुदिनी दूती । अडकविला गभस्ती । निजाग्रेंकरूनी ॥ १२ ॥ ऐसिया वनीं एकटा बाळू । मी धुंडत असतां अळुमाळु । जाहलों पैं व्याकुळू । क्षुधेतृषेनें ॥ १३ ॥

तदा तरंगिणीऱ्हद्जीवन । पाहोनि केलें स्नान पान । सकलश्रमनिराकरण । होवोनियां बैसलों ॥ १४ ॥ जेथ मनुष्य नाहीं कोणी । ऐसिया तिया महारण्यीं । पिंपळातळीं बैसोनी । आणिलें मनीं पूर्वश्रुत ॥ १५ ॥ हृदयस्थ परमात्मा चिंतिला मनीं । बुद्धि दृढ लाविली ध्यानीं । सकळ इंद्रियें आकर्षुनी । प्राणासहित ॥ १६ ॥

॥ पद ॥

चरण चारु चिंतितांचि प्रेमें अंतरीं । यन्नखजा पापियांहि देत शिवपुरी ॥ धृ० ॥ रमणविरह साहिना ह्मणोनि कुमुदिनी । राहिली प्रभुपदनखीं बघुनि दिनमणी ॥ १ ॥ इंद्रनीलगुल्फद्वय शोभती कसें । जेथ मिठी घातालिसे सुजनमानसें ॥ २ ॥ एवमादियुक्त मूर्ति प्रगटली हृदीं । नित्य रासमंडळीं जे गोपिछंछदीं ॥ ३ ॥ चतुर्बाहु रूप सुजनचित्तचोरटें । पाहतांचि वृत्ति समाधिसही विटे ॥ ४ ॥ अलकावतीपतिचरणध्यान ज्या घडे। कठिणहि हें रूप होय त्याचि सांगडें ।५। १७

॥ अभंग ॥ १.

प्रेमाधीन चित्त नयनीं जीवन । रोममूळें जाण स्वेदांकीत ॥ १ ।
रोमांचित गात्रें मुखीं नामघोष । तेणें हृषीकेश प्रगटला ॥ २ ॥
योगी जिंकिताती जेधवां हें मन । मृदुवेगाहून आरंभीती ॥ ३ ॥
भक्तिमध्यें होय चित्त आकर्षण । ह्मणुनीयां जाण मध्य वेगू ॥ ४ ॥
योगाचा आरंभ मृदुसंवेगांत । मध्यसंवेगांत भक्त्यारंभू ॥ ५ ॥
तीव्र वेग होतां योगाची समाप्ति । भक्तीची तों स्थिती जैसी तैसी ॥ ६
नव्हे ही कल्पना नव्हे अर्थवाद । अनुभव सिद्ध सज्जनांचा ॥ ७ ॥
सप्रेमें चिंतीता ज्ञानेशचरण । कळेल ही खूण । जीवेंभावें ॥ ८ ॥ १८

॥ २ ॥

ऐसा हळु हळु नारायण मनीं । प्रगटला मुनि दृढभावें ॥ १ ॥
तदा प्रेमभरें पुलकांकितांग । आनंद अभंग प्रगटला ॥ २ ॥
विषयवासना निमाली उपाधि । मग्न परमानंदीं जाह्लो कीं ॥ ३ ॥
भुललों आपणा विसरलों पर । ध्यातृध्येयाकार भिन्न नाहीं ॥ ४ ॥
विसरला भक्त विसरला देव । विसरला भाव वृत्तिरूप ॥ ५ ॥
विसरले गूण भूललें निर्गूण । जें जें प्रेमावीण दूजें होतें ॥ ६ ॥

प्रेमचि तो मग अंतरबाहेरीं । सचेतन हरि जाहलासे ॥ ६ ॥
आळंदीचा राणा उपदेशदाता । तेणें भय चिंता सर्व गेली ॥ ८ ॥ १९

॥ गद्य ॥

हे मुने ! ह्याप्रमाणें समाधीचेठायीं मग्न जाहलों असूनही त्या प्रेमाचेठायीं आनंदेदंतारूप भगवंताचें रूप प्रगट झालें आणि, अत्रसमाधिरित्थंबोध्य: । त्वंपदार्थनिष्ठतयाऽऽत्मरूपेसमाधि: । तत्पदार्थनिष्ठतया प्रेममयेभगवतिसमाधि: । तयोरक्षणंतुमहावाक्यार्थनिष्ठतयाकृतम् । अथापि इच्छाप्रारब्धदोषतइत्यादिवत्सगुणरूपतिरोधानमपश्यन्सन्व्युत्थितोऽस्मि । तदातदेवरूपंदिदृक्षुरहंपुनर्ब्रह्मज्ञानवानपितेनैवरूपेणकृष्टचेता:पुनरपि समाधिनिष्ठोऽभवम् । किंतुतत्पदार्थनिष्ठतयावीक्ष्यमाणोऽप्यहंरूपदर्शनाभावेननिर्गताशयावैक्लव्यंप्राप्तवान् ॥

एवं त्या निर्जन वनाचेठायीं मी प्रभुदर्शनार्थ प्रयत्न करीत असतां, प्रेमळजनरक्षणार्थ मातें गंभीर वचनानें प्रशंसा करून बोलता जाहला, कीं हे तपस्विन् ! कृपापात्र ! या जन्माचेठायीं तूं मला पाहण्याला योग्य नाहींस. कारण, ज्याचे कामादिक मल दग्ध झाले नाहींत, किंवा ज्याचे लय ह्मणजे निद्रा, कषाय ह्मणजे स्तब्धता, रसास्वाद ह्मणजे धन्यताभिमान, निवृत्त झाले नाहींत, असे जे अनिष्पन्न योगी आहेत, म्हणजे योगाचेविषयीं यत्न करीत असतांही ज्यांचा तेथें पूर्ण अधिकार झाला नाहीं, अशा पुरुषांनां माझें दर्शन कठिण आहे. तथापि, हे मुने ! हे कृपापात्र ! हे तपस्विन् ! असें जरी आहे तरी माझा अनुग्राहक स्वभाव असल्यामुळें माझेठायीं तुझा अनुराग उत्पन्न व्हावा म्हणून मी आपलें रूप तुला एकवेळ दाखविलें आहे. यद्यपि महावाक्येंकरून ज्ञान झालें, तथापि माझें रूप दिसण्याला माझा अनुग्रहच हेतु आहे, असें जाण. याप्रमाणें ज्याअर्थी माझे ठिकाणीं अनुरागयुक्त योगी हृदयांतील कामादिमलांनां जाळून टाकतात, त्याअर्थी माझे ठिकाणीं लब्धानुराग होत्साता हृदयांतील कामादिमलांनां जाळून टाक.

॥ ओव्या ॥

तुज अल्प सत्संगती । सत्सेवाही यथाशक्ती । जाहली म्हणवोनी दृढ भक्ति । मजविषयीं तुझी ॥ २० ॥ म्हणवूनि हें अमंगळ ।

भौतिक टाकोनि केवळ । दिव्य देहीं प्रबळ । मद्भक्त होशील ममानुग्रहें ॥ २१ ॥ आतांही तूं मद्भक्त सिद्ध । परी पुढें मद्भक्त आणि मदीय पार्षद । वरी ब्रह्मज्ञ आणि शुद्ध । होशील संत ॥ २२ ॥ 'इंद्रियां अनघड पडलिया । जीविताचें सुख बुडालिया । आंतबाहेरीं उमटलिया । मृत्युचिन्हें' ॥ तेथ केंवी प्रेमसंचयु । केंवी तव परिचयू । स्मृति राहावया उपायू । कवणू असे ॥ २३ ॥ 'तरी ऐसियाही ध्वनी । म्हणी थारा देशील मनीं । परी नित्य सेविला मी निदानीं । सेवकू होय ॥ हें मरण काय बापुडे ॥ परी प्रलयांतही जरी घडे । तरी मदनुग्रहें न बुडे । स्मृति मज्जनांची' । म्हणोन येथ एक । माझेपण असावें सम्यक । मग भरंवसेनी भवकटक । निर्दळिलें जाणें ॥ २४ ॥ सर्वव्यापक महदद्भुत । जवळी असोनी अदृष्टवत । मी प्रणाम केलिया अनुकंपित । अखंड जें भगवद्रूपीं ॥ २५ ॥ तें रूप एवं वदोनी मातें । अंतर्हित जाहलें जेथिचें तेथें । मीही त्यजोनि लज्जेतें । श्रीहरिनामीं रत झालों ॥ २६ ॥ राम कृष्ण हरि गोविंद । या नामांचे निखिल प्रबंध । नेणोनि दिवसनिशाबोध । गात असतां ॥ २७ ॥ तैसीं अति गौप्य आणि कल्याणरूप । चरित्रें हरीचीं अनुपम अमूप । [1]चिंतितसातां निःसंकल्प धुंडिली मही ॥ २८ ॥ करितां पृथ्वीपर्यटण । मदमत्सरीं न लिंपे मन । निरीच्छ संतुष्ट होउन । कालप्रतीक्षण करीतसातां ॥ २९ ॥ एवं मज कृष्णभक्ताचा शार्ङ्गधरू । मज निस्पृहाचा संतोषतरू । मज शुद्धात्मयाचा आनंदसागरू । जो जगद्गुरू प्रगटला ॥ ३० ॥ जननीगर्भी रक्षिलें जेणें । भगवत्पार्षदतनु यावया तेणें । परमेश्वरें कृपाजीवनें । सौदामिनीसम येणें केलें ॥ ३१ ॥ प्रारब्धकर्म संपल्यावरी । पांचभौतिक देह महीवरी । पडलिया मज सत्वरीं । हरिजनशरीरीं योजिलें ॥ ३२ ॥ कर्मारब्ध नाहीं हरिजनशरीर । तें शुद्ध आणि नित्य ऐसें म्हणती श्रीधर। असो ऐसा ब्रह्मकुमर । एवं मद्वृत्ती जाण मुने ॥ ३३ ॥ मग कल्पांतसमयीं । निजाश्रयजळीं सुप्त फणिशायी । तेथ समाधिइच्छा करितां ब्रह्माही । मी श्वासद्वारा तद्धृदयीं प्रवेशलों ॥ ३४ ॥ एवं सहस्र युग

---

१ गात्र द्रवभूत झालेला असा.

लोटलिया काळ । तदा जागा होवोनि हंसपाळ । मी आणि मरीच्यादि ऋषी सकळ । प्राणापासोनि उपजविले ॥ ३५ ॥ तेथ मरीच्यादि प्रजापती । सृष्टिकार्यालागीं झटती । मी होवोनी ब्रह्मचारी व्रती। लोकत्रयीं हिंडतो ॥ ३६ ॥ जे कर्में घेती स्वर्गादिफळें । तया ब्रह्मांडावरणबाह्य मार्ग न मिळे । आणि जे तपाद्युपासनीं निजबळें । ब्रह्मलोकीं जाती पैं ॥ ३७ ॥ ते ब्रह्मांडावरणबाह्य तंव जाती । परी न पुनर्ब्रह्मांडांतर्गती । मी भगवदनुग्रहें निश्चिती । बाह्यांतर्वर्ती पर्यटतो ॥ ३८ ॥ माझें ब्रह्मचर्यादिकर्मेंकरून । ब्रह्मांडांतरीं होय गमन । भगवदुपासनादिकें-करून । ब्रह्मांडाबाहेर गति माझी ॥ ३९ ॥ आणि ब्रह्मज्ञान परिपूर्ण । यालागीं कर्माकर्म न करी बंधन । वरी भगवत्प्रेमसंपन्न । ह्मणोनी जाण स्वतंत्र मी ॥ ४० ॥ तरी प्रेमें भगवद्वचना । पाळोनि हिंडतो जगत्कल्याणा । ही माझी उत्तम महती वीणा । मज परेशें दीधली ॥ ४१ ॥ षड्जर्षभ गांधार मध्यम । पंचम धैवत निषाद सप्तम । हे स्वर ब्रह्माभिव्यंजक परम । ह्मणोनी ब्रह्म बोलिजे या ॥ ४२ ॥ ऐसी ब्रह्मविभूषित वीणा । मी राग ताल मूर्छना । साधोनि भगवद्गुणा । गात गात हिंडतो ॥ ४३ ॥ गानीं होय भगवत्प्राप्ति । येथ उद्गातृकर्मीं प्रमाण श्रुती । आणि याज्ञवल्क्यस्मृति । ऐसीचि आहे ॥ ४४ ॥

॥ श्लोक ॥

'वीणावादनतत्वज्ञःश्रुतिजातिविशारदः ॥
तालज्ञश्चाप्रयासेनमोक्षमार्गंनियच्छति ' ॥ १ ॥

॥ ओवी ॥

जो वीणावादनतत्व जाणें । श्रुतिजाति ओळखे ज्ञानें ।
आणि तालज्ञ असोनि हरिगुण गाणें । तो मोक्षसाधनें अभियुक्त ४५

॥ श्लोक ॥

' यथानयतिकैलासंनगंग.नसरस्वती ।
तथानयतिकैलासंनगंगानसरस्वती ॥ १ ॥ '

॥ ओव्या ॥

ऐसें रागार्णवकाराचें वचन । गायन करिती सर्व वर्ण । चांडाळही करिती गायन । हें वासिष्ठीं बोलिलें ॥ ४६ ॥ यालागीं वेदवर्ज्य-

भाषया । शूद्रादिकां अधिकार गावया । आणि वेदपुराणवर्ज्यभाषया । चांडालादिकां गावया । अधिकारू ।। ४७ ।। (सर्वांनां गानाधिकार आहे असें वचन मूळांत नसून मी आपल्या मतिप्रमाणेंच लिहलें आहे. ह्मणून यांत प्रमाद असल्यास मूळावर लोटूं नये. ) एवं प्रेमें करितां भगवद्गान । आनंदें नाचे नारायण । येविषयीं प्रमाण । अनुभव माझा ४८ माझें पाहूनि गुणगान । प्रभू हृदि येतो बोलाविल्यासमान । गंगादितीर्थमूळ यच्चरण । तो प्रेमें दर्शन मज देतो ।। ४९ ।। जयाचें आवडते गुण । ऐकतां सर्वांग होती श्रवण । तो हृदयनिवास परमकरुण । नित्य दर्शन मज देतो ।। ५० ।। एवं माझें प्रयोजन । गुणगानें प्रेमवर्धन । निष्काम पाहोनि जगज्जीवन । नित्य दर्शन मज देतो ।। ५१ ।। पांचभौतिकभाव त्यजून । समाधिनाविष्ट होय मन । अनध्यस्तविवर्त आनंदघन । नित्य दर्शन मज देतो ।। ५२ ।। जैसें हें हरिगुणगान । मज करी ब्रह्मसंपन्न। तैसेंचि सकलांस ह्मणोन । तूंही वर्णन करी मुने! ५३ विषयभोगें जयाच्या मना । झडपूनि घेत डाकिणी तृष्णा । तयास्तव तूं वर्णी कृष्णा । परम घृणा करोनी ।। ५४ ।। श्रीहरीचें गुणवर्णन । हीचि शाश्वती नौका जाण । भवसिंधूमाजीं तरण । सहज सकळ जनांचें ।। ५५ ।। येविषयीं प्रमाण श्रुत । आणि ऐसेंचि वदती तात । श्रीतुकारामादिही संत । एवं वदती ।। ५६ ।। 'तयापाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा' ( ज्ञानेश्वरी अ० ९ ओ० २०८ ).

।। अभंग ।।

' निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ।।१।।
उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे नाना छंदे पांडुरंग ।। २ ।।
मार्गानें चालतां नाम वदे वाणी । उभा चक्रपाणी मागें पूढें ।। ३ ।।
तुका ह्मणे याला कीर्तनाची गोडी । भावें घाली उडी नामासाठीं ' ।।४।।

( तुकाराममहाराज. )

।। दोहा ।।

'रामनामको अंक है सब साधन है सून ।
अंक गये कछु हात नहीं अंक रहे दसगूण ।। १ ।।

रामनाम कहबूं करो जबलग घटमो प्राण ।
कबहूं दीनदयालके भनक परेगी कान ॥ २ ॥
रामनाम नरकेहरी कनककशिपुकलिकाल ।
जापकजन प्रल्हाद जिमी पालहि दलिसुरसाल ॥ ३ ॥ '

( तुलसीदास ).

॥ दोहा ॥

इतिविध निजरामायणीं वदले तुलसीदास ।
जितेंद्रिय आणि नाम वदे तरि करि हरि हृदि वास ॥५७॥

॥ ओव्या ॥

एवं प्रमाणेंकरून । सिद्ध सकलां भवतरण । परी अन्वयव्यतिरेकेंही जाण । ऐसेंचि दिसें ॥ ५८ ॥ भक्ति नसतां योगादिकीं । चित्तवृत्ति न शमे निकी । आणि मुकुंदसेवा घडतां नेटकी । मनोवृत्ति सहज शमे ५९

॥ अभंग ॥

अजपा जपणें उलट प्राणाचा । तेथही नामाचा निर्धार असे ॥ १ ॥ ऐसी तातवाणी हरिपाठग्रंथीं । योगासी निश्चिती नामापेक्षा ॥२॥ आणि माझा ऐसा अनुभव आहे । भक्तीवीण नोहे शांति चित्ता ॥ ३ ॥ प्रतिमादौ किंचिन्मुकुंदाची सेवा । करितांही गोवा सोडी मन ॥ ४ ॥ मग दृष्ट जे कां श्रीहरीचे गुण । तेणें कैसे मन शांत नोहे ॥ ५ ॥ आळंदीचा राणा जरी करी कृपा । भक्तिमार्ग सोपा तरी कळे । ६ ।६०।

॥ ओव्या ॥

जें जें त्वां पुसिलें कांहीं । तें तें मियां सांगितलें सर्वही । हें होवो तुज संतोषदायी । मम जन्मकर्मरहस्य ॥ ६१ ॥ व्यासा तूंही लीन हरिगुणीं । यालागीं हें तुज आवडतें मनीं । मीही यथार्थ ह्मणोनी । वदलों सकळ ॥ ६२ ॥ आपुलिया अनुभवेंकरून । दुसरा होतो भक्तिसंपन्न । तरी स्वचरितही करावें वर्णन । तेथ अभिमान बाधीना ॥ ६३ एवं वदोनी ब्रह्मनंदन । करीत करीत हरिगायन । स्वप्रयोजनशून्य परी जगत्कल्याण । कराया चालिला सूत ह्मणे ॥ ६४ ॥ परी जगत्कल्याणही वासनारहित । जैसा येतां मलयमारुत । तदा सहज तोषे घ्राणदैवत । तद्वल्लोककल्याण होत संतकरवीं ॥ ६५ ॥

॥ अभंग ॥

धन्य धन्य धन्य श्रीनारदमूनी । मग्न हरिगुणीं कालत्रयीं ॥ १ ॥
धन्य भाग्यनिष्ठ श्रीब्रह्मनंदन । चित्तीं नारायण सर्वकाळ ॥ २ ॥
धन्य भाग्य हातीं हरिदत्त वीणा । गाये हरिगुणा निजानंदें ॥ ३ ॥
तोचि ज्ञानेश्वर आळंदीचा राणा । धन्य करी जना अनुग्रहें ॥ ४ । ६६ ।

॥ दोहा ॥

हरिगुण गातां हर्ष अती तो धन्य विधिकुमार ।
आणि धन्य ते त्याचिपरी हरिरत त्यजुनि कुमार ॥ ६७ ॥
अलकावतिपतिपाउलें वंदुनि अतिसुखसार ।
रामकृष्णहरि गाउनी तोडु सकल संसार ॥ ६८ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते नानाभाषाप्रबंधे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे व्यासं प्रति नारदेन प्राग्जन्मतथास्वभाग्यकथनन्नाम षष्ठसखीप्रेषणम् ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ७ वें.

॥ श्लोक ॥

श्रीज्ञानेश्वरपदश्रियंनत्वापरमतमाम् ।
प्रेषयामि सप्तमीं सखी मृदुभाषिणीमिमाम् ॥ १ ॥

अस्मिन्नध्यायेभगवद्भक्तस्यजन्मकथनार्थंद्रौणिनाकृतमुच्यते ।

॥ दोहा ॥

शौनक सूता प्रश्न करी कीं गेल्या विधिसूत ।
व्यास तत्कथित चिंतुनी आचारिला कीं पूत[1] ॥ २ ॥

सूत म्हणे शौनकाप्रती । सरस्वतीचे पश्चिमतटक्षितीं । शम्याप्रास स्वाश्रमाप्रती । व्यास निश्चितीं बैसले ॥ ३ ॥ मग जें बोलिलें

---

१. पवित्र.

ब्रह्मनंदनें । तेथ मन ठेविलें प्रणिधानें । समाधिनिष्ठ प्रज्ञेनें । सर्वे कांहीं जाणलें ॥ ४ ॥ जें अतीत अद्य अनागत । तें मायावृत्तिकारणीं वसत । तें समाधीनें कळे समस्त । म्हणोनी सांख्य वदत सत्कार्य ॥ ५ ॥ आणि जरी तें मिथ्या वेदांतमतें । तरी यावदविद्या उपपद्यते । म्हणोनी बाधितानुवृत्त्या प्रातिभासिकत्वें तें । ज्ञानियांहि कळते समाधिमत्या ॥ ६ ॥ एवं भक्त्या निर्मल मनीं । पुराणपुरुष कैल्यदानी । पाहता जाहला व्यासमुनी । आणि तदाश्रित माया जननी देखिली ॥ ७ ॥ जिनें ब्रह्म असोनि जीव । निजकृती मोहिला स्वयमेव तो जीवांचा महाभव । पाहिला व्यासें ॥ ८ ॥ निर्गुण ब्रह्म पाहिलें साक्षीपणें । आणि पौरुषरूपीं अनध्यस्तविवर्ती ब्रह्म पाहिलें परमप्रेमगुणें । माया देखिली वृत्तीपणें । आणि जीवसंसृती जगत्संयमानें देखिली ॥ ९ ॥ जेंवी गभस्ति दिसे निर्मळ । मिथ्यात्वें दिसे मरीचिजळ । पाहोनि कुरंग तळमळ । तद्भ्रमही कळे ॥ १० ॥ एवं जाणोनि सकळ । जाणला भक्तियोग निर्मळ ।आणि हें सात्वत शब्दब्रह्म निखळ । जाणोनि प्रकट केलें विश्वहिता ॥ ११ ॥ ब्रह्माश्रय ब्रह्म विषय । ऐसिया मायेचेठायीं स्वयें । ब्रह्मचि आभासत्वें जीव होय । आणि साहे बंधदुःख ॥ १२ ॥ तेंचि भक्तिज्ञानेंकरून । स्वरूपानंदप्रचुर जाणून । मुक्त होय एवं निरूपण । संक्षेपेंकरून दर्शविलें ॥ १३ ॥ एतद्विस्तरचि सात्वतश्रुती । जया श्रीमद्भागवत म्हणती । आणि समाधिभाषाही अपरमती । योग्य बोलती मज वाटे ॥ १४ ॥ ती ही भागवतसंहिता । जी प्रेमें ऐकिली असतां । जन्मजरामरणादिहंता । भगवद्भक्तियोग तत्वतां मिळे ॥ १५ ॥

॥ दोहा ॥

त्या व्यासें ही भागवती करुनि संहिता शुद्ध ।
निजपुत्राप्रति पढविली जो आधिंच चिद्बुद्ध ॥ १६ ॥

॥ ओंव्या ॥

तदा शौनक म्हणे सूता । तया निवृत्तिनिरता । एवढी भागवतसंहिता । पढावया कवण हेतू? ॥ १७ ॥ जाणलीया परमात्मवस्तू । सकल शास्त्रें पावती अस्तू । आणि प्रयोजनाऽभावें प्रवृत्तू । मंदही नोहे ॥ १८ ॥

ज्ञान जाहलियावरी अखंडित । निःशेष त्यागिजें शास्त्रीय द्वैत । वेद शास्त्रें पुराणें समस्त । पदपांसुवत त्यजावे ॥ १९ ॥ इत्यादि नाना श्रुतिस्मृति । कंठरवेंकरूनि वदती । कीं मुक्तांची नोहे प्रवृत्ती । ब्रह्मबोधक शास्त्रीं ॥ २० ॥ आणि शुक तंव महाराज परम । निजरूपें जाहला ब्रह्म । एवं तो श्री आत्माराम । असोनि भागवत कां पढला ॥ २१ ॥ सूत म्हणे शौनक मुने! । हरिभक्तीची प्रयोजनें । मुक्तांचेठायीं निःशेष क्षीणें । जाहलीं असती ॥ २२ ॥ देखे सूर्ये दे प्रकाशू । तो कवण प्रयोजना विशेषू । परी होत असे समुल्लासू । जगत्प्रयोजना ॥ २३॥ तेंवी मुक्तांचे हरिभजन । तो तंव त्यांचा स्वभाव पूर्ण । परी उद्धरती दीन जन । पामर विषयी मुमुक्षू ॥ २४ ॥ कां नदि जैं होय अब्धिगामिनी । तैं नदींत काय नसे पाणी । परी स्वभावेंचि प्रवाहकरणी । आर्ता जीवनपानीं तृप्त करी ॥ २५ ॥ तेंवी मुक्तांचियाठायीं । भक्तीवीण ब्रह्मपण न्यून नाहीं । परी हरिचरणगामिनी लवलाही । प्रीति होय ॥ २६ ॥ तेणें उद्धरती नानाजीव । हा तो सज्जनस्वभाव । येथ तर्क करणें मूढगौरव । जाण मुने ! ॥ २७ ॥ कां गंगा सप्रवाह सागरीं झोके । तैं समुद्राचें क्षारत्व न देखे । तेंवी सुजनही सर्व कर्तृत्वादि कलंके । न देखती हरीची ॥ २८ ॥ मुमुक्षुदशेंत अभ्यस्तभक्ति । ते मुक्तदशेंत ये स्वभावस्थिति । आणि भगवद्भक्त श्रम न गणती ।भगवत्सेवादौ ॥ २९ ॥ सकलमोहविनाश जाहला । आत्मानात्मविवेकू केला । तेणें हृदयग्रंथीचयो निमाला । सकल जयांचा ।३०। आणि मार्तंडालें कहीं । आंधाराची सेचि नाहीं । तेंवी जया कालीं तिहीं । अज्ञान न स्मरे ॥ ३१ ॥ दुःखध्वंसें आनंदप्राप्ति । ऐसी नोहे जयांची स्थिति । जे अखंड ब्रह्मानंदें डुलती । जगद्भ्रांतिविरहित ॥ ३२ ॥ ऐसे आत्माराम समर्थ । श्रीहरिचरणीं होती रत । एवं गुणवान् भगवंत । अन्य हेत न वदवे ॥ ३३ ॥ कीं सुपुत्रा पितृत्वही येतां । तरी काय विसरे पूर्वील पिता? । तेंवी सुजनां भगवद्गुणवार्ता । होय सर्वथा भूषणावह ॥ ३४ ॥ आणि गेलियाही ब्रह्मपेठे । येती प्रारब्धाचे चपेटे । ते भोगावे तरी मग नेटें । भजन कां न कीजे? ॥ ३५ ॥ प्रारब्धाचा अभिभव । भक्ति करी स्वयमेव । परी वस्तुतस्तव । मुक्तां भक्तिभाव प्रयोजन ॥ ३६ ॥

॥ श्लोक ॥

'आत्माराम असे शुकादिक मुनी ज्यांचें अविद्यामय ।
ग्रंथी सर्वहि सूटले जितचि जे मुक्त स्वयें अद्वय ॥
भक्ति श्रीहरिची उगीच करिती तीही निमित्ताविण ।
कीं मुक्तीहुनि गोड फार असती श्रीमाधवाचे गुण ॥ १ ॥'

( वामनपंडित. )

॥ ओव्या ॥

एवं श्रीवामनोक्ति । 'भक्तिभाग्य प्रेमा साधीन' इति । श्रीतुकाराम समर्थी । बोलिलें ऐसें ॥ ३७ ॥ 'आम्हां भोग मोक्षाचियेठायीं । इये श्रीमूर्तिवांचोनि नाहीं' । ही तातोक्ति लवलाही । आणि ज्ञानी मद्भक्ति पावे ही कांतोक्ति ॥ ३८ ॥ 'यंसर्वेदेवानमंतिमुमुक्षवो ब्रह्मवादिनश्च' ही श्रुति । 'मुक्ताऽपिलीलयाविग्रहंकृत्वाभजंति' । एवं नृसिंहतापनीयभाष्यांत वदती । श्रीमदाचार्य ॥ ३९ ॥ एवं नाना प्रमाणेंकरून । मुक्तांचा स्वभाव भगवद्भजन । अन्य कांहीं प्रयोजन । हें मधुसूदन बोलिलें ॥ ४० ॥

॥ श्लोक ॥

'जीवन्मुक्तिदशायांतुनभक्तेःफलकल्पना ।
अद्वेष्टृत्वादिवत्तेषांस्वभावोभजनंहरेः ॥ १ ॥'

॥ ओव्या ॥

'स्वयंफलरूपतेतिब्रह्मकुमारः' इति निजसूत्रीं नारदोक्ति । एवं मुक्तांप्रति अवश्य भगवद्भक्ति । विशेष विस्तरें 'भक्तिपद्तीर्थामृतीं' । 'श्रीमत्भगवद्गीतासंगति' 'निदिध्यासनप्रकाशादि' ग्रंथीं देखिजे ॥ ४१ याकारणें श्रीहरिचरणीं । प्रीति वाहे श्रीशुक मुनी । हरिवांचोनि अंतःकरणीं । दुसरें नोहे ॥ ४२ ॥ 'ब्रह्म हें खरेंचि आहे । आदिमध्यावसानीं पाहे । हें होतां नवल काय । परि भक्ति साधिजे' ही रत्नाकरोक्ति ॥ ४३ ॥ एवं श्रीभगवद्भजन । शुक जाहलियाही ब्रह्मसंपन्न । स्वभावेंचि श्रीहरीचे गुण । आवडती तया ॥ ४४ ॥ ह्मणोनि श्रीमद्भागवत । पढला प्रेमें समस्त । ब्रह्मानंदें हरिगुण गात । नारदवत प्रेमभरें ॥ ४५ ॥ इतुकेनि आशंका संपूर्ण । निवर्तली आतां पूर्वानुसंधान । जो

तुह्मीं पुसिला होता प्रश्न । कीं परीक्षिज्जन्मकर्म सांग पां ॥ ४६ ॥ तरी परिक्षिताचें जनन । आणि पांडवांचें महाप्रस्थान । तैसें परिक्षिताचें मोचन । हें हरिकथासंगतिहेतु ह्मणोनि सांगतों ॥ ४७ ॥ कौरवपांडवांच्या संग्रामीं । भीमगदेंकरोनि कौरवस्वामी । दुर्योधन रणीं । पडलिया ॥ ४८ ॥ तदा पाहोनि बंधुदु:ख । अश्वत्थामा धांवोनि नावेक । द्रौपदीपुत्रादिकांचीं सकळिक । निद्रेमाजीं तोडिलीं शिरें ॥ ४९ ॥ तीं नेवोनि दुर्योधनातें । दाखविलीं जेव्हां समस्तें । परी तें कृत्य तयातें । नावडतें झालें ॥ ५० ॥ तदा बोले दुर्योधन । या मुलांतें संहारून । हें अतिनिंद्य कर्म दारुण । दाविलें मातें ॥ ५१ ॥ माझें पांडवांचें वैर । परी आम्हां दोघांसही रक्षणीय कुमर । तुवां शिरें तोडौनि परिकर । काय पुरुषार्थ पैं केला? ॥ ५२ ॥

॥ गद्य ॥

दुर्योधनाच्या व भीष्मद्रोणादिक यांच्या अंत:करणांच्याठायीं राक्षसांनीं प्रवेश करून पांडवांशीं विरोध केला होता. या प्रकारची भारताचेठायीं कथा वर्णिली आहे. ते समस्त वीर रणामध्यें मरण पावल्यावर राक्षस आपल्याठायीं निघून गेले. त्यानंतर ज्यांच्या त्यांच्या निर्वैर वृत्ति झाल्या. तद्वत् दुर्योधनाचाही राक्षसावेश निवर्तल्यावर निर्वैर वृत्तीनें त्याचे अश्वत्थाम्याविषयीं असे उद्गार निघाले. यद्यपि हें अश्वत्थाम्याचें कर्म पाहून दुर्योधनाला आनंद वाटला, असें महाभारतांत सांगितलें आहे, तथापि तें दुर्योधननिरीक्षणकालानवच्छिन्न राक्षसावेशनिविष्टकालीचें समजावें.

॥ ओव्या ॥

तूं जन्मलासी ब्राह्मणवंशीं । परी कैसा विलक्षण साहसी । मुलें मारोनि आणिल्या निशीं । काय पुरुषार्थ पैं केला ? ॥ ५३ ॥ जो मूर्तिमंत कारुण्यखाणी । तदीयत्वास्तव तुजला द्रौणी । म्हणती परी त्वां मुलें मारोनी । काय पुरुषार्थ पैं केला ? ॥ ५४ ॥ वरी वैरी पांचही जण । ते सुखी आहेत सप्राण । आणि हीं परतंत्र बाळें मारून । काय पुरुषार्थ पैं केला ? ॥ ५५ ॥ समोर नसतां धनंजय । आणि तो श्री यादवराय । नसतां त्वां हा रचोनि उपाय । पुरुषार्थ काय साधिला? ।५६।

चोरी आपुलिया सदनीं । करावी दुजियानें येउनी । ऐसी इच्छा चोरा-चियाही मनीं । नुपजे कदा ॥ ५७ ॥ तेंवी सुष्ट वा दुष्ट जनासी । गर्ह्य कर्म न रुचे कवणासी । यालागीं नीतिधर्मासी । अनुसरिजे ॥ ५८ निजमुलांचें ऐकोनि मरण । याज्ञसेनी तापसंपन्न । तियेचें करावया सांत्वन । बोले अर्जुन प्रतिज्ञा ॥ ५९ ॥ अहो हा असोनि ब्राह्मण । गर्ह्य कर्म करी दारुण । जैं तयाचें शिर तोडीन । डोळे पुसीन तैं तुझे ॥ ६० ॥ आततायी घोरकर्मी । याचें शिर छेदेन मी । बाण मारोनिया मर्मीं । डोळे पुसीन तैं तुझे ॥ ६१ ॥ गांडीव धनुष्य चढवोन । तिखट शरें शिर छेदेन । त्यावरी तूं करिशील स्नान । डोळे पुसीन तैं तुझे ॥ ६२ ॥ तुझे पुत्र जाळिले जेणें । त्या मी जैं तिखट बाणें । जाळीन तैं निजकरानें । पुसीन नयनें तव प्रिये ! ॥ ६३ ॥ एवं वदोनि पृथानंदन । कृष्णासहित रथीं बैसोन । लक्षोनि द्रोणनंदन । कपिध्वज त्यावरी धांवला ॥ ६४ ॥ आला पाहोनि गांडीवपाणी । प्राणाची आशा धरोनी । तदा पळों लागला द्रौणी । कीर्ति त्यजोनी सकळही ॥ ६५ ॥ एवं अश्वत्थामा धांवतां । पाठी अर्जुनही धांवे तत्वतां । तदा आपणा कोणी नाहीं रक्षिता । ऐसें जाणिलें द्रोणसुतें ॥ ६६ ॥ मग सकळ अस्त्रांत शिरोमणी । तें ब्रह्मास्त्र निजरक्षणीं । उफराटी गायत्री जपोनी । उपसंहार नेणोनी योजिलें ॥ ६७ ॥ तयाचें तेज भयंकर । पाहोनिया गांडीवकर । होवोनि भयचकित अंतर । श्रीकृष्णातें बोलत ॥ ६८ ॥ श्रीकृष्णा ! तूं महाभाग । भक्तांचा तूं अभयमार्ग । संसारबद्धां तूं अपवर्ग । कैवल्यरूप ॥ ६९ ॥ तूं परमात्मा परेश्वर । तूं निर्गुण प्रकृतिपर । तूं आदिकारण आणि निर्विकार । नवल असे ॥ ७० ॥ तूं आपल्या चिच्छक्तीनीं । मायेतें अभिभवोनी । कर्मफळें मूढ जीवां लागोनी । देसी परी तूं अकर्ता ॥ ७१ ॥

शिष्यः— भगवन् ! मायारहित परमात्मा मायेला वश न होऊन मूढ जीवांस जशीं कर्मफळें देतो, तद्वत् मुक्तांनां देतां येते किंवा नाहीं ? दुसरें असें कीं, परमेश्वराच्या चिच्छक्तीनेंच जर मायेचा अभिभव होतो, तर तिची निवृत्तिच झाली पाहिजे. मग त्या परमात्म्यावर फलदातृत्व वास्तविकच आलें पाहिजे.

श्रीगुरुः– अरे! याचें उत्तर श्रवण कर. रज्जूचें ठिकाणीं सर्प तिन्ही कालीं जसा नसतो; तथापि भ्रांतीनें रज्जूवरच भासतो; परंतु आरोपित केलेल्या सर्पाचा रज्जूवर अभाव असूनही रज्जू अज्ञात असतां, सर्पाला साधक होतो, बाधक होत नाहीं; तद्वत् ब्रह्माचेठायीं कालत्रयीं जरी जगत् नाहीं, तरी जीवाच्या भ्रांतीनें तें ब्रह्माचेठायींच सिद्ध आहे. आणि जोंपर्यंत जीवांनां ब्रह्मज्ञान होत नाहीं, तोंपर्यंत स्वतः नित्यमुक्तरूप व आरोपित जगद्भावरूप असूनही ब्रह्म स्वाज्ञात असतां सत्तारूप सामान्यचेतनत्वानें जगताचें साधकच होतें, बाधक होत नाहीं. ह्मणूनच स्वतः मुक्त राहूनही जीवदृष्टीनें कर्मफलदातृत्व त्यावर आरोपित होतें. त्या ब्रह्मालाच दृष्टिसृष्टिवादांत ईश्वर ह्मणतात, असें सिद्धांतबिंदूंत सांगितलें आहे. पण मुक्तांची गोष्ट तशी नाहीं. मुक्तांनां बंधकालीं बंध भासतो. आणि रज्जूच्या विशेष ज्ञानानें जशी सर्पाची निवृत्ति होते, तद्वत् शुद्ध, बुद्ध, मुक्त इत्यादि ब्रह्माच्याही विशेष ज्ञानानें संसारनिवृत्ति होते. ह्मणून जीव अज्ञानी असतां ते बद्ध आहेत, आणि ज्ञानी असतानां ते ब्रह्मरूप आहेत. तथापि सर्व सृष्टीला मुक्तांचें सन्निहितत्व कल्पणें शक्य नाहीं. कारण या कल्पांत ज्ञान ज्याला झालें आहे तो मुक्त झाला, परंतु पूर्व कल्पांत मुक्त नव्हता, हें सिद्ध आहे. परंतु ब्रह्म सर्वदांच नित्यमुक्त असून सामान्यचेतनत्वानें जगत्साधक असल्यानें सर्वदाच सन्निहित आहे. म्हणून तेंच जगताचें निमित्तोपादान होऊन कर्मफल देण्याला समर्थ आहे. आणि असन्निहितत्वामुळेंच जरी ब्रह्म होतात, तरी मुक्तांनां सृष्टिकर्तृत्व येत नाहीं. यथा, लवणकण समुद्रांत टाकला असतां तो जलरूप होतो, तथापि तरंगाचें कर्तृत्व त्या जलरूप झालेल्या लवणकणाकडे येत नाहीं, किंतु प्राक्सिद्ध समुद्राकडेच येते. तद्वत् मुक्तही ब्रह्मांत मिळाले असतां, जगत्कर्तृत्वादिक नित्यसिद्ध अशा ईश्वराकडेच राहतात. अशा प्रकारचा ईश्वर तूं आहेस, ह्मणून मायामोहित अशा जीवांनां कर्मफलें तूं स्वपराक्रमानेंच देतोस. यावरून ईश्वरच फलदाता व श्रेष्ठ आहे, हें सिद्ध होतें.

शिष्यः– महाराज! कर्माप्रमाणेंच फल होत असल्यानें किंवा ईश्वर देत असल्यानें ईश्वराच्या ठिकाणीं श्रेष्ठत्व कोणतें आहे?

**श्रीगुरु:**— ऐक. कर्में स्वत: फळें देऊं शकत नाहींत. कारण, तीं जड आहेत. दुसरें, एक वर्षी यज्ञ करून हजारों वर्षेपर्यंत स्वर्गामध्यें फळ मिळणें, यांत ईश्वराच्या पराक्रमाशिवाय कर्मांकडून स्वत: झालेली योजना दिसत नाहीं. ह्मणून ईश्वरच सर्व कांहीं दाता आहे. किंतु नैर्घृण्यवैषम्यदोष येऊं नयेत, ह्मणून मात्र जीवकर्मांची अपेक्षा ठेविली आहे. तथापि आपण कधींही कर्मपरतंत्र होत नाहीं.

॥ ओव्या ॥

आणि तेंवी तुझा हा अवतार । साधुरक्षणार्थ परिकर । ह्मणोनि तुझेठायीं साचार । विप्रलिप्सादि दोष नसती ॥ ७२ ॥ एऱ्हवीं साधूंचें रक्षण । हें तों आपेक्षिक प्रयोजन । कारण तें तंव इच्छामात्रेंकरून । होवों शके ॥ ७३ ॥ जो तूं जन्माआधीं दुग्धनिर्मिता । त्या तुज साधुरक्षणें भगवंता । अवतार घेणें लागे ह्मणतां । हास्य चित्ता येतसे ॥ ७४ यालागीं तुझ्या अवताराचें । मुख्य प्रयोजन एक साचें । कीं अनन्य एकांत भक्तांचें । वाढवावें प्रेम ॥ ७५ ॥ तथापि सहजचि येणें । होय दीनांचें उद्धरणें । मीही भयचकित मनें । दीनचि आहे ॥ ७६ ॥ यालागीं पुसतों तुज । हें येतसे भयंकर तेज । वाटे कीं जें सहज । जाळील ब्रह्मांड ॥ ७७ ॥ तें काय इंद्राचें वज्र । किंवा उतरला सहस्रकर । किंवा कवणाचें आहे अस्त्र । येवढें उत्तर सांग प्रभो ! ॥ ७८ ॥ तदा बोलिले कमलकर । पार्था ! हें अश्वत्थाम्याचें ब्रह्मास्त्र । याचें निवारण नव्हे अन्यत्र । यालागीं ब्रह्मास्त्र तूंहि योजी ॥ ७९ ॥ ऐसें ऐकूनि अर्जुन । तत्काळ करोनी आचमन । प्रतिलोम वेदजननी जपोन। ब्रह्मास्त्र सोडिलें तेंधवा ॥ ८० ॥ तीं दोन्ही अस्त्रें मिळालीं प्रबळ । तेणें निघाला तेजकल्लोळ । जळों पाहे ब्रह्मांडमंडळ । जणू प्रळयकाळ वर्तला ॥ ८१ ॥ तदा प्रजानाशसमय । पाहोनिया धनंजय । आणि श्रीकृष्णाचें ही जाणोनि हृदय । अस्त्रद्वय उपसंहरी ॥ ८२ ॥ मग कोपोनि पार्थ वीरू । तत्काळ बांधिला द्रोणकुमरू । शिबिरा न्यावा तंव शार्ङ्गधरू । अर्जुनातें बोलिला ॥ ८३ ॥ अरे ! येणें निद्रेंत वधिले सुत । म्हणोनि तूंही करी याचा घात । मारतियालागीं जो मारत । पुण्य न होत ना पाप त्यातें ॥ ८४ ॥

यद्यपि मद्यपान केलेला, असावध, उद्योगरहित, ग्रहपीडादिकांनीं बुद्धिभ्रष्ट आणि शरण आलेला व विरथ अशा शत्रूला धर्मवेत्ते मारीत नाहींत, तथापि दुसऱ्याचे प्राण घेऊन जो आपले प्राण पुष्ट करितो, त्याला मारणें हें उचित आहे. कारण त्याला मारलें असतांच त्याच्या पापांचें प्रायश्चित होऊन तो स्वर्गाला जातो. आणि त्याला दंड झाला नाहीं तर तो नरकांत पडतो, अशी स्मृतिही आहे.

॥ श्लोक ॥

'राजभिर्धृतदंडास्तुकृत्वापापानिमानवाः ॥
विधूतकल्मषायान्तिस्वर्गंसुकृतिनोयथा ॥ १ ॥'

स्मृत्यर्थः— मानवांनीं पाप केलें असतांही राजाकडून दंड धारण केला असतां पुण्यवंताप्रमाणें ते मनुष्य स्वर्गाला जातात.

शिष्यः— महाराज! माझी येथें एक शंका आहे. राजानें अपराधाची क्षमा करावी कीं नाहीं; कारण, अपराधांची क्षमा केली असतां सर्व पातकांचें क्षालन होणार नाहीं.

श्रीगुरुः— ह्या शंकेचें उत्तर देतों, तें ऐक. निवृत्तिनिष्ठांचें ठिकाणीं जशी क्षमा विधीनें सांगितली आहे, तशी राजाचें ठिकाणीं सांगितली नाहीं. राजाचें ठिकाणीं जी क्षमा सांगितली आहे, ती मनुष्याचें ठिकाणीं चूक होण्याचा संभव असल्यामुळें कदाचित् डोळा चुकून न्याय यथार्थ न झाला तर निरपराधी पुरुषाला शिक्षा होऊं नये, म्हणून सांगितली आहे. न्यून पाप केल्यानें अधिक पाप होण्याचें जर टळत असेल, तर न्यून पापच करावें, पण अधिक पाप होऊं देऊं नये, असें आत्मपुराणांत सांगितलें आहे. म्हणून अपराधी सुटणें जरी पाप आहे, तरी निरपराधी मरणें त्याहून अधिक पाप आहे. अतः, राजानें क्षमेचें अवलंबन करावें. तथापि त्यांत हा विशेष आहे. सर्वज्ञमुनींनीं सांगून ठेविलेल्या स्मृतीप्रमाणेंच न्याय करावा. आपल्या स्वतःचे नियम (कायदे) करून न्याय करूं नये. परंतु आपत्कालीं दंड वर्ज्य करून बाकीच्या राजव्यवस्थेंत स्वतःचे नियम करण्यास प्रत्यवाय नाहीं. दंडनियम मात्र सर्वथाच श्रुतीवर अवलंबून ठेवावेत. कारण, यमदंड प्रत्यक्ष पाहून आपल्या दयाळूपणानें उपयोगी पडतील तेवढे यमपुरी-

तील नियमच स्मृतींत प्रायश्चित्तार्थ घेतले आहेत. ह्मणून स्मृतीप्रमाणें बरोबर प्रायश्चित्त झालें असतां यमाकडे न जाऊन तो बरोबर स्वर्गास जातो. यद्यपि एकाच पापाचीं निरनिराळ्या स्मृतींत निरनिराळीं प्रायश्चित्तें आहेत, व तसेच निरनिराळे दंडही आहेत खरें; परंतु तेथें पश्चात्तापाचें व वृत्तीचें बलाबल पाहून श्रुत्यनुकूल स्मृत्युक्त दंड करावा. ( हें नृपनीतिविवेचन किंचित् मी आपल्या बुद्धीनें केलें असल्यामुळें प्रमाद असल्यास ते माझेच समजावेत. ) ह्मणून निद्रेंत बाळांचा घात करणाऱ्या अश्वत्थाम्याला तूं मारून टाक. हें ह्यानें फारच गर्ह्य कर्म केलें आहे. आतां तें स्वामीसंतोषासाठीं केलें ह्मणावें, तर ह्याचें निंद्य कर्म त्या दुर्योधनालाही शेवटीं आवडलें नाहीं; आणि त्वां द्रौपदीजवळ प्रतिज्ञाही केली आहे. याप्रमाणें अर्जुनाच्या परीक्षेकरितां भगवान बोलिले असतांही अश्वत्थामा गुरुपुत्र व ब्राह्मण असल्यामुळें, त्याला अर्जुनानें मारलें नाहीं. यद्यपि, गीतेवरून आततायीनां मारणें हा धर्म आहे, असें त्याला समजलें होतें, तथापि त्यानें असा विचार केला कीं,

॥ श्लोक ॥

'सुखदुःखसमेकृत्वालाभालाभौजयाऽजयौ ।
ततोयुद्धाययुज्यस्वनैवंपापमवाप्स्यसि ' ॥ १ ॥

(भ० गी० अ० २ श्लोक ३८)

॥ गद्य ॥

याप्रमाणें मला देवानें सांगितलें होतें. परंतु येथें तद्वत् स्थिति नाहीं. कारण, याला स्वतःला कोणी त्राता नसून, येथें आमचाच खात्रीनें जय होणार आहे. अशा दुर्बलावर शस्त्र धरल्यानें सुखदुःखसमबुद्धि राहत नाहीं. पुनः, मी याचा शोकापन्न होऊन जर वध केला, तर तो मोहानेंच होईल; धर्मानें होणार नाहीं. म्हणून ह्याला मारणें योग्य नाहीं. याप्रमाणें विचार करून त्याला घेऊन शिबिरास आल्यावर द्रौपदीपुढें आणलें तेव्हां ती शोक करीत होत्सातीही साध्वी ह्मणाली, 'अहो! याला सोडा. हा गुरुपुत्र आहे. ज्या द्रोणाचार्यापासून तुह्मीं अस्त्रसमूह धारण केला, तेच हे द्रोणाचार्य अश्वत्थामा झाले आहेत. कारण, 'आत्मावैपुत्रनामासि' अशी श्रुतिही आहे. शिवाय, त्या द्रोणाचार्याची स्त्री कृपीही जिवंत

आहे. ह्मणून मी ज्याप्रमाणें पुत्रशोकविव्हल आहे, तशी ती न होवो. शिवाय गुरूचें कुळ सर्वदां तुह्मांस रक्षणीय आहे. अजितेंद्रिय राजानें ब्राह्मणाचें कुळास धक्का पोंचविला असतां, तें शोकाकुल ब्रह्मकुल राजकुलास, अनल ज्याप्रमाणें क्षणांत तृण दहन करतो, तद्वत् दहन करितें. ह्मणून त्याला सोडा.' असें बोलून द्रौपदीनें अश्वत्थाम्याला नमस्कार केला. सूत ह्मणाले, याप्रमाणें तिचें तें धर्माला व न्यायाला अनुसरलेलें भाषण ऐकून श्रीकृष्णादिकांनीं तिची प्रशंसा केली. तेव्हां भीम ह्मणाला, 'अहो! हें काय? ह्या ब्राह्मणाधमानें निद्रेंत बाळांचा वध केला असल्यामुळें याचा वध करणेंच उचित आहे.' एवं भीमानें वधाविषयीं अर्जुनाला प्रवर्तविणें व द्रौपदीचें निवारण करणें पाहून, भगवान ह्मणाले 'अर्जुना!

॥ श्लोक ॥

'वपनंद्रविणादानंस्थानान्निर्यापणंतथा ॥
एषहिब्रह्मबंधूनांवधोनान्योऽस्तिदैहिकः ॥ १ ॥

अर्थः— केश काढणें, द्रव्य घेणें आणि स्वस्थानांतून काढून देणें, हाच ब्राह्मणाधमाचा वध होय. त्याचा प्राण घेणें सांगितलें नाहीं. याप्रमाणें सर्वशास्त्र करणाऱ्या माझीच आज्ञा आहे. व,

॥ श्लोक ॥

'आततायिनमायांतमपिवेदांतपारगम् ॥
जिघांसंतंजिघांसीयान्नतेनब्रह्महाभवेत् ॥ १ ॥'

अर्थः— हातांत शस्त्र घेऊन मारावयास आलेला वेदांतपारंगत जरी असला, तरी त्याला मारलें असतां ब्रह्महत्येचें पातक लागत नाहीं, अशी ही स्मृतिरूपानें माझीच आज्ञा आहे. एवं दोन्ही माझ्याच आज्ञा असल्यामुळें दोन्ही तूं पालन कर. सारांश, तूं आपली द्रौपदीजवळ केलेली प्रतिज्ञा ज्या रीतीनें सत्य होईल, व तसेंच भीमादिकांचें आणि माझें प्रिय होईल, असें कर.' याप्रमाणें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून अर्जुनानें अश्वत्थाम्याचे केश व शिरावरील मणी काढून घेऊन, तेजोहीन अशा त्याला घरांतून निष्कासिलें; व नंतर ते सर्व पांडव शोकार्त द्रौपदीसह मृतबालांचें और्ध्वदैहिक करिते झाले.

॥ दोहा ॥

भाव धरुनि अत्यंत मनीं अलकावतिपतिपाय ।
चिंतुनि श्रोतीं ऐकिजे भगवद्भक्तिउपाय ॥ ८५ ॥

हरि:ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते नानाछंदबद्धे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे द्रौणीनिग्रहो नाम सप्तमसखीप्रेषणम् ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ८ वें.

॥ श्लोक ॥

गाढानुरागिणौसिद्धौसाक्षाद्ब्रह्मस्वरूपिणौ ।
उमेशौपितरौवंदेभक्त्यापरमयामुदा ॥ १ ॥

॥ दोहा ॥

झालियाहि चितिनिष्ठ घडो गुरुचरणांची प्रीत ।
ऐशी भक्ति अखंड ही सत्पुरुषांची रीत ॥ २ ॥

॥ ओव्या ॥

आतां अष्टमप्रेषणीं । कुपित जाहला असतां द्रौणी । परीक्षिद्रक्षण तदस्त्रापासुनी । श्रीकृष्णें केलें पराक्रमें ॥ ३ ॥ तदा कुंतीनें स्तविला देव । आणि युधिष्ठिराचा शोकभाव । वर्णिला असे स्वयमेव । येथ अवधान द्याहो चतुर श्रोते ॥ ४ ॥

॥ गीति ॥

ते पांडव वनितासह श्रीरंगालाहि घेउनी संगे ।
द्याया उदक मृतांना सकलहि तैं पातले महागंगे ॥ ५ ॥
देउनि पाणि मृतांना नयनीं संप्राप्तपाणिलापानें ।
करिती स्नान त्या जळीं चिंतनेंचि जे प्रताप पापा ने ॥ ६

॥ गद्य ॥

तत्रधृतराष्ट्रंगांधारीन्द्रौपदींपृथांभीमादिसहितंयुधिष्ठिरऋषिभि:सह कृष्ण: अहोभूतेषुकालस्यविचित्रागति:कालोहिदुरतिक्रमइतिवदन्सान्त्वया-

मास । ततोऽसतोनृपान्घातयित्वायुधिष्ठिरस्यराज्यंसंसाध्यत्रिभिरश्वमेधैर्धर्मराजंयाजयित्वातद्यशःशतक्रतुरिवदिक्षुविस्तार्यपांडवानामंत्र्योद्धवसात्यकियुतोद्वैपायनादिभिःपूजितश्चभगवान्श्रीकृष्णोद्वारकां ( स्वीयांपुरीं ) गंतुंरथमारुरोह ।

॥ श्लोक ॥

तदा उत्तरा धांवुनी देवराया । करी प्रार्थना वाहुनी शीर पाया ॥
म्हणे त्राहि धांवे सख्या पूतनारी । तुझ्यावांचुनी कोण दुःखें निवारी ।८।

॥ ओव्या ॥

लोकीं जे जे पदार्थ । ते परस्पर मृत्युमंत । यालागीं निर्भय तूं भगवंत । ऐसा सिद्धांत मम मतें ॥ ८ ॥ देवा! माझिया आंगावर । तप्त लोहासम शर । येतसे तो माझें शरीर । जाळो कां सुखें ॥ ९ ॥ परी आंधळियाची काठी । तेंवी मज एकुलता गर्भ पोटीं । तयाचें पतन जगजेठी । न होय ऐसें करी कां ॥ १० ॥

॥ अभंग ॥

उत्तरेचें ऐसें करुणावचन । ऐकिलें संपूर्ण देवरायें ॥ १ ॥ जाणिलें कीं द्रोणसुताचें हें कर्म । नाशार्थ परम पांडवांच्या ॥ २ ॥ पांडवही तदा दिव्य पांच शर । पाहती समोर येतसाते ॥ ३ ॥ निवारावया तें संप्राप्त संकष्ट । निजअस्त्रें स्पष्ट प्रयोजीलीं ॥ ४ ॥ परी ब्रह्मास्त्राचें अन्यास्त्रेंकरून । नोहे निवारण कदाकाळीं ॥ ५ ॥ ऐसें जाणोनियां तदा नारायणें । जो स्वभक्तजणें पडों नेदी ॥ ६ ॥ सुदर्शनें केलें ब्रह्मास्त्रवारण । सर्व नारायण व्यापक जो ॥ ७ ॥ मायागुणें तेणें आवरिला गर्भ । वंशही सुप्रभ वाढवीला ॥ ८ ॥ जरी तें ब्रह्मास्त्र अमोघ अनंत । विष्णुतेजें शांत परी झालें ॥ ९ ॥ नव्हे हें आश्चर्य कदा नारायणीं । सर्वाश्चर्य मुनी ह्मणती ज्या ॥ १० ॥ सकळांअंतरीं सकळांनिराळा । तेथ काय कळा आश्चर्याची ॥११॥ मायेनें जो जग करी पाळी नाशी । तया कासयासी नवलावो ॥ १२ ॥ ज्ञानेश्वरप्रभु होतां कृपावंत । तैं ये भगवंत हृदयींच ॥ १३ ॥ ११ ॥

॥ ओव्या ॥

द्रौपदीसहित निजनंदन । मुक्त ब्रह्मास्त्रापासोन । जयाचिया कृपें-

करून । सहज झालें ॥ १२ ॥ तया श्रीकृष्णातें प्रयाणसमयीं । कर जोडोनि लवलाही । सप्रेमें पांडवआई । स्तविती झाली ॥ १३ ॥

॥ गद्य ॥

सूत ह्मणतात, हे शौनकादिकहो ! ज्ञान करून घेण्याचे दोन प्रकार आहेत. एक तर 'त्वंपद'विवेक करून देहादिकांहून आपल्याला भिन्न मानून घेणें, हा पहिला प्रकार; किंवा 'तत्पद'विवेक करून परमेश्वराचे गुण वर्णन करितां करितां भावनाएकत्रीभूत होत्साता अतिशय निरभिमानी होऊन, जीव व परमेश्वर एकच आहे, या स्थितीला प्राप्त होणें, हा दुसरा प्रकार. यथा—

॥ श्लोक ॥

'देहबुद्ध्यातुदासोऽहंजीवबुद्ध्यात्वदंशकः ।
आत्मबुद्ध्यात्वमेवाहमितिमेनिश्चलामतिः ॥ १ ॥'

अर्थः— हे देवा ! देह बुद्धीनें मी तुझा दास, जीवबुद्धीनें अंश, आणि आत्मबुद्धीनें तूं व मी एकच आहोंत, असा माझा पूर्ण विश्वास आहे. परंतु त्यांतही हा विशेष आहे. विहिरींतील पाणी शुद्ध ठेवावयाचें असलें तर सौंदर्णींतील पाणी किंवा आणखी कांहीं त्या विहिरींत जाऊं न दिलें पाहिजे. परंतु गंगेची गोष्ट तशी नाहीं. गंगेत ओढे, नाले, मोऱ्या, ज्या जाऊन मिळतात, त्या गंगारूपच होतात. तद्वत् महावाक्यास शुद्ध ठेवावयाचें असलें तर त्याच्याकरितां प्राज्ञ ब्राह्मणवर्गही शुद्ध ठेवावा लागतो. म्हणूनच तदनधिकारी स्त्रीशूद्रास त्या वेदरूप महावाक्याचा अधिकार नाहीं. परंतु परमेश्वराचें ठिकाणीं मन स्थापन करून निराभिमान समाधिनिष्ठ झाल्यावर ब्रह्मज्ञान करून घेण्याचा सर्वांना अधिकार आहे. अतः, कुंती स्त्री असल्यामुळें दुसऱ्या प्रकारानें ह्मणजे स्तुति करून तिनें ज्ञान संपादिलें.

शिष्यः— भगवन् ! तिनें मूर्त्युपहित श्रीकृष्णाची स्तुति केली असल्यामुळें ती कनिष्ठ आहे. तस्मात् तिजपासून उच्चतर ज्ञान कसें झालें ?

श्रीगुरुः— हें तुला दृष्टांतसहित सांगतो, तें श्रवण कर. तदर्थ परमेश्वराचीं भूमि, बीज, अंकुर, तरु, आणि फलोपम अशीं पांच रूपें

आहेत. त्यांत पहिलें शुद्ध, दुसरें मायावी, तिसरें सूत्र, चवथें विराट् आणि पांचवें हरिहर. शुद्धावांचून हीं सर्व रूपें विवर्त आहेत. ह्मणजे शुद्धाचें ठिकाणीं मायायोगानें ईशत्व ह्मणजे शबलत्व, आणि शबलाचें ठिकाणींच समष्टिअंतःकरणउपाधीनें हिरण्यगर्भत्व ह्मणजे सूत्रत्व आणि सूत्राचें ठिकाणीं समष्टिस्थूलोपाधीनेंच विराट्त्व, आणि भक्तप्रीतियोगानें शुद्धाचें ठिकाणीं हरिहरत्व.

शिष्यः—भगवन्! बाकीचीं दोन रूपें उत्तरोत्तर एकएकाचें ठिकाणीं सांगून शेवटलें हें पांचवें रूप शुद्धाचें ठिकाणीं प्रीतियोगानें होतें, असें कां ह्मणतां?

श्रीगुरुः—तुझी शंका समीचीन आहे. परंतु माझ्या ह्मणण्याचा उद्देश न समजल्यामुळें ती उत्पन्न झाली आहे. सर्व झाडांत भूमींतलाच रस येत असतो. जलांतला रस येतो, भूमींतला येत नाहीं असें तूं ह्मणशील तर शुद्धाला जलस्थानीय समज. ' पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः । सवा एष पुरुषोऽन्नरसमयः ।' या श्रुतीवरून आह्मी पृथ्वीपासून रस येतो असें ह्मटलें कारण औषधीमध्यें रसच श्रेष्ठ आहे असें वैद्यशास्त्राचें मत आहे. परंतु तो फलाचेंच ठिकाणीं व्यक्त होत असतो; तद्वत् या चारी मूर्तींचें ठिकाणीं जरी भूमिरूप ब्रह्माचाच आनंद आहे, तथापि त्याची परमव्यक्तता या फलोपम हरिहरपुरुषांत आहे. ह्मणून आह्मीं हरिहरपुरुष प्रीतियोगानें शुद्धाचें ठिकाणीं होतो, असें ह्मटलें.

शिष्यः— महाराज ! शुद्धाचें ठिकाणीं तिन्ही कालीं सर्वांचाच अभाव असल्यामुळें शबलादि हीं चारी रूपें जीवकल्पितच असलीं पाहिजेत ?

श्रीगुरुः—हं ! तुझ्या ह्मणण्याचा अर्थ मी समजलों. पण जीवकल्पित जरी तीं असलीं, तरी तीं जीवांनीं केलेलीं नाहींत; ह्मणजे जीवांच्या भेददृष्टीनें भासतात, ह्मणून तीं विवर्त आहेत. त्यांपैकीं फलोपम हरिहररूप अनध्यस्तविवर्त असून, बाकींचीं शबलादि तीन अध्यस्तविवर्त आहेत. कारण, व्यतिरेकामध्यें शबलादि तिहींचा निरास करण्यास सांगितलें आहे, तसें हरिहरमूर्तींचा निरास करून व्यतिरेक करावा, असें कोठें सांगितलें नाहीं. ज्याचा निरास करतां येतो, त्याचाच नाश

होतो. हरिहररूपाचा निरास करण्याची आवश्यकता नसल्यामुळें त्याचा ज्ञानानें नाश होत नाहीं. ह्मणून तें रूप अनध्यस्तविवर्त आहे. आणि श्रीकृष्णरूप हरिहरात्मक आहे. हें पूर्वी सांगितलें आहे, ह्मणून तेंही तसेंच आहे.

॥श्लोक॥ ' नकार्यत्वादनित्योऽयंनंदनंदनविग्रहः ॥
उपचाराद्विकार्यत्वंतत्रपौराणिकाजगुः ॥ १ ॥ '(महा० नीलकंठी )

**भावार्थः**—हें श्रीकृष्णशरीर नित्य आहे. आणि हें रूप नित्य राहावें, अशी परमेश्वराची इच्छाही आहे. मी आपल्या मायेचा व या श्रीकृष्ण-शरीराचा उपसंहार करीत नाहीं, असें नीलकंठाचार्यांनीं गीतेच्या टीकेंत भगवंताचें ह्मणणें स्पष्टही केलें आहे. तेथें आणखीही एक रहस्य आहे. ' ब्रह्मैवाविद्ययासंसरति' या वचनावरून दृष्टिसृष्टिवादी अविद्याआभास-रूप शबलाला जीव म्हणत असतात. आभास ह्मणजे मिथ्या प्रतिबिंब.

**शिष्यः**—महाराज ! ह्या वाक्याचा नीट अर्थ समजला नाहीं.

**श्रीगुरुः**—अरे ! वेदांतांत प्रतिबिंबवाद आणि आभासवाद इत्यादि जीवाविषयीं आहेत त्यांत प्रतिबिंबवादी प्रतिबिंब सत्य आहे, असें ह्मणतात, आणि आभासवादी प्रतिबिंब मिथ्या आहे असें ह्मणतात. एवढाच त्या दोन वादांतील भेद आहे. ह्मणून मी तुला आभास ह्मणजे मिथ्या प्रतिबिंब असें सांगितलें. या सर्व वादांचा विस्तर सप्रमाण 'वेदांतप्रक्रियासमुच्चय' ग्रंथावरून कळेल. याप्रमाणें अविद्याउपाधिगत मिथ्या ब्रह्मप्रतिबिंबालाच दृष्टिसृष्टिवादी जीव ह्मणतात. प्रतिबिंबानें ब्रह्माचे ठिकाणीं जें आपेक्षिक बिंबत्व त्याला ते ईश्वर ह्मणतात. सारांश, शबलादि तीन रूपें जीवमय अध्यस्तविवर्तरूप असल्यामुळें त्यांचा व्यतिरेकानें नाश करावा लागतो. आणि हरिहर आपेक्षिकबिंबोपम ईश्वराचें अनध्यस्तविवर्त रूप असल्यामुळें ब्रह्मज्ञानानें त्याचा नाश करण्याची आवश्यकता नाहीं, आणि तो होतही नाहीं

**शिष्यः**—महाराज ! हा नारायण कल्पांतरीं नाश पावतो, असें भारतांत सांगितलें आहे, त्याचा अर्थ काय ?

**श्रीगुरुः**—ह्याचा अर्थ, तो परमात्मा कोणी पाहणाराच नस-ल्यामुळें कोणालाच दृष्टिगोचर होत नाहीं, असा आहे. अन्यथा कल्पांतरीं जी या पुरुषाची योगनिद्रा सांगितली आहे, तिच्याशीं

विरोध येतो. कारण, त्या निद्रेंत भगवच्छरीर हें एकार्णवांत असतें अशीं वचनें आहेत.

शिष्यः— महाराज! हें मला आतां चांगलें समजलें.

श्रीगुरुः—बरें, ठीक झालें. अशा प्रकारचें जें शुद्ध ब्रह्म त्याला जाणून, तेंच हें अनध्यस्तविवर्त कृष्णरूप आहे. म्हणून त्याची स्तुति करून कुंतीनें ज्ञान करून घेतलें.

शिष्यः— भगवन्! हें मला चांगलें समजलेंच नाहीं.

श्रीगुरुः— अरे! जसें सुवर्ण अशा अशा प्रकारचें असतें, असें लक्षणानें तें समजून, नंतर अलंकारांचे ठिकाणीं त्याचा प्रत्यय घ्यावा, तद्वत् पूर्वी श्रवणानें परोक्ष शुद्ध ब्रह्म जाणून, अनध्यस्तविवर्तरूप श्रीकृष्णाचें ठिकाणीं स्तुति करून कुंतीनें तें अपरोक्ष करून घेतलें. याविषयीं श्रीएकनाथ महाराजांचें स्वात्मसुखांतील दृष्टांतवचन प्रमाण आहे.

॥ ओवी ॥

' म्हणे म्यां सोनें पहावें दृष्टी । तरी पुढें ठेविजेल खोटी ।
परी खोटी वेगळी भेटी । काय सुवर्ण निढळे? ' ॥

या दृष्टांताला सिद्धांतवचन तातांचें आहे.

॥ ओव्या ॥

'सोनें सोनेपणा उणें । न येतां झालें लेणें ।
तैसें न वेचतां जग होणें । अंग जया ॥ (चांगदेवपासष्टी ओवी ४)
पैं जे वाणि श्यातुका । तेचि वेगळिये वाला एका ।
तैसा एकदेशिया व्यापका । सरिसा पाडू ॥' (ज्ञा०अ०१२ओ०२५)

शिष्यः— भगवन्! माझे सर्व संशय निवृत्त झाले. आतां कुंतीनें कशी स्तुति केली, ती ऐकण्याची इच्छा आहे.

श्रीगुरुः— ठीक आहे; ऐक. कुंती म्हणते:—

॥ ओवी ॥

तूं आदिपुरुष शुद्ध साचार । तूं ईश्वर प्रकृतिपर ।
सर्वभूतां सबाह्यांतर । व्यापूनि असंसी ॥ १४ ॥

॥ गद्य ॥

श्रीगुरुः— वत्स! या ओवीचा अर्थ तूं असा समज कीं, आदि-

पुरुष हें विशेषण शुद्धाकडे लावलें असून, प्रकृतिपर हें विशेषण ईश्वराकडे लावलें आहे. ह्मणून येथें अविद्यारूप प्रकृतींत पडलेल्या प्रतिबिंबाला दृष्टिसृष्ट्यन्वयें जीवत्व असल्यामुळें, जीवप्रतिबिंबापेक्षिक बिंबत्वच ईश्वर आहे. आणि तें प्रकृतीहून पलिकडचें आहे. त्यांत आणि शुद्धांत भेद नाहीं. बिंबत्व केवळ नाममात्र आहे. तरी बिंब नाममात्र नसल्यामुळें स्तुत्य आहे. ह्या अर्थाला पुन: विसरूं नको.

हे भगवन्! तूं सर्वांच्या अंतरबाहेर असूनही तुजप्रत हीं भूतें जाणत नाहींत. कारण, ज्याप्रमाणें भूषणाद्याच्छादनामुळें नटाचें खरें स्वरूप समजत नाहीं, त्याप्रमाणें मायेमध्यें प्रतिबिंबित जे जीव, त्यांच्या आणि तुझ्यामध्यें मायेचा पडदा असल्यामुळें तुझें रूप त्यांच्या लक्ष्यांत येत नाहीं. आणि त्या प्रकृतिपर ईश्वराचेंच हें अनध्यस्त रूप असल्यामुळें हेंही त्यांच्या लक्ष्यांत येत नाहीं. परंतु तुझी कृपा ज्यावर झाली त्याला तें कळतें. ह्मणूनच माझ्यावरही तुझी कृपा आहे असें मी मानते.

॥ चूर्णिका ॥

जैंवी जलांतुनी पयो निवडी हंस । तेंवी आत्माऽनात्मविवेचनीं जे परमहंस । आणि मननिदिध्यासनीं । स्थित ह्मणोनी । महामुनी । रागद्वेष गेला ह्मणोनी । तिष्ठताती निर्मलपणीं । परी त्यांनांही आपुल्या अचिंत्य गुणीं । तूं रमविसी आकर्षुनी । यालागीं हें अनध्यस्तविवर्त रूप धरोनी । पावलासी शार्ङ्गपाणी । ऐसिया तुज आम्हीं मोक्षदानी । जाणण्या समर्थ कैंवी कामिनी । यालागीं आपुल्या कृपेंकरूनी । आह्मां दीनांही भक्तियोग देउनी । उद्धरी स्वकरांनीं कृपाळा ! ॥ १५ ॥

॥ ओव्या ॥

ह्मणोनि मी अबळा । तुझा भरंवसा घननीळा । धरोनि नमिते केवळा । दीनबंधो! ॥१६॥ तूं निजभक्तांचें कर्षिसी मन । यालागीं तुज बोलिजे कृष्ण । किंवा कृषि शद्वाचा अर्थ पूर्ण । आणि न शद्वाचा अर्थ तृप्ति ॥१७॥ एवं पूर्णता आणि तृप्ती । यांची एक करोनि स्थिति । कृष्ण ऐसेंही निश्चितीं । नाम घडे ॥ १८ ॥ ऐसा तूं कृष्ण सगुण निर्गुण । तैसें जन्म-

नामही सगुण निर्गुण । तूं वसुदेवाचा नंदन । हें जन्मनाम सगुण त्या तुज नमो ॥ १९ ॥ आणि सकल भूतें तुझ्याठायीं । वास करिती अवलाही । ह्मणोनी तुजला पाहीं । म्हणती वासु ॥ २० ॥ तोचि तूं देव । यालागीं नाम वासुदेव । एवं तूं अचिंत्यप्रभाव । त्या तुज नमो परेशा ॥ २१ ॥ तूं देवकीचा नंदन । त्या तुझें नमितें चरण । परी वार्धक्य तारुण्य सांडोन । तूं बाळ नंदगवळ्याचा ॥ २२ ॥ म्हणोनि अखंड बाल्यरूप । त्या तुज नमितें अमूप । आणि गायी चारोनि रमविले गोप । ऐसिया तुज नमितसे ॥ २३ ॥ नाभीं ज्याच्या ब्रह्मांडकमळ । भक्तार्पित कमळांची गळां माळ । संसार पाहुनीहि दृष्टीस नाहीं मळ । यालागीं कमलनेत्र तुझे ॥ २४ ॥ भक्तवृत्ति होऊनि भ्रमरी । सौरभ सेविती साचारी । यालागीं तव पादांघ्री । कमळरूप ॥ २५ ॥ एवंरूप दिनानाथा । ठेविते तव पदीं माथा । वरी तुझ्या उपकारा गणिता । मिती सर्वथा नाहीं हरे ! ॥ २६ ॥ माते देवकीहूनि मजवरी । प्रीति तुझी पूतनारी । मायेस रडविलें बंधांतरीं । मज शोका-पासोनि मुक्त केलें ॥ २७ ॥ मायेस बहुकाळ बंधन । आम्हां लाक्षा-गृहांतून । झडकरी त्वां पावोन । मुक्त केलें दयाळा ! ॥ २८ ॥ मायेचें नाहीं रक्षिलें बाळ । माझीं लेंकुरें दिलीं मजजवळ । मायेसी दुसरा नाथ केवळ । मजसी नाथ तूंचि एक ॥ २९ ॥ मायेसी दोनचि विपत्ति । त्यांतील एकीची केली मुक्ति । विपत्तिसमुदायांतूनी आह्मांप्रती । त्वां श्रीपति सोडविलें ॥ ३० ॥ मायेसी मुक्त केलें एकवेळ । आह्मां-साठीं धांवला वेळोवेळ । यालागीं त्यजोनी मोक्षादि फळ । जन्म जन्म पदकमळ सेवीन तुझे ॥ ३१ ॥ तुझे एक एक उपकार । स्मरूं तरी कोठवर । विषापासोनि वृकोदर । सोडविला ॥ ३२ ॥ वाचविलें लाक्षा-दि गृहांतून । आणि मनुष्यभक्षक राक्षसांपासून । तैसें वनवाससंकटां-तून । रक्षिलें ॥ ३३ ॥ भीष्मादि महायोद्ध्यांचें अस्त्र । तूं वारिता शार्ङ्गधर । आतां वारिलें द्रोणपुत्रास्त्र । हें म्यां नेत्रीं पाहिलें ॥ ३३ ॥ यालागीं तुझे उपकार । स्मरतां होतील अपार । ते फेडावया साचार । प्रत्युपकार कदा नोहे ॥ ३४ ॥ एवं मी सर्वथा तुझी । आतांऽहंकृति गेली माझी । परी लाचावली मति सहजी । रूपीं इया ।३५। तुज भक्तीनें

बोलावून। प्रत्युपकारें करावें पूर्ण। हें तंव सामर्थ्य नाहींचि जाण। माझिया आंगीं ॥३६॥ यालागीं श्रीगोपिकापति। आह्मां सर्वदा येवोत विपत्ती। ह्मणजे तूंचि देवोनि भेटी निश्चिती। मुक्त करित जासील आम्हां दीनां ॥ ३७ ॥ प्रत्युपकार कोणत्याही जन्मीं। करावया असमर्थचि मी। यालागीं सर्वदा आह्मी। विपत्तींत पडो पां॥ ३८ ॥ जेथ तेथ जगद्गुरो!। तुझिया प्रेमें हृदय भरो। मग तुझें दर्शन संहरो। बंधन आमुचें ॥ ३९ जें कां तुझें सुखदर्शन। तेंचि भवाचें सुदर्शन। तेंचि आमुचें कैवल्य पूर्ण। जें आत्मदर्शन मुनींचें ॥ ४० ॥ भगवन्! उत्तम कुळीं जनन। हेंचि परमार्था साधन। परी तेथचि वाढतां अभिमान। संग दारुण उपजवी ॥ ४१ ॥ जें ब्रह्मविद्ये मातृमंदिर। स्वर्ग जयांचें अग्रहार। ऐसें धन्य ब्राह्मणशरीर। परी वाढतां अहंकारमृच्छुल्क ॥ ४२ ॥ बहुभाग्यें-करोनि जाणा। सत्कुळीं जन्म जनार्दना!। परी तुज न भजतां जग-न्मोहना। उपयोग जाणा मग नसे ॥ ४३ ॥ देखे मलयचंदनतरू। परी सभोंवता द्विजिव्हभारू। तदुपयोग कोणी करूं। न शके जेंवी ॥ ४४ ॥ तेंवी उत्तमकुळीं जनन। तें वाया दवडी मदअभिमान। वरी ऐश्वर्य असतां जाण। तोचि अभिमान दृढावे ॥ ४५ ॥ त्याहीवरी जवळी धन। तेणें होय अलर्कसमान। जें जें देखे भूतसंपन्न। तेथ भुंकोन आव घाली ॥ ४६ ॥ सत्कुलादिकांचा अभिमान। तेणें न मानी विष्णुजन। विद्यागर्वेंकरूनि जाण। वडिलादिक अवमानी ॥४७॥ जे आपणापरीस निष्किंचन। त्यावरी आज्ञा घाली दारुण। तयांतें चाकरीस ठेवोन। कष्ट निर्वाण देतसे ॥ ४८ ॥ किंचित् धनाचेनि योगें। जग चाकर ह्मणे अवघें। अन्य बोलतां करी उगें। ह्मणे मजसमोर बाउगें वटवटसी ॥ ४९ ॥ चाकरीस ठेविले जे कां दीन। त्यांसी नियोजी कार्य गहन। न पाहे तयांची भूक तहान। शीत उष्ण त्यांची नेणे ॥ ५० ॥ वेळीच्यावेळीं न दे पैका। चाकरें मागतां ह्मणे ऐका। परी माझें काम सांडूं नका। ही आज्ञा देखा अनिवारू ॥ ५१ ॥ गृहीं जाहलें पितृमरण। अथवा वनिता ऋतुसंपन्न। तरी आज्ञा न दे चाकरा-

---

१. कावरलेलें कुत्रें.

कारण । विक्षेप होईल ह्मणोनि कार्मी ॥ ५२ ॥ सुशील धर्माची घातल्या पंक्ती । आज्ञा न दे गृहीं जावयाप्रती । आणि मग सांगे भूपतिनीति । ह्मणे सजाचि निश्चितीं सेवावें ॥ ५३ ॥ एवं जयाच्या हातातळीं । दीनदयेसी तिलांजुळी । धनवंत पाहतां स्वसम मेळी । तरी आरंभी टवाळी कांहीं तरी ॥ ५४ ॥ जे जे धनवंत महीवर । ते ते म्हणे दावेदार । तयातें जिंकोनि मी निर्धार । एकटा महीवर शोभेन ॥ ५५ ॥ आपणापरीस जे धनवंत । तेथ युद्ध अथवा चौर्य आरंभित । गृहा आलिया साधुसंत । न दे उसंत त्यांसि प्रेमें ॥ ५६ ॥ आपण न करीच सर्वथा दान । आणि पुत्रांदिकीं करितां जाण । त्यांसीहि दे ऐसी शिकवण । कीं येणें सदन बुडविसी तूं ॥ ५७ ॥ एवं जन्मादि मद-रीती । हें तंव आंगीं दिवसरातीं । मग एखादे वेळीं कामवृत्ति । उठतां निश्चितीं चवताळे ॥ ५८ ॥ मग ही माय ही भगिनी । ही सासू ही वहिनी । ही आपुली ही परावी कामिनी । स्वस्त्रीपरी देखत ॥ ५९ ॥ परस्त्री तंव बळें भोगी । जनलज्जें मातादिक जरी न भोगी । तरी मानसमैथुनयोगी । तेथही होय ॥ ६० ॥ अथवा भेटतां एकांत । तो तेंही करावया न लाजत । अथवा कामें जैं चरफडत । तैं माताही भोगित निजस्वप्नीं ॥ ६१ ॥ जया दानाचेंनि नांवें । तेथूनि निकें अंग घ्यावें । परी दान किंचित् करी स्वभावें । तरी तेणें गौरवे दंभवशें ॥ ६२ ॥ एक चिंधी करोनि दान । त्रिभुवनपतित्व कामी मन । एवं रजस्तमःसंपन्न । घूर्णीत लोचन काममदें ॥ ६३ ॥ ऐसा सर्वदा माया-वश । मग मुखीं नये हृषीकेश । यालागीं तूं जगन्निवास । वळसी निर्धनास दीनबंधो ॥ ६४ ॥ रज्जूचा आश्रय करोनियां । सर्प लोकां दावी भया । तेवीं तुझा आश्रय करोनिया । लक्ष्मी तव माया जन बुडवी ॥ ६५ ॥ तूं निःसंग निर्भय । लक्ष्मीवंता चौरभय । तूं चिदा-नंद यादवराय । दुःखी दूरान्वय धनवंत ॥ ६६ ॥ लक्ष्मी तुझे चुरी चरण । आणि सेवा घे धनिकांकडून । तूं न इच्छितां तुझे धरी चरण । इच्छितां धनवान चपल राहे ॥ ६७ ॥ ह्मणोनी यशोदागर्भरत्ना । जे वमनासम मानिती धना । तयांच्या किंचिन्मात्र यत्ना । तूंचि फळ-सी ॥ ६८ ॥ कामसंपन्न होतां तरुण । परी मूत्रपात्रें फळे कामिन ।

आणि बाल दीनभावें करितां रूदन । तरी दुग्धपानें फळे जननी ॥ ६९ तेंवी जन्मादिमदें यादवराया । नरकाचि दे तुझी माया । निर्धन किंचित् ध्यातां तव पाया । तरी फळसी तया तूं सच्चित्सुख ॥ ७० ॥ निर्धन भजकां तूंचि धन । तूं आत्माराम जगज्जीवन । यालागीं पुरुषार्थकांक्षा जाण । तुझेठायीं न सांपडे ॥ ७१ ॥ तूं सकल धर्मा आदिकारण । तुजाचि पावती धर्मसंपन्न । यालागीं तुज धर्माचरण- । विना दीनोद्धरण अप्रयोजक ॥७२॥ लक्ष्मी तुझे सेवी पाय । म्हणोनि नलगे तुज अर्थ- उपाय । तूं नित्यतृप्त यादवराय । ह्मणोनि नोहे काम तुज ॥ ७३ ॥ तिन्ही काळीं तुझेठायीं । जगज्जन्मादि सर्वथा नाहीं । यालागीं तुज फणिशायी । मोक्ष लवलाही न गुंतवी ॥ ७४ ॥ तो तूं भक्तवत्सल आत्माराम । रागद्वेषवर्जित परम । तुज वश करी एक प्रेम । पुरुषोत्तम अजित तूं ॥ ७५ ॥ एवं दीनमनोरथपूर्ते । हे माउली चिद्घनमूर्ते । जे तूं परब्रह्म निरुतें । त्या तुज नमितें सद्भावें ॥ ७६ ॥ एवं तूं नित्य- तृप्त । परी मोक्षादिक पुरुषार्थ । तुझे पायीं समस्त । लोळती प्रभो ! ॥ ७७ ॥ मोक्षाऐसें धन । तूं वैरियाही देसी पूर्ण । मग भक्त रक्षिसी हें वचन । केतुलें स्तवन साजेल ? ॥ ७८ ॥ तुझा भक्तांचियेठायीं । प्रेम न वर्णवे शेषशायी । मोक्षादि देवोनि लवलाही । शेखीं आंगेंही करिसी सेवा ॥ ७९ ॥ ऐसिया तुज नारायणा । लोटांगणीं आलें चरणा । दीनानाथा जगन्मोहना । यशोदानंदना जगत्पते ! ॥ ८० ॥ भगवन् ! तूं नव्हेसी देवकीसुत । ह्मणजे मानुषधर्में अलिंपित । त्वत्तो- जगज्जन्मादि समस्त । यालागीं निश्चित काळरूप तूं ॥८१॥ परी काळ जैसा अचेतन । तैसा तूं नव्हसी ईशान । तूं जगज्जन्मादावुपादान । या- लागीं काळ ह्मणती तुज ।८२। आणि तूंचि आपण निमित्त हेतू । यालागीं ई- शानशद्ब प्रवृत्तू । सर्वनियामक भगवंतू । आदि अंतू तुज नाहीं ।८३। सांगावया ब्रह्मसंपन्न । काल ऐसें कुंतीवचन । करावया वैशेषिककाल- व्यावर्तन । ह्मणे ईशान देवासी ॥ ८४ ॥ शैववैष्णवादिद्वैतीमत । ह्मणती ईश्वर केवल निमित्त । तें निरसावया अनादि अनंत । कुंती बोलत भगवंता ॥ ८५ ॥ तूं पर्जन्यवत्साधारणहेतू । परी स्वसंकल्प बीजभूतू । घेउनी भूतगण समस्तू । त्वद्वशें प्रवृत्तू स्वस्वकर्मीं ॥ ८६ ॥

तूं भूतांच्या कर्मेकरून । तया वर्तेविसी आपण । ह्मणोनी न होसी विषम वा निर्घृण । समसमान सर्वत्र ॥८७॥ सकल विश्वाचित्रें गोमटीं । राहती तव रूपीं आद्यपटीं । तो तूं मानुषरूपें जगजेठी । लीला कोटी दाविसी ।८८। परी हें मानुषरूपही तुवां । किमर्थ धरिलें देवाधिदेवा? । हें जाणावयाही वासुदेवा । समर्थभावा नये कोणी ॥ ८९ ॥ तूं साधूवरी अनुग्रह करिसी । दुर्जनांतें संहारिसी । ऐसें विषमत्व वदती तुजसी । ते मूढ निःशेषीं मायिके ॥ ९० ॥ सद्गुरू ह्मणे हे तात ! । या कुंती-वचनावरूनि अर्थ । निघोपाहे पूर्वोक्त । तें तुज स्मरण आहे कीं ? ।९१ एवं प्रेमविवर्द्धन । हें कृष्णावतारमुख्यप्रयोजन । आपेक्षिककार्य संतरक्षण । दुर्जनहरण गौणकार्य ॥ ९२ ॥ कुंती ह्मणे भगवंता । दुष्टां मारोनि रक्षिसी संता । हें म्हणणें अज्ञान अनंता । असें सर्वथा मी जाणे ॥९३॥ मेघांचें पाणी गोड उंसीं । आणि तेंचि मारक होय विषीं । परी येथें कायी पर्जन्यासी । कर्तृता आहे ? ॥ ९४ ॥ तेंवी सत्कर्मै तारिसी सज्जनां । दुष्कर्में मारिसी दुर्जनां । परी तुजला नारायणा । कर्तृता नाहीं ॥ ९५ ॥ ईश्वर सृजी पाळी संहारी । ऐसें बोलणें चराचरीं । तें अज्ञान आरोपकारी । तूं निर्विकारी पूर्णब्रह्म ॥९६॥ तुज अजन्मातें जन्म । तुज अकर्मातें कर्म । तुज अनामातें नाम । आश्चर्य परम हें वाटे ।९७। ज्या तुज ह्मणती श्रुति वाहवा! । तो तूं तिर्यग्योनींत वराहा । ज्या तुझे एकदेशी विराट्र हा । तो तूं वामन ऋषिवंशी ।९८। जो तूं जगाचें जीवन । तो तूं जीवनीं मत्स्य कूर्म आपण । जो तूं आत्माराम नारायण । तो तूं रघुनंदन मानुषजन्मीं ॥ ९९एवमादिकरूनि अनंता । तुझीं चरित्रें कमलाकांता । मोह करिती अज्ञचित्ता । सूज्ञ भक्तां तूं ज्ञेय होसी ॥ १०० ॥ एवं ऋष्यादौ जरी तुझ्या व्यक्ती । तरी तुज नाहीं अविद्याख्याती । हें न जाणोनि तुज पाहती । तत्तदादिरूप ॥ १ ॥ आणि तुझी ही लीला परेशा । अगाधचि असे हृषीकेशा । तें आश्चर्य करवी रमेशा । सज्ज-नांसी ॥ २ ॥

॥ अभंग ॥

दूधदधिभांडे फोडिलें म्हणोनी । यशोदा बांधोनी ठेवी तूज ॥ १ ॥ नव लक्ष दावें लाविलें उदरीं । रडसी पुरारिमित्र तूं तैं ॥ २ ॥ मायभेणें

आंग कांपे थरथरा । उभा शार्ङ्गधरा अधोवक्त्र ॥ ३ ॥ ऐसी दशा दृष्टीं पाहोनियां देवा । आश्चर्येंही जीवा फार वाटे ॥ ४ ॥ तुझी माया भज न करो आवृति । हाचि राधापति वर देई ॥ ५ ॥ ज्ञानेश्वरमित्र तूंचि कृपासिंधू । मुझी दीनबंधू तुज ध्याती ॥ ६ ॥ १०३ ॥

॥ गीति ॥

भयही भीत जयातें तो तूं मायेस भीसि गोपाळा ।
पाहुनि चकितचित्त मुनि केंवी मी तेथ जाणती बाळा ॥ १०४ ॥

॥ ओव्या ॥

तूं जगन्मोहन आणि जगज्जीवन । म्हणोनि तव चारित्रें वर्णिती सज्जन । जैसें सूर्यतेज नव्हे सहन । परी तमनिवारणा नयन अपेक्षिती ॥ ५ ॥ तैसें तुझें न कळे चरित । परी आपुली व्हावया शुद्धी यथार्थ । जैसा भाविती तैसा तुजप्रत । वर्णिती समस्त लीलात्मका ॥ ६ ॥

॥ गीति ॥

कोणी बोलति अज हरि यदुपांडवकीर्तिसाठिं अवतरला ।
चंदनपादपगंधें मलयगिरी ज्यापरी यशें वरिला ॥ ७ ॥

॥ ओव्या ॥

पूर्वी सुतपा प्रजापती । तपें पुत्र मागतां तुजप्रती । तूं बोलिलासी ॐ इति । तोचि सुतपा संप्रति वसुदेव ॥ ८ ॥ आणि तयाची भार्या पृष्णी । ते येजन्मीं देवकी जननी । वरसिद्धि करावया लागुनी । तूं बाळ झालासि त्यांचा ॥ ९ ॥ तूं अजन्मा भगवंत । परी तव जन्म विश्वक्षेमार्थ । आणि दुर्जनांचा घात । करोनि संत रक्षिसी ॥ १० ॥

॥ अभंग ॥

कोणी ह्मणताती कुंभिनी सागरीं । बुडतां साचारी नौकेसम ॥१॥
तदाऽविंदजन्में प्रार्थिलें तुजला । ह्मणोनी जन्मला अजही तूं ॥ २ ॥
उतरावयासी पृथ्वीचा भार । तुझा अवतार विश्वनाथा ॥ ३ ॥
बोलताती ऐसेंही कोणी सज्जन । ज्ञानेश्वरीं लीन चित्त ज्यांचें । ४ । ११

॥ ओव्या ॥

एवमापेक्षिक आनुषंगिक । तुझीं प्रयोजनें वदती अनेक । आतां जे ब्रह्मनिष्ठ त्वदात्मक । ते तव मुख्य प्रयोजन वदती ॥ १२ ॥ स्वस्वरूपाचा विसर । तोचि अज्ञान अडदर । तेणें मी देह हा अहंकार ।

वृद्धि पावे ॥ १३ ॥ तया अहंकारें कामबुद्धि । कामेंकरोनि कर्मवृद्धि । नाना निषेध नाना विधी । तेणें क्लेशाभिसंधि प्राणियां ॥ १४ ॥ एवं जे दुःखित दीन । तिहीं करावें श्रवण कीर्तन । ह्मणोनी अजन्माही तूं भगवान । चरित्रें नाना करितोसी ॥ १५ ॥ कृष्णावतारमुख्यप्रयोजन । तुझें हें कीं प्रेमवर्द्धन । तो तूं नंदयशोदात्मजनन । गोपीकुचमर्दन गोविंदू ॥ १६ ॥ मुळीं 'करिष्यन्' ऐसें वचन । तेथ एवमर्थद्योतन । कीं जें हें मुख्य प्रयोजन । तें भूत भविष्य वर्जोन वर्तमान सदा ॥ १७ मागील अन्य मतांतर । तें भूतकालिक समग्र । आणि हें ब्रह्मनिष्ठ-मत साचार । कीं वर्तमान अवतार सर्वदा हा ॥ १८ ॥ श्रवण कीर्तना-योग्य चरित्रें । करीत होत्सातां अतिविचित्रें । जन करिसी प्रेमपात्रें । भक्तिरात्रेंकरोनी ॥ १९ ॥ जेधवां जेधवां स्मरतील भक्त । तेधवां तेधवां प्रगट तूं अनंत । ह्मणोनि 'करिष्यन्' हें वचन यथार्थ । पराशरसूत बोलिले ॥ १२० ॥ ह्मणोनि मागील मतांहून । हेंचि मत परम प्रमाण। कारण जे वर्णिती तव गुण । आणि करिती श्रवण आदरें ॥ २१ ॥ तव गुणाचि धरिती मनीं । त्यांतचि रमती दिवसरजनीं । तेचि क्षण न लगत क्षणीं । तुझिये चरणीं मिसळती ॥ २२ ॥ ज्या पदीं तिहीं काळीं भव । न धरी भावना अभाव । ते तुझे पद स्वयमेव । तव चरित्र गावोनि पावती ॥ २३ ॥ मुळीं 'अंबुज' ऐसें पद । येणें हा अर्थबोध । कीं या संसारीं असोनि प्रसिद्ध । कमलसम भवजळीं नातु-डती ॥ २४ ॥ एवं चरण नातुळती भवजळा । तरी तूं केंवी आतुळ-शील घननीळा । ह्मणोनी तुझीही तनू केवळा । अनध्यस्तविवर्ती ॥ २५

॥ पद ॥

जय जय जय दीनबंधु भुवनसुंदरा । अनुचित तव गमन आज इंदिरावरा । जय जय जय० ॥ धृ० ॥ आह्मि तुझें श्वान सर्व जाण पोसणें । विकत घेतलेंचि तुवां देउनी पणें ॥ १ ॥ मारुनिया गोत्र अर्कीं पाडिलें नृपा । यास्तव ते द्वेषिताति तूं करी कृपा ॥ २ ॥ तम

---

१. रात्र शद्ब 'पंचरात्रागमांत' ज्ञानवाची आहे.

जनां तूंचि एक अमृतप्रपा । ह्मणोनि प्रभू शरण तुला मी अपत्रपा[1] । ३ अलकावतिकांतमित्र तूं कृपाघना । सकलहृदयिं नांदतोसि स्वामि चिद्घना ॥ ४ ॥ २६ ॥

॥ ओव्या ॥

तुजवीण यादव आणि पांडव । न पवती कीर्तिशोभातांडव । जैसा नियामक नसतां जीव । कलेवर सावेव अमंगळ ॥ २७ ॥ प्रभो ! आह्मीं तुजवांचुनी । अतितुच्छ कीं वाचुनी । गृहस्वामी नसतां शुनी । केंवी जनीं वानिजे ॥ २८ ॥

॥ करुणास्यवृत्तम् ॥
( वृजभाषांतर्गतगीतिकाधारेण. )

तव पादचिन्हितही नसे जरि (यदि) कुंभिनी यदुरक्षका ।
मणिशैलवृक्षयुताहि किंतु न शोभते भवभक्षका ॥
महि जिंकिली मैमजें असें जन बोलती परि त्वद्विना ।
किमपी न विष्णु समर्थता तव दारुयंत्रनियुग्जना ॥ २९ ॥

॥ ओव्या ॥

हे उत्तम देश ह्या नदी । हे पर्वत ह्या औषधी । तुझिया दृष्टीं कृपानिधी । पावती वृद्धि स्वानंदें ॥ १३० ॥ तुझें वज्रांकुश साजिरें । जें ध्यातां भजकमोह जिरे । तें न दिसतां पूतनारे ! । सौंदर्य सारें हरपतें ॥ ३१ ॥

॥ श्लोक ॥

जातां हरी कुशल तें नच पांडवांते ।
राही तरी सुख नव्हे मग यादवांते ॥
एवं बघोनि अति व्याकुल चित्तसत्वा ।
प्रार्थि स्वयें सुत ह्मणे परमार्थतत्वा ॥ ३२ ॥

॥ ओव्या ॥

तूं विश्वात्मा सर्वेश्वर । निर्गुण ब्रह्म निर्विकार । ज्ञानप्राप्यानंदसार । मुनिनिर्धारानिजानिष्ठ ॥ ३३ ॥ तूं विश्वेश कर्पूरगौर । करिसी प्रलयीं प्रत्याहार । उपादान ह्मणोनि साचार । तूंचि एक ॥ ३४ ॥ तूं

---

१ गेली आहे लज्जा जीची अशी. २ माझे पुत्र.

विश्वरूप महाविष्णू । स्वभक्तापराधसहिष्णू । जैसा तुवां बोधिला जिष्णू निजज्ञान देउनी ॥ ३५ ॥ तेंवी माझे पांडव यादव । परी हा केवळ अहंभाव । येथ स्नेह जो स्वयमेव । तो हे माधव ! निवारी ॥ ३६ ॥ तूं समान सर्वांभूतीं । मज देवोनि स्वानुभूती । नित्य हृदयीं करी वस्ती । कारुण्यमूर्ति परेशा ॥ ३७ ॥ स्नेहपाश हा अतिदृढ । जीवां बांधी अवघड। तूं आह्मां भेटलासी उघड । तरी हा तोड भवरोग । ३८ ।

॥ अभंग ॥

तुझेठायीं चित्त अनन्य हो लीन । वृद्धि क्षणक्षण प्रीति पावो ॥ १ ॥
घडीघडी वाढो पायांची आवडी । प्रेमाची कावडी उचंबळो ॥ २ ॥
देह जावो राहो तेथें नको जीव । तुझेठायीं भाव दृढ लागो ॥ ३ ॥
अविच्छिन्न चाले जैसी तैलधारा । तैसी सर्वेश्वरा त्वयि भक्ति ॥ ४ ॥
मिळतां सागरा बहुविध ओघा । न गणीच गंगा जयापरी ॥ ५ ॥
तैसें माझें मन न गणोचि विघ्न । तव पादध्यान ठसावो या ॥ ६ ॥
आळंदीचा राणा कृपावंत होय । साधेल हें कार्य झडकरी ॥ ७ । ३९॥

॥ गीति ॥

श्रीकृष्णाऽर्जुनमित्रा यदुपति महिपतिकुकामकुलदमन ।
नित्य पराक्रमशीला तव[1] पद गगनजजजोद्भवा नमन ॥ १४० ॥

॥ अभंग ॥

पूर्णकाम नित्य तृप्त तूं गोविंद । स्मरतो अनिंद मुनीगण ॥ १ ॥
गायीब्राह्मणांचें करावें रक्षण । आणीक भक्षण भूद्रुहांचें ॥ २ ॥
सुरकार्य तेंही सहजचि व्हावें । दीन उद्धरावे लीलागानें ॥ ३ ॥
ह्मणोनियां जन्म सगुण सुंदर । प्रेमळमंदिर नारायणा ॥ ४ ॥
योगी तुज ध्याती ह्मणोनी निर्गुण । तोचि तूं सगुण भक्तांसाठीं ॥ ५ ॥
ब्रह्मादिक गुरु त्यांचाही तूं गुरू । भावें नमस्कारू पायीं तुझ्या ॥ ६ ॥
ज्ञानेश्वर स्वामी करी कृपादृष्टी । सदा तूंचि सृष्टीं भासतोसी ॥ ७ । ४१ ।

॥ ओव्या ॥

एवं अखिलोदय गोविंद । कुंतीनें स्तवितां परमानंद । मुख करोनी स्मित मंद । चित्त भक्तांचें कर्षिलें ॥ ४२ ॥ अथवा तें हास्यचि

---

१. पाठभेदः— तव चरण नभजजजातजा नमन ।

माया । तिनेंचि मोह पाडोनिया । सांत्वन करोनी कुंत्यादि प्रायः । गुंतुमिच्छि द्वारवती ॥ ४३ ॥ आपलें ठिकाणीं अनन्य भक्ति । कुंतीनें मागितली होती । ते तथास्तु म्हणोनी श्रीपती । गजपुराप्रति प्रवेशले ॥ ४४ ॥ तेथ राहोनि कांहीं दिवस । पुसोनि सुभद्रादि स्त्रियांस । स्वपुरा जातां जगन्निवास । वर्तला पांडवांस आकांतू ॥ ४५ ॥ मग युधिष्ठिरादि सकळ । सप्रेमें वंदिती चरणकमळ । म्हणती यदुपते कांहीं वेळ । आणखी राही दयाळा ! ॥ ४६ ॥ त्यजुनी धन सदन कामिनी । योगी तुज न विसंबिती मनीं । आम्ही सप्रेम नाहीं ह्मणोनी । जातोसि काय गोविंदा ? ॥ १४७ ॥ परी अनुग्रह करोनि देवा । आपला अधिक वास व्हावा । ऐसिया पाहोनि भक्तिभावा । आलें माधवा अवश्य राहणें ॥ ४८ ॥ युधिष्ठिर शोकसंपन्न । पाहोनि व्यासादि सांगती ज्ञान । आणि तैसाचि बोधी श्रीकृष्ण । कथाप्रगायन करोनी ॥ ४९ ॥ परी न सुटे धर्मशोक । येथ श्रोते होतील साशंक । कीं व्यासादिकीं बोधूनि देख । धर्म निःशोक कां न झाला ? ॥ १५० ॥ तरी ऐका समाधान । भीष्मयशविवर्द्धन । व्हावें म्हणोनि धर्मे ज्ञान । त्यापासोन शिकावें ॥ ५१ ॥ हा ईश्वराचा अभिप्राय । तो अद्भुतकर्मा यादवराय । स्वयें जरी बोधिता होय । तरी अबोधवदुपाय दृढ करी ॥ ५२ ॥ जेंवी कौरवांसि संधी करावयासि गेला । परी युद्धाचि दृढ करोनि आला । तेंवी भीष्मापासोनि ज्ञान मिळावें युधिष्ठिराला । ह्मणोनि लौकिकत्वें बोधिला परी शोकयुक्त ॥ ५३ ॥ व्यासांनीं ऐसें जाणोन । वरिवरी करिती सांत्वन । भीष्माकडे धर्मालागून । जावें घेऊन हरि इच्छी ॥ ५४ ॥ श्रीकृष्णाचा अभिप्राय । व्यासादिकीं जाणला होय । म्हणोनी शोक करी धर्मराय । तें निमुटपणें पाहती ॥ ५५ ॥

॥ गद्य ॥

व्यासाद्यैःप्रबोधितोऽपिशुचाव्याप्तःसन्नाबुध्यतविवेकंनप्राप । कुतः? ईश्वरेहाया अज्ञैःस्वभक्तभीष्मनिर्याणमहोत्सवायराज्ञासहकुरुक्षेत्रंगंतव्यं तत्रतन्मुखेनैवायंप्रबोधनीयइतीश्वराभिप्रायः कार्यद्वयविधायकस्तमजानाद्धि-रिति ।

याठिकाणीं श्रीधराचार्य ह्मणतात:—श्रीकृष्णाचा अभिप्राय व्यासादिकांनां समजला नाहीं; तें त्यांचें ह्मणणें खरेंही असेल, पण तूं व्यास होऊन संसाररहित सर्वज्ञ होशील; भूत, भविष्य, वर्तमान, तुझ्या जाणण्याच्या पलीकडे कांहींच राहणार नाहीं, असा अपांतरतमसुनीला विष्णूंनीं वर दिला; या महाभारतवचनासी विरोधी वाटते.

॥ ओव्या ॥

सूत ह्मणे शौनकादि मुनी । युधिष्ठिर संतप्त मनीं । ह्मणे पहा मी किती अज्ञानी । मारिल्या अक्षौहिणी वृथा ॥५६॥ देह तों कीटकादींचें खाजें । तें म्यां ह्मणोनिया माझें । कौरवादि मानोनि दुजे । वधिले समाजे मिळोनी ॥५७॥ मारिले गुरू मारिलें बाळ। ऐसा मी हिंसक महाखळ । नरकीं राहतां अनंत काळ । सुटका नव्हेल पैं माझी ॥५८॥ हा! हा! कटकटा ह्मणोनी । निकें अंग घाली धरणीं । पुढतीं म्हणे अक्षौहिणी । म्यां निर्याणीं पाठविल्या ॥ ५९ ॥ युद्धीं मारतां वैरी । पाप नाहीं निर्धारी । हें बोलिलें आहे शास्त्रीं । परी ममांतरीं न ठसावें ॥ १६० ॥ केवळ प्रजा पाळावया । युद्धीं मारतां वैरिया । पाप नाहीं या अभिप्राया । वदे शास्त्र ॥ १६१ ॥ म्यां तंव राज्यलोभेंकरून । मारिले बाळ गुरुजन । यालागीं पापसंपन्न । अत्यंत जाण मी असे ॥ ६२ ॥ आणि माझिया हातीं । ज्या साध्वींचे मेले पती । उद्देश नसतांही मजप्रती । घडला द्रोहो स्त्रियांचा ॥ ६३ ॥ त्या पापांचा निर्गम । करूं न शके गृहस्थकर्म । नानायज्ञगणसंभ्रम । माझें पाप न निवर्ती ॥ ६४ ॥ किंचित्पंकेंकरूनि जाण । पंकाब्धीचें नव्हे क्षालन । कीं किंचित् केलें मद्यपान । तेंचि बहु करून काय पुण्य ॥ ६५ ॥ प्रमादें केली भूतहिंसा । आणि तें पापनिवारणा बहु हिंसा । कां ऐसें करी तयाचा धिंवसा । मात्र उरे ॥ ६६ ॥ जिवंत न पोसितां गुरुजन । मेलिया करणें गयावर्जन । तेंवी पशुहिंसायुत याग करून । मम मोचन कदा नोहे ॥ ६७ ॥ अश्वमेधें पापनिवृत्ति । ऐसी जरी सांगे श्रुति । तें प्रमाण तथापि निश्चितीं । चित्ता शांति येईना ॥ ६८ ॥ एवं धर्म शोकसंपन्न । तयासी आतां जगज्जीवन । भीष्माकरवीं वदवील ज्ञान । रसाळ निरूपण हें पुढें ॥ ६९ ॥

॥ दोहा ॥

अलकावतिपतिपादुका संसृतिकुवनकुठार ।
हृदयिं धरुनि मुनि पावती स्वपद करुनि रिपु ठार ॥ १७० ॥

हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे कुंतिस्तुतियुधिष्ठिरानुतापनिरूपणन्नाम अष्टमसखीप्रेषणम् ।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ९ वें.

॥ पद ॥

नूतनजलदतनू । वंदू ॥ ध्रु० ॥ ज्याचा आश्रय करुनी वदती भजक विभव न गणू ॥ १ ॥ यद्वाणीच्या दृढ विश्वासें । हरत कुतार्कि ननू ॥ २ ॥ अलकावतिपतिनंदिनिप्रियकर । जो सच्चित्कघनू ॥ ३ ॥ १ ॥

॥ दिंडी ॥

सूत बोले तेधवां विप्रराया । प्रजाद्रोहें तापली धर्मकाया ॥
धर्म जाणाया कुरुक्षेत्रिं जावें । भीष्मभेटी होईल प्रेमभावें ॥२॥

॥ अभंग ॥

धर्माचे मनींचा सर्व अभिप्राय । स्वामी यदुराय जाणता तो ॥ १ ॥
तेच क्षणीं दिलें अनुमोदनातें । म्हणे हेंचि सत्य जाण धर्मा ॥ २ ॥
सकळ धर्माचा जाणता तो एक । समर्थ सम्यक देवव्रत ॥ ३ ॥
चला तेथें आतां सर्वजण जाऊं । ऐकोनीयां घेऊं शुद्ध ज्ञान ॥ ४ ॥
ऐसें बोलोनीयां कृष्ण व्यास धौम्य । आणिकही सौम्य सर्वजण ॥ ५ ॥
चारी बंधूसह युधिष्ठिर रावो । झाले स्वयमेवो रथारूढ ॥ ६ ॥
आले तदा भीष्मशरशय्येपाशीं । नमिती पायांसी सहाष्टांगें ॥ ७ ॥
ज्ञानेश्वरप्रभू जीविंचा जिव्हाळा । पुढें ज्ञानकळा उपदेशी ॥ ८ ॥ ३ ॥

॥ गद्य ॥

एवंयुधिष्ठिरोदेवव्रतवक्त्रात्ज्ञानंगृहीतुमागतइतिज्ञात्वाप्रेम्णाश्रीकृष्णदर्शनंचभवतीतिविचार्य देवर्षयोब्रह्मर्षयोराजर्षयश्चतथापर्वतोनारदोधौम्योव्यासोबृहदश्वाभरद्वाजःपरशुरामोवासिष्ठइंद्रप्रमदस्त्रितोगृत्समदःकक्षीवान्गौतमोऽत्रिःकौशिकःकश्यपःशुकाऽन्येचऋषयःशिष्यैःसहभीष्मसमागमंकर्तुंसमागताः। तानेतान्दृष्ट्वासभगवान्गांगेयःप्रेम्णापूजयामास। श्रीकृष्णश्चतनुवाङ्मनोभिरर्चितवानग्रेयुधिष्ठिरादीन्पंडुजान्दृष्ट्वेदमाह।

॥ ओव्या ॥

स्नेहें जलभरीलोचन। वदे भागीरथीनंदन। तुह्मी सर्वेही धर्मसंपन्न। काय ह्मणून शोकग्रस्त ॥ ४ ॥ तूं युधिष्ठिर तूं भीम तूं अर्जुन। तुह्मी दोघे माद्रीनंदन। शोक करितां काय ह्मणोन। जीवीं अज्ञान धरोनी ॥५॥ येथ तुमचे पाठिराखे। हे व्यासादिविप्र निके। जयांच्या आश्रयें नेटके। भूमिपालनीं समर्थ ॥६॥ पाळावया गायी ब्राह्मण। तुम्हां झालें तनुधारण। ते तुम्ही शोक करितां दारुण। तरी अन्याय पूर्ण भज वाटे ॥ ७ ॥ परलोकीं तुमचा पाठिराखा। आणि इहलोकींही परमसखा। सत्य धर्म असतां देखा। किमर्थ शोका आतुळले ॥ ८ ॥ पुनः स्नेहातुरवाणी। ह्मणे विप्र धर्म शार्ङ्गपाणी। आधार असतां तुह्मालागुनी। क्लेश जीवनीं होताती ॥ ९ ॥ जेथ विप्र धर्म कृष्ण। तेथ दुःखनिकृंतन। परी तुमचें दुःखीं जीवन। आश्चर्य पूर्ण मज वाटे ।१०।

॥ गीति ॥

अतिरथि पंडु दिवंगत जेव्हां आणी तह्मीहि अतिलहान।
तैं तुमच्या मातेनें कष्टहि किति सांगु सोशिले गहन ॥ ११ ॥

॥ ओव्या ॥

एवं तुमचियावर। दुःख कोसळें वारंवार। येथ काळगतीच अनिवार। ऐसें मी ह्मणे ॥ १२ ॥ कृष्णाऐसा पाठिराखा। आणि गांडीव धनुष्य देखा। ध्वजस्तंभीं रघुपतिसखा। रथ तरी निका अक्षय ॥ १३ ॥ राजा तंव धर्मसंपन्न। गदाधारी पवनजनन। अस्त्रवेत्ता शक्रनंदन। विपत्ती दारुण परि होती ॥ १४ ॥ यास्तव मज ऐसें वाटे। हें सर्व काळकृत ओखटें। जगचि हें नेटपाटे। काळचपेटे साहत

॥ १५ ॥ दोन्ही कर जोडून । शिष्य सादर करी प्रश्न । कीं सकळातें जैं काल कारण । तरी प्रयत्न कां कीजे ॥ १६ ॥ तदा समर्थ श्रीगुरु-रावो । फेडिती शिष्यसंदेहभावो । वक्ता ह्मणे तें ऐका हो । श्रोते निर्मोह चतुर तुम्ही ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥

श्रीगुरुरुवाचः— दुःखंस्वभावतोद्वेष्यंतन्निवृत्तिरपेक्ष्यते ॥
तथापिभुक्तंनष्टंस्याद्वर्तमानंविनश्यति ॥ १८ ॥
तस्मात्सर्वप्रयत्नेनहेयंदुःखमनागतम् ॥
योगसूत्रसांख्यभाष्याभ्यामेतदुपपादितम् ॥ १९ ॥
कालोदैवंपरेशेच्छाभूतशोकनिवृत्तये ॥
भाविहानौप्रयत्नस्यादतोमोहंत्यजतुव्रज ॥ २० ॥

॥ गद्य ॥

याप्रमाणें हें सर्व कालाच्या योगानें झालें आहे, अथवा दैवानें झालें आहे, अथवा परमेश्वरानें केलें आहे, इत्यादि समाधान झालेल्या सर्व दुःखाविषयीं शोक करणाऱ्याकरितां समजावें. अनागत दुःखांची निवृत्तिही कालादिकांनेंच होईल असें मात्र समजूं नये. कारण अतीत दुःख भुक्त असल्यामुळें त्याविषयीं शोक करणें व्यर्थ आहे. परंतु अनागत दुःख निवृत्त करण्याला योग्य आहे. असें योगसूत्रांत व सांख्य-भाष्यांत सांगितलें असल्यामुळें, तेथें प्रयत्नच अपेक्षित आहे. अन्यथा पुढील जरामृत्युआदिक दोष जाणून जें वैराग्य होतें तें व्यर्थच होऊं लागेल. शिवाय काल, दैव, आणि ईश्वर यांची जरी सर्वांनां साधारण अपेक्षा आहे, तरी विशेष अपेक्षा प्रयत्नाची आहे. म्हणून अतीत दुःखाविषयीं शोक करीत होत्साता धैर्य सांडून प्रयत्नशून्य होणें विबु-धांस योग्य नाहीं. अशा अभिप्रायानें हें सर्व अतीत दुःख काल-दैवाच्या योगानें झालें आहे असें मी मानतो, असें भीष्म बोलले. पुनः भीष्म म्हणाले, हे युधिष्ठिर! तूं या श्रीकृष्णाच्या अनुवर्ती होऊन प्रजांचें रक्षण कर. हा परमात्मा धर्मानें व तुझ्या भक्तीनेंच तुला वश होणारा आहे. हा परमात्मा मायेच्या योगानें कर्ता भासत असला तरी वस्तुतः अकर्ता असल्यामुळें मायायोगें कर्मफलदाता होत्साताही कोणाच्या

कालदैवादिकांचें निवारण करीत नाहीं. हा परमात्मा मायारहित आकाशाप्रमाणें असंग असून आपेक्षिकबिंबत्वारोपानें हा पर्जन्यासारखा सर्वांच्या कर्मबीजाला फलरूपपुष्टिदाता आहे. म्हणून याजकडे नैर्घृण्य किंवा वैषम्यदोष येत नाहींत. बीजवृक्षाचा जन्यजनकप्रवाह जरी अनादि आहे, तरी आपल्या आंगणांत झाड लावणें हें कोठें बीजापासून, तर कोठें वृक्षाच्या शाखेपासून, मनुष्यप्रयत्नानें उत्पन्न करून घेतां येते. अथवा ज्या वर्णाची किंवा ज्या आकाराची गाय उत्पन्न करावयाची असली, तशी ती गौळ्यांनां सामुग्रीचा आश्रय घेऊन प्रयत्नानें करितां येते. तद्वत्, कर्म आणि तत्फलदातृ ईश्वर व जीव यांचा संबंध जरी अनादि असला तरी आपल्याला योग्य कोणतें हें गुरु, शास्त्र व विचाराचा आश्रय घेऊन प्रयत्नानें आचरितां येते, आणि ईश्वर पर्जन्यवत् साधारण कारण मात्र राहतो. झालेलें अजीर्ण ज्याप्रमाणें दुसऱ्यादिवशीं औषधीनें नाहींसें करितां येते, तद्वत् दैवालाही प्रयत्नानें वळतां येते असें वसिष्ठ म्हणतात. जसें जसें बीज वाढूं लागेल, तशी तशीच त्याला पुष्टि जल देत असते. तद्वत्, ज्याचा जसा प्रयत्न असेल तसें त्याला फल परमात्मा देत असतो. प्रयत्नावांचून दारुयंत्रासारख्या जीवांनां अनादिदैवानें परमात्मा फल देतो असें मानलें, किंवा परमात्माच स्वतः प्रयत्नावांचून करवितो असें मानलें, तर दोहींपक्षीं विधिनिषेधशास्त्र लागू होणार नाहीं. आणि कदाचित् साधनचतुष्टयसंपन्न तपस्वी नरकांत जाऊन ब्रह्महत्यारी परमपदाला जाईल. आणि असें गृहीत केलें म्हणजे वेदप्रामाण्य अस्ताला गेलेंच म्हणावयाचें. ह्मणून हा परमात्मा कृतप्रयत्नापेक्षी आहे, असें बादरायणाचार्यांनीं ब्रह्मसूत्रांत व श्रीमच्छंकराचार्यांनीं त्याच्या भाष्यांत सत्य सांगितलें आहे. ह्मणून तूं श्रीकृष्णभक्ति आणि प्रजापालनधर्म करीत ऐस. शिवाय, ह्या कृष्णाचें गूढ कर्तव्य मोठ्या मोठ्यांनां देखील समजणें शक्य नाहीं. कारण हा कालातीत असल्यामुळें पूर्वगुरूंचाही गुरु आहे. म्हणून जें जें कांहीं तुला पूर्वी दुःख झालें असेल तें दैवादिकांवर टाकून श्रीकृष्णाचा अनुचर होऊन प्रयत्नानें स्वधर्म साध.

॥ ओव्या ॥

दैव म्हणजे परेशु । जो परमात्मा सर्वेषु । तदधीन हा जगद्विलासु । जाण सकळ ॥ २१ ॥ यालागीं करोनि यत्न । शोधोनि काढी हृदयींचें रत्न । सच्चिदानंद जगज्जीवन । जो श्रीकृष्णस्वरूपची ॥ २२ ॥ त्वदनुचर होऊनी तात । सकळ प्रजांचा तूं नाथ । यालागीं या अनाथ । रक्षीं प्रजा ॥ २३ ॥

॥ गद्य ॥

हे धर्मज्ञा ! हा परमात्मा जीवरूपप्रतिबिंबापेक्षिकबिंबत्वनामारोपित ब्रह्मच होत्साता अनध्यस्तविवर्तत्वेंकरून पौरुषेयरूपधारी सर्वजीवांनां ज्ञान देणारा आहे. आणि ज्याप्रमाणें मृगजळाला पाहून मृग मोह पावतात, किंवा सुवर्णाचा न जाणणारा सुवर्णालंकार पाहून ठाऊक असलेल्या पित्तलधातूचे आहेत असें ह्मणतो, तद्वत् ह्याचें स्वरूपाला न जाणणारे मूढ, मनुष्यासारखे ह्या परमेश्वराचें स्वरूप पाहून, याच्या मायेनें मोह पावतात. या स्थानीं हें रहस्य आहे. परमेश्वराचें शरीर मायेनें झालें आहे असा एक वाद आहे. आणि सच्चिदानंदरूपच परमेश्वराचें शरीर आहे, असा दुसरा पक्ष आहे. हे दोन्ही पक्ष मधुसूदनस्वामींनीं आपल्या गूढार्थदीपिकेंत दाखविले आहेत. हे तादृश विरोधी दिसतात, तथापि ह्यांचा समन्वय असा होतो. ज्याप्रमाणें एखादी सुंदर पतिव्रता व साध्वी स्त्री पाहून एखाद्या कामिकाला मोह होतो, परंतु तो मोह त्या स्त्रीचें ठिकाणीं मुळींच नसतो, तरी ह्या स्त्रीच्या योगानें मला मोह पडला असा कामिकाचा व्यवहार दिसतो. तद्वत्, परमेश्वराचें मनुष्यादिसदृश विचेष्टित पाहून स्वरूपाला न जाणणाऱ्या लोकांनां हा मनुष्य आहे अशा प्रकारचा मोह पडतो. म्हणून हा परमात्मा आपल्या मायेनें त्यांनां मोहवितो असा आरोपानें व्यवहार झाला आहे. याप्रमाणें प्रथम पक्षाचें ह्मणणें परमेश्वराचें ठिकाणीं सिद्ध होत असून, ज्ञानानें ह्याच्या शरीराची निवृत्ति होण्याची अपेक्षा नाहीं; ह्मणून हा अनध्यस्तविवर्त असल्यामुळें दुसरा पक्षही सम्यक् आहे.

शिष्यः– भगवन् ! मला येथें एक शंका आहे. तिचा आपण कृपेनें परिहार कराल अशी आशा धरून मी ती आपणाला विचारण्याचें

धैर्य करितों. परमात्म्याचें मानुष शरीर पाहून असूर मोह पावतात. ते तमोगुणानेंच पावत असले पाहिजेत. आपण जो पतिव्रतेचा दृष्टांत दिला तत्सदृशच दृष्टांत भक्तिरसायनांत आणि पंचदशींत एकच वस्तु त्रिगुणात्मक असतें, हें दाखविण्याकरितां घेतला आहे.

॥ श्लोक ॥

' कामिनीसुखताभर्तासपत्न्यादुःखरूपता ॥
तादृङ्मानात्तथान्येनमोहत्वमनुभूयते ॥ १ ॥ '

( भक्तिरसायन. )

याप्रमाणें भगवच्छरीरापासून ज्यांनां सुख होतें ते सत्वगुणानें, आणि दुष्टादिकांनां दुःख होतें तें रजोगुणानें, व मूढांनां मोह होतो हा तमोगुणानें. ह्मणून परमेश्वराचें शरीर त्रिगुणात्मकच आहे, आणि त्रिगुणात्मक ह्मणजे प्रकृतिजन्यच असलें पाहिजे. एकच वस्तु त्रिगुणात्मक असूं शकते, ही गोष्ट सांख्यभाष्यांतही सिद्ध केली आहे.

श्रीगुरुः— तुझी शंका मार्मिक असल्यामुळें मलाही फार आनंद झाला आहे. तस्मात् आतां उत्तर श्रवण कर. प्रथम तुला एक दृष्टांत सांगतों. सूर्याचें ठिकाणीं घुबड आंधार पाहतात, असें आत्मपुराणांत सांगितलें आहे, आणि मृग नदी पाहतात, आणि कामली सुवर्ण पाहतात. परंतु त्यांतील कोणताही भाव सूर्याचेठायीं असत नाहीं. तद्वत्, लोक आपआपल्या गुणांनीं युक्त होत्साते परमेश्वराचेठायीं त्याच गुणांचा आरोप करून सूर्यावर थुंकणें असतांनां आपल्या तोंडावर घेण्यासारखें, किंवा उत्तम ध्यान केलें असतांनां आपलेंच अंतःकरण ध्यान रूपानें निराळें पाहिल्यासारखें, मोहादिक करून घेतात; आणि हा परमात्मा मायेनें मोह करितो असा आरोप मात्र याजवर ठेवितात. पुनः, सत्वगुणादिक जसें विषयरूप होऊन सुखादिक उत्पन्न करितात, तसा हा परमात्मा सत्पुरूषांनां विषयरूप होऊन सुख उत्पन्न करीत नाहीं; किंतु आत्मरूप आनंदच दाखवितो; आणि आपणही आत्मरूप आनंदांतून केव्हांच प्रच्युत होत नाहीं. ह्मणून हा श्रीकृष्ण प्रेमवर्धनाकरितां व संताकरितां अज्ञानध्यस्तविवर्तरूप असून मूढांनां मात्र त्यांच्या त्यांच्या गुणारोपानें सुखादिक उत्पन्न करून देतो. धर्मपूर्वक

राज्य झालें असतां स्वर्गादिक कर्मे व व्यवहार निश्चित करतां येणें, इत्यादि संतप्रत्ययभिन्न मूढांच्या सुखाचा अर्थ समजावा. याप्रमाणें तुझ्या शंकेचें उत्तर आहे.

शिष्यः– महाराज ! हें मला कळलें. आतां भीष्म काय ह्मणाले तें जाणण्याची इच्छा आहे.

श्रीगुरुः– याप्रमाणें हा परमात्मा जरी मूढांनां मोहोत्पादक असला, तरी यादव व गोपाळ व तुजसारखे भक्त त्यांचें ठिकाणीं याचें गूढ रूप ह्मणजे ब्रह्मत्व प्रगट आहे. ह्या माझ्या ह्मणण्याला परमेश्वरानें आपल्या वाणीनेंच संमती दिली आहे.

॥ श्लोक ॥

'अवजानंतिमांमूढामानुषींतनुमाश्रितम् ॥
परंभावमजानंतोममभूतमहेश्वरम् ॥ १ ॥
मोघाशामोघकर्माणोमोघज्ञानाविचेतसः ॥
राक्षसीमासुरींचैवप्रकृतींमोहिनींश्रिताः ॥ २ ॥
महात्मानस्तुमांपार्थदैवींप्रकृतिमाश्रिताः ॥
भजन्त्यनन्यमनसोज्ञात्वाभूतादिमव्ययम् ॥ ३ ॥'
(श्रीमद्भगवद्गीता अ० ९ श्लो० ११ ते १३.)

अर्थः– मूढ जे आहेत ते मला मनुष्यशरीरधारी समजतात. कारण ते माझा परब्रह्मभाव जाणत नाहींत. पुनः, ज्यांची वासना मिथ्या अशा जगाकडेच धांवत असते, आणि ज्यांचीं कर्मे अश्रद्धादिकांमुळें निष्फळच होत असतात, व ज्यांचें ज्ञान वेड्याच्या चिंध्या फाडण्याच्या ज्ञानासारखें किंवा वैद्यशास्त्रांतील मिथ्यायोगाच्या दृष्टांतासारखें कांहींच उपयोगी नसतें, तशीच ज्यांनां बुद्धिही नसते, जे रजोगुणामुळें आसुरी वा राक्षसी वृत्तीचे असून तमोगुणामुळें मोहिनी वृत्तीच्यास्वाधीन असतात, त्यांनां माझें ब्रह्मज्ञान समजणेंच शक्य नसल्यामुळें ते मला मनुष्यासारखे पाहतात. पण महापुरुषांची गोष्ट तशी नाहीं. महात्मे 'अव्ययं मां ज्ञात्वा' ह्मणजे अनाद्यनंत अशा मज ब्रह्मस्वरूपाला स्वरूपलक्षणानें जाणून 'दैवींप्रकृतिमाश्रिताः' ह्मणजे शरीर व मनानें सत्वनिष्ठ असून

'भूतादीन्' ह्मणजे तटस्थलक्षणासिद्ध जीवप्रतिबिंबापेक्षितबिंबत्वरूप अनध्यस्तविवर्तरूप अशा माझें ह्मणजे ईश्वराचें सर्वत्यागपूर्वक एकप्रवाहीचित्तानें भजन करितात, म्हणजे ब्रह्म जाणून माझी सगुण भक्ति करितात, असा भाव. एवं हें या श्रीकृष्णप्रभूचेंच वचन असल्यामुळें तूं आपल्या भावांसह ह्याच्या आज्ञेप्रमाणें वाग, म्हणजे तुझें कल्याणच आहे.

॥ ओव्या ॥

याचा संपूर्ण प्रभावो । जाणे स्वामी सदाशिवो । कीं तो आणि हा स्वयमेवो । एकचि म्हणुनि ॥ २४ ॥ कीं जिभेचें रसज्ञपण । जेंवी जीभ जाणें आपण । तेंवी याचें महिमान । गिरिजारमण जाणतो ।२५। तैसा याचाचि अवतारू । श्रीनारदमुनीश्वरू । तो भक्तिबळें साचारू । जाणे प्रभाव हरीचा ॥ २६ ॥ साक्षात भगवान कपिलमुनी । याच्या असंगतेचा तो ज्ञानी । हे श्रेष्ठ याचेंच रूप असोनी । याच्याचि भजनीं लागले ॥ २७ ॥ पूर्ण भजन आत्मपणें । या सकळा निकें होणें । यालागीं भेद सांडोनि भजणें । अनन्य त्वांही ॥ २८ ॥ जो परमात्मा जगद्बंधू । तयातें ह्मणसी मामे बंधू । जो मायारहित परमानन्दू । तयातें प्रिय बोलसी ॥ २९ ॥ हा प्रियाची परमसीमा । परी प्रियत्वें नये पार्थक्यधर्मा । जो अरिमित्रहृदयीं समात्मा । त्यातें मित्र तूं म्हणसी ॥ ३० ॥ हा आप्तकाम म्हणुनी कहीं । यातें कवणाचें कर्तव्य नाहीं । त्या तूं सुहृत्तम मानोनि गेहीं । अज्ञानठायीं गिंवसलासी ॥ ३१ ॥ जो अनुमंता सर्व जनां । त्यातें त्वां मंत्री मानोनि जाणा । आणि अज्ञानत्वें जो सुहृत्पणा । तेणें भलतेंचि केलें ॥ ३२ ॥ अरे! ब्रह्मेंद्रादि सुरांच्या पंक्ति । चालती होवोनि यद्वशवर्ती । त्वां दूत करोनी तयाप्रती । धुरें रथीं बैसविला ॥ ३३ ॥ येणें येणें अज्ञान धर्में । कवळिलाती मोहें परमें । यालागीं सांवळेंनि ब्रह्में । कळवितां वर्में न कळाली ॥ ३४ ॥ आतां हा जरी परमात्मा । तरी सारथी केंवी जाहला आम्हा । काय कहीं सूर्य तमा । होईल वश ॥ ३५ ॥ तरी ऐसा ह्मणीं । संशयो धराल मनीं । यातें नीचाच्या कर्माची कहाणी । आम्ही कानीं नायको ॥ ३६ ॥ हा रागद्वेषविवर्जितू । नेणें

मानापमानमातू । जैसा जाणलिया वशीभूतू । निजात्मा ब्रह्म ॥ ३७ ॥ तेंवीचि हा पूतनारी । सारथ्यादौ वर्तला तरी । कदापि नोहे अहंकारी । निर्विकारी चिदात्मा ॥ ३८ ॥ हा सर्वथाचि अद्वय । यातें न दिसे द्वितीय । यालागीं मीपणा न होय । कवणे काळीं ॥ ३९ ॥ हा समसमान सर्वांभूतीं । यालागीं याची अद्वैतस्थिती । हा सर्वात्मा गोपिकापति । यालागीं निश्चिती विषम नोहे ॥ ४० ॥ विश्वरूप दाविलें जेव्हां । हा अर्जुनातें ह्मणे तेव्हां । मियां मारिलिया कौरवा । होवावें तुवां निमित्त ॥४१॥ तूं भक्त माझा अर्जुना । ऐसें बोलिला यादवराणा । येणें विषमत्व नारायणा । ह्मणीं श्रोते मना आणाल ॥ ४२ ॥ तरी तैसें सर्वथा नाहीं । तो दुष्टांचे कर्म तयां काळदेही । आणि संतांचे सद्धर्म लवलाही । नाना उपायीं रक्षिता ॥ ४३ ॥ जितुकें जयाचें कर्म त्याचा न करी अतिक्रम । लुब्धकें पीडितां परम । तो अर्जुन समर्थ ॥ ४४ ॥ तोचि गांडीव तोचि अर्जुन । तोचि रथ तेचि बाण । परी म्लेच्छापासूनी रक्षण । समर्थ जाण न जाहला ॥ ४५ ॥ ऐसी कथा महाभारतीं । यालागीं हा जगत्पती । एका वैर एका भक्ति । न देखे कदा ॥ ४६ ॥ आतां यातें ह्मणती भक्तिवश । तयाचा हाचि विशेष । आनंद दे निजभक्तास । परी व्यवहार वैषम्यास येईना ॥ ४७ ॥ कीं पतिव्रता भजे आपुला पति । परी कदा न द्वेषी परपती । अथवा धर्मवशें तिजप्रति । रागही नव्हे ॥ ४८ ॥ तेंवी अनन्य भक्तांचा । हा योगक्षेम करी साचा । परी आंगा विषमतेचा । न लवीचि वारा ॥ ४९ भक्तांचेनि किंचिद्वैते । हा गुरूत्वें जरी वर्ते । तरी कर्मादौ वैषम्यातें । न पावेची ॥ ५० ॥ कीं आत्मा जाणोनि जीवन्मुक्त । जे का जाहले अखंडित । तयांचा देह पडतां काय यथार्थ । आत्मा रक्षीत सांगां पा ॥ ५१ ॥ तेंवी जयासी निजभक्ति । तयांसी करी हा दुःखनिवृत्ती । परी विषयसुखसंपत्ती । देवोनि विषम न होय ॥ ५२ ॥ भक्तीनें प्रारब्धाभिभवो । करी तथापि न वाढवी भवो । आणि सकामकर्मी जो फळसंभवो । तो कर्मेचि स्वयमेवो परी आधार हरी ॥ ५३ ॥ अथवा पाण्याचें गोडपण । तें जनाची हरी ताहान । तेंवी वंद्यासंसक्ति समाश्रवून । भक्ताधीन हा असे ॥ ५४ ॥

॥ गद्य ॥

**शिष्यः—** भगवन् ! सप्तमभूमिकारूढ मुक्ताला देखील कोणतीच संसक्ति संभवणें शक्य नाहीं, तर मग वंद्यासंसक्ति ईश्वराला आहे असें कसें म्हणतां ?

**श्रीगुरुः—** बाबा ! हें म्हणणें आमच्या पदरीचें नव्हे. असें वसिष्ठाचार्यांनींच योगवासिष्ठांत म्हटलें आहे. पाहिजे असेल तर तूं त्यांना विचार.

**शिष्यः—** महाराज ! आपण वसिष्ठाकडे लोटण्याचें कारण मी समजलों. वंध्यासंसक्ति बंधनरूप असल्यामुळें पांचव्या भूमिकेंत तिचेंच निराकरण होतें. परंतु वंद्यासंसक्ति यावदधिकार तशीच राहते.

**श्रीगुरुः—** हें तुलाच समजलें ठीक झालें. परंतु हा विशेष आहे असें जाण. भक्तीवांचून इतर जीवन्मुक्तांनां यावत्प्रारब्ध वंध्यासंसक्तीचाही निमुटपणें त्रास सोसावा लागतो. आणि भक्तिसहित जीवन्मुक्तांनां वंध्यासंसक्तीचा त्रास सोसावा लागत नाहीं. किंतु यावदधिकार वंद्यासंसक्ति राहते. आधिकारिकत्व ज्ञानी उपासकांनांच असते, असें गूढार्थदीपिकेंत सांगितलें आहे. पण परमेश्वराचा अनध्यस्तविवर्तरूप देह नित्य असल्यामुळें त्याची प्रेमवर्धकत्वादि वंद्यासंसक्ति कधींही नष्ट होत नाहीं. आणि देह अध्यस्तविवर्त नसल्यामुळें त्याच्या जीवन्मुक्तींत व विदेहमुक्तींत भेदही नसतो. किंबहुना तो जीवन्मुक्त किंवा विदेहमुक्त अशा शब्दाला पात्र होत नसून नित्य मुक्तीचें स्वरूपच आहे. समर्थांनींही असेंच म्हटलें आहे.

॥ ओवी ॥

' सचेतन ते जीवन्मुक्त । अचेतन ते विदेहमुक्त ॥
दोहींवेगळे नित्यमुक्त । योगेश्वर ॥ १ ॥ ' (रामदास.)

यांत ' योगेश्वर ' जें पद आहे तें ' यत्रयोगेश्वरःकृष्णो ' ' योगमायांसमाश्रितः ' इत्यादि प्रमाणावरून ईश्वर आणि त्याच्या अवतारांकडेच लावावें. अथवा या वचनाची आणखी कोणाला कांहीं विवक्षा असली तरी आमचा सिद्धांत भंगत नाहीं. अनध्यस्तविवर्तत्वामुळें

ह्याला बंधनाचीच कल्पना झाली नसल्यामुळें मुक्तताही कल्पणें व्यर्थच आहे. नाथ म्हणतात:—

॥ ओवी ॥

‘ पुण्यभ्रमें स्वर्गप्राप्ती । पापभ्रमें अधोगती ॥
देहभ्रमें बद्ध म्हणती । मुक्त म्हणती तो अतिभ्रमू ॥ १ ॥ ’

( एकनाथमहाराज. )

बद्ध, साधक, मुमुक्षु, मुक्त, इत्यादि नाहींत तोच परमार्थ असा प्रमाणशिरोमणी भगवान वेदही ह्मणतो.

**शिष्यः**— महाराज ! याप्रमाणें माझ्या शंकेचा परिहार झाला. आतां, भगवान भीष्म काय ह्मणालें हें ऐकण्याची उत्कंठा वर्तते.

**श्रीगुरुः**— श्रवण कर. भीष्म ह्मणतात:— असा जरी हा परमात्मा आहे, तथापि ज्याप्रमाणें सूर्याच्याठायीं तम नसूनही दुसऱ्याच्या तमाला निवर्तक मात्र होतो; त्याप्रमाणें विषमरहित हा परमात्मा असूनही भक्तांचें अज्ञान अनुग्रहानें दूर करतो. ह्याला उदाहरण माझेंच आहे. मी शरशय्येवर मरणोन्मुख पडलों असतां ह्या परमात्म्यानें आपण होऊन मला दर्शन दिलें आहे. ह्मणून हा एकांत भक्तांवर अनुग्रह करणारा आहे, असेंही माझ्यानें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

॥ ओव्या ॥

अहो ! मेघाचियाठायीं । वैषम्य तंव कहींचि नाहीं । परी चातकार्तिहर हें कायीं । न ह्मणवे सांगा ॥ ५५ ॥ तेंवीचि हा भगवंतू । भक्तां परम कृपावंतू । ऐसें वदोनि देवव्रतू । रोमांचितू जाहला ॥ ५६ । जयाचियाठायीं मन । जाहलें असतां भक्तिसंपन्न । जयाचें नामकीर्तन । वाचेनें दृढ ॥ ५७ ॥ एवंविधि त्यजितां शरीर । तो तोडूनि कामकर्मादि समग्र । मुक्तरूप होय साचार । ब्रह्मपणें ॥ ५८ ॥ वाराणसींत मरतां । तरी शिवानुग्रह न चुके सर्वथा । तैसे भक्तिगंगेंत देह ठेवितां । हरिहरानुग्रह चुकेना ।५९। यालागीं हें अनात्मशरीर । तें मी स्वेच्छे त्यागीन साचार । परी हा प्रेमळ सखा तोंवर । तिष्ठो निर्धार ये स्थळीं ॥ ६० । हा चतुर्बाहु हास्यवदन । पीतांबरधारी मनमोहन । राधिकापति जगज्जीवन । नारदादि भजन करिती ज्याचें ॥ ६१ ॥ ऐसीचि पाहूनियां

मूर्ती । मी वसुशरीरीं करीन भक्ति । किंबहुना भोगमोक्षाचेठायीं निश्चिंतीं । या श्रीपतीस सोडूं नेच्छी ॥ ६२ ॥ अथवा जाणोनि माझें निधन। युधिष्ठिर दुःखी होईल आपण । हें मनीं आणोनि गंगानंदन । दुसरें वचन बोलत ॥ ६३ ॥ देह त्यजणें न त्यजणें । हें माझ्या इच्छेचें करणें । परी प्रेमवर्धनार्थ हरीनें हृदि येणें । यदर्थ बोलणें हें माझें ॥ ६४ ॥ येथ मयूरपंतवचन । तेंही मज वाटे प्रमाण । यालागीं पुष्ट्यर्थ जाण । समाश्रयींतो ॥ ६५ ॥

॥ गीति ॥

'जेव्हां मानेल मना तेव्हां त्यागीन या शरीरा हो ।
तोंवरि मदग्रभागीं हा गीतामृतनिधी उभा राहो ॥' (मोरोपंत.)

॥ ओव्या ॥

'गीतामृतनिधी' या वचनेंकरून । हा जवळीं असतां नारायण । मग ब्रह्मविस्मृती पडेल हेहि दारुण । चिंता मजकारण नव्हे कदा ॥ ६६ ॥ एवं पितामह कृपासंपन्न । पाहोनि युधिष्ठिर आपण । नानाधर्मार्थ करी प्रश्न । ऐकतां ऋष्टिजन सूत म्हणे ॥ ६७ ॥ तरी सकळ मनुष्यांचे सामान्यधर्म । आणि जेणें वर्तती वर्णाश्रम । प्रवृत्तिनिवृत्तिरूप परम । जें वेदब्रह्म बोलिला ॥ ६८ ॥ प्रजापालनार्थ राजधर्म । चित्तशुद्ध्यर्थ दानधर्म । परममुक्त्यर्थ मोक्षधर्म । पूसिला तैसा ॥ ६९ ॥ आणि तेंवी स्त्रीयांचे धर्म । जेणें इहपर साधे उत्तम । आणि पुसिले भागवद्धर्म । जेथ पुरुषोत्तम संतोषे ॥ ७० ॥ निग्रहादिक राजधर्म । भूतदयादि दानधर्म । शमदमादि मोक्षधर्म । स्त्रीधर्म पातिव्रत्यादि ॥ ७१ ॥ आणि एक परमात्मा भगवंत । जेथ संतोषे अखंडित । ते भागवद्धर्म सनातन निश्चित । द्वादश्यादि विश्रुत नियम जेथें ॥ ७२ ॥ ससाधन चारी पुरुषार्थ । ज्या अधिकारिया जें जें विहित । नाना आख्यानोपाख्यानीं संश्रित । तें भीष्में समस्त सांगीतलें ॥ ७३ ॥ तो महाराज इच्छामरणी । धर्म सांगत असतां प्रेमेंकरोनी । तंव उत्तरायण तियेक्षणीं । प्राप्त झालें ॥ ७४ ॥ जो युद्धीं सहस्ररथी । रक्षी आपुलिया महाशक्ती । यद्वाणी सहस्रार्थवती । उपसंहरी ती तेधवां ॥ ७५ ॥ मग सकळसंगविनिर्मुक्त । आदिपुरुषीं ठेविलें चित्त । जो श्रीकृष्ण जगन्नाथ । पीतांबर धृत चतुर्भुज ॥ ७६ ॥ तेथ दृष्टि ठेवोनि

समान । पुरतस्तिष्ठत आपण । धन्य भाग्यसंपन्न । देवव्रत तो ॥ ७७ ॥ ऐसें करितां विशुद्ध धारण । सर्व अशुभ जाहलें क्षीण । श्रीकृष्णकृपादृष्टीकरून । आयुधश्रम निवर्तले ॥ ७८ ॥ जयाच्या कृपादृष्टिवशें । प्रलयींही भक्त सुखसे । तो पाहतांच आपैसे । भीष्मश्रम निवर्तले ॥ ७९ ॥ आंगीं रूपले होते शर । ते श्रम गेले समग्र । मग प्रेमें जोडोनि कर । स्तवी साचार श्रीकृष्णा ॥ ८० ॥ जो श्रीकृष्ण कृपामूर्ति । सृष्टिकारण प्रकृति । लीलेसाठीं श्रयितां निश्चिती । तद्वशवर्ती कदा नव्हे ॥८१॥ कीं वैद्याश्रयिती मारक विष । परी तेणें जगत्कल्याण निःशेष । तेंवी बंधनहेतु माया जगन्निवास । आश्रयिता विशेष जगत्तरण ॥ ८२ ॥ परी तेही माया हरीच्याठायीं । वैभव दाखवावया पाही । तटस्थलक्षणरूपचि लवलाही । कदाचित् राही सदा नसे ॥ ८३ ॥ परी अज्ञ जीवाहून । करावया व्यावर्तन । जगदुत्पत्तिस्थितिलयकारण । हें तटस्थलक्षण मायिक ॥ ८४ ॥ एऱ्हवीं हा परमामृत । जयाहोनी इतर नाशिवंत । जो पूर्ण म्हणोनी भूमाशद्वार्थे । सनत्कुमारादि संत ध्याती जया ॥ ८५ । तो हा श्रीपति मजसमोर । तेथ विषयतृष्णारहित अंतर । होवोनि सदा चरणावर । वाहिलें हरीच्या ॥ ८६ ॥ जो परमानंद यादवराणा । जो भगवंत अनंत करुणा । तेथ विगतविषयतृष्णा । अर्पिली मती ॥ ॥ ८७ ॥ नाना धर्मांचें फळ । ही श्रीकृष्णधारणा केवळ । चरणीं समर्पिली सोज्वळ । घननीळजाश्वनीळनामें ॥ ८८ ॥ वासुदेवीं भगवंतीं । जी अक्षय परमप्रीति । तियेलागीं म्हणती रति । साहित्यवेत्ते ॥ ८९ ॥ ती आहे तैसीच राहावी । पूर्ण प्रवाहें वाढावी । म्हणोनी प्रार्थना आधवी । श्रीकेशवीं समर्पी ॥ ९० ॥

॥ अभंग ॥ १.

लोकत्रयीं ज्याची सुंदर प्रतिमा । तेथ माझा प्रेमा नित्य राहो ॥१॥ निर्मळ पीवळें वस्त्र ज्याच्या कटीं । तेथ हो गोमटी प्रीति माझी ॥ २ ॥ वस्त्र ज्याचें जैसा प्रभातगभस्ति । तेथ माझी प्रीति नित्य राहो ॥ ३ ॥ तमालद्रुमाच्यासम देह नीळा । तेथ प्रीतिमाळा समर्पिली ॥ ४ ॥ सुंदर साजिरें वदनकमळ । उपरी कुरळकेशपंक्ति ॥ ५ ॥ तया नारायणीं फळ-

विरहीत । प्रीति अखंडीत असो माझी ॥ ६ ॥ ज्ञानेश्वरमित्र अर्जुनाचा सखा । तेथें असो निका प्रेम माझा ॥ ७ ॥ ९१ ॥

॥ २ ॥

अगाध आवडी अर्जुनाची जया । रथ प्रेरावया सिद्ध झाला ॥ १ ॥ अश्वपादरजशुभ्रवर्णे अंग । वदन सुरंग स्वेदयुक्त ॥२॥ भक्तवात्सल्याचें अत्यंत दर्शक । दिसे युक्त मूख श्रमस्वेदें ॥ ३ ॥ अलकावलीनें झाकिलें साजिरें । परब्रह्म धुरें अर्जुनाच्या ॥ ४ ॥ माझ्या तीक्ष्ण बाणें त्वचा किंचिच्छिन्न । वितूटित जाण कवचही ॥ ५ ॥ तया नारायणीं कृष्णीं माझें चित्त । रमो अविश्रांत सर्वकाळ ॥ ६ ॥ गोविंद गोपाळ जपतांचि नांवें । ज्ञानेश स्वभावें कृपा करी ॥ ७ ॥ ९२ ॥

॥ ओवी ॥

निजप्रेमळमित्रभाषण । एकतांचि रथ फिरवोन । दोही सैन्यामाजीं आणोन । दाखवी संपूर्ण पार्थातें ॥ ९३ ॥ हा कृप हा द्रोण । इत्यादि कालदृष्टीकरून । पर सैन्याचें संपूर्ण । आयुराकर्षण करी ॥ ९४ ॥ स्वभक्तरक्षणीं परम चतुर । एवं पार्थसखा करुणाकर । तेथ माझी प्रीति निरंतर । राहो निर्धार करोनी ॥ ९५ ॥ एवं सख्यभावें सारथ्य करी । सदा रक्षी पार्था कूसरी । आणि गुरु होवोनि अंतरीं । रक्षितांचि होय ॥ ९६ ॥ आह्मी सकळ असतां समोर । मी मारता हा अहंकार । उठोनि विकळ धनुर्धर । जाहला असतां ॥ ९७ ॥ शरचापविनिर्मुक्त । पाहोनि निजात्माविद्यास्थित । उपदेशूनि निवारित । कुमती पार्थाची ॥ ९८ ॥ जयाच्या अंगेंकरून । पीतवस्त्रांदिका निर्मळपण । तो हा महाराज श्रीकृष्ण । गतिोपदेशे पूर्ण जगद्गुरू ॥ ९९ ॥ वेद अत्यंत कृपण । तयास मान्य तीन वर्ण । स्त्रीशूद्रादि जे कां दीन । तेथ दयार्द्र मन नव्हे त्याचें ॥ १०० ॥ तें वेदाचें कार्पण्य निरसावया । गीता निर्मिली चैतन्यकाया । निश्वासीं जन्म वेदा यया । आणि गीता तंव बोलिली प्रत्यक्ष ॥ १ ॥ "बाप बाप ग्रंथ गीता । जो वेदीं प्रतिपाद्य देवता । तो श्रीकृष्ण स्वयें वक्ता । जिये ग्रंथीं" ॥ १ ॥ (ज्ञानेश्वरमहाराज) तयाच्या चरणीं अखंड । माझी रती असो प्रचंड । यन्नामस्मरणें पापी उदंड । तोडोनि यमदंड मुक्त होती ॥ २ ॥ आतां

मी न धरी शस्त्र । ऐसी स्वप्रतिज्ञा विचित्र । सोडोनि रथाचें चक्र । घेतलें करी ॥ ३ ॥ आपुली प्रतिज्ञा मोडोनियां । माझी सत्य करावया । रथाखालीं उतरूनियां । चक्र करीं घेतलें ॥ ४ ॥ मग धाविन्नला सिंह्यासमान । परी मनुष्यत्वाचें जाहलें विस्मरण । तेणें प्रकाशलें देवपण । एकाएकी ॥ ५ ॥ अनंत ब्रह्मांडगोळ उदरीं । भार साहो न शके धरित्री । यास्तव प्रतिपदीं थरारी । ऐसें दिसे ॥ ६ ॥ उत्तरीय लोळे तळीं । ऐसा किरीटी कुंडली वनमाळी । मदनुग्राहक पूतळी । चैतन्याची ॥ ७ । एवं धांवत असतां श्रीहरी । माझिया बाणघायें निर्धारीं । कवच फुटोनी किंचिच्छरीरी । छिन्नइव जाहला ॥ ८ ॥ रुधिराचे वाहती लोट । मी परमाततायी स्पष्ट । येत असतां अमृतघट । बाणें फोडूं इच्छिला । ९ । तैं धावूनिया अर्जुन । करीत असतां निवारण । तयाचें न मानोनि वचन । आला धावोन मद्वधार्थ ॥११०॥ तैं अर्जुनपक्षी जगजेठी । ऐशी सहज लोकदृष्टि । परी माझियाच अनुग्रहासाठीं । शस्त्रा शेवटीं करीं धरिता ॥ ११ ॥ अहो! जो ब्रह्मांड रची मोडी । तया प्रतिज्ञा तोडावयाची काय खोडी । ममानुग्रहाची आवडी । ह्मणोनी तोडी प्रतिज्ञा ॥ १२ ॥ माझिया भक्तांचें वचन । सर्वथा मिथ्या न हो ह्मणोन । आपुली वैखरीही अनृत करोन । ममानुग्रहाकारण धांवला ॥ १३ ॥ माझें आततायीत्व न स्मरला । आपुलीही प्रतिज्ञा विसरला । केवळ ममानुग्रहें भरला । ऐसा देखिला प्रभू मियां ।१४। तोचि माझी परम गती । तोचि माझीपरम मुक्ती । अनुभव श्रुति आणि युक्ति । याचीच प्राप्ती इच्छितो १५ तो हा मुकुंद गोविंद । हा जगदानंदकंद । तो हा शामसुंदर तत्पदारविंद । स्मरणें मंदही परी पावेन मी ॥१६॥ जेंवी अकार्येंहींकरून । सांसारीक करिती कुटुंबभरण । तेंवी स्वप्रतिज्ञाही मोडोन । भृत्यरक्षण करी जो ॥ १७ ॥ हा सच्चिदानंद भगवंत । परी अर्जुनसारथ्य करित । वेत्र घेवोनि तुरग वळत । रम्य दिसत अति तेणें ॥ १८ ॥ अश्वदोरे धरिले करीं । युद्धीं मेले जे स्वीय वैरी । ते सर्वही पाहूनि यन्मुखश्री । सरूपता निर्धारी पावले ॥ १९ ॥ हें मियां पाहिलें दिव्यदृष्टी । ह्मणोनी माझी प्रतीति गोमटी । कीं इच्छा न करितांही जगजेठी । दर्शनमात्रें तारितो ॥ १२० ॥ मी मुमुर्षु शरपंजरी । आणि अनुग्रह करोनी मजवरी ।

दर्शन द्यावया पूतनारी । आपणची पातला ॥ २१ ॥ तो हा माझी परमगती । येथ मी जन्मापासोनि ठेविली मति । यास्तव आतां ही रति । अस्य पदकामाप्रति वरो ॥ २२ ॥ क्षत्रधर्मयुक्त भक्ति । करोनी पावले भगवंतीं । येथ आश्चर्य नाहीं निश्चिती । परी धर्मरहितभक्तींही उद्धरिले ॥ २३ ॥

॥ पद ॥

कामोध्व

मदनविगतनयनगोपि गोकुळीं किती । त्यजुनि पती भजती त्यां दिधलि सद्गती ॥ धृ० ॥ ललित गमन हसित मंद वदन साजिरें । पाहुनियां शद्भवेत्रहंकृती जिरे ॥ १ ॥ पाहुनियां अलकावतिकान्तकन्यका । पावल्याचि ब्रह्मचिती परम धन्यका ॥ २ ॥ २४ ॥

॥ ओव्या ॥

अतिसुंदर गमन । तेंची ज्यांचें मार्गदर्शन । मंदहास्यें रम्य वदन । प्रसादचिन्ह तेंचि ज्यांचें ॥ २५ ॥ प्रेमेंकरोनि पाहे गोविंद । तोचि ज्यांचा ब्रह्मानंद । घडींघडी ये गृहा मुकुंद । आदर तोची कल्पिती । २६ परम मदांध असूनी । भक्तिनिष्ठत्वें शार्ङ्गपाणी । सुंदर मंद हासादि करोनी । अत्यंत मानी जियातें ।२७। एवं संयोगीं आनंदभरिता । वियोगीं लीलाविष्टचित्ता । ज्ञानें ब्रह्माहमस्मि प्रत्यय येतां । तरी कृष्णादि स्वतः पैं होती ।२८। स्वतः कल्पित लीला करोन । करिती अहंग्रहोपासन । परी जयांचा उपकार गहन । न पारयेहमापण हरि ह्मणे ॥ २९ ॥ त्या पर्णित सकळ गोपनारी । हा तंव धर्मार्थ अवतारी । परी जारबुद्धया भजोनियां । पूतनारी । ब्रह्म सुंदरी पावल्या ॥ १३० ॥ एवं जीवब्रह्मैक्यपण । पावल्या निश्चयेंकरोन । आणि अंतःकरणादिकें पूर्ण । कृष्णस्त्रीपण पावल्या ॥ ३१ ॥ मुळीं वचन प्रकृती । तयाची एवमर्थक्लृप्ती । जैसी अनादिपुरूषा प्रकृति । तैशा गोपिका नित्य युवती श्रीकृष्णाच्या । ३२ ॥ प्रेमळ आणि ब्रह्मज्ञानी । आधिकारिकत्वें कृष्णकामिनी । ऐशा जाहल्या तनुमनधनी । ज्याच्या भजनीं लागतां ॥ ३३ ॥ जारत्वीं पतिव्रतापण । साधिलें जिहीं संपूर्ण । नित्यचि भ्रतार श्रीकृष्ण । वरिला जिहीं ॥ ३४ सत्कार्यदृष्ट्या सदंतःकरण । तें प्रेमवशचि ह्मणोन । ईश्वरसामर्थ्यें आधिकारिकपण । आलें ह्मणोन नित्यता हरिस्त्रीत्वा ॥ ३५ ॥ इतरांचेंही

अंत:करण । आहेचि पैं तत्समान । परी नानावृत्ति म्हणोन । अभिभवन पावलें ॥ ३६ ॥ तैशा न होती व्रजबाळा । ज्या ज्ञानें ब्रह्म केवळा । हरिऐक्यें त्यागोनि अविद्याकळा । अंत:करणें वेल्हाळा शुद्धसात्विका ॥ ३७ ॥ रजस्तममिश्र सत्वगुण । तेंचि अविद्येचें लक्षण । अविद्याकृत शरीरा प्रारब्धबंधन । यास्तव विदेहमुक्ति प्रमाण अभक्त ज्ञानियां ॥ ३८ ॥ परी श्रीकृष्णप्रेमेंकरून । अत्यंत निरसले रजस्तमोगुण । यालागीं शुद्ध-सत्वांत:करण । ईशोपाधिलक्षण जाहलें ॥ ३९ ॥ दृष्टिसृष्टिवादीं पाहतां । प्रतिबिंबापेक्षिकबिंबत्वीं प्रेमैक्यता । तेणें आनंदेंदंतेवेदंता । अंत:करणे-वांत:करणवृत्तिता संप्राप्ता ॥ १४० ॥ ऐसी जियांची स्थिती । म्हणोनी तियां नित्यमुक्ति । जीवन्मुक्ति आणि विदेहमुक्ति । नाममात्र तेथ ॥ ४१ ॥ जीवन्मुक्ति विदेहमुक्ति भिन्न । योगियां नित्यमुक्ति पूर्ण । ऐसें समर्थांचें वचन । पूर्वी प्रमाण बोलिलें ॥ ४२ ॥ म्हणोनि ब्रह्मत्वें अभेदमंता । प्रेमें नित्य श्रीकृष्णकांता । भेद गेलियाही प्रेमपूर्णता । भिन्नेवभिन्नता आचार्य म्हणती ॥ ४३ ॥

॥ श्लोक ॥

'सत्यपिभेदापगमेनाथतवाहंनमामकीनस्त्वम् ।
सामुद्रोहितरंग:क्वचनसमुद्रोनतारंग: ॥१॥' (श्रीशंकराचार्य.)

॥ ओव्या ॥

भेद गेलियाही देवा । आह्मी तुझे रमाधवा । परी तूं आमुचा उमाधवा । केव्हांचि न होसी ॥४४॥ पाणियाचेनि अभेदपणें । परी तरंगा समुद्रजत्वा येणें । समुद्रा तरंगाचें होणें । केव्हांचि नव्हे ॥ ४५ ॥

॥ गीति ॥

ज्ञानें द्वैत निरसलें परि हरि तुमचे आह्मी दयासिंधू ।
सिंधुवरी[1] लहरी जारे परि लहरीचा कधीं नसे सिंधू ॥ १ ॥

॥ ओवी ॥

एवं अभेद जाहलिया । प्रेमें ईश्वराचे व्हावया ।
स्वयें असोनी दुसरिया । तातही बोधिती ॥ ४६ ॥

---

१. सिंधुज लहरिस म्हणती परि लहरीचा नव्हे जसा सिंधू ॥ पाठां०

॥ ओव्या ॥

" तैसी क्रिया कीर न साहे । तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे ।
हें अनुभवाचि जोगे नोहे । बोलाऐसें " ॥ १ ॥
( ज्ञानेश्वरी अ० १८ ओ० ११५१ )

" देवदेऊळपरिवारू । कीजे कोरूनि डोंगरू ।
तैसा भक्तीचा वेव्हारू । कां न व्हावा " ॥ १ ॥
( अमृता० प्रक० ९ ओ० ४१ )

॥ ओव्या ॥

एवं गोपी नित्य हरियुवती । यालागीं शंका न कीजे श्रोतीं । भीष्म म्हणे मदीय रति । त्या श्रीपतिचरणीं असो ॥ ४७ ॥ निश्चयें-करोनी गोपकन्या । ब्रह्मत्वें होवोनि परम धन्या । कांतात्वें जाहल्या कृष्णमान्या । मत्प्रीतिधान्या मांदुसतें ॥ ४८ ॥ जो अनादि जगदांकुर-कंद । जो भक्तवत्सल श्री गोविंद । माझी रती सह मतिवृंद । प्रद्युम्न तत्पद मानूनि वरो ॥ ४९ ॥ जय जय श्रीकृष्ण करुणार्णवा । जय जय नंदसूनो वासुदेवा । तुझिया चरणीं माधवोमाधवा । वाहिलें जीवा प्रेमभरें ॥ १५० ॥ युधिष्ठिराच्या राजसूयमखीं । मुनिगणामाजीं मंगळ लोकीं । जेथ शशि रवी न लविती नखी । पाहोनि निकी तिची प्रभा ॥ ५१ ॥ आश्चर्यें तटस्थ देखते । वर्णिती रूप आणि महिमेतें । ऐसिया जगत्पूज्य श्रीहरीतें । मी दृष्टीपुढें पाहतों ॥ ५२ ॥ जो सर्वात्मा सर्व-जीवन । जो भक्तवत्सल आनंदघन । तो माझे निववावया नयन । आविर्भवन पावला ॥ ५३ ॥ एवं श्रीकृष्णीं परमभक्ती । आणि येणेंचि पावती जीवन्मुक्ती । जे परमात्मस्वरूपीं ऐक्यस्थिति । श्रुति युक्ति अनु-भूति पावलों ॥ ५४ ॥

॥ श्लोक ॥

मार्तंड एक परि पाहति भिन्नदृष्टी ।
तेंवी समस्त रचिती प्रतिचित्तसृष्टी ॥
सच्चित्सुखें न गणि हा परि त्या कशाया ।
सूर्याप्रति श्रम नसे जनता कशाया ॥ ५५ ॥

॥ गीति ॥

चैतन्य भेद पावे प्रतिजनबुद्धींत बोध ना म्हणुनी ।
गतभेदमोह होउनि मी झालों रूप हें न भव गणुनी ॥ ५६ ॥

॥ ओव्या ॥

एवं आधींच परमप्रेमा । वरी ऐक्यत्वें जाहला ममात्मा । आत्मा तो प्रियाची परम सीमा । यालागीं प्रेमा अनिर्वाच्य वाढे ॥ ५७ ॥ एवं देवव्रत स्तुती । करूनि साधिली पूर्ण भक्ती । ब्रह्मरूपीं समाधिस्थिती । जीवन्मुक्ती पावला ॥ ५८ ॥ सूत म्हणे शौनक मुने । एवं परमेश्वरीं तेणें । निजैक्य करोनि ब्रह्मज्ञानें । सगुणध्यानें सुखभरित ॥ ५९ ॥ "सर्गेऽपिनोपजायंत" इति । तेंवीचि 'प्रलयेनव्यथंति' । 'नमेभक्तः प्रणश्यति' । या भगवदुक्तस्थिती प्राप्त भीष्म ॥ ६० ॥ ब्रह्मत्वें नाहीं जननमरण । भक्त्या तनू चित्सुखघन । यालागीं देवव्रत आपण । जिता देवपण पावला ॥ ६१ ॥ तेथ परम मुक्तीचिया दर्शणी । सकलही जाहले तूष्णी । आनंदें भरले लोक तीन्ही । दुंदुभी सुरगणीं वाजविल्या ॥ ६२ ॥ जयाची पूर्ण ब्रह्मदृष्टी । तों सत्पुरुष करिती प्रशंसागोष्टी । देव करिती पुष्पवृष्टी । मानवसृष्टी आनंदू ॥ ६३ ॥ एवं ज्योतिनिमग्न देवव्रतू । ज्योतिरूपें बाह्यस्थितू । परमानंदभरितचित्तू । भाक्तिज्ञानयुक्त महंत तो ॥ ६४ ॥ येणेंचि बोधें सकल जन । श्रीकृष्णीं ठेवोनि मन । युधिष्ठिर सर्वे घेऊनि कृष्ण । गजपुरा आपण पावला ॥ ६५ । चहोंकडे जाहली शांती । निमाली दुःखशोकापक्रांती । धर्मयुक्त युधिष्ठिर धर्मस्थिती । राजसंपत्ती चालविली ॥ ६६ ॥

॥ दोहा ॥

श्रीज्ञानेश्वरचरणरजीं शतशः करूनि प्रणाम ।
कृष्ण विष्णु गोविंद हरी नित्य जपू प्रभुनाम ॥ १६७ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे भीष्मब्रह्मप्राप्तियुधिष्ठिरराज्यप्रलंभोनाम नवमसखीप्रेषणम् ।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण १० वें.

॥ दोहा ॥

अलकावतिपतिपाउलें चिंतुनि वारंवार ।
उमामहेश्वर वंदुनी करु संसृतिसंहार ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

या दशमाध्यायीं प्रस्तुत । स्वपुरीं जाता वैकुंठनाथ । स्त्रियांनीं स्तविला कृपावंत । वर्णन यथार्थ हें केलें ॥ २ ॥ तैसेंचि द्वारकेकडे गमन । हेंहि केलें निरूपण । कथासंदर्भी शौनक प्रश्न । केंवी करी तेंऐका ॥ ३ ॥

॥ गद्य ॥

शौनक म्हणाले:— हे सूत! समस्त वैरीयांचा विनाश करून तो युधिष्ठिर राजा आपल्या पुरीप्रत येऊन काय करिता झाला? याप्रमाणें प्रश्न ऐकून सूत म्हणाले:— मुने! नष्ट जो पांडवांचा वंश तो परीक्षिद्रूक्षणाच्या योगानें अंकुरित करून आणि युधिष्ठिराला राज्य देऊन परमात्मा श्रीकृष्ण प्रसन्न होते झाले. तेव्हां हें सर्व जगत् परमेश्वराच्या आधीन आहे अशा बोधानें भ्रमनिवृत्त झालेला आणि भीष्माच्या व भगवंताच्या मुखांतून ऐकिलेल्या धर्माच्या योगानें धर्मनिष्ठ झालेला युधिष्ठिर इंद्राप्रमाणें समुद्रवलयांकित पृथ्वीचें पालन करूं लागला. याप्रमाणें युधिष्ठिर राज्य करीत असतां त्याच्या यज्ञाच्या योगानें तृप्त झालेल्या देवतांपासून यथाकाम पर्जन्य पडत असे. पृथ्वी कामधेनूप्रमाणें धान्य आणि सर्व रत्नें उत्पन्न करूं लागली. हें त्याचें सत्याचें फळ. त्याचप्रमाणें गायी पुष्कळ दूध देऊं लागल्या. नदी, समुद्र, पर्वत, वनस्पति, इत्यादिक धर्मराजाच्या इच्छेनेंच वेळच्यावेळीं उपयुक्त होत असत. हें त्याच्या तपाचें फळ समजावें. त्याचप्रमाणें सदा फलित अशा औषधी यथाकालीं त्याच्या इच्छेनेंच सर्व पदार्थ पुरवीत असत. हें त्याच्या धर्माचें फळ समजावें. त्याच्या योगप्रभावामुळें राज्यांतून मानसिक दुःखें नाहींशीं झालीं. अहिंसेमुळें शारीरिक दुःखें निवर्तलीं. त्याच्या भूतदयेनें आधिदैविक, आधिभौतिक, अध्यात्मिक, हे तिन्ही ताप दूर पळाले.

आणि त्याच्या न्याय्यत्वामुळें पापकारक रागद्वेषादिक क्लेश कोणाचा अभिभव करीत नसत. त्याचप्रमाणें त्याच्या पूर्ण ज्ञानामुळें त्याला कोणी शत्रूच उत्पन्न झाला नसून, इह, पर, आणि मोक्ष या सर्वांचा विभागी असा तो जीवन्मुक्तिस्थित 'राजाकालस्यकारणं' या वाक्यांत सांगितल्याप्रमाणें कृतयुगसंज्ञककालप्रवर्तक लोककल्याणार्थ महाराज युधिष्ठिर राज्य करता झाला.

ततःश्रीकृष्णोहास्तिनपुरेकतिचिन्मासान्सुहृदांशोक.नेवृत्तयेसुभद्राद्रौपद्योर्भगिन्योःप्रियचिकीर्षयाचस्थित्वाधर्मादीन्पृष्ट्वातैरनुज्ञातः सन्द्वारकांगंतुंरथमारुरोह । तदासुभद्राद्रौपदीउत्तराकुंतीगांधारीअर्जुनःकृपोनकुलःसहदेवोभीमोधौम्यश्चसत्यवत्यादयःस्त्रियश्चभगवतोविरहंनसेहिरे ।

॥ करुणास्यवृत्त ॥

यश एक वेळ यदैकुनी जन सत्पदा न च सोडिती ।
सुतदारवित्तविभूतिसंसृतिपाश तो चट तोडिती ॥
अपरोक्षसंगति साधुनी मग सोडितीलच कैंवि ते ।
जननीविणे शिशु दीन शोकित पंडुनंदन तेंवि ते ॥ ४ ॥

॥ ओव्या ॥

...रान स्पर्शन आसनाशन । तैसें एकेसंमति शयन । एवं सख्य-...त्या कृष्णस्थित मन । वरी महात्म्यज्ञान व्यासादिमुखें ॥५॥ नाना उपकारांची मांदी । एवं उघडप्रेमसमाधी । विसरतील कवणेविधी । ते विचारी सुबुद्धी शौनका ॥ ६ ॥

॥ गद्य ॥

अतएवानिमिषैर्नेत्रैस्तमेवपरमात्मानंवीक्षमाणास्तत्रतत्राईणानयनाद्यर्थं चलंतिस्म ।

पुष्कळ दिवसाच्या सहवासामुळें हा परमात्मा येथेंच राहो असे वाटून एक एक दिवस राहवून घेण्या करितां प्रयत्न करूं लागले. याप्रमाणें परमेश्वराचें गमनसमयीं वियोग सहन न होऊन अतिउत्कंठेनें पडत असलेल्या अश्रूंचें, आप्तगमनकाळीं शोक कल्याणकारक नाहीं असें जाणून, बांधवस्त्रिया डोळ्याच्या डोळ्यांत स्तंभन करीत होत्सात्या प्रेमानें परमेश्वराकडेच पाहूं लागल्या.

तदामृदंगभेर्यादयोनेदुः । तथाप्रासादारूढाःकुरुस्त्रियःश्रीकृष्णंकुसुमैर्ववृषुः । तदार्जुनश्छत्रंजग्राह । उद्धवसात्यकीचामरेजगृहतुः । निर्गुणत्वादननुरूपामानुषनाट्यत्वाच्चानुरूपाविप्राआशिषोददुः । तदाश्रीकृष्णचरणाविष्टचेतसांगजपुरस्त्रीणामुपनिषन्मूर्तिरुचिराःपरस्परमालापाबभूवुः ।

॥ ओवी ॥

तेथ तेज सौंदर्यादिकीं विस्मित । कांहीं स्त्रिया आश्चर्यभरित ॥
तयातें अन्य सखि यथार्थ । हरिस्तुत्या परमार्थ बोलिती ॥ ७ ॥

॥ पद ॥

बाइनों ! नवल काय मना ॥ ध्रु० ॥ योगी ह्मणती परमेश्वर या । देवकीनंदना ॥ १ ॥ जगदुत्पत्तिस्थितिलय दाविती । यदीयतटस्थपणा ॥ २ ॥ निजभजकां करि परमसुखी हा । दे कैवल्यधना ॥ ३ ॥ ज्ञानेश्वर करुणेविण याच्या । न कळति आत्मखुणा ॥ ४ ॥ ८ ॥

॥ २ ॥

बाई ! हा यदुपति तोचि सये ॥ध्रु०॥ गडे ! हा० ॥ महावाक्याविण इतर श्रुती यत् - । ज्ञान परोक्ष सुये ॥१॥ महावाक्यें अपरोक्षें कळतो । फळतो बंधलयें ॥ २ ॥ श्रुतियुक्तीगुरुवचनानुभवीं । ज्या हृदि भजति स्वयें ॥ ३ ॥ सांडुनि चितिवैभव तो चालवी । विजयरथाचि हये ॥ ४ अलकावतिपतिकरुणेवांचुनी । न कळेऽनंत नये ॥ ५ ॥ ९ ॥

आणाखि नाहीं जुना ॥ ध्रु० ॥ याहुनी ॥ कापिल जी नर सोडुनि वर्ते । हा चोवीस गणा ॥ १ ॥ सृष्टिपूर्वी हा एकचि होता । वैदिक सत्यपणा ॥ २ ॥ हा माती घटीं तेंवि सदाश्रय । जगवागारभणा । ३ । याच्या सत्सामान्यचेतनीं । भेदा अनृतपणा ॥४॥ यद्विशेषचित् कळुनि महात्मे । तोडिति जनिमरणा ॥ ५ ॥ सत्य रूप याचें समजाया श्री ज्ञानेश म्हणा ॥ ६ ॥ १० ॥

॥ करुणाख्यवृत्त ॥

गुणसाम्यभंग न तैंचि हा प्रभु एक अद्वय अक्षय ।
प्रलयांत यापरि ज्याप्रती पुढती कदापिहि न क्षय ॥
म्हणुनी तथाविध एधवाहि असेंच मानसि ओळखा ।
मग मारुनी भवबंध हा रिपु चित्सुधावृतगोळ खा ॥ ११ ॥

॥ ओव्या ॥

असतां सर्गाचा आदिअंत । जीव लीन होय यांत । येथ श्रोते हो- तील आशंकित । कीं ब्रह्म असोनी जीवलय होत कैसा ॥ १२ ॥ तरी ऐकावें समाधान । जीव हा ब्रह्म पूर्ण । तथापि अविद्याआभासेंकरून । जीवपण ब्रह्मातें ॥ १३ ॥ ती अविद्या सत्वादिगुणी बहुविधा । यालागीं जीव तोही बहुधा । जेव्हां प्रगट नव्हती भोगसंपदा । तेव्हां शुद्ध- सत्वोपहितपदा हा होता । १४ ॥ परी असो हें बोलणें । अज्ञानासी घेतां प्रमाणें । तरी लौकिकवैदिकपणें । न सांपडे तें ॥ १५ ॥ 'तंव प्रमाणाचिया मापा । न संपडेचि जे बापा । तया आणि खपुष्पा । वि- शेषु काई' ॥ ( अमृ० प्र० ७ ओ० ५३ ) ऐसी तातचरणोक्ति साची । परी अज्ञानाघरीं त्राये वाउगीयांची । येणें मी नेणें या शिष्यप्रतीतीची । अविद्याशब्दवाचीशक्तिग्रहण ॥ १६ ॥ 'अविद्येचे आडवे । भुंजीत जीव- पणाचे भवे । तया चैतन्याचा धांवे । धावेकारू जो' । ( अमृ० प्र० २ ओ० २ ) येणें येणें गुरुस्तवनें । शिष्यदृष्ट्याऽविद्या पाल्हाणें । लागे कार्यदृष्ट्या कल्पणें । परी अनेक ह्मणणें गौरवूं ॥ १७ ॥ यद्यप्यज्ञान कार्यानुमेयता । सप्रमाध्यायीं अग्राह्य ताता । तथापि ब्रह्मान्वयें जग पाहतां । तदर्थीं खंडनता जाणिजे ते ॥ १८ ॥ कार्यानुमेय अज्ञान यास्तव । परी एक म्हणतां होय लाघव । यालागीं एकाऽज्ञानीं आभास जीव । एकचि असे ॥ १९ ॥ परी घटें न लिंपे घटनभ । तेंवि उपाधौ न लिंपे जीव सप्रभ । तथापि अंतःकरण मिश्रसत्वप्रभ । बहुविध असे ॥ २० ॥ त्या अंतःकरणीं जीवाभास । प्रमाता ऐसें ह्मणती जयास । अंतःकरणें बहुत्वें त्यास । बहुविधता असे ॥ २१ ॥ तो प्रमाताचि अहंकारू । त्यासीचि बंधमोक्ष प्रकारू । स्वप्रकल्पित शिष्य गुरु । बंध मोक्ष साचारू स्वप्नवत ॥ २२ ॥ त्या अंतःकरणवृत्ति जेव्हां । नव्हत्या अज्ञान अगोचर तेव्हां । यालागीं स्पष्टपणें आपुलिया भावा । प्रतिबिंबा- पेक्षीबिंबप्रभावा ईश्वर जाणें ॥ २३ ॥

॥ गद्य ॥

शिष्यः– भगवन्! ब्रह्माचा अविद्येचेठायीं आभास तो जीव, आणि तदपेक्षेनें आलेल्या बिंबत्वारोपावच्छिन्न ब्रह्म तो ईश्वर, असा आपला

अभिप्राय आहे. तो जीव एकच आहे, म्हणजे पर्यायानें आपणास अनेकजीववाद संमत नाहीं. असें आहे तर अंतःकरणाचें बहुविधत्व मानून त्यांचे ठिकाणीं जीवाभास प्रमाते पुष्कळ मानले, ही अनेकजीववादापत्ति आहेसें मला वाटतें. दुसरें, जीवाभासासच जर बंधमोक्ष आहेत तर एक आभास मुक्त झाला असतांनां सर्वमुक्तत्वापत्ति येत नाहीं हे खरें, परंतु मग अंतःकरणामध्येंच ब्रह्माचा आभास मानून अनेकजीववाद स्वीकारल्यास कोणता प्रत्यवाय आहे? बंधमोक्षार्थ जर अंतःकरणस्थ जीवाभासाचा स्वीकार केला तर अविद्यागत आभासरूपी एकजीव सांगण्याचें प्रयोजन काय? पुनः, जीवाभासालाच जर बंधमोक्ष आहेत, तर अविद्येमध्यें असलेला ब्रह्माभासरूपी एकजीव केव्हांच मुक्त होणार नाहीं. असें मानलें म्हणजे शुकवामदेवादिमुक्तिबोधक शास्त्राला वैय्यर्थ्य येऊन ब्रह्म व अविद्या हे पदार्थ नित्य स्वीकारणें गळीं येत असल्यामुळें द्वैतापत्ति येते.

श्रीगुरुः— शंकेस्तव तुझें मी अभिनंदन करतों. कारण फुकट भिन्न शास्त्रांचा पूर्वपक्ष न घेऊन अद्वैतहानि न होणाऱ्या वेदांताच्याच एका सिद्धांताचा आश्रय करून दुसऱ्या प्रक्रियेविषयीं विचारलें आहे, हें तुझें बुद्धिवैभव अत्यंत शंसनीय आहे. इतक्यानेंच तुला जर ब्रह्मबोध झाला असेल तर हीच प्रक्रिया घेतली पाहिजे असा आमचा आग्रह नाहीं; कारण सुरेश्वराचार्य म्हणतातः—

॥ श्लोक ॥

' ययायययाभवेत्पुंसांव्युत्पत्तिःप्रत्यगात्मनि ॥
सासैवप्रक्रियेहस्यात्साध्वीसाचाऽनवस्थितिः ॥ '

॥ गद्य ॥

ज्या ज्या प्रक्रियेनें बाह्यदृष्टीचा आश्रय न घेऊन आंतल्या आंतच मुमुक्षूंनां आत्मविद्या प्राप्त होते, ती ती प्रक्रियाच उत्तम गणली जाते; आणि ती पुष्कळ प्रकारची आहे. तातही म्हणतातः— ' अगा मी एक लाणीचे खागे । मज येवो ये भलतेनि मार्गे । भक्ति कां विषयविरागें । अथवा वैरें ॥ १ ॥ म्हणोनि पार्था पाहीं । प्रवेशावया माझ्याठायीं । उपायांची नाहीं वाणी येथ ॥२॥'(ज्ञाने०अ० ९ ओ० ४७०-७१) परंतु

ब्रह्मबोध न होऊन उत्कंठेनें ही प्रक्रियाच जाणून घेण्याची इच्छा असेल आणि हिनेंच ब्रह्मबोध होतो असा विश्वास असेल तर उत्तर श्रवण कर. अनेकजीववाद आणि एकजीववाद या दोन्ही प्रक्रियाविषयीं जाप्रच्छ्रुति प्रमाण आहे. 'जीवभूतांमहाबाहोययेदंधार्यतेजगत्'। 'ममैवांशोजीवलोके जीवभूत:सनातन:' । (गीता अ० ७श्लोक ५,७) इत्यादि श्रुति एकजीववादबोधक असून 'अज्ञानेनावृतंज्ञानंतेनमुह्यंतिजंतव:'। 'ज्ञानेनतुतदज्ञानं येषांनाशितमात्मन:'। इत्यादि श्रुति अनेकजीववादबोधकही आहेत. असो. प्रस्तुत तूं आपल्या प्रश्नाचें उत्तर ऐक. उपाधि दोन प्रकारचा आहे. कारणरूप आणि कार्यरूप. त्यालाच अविद्या म्हणतात. पहिल्या-उपाधिगत आभास बंधाला पावत नाहीं; आणि दुसऱ्या उपाधींतले आभास बंधाला पावतात. याला एक दृष्टांत देतों. घट हा प्रथम उपाधिस्थानीं समज. त्यांत आलेलें आकाश जसें कोणत्याही रीतीनें महाकाशाहून भिन्नधर्मी दिसत नाहीं, परंतु घटाकाशमहाकाश हा शब्दभेद मात्र होतो, तद्वत् जीवब्रह्म हा शब्दभेद मात्र झाला आहे. परंतु त्या घटांत जल टाकलें म्हणजे त्यांतील आकाश ज्याप्रमाणें चांचल्यादि धर्मांनें युक्त दिसतें, तद्वत् अंत:करणरूपी जो द्वितीय उपाधि त्याचेठायीं प्राप्त झालेले प्रमातृसंज्ञक जीवाभास गमनागमन सुखदु:खादि धर्मांनीं युक्त दिसतात; म्हणून त्यानांच बंधमोक्ष वास्तविक आहेत. कारण ज्याला दु:ख सत्य वाटतें त्यालाच दु:खाची निवृत्तिही सत्य वाटते. यद्यपि घटस्थ जलांत विस्तृत प्रदेश दिसल्यामुळें जलाकाश महाकाशाचेंच प्रतिबिंब आहे घटाकाशाचें नाहीं; तद्वत् अंत:करणरूपी द्वितीय उपाधींत आलेले आभास ब्रह्माचेच आहेत जीवाचे नाहींत अशी शंका येते. तथापि घटाकाश आणि महाकाश हे सर्वथाच अभिन्न असल्यामुळें तत्साध्य सिद्धांताचेठायीं विरोध येत नाहीं. तरी दुसऱ्यारीतीनेंही उत्तर देतां येते. असा प्रश्न करणाऱ्याला आम्ही असें विचारतो कीं घटाचेठायीं घातलेलें जल एकदेशीय आहे कीं सर्वदेशी आहे? ह्यांतून द्वितीय पक्ष मानण्याइतका तूं मूर्ख नसलास तर प्रथम पक्ष तुला मान्य आहे असें आम्ही महीत करतो. या एकदेशी जलांत सर्व महा-

काशाचें प्रतिबिंब पडणें शक्य आहे, असें जर तूं मानीत असलास तर एकदेशीघटोपाधींत सर्व महाकाश घटाकाशत्वाला प्राप्त झालें आहे असें तुला मानण्याला कोणता प्रतिबंध येतो? आणि कदाचित् आमच्या म्हणण्याचा त्वां स्वीकार केलाच तर मग घटाकाशाचेंच प्रतिबिंब विस्तृत जलांत देशरूप दिसणें संभवनीय नाहीं काय? तद्वत्, रज्जुपृष्ठैकदेशीसंभूतसर्पस्य सर्वरज्जुस्थसर्पभ्रमसम ब्रह्मैकदेशीयअविद्यागत सर्वब्रह्मस्थभ्रमसंभास्यमानत्वास्तव अंत:करणरूपी द्वितीयउपाधीचें ठिकाणीं येणारे आभास जीवाचेच आहेत ब्रह्माचे नाहींत. अथवा महाकाशाचे प्रतिबिंब मानलें तरीही त्याला घटाकाशाश्रितत्व असल्यामुळें महाकाशप्रतिबिंबरूप जलाकाशावच्छिन्न घटाकाशोपजीवितया उपयोगिता कल्पिता येते; म्हणून साक्षी आणि आनंदमय असा उभयात्मक भोक्ता विद्यारण्यस्वामींनीं ठरविला आहे; तद्वत्, ब्रह्म व प्रतिबिंबावच्छिन्न अविद्यान्तर्वर्ती एकजीवोपजीवितया उभयात्मक प्रमाता भोक्ता आत्म्याला‌ही ठरवितां येत असून दृष्टिसृष्टिवादांत उत्तर देतां येते. आतां, तूं म्हटलें होतें कीं अंत:करणाचेचठायीं आभास मानल्यानें कार्य होतें तर अविद्या पाहिजे कशाला? हें म्हणणें सत्य असेल, परंतु अंत:करण कार्यरूप असल्यामुळें कारणरूप अविद्येवांचून त्याची सिद्धी होत नाहीं, आणि ब्रह्माभासावांचून अविद्येचा स्वीकार केला असतां जडाचें स्वातंत्र्य किंवा ब्रह्माला कर्तृत्व हे दोन अतिप्रसंगदोष येतात; म्हणून तिचेठायीं ब्रह्माभास जीव अवश्य मानला पाहिजे. मायेचें ठिकाणीं आभास ईश्वर मानून तिचें कार्य अंत:करण, त्याचें ठिकाणीं ब्रह्माचे आभास जीव मानणें शक्य असले तरी, आणि जलक्षपणें जलाकाशमुक्तिकल्पनावत् अंत:करणाच्या नाशानेंच जीवाची मुक्ति संभवनीय म्हणणेंहि शक्य असलें, तथापि यावदविद्या तिच्या कार्याचा आत्यंतिक नाश स्वीकारणें विरुद्ध आणि असंभवनीय असल्यामुळें ज्ञानानें त्या अविद्येचाच नाश झाला पाहिजे. आणि त्वदुक्त पक्षाचेठायीं तर तो नाश ईश्वरोपाधीचा होईल; म्हणजे एकाच्या ज्ञानानें दुसऱ्याच्या उपाधीचा नाश होऊन अन्यज्ञानानें अन्यमुक्तिप्रसक्ति दोष येतो. किंवा ईश्वर नित्य स्वीकृत असल्यामुळें त्याची ती उपाधि नित्यस्वीकृत

आहे, असा स्वीकार गळीं येत असल्यानें निवृत्त उपाधी-पासून अंतःकरणादिकार्ये उत्पन्न होणें शक्य नाहीं. जसें सर्प-निवृत्तिपासून रज्जूवर सर्प होणें शक्य नाहीं. हा दोष निवृत्त करण्या-करितां यावत् सृष्टि तावत् ईश्वरप्रारब्ध म्हणशील तर घटत नाहीं. कारण ईश्वर विदेहमुक्त झाला असतां सृष्टि पुनः उत्पन्न होणारच नाहीं. तसें झालें म्हणजे इतर बिचाऱ्या जीवांनां ज्ञानावांचूनच मुक्ति होईल. मग ज्ञानापासूनच कैवल्य आहे हें श्रुतिप्रामाण्य, व जोंपर्यंत ज्ञान झालें नाहीं तोंपर्यंत ही सृष्टि अनाद्यनंत आहे हें आचार्यवचनप्रामाण्य, आणि मला पहिले पासूनच ब्रह्म समजलें नाहीं, मी सृष्टि पाहतों, या प्रकारचा सर्व जगाचा अनुभव, हे तिन्हीहि अस्ताला गेलेच म्हणाव-याचे. अतः, ब्रह्मबोध होत असेल तर कांहीं आग्रह नाहीं; पण मीमांसा करावयाची असेल, व राजमार्ग स्थापावयाचा असेल, तर असे खडतर दोष येऊं देणें उचित नाहीं. (म्हणून अविद्येचेठायीं प्रतिबिंब मिथ्या-रूपी ब्रह्मभास जीव ग्रहण करून, तदपेक्षी बिंबत्वारोपावच्छिन्न ब्रह्माला ईश्वर मानून, घट फोडला असतां जल नष्ट झाल्यावर जलकाश जसें महाकाशांत मिळतें, तद्वत् अनध्यस्तविवर्ततया ईश्वरोपदिष्ट वेद, वा स्वाप्नवत् गुरुकल्पिततया, अथवा स्वप्नीं ओसणत असतां जागृत-पुरुषकृत आव्हानसमान जे वेद ते प्रमाण मानून तज्जन्य महावाक्यानें मननसहकारीकारणासह, किंवा मननानें महावाक्यसहकारीकारणासह उद्भूत झालेल्या नित्य शुद्ध, बुद्ध, मुक्त, इत्यादि विशेषचैतन्यज्ञानानें सामान्यचेतनसत्ताप्राप्त मिथ्याकारणअविद्येची निवृत्ति झाल्यानें अंतः-करणादि कार्यअविद्येची निवृत्ति होऊन रज्जुज्ञानकृत तत्स्थसर्पनिवृ-त्तिवत् बंध सत्य मानून त्याची सत्य निवृत्ति अपेक्षणारा मुमुक्षुरूपी जीवाभास प्रमाता मुक्त होतो म्हणजे ब्रह्मस्वरूपीं मिळतो./ हे बंध-मोक्ष जीवाभासाला वास्तविक वाटत असून जीवाचें ठिकाणीं कल्पित आहेत. जसें जलाकाशाचें ठिकाणीं जलांत असणें आणि आकाशांत मिळणें हें वास्तविकासारखें भासत असून घटाकाशाचें ठिकाणीं त्याचा कोणत्याही रीतीनें भेद कल्पितां येत नसल्यामुळें पूर्वोक्त शाब्दिकभेद-यत् घट असल्यानें आणि फुटल्यानें भासत असतात, तद्वत् मी बद्ध होतों,

मी मुक्त आहे, इत्यादि विक्षेप, आवरण, आणि परोक्षअपरोक्षज्ञान आभासालाच होतें, असें स्वामीविद्यारण्योक्त प्रमाणावरून जीवाभासांचें ठिकाणीं बंध वास्तविकइव भासत असून अविद्यानिवृत्तिमात्रानें मुख्य जीवाचेठायीं ते वाचारंभणमात्र भासतात. म्हणूनच तातानें असें म्हटलें आहे कीं 'हा घटाकार जैसा । निमालिया तया अवकाशा । नलगे मिळों जाणे आकाशा । आनाठाया ॥ तैसा देहाहंकार नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला । तोचि परमात्मा संचला । आधींचि आहे. ' ॥ (ज्ञानेश्वरी अ० ६ ओवी ८३।८४ )

या दोन ओव्यांत प्रथम दृष्टांत घटाकाशाचा घेऊन सिद्धांत मात्र देहाहंकार धरणाऱ्या अंत:करणस्थ जीवाभासरूपी प्रमात्याविषयीं केला आहे. दृष्टांत सिद्धांतैकदेशोपजीव्य असल्यामुळें दृष्टान्ताश्रित वादीकृत शंका घटत नाहीं. मुख्य जीवाचें ठिकाणीं बंधमोक्ष कल्पितता याच दृष्टान्ताचे आश्रयानें पूर्वीं सांगितली आहे. याविषयीं आणखी तातवचन प्रमाण आहे. ' परी जितीना मेली । अविद्या हे जाकळी । बंधमोक्षीं घाली । बांधोनियां ॥ मोक्षुचि बंधु होय । तरी मोक्षशद्ब कां साहे । परी अज्ञानाघरीं त्राये ॥ वाबुगीयांची । बागुलाचेंनि मरणें । तोषावें कीं बाळपणें । येरां तो नाहीं मा कोणें । मृत्यु मानावा ॥ तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपुली प्रमा । करीतसे सोहं मा । ऐसा बंधु' ॥ ( अमृ० प्र० ३ ओ० ११ ते १३ व २३ )

या ओवींत अज्ञान शद्ब बालवाचक आहे. उपर्युक्त सर्व ओवींचा सारांश असा आहे कीं बाल व तरुण आईबाप एकाच द्रव्याचे बनलेले असतात. त्याप्रमाणें प्रमाते व जीव एका प्रतिभासाचे जरी आहेत, तरी जसें बागुलाचें मरणें बागुलाच्या सत्यत्वामुळें बाळाला आनंददायक होतें तसें आईबापाला होत नाहीं, परंतु बाळाकरितां कल्पित त्याचें असणें नसणें बोलावें लागतें. तद्वत् बालस्थानीय जीवाभासरूपी प्रमात्यालाच वास्तविकइव बंधमोक्ष भासत असून वरील दृष्टांतवत् जीवाभासापेक्षेनें मुख्यजीवाचेठायीं कल्पित वाचारंभणमात्र भासतात. म्हणून जिभेनें जिभेचें नांव घेतल्यानें जिभेला जशी फलनिष्पत्ति नाहीं, तद्वत ब्रह्मरूप असून, मी ब्रह्म, मी ब्रह्म, असा वृत्तिवाचाळपणा केल्यानें

फलनिष्पत्ति कांहींच नसून फुकट वटवट मात्र होते. म्हणून तें ज्ञान बंधनच आहे. याप्रमाणें मुख्यजीवाचें ठिकाणीं जरी बंधमोक्ष कल्पित आहेत, तरी 'तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां । तें पायां पडोनि मियां । सोडविलें ॥ १ ॥' या ओवींत ब्रह्माभासरूपी मुख्यजीवापेक्षिक बिंबत्वारोपाऽवच्छिन्न ब्रह्मरूपी गुरुस्थानीय परमेश्वराची भक्ति दर्शविली आहे. आम्ही केलेल्या ह्या ईश्वरलक्षणाला 'अर्थदिप्ति'-कार दिवाकर महाराजांचीही संमति आहे. तसेंच नवव्या प्रकरणांत 'आम्ही निखळ मा तुझे । वरी लोभें ह्मणसी माझे । हें पुनरुक्त साजे । तूंचि ह्मणोनि ' ॥ ( ओवी ६५. ) या रीतीची भक्ति प्रतिपादन करून, द्वैत येऊं नये म्हणून ' देवदेऊळपरिवारू । कीजे कोरोनि डोंगरू । तैसा भक्तीचा वेव्हारू । कां न व्हावा?' ॥ ( अमृ० प्रक० ९ ओवी ४१. ) असें पुन: सांगितलें आहे. तरी भक्ति राहतेच असें ' अखताचि अखता । अखतीचि असे न पूजिता । मा अखतीं काय आतां । पुजों जावी ॥ झाला देवोचि भक्तु । ठावोचि झाला पंथु । होऊनि ठेला एकांतु । विश्वचि हें ॥ घालितां अव्हासव्हा पाये । शिवयात्रा होत जाये । शिवा गेलियाही नोहे । केंही जाणें ॥ चालणें आणि बैसक । होन्ही मिळोनि एक । नोहे ऐसें कवतुक । इये ठायीं ॥ येऱ्हवीं आडोळलिया डोळा । शिवयात्रेचा सोहळा । भोगिजे भलतेवेळा । भलतेणें ॥ ना समोर दिसे शिवुही । पारि देखिलें कांहीं नाहीं । देवभक्ता दोही । एकुचि पाडु ॥ आपणचि चेंडू सुटे । मग आपणया उपटे । तेणें उदळिला दाटे । आपणपांचि ॥ ऐसी जरी हे चेंडुफळी । देखिजे कां केव्हेळीं । तरी बोलिजे हे सरळी । प्रबुद्धांची ॥ ऐसाही स्वामीभृत्यसंबधा- । लागीं उठती श्रद्धा । तैं देवोचि नुसुधा । कामविजे ॥ कर्मोचा हातू नलगे । ज्ञानाचेही कांहीं न रिघे । ऐसगिचि होतसे आंगे । उपास्ति हे ॥ कोण्ही एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म । योगज्ञानादि विश्राम । भूमिका हे ॥' (अमृ० प्रक० ९ ओवी ४३,४४,५१ ते ५६,३८,५७, ५९.) इत्यादि ओव्यांनीं सांगितलें आहे. आतां शुकवामदेवाची जी मुक्ति शास्त्रांत सांगितली आहे ती देखील जीवाभासाचीच सांगितली असली पाहिजे. कारण मी शुक, मी वामदेव, इत्याद्यहंकार प्रमातारूपी

जीवाभासालाच असणें संभवनीय आहे; मुख्य जीवाला नाहीं. वर जी जाग्रच्छ्रुतींतील वचनें दाखविलीं, त्यांतील 'जीवभूतांमहाबाहोययेदंधार्यते जगत्' । इत्यादि एकजीवपर जाग्रच्छ्रुतीचा अर्थ मुख्यजीवपर करून 'अज्ञानेनावृतंज्ञानंतेनमुह्यन्तिजन्तवः' इत्यादि अनेकजीववादपर पूर्वी लाविलेल्या जाग्रच्छ्रुतीचा अर्थ अनेकजीवाभासपर करावा ह्मणजे भगवद्वाक्याचें दृष्टिसृष्टिवादपर आनयन होतें. ह्मणून शुकवामदेवादिकांची मुक्ति मुख्य जीवाच्या दृष्टीनें कल्पित असून जीवाभासाच्या दृष्टीनें वास्तविकइव आहे. ब्रह्मदृष्टीनें नाहींच. किंवा नाहीं ही अभावगोचरताही सहन होत नाहीं. याप्रमाणें शब्द पुढें चालत नसल्यामुळें कृष्णार्पणतारूप भक्ति शुकादिकही करितात. 'आत्मारामाश्चमुनयोनिर्ग्रंथाअप्युरुक्रमे। कुर्वंत्यहैतुकींभक्तिमित्थंभूतगुणोहरिः॥' असें भागवतांत सांगितलें असून 'येरवीं विषय जिणोनि जन्मले । जे शुकादिक वादुले । ते विषयचि वानितां जहाले । भाट ययाचे ॥ (ज्ञाने० अध्या० ११ ओंवी १७३) असें तातांनीं ह्मटलें आहे. आणखी अद्वैतानंतर भक्तीसाठीं 'एकाकीनरमते' या श्रुतिप्रामाण्यावरून द्वैतमिव अद्वैतप्रतीति कांहीं विरोधी नाहीं. तात ह्मणतातः— 'अहो ऐक्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभु मिळे। तरी स्वतरंगाचीं मुकुळें । तुरंबु कां पाणी॥' (अमृ० १।५९) आणि बोधसारकार नरहरी महाराजांनींही असेंच ह्मटलें आहे:-'द्वैतंमोहायबोधात्प्राक्प्राप्तेबोधेमनीषया। भक्त्यर्थंकल्पितंद्वैतमद्वैतादपिसुंदरम् ॥' ( बोधसार—भक्तिरसायनप्रकरण. श्लोक ४२. ) अशा भक्तीची श्रेष्ठताही तेथेंच सांगितली आहे. 'पारमार्थिकमद्वैतंद्वैतं भजनहेतवे। तादृशीयदिभक्तिश्चेत्सातुमुक्तिशताधिका'॥ ( श्लोक ४६ ) सुवर्ण कळल्यावर अलंकाराचा जसा विरोध राहत नसून उलटा त्यापासून आनंदच होतो, तद्वत् अद्वैत असून भक्त्यर्थ भासणारा हा द्वैतपणा बाधक नाहीं, असा या श्लोकांचा भाव समजावा. ह्मणूनच शुकादिकांच्या वृत्ती तल्लीन झाल्या. तो विष्णुशिवात्मक अनध्यस्तविवर्तरूप परमात्मा ब्रह्मस्वरूपी हा श्रीकृष्ण आहे. आणि ब्रह्मस्वरूपी होता असें जे भूतकालिक वचन पूर्वी सांगितलें तें दृष्टिसृष्टिसिद्ध जीवाभासाच्या

सृष्टिदृष्टीनें समजावें. यावरून सत्तात्रयवाद हा जीवाभासदृष्टीनेंच सिद्ध आहे असा भाव तूं समज. आतां त्या स्त्रियांनां महावाक्यावांचून हें एवढें ज्ञान कसें झालें ? अशी तुला शंका येईल तर, या पुरस्त्रियांचे शद्ब श्रुतीनें अभिनंदन करण्याजोगे आहेत हें पूर्वी सांगितलेलें व्यास-श्लोकार्थबोधक वाक्यच उत्तर समज. याप्रमाणें त्या स्त्रिया ह्मणाल्या:-

हे सख्यानों ! या परमेश्वराचें ठिकाणीं कोणत्याच प्रकारचें आश्चर्य न करून केवळ ब्रह्मस्वरूप होऊन समाधिकालीं व व्युत्थानकालीं एकदशारूप होऊन राहणेंच आपणा सर्वांनां इष्ट आहे. कारण विस्मय हा रसास्वाद विघ्नाला उत्पन्न करून समाधि स्थीर होऊं देत नाहीं. श्रीसद्गुरू एकनाथ महाराज ह्मणतात:— 'प्रथम स्वरूप पाहतां दृष्टी । न सांवरत विस्मय उठी । तोही जिरवोनिया पोटीं । दशा जे उठी ते समाधि' ॥ १ ॥ परंतु शद्बाश्रय आणि शद्ब कल्पित असल्यामुळें ब्रह्म-बोध झाल्यावर प्रेमानेंच परमानंद प्राप्त होत असल्यानें तदुद्बोधक महात्म्यज्ञाननिष्ठ स्तुतिरूप भाषण जीवाभासाच्या दृष्टीनें पुनः झालें, तरी महात्म्यज्ञान रक्षकत्वास्तव आपणाला बाधक होत नाहीं.

॥ ओव्या ॥

एवं निष्प्रपंच भगवंत । आदिअंतीं अखंडित । तोचि अध्यारोपाप-वादगृहीत । प्रपंचयुक्त भासतो ॥ २४ ॥ 'अध्यारोपापवादाभ्यां निष्प्रपंचं प्रपंच्यते । ऐसी स्मृतीही साक्ष देते । भ्रम तो आरोप श्रुति ह्मणते । आणि बोलती बाध ते अपवाद ॥ २५ ॥ तेथ आरोप आधीं सांगावया । कारणअवस्था बोलिजे यया । जिच्यायोगें परमात्मया । आलें उपादान निमित्त होणें ॥ २६ ॥ नन्वारोप कवण करी । ऐसी शंका होईल जरी । तरी आरोप पाहती अविचारी । तो कवण करी हा प्रश्नचि नये ॥ २७ ॥

॥ श्लोक ॥

'अविचारकृतारोपोविचारेणनिवर्तते' ।
'अनुभूतिप्रकाशीं'त्थं विद्यारण्यहि बोलिले ॥ २८ ॥
अविचाराद्यदुत्पात्तिर्नकेतात्तदपेक्ष्यते ।
रज्जुसर्पःशुक्तिरौप्यंकःकरोतीहबुद्धिमान् ॥ २९ ॥

॥ गद्य ॥

'जन्माद्यस्ययत:' इत्यादि सूत्रांत जें ईश्वरकर्तृत्व सांगितलें तें जगताविषयीं असून अविद्येविषयीं नाहीं. अथवा तटस्थलक्षणानें अधिष्ठान-पर त्याचा अर्थ समजावा.

॥ श्लोक ॥

अप्यकर्तुर्विवक्षायामधिष्ठानमपेक्ष्यते ।
निरधिष्ठानविभ्रांतेर्नास्माकंबौद्धवत्स्पृहा ॥ ३० ॥
अस्तिचेदीश्वर:काश्चित्सत्त्वत्रयमत:स्थित: ।
आरोपेणकृत:सोऽपिशुद्धसत्त्वेनमायया ॥ ३१ ॥
देश:काल:कृति:कर्तासर्वमारोपितंयत: ।
व्यवस्थापिक्रमादीनांतत:स्यात्सृष्टिसंभवे ॥ ३२ ॥
सत्ताद्वयविवादेतुपरेशोब्रह्मरूपक: ।
आभासोजीवआरोपात्सचसर्वंकरोत्यहो ॥ ३३ ॥

॥ ओव्या ॥

परी हा आरोप झाला कहीं । हें विचार्य सेचि नाहीं । जे भ्रम जाहला कहीं । हें हाताचि नये ॥ ३४ ॥ कहीं जाहलें स्वप्न । याचा स्वप्नीं शोध अघटमान । जागे होतां नाहीं स्वप्न । यालागीं शोध न संभवे ॥ ६५ ॥ वरी भ्रम उत्पन्न करावया । झटला कोणी एक उपाया । तरी हातां येईल काह्या । सांगिजें कवणीं ॥ ३६ ॥ कीं तमाचा विसंवरा । मागावया दिनकरा । जाणे आलें राती घरा । तव केंवि मिळे? ॥ ३७ ॥ नाना जावया वाराणशी । स्वस्कंधवाहनाभिलाषी । पावेल कवणिये दिवशीं । गति तैशी भ्रमोत्पादका ॥ ३८ ॥ आतां उत्पत्ति जंव न सांगवें । तैं कैं जाहलें हें कवणे ह्मणावें ? । येथ आक्षेपू संभवे । ऐसा जरी ॥ ३९ ॥ कीं आधीं भ्रमाभाव देखे । भ्रम निवर्तलीया स्मरणें विशेखे । ह्मणे म्यां एतुला काल निके । भ्रमातें मोटके भोगिलें ॥ ४० ॥ परी येणें कळे भ्रमाचा आदी । ही शंका नघडे त्रिशुद्धी । जो अग्रीं उभा असेल वादी । पुसिजे समाधी[1] तयातें ॥ ४१ ॥ दृष्टांती-

---

१ समाधान.

भूत भ्रमाच्याठायीं । ही शंका संभवे पाही । परी मूलाविद्येचिया- ठायीं । ऐसें सर्वथा न बोलवे ॥ ४२ ॥ आणि दृष्टांतीभूत जरी भ्रमू । तरी भ्रमदर्शेत नव्हे भ्रमावगमू । भ्रम निवर्तलीया संभ्रमु । जरी कां घडे ॥ ४३ ॥ तरी अनुभवें पाहतां । कीं तुज ऐसें विचारिता । कीं तूं ब्रह्माचा नेणता । सांग कैंपासूनि असशी? ॥ ४४ ॥ तरी तूं ऐसे देशील उत्तर । कीं ब्रह्मज्ञान मज नाहीं आजवर । आणि मागे असेल ऐसी निर्धार । स्मृतीही नव्हे ॥ ४५ ॥ यालागीं मूलाविद्या अनादि । हें स्वीकारणे आलें बुद्धि । आग्रहाचि जरी मधीं । धरील कोणी ॥४६ ॥ तरी 'तुष्यतुदुर्जन' या युक्ति । क्वाचित्क्वचित् बहू महंति । ब्रह्मरूपीं मा- योत्पत्ती । उपेक्ष्यरीती बोलिली ॥ ४७ ॥ आदिअंतीं जें नाहीं । ते मध्यही नसे कांहीं ॥ हें बोलणें तंव लवलाही । ब्रह्मदृष्टी शोभते ॥ ४८ ॥ एवं भ्रमाचा न कळे आदी । परी ज्ञाने कळतो अवधी । या- लागीं 'मी ब्रह्म' ही बुद्धि । महावाक्यशब्दीं उपजे ॥ ४९ ॥ ह्मणोनि आरोपदृष्टि । स्वरूपाची विस्मृती मोठी । तीचि अविद्या गोमटी । प्रकृति नेहटी नाम जीचें ॥ ५० ॥ आणि सृष्टि करावयाची वासना । तीचि जियेतें गर्भधारणा । जन्माआदी कुमारीपणा । घेवोनियां जे ॥ ५१ ॥ ऐशी प्रकृति अधिष्ठून । निजसत्वें तीतें व्यवस्थापोन । जिच्यायोगें पावोनि मोहन । स्वयें आपण जवि झाला ॥ ५२ ॥ कीं बिंब तेंचि प्रतिबिंब । परी जैसें तैसें नभीं नभ । तेंवी ब्रह्मीं ब्रह्मता स्वयंभ । अभी जीवप्रतिभ जाहला ॥ ५३ ॥ जो पहिला कां प्रवेश । तो सृष्टि जाहलिया अनुप्रवेश । ऐसा प्रभुनिश्वास । आनंदविलास पावला ॥ ५४ ही सुषुप्तिअवस्था जीवाची । समष्ट्या प्रलयावस्था साची । येथ रूपनामतेची । जीवातें सेचि कांहीं नसे ॥ ५५ ॥ तयातें व्हावें नाम- रूप । ऐसा भगवदीक्षणसंकल्प । यालागीं कारणारोप । हें साटोप बोलिजे ॥ ५६ ॥ येथुनी सृष्टिस्वप्नांची घुमाळि । जिया परंपरा वेदांत कुळी । भाव येतो हा फळी । आली बाम्रळी चालतू ॥ ५७ ॥ त्रिगुणात्मक अज्ञान । तेथ तामसी माया करोनि ग्रहण । ब्रह्म जगदु- पादान । जाहलें असे ॥ ५८ ॥ आणि शुद्धसत्वांश अज्ञान । निके करोनिया ग्रहण । ब्रह्मचि पैं आपण । निमित्तकारण जगा झालें ॥ ५९ ।

एवं सत्वत्रयवादमत । हें बोलिलें पैं निश्चित । प्रयोजन याचें यथार्थ । ऐसें आहे ॥ ६० ॥ सुषुप्तिमाजीं कोणी । मुक्त न होय अज्ञानी । ऐसीचि दशा पाषाणीं । बोलिले वसिष्ठमुनी रघुनंदना ॥ ६१ ॥ म्हणोनि तेथ मुक्ति होणें । जेंवी दुःसंभवे येणें । तेंवी कारणस्थितींत जीव मुंचणे । असंभव जाणे सर्वथा ॥ ६२ ॥ कीं काष्ठाचियाठायीं । गुप्त वन्ही असे पाही । परी मंथिलियावीण लवलाही । काष्ठ जाळों तो न शके ॥ ६३ ॥ तथा सामान्यचिदाश्रिताऽविद्यावर्ती । जीवत्वाची असे बुंथी । ते सृष्टित्वा आलियावीण निश्चिति । ब्रह्मत्वस्थिति येवों न शके ।६४। ऐसें जाणोनि देवाधिदेवें । नामरूपें निवेशिली जीवें । ह्मणोनि नैर्घृण्य वैषम्य स्वभावें । निमाले दोष ॥ ६५ ॥ आणि जाणावया ब्रह्म । वेद निर्मिले परम । 'वेदान्तकृत्' इत्यादि वर्म । जाग्रच्छ्रुतीचें यास्तव ॥ ६६ ॥ मिमांसक ह्मणती नाहीं देव । वेद अनादि अनपेक्षोश्वरव । सांख्य आणि व्याकरणभाव । ऐसाचि आहे ॥ ६७ ॥ परी तें सर्वथा अनृत । जो वेदीं निःशेष अर्थ । तो कवण कल्पी बुद्धिमंत । अज्ञ कीं सज्ञ ॥ ६८ ॥ सज्ञ म्हणूं तरी कवण संस्कारें । संस्कार मानू तरी कवणाप्रकारें । प्रकार ह्मणूं तरी कवणे विद्यासागरें । विद्या सागर ह्मणूं तरी जाहलीरे अनवस्था ॥ ६९ ॥ अनवस्थारहित एक । अज्ञ जीवा अर्थोपदेशक । तरी तोचि ईश तो वेदबोधक । हें किमर्थ लेक ( मूर्ख ) न कल्पिती ॥ ७० ॥ ह्मणोनि वेद ईशप्रणीत । हाही जाहला सिद्धान्त । एवं सत्वत्रयवादास्थित । निरूपण ॥ ७१ ॥ आतां दृष्टिसृष्टिवादें । येणें आरोपे प्रसिद्धे । ब्रह्मातें अविबोधें । आलें विनोदें जीवैकपण ॥ ७२ ॥ आणि आपेक्षिकबिंबारोपाऽवच्छिन्न । तेंचि ब्रह्म ईश्वर जाण । अनध्यस्तविवर्तपण । निजभक्ता नारायण जें ॥ ७३ ॥ तयाचा घेऊनि आधार । जीव कल्पी समग्र । जेंवी क्षिप्त एक प्रस्तर । तो भित्याधार घेवोनि प्रतिक्रिया करी ॥ ७४ ॥ तेंवी परमेश्वरीं संकल्प । कामेंकरोनि साक्षेप । एवढा खटाटोप । रचिला जीवें ॥ ७५ ॥ तेथ ओसणता महास्वप्नीं । जीवकल्पित सत्कर्तृत्वादिगुणी । ब्रह्मप्रतिष्ठा अनध्यस्तविवर्तपणी । वेद-

१ जीवाच्याठायीं.

वचनीं मारी हाका ॥ ७६ ॥ तैं तेणें पावोनि ज्ञान । ब्रह्मत्वें भोगी मुक्तपण । यालागीं वेदांतकृत् हें वचन । भगवंतींचि घटे ॥ ७७ ॥ अथवा स्वप्नीं स्वप्नमिथ्यावाक्यबोध । तेंवी महास्वप्नीं कल्पोनि गुरुवेद । ज्ञान पावोनि प्रसिद्ध । पावे फळ ॥ ७८ ॥ स्वप्नरार्थे स्वप्नजगन्नियमन । तेंवी ईशा जीवकल्पित कर्तृपण । ईश्वरभजनें स्वप्नसमान । फळही होय ॥ ७९ ॥ जैसी कां स्वप्नवाक्यमीमांसा । तेंवी न वेदवाक्यमीमांसा । बाधाऽबाधे फळभेदठसा । सांपडे ह्मणुनी ॥ ८० ॥ किंवा वेद भगवन्निश्वास । यालागीं तें स्वाप्निक विशेष । आणि गीता स्वमुखें जगन्निवास । बोलिला ह्मणोनी ती जागृतपुरुषहाका ॥ ८१ ॥ 'वेद संपन्न होय ठायीं । परी कृपण ऐसा आन नाहीं । जे कानी लागला तिहीं । वर्णीच्याची ॥ येरां भवव्यथा ठेलिया । स्त्रीशूद्रादिकां प्राणिया । अनवसर मांडूनियां । राहिला आहे ॥ तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें । वेद वेठला भलतेणें । सेव्य होआवया' ॥ (ज्ञाने० अ० १८ ओ० १४०५७-५९ ) 'वेद माझे स्वप्नीं चेइला । आह्मी काय मानू त्याचे बाला । वेद आह्मावरी रुसोनी गेला । आम्ही त्याचे बाला धरिलें कंठीं' ॥ एवं श्री तात नाथ तुकाराम । बोलिले प्रमाण परम । आणि गीता हे स्वमुखें परब्रह्म । बोलिले यास्तव वरिष्ठ श्रुति ॥ ८२ ॥ 'तरी ज्याच्या निश्वासीं । जन्म झाले वेदराशी । तो सत्यप्रतिज्ञ पैजेसी । बोलिला स्वमुखें ॥' म्हणोनि वेदां मूळभूत । गीता ह्मणों हें होय उचित । ऐसें पुन: तात । बोलिले आह्मांती ॥ ८३ ॥ 'बाप बाप ग्रंथ गीता । जो वेदीं प्रतिपाद्य देवता । तो श्रीकृष्ण वक्ता । जिये ग्रंथीं ॥'

॥ गद्य ॥

म्हणून गीतेला जाग्रच्छ्रुति आणि वेदाला सौषुप्तश्रुति मी ह्मटलें. परंतु हें सर्व गीतेच्या स्तुतीसाठीं समज. कारण परमेश्वराला अज्ञानरूप निद्रा संभवत नसल्यामुळें अमूक जाग्रच्छ्रुति व अमूक सौषुप्तश्रुति असें परमेश्वराच्या वाक्याविषयीं ह्मणणें अश्लाघ्य आहे. तथापि वेदसम गीतेचें प्रामाण्य मला सम्मत आहे. वेदापेक्षां कमी नाहीं. आणि वेद निश्वासरूप म्हणजे अस्पष्टार्थबोधक आहेत. आणि गीता ही स्पष्टार्थ-

बोधक आहे. ह्मणून तीच अत्यंत सेव्य आहे. याप्रमाणेंच तातांचाही आशय आहे. वेद हा आपल्या ठिकाणीं पूर्ण आहे; वेदच आपलें कृपणपण काढण्याकरितां गीतारूप झाला; इत्यादि तातांचीं वचनें वेद-समान गीताप्रामाण्यार्थ आहेत. आणि संपूर्ण वेद बीजरूपानें पण स्पष्ट गीतेंत समाविष्ट आहेत, ह्मणून तातांनीं हिला वेदांचें मूळ म्हटलें. पण हेतु देऊन सिद्ध केले असल्यामुळें ह्या तातवचनाला अर्थवाद मात्र ह्मणतां येत नाहीं. पुन:, गीतेंत कोणताही अंश वेदविरुद्ध नाहीं. आणि पांचरात्रांतील वेदनिंदावचनाचा जसा आचार्यांनीं प्रतिक्षेप केला आहे, तसा 'त्रैगुण्यविषयावेदा' 'वेदवादरता:पार्थ' इत्यादि गीतेंतील वेद-निंदाभासवचनांचा प्रतिक्षेप केला नाहीं. अत:, गीतेचें वेदसम प्रामाण्य सिद्ध आहे.

॥ ओवी ॥

एवं कवणेही मतें । ब्रह्मबोधचि अपेक्षित येथें ॥
अनध्यस्तविवर्तत्वें आपणाते । एतद्दर्शन होतें भक्तिभाग्यार्थ ।८४।

॥ नरकूटकवृत्त ॥

मुनिजन जिंकुनि पवन मानस इंद्रिय जे ।
हरिभजनें गुणत्रयीं न लिंपुन पूर्ण अजें ॥
भवभय सांडुनि रमति चित्त निरिच्छ यथा ।
नयन भरोनियां बघुनि गाति मुकुंदकथा ॥ ८५ ॥

॥ ओव्या ॥

तोचि हा प्रभु अंत:करण । शुद्ध करूं शके सकरुण । या-बांचोनि योगादिसाधनधन । बंधन आणि न शुद्ध चित्त करी ॥ ८६ ॥ या प्रभूचें दर्शन । आपणा झालें हें धन्य पुण्य । यालागीं ह्यांचें दूर-गमन । होतां अप्रत्यक्षभवन योग्य नव्हे ॥ ८७ ॥ ह्मणोनी त्यागोनि सकल संसृति । जाऊं याचिये संगती । जे योगी पावले गती । तें या पद चिंतिती त्या सहज मिळे ॥ ८८ ॥ याचें करोनि प्रेमळ भज यातें पाहती शुचिमति होऊन । शुद्ध सूक्ष्म बुद्धीनें आत्मदर्शन । ाची वह्निश्वासन प्रमाणही ॥ ८९ ॥ ननु आत्मा मनोवागगोचर । तमाय तैसाचि बुद्धिगोचर । येथ वचनविरोधप्रकार । आशंकेचा ॥ ९०१२०॥

येथ समाधान । आत्मया न जाणे अशुद्ध मन । शुद्ध बुद्धि जाणे म्हणोन । शंका निष्पन्न होईना ॥ ९१ ॥

॥ चूर्णिका ॥

अथवा घटातें जाणतां । तैं बुद्धि विषयचेतनावच्छिन्नावृत्ति भंगूनि तत्वतां । आभास दे प्रकाशता । एवं बुद्धि आणि तद्गताभासयुगुलव्याप्यता । घटादिकां ॥ ९२ ॥

॥ ओव्या ॥

जेंवी पाहावया अन्यपदार्थे । नेत्र आणि दीप अपेक्षित । परी सूर्यातें पाहतां निश्चित । नेत्रापेक्षित परी दीप नलगे ॥ ९३ ॥ तेंवी साक्षी स्वयंप्रकाश । परी आवरण भंगावयास । शुद्धवृत्त्यपेक्षा विशेष । परी आभासप्रकाश तेथ नलगे ॥ ९४ ॥ एवं अप्रमेय अनादि वाङ्मनोऽगोचर । हीं वचनें आभासभानिषेधपर । आणि बुद्धिग्राह्य इत्यादि शब्द सुंदर । साक्षिस्थवृत्त्या आवृतिभंगपर बोलिजती ॥ ९५ ॥ बुद्धिवृत्ति तत्फल चिदाभास । विषयीं युगुलव्याप्ति विशेष । परी वृत्तिव्याप्ति-अपेक्षा साक्षिज्ञानास । फलव्याप्ति निःशेष तेथ नसे ॥ ९६ ॥ ब्रह्माभासे जीवाभासे । आभाससाम्यता सहज दिसे । याळागीं द्वित्रीसत्ववादवशें । विरोध नसे सर्वथा ॥ ९७ ॥ एवं अर्थद्वयामाझारीं । प्रथमार्थ दावी सगुण हरी । द्वितीयार्थ तो निराकारी । ज्ञानप्रकारीं योजिजे ९८ वेदीं शास्त्रीं परम निपुण । आणि अनुभवें संपूर्ण । ते श्रोत्रीय ब्रह्मनिष्ठ सुजन । गाती गुण प्रभूचे या ॥ ९९ ॥ एक परमात्मा परमेश्वरु । जो अज अव्यय निर्विकारू । जगत्सर्जनपालनसंहारू । तटस्थलक्षण जयाचें ॥ १०० ॥ जीव एक अथवा अनेक । ऐसे वेदांतीवाद सम्यक । परी नानाईश्वरवाद देख । नसे निष्टंक कोठही ॥ १ ॥ यद्यपि वाचस्पतिमतें । प्रतिजीवाप्रति सृष्टिभिन्नते । म्हणोनि ईश्वरही प्रतिजीवातें । एकैक मिळे ॥ २ ॥ एवं नानेश्वरप्राप्ति । सहज होय परी हे विरुद्धोक्ति । आतां रूपातु इया युक्ति । तात्पर्य निश्चिती घटों शके ॥ ३ ॥ एक सृष्टींत असे ईश्वर । तेथचि होऊं पाहे लयोत्पत्तिसंकर । परी वाचस्पती प्रतिगीतेचे सृष्टींत ईश्वर । एक एक साचार बोलती ॥ ४ ॥ म्हणोनी एक निश्वासमन । एकचि ईश्वर करी आपण । भिन्न सृष्टि ईश्वरासी

जाण । संबंध न घडे ॥ ५ ॥ आणि स्वप्नीं पंडिता जेंवी विद्या । तेंवी प्रतिजीवसृष्टि ईश्वरा नव्हे अविद्या । हें तात्पर्य किंचिद्बोध्या । आलें तरी उपेक्ष्य ॥ ६ ॥ यापक्षीं ईश्वरातें । ज्ञान स्वीकारिलें पुरते । तरी सर्वजीवांवरी तयातें । स्वतंत्रतें ठाव नव्हे ॥ ७ ॥ स्वस्वसृष्टींत सर्वज्ञता । स्वस्वसृष्टींत स्वतंत्रता । येणें आली महज्जीवता । गळीं तत्वतां सहजची ॥ ८ ॥ मग कोठें ब्रह्मज्ञानें मुक्ति । एखादा ईश्वर करील भलती स्थिती । किंवा सर्वेश्वर सृष्टिगत ईशा नियती । एक तरी नियामकस्थिती कवणाते ॥ ९ ॥ आणि तो एक मानिजे नियामकू । तरी तोचि ईश्वर होईल एकू । अन्यथाऽनवस्थाभाकू । न चुके कदा ॥ ११० ॥ ह्मणोनि अनेकजीववादांतही । ईश्वर तो एकचि पाहीं । आणि प्रंपच तो तव लवलाहीं । स्ववासनया भिन्न भिन्न ॥ ११ ॥ अथवा तत्कृत प्रपंच साधारण । सर्वजीववासनया समान । आसक्ति मात्र भिन्न । ते जननमरण भोगवी ॥ १२ ॥ किंवा साधारण प्रपंचवृत्ति । साधारणाऽसाधारणाऽनासक्ती । तथा सुखदु:खप्रतीति । परी त्यजोनि आवृती हरी एकू ॥ १३ ॥ एवं सत्वत्रयान्वयें । आतां दृष्टिसृष्ट्या स्वयें । पाहतां तरी हें होय । उचितचिकीं ॥ १४ ॥ प्रतिबिंबापेक्षिकबिंबारोपावच्छिन्न । ब्रह्मातेंचि सहज ईश्वरपण । तो सर्वज्ञ सर्वशक्तिमान । परी जीवकल्पित जाण । कर्तृता ॥ १५ ॥ सैन्य घाई राया जय । तेंवी जीवरचनी ईशाश्रय । यालागीं कर्तृतादात्म्यप्रत्यय । ईश्वरीं होय कर्तृत्वाचा ॥ १६ ॥ यालागीं सर्गस्थित्यंतकर्ता । हे जीवापेक्षी परी उपासका भ्रांता । भासे आणि ज्ञानिदृष्ट्या पाहतां । हा अकर्ता अद्वयू ॥ १७ ॥ अनध्यस्तविवर्तत्वें आम्हां । पातला देयावया प्रेमा । म्हणोनि श्रीकृष्णचरणगरिमा । नित्य नमावें सखियांनो ॥ १८ ॥ ह्यांचि कारण नाना अवतारा । देव स्तविती ज्या दिनोद्धारा । तो पाळावया विश्वविस्तारा । निर्विकारा आकृति ॥ ११९ ॥

॥ पद ॥

हा हा यदुकुलराय ॥ ध्रु० ॥ ब्रह्म असूनि नवल वाटतें । याची यशुमति माय ॥ १ ॥ राजे जेव्हां करिति अधर्मू । तैं यज्ञनि क्षेमाय ॥ २ ॥ यातें पावावया स्मरिजे । अलकावतिपतिप‌ाय ॥ ३ ॥ ॥१२०॥

जेव्हां राजे अधर्मेंकरोनी । असु पोषिती जनां मारुनी । तेव्हां परमात्मा कैवल्यदानी । सत्व घेवोनि अवतरतो ॥ २१ ॥ ननु याची सत्वमूर्ति । सर्वथा किंवा मिश्ररीती । सर्वथा ह्मणावी तों आसुरांप्रती । कां हा श्रीपती मारितो ॥ २२ ॥ जरी ह्मणावें मिश्रसत्व । तरी पातलें जीवत्व । महाराज! याचें तत्व । कायते सत्वर कळवा जी ॥ २३ ॥ तुझा प्रश्न आहे निका । परी हा पांडवपाठिराखा । शुद्धसत्वरूपें असोनि देखा । मिश्रसत्वसारिखा भासतो ॥ २४ ॥ जरी असतें सत्व मिश्र । तरी मुक्त न होते मारिले असुर । यालागीं हा करुणाकर । शुद्धसत्वावतार बोलिजे ॥ २५ ॥ परी आसुरांचा दुर्घट तमू । यालागीं तो निवटे हा सत्वधर्मू । परी या प्रभूतें रजतमू । कदा विभ्रमू असेना ॥ २६ ॥ नाना सूर्य निवटी तमा । तेणें तमारिपणाची गरिमा । परी केव्हां तरी किंचित्तमा । सूर्यप्रतिमा कायी मिळे ॥ २७ ॥ आतां तम निवर्तवी ह्मणून । सूर्या जरी आलें तमारिपण । तरी तें नाममात्रावीण । स्वरूपें प्रमाण असेना ॥ २८ ॥ तेंवी निवटोनि नि:शेष अधर्मू । स्थापन होय परमधर्मू । यालागीं हा पुरुषोत्तमू । सत्व संभ्रमू लोक ह्मणती ॥ २९ ॥ येऱ्हवीं हें सर्वनाममात्र । परी हा परमात्मा स्वतंत्र । अनध्यस्तविवर्त चिन्मात्र । सुकुमारगात्र केशवू ॥ १३० ॥ असो ऐसी जेव्हां जनीं । वाढे अधर्मराह्मारजनी । तैं हा सज्जनमनदिनमणी । अंध:करणी निवारी ॥ ३१ ॥ 'आयका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही गुणवर्य । वसती जेथ '। तो यशें जन करी पुण्योत्तम । श्रीनें चालवी भक्तक्षेम । औदार्यानें सत्वपरम । दे मोक्षधाम ज्ञानानें ॥ ३२ । वैराग्यें करोनि न कर्ता । ऐश्वर्यें योग चालविता । कवणेपरी जेथ न्यूनता । नाहीं सर्वथा समयत्रयीं ॥ ३३ ॥ तैं जग पाळी साच पैजे । उपदेशी ज्ञप्ति ब्रह्ममयी जे । अद्भुतकर्मे गाती पै जे । दया सहजे त्यांजवरी ॥ ३४ ॥ निज निज कर्मांचीं फळें । जरी हा देतो सकळें । तरी वेदें सदुपदेशपीयूषगुरळे । येणें कळवळे दीधले ॥ ३५ ॥ सर्वां सकृप चक्रपाणी । परी जे बैसती कुहकसदनीं । ते आपणचि याचिया कृपाजीवनीं । दैवें करोनी भिजतीना ॥ ३६ ॥ 'कैसे प्राप्तीचिये वेळे । निदैवा आंधळेपणाचे डोहळे '। तैसे जनांचे विषयकवळें । हृद्ज्ञान-

डोळे लोपती ॥ ३७ ॥ ऐसी युगीं युगीं मूर्ती। कृपेनें धरी हा जगत्पती। जैं जैं भक्त आठवती। तेव्हां श्रीपती प्रगटतो ॥ ३८ ॥ नामाग्नीनें ज्यांचें समग्र। जळालें पैं अघतणार। तो एतत्कृपामृतें सत्वर। भिजोनि भवपार पावतो ॥ ३९ ॥ एवं सर्वावतारस्थिती। परी नवल कृष्णावताररीती। येथ मुख्यप्रयोजनप्राप्ती। वाढविणें प्रीति स्वीयांची ॥ १४० ॥ तें धन्य धन्य यदुकुल। जेथें जन्मला घननीळ। मज जन्मायोग्य हें स्थळ। ऐसें स्वयेंचि केवळ सत्कारी ॥ ४१ ॥ धन्य पूर्ण तें मधुवन। जेथें क्रीडा करी जगन्मोहन। जो सच्चिदानंदारविंद-लोचन। संसारमोचन ह्मणती मुनी ॥ १४२ ॥

॥ प्रियांगविक्षेपवृत्त ॥

नवल बरें का हे सखिग्यांनो। स्वरयश जेथें तुच्छचि मानो।
महीवरि शोभे द्वारवती ही। सुरवर जेथें राबति देही ॥ ४३ ॥
हरिकरुणेनें आपण धन्य। इति मनीं भावें भाविति मान्य।
सकळही लोकां आवडि साची। गणति न सेवे रातदिसाची ।४४।

॥ ओव्या ॥

जो स्वयें आत्मयाचाचि पालक। नव्हे इतर पित्रादिसम दैहिक। तयाचें प्रजा तल्लित सस्मित मुख। जाणोनि अनुग्राहक लक्षिती ।४५। त्या धन्य रुक्मिण्यादि वनिता। ज्या कृष्णसमुद्रीं परमसरिता। श्रीकृष्णघनवर्षणीं सर्वथा। ज्या अवनिता पावल्या ॥ ४६ ॥ बहुजन्में अर्चिला देवो। तयाचें फळ हें पहा हो। जो जगदात्मा आदिदेवो। तो वासुदेवो कांत जया ॥ ४७ ॥ जयाची पाहूनियां कांती। कोटि रति-कान्ताही खंती। तयाचे पावतां संक्रांती। पद क्षाळिती स्नेहवशें ॥ ४८ जो पाय नसोनि करी गमन। त्याचें करिती पदक्षालन। जो हात नसोनि करी ग्रहण। तो पाणिग्रहण करी ज्यांचें ॥ ४९ ॥ जया न वस्तुस्थानवेला। न पवति जया क्रिया बहुला। तो ज्यांचियासह बहुला। लीलया वहिला आरोही ॥१५०॥ जयाचा कोणी नव्हे धर। यालागीं बोलिजे अधर। अंतर्यामि सर्वेश्वर। अमृत निर्धार श्रुति ह्मणे ॥ ५१ ॥ जो अधर तोचि अमृत। यालागीं बोलिजे अधरामृत। परी अधरीं मिळवावया निश्चित। पावला अमृतऽधरसदृशीं ॥ ५२ ॥ तें अधरा-

मृत सेवुनी । ज्या अमृतचि जाहल्या मनीं । तुम्ही सकळही कामिनी । त्यांसी जाउनी सख्य करा ॥ ५३ ॥ जरी प्रभूचें अधरामृत । तुम्हा असेल अपेक्षित । तरी रुक्मिण्यादि भगिनी समस्त । गुरुत्वें निश्चित भजा वो ॥५४॥ पूर्वीं अधरामृत सेवुनी । अधरामार्जीं राहुनी । पतिपुत्रांचे चपेटे साहुनी । व्रजकामिनी लुब्धल्या ॥ ५५ ॥ त्या व्रजस्त्रियांचें चरणपाणी । पिऊनि हरिकरीं दिधलें पाणी । यालागीं धन्य त्या कृष्णकामिनी । ज्या हें चिंतिती मनीं त्याहि धन्य ॥ ५६ ॥ श्रीकृष्ण एक कुमुदिनी । तेथ आदौ भृंगी व्रजकामिनी । तदुच्छिष्टसेवका कृष्णपत्नी । तत्प्रसादधारिणी होऊं चला ॥ ५७ ॥ कीं मिळोनि गंगेचिया ओघा । सागरीं गमन ओहळ क्षुल्लगा । तेंवी वृंदावनीं कामिनी पिंगा । चिंतोनि हरिअंगसंगा पाविजे ॥ ५८ ॥ एवं व्रजयुवतींचा त्यागू । आणि तयां आवडता श्रीरंगू । हें पाहोनि स्त्रीकलाप अभंगू । करी संगू श्रीहरीचा ॥ ५९ ॥ एकीनें जावोनि अंबालयीं । वरिली मूर्ति गोपीप्रसादमयी । सोडुनी बंधू बाप आई । आली आलयीं आनंदें ॥ १६० ॥ एकीनें सोडोनि तीर्यग्योनी । जीवेंभावें लागली चरणीं । तो तियेचा भाव जाणुनी । जैसि स्त्रीत्वा आणि श्रीकृष्णू ॥ ६१ ॥ आंदण घेवोनि स्यमंतका । तंव अकस्मात पातली एका । जियेचिया बापें उपकार निका । स्मरोनि निष्कलंका समर्पिली ॥ ६२ ॥ एक पाहोनि अनुष्ठानी । निकें वरी चक्रपाणी । एक चौघे बंधू अव्हेरुनी । लागली चरणीं आनंदें ॥ ६३ ॥ एकीसाठीं भेदोनि पण । आवडी करी हरि करग्रहण । तैसा दुसरीचाही पण । भेदोनि अर्धासन दीधलें ॥ ६४ असो ऐसी नाना रीती । सोळा सहस्रही युवती । एकयाचि लग्नें वरी श्रीपती । परी एकपत्नित्वस्थिति भंगना ॥ ६५ ॥ नाना रूपें घेवोनि हरी । भोगोनि राहिला ब्रह्मचारी । हें असो परी तितुकी निर्द्धारीं । सृष्टी निर्मिली सामर्थ्यें ॥ ६६ ॥ एवं वधोनि चैद्य अनंत । ज्याचे प्रद्युम्न सांबादि सुत । आणि नरकासुर मारोनि निश्चित । ज्या समस्त आणिल्या ॥ ६७ ॥ या सकळही जयाच्या स्त्रिया । चुंबन देती ह्मणोनि प्रिया । ज्यांची श्रीकृष्णैकचर्या । परम आर्या ज्या झाल्या ॥ ६८ ॥ येऱ्हवीं तरी स्त्रियांचें जिणें । अस्वतंत्र लाजिरवाणें । अशौचाचें

ओळखणें । भांडारची । ६९। परी समुद्राचें क्षारपण। शोभेचि जेंवी रत्न ह्मणून । तेंवी श्रीकृष्णकांत हृदयीं पूर्ण । यालागीं ऐसेंही स्त्रीपण शोभे ॥ १७० ॥ नातरी देहीं पाहतां स्पष्टा । दिसे पूयशोणिन्मांसविष्टा । परी शोभवी ब्रह्मनिष्ठा । जेंवी उत्कृष्टा । गुरुत्वें ॥ ७१ ॥ तेंवी अशुची अस्वतंत्र । ऐसिया स्त्रीत्व जरी पात्र । परी हृदयीं धरितां कोमलगात्र । शोभा विचित्र आली तया ॥ ७२ ॥ आणि ओहोळ गंगेसी मिळे । तैं अशुचित्व गळे सगळें । परी पाणीपण तों केवळें । जैसें तैसें ॥ ७३ ॥ तेंवी मिळतां भगवंतीं । गळोनि स्त्रियांची अशुचस्थिति । राहिल्या होवोनि केवळ भक्ति । जेंवी व्रजयुवती गोकुळीं ॥ ७४ ॥ वेचोनि पराक्रम धन । जिया आणिलिया जिंकोन । त्याहींच पुढतीं प्रेमेंकरून। केला आधीन निजकांतू ॥ ७५ ॥ प्रेम मांदूस करून । आंत ठेविलें कृष्णधन । तें उघडें राजपथीं भोगितां जाण । न नेती चोरोन तस्कर ॥ ७६ ॥ ऐशा उघड महाधनिका । अष्टसिद्धि जियांचिया पायिका । त्या रुक्मिण्यादि सकळिका । जेंवी गोपिका तेंवी नमो ॥ ७७ ॥

॥ दोहा ॥

हें वनितांचें स्तवन जे श्रवण पठन अविकार ।
करिती होउनि सूत ह्मणे ते पावति भवपार ॥ ७८ ॥

॥ ओव्या ॥

एवं वदत स्त्रिया । अवलोकिती यादवराया । प्रभूही कृपादृष्टी पाहोनियां । पातला लवलाह्या स्नेहवशें ॥ ७९ ॥ परी मर्मवासौ इया भक्ती। नेणो कृष्णा होईल भीति । ह्मणोनि चतुरंग सैन्य देती । युधिष्ठिरादि स्नेहवशें ॥ १८० ॥ जें जातो शार्ङ्गधर । ह्मणोनि परम विरहातुर । कीं वियोगें प्रेम राहील निरंतर । विरहातुर ह्मणोनि वा ॥ ८१ ॥ ऐसें चालतां चालतां दूरी । प्रेमें पांडव आले हें हरी । जाणोनि तयां सांतवोनि घरीं । परतवोनि स्वनगरीं निघाला ॥ ८२ ॥

॥ गद्य ॥

ततःकुरुजांगलपांचालशूरसेनब्रह्मावर्तकुरुक्षेत्रमत्स्यसारस्वतमरुसौवीराभीरान्देशानतीत्यानर्तसमीपेप्राप्तस्तत्रत्यैर्जनैस्तत्रतत्रपूजितःसन् रथादवतीर्यसायंसंध्यामुपासितवान् ।

॥ श्लोक ॥

एवंविधानिकर्माणिमत्प्रियस्यमहात्मनः ।
श्रुतानिश्रूयतामम्बज्ञानेश्वरकृपालवात् ॥ १८३ ॥

हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे श्रुतिमनोहर-स्त्रीस्तवादिनिरूपणं नाम दशमसखीप्रेषणम् ।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ११ वें.

॥ पद ॥

नमिते मी पदकमला श्री कृपाघना । सत्वर घे करुनि प्रभू मज निजांगना ॥ नमिते मी ० ॥ ध्रु० ॥ तप तपती मुनिजन तव चरण-भेटिला । पोटिं प्रेम धरुनि त्यजिति बंधकोटिला ॥ नमिते मी० ॥ १ ॥ चरणहाव जीवभाव सकल हारवी । यामिनितम वारुनि हृदि प्रगट हा रवी ॥ नमिते० ॥ २ ॥ अलकावतिपतिचरणा वंदुनी सदा । लंपट तव मंचकिं आह्मि प्रीति लासदा ॥ नमिते० ॥ ३ ॥ १ ॥

॥ पद ॥

मंगल पदा ध्या । चिंतुनि वारा भवआपदा ॥ ध्रु० ॥ सुख सर्वदा हो । वाचे करोनी शंकर वदा ॥ मंगल० ॥ १ ॥ पिनाकधरा ध्या । गाऊनि त्यागा वनिताधरा ॥ मंगल० ॥ २ ॥ आळंदीपती ध्या । हरि-साठीं ज्या मुनी जपती ॥ मंगल० ॥ ३ ॥ २ ॥

॥ गीति ॥

रसने रसने रस ने हरिनामामृत अखंड तूं हृदयीं ॥
वसणे वसणे वसणे चित्ता त्वां १कांत जेथ भाक्षि दही ॥३॥

---

१. कृष्ण.

॥ पद ॥

वाणि करहुं मधुर मधुर गान नामकारे । लेहुं मती कबहुं श्रयण कुजन कामकारे ॥ ध्रु० ॥ गाल लाल कीन्ह बाल काल धामकारे । लाल अदन चाल भरा देह चामकारे ॥ वाणि० ॥ १ ॥ ज्ञानदेव हरत भेव शरण जाय वाको । भव वैभव तजि परिहारि जनम ए कव्वाको ॥ वाणि० ॥ २ ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥

आनर्तैःस्तूयमानस्यपुरींनिर्विश्यबंधुभिः ।
एकादशेरतिःसम्यग्यादवेंद्रस्यवर्ण्यते ॥ १ ॥
उत्सवैरुच्चरत्पौरमुदंचध्वजतोरणम् ।
उल्लसद्रत्नदीपालिस्वपुरंप्रभुराविशत् ॥ २ ॥

॥ गद्य ॥

सूतउवाचः— ततःकृष्णोद्वारकाप्रदेशान्प्राप्यतत्रस्थानांविषादंशमयन् शंखंदध्मौ । सध्मायमानःशंखःकृष्णस्यहस्तकमलसंपुटेसशब्दोहंसइवशुशुभे । तच्छंखनादंश्रुत्वाभगवद्दर्शनलालसाःप्रजाःप्रत्युज्जग्मुः । ततःकृष्णाय प्राभृतानिदत्वाप्रीत्याप्रसन्नमुखाःसत्यस्तमात्मारामंवदंतिस्म ।

॥ श्लोक ॥

तव चरणसरोजा वंदितो देवराया ।
निजकर शिरिं ठेवी सत्वरें दे वरा या ॥
श्रवणनयनचित्तीं मूर्ति तूझी वसावी ।
जनिं जनिमरणाची भीति कांहीं नसावी ॥ ५ ॥

॥ घनाक्षरी ॥

ब्रह्मा पोटिंचेंचि बाळ । तोहि पायिं ठेवि भाळ ॥
तैसा वंदि चंद्रभाळ । घालि माळ इंदिरा ॥ ६ ॥
देव इंद्र चंद्र सूर्य । तुज सेवुनियां आर्य ॥
साधिताति मुक्तिकार्य । मुनि शान्तिमंदिरा ॥ ७ ॥
जगत्रयमूषकाल । मानि भोज्य व्यालकाल ॥
अनध्यस्त तूं अकाल । नंदबाल सुंदरा ॥ ८ ॥
दीननाथ तुझे पाय । ऱ्हाीं मिळाया उपाय ॥
यास्तवाह्नि गोपराय । प्रेमें बाहु कंधरा ॥ ९ ॥

॥ ओवी ॥

पुढील श्लोकीं सकल प्रजा । स्वानुभवें भावनाओजा ॥
परिपूर्ण करोनि हृत्सरोजा । नंदात्मजा स्तविताती ॥ १० ॥

॥ करुणास्यवृत्त ॥

निजमायओळख बाळकाप्रति पाजि दूध म्हणोनिया ।
जन पाहती हरिला तथाविध विश्वपाळ गणोनिया ॥
जननीवरी निजभार बाळक सर्व अक्षय ठेविती ।
जन तेंवि नंदसुता गुरु प्रिय माय तातहि भाविती ॥ ११ ॥

॥ ओव्या ॥

आम्ही सर्वही भगवंता । तुझे अंश कृपावंता । परी देहसंगें अनंता। महती बद्धता पावलों ॥ १२ ॥ यालागीं देहबुद्ध्या तव दास । जीव-बुद्धीनें तुझे अंश । आत्मबुद्धीनें सर्व समरस । भक्ति उल्हास मधुरता ॥ १३ ॥ आम्ही दास तूं परमदेव । आम्ही बाळ तुज मातृपितृभाव । आम्ही चित्प्रभा तूं कांत करुणार्णव । निवारायाऽस्मद्भव तूं गुरु देव आह्मा ॥ १४ ॥ हे गुरो! करोनि तव सेवा । आह्मी कृतकृत्य जाहलों देवा । टाकोनियां जीवभावा । ब्रह्मभावा मिळालों ॥ १५ ॥ अथवा जगीं न यावा कर्तृत्वाभिमान । ह्मणोनि तूं विश्वपाळण । आह्मी सर्व तवाधीन । सांभाळ पूर्ण करिशी तूं ॥ १६ ॥ ऐसा नित्य करिता सांभाळ । आमुचा होता अपराध प्रबळ । भक्षूं पाहे काळव्याळ । तेथ देव तूं व्रजपाळ । सोडविशी ॥ १७ ॥ साही वैरी धांवती देखा । तेथ तूं सुहृत्पाठिराखा । तव वीर्यें तवांश आम्ही वेणुमुखा । अतो निष्कलंका पिता तूं ॥ १८ ॥ कोंडिता इंद्रियें कष्ट होती । ते तव प्रेमें सकल हरिती । यालागीं माय तूं यदुपती । आम्हाप्रती दीनबंधो ! ॥ १९ ॥ साधनचतुष्टयें ऋतुस्नाता । गुरुप्रेममदें उन्मत्ता । तेथ ब्रह्मानंदें काम पुरविता । पती अनंता तूंचि आम्हा ॥ २० ॥ कांतकांता अक्षयगांठी । एकत्वें घालावयासाठीं । महावाक्योपदेष्टा कर्णसंपुटीं । गुरु जगजेठी आम्हां तूं ॥ २१ ॥ एवं तुझी करितां सेवा । मनचि सांडि मनोहावा । तेथ कृतकृत्यतेचा ठेवा । सहज स्वभावा सांपडतो ॥ २२ ॥ एवमंतरीं तव आलिंगनें कृतार्थ । आणि बाहेरीं परम सनाथ । तुझें रूप श्री

यदुनाथ । पाहतसों यास्तव ॥ २३ ॥ ज्ञानिया मुक्तीची परम गोडी । परंतु व्युत्थानीं दैवबेडी । आम्ही तुझी धरितां गोडी । मुक्ती बापुडी वश झाली ॥ २४ ॥ अंतरीं तुझा ब्रह्मानंद । बाहेरीं तव चरणामोद । म्हणोनि समाधिव्युत्थानभेद । निमाला प्रसिद्ध सकलही ॥ २५ ॥ वैभवीं गुंतले सुरवर । चालविती जनीं अधिकार । यासाठीं व्हावया तुझे चाकर । पडतो अंतर तव प्रेमें ॥ २६ ॥ देव तुझे यद्यपि सेवक । तरी ते परम आज्ञाधारक । म्हणोनी तुझें प्रेमहास्य सम्यक । तयालागीं दिसेना ॥२७॥ देवांस प्रळयीं होय व्यथा । यालागीं तुझी करुणार्द्रता । तयालागीं न दिसे ताता । तें भाग्यें आम्ही पाहतो ॥ २८ ॥

॥ अभंग ॥

म्हणोनीयां देवा सकळही आम्ही । सेवक तूं स्वामि दीनबंधो ॥१॥ तुझियानें आम्ही जाहलों सनाथ । मोक्षालाहि लाथ मारूं आतां ।२। देवांलाही रूप न दिसे सांवळे ॥ भरोनियां डोळे पाहताहो ॥ ३ ॥ काय हें आश्चर्य कवण सुकृत । तुजसवें तात क्रीडताहो ॥ ४ ॥ आम्हा वाटे पूर्वी ज्ञानेश्वरसेवा । केलियाचा ठेवा मीळताहे ॥ ५ ॥ २९ ॥

॥ श्लोक ॥

संयोगेनसुखंयस्यवियोगेऽपिसुखंभवेत् ।
पुनःसंयोगसंप्राप्तौसुखंतस्मैनमाम्यहम् ॥ ३० ॥

॥ दिंडी ॥

जेधवां तूं गेलासि कुरूदेशीं । सुहृत्प्रेमें डोळिया पहायासी ॥
तदा आम्हां पळ वर्षकोटि होता । तवागमनीं विश्वास जरी होता ३१

॥ गद्य ॥

**शिष्यः–** भगवन् ! बाहेर गेला असतांनां वा दृष्टिआड झाला असतानां मृत समजावा. कारण यावत् दृष्टि तावत् सृष्टि आहे असा दृष्टिसृष्टिवादियांचा सिद्धांत असून तो आपणास सम्मत आहे. आणि आपणास भगवद्भक्तिही सम्मतच आहे; आणि भगवद्भक्तींत तर भगवंताचा नाश इष्ट नाहीं असें आहे; तेव्हां प्रजाजनांनां जो पळ पळ कोटिवर्षसमान भासला तो काय म्हणून? भगवंताच्या मरणप्रत्ययामुळें कीं काय?

श्रीगुरुः— तूं पूर्वी जेव्हां शंका केलीस तेव्हां मी तुझ्या बुद्धिवैभवाची प्रशंसा केली होती. त्याचें हें फळ असेल नाहीं ? अरे मूढबुद्धे! मूळांत 'यर्हि' हें पद आहे; आणि 'यर्हि तर्हि'चा नित्यसंबंध आहे. ह्या पदांनीं संयुक्त अर्थ केला असतां 'यर्हि' पदाचा भाव कीं, जरी आपण सुहृद पाहण्याला गेलां होतां व पुन्हा येणार होतां अथवा हृदयांत होतां, तरी व्युत्थानीं प्रारब्धभोगभीतीमुळें आणि सुंदरतनुप्रेमामुळें पळ कोटि वर्षांसमान भासत होता. या अभिप्रायानेंच 'आगमनीं विश्वास जरी होता' असें दिंडींत म्हटलें आहे. आतां, दृष्टिसृष्टिवादाला धरून तूं जी शंका केलीस ती घटत नाहीं; कारण सृष्टिरूप अनाद्यतिरिक्त प्रपंचाविषयीं दृष्टिसृष्टीचा स्वीकार अद्वैतसिद्धींत मधुसूदनाचार्यांनीं केला असल्यामुळें अर्थातच चतुर्धराचार्यांनीं भारतभावदीपांत ह्मटल्याप्रमाणें आणि अस्मदीय भक्तिपदतीर्थामृत वचनाप्रमाणें अज, अव्यय, अनध्यस्तविवर्त जें परमेश्वरशरीर त्याचेठायीं दृष्टिसृष्टि स्वीकृत नाहीं. ह्मणून परमेश्वराचें सुहृद्दिदृक्षया हास्तिनपुरगमन द्वारकावासी बुध जनांनां मरणप्रत्ययबोधक झालें नाहीं. तस्मात् त्यांच्या भक्तीचा छेदही घडला नाहीं; अथवा जीवरूपी प्रतिबिंबापेक्षी आरोपित बिंबत्वावच्छिन्न बिंबरूपी चैतन्य परमात्मा वा शुद्धब्रह्म परमात्मा दृष्टिसृष्टिवादांत गृहीत असल्यामुळें, प्रथमपक्षीं जीवबोधनार्थ स्वगोचर विद्यामय भगवच्छरीराचा वा द्वितीयपक्षीं श्रीमन्मधुसूदनगूढार्थदीपिकोक्त 'प्रेम्णैकत्वेऽपिपृथगिवानंदभान' रूपी भगवच्छरीराचा स्वीकार करावा लागत असल्यामुळें बुधजनांनां भगवच्छरीरसंबंधी व्ययप्रत्यय संभवनीय नाहीं. ह्मणून दृष्टिसृष्टिवादी राहूनही अत्युत्कट भक्तीनें साक्षात्संयोगीं वा वृत्तिमात्रसंयोगीं वियोगोपलालनरूप प्रेमास्तव कोटिवर्षसम पळ वाटणें शक्य नाहीं काय?

शिष्यः— भगवन् ! माझी शंका समूळ विनिवृत्त झाली. अग्र्यवृत्तांत ऐकण्याकरितां श्रवणमनाद्युत्सुक आहेत.

श्रीगुरुः— इतिप्रजानांवचःशृण्वन्दृष्ट्यातासामुपरिप्रसादंकुर्वन्कृष्णो— द्वारकांविवेश। कथंभूतां। स्वतुल्यबलैर्मधुभोजदाशार्हादियादवैरक्षिताम्। सर्वर्तुपुष्पादिसंपदायुक्तवृक्षलतामिश्रैरुद्यानादिभिःशोभिताम् । पुरद्वार-

गृहद्वारेषुकृततोरणांध्वजपताकाग्रैः प्रतिहतातपाम् । सुगंधजलैः संसिक्तमार्गां फलपुष्पाक्षतांकुरैरवकीर्णाम् । द्वारिद्वारिपूर्णकुंभबलिदीपादिभिःसमलंकृताम् । एवंभूतांनगरींप्राप्तंश्रीकृष्णंश्रुत्वावसुदेवोऽक्रूरउग्रसेनोरामःप्रद्युम्नश्चारुदेष्णःसांबादयोहर्षेण त्यक्तशयनासनभोजनाःसंतः हस्तिश्रेष्ठंपुरःकृत्वाब्राह्मणैःशंखतूर्यादिवाद्यघोषेणचसहरथैःप्रत्युज्जग्मुः । तथाशतशोवेश्याःस्वलंकृतायानैर्जग्मुः । नटनर्तकगंधर्वाश्चजग्मुः । सूतमागधबंदिनोभगवच्चरितानिगायन्तिस्म । श्रीकृष्णोऽपिनमनालिंगनकरस्पर्शहास्यावलोकनैर्यथायोग्यंसुहृदांपौरजनानांसर्वेषांसम्मानंचक्रे । ततोगुरुविप्रवृद्धादिभिराशीर्भिर्युज्यमानंश्रीकृष्णंराजमार्गगतंहर्म्यारूढाःपुरस्त्रियोददृशुः ।

॥ पद ॥

धन्य धन्य तेचि पुरुष धन्य त्याचि नारी । हृदयिं धरुनि पूजिताति नित्य पूतनारी ॥ध्रु०॥ यमनियमादिक करिती त्यांस आकळेना । निगममान करिति सदा वृत्ति त्या कळेना ॥ धन्य धन्य० ॥ १ ॥ अनक विजड सुव्रत सुतनु शांत निर्विकारी । युवतिचरण स्मरुनि ह्मणति त्यास सदनचारी ॥ धन्य धन्य०॥२॥ निगमहृदय पूर्णब्रह्म सुजनसुमनोहारी । अलकावतिपतिकृपया आह्मि तदिय नारी ॥ धन्य धन्य० ॥ ३ ॥ ३१ ॥

॥ ओव्या ॥

जरी द्वारकावासी जन । नित्य घेती अच्युतदर्शन । तरी तृप्त न होती नयन । श्रीधाम ह्मणोन सहजची ॥३२॥ शिष्य ह्मणे श्रीगुरुनाथा । विषयां आपातरमणीयता । आणि भगवान तंव विषय तत्वतां । यदर्थता साकारता जाहला ॥ ३३ ॥ तयाचेंचि होतां दरुशन । न कां तृप्त द्वारकावासी जन । ऐसा ऐकूनिया प्रश्न । सद्गुरु वचन बोलती ॥ ३४ ॥

॥ पद ॥ भगवंता ह्मणसी विषय मूढतमबुद्धी । तुजनाहिं अम्रुनियां यशुमतिजभजनासिद्धी ॥ धृ० ॥ किति वटवट करिशी पढुनि शब्दगणअवधी । हरिभक्तिविणें वेदान्त बोलणें अविधी ॥ १ ॥ कामादिक रिपुंना जो वैराग्यें न वधी । परि होत पतन जो तर्ककर्कशें नवधी ॥ २ ॥ चाल ॥ बहु तुला श्रोलिलों वाणी साजिरी । परि तुझी विषें भरली ही वाग्झरी ॥ चाल पहिली ॥ करुं नको कुतर्के व्यर्थ मती ही गद्धी । तुज नाहिं अम्रुनियां० ॥१॥ विषयांचा येतो वीट भोग निज ह्मणुनी ।

मन चंचल घडिघडि इच्छित नूतन गणुनी । विषयींहि राहते ब्रह्मसुख-चि जरि भरुनी । स्थिरतेवांचुनि मन नेघे साक्षात्करुनी ॥ चाल ॥ आपणापरिस विषयांनां तुच्छता । ह्मणोनियां वीट येतो कीं तत्वतां ॥ चाल पहिली ॥ आपली आवडी वरिष्ट ह्मणती सद्धी । तुज नाहिं अज्ञुनियां ॥ २ ॥ तो आत्मा श्रीहरि चेतनकंचनगाभा । ही कृष्णतनू भूषणसम ब्राह्मिक शोभा । असि परम प्रेमास्पद मन ही स्थिर करभा । विसरेल कोण विज्ञात निगमसंदर्भा ॥ चाल ॥ हा विवर्त परि अध्यासा नावळे ॥ यद्यशुमति साजवि प्रेमें जांवळें ॥ चाल पहिली ॥ ह्मणुनी अतृप्त द्वारकौकसांची सद्धी ॥ तुज नाहिं अज्ञुनियां० ॥ ३ ॥ श्री अल-कावतिपति तात गुरू शिव भोळा । श्रित तनुजदैन्य अवलोकी सकरुण डोळा । तैं सांपडला समजुनि सच्चित्सुखगोळा । अन्वयें पहावा कांत-गुरुभजनसोहळा ॥ चाल ॥ हें भाग्य ज्यांस वैराग्य त्या प्रती । हें ओळखुनि मुनि आले सद्गती ॥ चालपहिली ॥ तूं भज गुरु हरि निज कळुनि समाधीसंधी । तुज नाहिं अज्ञुनियां० ॥ ४ ॥ भगवंता० ॥ ३५

॥ गीति ॥

शिष्य ह्मणे अकलंका हरली शंका समस्त ही माझी ॥
आतां करुणेनें प्रभु कळवितील पुढिल वृत्त सुसमाजीं ॥ ३६ ॥

॥ ओव्या ॥

सद्गुरू ह्मणती ऐक वचन । जया हरीचें हृदयस्थान । कमला शोभवी आपण । शोभा पाऊन मुक्तित्वें ॥ ३७ ॥ यास्तव मिसळतां हृदयालिं-गनीं । कामनापूर्ती सहजेक्षणीं । सुंदर वदन पाहतां नयनीं । रूपा सन्य-सुनी मन राहे ॥ ३८ ॥ बाहू आश्रित लोकपाळ । ह्मणोनि भक्तां सर्व दिग्मंगळ । आणि निर्गुण जाणोनि सगुण वेल्हाळ । अति उतावेळ जे गाती ॥ ३९ ॥ ऐसिया भक्तांचें अधिष्ठान । ज्या प्रभूचे चारु चरण । तयाचे होतां संघट्टण । सत्संगें जीवपण हारपे ॥ ४० ॥

॥ गद्य ॥

एवंहरौबद्धसौहृदैरातपत्रव्यजनैर्मंडितोऽर्कसनक्षत्रचंद्रेंद्रचापवैद्युतैर्यथा-मेघाश्छत्रचामरैःकुसुमवर्षैःपीतांबरेणवनमालयाचपथिहरिर्बभौ । एवंभूतः कृष्णःपितृगृहंप्रविष्टोमातृभिरालिंगितःसन् देवकीप्रमुखामातॄर्ववंदे । ववंद

इति मातृसौंदर्यादरविशेषज्ञापनार्थमुक्तम् । सौंदर्यनामपातिव्रत्यमोजः । आदरविशेषोनामशुद्धबुद्धिः । शुद्धबुद्धिंविनागर्भेब्रह्मणआवेशोभवितुमशक्यत्वात् । नचानादरणीयायांशुक्तौमौक्तिकंयथाभवतितथाहरिर्मातृगर्भइतिवाच्यम् । देवैर्मातुःकृतादरात् । " देवक्यांदेवरूपिण्यां " इतिवचनाच्च । नापियथाशुक्तावप्रयासंविनामौक्तिकंभवतितथागर्भेहरेरागमनम् । निर्गुणतयाब्रह्मभावेनसगुणतयापुत्रभावेनचाचिंतनरूपेणप्रयतनात् । ' युवांमांपुत्रभावेनब्रह्मभावेनचासकृत् । चिंतयन्तौकृतस्नेहौयास्येथेमद्गतिंपराम् ' एतद्वक्ष्यमाणंभगवद्वचनमेवयतनेप्रमाणम् । ' जीवानामिवनधातुसंबंध ' इतिश्रीधरटीकोक्तेश्चशुद्धबुद्धावेवभगवदाविर्भावइत्यादरणीयत्वं सिद्धम् । विशेषपदस्तुकर्मणाशुद्धबुद्धौत्वनुभवेनात्मनोभक्त्याऽनध्यस्तविवर्तरूपस्यभगवच्छरीरस्यचाविर्भावइतिविशेषः । ततःस्नेहस्नुतपयोधरास्ताःपुत्रमंकसमारोप्यनेत्रोदकैःसिषिचुः । सर्वासामेवशुद्धबुद्धित्वात्सापत्न्यभावरहिताः परमेश्वरंपुत्रमन्यमानाःस्नेहस्नुतपयोधराःक्लेशरहितत्वादितिबोध्यम् । अथयत्रस्त्रीणामष्टोत्तरशताधिकानांषोडशसहस्राणांप्रासादास्तत्स्वगृहंप्राविशत् ।

श्रीगुरू म्हणाले, याप्रमाणें परमेश्वराची लीला अगाध आहे.

॥ पद ॥

**महिषीवचनः**—पिया परदेस गयेरी । आपसमें सखि पगली भयेरी । पिया परदेस ॥ ध्रु० ॥ मृगशिर महिना शीत सहन करी जल जमुना गहरीमा । न्हाय प्रीति कात्यायनि पूजी कर हरि कव गहिरीमा । परदेस गयेरी ॥ १ ॥ पूसमासमों थंड न जानहि सूरज ध्यात रहीरी । अबलों आय पियाकी साजनी बात काउ न कहेरी । परदेस गयेरी ॥ २ ॥ लाग माघ तब गइ प्रयागजू गंगास्नान करेरी । जतरा धूंडत मिलत न प्यारा सखि अब कांह करीरी । परदेस गयेरी ॥ ३ ॥ फागन फाग खेळ सब नारी निजपति बहियां गहेरी । मै बैठी अकेली घरमों बात कोउं न कहेरी । परदेस गयेरी ॥ ४ ॥ चैत बसंत बगीचे मांही पादप फूल गयेरी । रात देख चांदनी साजनी बिरहदुख न सहेरी । परदेस गयेरी ॥ ५ ॥ लागि मास बैसाख जुवतिपति संगति मधुवा पिवैरी । मै अपने घरमांहि अकेरी बिनुपिय जल न पवेरी । परदेस गयेरी ॥ ६ ।

अव्वल विरहताप उर भारी नाहीं जात सहेरी । जेठ धूप सवतीसहायक सखि मोर असु न रहेरी । परदेस गयेरी ॥ ७ ॥ मास असाड मेघ गडगड करी जीको परम डरावे । काहे सखी संदेसा पियको कोहु लेहिं नहि आवे । परदेस गयेरी ॥ ८ ॥ सावन जविन बरखे अतितर तनकन आस धरीरी । औरनि सदन हिंडोरा पियको हम घर बिरह परीरी । परदेस गयेरी ॥ ९ ॥ भादोंमास आस सखि कहलों कौन उपाय रचूंरी । शिवगल नील साधन सहायले अब किमपी न बचूंरी । परदेस गयेरी ॥ १० ॥ लागि कुंवार शकुन की बाता आइ शकुंतहि बोले । पियसंदेशा सखिमुखि सुनि सुनि पियारी मनमों डोले ॥ परदेस गयेरी ॥ ११ ॥ पियमिल कार्तिकमास रास रचि आस पूर्ण करदीनी । अलकावतिपतिनंदिनि व्रतफल पाय ब्रह्मसुख चीनी ।परदेस गयेरी ॥ १२ ॥ आपसमें सखि० ॥ ४१ ॥

॥ ओव्या ॥

एवं अनुभवें श्रीकृष्ण पती । दुरूनि पाहतां सकल युवती । धृतव्रता महासती । महोत्सवमती ऊठल्या ॥ ४२ ॥ कारितां प्रियाचें आलिंगन । मध्यें न साहे अंतःकरण । ह्मणजे जीवब्रह्मैक्यपण । ही लिहिती खूण श्रीधर स्वामी ॥ ४३ ॥ न साहे मनोव्यवधान । तेथ कवण गणी वसन आसन । क्षुत्पिपासा जलपानाशन । ऊठल्या विसरून सर्वेही । ४४ । देशांतराहूनि निजकांत । गृहीं येतांक्षणीं समस्त । विसरूनि लोकांत एकांत । जीवें आलिंगित धांवल्या ॥ ४५ ॥ निगममर्यादा अधोवदना । पुष्टौ शार्ङ्ग्यंगालिंगना । निवृत्तमदना मदनजनना । हृदयसदना सत्कारिती ॥ ४६ ॥ क्रीडाशरीरसंस्कृती । पहाणें समाजोत्सवस्थिती । हास्य आणि परगृहगती । हें सर्व त्यजावे पति ग्रामीं नसतां ॥ ४७ ॥ ऐसें याज्ञवल्क्यवचन । तैशाचि आचरित होत्या आपण । तैशा धृतव्रताचि उठोन । लज्जित अधोवदन उभ्या ॥ ४८ ॥ सदनीं येतां परम प्रिय । ज्यांचा गंभीर अभिप्राय । ऐशिया त्या आदी स्वयें । बुद्धीनें मिळती श्रीहरीतें ॥ ४९ ॥ ब्रह्मणि न चले फलव्याप्ती । ह्मणोनी साधिती वृत्तिव्याप्ती । ऐशा कृष्णदर्शनापूर्वी श्रीधर ह्मणती । येणें भगवदाकारवृत्ति द्योतिली ॥ ५० ॥ आधींच मिळाल्या आत्मदर्शनें । ये व्यतिरेकाचे

खुणें । अन्वयें जग ब्रह्मपणें । पाहती दृष्टीनें हरीतें ॥ ५१ ॥ तंव शंका करी शिष्य आपण । अन्वयें ब्रह्मत्वें जगदर्शन । तरी हा एक पति श्रीकृष्ण । ऐसें त्यांचें मन राहिलें कैंवी ॥ ५२ ॥

॥ अभंग ॥

'पतिव्रता नेणें आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं '॥ १ तुकारामवाणी परम प्रमाण । अन्यथा ते जाण कदा नोहे ॥ २ ॥ मुक्त झालियाही निषिद्धाचरण । युक्त नोहे जाण दीनबंधो ॥ ३ ॥ ज्ञानेश्वर-सुत सशंकितबुद्धी । कारितिल शुद्धी गुरुदेव ॥ ४ ॥ ५३ ॥

॥ ओव्या ॥

ऐसी शंका करूनि श्रवण । तापलें गुरूचें अंतःकरण । परी काम-प्रभ वर दत्त ह्मणून । शांत करून घेतलें ॥ ५४ ॥ मग बाळका यावी सद्बुद्धि । ह्मणोनि ताडी जनक कृपानिधि । ताडणीं गुण बहुविधी । लालनीं दोष हें सिद्धि व्याकरणमहाभाष्यें ॥ ५५ ॥ असो श्रीगुरु ह्मणती तुझी बुद्धि । आजि जाहली दोषनिधी । किंवा पापकर्में जो जाहला विधी । तो तव बुद्धिनिर्माता ॥ ५६ ॥ पूर्वी जो कांहीं लाड केला । तो आजि भला फळा आला । कांहीं न भीसी बोलावयाला । इच्छिला तेंचि बोलिसी ॥ ५७ ॥ परि हे शंका न प्रह-रितां । ऐसाचि गुरुसंप्रदाय निघेल तत्वतां । ह्मणोनि उत्तर आतां । योग्य तेवढें देणें असे ॥ ५८ ॥ परी माझी एवढी विनवणी । पुढती ऐसी शंका येतां मनीं । तरी तूं जाय उठूनि सदनीं । कुतर्केंकरूनि अधमाधिकारी ॥ ५९ ॥ वेदें जो धर्म सांगितलाहे । तेथ जो कुतर्के दोष पाहे । तया न शुभलोक ना मुक्ति आहे । नरक लवलाहे नेमस्त ॥ ६० ॥ तथापि ऐकें प्रत्युत्तर । अनध्यस्तविवर्त शार्ङ्गधर । चित्प्रति-बिंबावच्छिन्नारोपितबिंबत्वशरीर । नोहे वरिष्ठ भर्तार अन्य त्याहुनी ॥ ६१ ॥ 'नतस्यकश्चित्पतिरास्तिलोक' इति । ऐसी श्वेताश्वतरश्रुती । 'वासुदेवःपुमानेकःस्त्रीरूपमितरज्जगदिति '। श्रुत्यनुकूलस्मृतिप्रमाणता ॥ ६२ ॥ भूषणें नथनी बुगडी बाळी । ही एका सोनियाचीं सगळीं । परी कानीं नथनीं गळां बाळी । नाकीं बुगडी कोण घाली॥ ६३ ॥तेंवी

---

१. 'लालनेबहवोदोषास्ताडनेबहवोगुणाः'

जग हें स्वभावें । परमेश्वराचि आघवें । परी वर्तन तें संभवे । यथायोग्यची । ६४ । देखे अन्न आणि विष्ठा साची । उपजे एकाचि धान्याची । परी रूढी अन्नभक्षणाची । विष्ठा कोणी न भक्षे ॥ ६५ ॥ कीं मीठ आणि नदीचें पाणी । होती एकाचि उदकांतुनी । परी शाखा भरिजेति लवणीं । नादेय सर्वपरी वावरे ॥ ६६ ॥ तेंवी ब्रह्मपणें पाहतां । तरी जग ब्रह्मची तत्वतां । परी भोगप्रसंग येतां । विहित सर्वथा सोडूं नये ॥ ६७ ॥ जरी ब्रह्मज्ञानीयाच्याठायीं । धर्माधर्म कांहींच नाहीं । तरी अनंत जन्म जो धर्म केला पाही । तो धर्मीच लवलाही वर्तवी ॥ ६८ ॥ नातरी माता वृद्ध झाली । तिची कामवृत्ती समूळ गेली । ह्मणोनि काय तरुण मुली । कुमारीच ठेवाव्या ॥ ६९ ॥ नैसा आपण सिद्ध जाहला । आणि जग अधर्मी बुडवूं लागला । तरी तया सिद्धपणाला । देव न म्हणतां नरक म्हणणें ॥ ७० ॥ आणि ब्रह्मज्ञान झालियावरी । अधर्माची हांव धरी । तरी त्याहोनि संसारी । दुसरा कोण ॥ ७० ॥ कुत्तरब्रह्मज्ञान जया ह्मणती । ते हे योग्य नोहे स्थिती । यास्तव स्त्रिया पाहूनि कृष्ण पती । पातिव्रत्यवृत्ति अनुसरल्या ॥ ७२ ॥ एवं आधींच मिळाल्या आत्मपणें । पुढतीं सगुणप्रेमीं अंतःकरणें । मग सगुणसंयोगानुभवीं नयनें । आलिंगिती प्रियकरा ॥ ७३ ॥ मग विश्वरूप बाळकाप्रती घालोनि हरीच्या पायांवरुती । आपणही तीचि रीती । स्वीकारिती आवडी ॥ ७४ ॥ तेव्हां लज्जावतीही असोन । पतिप्रेमें विवश होऊन । रोधिलेंही नयनींचें जीवन । हळुहळू निघोन अभिषेकूं पाहे देवा ॥ ७५ जरी भगवान समीप सर्वकाळ । एकांतींही सुखें घडे मेळ । तरी नित्यनूतन चरणयुगुळ । कवण भजनशीळ सोडूं इच्छी ॥ ७६ ॥ जयाचा एक पाद जग । त्या जगासही विचित्र रंग । मग पूर्ण पादद्वय सानुराग । नित्यनूतन कां न होती ॥७७॥ जेथूनि निघाली पुण्यगंगा नित्य जगाच्या पापभंगा । त्या पादकमला प्रेमपरागा । नित्यनूतन कवण न ह्मणे ॥ ७८ ॥ नित्यनूतन बद्धांची भ्रांती । नित्यनूतन मुक्तांची मुक्ति । आणि भगवच्चरणस्थिति । कां नूतन नव्हे ॥ ७९ ॥ अहो चकोरासी कहीं । चंद्राचा वीट येत नाहीं । कीं खादाडासी लवलाही । भोजनवीट कदा नव्हे ॥ ८० ॥ कीं कामुकासी कामिनी । मंचकीं

पाहिजे दिनयामिनी । मग भगवद्भक्तां चक्रपाणी । पुरातन मनीं केंवि वाटे ॥ ८१ ॥ कमळीं राहे भ्रमरू । परी न सोडी तेथील आधारू । तेंवी नित्यनूतन प्रकारू । भगवच्चरणाचा ॥ ८२ ॥ नित्यनूतन हरिपद-सुख । प्रेमळ भक्त जाणती एक । येर तुजसमान मूर्ख । करुनी कुतर्क नागवती ॥ ८३ ॥ 'स्वामी ह्मणे शिष्यासी । यावरी जरी संशय घेसी । तरी श्रीमुखांतरीं खासी । निश्चयेसी' ॥ ऐसी समर्थाची उक्ती । तुजहीं पाहिजे तेचि रीती । लत्तापुष्पें समजे ज्याची मती । तो देव वचनवृत्ति नायके ॥ ८४ ॥

॥ पद ॥

अतितर चंचल रमा । त्यागुनि परि निज मान न विसरे घडिभर पुरुषोत्तमा ॥ ध्रु० ॥ जीस्तव जनता श्रमा । पिटुनि पाय किति करिति उपाया हरवुनि जीवितजमा ॥ यति येतां आश्रमा । मागल कांहीं ह्मणुनि न करिती जीस्तव वचनश्रमा ॥ परि त्यासहि पाजी वमा । त्यागुनि परि निज० ॥ १ ॥ इतुका सुंदरपणा । हरिचरणा मग सोडूं इच्छिल कोण आणिक अंगना ॥ जो मोही मुनिमना । योग याग जप भुलुनि नाचती शार्ङ्गिमंदिरांगना ॥ ज्ञानेश्वरगुरुपद नमा । त्यागुनि परि निज० ॥ २ ॥ ८५ ॥

॥ ओव्या ॥

येणें येणें प्रकारें । लीला धरिली यादवेंद्रें । भूभारभूतनरपतिशिरें । उडविलीं गगनीं ॥ ८६ ॥ भूमिभारउतारण । हें नव्हे मुख्य प्रयोजन । ऐसें मागां निरूपण । केलेंचि आहे ॥ ८७ ॥ ह्मणोनि शस्त्र करीं न धरितां । तया आपसांतचि द्वेष सर्वथा । उत्पन्न करोनि असतां । संहारिलें ॥ ८८ ॥ जैसा वायू आपण । वेळवातें परस्पर घांसोन । जाळी अग्नि उत्पन्न करून । परी अलिप्तपण सोडिना ॥ ८९ ॥ तैसा परस्पर उपजवूनि द्वेष । केला कुंभिनीभारनाश । परी आपण अलिप्त जगदीश । रमानिवास श्रीहरी ॥ ९० ॥ ह्मणसी सतांच्याठायीं । द्वेषवृत्ति सर्वथा नाहीं । तरी उत्पन्न फणीशायी । करील कैसा? ॥ ९१ ॥ ययाचें हें समाधान । कीं वस्तुतः द्वेष दुर्जनीं उत्पन्न । संतीं युद्ध केलें धर्मकरून । साक्षी भगवान जगद्गुरू ॥ ९२ ॥ जो सूर्याकडे पाहोनि

थुंके । तेणें त्याचेंचि वदन माखे । तेंवीं दुर्जन सज्जनीं द्वेष झोके । तो माघारा सरके दुर्जनाचिवरी ॥ ९३ ॥ कां परतंत्र आपुलिया क्रोधेंकरून । आपणाचि पावे मरण । तेंवी सज्जनद्वेष करून । पावती मरण दुराचारी ॥ ९४ ॥ परी सज्जना साह्य देवो । ह्मणोनि दुर्जनद्वेषें नव्हे अभिभवो । मग आपणचि विनाशभावो । प्राप्त करिती ॥ ९५ ॥ एवमानुषंगिक प्रयोजन । आणि भक्तियोषित्कदंबीं रमण । ही मुख्य प्रयोजन ह्मूण । पूर्वनिरूपणावरून जाणिजे ॥ ९६ ॥

॥ गद्य ॥

ननु, भगवंताचें शरीर भूतकार्य आहे, असें पुष्कळ प्रमाणावरून ह्मणतां येते व त्याचे ठिकाणीं रज्जुकृतबंधनाभावशक्ति योगानें आल्या आहेत असेंही ह्मणण्याला पुष्कळ आधार आहे. कारण अनुगीतापर्वांत अशी कथा आहे कीं, एकेवेळीं अर्जुन व श्रीकृष्ण सभेंत बसले असतां अर्जुनानें श्रीकृष्णाला विचारिलें कीं तुझा विश्वरूपादि मोठेपणा मी जाणतों. परंतु त्वां केलेला उपदेश मी मनाच्या दौर्बल्यामुळें विसरून गेलों, तो फिरून मला समजून घ्यावासा वाटतो. तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले, तूं मला अश्रद्धधान व मूर्ख दिसतोस. मला पुनः त्या उपदेशाची आठवण होईलसें वाटत नाहीं. कारण, मी योगयुक्त होऊन तुला खऱ्या धर्माचें ज्ञान करून दिलें होतें. (अश्वमेधपर्व अध्या० १६ श्लोक १३ पर्यंत ) येथें श्रीकृष्णानें आपल्याच मुखानें मला ज्ञान व ऐश्वर्य योगानें आलें होतें असें कबूल केलें आहे. पुनः, मोक्षधर्मांत 'या नारायणाच्या शरीराची ईश्वराच्या आठव्या अंशापासून उत्पत्ति असून तें कल्पांतीं परिवर्तते', असें भीष्माचार्यांनीं ह्मटलें आहे; व 'परिवर्तते' ह्मणजे 'नाश पावते', असा अर्थ चतुर्धरांनीं केला आहे. ह्यावरूनही परमेश्वराचें शरीर उत्पत्तिनाशवान् असल्यामुळें भूतकार्य आहे आणि तें धर्माऽधर्मजन्यही आहे. कारण योगवार्तिकांत विज्ञानभिक्षूंनीं वामनादि शरीरांचा प्रकृत्यापूरणानें क्षणांत गगनव्यापित्व विश्वरूपादि परिणाम त्याच्या ठिकाणीं असलेल्या योगैश्वर्यास्तव बोलिला आहे. आणि तें प्रकृत्यापूरण धर्माऽधर्मादिसापेक्ष बोलिलें आहे. यद्यपि जात्यंतरपरिणाम केवळ प्रकृतीनेंच होतो, तथापि धर्म हा प्रकृतीच्या प्रतिबंधाचा निवर्तक

असून अधर्म हा प्रतिबंधक आहे, असें योगसूत्रांत व त्याच्या भाष्यांत ह्मटलें आहे.* ह्मणून अवताराचें शरीर धर्माऽधर्मजन्य सिद्ध होत नाहीं. तथापि सर्व जीवांचेंच शरीर धर्माऽधर्मजन्य नसून प्रकृतीच्या प्रवृत्तीमुळें झालें आहे, असा त्या सूत्रभाष्याचा अभिप्राय असल्यामुळें श्रीकृष्णशरीराला सर्वजीवशरीरतुल्यता प्राप्त होते. ह्मणून श्रीकृष्णशरीरही भूतकार्य आहे. आणि शरीराच्या भूतकार्यत्वास्तव श्रीकृष्ण हा जीव आहे. असेंच मधुसूदन स्वामींनीं 'अद्वैतसिद्धींत' म्हटलें आहे.

'तान्यहंवेदसर्वाणिनत्वंवेत्थपरंतप'

( भगवद्गीता. )

**अर्थः**— तुझे व माझे सर्व जन्म मी जाणतो, तूं जाणत नाहींस.

ही सर्वज्ञता मधुसूदनस्वामींनीं समष्टिजीवांविषयीं सांगितली आहे. आणि दृष्टिसृष्टिवादांत ह्यावांचून निर्वाहही लागत नाहीं. हिरण्यगर्भशरीर प्रतिकल्पभेदत्वास्तव कर्मजन्य आहे. ह्मणून भूतकार्य आहे. आणि आनंदगिरीनेंही मांडूक्यभाष्यटीकेंत असेंच म्हटलें आहे.

**श्रीगुरुः**— हे वादिन्! श्रुतिमातेनें दुग्ध पाजून तृप्त केलेल्या ह्या माझ्या बुद्धीपुढें तुझ्या ह्या शुष्कतर्कजालाचा मुळींच टिकाव लागणार नाहीं. तूं काढलेल्या आक्षेपांचीं उत्तरें क्रमानें श्रवण कर. अर्जुन पूर्ण होता असें जरी आमचें मत आहे तरी वाक्य पुढें आल्यामुळें आम्हाला वाक्यानुसार विचार करणेंच आवश्यक आहे. अनुगीतावाक्य घेऊन शंका काढतांनां तुझ्या एक गोष्ट ध्यानांत यावयाला पाहिजे होती. ती ही कीं, परमेश्वरानें माझें शरीर मायामय असून माझें जन्म कर्मही दिव्य आहे असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. ह्या भगवंताच्या

---

* पातंजलयोगसूत्र कैवल्यपाद–सूत्र ( २-३ ) 'जात्यंतरपरिणामः प्रकृत्यापूरात् । निमित्तमप्रयोजकंप्रकृतीनांवरणभेदस्तुततःक्षेत्रिकवत्' ॥

भाष्यः— यथाचक्षेत्रिक.केदारादपांपूर्णात्केदारांतरंपिप्लावयिषुःसमंनिम्नं निम्नतरंवानापःपाणिनाऽपकर्षत्यावरणंत्वासांभिनत्ति । तस्मिन्भिन्ने स्वयमेवापःकेदारांतरमाप्लावयंति । तथाधर्मःप्रकृतीनामावरणधर्मंभिनत्ति । ......धर्मोनिवृत्तिमात्रेकारणमधर्मस्यशुद्ध्यशुध्योरत्यंतविरोधात् ।

म्हणण्याचा भाष्यकारांनीं 'भगवच्छरीर भूतमय नाहीं' असा अर्थ केला आहे. आतां, तें शरीर खरोखर जर योगानें उत्पन्न झालें असतें तर भूतकार्यच असावयाला पाहिजे होते. कारण, योगियांचें शरीर देखील शुक्लकर्मजन्य आहे. यद्यपि अशुक्ल अकृष्ण योगियांचें कर्म उत्पन्न होत असल्यामुळें शुक्लकर्मजन्य तच्छरीर ह्मणतां येत नाहीं; तथापि अकृष्ण अशुक्ल कर्मानें योगियांचें शरीर उत्पन्न होत नाहीं, तर त्या कर्मानें त्याचा पुनर्जन्माभाव मात्र स्वीकारला आहे; अथवा त्या कर्मानें योगियांचें शरीर होतें, असें जरी म्हटलें तरी तें पूर्वीं नव्हतें असें म्हणावें लागेल. आणि जें पूर्वीं नव्हतें त्याची उत्पत्ति मानल्यास त्या उत्पत्तीला कारण योगियांचें कर्म मानावें लागेल. तें कर्म योगसाध्य आहे आणि योग मोक्षेच्छासाध्य आहे. मोक्षेच्छा जीवांचे ठिकाणीं संभवते, परमेश्वराचेठायीं संभवत नाहीं. म्हणून परमेश्वराचें शरीर भूत-कार्य असूं शकत नाहीं. आतां, भगवद्गीतेंतील ह्मणणें जर अनुगीतेंतील म्हणण्यानें अभिभूत करावयाचें असलें, तर पहिलें परमेश्वराचें शरीर मायाकार्य असून पुनः तें भूतकार्य झालें असें म्हणावें लागेल. आणि तसें ह्मणणें म्हणजे ईश्वरच पुढें जीव झाला असें ह्मणण्यासारखें होईल. आणि तसेंही मानशील तर जीव ईश्वराचा परिणाम होईल. परिणाम अनित्य असतो, ह्मणून जीव अनित्य होईल. जीव अनित्य मानला असतांना उत्पत्तिविनाश मानावा लागेल. तो तर 'उत्पत्त्यसंभवात्' या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें श्रुतिविरुद्ध आहे. आतां, ब्रह्माचा परिणाम यद्यपि विरुद्ध आहे, तथापि मायिक ईश्वराचा परिणाम मायिक जीव ह्मणण्यास कोणता प्रत्यवाय आहे? असें ह्मणूं नको. कारण मायिक ईश्वराचा परिणाम जीव आहे, ह्मणजे मायांशाचा आहे कीं चैतन्यांशाचा आहे ? प्रथमपक्षीं, दगड, प्रेत, व जीव सर्व एकाच कोटींत जातात. मग देहापासून जीवात्म्याचा व्यतिरेक करून मोक्ष कसा संभवतो? आणि संभवत असेल तर मग प्रेताला किंवा दगडा-लाही महावाक्योपदेश कां करितां येऊं नये ? द्वितीयपक्षीं, येणाऱ्या दोषांची अनंत कल्प जरी गणना केली तरी थोडीच होते. कारण चैतन्याचा परिणाम चैतन्याचेंच अनित्यत्व दाखविणारा आहे. अतः,

अनुगीतेंतील वचनानें भगवद्गीतेंतील वचनाचा अभिभव होऊं शकत नाहीं. उलटा, भगवद्गीतेंतील वचनानेंच अनुगीतेंतील वचनाचा अभिभव होऊं शकतो. कारण, तुझें ह्मणणेंच जर क्षणभर खरें धरलें तर भगवद्गीतेंतील श्रीकृष्णाचें म्हणणें योगसिद्धकालींचें असून, अनुगीतेंतील म्हणणें व्यवहारकालीचें सिद्ध होतें. आणि योगसिद्धकालींचें भाषणाची यथार्थता अधिक असते. म्हणून भगवद्गीतेंतील वचन मुख्य, व अनुगीतेंतील वचन गौण ह्मणावें लागतें. आणि मुख्यवचनानुसारच गौण वचनाचा समन्वय होतो. आमच्या मताप्रमाणें विचारशील तर, अनुगीतेंत जें अर्जुनानें विचारलें तें भगवद्गीतेंतील विचारण्याप्रमाणें वैराग्यसंतप्त होऊन विचारलें नाहीं. दुसरें, 'श्रीकृष्णा! तूं आतां लौकरच द्वारकेंत जाणार' असेंही अनुगीतेंत अर्जुनानें म्हटलें आहे. यावरून अर्जुन श्रीकृष्णाचें ठिकाणीं गमनागमनस्वीकार करीत होता; ह्मणजे श्रीकृष्णाचें ईश्वरत्वच तो विसरला होता, असें ह्मटलें तरी चालेल. कारण "ईश्वरःसर्वभूतानांहृद्देशेऽर्जुनतिष्ठति" हें गीतेंतील वाक्य जर त्याला स्मरलें असतें तर परमेश्वराचें द्वारकागमन भासलें नसतें. आतां, ही गोष्ट अर्जुन जरी विसरला नसला तरी पण भारतकारांनीं अर्जुनाची विस्मृति ज्याअर्थी गृहीत केली आहे, त्याअर्थी ती अर्जुना करितां असो किंवा नसो. किंतु ज्ञान सांगणाऱ्या सद्गुरूचें ठिकाणींही मूर्ख शिष्यांनां अतिपरिचयास्तव जीवबुद्धी होत असते. आणि तसें झालें म्हणजे मग तितक्याच प्रेमानें त्याला ज्ञान सांगणें घातक होतें. एवढ्याकरितां पुनः त्याला भ्रमात्मक उपदेश करावा लागतो. बृहदारण्यकांतील याज्ञवल्क्यजनकसंवादांत व वासिष्ठांतील वसिष्ठरामसंवादांत अशीच कांहीं स्थळें आहेत. त्याप्रमाणेंच श्रीकृष्णाचें अनुगीतेंतील वचन समजावें. दुसरें मूळ अनुगीतावचनांत भगवंतानें आपल्याला योगयुक्त म्हटलें आहे. आणि परमात्मा सर्वदा युक्तयोगी आहे, युंजानयोगी नाहीं. ज्याला ध्यान करून एखादी गोष्ट कळते त्याला युंजानयोगी म्हणतात. व अखंडैकरससर्वज्ञता असणें, हें युक्तयोगीपणाचें लक्षण आहे. पुनः, 'तस्मात्सर्वेपुकालेपुयोगयुक्तोभवाऽर्जुन' ही भगवंताची आज्ञा अर्थातच अर्जुनानें मोडली होती. कारण योगयुक्त जर

सर्वकालच अर्जुन राहिला असता तर उपदेश विसरला नसता. आज्ञा मोडणाऱ्या शिष्याला सद्गुरूनें अधिक प्रेमानें वागविणें म्हणजे अधिक आज्ञा मोडण्यालाच शिकविण्यासारखें आहे. पुन, जो वेदाज्ञा पाळीत नाहीं, त्याचेपुढें परमेश्वर आपलें स्वरूप प्रकट करीत नाहीं. तसें होणें त्याच्या आज्ञाभंगरूप कर्माचेंच फल होय. आणि अर्जुनानें जी परमेश्वराची आज्ञा मोडली, त्यांत अर्थातच त्याचें माहात्म्यज्ञान शिथिल झालें असावें, त्यामुळें आपलें ठिकाणीं अर्जुनाला न समजून येणारी अशी त्याची जीवत्वबुद्धी पाहून अनुगीतेंतील वाक्य श्रीहरीनें उच्चारिलें आहे. व पुढें जो अनुगीतोपदेश केला तो त्याच्या सख्यभक्तीचें फल होय. आतां, तातांनीं अर्जुनाची प्रशंसा केली असल्यामुळें अर्जुनाला विस्मृति संभवनीय नाहीं, असें म्हणशील तर मग अर्जुनाकरितां हें वाक्यही नाहीं. विसरलेल्या शिष्याकरतांच सद्गुरूचें हें वाक्य आहे. आणि वस्तुत: तर भगवद्गीतेंतील वाक्य परमार्थप्रसंगोचित असून हें अनुगीतेंतील वाक्य व्यवहारप्रसंगोचित आहे. म्हणून भगवद्गीतेंतील वाक्यानुसार या अनुगीतेंतील वाक्याचा असा समन्वय करावा. 'तेव्हा मी योगानें सांगितलें' म्हणजे तुझ्या योगामुळें तुला दिव्य चक्षु देऊन तुझ्या वैराग्यादिकामुळें तुझ्या हृदयाचा आश्रय करून तुझ्या योगवृत्तीसी युक्त होत्साता मी ती गीता सांगितली होती. म्हणूनच युद्धांतील इतर पुरुषांनां ती कळली नाहीं. आतां तूं तसा योगयुक्त होऊन विचारीत नाहींस, एवढ्याकरितां मलाही तसी आठवण होईलसें वाटत नाहीं. हें पहिल्या आक्षेपाचें उत्तर झालें. आतां दुसऱ्या आक्षेपाचें उत्तर श्रवण कर. केशवशरीर नाश पावतें, एवढाच भारतांतील त्वां श्लोक घेतलास, परंतु ' पालितागोपसुंदर्यःसकृष्णःक्वापिनोगतः ' या पद्मपुराणांतील वाक्याचा त्वां विचार केला नाहींस. एक वाक्य सोडून देऊन एक वाक्य घेणें पांडित्याचें लक्षण नव्हे. इतिहासपुराणांचा सारखेपणा असल्यामुळें दोन्ही वाक्यांचा समन्वय श्रवण कर. चतुर्धराचार्यांनीं गीतेच्या टीकेंत ह्मटल्याप्रमाणें भगवंताचें शरीर मायामय असून नित्य आहे. ह्मणून त्याचा प्रलयकालीं नाश संभवत नाहीं. कारण प्रलयकालीं भगवंताच्या मायेचा

प्रलय होत नाहीं. जीवाच्या कर्मलयास्तव भूतलय मात्र होतो. भगवन्मायेचा प्रलयकाळीं लय मानसील तर आह्मी असें विचारतों कीं, तो लय काय दुसऱ्या एका मायेंत होतो? कीं परमेश्वरांत होतो? प्रथमपक्षीं अनवस्था आहे. द्वितीयपक्षीं दोन दोष येतात. प्रलयकाळीं मायेचा लय परमेश्वरांत झाला ह्मणजे सर्व जीवांना मुक्ति मानण्याचा प्रसंग येतो. आणि मग पुन: जगदुत्पत्ति होणार नाहीं. आणि ही मुक्ति ज्ञानावांचूनच होईल. ज्ञानावांचून मुक्ति मानल्यास श्रुत्युपदेशाची आवश्यकता राहणार नाहीं. श्रुत्युपदेशाची आवश्यकता न राहिली ह्मणजे धर्माधर्माची आवश्यकता राहणार नाहीं. तसें झालें ह्मणजे कर्मफल देणाऱ्या परमेश्वराचीही आवश्यकता राहणार नाहीं. आणि परमेश्वराची आवश्यकता न राहिली ह्मणजे विषयसुख व देहात्मवाद बळकावून मुक्तीचीही आवश्यकता राहणार नाहीं. आणि असें मानलें असतां दु:खाची निवृत्ति जी अक्षय जीवाला पाहिजे, या वासनेची वाट न लागून जगत्‌ही विनाकारणच मानण्याचा प्रसंग येईल. आणि विनाकारण जगत् मानलें ह्मणजे अभावापासून भावोत्पत्ति मानण्यासारखें आहे. आणि अभावापासून भावोत्पत्ति मानशील तर मोक्षादिकांच्या अभावामुळेंच तुला मोक्षभाव आहे असें ह्मणण्याला कोणता प्रत्यवाय आहे ? असें चमत्कारिक अनर्थपरंपराचक्र मस्तकावर घेणें युक्त नाहीं. दुसरें, प्रलयकाळीं मायेचा परमेश्वरांत लय मानून पुनर्जगदुत्थान मानलें तर मुक्तांनांही पुनर्जन्मापत्ति होईल. आणि तसें मानलें म्हणजे मग मुक्तीची अपेक्षा न राहिल्यामुळें वर सांगितलेले सर्व दोष येतात. ह्मणून परमेश्वराच्या मायेचा प्रलयकाळीं विलय नाहीं. अविलयत्वास्तव मायारूप भगवच्छरीराचाही विलय नाहीं. अत:, भगवच्छरीर नित्य आहे; परंतु त्यामध्यें हा भेद आहे. नटाचें एक शरीर जें नित्य असतें तें त्याच्या स्त्रीपुत्रांनां सर्वदा प्रतीत असते. आणि इतर नाटक पाहणारांनां त्याच्या नटशरीराचीच अपेक्षा असल्यामुळें नाटक पाहणाऱ्याजवळ मूळ शरीरानें तो नट सर्वदा राहत नाहीं. त्याप्रमाणें भगवंताचें हें शुद्ध मायाशरीर दोन लोकांनां पाहिजे असते. भगवद्भक्त हे परमेश्वराचे नित्यसंबंधी असल्यामुळें त्यांनां तें शरीर

सर्वदाच प्रतीत असतें. आणि सृष्टिकार्यार्थ देवांच्या प्रार्थनारूप पुण्यानें आविर्भूत भगवच्छरीर देवकार्यप्रतिबंध निवृत्त झाल्यावर सृष्टयैतीह्-दृष्टीनें तिरोभूत होतें. ह्मणूनच कर्मी पुरुषाला भगवच्छरीराचा नाश झाला अशी बुद्धी होते. ह्या बुद्धीचा आश्रय करूनच तूं दिलेल्या मोक्ष-धर्मवचनाची व भागवत भारतांतील श्रीकृष्णनिजधामगमनाची व्यवस्था घटते. आणि वास्तविक भगवद्भक्तदृष्टीनें पद्मपुराणवचनाची व्यवस्था घटते. पुनः, तूं दिलेलें मोक्षधर्मवचन कल्पांतीं नाश होणाऱ्या केशवा-विषयींचें असेल. श्रीकृष्णाविषयीं तें होऊं शकत नाहीं; कारण तुझ्या सारख्यांनां कल्प न होतांनां श्रीकृष्ण आतांच गोचर नाहीं. मग तूं त्याला आतांच कल्पांत झाला म्हणतोस? तुझें कसेंही मत असो. परंतु परमात्मा श्रीकृष्ण भक्तांनां अझूनही प्रतीत होतो खरा. नामदेवानें ह्मटलें आहे कीं,

॥ अभंग ॥

भाविकांसी दृष्य अभाविकां बौद्ध । मोठा हा सावध नारायण ॥१॥
लक्ष असे ज्याचें देवाजीचे पायीं । येउनियां राही हृदयांत ॥ २ ॥
त्याचा सर्व धंदा करी चक्रपाणी । बोलिले पुराणीं व्यासादिक ॥ ३ ॥
संशय चित्तांत नका धरूं आतां । सर्व हा जाणता पांडुरंग ॥ ४ ॥
नाम्यासंगें जेवी आवडी हा जाणा । तैसें तया ह्मणा बौद्ध आतां ॥ ५ ।

( नामदेवगाथा. )

॥ श्लोक ॥

" नकार्यत्वादनित्योऽयंनंदनंदनविग्रहः ।
उपचाराद्धिकार्यत्वंतत्रपौराणिकाजगुः " ॥ १ ॥ इति स्मृतिरपि.

स्मृत्यर्थः— ' उपचारात् ' म्हणजे वास्तविक नसणें. अन्यत् स्पष्ट आहे. याला चतुर्धराचार्यांनीं फळाच्या दृष्टांतानें अनंतबीजगर्भवत् अनंतेश्वराचाच जणूं काय समुदाय परब्रह्मरूप ही श्रीकृष्ण लघुमूर्ति आहे असें ह्मटलें आहे. आणि तातांचीही याला संमती आहे.

॥ ओव्या ॥

' हो कां जे कृष्णाकृतीचिये मोडी । होती विश्वरूप पटाची घडी । ते अर्जुनाचिये आवडी । उकलूनि दाविली ॥ तंव परमाणु वा रंग । तेणें देखिलें

साविया चांग । तेथ ग्राहकिये नव्हेचि लाग । म्हणोनि घडी केली पुढती ॥ तैसें वाढीचेंनि बहुवसपणें । रूपें विश्व जिंतिलें जेणें । तें सौम्य कोडिसवाणें । साकार जाहलें'' ॥ (ज्ञानेश्वरी अध्या० ११ वा. ओव्या ६५१ ते ६५३ ).

आणि ही भगवन्मूर्ति नित्य आहे असें तात ह्मणतात.

॥ ओवी ॥

आम्हां भोगमोक्षाचियाठायीं । श्रीमूर्तीवांचोनि नाहीं ।
म्हणोनि तैसाचि साकार होई । हें उपसंहरी आतां' ॥

(ज्ञाने० अध्या० ११ ओवी ६०८. )

॥ गद्य ॥

आतां, तिसऱ्या आक्षेपाचें उत्तर ऐक. मला वाटतें, योगवार्तिक त्वां संस्कृतांत वाचलेंच नसावें. कारण तें पूर्ण वाचलें असतें तर त्वां असें म्हटलें नसतें. आतां योगवार्तिकांतलें उदाहरण तर त्वां दिलें आहे. यावरून असें वाटतें कीं तुला संस्कृत येत नसून पंडितांनीं लिहिलेल्या हिंदी टीकेवरून तुझें हें अनुमान दिसतें. परंतु पंडित हे स्वतः उदासी आहेत असें त्यांनीं योगदर्शनांतच नानक गुरूनां केलेल्या नमस्कारावरून प्रतीत झाल्यासारखें वाटतें. उदासीमतांत अवताराविषयीं फारशी पूज्य बुद्धी नाहीं. ह्मणून त्यांनीं विज्ञानभिक्षूच्या ह्मणण्याचा बलानें विपर्यास केला हें चांगलें ध्यानांत असूं दे. आतां विज्ञानभिक्षूंनीं असें म्हटलें नाहीं असें मी म्हणत नाहीं. परंतु तेथेंच त्यांनीं असा अभिप्राय दाखविला आहे कीं, जीवशरीरांत परिणाम धर्मादि सापेक्ष प्रकृत्यापूरणास्तव होत असून, ईश्वरशरीर परिणामी प्रकृत्यापूरण ईश्वरसंकल्पानेंच होतें. धर्माऽधर्माची अपेक्षा लागत नाहीं. पुनः, वर दिलेल्या भाष्यवचनापुढें विज्ञानभिक्षूंची प्रख्याति होऊं शकत नाहीं. शद्बप्रमाणावरच चालशील तर विज्ञानभिक्षु भाष्यकाराइतका आम्हाला प्रमाण नाहीं. आणि युक्तीनें विज्ञानभिक्षूच्या वचनाचा आतांच तुला समन्वय सांगितला. परमेश्वर-संकल्पानें प्रकृत्यापूरण होतें या म्हणण्यापेक्षांही भगवत्संकल्पमयच भगवच्छरीर आहे यांत परमेश्वराचें स्वातंत्र्य अधिक दिसतें. म्हणून भाष्यकारादिकांचेंच ह्मणणें अधिक बरोबर आहे.

मुला! आतां चवथ्या आक्षेपाचें उत्तर श्रवण कर. या आक्षेपांत त्वां मधुसूदनस्वामींनां कशाला पुढें आणलें आहेस कोण जाणे? हे स्वामी वेदांती असल्यामुळें त्यांची परीक्षा घेणें आह्माला बरेंच जड जातें. कारण ह्यांची विद्याही आमच्यापेक्षां अक्रम आहे. ह्यांच्या विद्येची प्रशंसा अशी आहे कीं,

॥ श्लोक ॥

'पारंवेत्तिसरस्वत्यामधुसूदनभारती ।
मधुसूदनभारत्याःसारंवेत्तिसरस्वती '॥ १ ॥

॥ गद्य ॥

इतकी यांची विद्या असल्यामुळेंच ह्या विद्यासागरांत पद्धतवार तरंगच मुळीं उठत नाहींत. कारण पद्धतवार चालणें फार तर नदी-ओढयांचें; समुद्रांत काय? कसाही तरंग उठूं शकतो. ह्मणूनच यांनीं अद्वैतसिद्धींत सर्वज्ञत्व समष्टिजीवाला सांगितलें आहे. आणि यांनींच आपल्या केलेल्या गूढार्थदीपिकेंत समष्टिहिरण्यगर्भाला आकाशाद्युत्पत्तिरूप कारणसृष्टीचें ज्ञान असूं शकत नाहीं, असें कंठरवानें सांगितलें आहे. 'तान्यहंवेदसर्वाणिनत्वंवेत्थपरंतप' या श्लोकाचा अर्थ अद्वैतसिद्धींत समष्टिजीवपर लाविलेला असून, गूढार्थदीपिकेंत ईश्वरपर लावून समष्टिजीवभिन्न श्रीकृष्णाला परमेश्वर ठरविलें आहे. पुनः, गूढार्थदीपिकेंतच परमेश्वराचें मायामय शरीर ह्मणून, दुसरा पक्ष मायमय शरीर नाहीं, असें प्रतिपादन करितांनांही मायामयच ह्मटलें आहे. वास्तवीक साकारत्व ह्मणणारांचें खंडन केलें आहे. बरें, तेवढें चांगलें ह्मटलें तरी भक्तिरसायनांत भगवंताचें शरीर ह्यांनीं परमानंद-रसरूप आहे, असें म्हटलें आहे. आतां दृष्टिसृष्टिवादांत परमेश्वराची व्यवस्थाच लागत नसल्यामुळें, अद्वैतसिद्धींत श्रीकृष्णाला समष्टि-जीव म्हटलें ह्मणावें, तर ह्याच महापुरुषानें सिद्धांतबिंदूंत दृष्टिसृष्टि-वाद प्रतिपादन करितांनां परमेश्वर वेगळा काढून सांगितला आहे. आणि तो परमेश्वर आमच्या प्रतिबिंबापेक्षीबिंबत्वारोपावच्छिन्न-बिंबरूपाप्रमाणेंच आहे. ह्या स्वामींची भक्तीवर आवडी फार. ह्यांनीं गूढार्थदीपिकेच्या उपोद्घातांत ज्ञानियांनां सहज परमेश्वराची भक्ति

राहते असें ह्मटलें आहे. परंतु एखाद्या वेळीं समाधितरंगांत येऊन हे भक्तीचें खंडन करीत नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ, अद्वैतसिद्धीच्या शेवटील प्रकरणांत हे ह्मणतात, ईश्वरप्रसादाची व भक्तीची अवधि ज्ञान, तें एकवेळ प्राप्त झालें ह्मणजे भक्तिरहित भोगानेंच प्रारब्धाची निवृत्ति होते. कारण 'तस्यतावदेवाचिरम्' ही श्रुति आहे. आणि श्रुतीमुळेंच स्मृतिपुराणांत भक्ति सांगितली असली तरीही तिचा बाध होतो. खरें आहे. भक्तीवांचून भोगानें प्रारब्धाची निवृत्ति ज्ञानानंतर होत नाहीं असें म्हणतो कोण? परंतु दृष्टपरमानंदप्राप्ति मात्र कालत्रयीं होत नाहीं. आतां, ती नकोच असेल तर गोष्ट निराळी. बरें, श्रुतिप्रमाण देऊन स्वामींनीं भक्ति सांगणाऱ्या स्मृतिपुराणांचा बाध केला असेल, परंतु 'यंसर्वेदेवानमंतिमुमुक्षवोब्रह्मवादिनश्च' या श्रुतीची वाट काय? का श्रुतीनें श्रुतीचाही बाध करावयाचा? आणि 'मुक्ताअपिलीलयाविग्रहंकृत्वाभजंते' या भाष्यकारवचनामृतापुढें आपलें थिल्लरोदकवचनतुषार सांभाळून फेंकावयाला स्वामी विसरले. तरी पण ही भक्तिखंडन करण्याची लहर स्वामींनां नेहमीच नव्हती. ही त्यांची मुक्तिप्रतिपादनधुंदी एकवेळ उतरली, आणि गूढार्थदीपिकेसारखे ग्रंथ रचण्याला स्वामींनीं सुरुवात केली कीं,

॥ श्लोक ॥

'ध्यानाभ्यासवशीकृतेनमनसातान्निर्गुणंनिष्क्रियम् ।
ज्योतिःकिंचनयोगिनोयदिपरंपश्यंतिपश्यंतुते ॥
अस्माकंतुतदेवलोचनचमत्कारायभूयाच्चिरम् ।
कालिंदीपुलिनेषुयत्किमपितन्नीलंमहोधावति ॥ १ ॥'

( गूढार्थदीपिका. )

**श्लोकार्थः**—ध्यानाचा अभ्यास करून वळविलेल्या मनानें निष्क्रिय, निर्गुण, प्रकाशस्वरूप ब्रह्म योगी पहात असतील तर ते खुशाल पाहोत; परंतु तेंच ब्रह्म यमुनेच्या तीरावर नीलतेजोमय, इकडून तिकडे धांवणारें आमच्या डोळ्यांनां आनंद देण्याकरितां नित्य आम्हाला पाहिजे आहे. स्वामीला घटकाभरही असें ब्रह्म नको. तर 'चिरं' म्हणजे नित्य पाहिजे आहे. यावरून म्हणावें लागते कीं, मुक्तीच्छा स्वामीला एखादे

वेळींच असते. श्रुति स्मृति घेऊन व स्वामींच्याच कांहीं वचनावरून दृष्टिसृष्टिवादांत देखील परमेश्वरशरीर व परमेश्वरभक्तीची जर व्यवस्था लागते, तर अद्वैतसिद्धींतील एखादें वाक्य वाढलेल्या चटणीप्रमाणें न रुचलें तर त्यांत कांहीं स्वामीला राग येणार नाहीं. आतां, अवतारा-विषयीं श्रुतिप्रमाण नाहीं, असें मात्र म्हणूं नको. कारण,

॥ श्लोक ॥

' चिन्मयस्याद्वितीयस्यनिष्कलस्याशरीरिणः ॥
उपासकानांकार्यार्थंब्रह्मणोरूपकल्पना ॥ १ ॥ '

अशी रामतापनीयोपनिषत् श्रुति असून ' त्वंजातोभवसिविश्वतोमुखः ' अशी श्वेताश्वतर श्रुति आहे. पुनः, ' सहस्रशीर्षा पुरुषः ' ' योऽसावादि-त्येपुरुषः ' ' यएषोंतरादित्येहिरण्मयःपुरुषोदृश्यतेहिरण्यश्मश्रुर्हिरण्यकेशः । अरश्चण्यश्चार्णवौतृतीयस्यामितोदिवीत्यादिप्रभुमितंवेश्म ' ।

( छांदोग्योपनिषत् )

इत्यादि श्रुती कांहीं मंत्रद्रष्टयांनीं गिळंकृत केल्या नाहींत. नृसिंहता-पनीयादिकांमध्येंही अशा प्रकारच्या पुष्कळ श्रुती आहेत. केनश्रुति तर ह्याविषयीं स्पष्टच आहे. 'तद्धैषांविजज्ञौतेभ्योह प्रादुर्बभूवतन्नव्यजानत-किमिदंयक्षमिति ॥' ( केनोपनिषत् १५–२ )

**शांकरभाष्यः**– 'तद्धकिलैषांमिथ्येक्षणंविजज्ञौविज्ञातवद्ब्रह्म । सर्वेक्षि-तृहितत्सर्वभूतकरणप्रयोक्तृत्वाद्देवानांचमिथ्याज्ञानमुपलभ्यमैवासुरवद्देवा-मिथ्याभिमानात्पराभवेयुरितितदनुकम्पयादेवान्मिथ्याभिमानापनोदनेना-नुगृण्हीयामितितेभ्योदेवेभ्योहकिलार्थायप्रादुर्बभूवस्वयोगमाहात्म्यनिर्मिते-नात्यद्भुतेनविस्मापनीयेनरूपेणदेवानामिंद्रियगोचरेप्रादुर्बभूव ' ॥

उपर्युक्त श्रुतींत आणि त्या श्रुतीच्या भाष्यांत देवावर कृपा करणारें व असुरांचा पराभव करणारें हें साकार ब्रह्म सांगितलें आहे. म्हणून तें अवताररूपच आहे. आतां, शारीरकभाष्यांत पांचरात्रोक्त चतुर्व्यूहो-पासना आम्हाला अनुकूल आहे, हें सांगण्याकरितां, ' सएकधाभवति त्रिधाभवति ' इत्यादि छांदोग्यश्रुतीचा अर्थ आचार्यांनीं ईश्वरपर लावि-लेला असून छांदोग्यभाष्यांत याच श्रुतीचा अर्थ उपासकपर लाविला

आहे. ह्मणून मधुसूदनाच्या ह्मणण्याप्रमाणें समष्टिजीवच ईश्वर होऊं शकतो, अशी शंका करूं नको. कारण समष्टिजीवाचें शरीर कर्मजन्य असल्यामुळें व प्रतिकल्पांत त्याचा निराळेपणा असल्यामुळें, सर्व कल्पांत सृष्टि करण्याला नित्य सन्निहित समष्टिजीव राहूं शकत नसून ईश्वरच राहूं शकतो. सर्व श्रुतींत ईश्वराचीच उपासना सांगितली आहे, असें आचार्यांनीं शारीरक सूत्राच्या चवथ्या अध्यायाच्या भाष्यांत ह्मटलें आहे. हें भाष्य न्यायानुगृहीत आहे; आणि बृहदारण्यकभाष्य विद्यास्तुतिपर आहे. स्तुतिपरापेक्षां न्यायानुगृहीत भाष्य अर्थातच अधिक प्रमाण आहे, हें सांगावयाला नको. तथापि दोन्हीहि भाष्यांचा समन्वय असा. शारीरकभाष्यांतलें ह्मणणें सर्वशक्तित्वाभिप्रायक असून बृहदारण्यकभाष्यांतलें ह्मणणें, ' त्याच्याच उपासनेमुळें उपासकांनां शक्ति येते,' अशा अभिप्रायाचें आहे. उपास्यामध्यें नसलेले गुण उपासकांनां येणार कोठले? तात्पर्य, ईश्वर समष्टिजीवही नव्हे; व अवताराचें शरीर भूतकार्यही नाहीं. तर ईश्वर ह्मणजे बिंबभूत व अवताराचें शरीर मायामय हें सिद्ध झालें. आतां अवशिष्ट आक्षेपाचें उत्तर ऐक.

**शंकाः–** ननु, जीं प्रयोजनें आपण सांगितलीं तीं सिद्ध करण्याकरितां शरीरावश्यकता आहे. आणि शरीर तर पुण्यपापेंकरून उत्पन्न असून भूतकारी असतें. तसें शरीर भगवंताला मानलें असतां जीवत्वप्राप्ति होते. म्हणून गोपीसंयोगादि निषिद्ध कर्माचा भोग भगवंतालाही झाला पाहिजे. अथवा ब्रह्मज्ञानी जीव असल्यामुळें भोग होणार नाहीं, तथापि नैष्कर्मसिद्धींत सुरेश्वराचार्यांनीं ज्ञानानंतर यथेष्टाचरणाचा श्वानाप्रमाणें निषेध केला आहे. तो निषेध मानला नसतां यद्यपि ज्ञानीयाला प्रत्यवाय नाहीं, तथापि बद्धापुढें गुणगान करण्याला तो योग्य नाहीं.

**समाधानः–** ही शंका असमीचीन आहे. कारण, परमेश्वराचें शरीर भूतकार्य नाहीं; मायामय आहे. कारण भगवद्गीतेंत भगवंतांनीं व भाष्यकारांनीं भगवच्छरीर मायामय सांगितलें आहे. दुसरें, रज्जुकृतबंधनाभावादिक भूतकार्य शरीराचें ठिकाणीं संभवत नाहींत. योगियाचें ठिकाणीं यद्यपि संभवतात तथापि अतिसिद्धिभोगानें व निषिद्ध कर्मानें योगियांचें सामर्थ्य क्षीण होतें. आतां, देववत् मर्त्यलोकीं

प्रारब्धजन्य सिद्धिभोग होतो, असें म्हणशील तर क्षीणपुण्यावांचून देवांचा मर्त्यलोकीं जन्म घटत नाहीं. आणि क्षीणपुण्यानें निषिद्धाचरण केलें असतां अधिक अधिक पुण्य क्षीण होऊन नरकप्राप्ति होते. आतां, श्रीकृष्णाला पुढें मुक्ति होईल म्हणून यद्यपि तो अभव्य नाहीं, तथापि निषिद्धकर्माचरणाचें फल सद्यः भोगीत आहे, असें दिगंबर म्हणतात. यावर त्यांनां आह्मी विचारितों कीं, हें तुमचें म्हणणें प्रमाण कसें मानावयाचें? तुह्मी म्हटलें म्हणून किंवा त्याला कोणी युक्ति आहे? किंवा कोणाचा अनुभव आहे? पहिल्यापक्षीं तुमचा जसा आग्रह आहे तसा दुसऱ्याचा कां नसावा? ह्मणून तुमचें म्हणणें प्रमाण तो मानणार कसें? द्वितीये, कर्माचें फळ मिळालेंच पाहिजे ही युक्ति दाखवाल तर घटत नाहीं. कारण, ज्ञानीयांचें ठिकाणचें कर्तृत्व गेलें असल्यामुळें तेथें विधिनिषेधाभाव आहे. तुमच्याच मताप्रमाणें पाहिलें तर विधिनिषेध सर्व व्यवहारनयानें सिद्ध असून शुद्धनयानें एक वस्तूच सिद्ध आहे. इथें तुमच्या अनेकांत प्रतिज्ञेची हानी होते. परंतु अनेकांतवाद सविस्तर खंडन करण्याचें हें स्थल नव्हे. पुनः, समयसारांत किंवा त्याच्या आत्मख्याति नांवाच्या टिकेंत ज्ञानीयाला चारित्राची आवश्यकता नाहीं असें म्हटलें आहे; आणि श्रीकृष्णाला तर तुह्मी भव्य व ज्ञानीही मानलें आहे. म्हणून त्याला निषिद्ध कर्माचा भोग होतो ह्मणणें तुमच्याच मताप्रमाणें बरोबर नाहीं. आणि भोग झाला असता तर कलियुगांतील सर्व संतांनां जी स्वतंत्रपणें श्रीकृष्णाची प्रतीति झाली ती झाली नसती. आतां, इतिहासाविषयीं संशय असेल तर भक्ति करून पाहिल्याविना दुसरा उपाय नाहीं. भक्तियुक्त लक्षणानें भक्ति करून पहावें व मग प्रत्यय येणार नाहीं तर आम्हाला कळवावें. आमच्या मतांत तर श्रीकृष्ण परमेश्वरावतार असल्यामुळें भोग होणें शक्य नाहीं. ह्मणून परमेश्वराचें शरीर देवजन्मवत् क्षीणपुण्यजनित नाहीं. गीतेंतील 'इमंविवस्वतेयोगं' इत्यादि श्लोकावरून पाहतां कोणत्याच मागील जन्मांत श्रीकृष्णाचा साधकपणा दिसत नाहीं, किंतु गुरुत्वच दिसतें. म्हणून अमूक एका जन्मांत श्रीकृष्णानें योग केला असेल असेंही संभवत नाहीं. अतः, रज्जुकृतबंधनाभावादिकांची सिद्धि

त्यांचें ठिकाणीं योगानें आलेली नव्हे. सारांश, परमेश्वराचें शरीर भूतकार्य नाहीं. आतां, श्वासोच्छ्वासादिकेंकरून वाय्वादिभूतकार्य म्हणशील तर ह्मणूं नको. कारण ते श्वासोच्छ्वासादिक भानमात्र आहेत. भूतनियति त्यांनां लागू नाहीं. आणि भानमात्रही परंतु स्वप्नाप्रमाणें नाहीं. कारण स्वप्न निद्राजन्य असून जागृतींत पाहिलें असतां तें दिसत नाहीं; आणि अर्जुनादिकांची परमेश्वरासह क्रीडा तर ज्ञान झाल्यावरही बंद पडली नाहीं. यास्तव परमेश्वराचें शरीर स्वप्नवत् भानमात्र नाहीं, किंतु अघटितघटनापटु मायेनें भासविलेलें असें आहे. आनंदगिरीनें जें भगवच्छरीर भूतकार्य आहे असें म्हटलें, तें भगवत्पूज्यपादवचनांनीं बाध्य असल्यामुळें व स्थूलदृष्टीला दिसणाराप्रमाणें मूढलोकानुवादात्मक असल्यामुळें व ‘ अवजानंतिमांमूढामानुषींतनुमाश्रितम् ’ ‘संभवाम्यात्ममायया ’ इत्यादि भगवद्वचनाला विरोध येत असल्यामुळें व स्वतःच आनंदगिरी महाराजांनीं तलवकारभाष्याच्या टीकेंत साकार ब्रह्मशरीर मायामय आहे, असें म्हणून उन्मत्तप्रलापवत् आपल्याच वचनानें आपलें खंडन केलें असल्यामुळें समीचीन नाहीं. एवं भूतकार्य नसल्यामुळेंच धर्माऽधर्मजन्यही परमेश्वराचें शरीर नाहीं. आणि जे योगवासिष्ठांत विष्णुशिवाचे रमाविलास स्मशाननिवासादि भोग प्रारब्धजन्य सांगितले आहेत, तसेंच राम आपल्या एकपत्नीव्रतानें कृष्णावतारीं मी ब्रह्मचारी होईन अशी प्रतिज्ञा करता झाला, असें भावार्थरामायणांत शेवटीं म्हटलें आहे, हीं दोन्ही ग्रंथांतील वचनें जीवाची धर्माकडे प्रवृत्ति व्हावी म्हणून आहेत, अन्यथा, योगवासिष्ठांतील कोणी जीव नित्य विद्यामय व नित्यच मुक्त आहे, या ईश्वराभिप्रायबोधक वचनासी व ‘ तरी ऐकेंगा रघुनाथा । तुम्हां अवतारांची सत्ता । नये जीवाचीया हाता । जरी यथार्थता मुक्त जाहला ।। ’ या भावार्थरामायणांतील वचनाशींच विरोध येतो.

**शंकाः—** ननु, भागवतटीकेंत श्रीधरांनीं भक्तांच्या इच्छेनें भगवच्छरीरोत्पत्ति बोलिली आहे, व निश्चलदासांनीं साधूंच्या पुण्यानें व

दुर्जनांच्या पापानें भगवच्छरीरोत्पत्ति बोलिली आहे. मग परमेश्वराचें शरीर धर्मोऽधर्मजन्य नाहीं असें कसें म्हणतां ?

**समाधानः**—हे वादिन् ! तुला त्यांच्या भाषणाचा अभिप्राय समजला नाहीं. तथापि श्रवण कर. हें भगवंताचें मायाजन्य शरीर अज अव्यय आहे. त्याचा उपसंहार परमात्मा आपण होऊनच करीत नाहीं असें भारतभावदीपांत चतुर्धराचार्यांनीं ह्मटलें आहे. तें अज अव्यय शरीर भक्तांच्या प्रेमवासनेनें हृदयांत प्रगट होतें असा श्रीधर स्वामींच्या ह्मणण्याचा अभिप्राय आहे. आणि तेंच अज अव्यय भगवच्छरीर समस्त सुर व भक्तसमष्टिप्रार्थनानिमित्तपूर्वक अवतार-प्रयोजनावच्छिन्नत्वेंकरून समष्टिविराड्हृदयगोचर होतें. तेव्हां सत् आपल्या सुकृतानें व असत् आपल्या दुष्कृतानें त्याला सुखदुःखहेतु समजतात. हा निश्चलदासांचा अभिप्राय आहे. अन्यथा, परकर्मानें परशरीर जीवाचेंही होत नाहीं तर ईश्वराचें कसें होईल ? पुत्राच्या उत्तम कर्मानें पित्याला परलोकांत उत्तम शरीर मिळतें. तें परकर्मजनित आहे असें ह्मणूं नको. कारण त्याचेठायीं अधिकार, योग्यता व पुण्यलेश हे स्वकीय असल्यामुळें त्याला परकर्मजनितत्व येत नाहीं. अधिकार ह्मणजे ऋणदातृत्व. पित्यानें पुत्राला आपल्या वीर्यापासून उत्पन्न करून मातेनें त्याचे गर्भकष्ट सहन केले आहेत, व बाळपणीं दोघांनींही जोपासना केली आहे, ह्मणून आईबापांचें पुत्रावर ऋण आहे. ‘ मातृदेवोभव ’ ‘ पितृदेवोभव ’ ही श्रुतीही याविषयीं प्रमाण आहे. ह्मणून पित्याला पुत्राचें कर्म ग्रहण करण्याचा अधिकार आहे. सन्याशाचे श्राद्धादिक करूं नयेत ह्मणजे त्याला अधिकार जरी असला तरी योग्यता नाहीं. तर गृहस्थालाच पुत्रऋण स्वीकाराची योग्यता आहे. आणि अतिपातकीयांचे श्राद्धादिक करूं नयेत असें गरुडपुराणांत सांगितलें आहे. यावरून श्राद्धादिककर्मफल मिळण्याला स्वतःचा पुण्यलेशही पाहिजे. म्हणजे घरीं द्रव्य थोडें असतां ऋणी जनांपासून तें घेऊन भरून काढावें, तद्वत् स्वपुण्य न्यून असतां पुत्रकृत श्राद्धादि-कर्मांनीं पुरें करून घ्यावें म्हणजे उत्तम शरीर व भोग मिळतात. तें

स्वीयकर्मफलच म्हटलें पाहिजे. यद्यपि, 'अनाथप्रेतसंस्कारात्कोटियज्ञ-फलंलभेत्' या वचनावरून अर्थातच परकर्माचें फळ पराला मिळतें हें सिद्ध होऊं पहातें, तथापि संस्कारकर्त्याच्या दयावृत्तीनें तें कर्म जनार्दनार्पण होऊन ईश्वराच्या साह्यानें त्या अनाथाला दान म्हणून मिळतें व दत्तावर देवता त्याचें स्वत्व ठेवितात. त्यामुळें त्याला उत्तम शरीर मिळालें तर तेंही स्वीय कर्माचेंच फल आहे; कारण तेथें अधिकार मात्र यद्यपि न्यून आहे तथापि योग्यता व पुण्यलेशाची अपेक्षा आहे. कारण कितीही अनाथ असला तरी सन्यासी व अतिपापी यांचे प्रेतसंस्कार शास्त्रीय निषेधास्तव दयावंतालाही करतां येत नाहींत. पुत्राच्या कर्मानें पित्याच्या अंतःकरणांत अदृष्ट उत्पन्न होतें असें सांख्यसूत्रकार व तद्भाष्यकार म्हणतात. तें अदृष्ट संबंधावांचून उत्पन्न होत असेल तर कोणाच्याही अंतःकरणांत उत्पन्न झालें पाहिजे; व मग पुत्रकृत श्राद्धानें पित्याला जशी उत्तम गती होते तशी कुड्यालाही झाली पाहिजे. व संबंधानेंच जर पित्याच्या अंतःकरणांत अदृष्ट होत असेल तर संबंध क्रियासाध्य असतो ह्मणून पितृकृत वैधगर्भस्थापनानेंच सिद्ध झालेला अधिकार पुत्रसमर्पित कर्माच्या अदृष्टाला संपादक होतो, व त्याचें ठिकाणीं पित्याचें स्वत्व राहतें. आतां, या पक्षांत सांख्यशास्त्राचा विरोधही नाहीं. सारांश, अन्यकर्मानें अन्यशरीरोत्पत्ति जीवालाही नाहीं तर ईश्वराला नाहीं हें काय सांगावें लागतें? सारांश, या सर्व विवेचनावरून परमेश्वराचें शरीर भूतकार्य नसून मायामय आहे हें सिद्ध झालें. पण दृष्टिसृष्टिवादानुसार आमच्या मतें ह्या शरीराचा अभिमान परमेश्वरास होत नसल्यामुळें त्याला स्वरूपच्युति नाहीं. व ह्मणूनच त्याला गुरुशास्त्रादिजन्य ज्ञानाची अपेक्षा नाहीं. यद्यपि शुद्धसत्व मायामय असल्यामुळें "अहंब्रह्मास्मि" ज्ञान विद्यावृत्तीनें परमेश्वराचें ठिकाणीं संभूत आहे, तरी त्याला त्याचा कांहीं उपयोग नाहीं. कारण अज्ञाननिवृत्ति करितांच ज्ञानाचें महत्व आहे. ह्मणूनच "सचेतन ते जीवन्मुक्त। अचेतन ते विदेहमुक्त। दोहींवेगळे नित्य-मुक्त। योगीश्वर" ॥ १ ॥ ह्या समर्थाच्या ह्मणण्याप्रमाणें परमात्मा नित्यमुक्त आहे. आणि त्याचें शरीर नित्यमुक्तप्रत्ययबलेंकरून त्याला

ब्रह्मरूपच भासत असलें पाहिजे, मायारूप भासत नाहीं. कारण, स्वरूपच्युति नसली तर सर्व जगच चिन्मय भासतें, मग स्वीयशरीर काय भिन्न आहे ? आणि हीच दृष्टि वास्तविक असल्यामुळें भगवच्छरीर मायामय ह्मणणें देखील व्यतिरेकीयांकरितां असून वस्तुतः तें अनध्यस्तविवर्तरूप आहे. हें भगवदवतरण "स्वमंतव्यांशसिद्धांततुषारादि" ग्रंथाचेठायीं नाना प्रकारानें विस्तरशः केलें आहे; तें मनीषा असल्यास अवलोकावें.

शिष्यः— भगवन् ! माझी संपूर्ण शंका विनिवृत्त झाली. आतां अग्रिमकथामृतपिपासा आहे. कारण आपल्या मुखांतील वचनाचेठायीं अलंबुद्धि कोणास होणार ?

श्रीगुरुः— श्रवण कर.

॥ श्लोक ॥

'सएषनरलोकेऽस्मिन्नवतीर्णः स्वमायया ॥
रेमेस्त्रीरत्नकूटस्थोभगवान्प्राकृतोयथा ॥ १ ॥'

( भागवतस्कंध१—अध्या.११—श्लो.—३५ )

अन्वयः— स एषः नरलोकेऽवतीर्णः स्वभगवान् यथा प्राकृतः स्यात्तथा स्त्रीरत्नकूटस्थो मायया रेमे ।

॥ ओव्या ॥

जो आनंदेदंतावच्छिन्न । तोचि हा पुढें अन्वयें सगुण । नरलोकीं नरसजातीय असोन । नाहीं मनुष्यपण ज्यालागीं ॥ ९७ ॥ आपुलें जें षड्गुणैश्वर्य । आपणचि तयाचा आश्रय । यालागीं 'स्वभगवान्' होय । विशेषण लाहे सार्थता ॥ ९८ 'प्राकृत' म्हणजे प्रकृतियुक्त । अविवेकें जो स्वविस्मृत । तो कामिनीयोनिसहोपस्थ । आनंद मानी ज्या परी ॥ ९९ ॥ तेंवी अमायी स्त्रियांत रमला । मायिका मायावशें गमला । एऱ्हवीं जो वेदें नमिला । यत्स्मरणें विमला योगीमति ॥ १०० ॥

॥ गद्य ॥

शिष्यः— भगवन्! आपल्या ह्मणण्याचा नीट अर्थ मला समजला नाहीं. कारण, मूळांत जीं 'सएष' अशीं पदें आहेत त्या पैकीं प्रथम

पदाचा पूर्वदेशकालविशेषणसंबंध असून, द्वितीय पदाचा इदानींतनदेशकालविशेषणसंबंध आहे; आणि दोहोंचा अन्वय ईश्वराचे ठिकाणीं आहे, हें संभवत नाहीं. कारण ईश्वरशब्दानें शुद्धब्रह्म घेतलें तर श्लोकांत सांगितलेलें नरलोकीं शुद्धब्रह्माचें अवतरण संभवत नाहीं. आणि मायायुक्त ब्रह्म घेतलें तर तें नित्य परोक्ष आहे. कारण माया ही मायादशेंत किंवा मायानिवृत्तिदशेंत कळत नसल्यामुळें अनुमेयमात्र आहे. तसा तदवच्छिन्न परमात्माही अनुमेयमात्र व परोक्ष आहे. परोक्ष पदार्थाचा अनुभव संभवत नाहीं. आणि पूर्वी ज्याचा अनुभव झाला नाहीं, त्याची आठवण संभवत नाहीं. मूळांतील 'स' शब्द पूर्वदेशकालविशेषणविषयिणी तत्ता दाखवीत असून, 'एष' शब्द इदानींतनदेशकालविशेषणविषयिणी एतत्ता दाखवितो. 'तदेतत्' पदांचा अन्वय करून देणारा तिसरा पाहिजे. आणि त्या तिसऱ्याला पूर्वदेशकालविशेषणविषयिणी तत्ता अनुभूत असली तरच तिचा इदानींतनदेशकालविशेषणविषयिणी एतत्तेशीं तो अन्वय करितो. ह्या प्रत्ययाला प्रत्यभिज्ञा म्हणतात. तशी प्रत्यभिज्ञा ईश्वरविषयक संभवत नाहीं. म्हणूनच कोणत्याही व्यक्तीचें ठिकाणीं परमेश्वरावतारपणा संभवत नाहीं. आणि परमेश्वरावतारपणा न संभवत असल्यामुळें अखंड ऐश्वर्य संभवत नाहीं. अखंड ऐश्वर्य न संभवल्यामुळेंच जीवत्वप्राप्ति होते. आणि जीव जें कर्म करितो, त्याचा अवश्य भोग होतो. म्हणून श्रीकृष्णाला स्त्रीभोगांनीं निषिद्ध कर्मापासून नरकप्राप्त्यादि भोग झाला पाहिजे.

श्रीगुरुः— गड्या! तुझें चावट्य अझून संपत नाहीं. मला वाटतें कीं, तूं श्रुतीवरही तर्क काढण्याला काय पूर्वजन्मींचा जंबूक आहेस? जो आपल्या आईविषयीं माझी आई जारिणी असेल काय ? असे तर्क काढतो, त्याच्यावर मी शुद्धकुलीन नाहीं काय असा तर्ककाढण्याचा जसा आरोप येतो, तद्वतच श्रुतिमातेविषयीं तर्क काढणाऱ्या पुरुषाची गोष्ट होते. तथापि काढलेल्या तर्कांचें निराकरण करण्याची माझी प्रतिज्ञा असल्यामुळें उत्तर श्रवण कर.

तूं बोलिलास कीं, परमेश्वर माया परोक्ष असल्यामुळें सर्वदा परोक्ष असतो; तें असंबद्ध आहे. कारण माया जर नित्य परोक्ष असेल, तर मग मायेचें कार्य प्रत्यक्ष कां व्हावें? आणि मायेचें कार्य जर प्रत्यक्ष होत नाहीं असें मानशील तर संसार कोणालाच भासू नये. तो तर भासत आहे. ह्मणून माया परोक्ष नसून प्रत्यक्षादिप्रमाणगोचर कार्यानुमेय आहे. आतां, कदाचित् असें ह्मणशील कीं यद्यपि मायेचा विक्षेपशक्त्यात्मक कार्यांश प्रत्यक्ष आहे, तथापि आवरणात्मक कारणांश परोक्षच आहे, तर तेंही बरोबर नाहीं. कारण, ज्याप्रमाणें 'मी संसारी आहे' असा विक्षेपशक्त्यात्मक मायेचा अनुभव येतो, त्याप्रमाणें 'मी ब्रह्म जाणत नाहीं' असा आवरणशक्त्यात्मक मायेचाही अनुभव येतो. आतां, परमेश्वर जो तूं मायावच्छिन्न बोलिलास, तो काय विक्षेपशक्त्यात्मक मायावच्छिन्न, कीं आवरणशक्त्यात्मक मायावच्छिन्न? प्रथम पक्षीं, विक्षेपशक्त्यांशापरोक्षानुभववत् परमेश्वराचाही अपरोक्षानुभव येणें शक्य आहे. आणि द्वितीय पक्षीं, परमेश्वराला जीवत्वप्राप्ति होते. कारण सर्व वेदांतसिद्धांतामध्यें यद्यपि पुष्कळ मतें आहेत तथापि त्या सर्व मतांत परमेश्वराविषयीं आवरणस्वीकार केला नाहीं. कारण, परमेश्वराविषयीं आवरण स्वीकारिल्यास परमेश्वराच्या आवरणनिवृत्तीकरितां दुसऱ्या परमेश्वरोपदेशाची आवश्यकता लागेल. तशीच दुसऱ्याकरितां तिसऱ्याची व तिसऱ्याकरितां चवथ्याची, याप्रमाणें अनवस्थादोष येतो. बरें, अनवस्था निराकरण करण्याकरितां परमेश्वर नित्य अज्ञानी आहे असें ह्मटलें, तर मग ज्ञान कोणासच न झालें पाहिजे. आणि महावाक्यावरून ब्रह्मापरोक्षज्ञान तर अनुभवसिद्ध आहे. दृढाऽदृढतेचाच मात्र ज्ञानी अज्ञानी यांत भेद आहे. तें महावाक्य वेदांतर्गत असल्यामुळें वेद ज्ञानीप्रणीत असले पाहिजेत. आणि सर्व जीवांनां तर महावाक्यावरूनच ज्ञान होतें. येवढ्याकरितां ईश्वराला नित्यज्ञानी मानलें पाहिजे. नित्यज्ञानी परमेश्वराचें ठिकाणीं मायेच्या आवरणाचा स्वीकार करणें, सूर्याचें ठिकाणीं आंधार आहे, असें ह्मणण्यासारखें होय. आतां, शुद्धसत्वात्मकमायाप्रतिबिंबित असल्यामुळें मिश्रसत्वात्मक अविद्यावरणाचा परमेश्वराचेठायीं स्वीकार नसूनही मायापरोक्षत्वास्तव

परमेश्वराला परोक्षत्वच आहे असें ह्मणूं नको. कारण मिश्रसत्वात्मक आवरणरूप अविद्या ज्याप्रमाणें पदार्थ झांकून टाकण्याला हेतु आहे, तशी शुद्धसत्वात्मक विद्या पदार्थ झांकून टाकण्याला हेतु नाहीं. ह्मणून जीवापेक्षां ईश्वरच सत्वनिष्ठानां अपरोक्ष होणें अधिक शक्य आहे. दुसरें, जो तूं शुद्धसत्वगुण मानिलास, तो साक्षीभास्य आहे किंवा नाहीं? आणि साक्षिभास्य मानिलास तर अनुभवगम्यापरोक्षता त्याचेठायीं प्राप्त होत असल्यामुळें तदवच्छिन्न परमेश्वराचेठायीं ती सहजच प्राप्त होते. ह्मणून परमेश्वराचा अनुभव येऊन स्मृति होणें शक्य आहे. आतां, मायेचा चैतन्याशीं संबंध नसल्यामुळें अनुभवगम्य मायाही यावद्ज्ञान आहे. आणि तीच सर्वसमर्थ असल्यामुळें परमेश्वराची अपेक्षा नाहीं, हें ह्मणणें ब्रह्मस्वरूपीं मायेचा अनिर्वचनीय संसर्गाध्यास असल्यामुळें ब्रह्मस्वरूपाची हानी न होऊन चैतन्याचेठायीं आरोपित मायावच्छेद प्राप्त होत असल्यामुळें, व तो न मानला तर जडत्वास्तव मायेच्या असामर्थ्यामुळें बाधित होतें. यद्यपि स्वामी निश्चलदास आपल्या 'युक्तिप्रकाश' नामक ग्रंथांत मूर्खांच्या भयाकरितां ईश्वर कल्पिला आहे, वास्तविक तो नाहीं, व त्याचे अवतारही नाहींत असें ह्मणतात तथापि ही मौढ्याऽवच्छेदकावच्छिन्न आचार्यपद्धतीच ह्मणावी लागते. कारण, स्वामी जे ईश्वर नाहीं ह्मणतात, त्यांनां मी असें विचारितें कीं, आपण जो ईश्वर नाहीं ह्मणतां, तो काय आपल्याला वाटते म्हणून? कीं श्रुतींत नाहीं ह्मणून? कीं युक्ति नाहीं म्हणून? कीं अनुभव नाहीं ह्मणून? पैकीं चवथा पक्ष संभवत नाहीं. कारण निद्रेमध्यें जीवाला कालगणनेची स्मृति न राहूनही वेळेच्यावेळीं कोण जागें करितो? साक्षी करितो म्हणाल तर, साक्षीचें ठिकाणीं कर्तृत्व आलें, ह्मणजे त्याचा साक्षीपणाच नाहींसा होतो. आतां, साक्षी कोणी नाहीं असें मानलें तर सर्वकर्ता ईश्वरच मानावा लागेल. व तसें मानलें ह्मणजे नैय्यायिकाभिमतप्राप्तिस्तव वेदांतसिद्धांत रसातळास गेलाच म्हणावयाचा. नुसती वासनाच आपोआप जागृत होते असें म्हटलें तर वासना जड आहे. सांख्याच्या कारणरूप जड प्रकृतीलाच जर वेदांत स्वतंत्र कर्तृत्व देत नाहीं तर तिच्या कार्यरूप जड वासनेला तें कर्तृत्व कसें

देईल? सारांश, परमेश्वर निद्रेतून उठविणारा आहे हा सर्वांचा अनुभव प्रमाण घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. तिसरा पक्षही बरोबर नाहीं. कारण शुद्धब्रह्माचें ठिकाणीं कर्तृत्व मानलें तर तें कर्तृत्व नित्य राहून ज्ञानानें त्या कर्तृत्वाचा नाश होणार नाहीं. आणि तें कर्तृत्व शुद्धब्रह्माचें ठिकाणीं असल्यामुळें मोठें ( महान ) राहील. महत्कर्तृत्वावच्छिन्न ब्रह्माचें ठिकाणीं अल्पकर्तृत्वावच्छिन्न जीवाचें ऐक्य संभवणार नाहीं. निश्चलदास महाराज! आपण कांहीं नास्तिक नाहीं; स्वयं वेदांती ह्मणवितां. यास्तव अशी माथ्यावर अर्गला घालून घेणें आपणास उचित नाहीं. ह्मणून विक्षेपशक्तिवशकर्ता मायाप्रतिबिंबित किंवा शुद्धसत्वात्मकमायाबिंबित, अथवा जीवरूपप्रतिबिंबापेक्षिकबिंबत्वारोपावच्छिन्नबिंबभूत परमेश्वर मानणें इष्ट आहे. पुनः, जीवन्मुक्त झाल्यावरही प्रारब्धाचा भोग भोगावा लागतो. तें प्रारब्धकर्म तर जडरूप असल्यामुळें त्याला नियमित करणें कोणाच्या संकल्पाशिवाय घटत नाहीं, आणि जीवसंकल्पानें जर प्रारब्ध संकल्पित झालें असतें तर जीवन्मुक्तींत वासनाक्षय झाल्या बरोबर प्रारब्धाची निवृत्ति व्हावयाला पाहिजे होती. तसें झालें असतें तर जीवन्मुक्तीच संभवली नसती, व जीवन्मुक्तावांचून गुरुपरंपरा संभवली नसती; व गुरुपरंपरेवांचून ज्ञान संभवलें नसतें; आणि ज्ञानावांचून मुक्तीही संभवली नसती; आणि मुक्तच जर कोणी झाला नसता, तर पुढें ज्ञानानें मुक्ति होणार, ह्या शास्त्राची प्रवृत्तीच व्यर्थ झाली असती. हें सर्वच लोट मानला तर नित्य संसारच भोगावा, असा उपदेश करणें श्रेयस्कर होतें. आणि संसार सर्वांनां अनुभूत असल्यामुळें त्याचा उपदेश संभवत नाहीं; म्हणून सर्वांनीं मौन होऊन राहावें हें बरें. येवढी भयंकर अनर्थपरंपरा शिरावर घेण्यापेक्षां परमेश्वरसत्यसंकल्पानेंच जीवन्मुक्तदशेंतही प्रारब्ध नियत केलें आहे, असें मानणें सयुक्तिक आहे. आतां, दुसरा पक्षही संभवत नाहीं. कारण, 'अस्मान्मायी सृजतेविश्वमेतत्' 'ससर्वज्ञःसविश्वकृत्' 'भोक्ताभोग्यंप्रेरितारंचमत्वा' 'सहिविश्वस्यकर्ताभुवनस्यगोप्ता' 'भीषास्माद्वातःपवतेभीषोदयतिसूर्यः' 'अंतःप्रविष्टाशास्ता' 'ममयोनिर्महत्ब्रह्मतस्मिन्गर्भंदधाम्यहम्'

' मयाध्यक्षेणप्रकृतिःसूयतेसचराचरम् ' ' ईश्वरःसर्वभूतानांहृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन्सर्वभूतानियंत्रारूढानिमायया ' ॥ ' सएवविश्वस्यभवान्विधत्तेगुणप्रवाहेणविभक्तवीर्यः । सर्गाद्यनीहोवितथाभिसंधिरात्मेश्वरोऽतर्क्यसहस्रशक्तिः ' ॥ ' अयंहिविश्वोद्भवसंयमानामेकस्वमायागुणाबिंबितोयः । विरिंचिविष्णवीश्वरनामभेदान्धत्तेस्वतंत्रःपरिपूर्णआत्मा ' ॥

इत्यादि शतशः श्रुती स्मृती भगवंताविषयीं प्रमाण आहेत. एवं पहिलाही पक्ष संभवत नाहीं. कारण, पहिला पक्ष स्वीकारला असतां आपलें ठिकाणीं दोन दोष प्राप्त होतात. वेदांताश्रित नास्तिकता हा पहिला; व अनिश्चयावच्छिन्नोन्मत्तप्रलाप हा दुसरा. पैकीं प्रथम दोष आपलें ठिकाणीं ठेवून आपणाला किंचित् निश्चयी मूर्ति समजावें तर परमेश्वराचें नास्तित्व आपण सर्वच ठिकाणीं कबूल केलें नाहीं. युक्तिप्रकाशांत जसें ईश्वर नाहीं म्हटलें आहे, तसेंच विचारसागराच्या चवथ्या तरंगांत ईश्वरवर्णन व ईश्वर आहे, म्हणून म्हटलें आहे. पुनः, वृत्तिप्रभाकराच्या पहिल्या प्रकाशांत ईश्वराच्या ज्ञानाला उत्पत्तिनाश आपण कबूल केले असून, त्याच ग्रंथाच्या आठव्या प्रकाशांत ईश्वर अनादि व आवरणरहित नित्यज्ञानी आहे, असें आपणच कबूल केलें. सारांश, आपलें ठिकाणीं दुसरा मात्र दोष आम्हाला दुःखानें ठेवावा लागतो. वेड्याशीं आम्ही भाषण करूं इच्छित नसल्यामुळें निश्चलदासमताचा तूं असलास तर तुझ्याशींही आम्ही भाषण करूं इच्छित नाहीं. तसेंच ईश्वराचा अवतार होत नाहीं, हेंही पर्यायानें निश्चलदास युक्तिप्रकाशांत दाखवितात. आणि विचारसागराच्या चवथ्या तरंगांत भाष्यकारांचें प्रमाण देऊन रामकृष्णाचें शरीर भूतकार्य नसून मायाकार्य अवताररूप आहे असें सांगतात, म्हणून ह्यांचें म्हणणें संशयात्मकच आहे. यद्यपि दृष्टिसृष्टिवादांत ईश्वर जीवकल्पित मानला आहे, तथापि परमेश्वराचें ऐश्वर्यच मात्र जीवानें कल्पिलेलें आहे, चैतन्य भाग जीवानें कल्पिलेला नाहीं; कारण चैतन्यभाग जर जीवानें कल्पिलेला असेल तर स्वसमानचैतन्यवत्ता ईश्वराचें ठिकाणीं राहूं नये. कल्पित पदार्थ आपल्यापेक्षां न्यून असतो; आणि चैतन्यभास्यही असतो. येथें

ईश्वरांतील चैतन्यभाग जर जीवकल्पित मानिला तर जीवकृत सृष्टीमध्यें ईश्वर संसारी होऊन जीवकृत वेदज्ञानानें ईश्वरमुक्तिप्रसंग प्राप्त होतो. आणि तसें मानिल्यास अस्मादिकांकडे संसारित्वास्तव व मुक्तीच्या अपेक्षेस्तव ईश्वरत्व येत असून जबरदस्तीनें नित्यज्ञानी ईश्वराकडेच जीवत्व येत आहे. ह्मणजे ईश्वराला जीव व जीवाला ईश्वर एवढा शब्दमात्र वाद होतो. नामभेदमात्र वादांत शहाणे पुरुष आग्रह करीत नाहींत. पुनः, ईश्वराचें चैतन्य जीवकल्पितच आहे, असें घेऊन चाललें तर तें चैतन्य चैतन्यभास्य आहे असें मानावें लागेल. तसें मानलें ह्मणजे भासकचैतन्याशीं भास्यचैतन्याची चेतनत्वास्तव एकता होऊन कल्पितत्व नाहींसें होईल; अथवा भास्य-चैतन्य जड होईल. हें कबूल करणें ह्मणजे प्रकाश आंधार होतो असें ह्मणणें होय. आणि अनुभव पाहिला तर स्वप्नांतील राजाचें राज्य ज्याप्रमाणें स्वप्नद्रष्टृकल्पित असतें, त्याप्रमाणें त्या राजाच्या शरीरांतील साक्षी कांहीं स्वप्नद्रष्टृकल्पित नसतो. तात्पर्य, दृष्टिसृष्टिवादांत जरी परमेश्वराचें ऐश्वर्य जीवकल्पित आहे तरी परमेश्वरांतर्गत चैतन्यभाग जीवकल्पित नाहीं. आणि जीवकल्पितेश्वरवाक्याचा यथार्थ अर्थ तर हा आहे कीं, घटाकाश जसें घटाचें कार्य नाहीं, किंतु घटाच्या स्थितीवर घटाकाशाची स्थिति अवलंबून आहे, तद्वत् ईश्वर जीवाच्या कल्पनेचें कार्य नसून जीवाला लागलेल्या अनादि वासनारूप कल्पनेवर परमेश्वराची स्थिती अवलंबून आहे. ह्मणजे जीव अनादिवासनारूप कल्पनेनें स्वरूपप्रतिबिंबापेक्षी ब्रह्मावर बिंबत्वारोप करितो. ह्मणून प्रतिबिंबापेक्षीबिंबत्वारोपावच्छिन्नबिंबभूत ब्रह्म परमात्मा ईश्वर आहे, हें दृष्टिसृष्टिवादांत सिद्ध होतें. आणि माझ्या ह्मणण्यालाच मधुसूदन स्वामी आपल्या सिद्धांतबिंदूंत संमति देतात. तो परमात्माच सुजनजीवभावनावच्छिन्न कनककुंडलवत् अनध्यस्तशरीररूप अवतार धारण करितो. हेंही " त्वंजातोभवसि विश्वतोमुखः " ' उपासकानांकार्यार्थंब्रह्मणोरूपकल्पना ' ' संभवाम्यात्ममायया ' ' तदातदाऽवतीर्याहम्. ' इत्यादि श्रुतिस्मृतीवरून आणि सगुणध्यान करणाऱ्याला संकष्टनाशक सगुण परमात्मा पाहिजे

या युक्तीवरून व पांडवसहकरणाद्यैतिहासिक अनुभवावरून सिद्ध आहे. आणि ईश्वरावतारप्रक्रिया अनेक स्थानीं मी निरूपण केली असून पुढेंही करीन. तात्पर्य, तो परमात्मा स्वतः अलिप्त होत्साता ‘ ऐका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हें साही गुणवर्य । वसति जेथ ’ ॥ १ ॥ ( ज्ञाने० अध्या ६–ओवी ३७ ) ह्या तातांच्या ह्मणण्याप्रमाणें ऐश्वर्यवान् आहे. यद्यपि जीवही उपासनावशानें ऐश्वर्यवान् होऊं शकतो, तथापि जगत्कर्तृत्वादिक धर्म त्याचेठायीं येऊं शकत नाहींत. आणि श्रीकृष्णानें वत्सहरणकालीं सर्व गोपवत्स उत्पन्न केले. ह्मणून शिवविष्ण्वात्मक कृष्णरूप जसें तृतीय सखी-प्रेषणाचेठायीं सिद्ध केलें तसेंच तें ब्रह्मदेवात्मकही आहे असें सिद्ध होतें. तथापि जग उत्पन्नकर्ता असूनही ब्रह्मदेवाचेठायीं जसा मोह पडला तसा श्रीकृष्णाचेठायीं पडला नाहीं; ह्मणून श्रीकृष्णाचें रूप जरी ब्रह्मदेवात्मक ठरतें तरी हिरण्यगर्भातील जीवधर्म त्याचेठायीं संभवत नाहींत. ह्यामुळेंच परमात्मा षड्गुणैश्वर्यवान् असूनही अलिप्त असतो. उपासक पुरुष षड्गुणैश्वर्याचा भोक्ता असतो व परमेश्वर त्याचा साक्षी असतो. यद्यपि आधिकारिक ज्ञानीत्वास्तव षड्गुणै-श्वर्याचे साक्षी जीवन्मुक्त राहूं शकतात तथापि षड्गुणैश्वर्य त्याचें उपासनाजन्य प्रारब्ध असल्यामुळें तत्क्षयानंतर विदेहमुक्तीची त्यांनां जशी अपेक्षा आहे तशी परमेश्वराला नाहीं. ह्मणून परमात्मा जगत्कर्तृत्वादितटस्थसत्यसंकल्पासहित षड्गुणैश्वर्याचा साक्षी आहे. आणि जीवभावनारोपक्षुब्ध शुद्धसत्त्वमय सत्यसंकल्पांत साक्षीसन्नि-धानजन्य संचोदना उत्पन्न होत असल्यामुळें संचोदकत्व साक्षिचे-ठायीं आरोपित आहे. तो संचोदकत्वावच्छिन्न बिंबभूत साक्षी ईश्वर अलिप्तच रहात असल्यामुळें उत्तम स्त्रीसमुदायाचेठायीं षड्गुणैश्वर्याच्या आपण ताब्यांत न जातां त्याला आपल्या ताब्यांत ठेवून भूतकार्यरहित स्वलीलामय मायेनेंच रमण करिता झाला. आतांच अनुभवानें ईश्वरा-नुभवता सिद्ध केली असल्यामुळें ‘ सएष ’ या शद्बानें ईश्वराची प्रत्य-भिज्ञा होते. जीव जसा प्रकृतीच्या आधीन होऊन स्त्रियांचेठायीं रमण करितो, तसें परमात्म्यानें रमण केलें नाहीं.

शिष्यः— भगवन् ! आपल्या व्यापक प्रदीप्त वचनानलानें माझें शंकाकंटकवन समस्त जळून मी मुक्त झालों आहे. तथापि त्यांत ग्रहण करितांनां झालेला जो बुद्धिश्रमरूपी दाह, त्याच्या शांत्यर्थ आपल्या वचनामृताची अपेक्षा करितो.

श्रीगुरुः—मुनिवर ह्मणाले, हे राजा !

॥ ओव्या ॥

तो हा परब्रह्ममूर्ती । जनां कळेल जियेरीती । तीं बाह्य चिन्हेंही निश्चिती । सांगू आतां ॥ १ ॥ ब्रह्मनिष्ठ ओळखावया । बाह्यचिन्हानपेक्षा राया । तदपि जे मोहिले हरिमाया । बाह्य चिन्हें तया उपयोगी ॥ २ ॥ सर्वांमाजीं अंतरंग । एक ब्रह्मविज्ञान चांग । शम दम विवेक आणि विराग । तो बहिरंग त्याहुनी ॥ ३ ॥ ह्मणोनि विरागविषयक शद्धीं । बाह्यचिन्हता प्रसिद्धी । शरीरापेक्षया पाहतां बुद्धि । तरी आंतर चिन्ह तें ॥ ४ ॥ विषय न रोधितां इंद्रियें न चळती । हे जीवन्मुक्ताही अघटप्राप्ति । तो परमात्मा ती जयाची सहजस्थिति । यालागीं भगवंतीं प्रत्यया ये ॥ ५ ॥ सकळ विषयामाजीं दुस्तर । जो सकळ दुःखांचें भांडार । जो नरकाचें माहेरधर । स्त्रीसंग साचार वर्णिला ॥ ६ ॥ स्त्रियांसी अबला ह्मणती लोक । परी ते विचारितां अतिमूर्ख । दृष्टिमात्रें मोहिले ब्रम्हादिक । त्या अबला कीं सबला ? ॥ ७ ॥ अधरामृताची वाटी । बळेंचि लावोनियां ओठीं । मोहुनी सोडिल्या वीरकोटी । तेथें काय गोष्टी इतरांच्या ॥ ८ ॥ जियांचें सुंदर हास्यवदन । जियांचे प्रेमळ कटाक्षबाण । पाहोनि योगीही साक्षीपण । जाती विसरोन क्षणमात्रें ॥ ९ ॥ बाळब्रह्मचारी हनुमंत । स्वेदद्वारा वीर्य द्रवला सागरांत । मग मकरध्वज जन्मला तेथ । स्त्रीप्रभाव निश्चित येवढा ॥ ११० ॥ साठ सहस्र वरुषें अनुष्ठानी । विश्वामित्र महामुनी । तो मेनिकेच्या पाठीं श्वान होउनी । तप सांडोनि फिरला हो ॥ ११ ॥ चहूं वेदांचा प्रतिपादिता । सर्व जगाचा उत्पन्नकर्ता । तो ब्रह्मदेव जगत्पिता । धांवला तत्वतां कन्येपाठीं ॥ १२ ॥ कल्पांत बाळब्रह्मचारी । तो नारद मागे कृष्णनारी । मग नारदी होऊनि निर्धारीं । साठ पोर आणि एक पोरी प्रसवला ॥ १३ ॥

॥ श्लोक ॥

'विश्वामित्रपराशरादिमुनयोवातांबुपर्णाशनाः ।
तेऽपिस्त्रीमुखपंकजंसुललितंदृष्ट्वैवमोहंगताः ॥
शाल्यन्नंसघृतंपयोदधियुतंभुंजंतियेमानवाः ।
तेषामिन्द्रियनिग्रहोयदिभवेद्विंध्यस्तरेत्सागरम्' ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

पाहूनियां मोहिनी नारी । वीर्य द्रवला त्रिपुरारी । तेथ इतरांची समाचारी । गती कवण ? ॥ १४ ॥ एवं सर्व स्त्रियांची स्थिति । आणि ह्या तंव लंपटस्थिती भगवंतीं । वरी पातिव्रत्यतेज निश्चिती । गंभीर स्थिति निर्मळता ॥ १५ ॥ ऐसा असोनीही आपण । परी श्रीहरीचें मन । वळवावयाकारण । सामर्थ्यसंपन्न नच झाल्या ॥ १६ ॥

॥ गद्य ॥

**शिष्य:**— भगवन् ! आपल्या भाषणापासून मला दोन शंका उद्भूत झाल्या आहेत. त्यांचें कृपाकरून उत्तर द्याल अशी आशा करून मी त्या शंका विचारण्याचें धैर्य करितों. विश्वामित्रपराशरादिक अतिशय तप करणारे जर स्त्रियांचें ठिकाणीं वशीभूत झाले, तर इतर जे रोज दहीं भात जेवणारे पुरुष ते इंद्रियनिग्रह काय करूं शकतील? या ह्मणण्याचा अर्थ असा करावयाचा काय? कीं इंद्रियनिग्रह सर्वथाच कोणाकडून होत नाहीं. दुसरें, तृतीय सखीप्रेषणाचेठायीं आपण हरिहरांची उपासना समान वर्णन केली आहे; आणि आतां शिवाची गौणता दाखवितां, हा पूर्वापर विरोध नाहीं काय?

**श्रीगुरुः**— बाळा ! तूं आपल्या दोन्हीही शंकांचें उत्तर श्रवण कर. एखादी आई जर आपल्या मुलाला असें सांगत असली कीं, तूं अग्नीपासून दूर हो; काल तो अग्नि चूर्ण करणारा मनुष्य सहज जळाला; ह्मणजे या वाक्याचा असा अर्थ घ्यावयाचा काय? कीं तूं बळेंकरून अग्नींत उडी घाल म्हणून. त्याप्रमाणें शास्त्रांत जी ऋषींचीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांचा अर्थ इतर मनुष्यांनीं इंद्रियनिग्रह करूं नये असा

होत नाहीं; तर मोठ्या मोठ्या पुरुषांचीही विषयासक्तीनें अशी स्थिति झाली म्हणून आपण पहिलेपासूनच तिला भिऊन राहिलें पाहिजे, असा त्या वचनांचा अर्थ होतो; आणि असा अर्थ केला तरच त्या वचनांचें साफल्य आहे. नाहीं तर त्या वचनांचें साफल्य नाहीं. कारण जी गोष्ट अज्ञात असते तिचाच उपदेश संभवतो. विषयसेवन तर सर्वांनांच ठाऊक आहे. त्याचा उपदेश काय करावयाचा असतो? म्हणून 'यद्यस्यतात्पर्यंतत्तस्यार्थः' या वाक्यांत सांगितल्याप्रमाणें विषयासक्तीचा अत्यंत त्यागच त्या वचनांचा अर्थ होतो. आतां दुसरी जी तुझी शंका आहे, तिचें उत्तर श्रवण कर. सर्व जगाचें कारण जो परमात्मा तो सत्तात्रयवादांत मायावीरूप आणि सत्ताद्वयवादांत प्रतिबिंबापेक्षिक आरोपितबिंबत्वावच्छिन्न ब्रह्मरूप, सर्वज्ञ कृपाळू असा जगज्जन्मादिमत्वतटस्थलक्षणलक्षित आहे. त्यालाच कारणब्रह्म म्हणतात. सर्व श्रुतींत हाच परमात्मा उपास्य आहे. या प्रभूचीच उपासना कोठें आनंदमयत्वानें सांगितली आहे, कोठें आकाशत्वानें, कोठें कालत्वानें, कोठें वैश्वानरत्वानें व कोठें प्रतीकरूपानें सांगितली आहे; व तशीच कोठे अभिगमनरूपानेंही सांगितली आहे. सर्व पुराणांतही अभिगमनरूपानेंच उपासना आहे. तो परमात्माच स्वभक्तार्थ शुद्धसत्वरूपानें हरिहरदेह धारण करून, रजोपहित ब्रह्मा, सत्वोपहित विष्णु, व तमोपहित शंकर असा सृष्टिकार्यार्थ होतो. म्हणजे निष्काम भगवद्भक्तांचें स्थान एक शुद्धसात्विक परमात्मा असून, भक्त सकाम असून जर अज्ञानी असले तर, त्यांनां तो विदेहप्रकृतिलय स्थान देतो; आणि ज्ञान झाल्यावर त्यांनां मुक्ति होते. आतां, निष्काम अज्ञानी उपासकांचें प्राप्य स्थान ब्रह्मलोक आहे. उपासनेंत मानसक्रिया विशेष व भक्तींत प्रेम विशेष. हा उपासना व भक्ति या दोहोंतील भेद आहे. निष्काम उपासक ज्या ब्रह्मलोकाला जातात, तें हिरण्यगर्भस्थान महाभारतांत:--

॥ श्लोक ॥

'रुद्रोनारायणश्चैवेत्येकंसत्वंद्विधाकृतम् ।
लोकेचरतिकौंतेयव्यक्तिस्थंसर्वकर्मसु' ॥ १ ॥

याप्रमाणें हरिहरत्व कारणब्रह्मास सांगितलें असून, सृष्टिकार्यार्थ कार्यब्रह्मासही हरिहरत्व महाभारतांतील अनुगीता व मात्स्यपुराणांत सांगितलें आहे.

॥ श्लोक ॥

' महानात्मामतिर्विष्णुर्जिष्णुःशंभुश्चवीर्यवान् ।
बुद्धिःप्रज्ञोपलब्धिश्चतथाब्रह्माधृतिःस्मृतिः ।
पर्यायवाचकैरेतैर्महानात्मानिगद्यते ' ॥ १ ॥

( अनुगीता. )

**अर्थः**— महत्तत्व, मति, विष्णु, जिष्णु, वीर्यवान् शंकर, बुद्धि प्रज्ञा, उपलब्धि, ब्रह्मा, धैर्य, आठवण, हे सर्व महत्तत्वाचेच पर्याय आहेत. याप्रमाणें अनुगीतेंत सांगितलें असून,

॥ श्लोक ॥

' सविकारात्प्रधानात्तुमहत्तत्वमजायत ।
महानितियतःख्यातिर्लोकानांजायतेसदा ॥ १ ॥
गुणेभ्यःक्षोभ्यमाणेभ्यस्त्रयोदेवाविजज्ञिरे ॥
एकामूर्तिस्त्रयोदेवाब्रह्माविष्णुमहेश्वराः ' ॥ २ ॥

**अर्थः**— सविकार प्रकृतीपासून महत्तत्व उत्पन्न होतें, म्हणूनच लोकांनां तें मोठें आहे अशी प्रतीति होते. साम्यावस्थेंतून न्यूनाधिकत्व पावलेल्या सत्वादिकांपासून तीन देव उत्पन्न होतात. एकच कारण-ब्रह्म जें विष्णुशिवात्मक सांगितलें आहे, तेंच ब्रह्माविष्णुमहेश्वर अशा तीन देवांच्या रूपानें होतें. याप्रमाणें 'उपासकानांकार्यार्थंब्रह्मणोरूपकल्पना' । इत्यादि श्रुतीवरून कारणब्रह्माला हरिहरत्व व महत्तत्वोपहित हिरण्यगर्भसंज्ञक कार्यब्रह्माला हरिहरत्व सांगितलें असल्यामुळें जे निष्काम उपासक कार्यब्रह्म हिरण्यगर्भाचें ठिकाणीं गमन करितात, ते जरी हरिहरोपासक असले तरी ब्रह्मलोकच त्यांनां हरिहरलोकाप्रमाणें भासतो. आणि जे निष्काम हरिहरभक्त कारणब्रह्माचें ठिकाणीं गमन करितात, ते शैव असोत अथवा वैष्णव असोत, एकच परमेश्वरस्थान त्यांनां मिळतें. याविषयीं पुष्पदंत म्हणतात:—

॥ श्लोक ॥

' त्रयीसांख्यंयोगःपशुपतिमतंवैष्णवमिति ।
प्रभिन्नेप्रस्थानेपरमिदमदःपथ्यमितिच ॥
रुचीनांवैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषाम् ।
नृणामेकोगम्यस्त्वमसिपयसामर्णवइव ' ॥ १ ॥
[ शिवमहि० श्लो० ७. ]

अर्थः– हे भगवन्? वेद, सांख्य, योग, शैव, वैष्णव, इत्यादि भिन्न, भिन्न मतांचीं शास्त्रें आपल्या रुचिवैचित्र्यामुळें हें चांगलें आहे, हें चांगलें आहे, अशा विश्वासानें सरळ किंवा वांकड्या अशा कोणत्याही पंथानें जाणाऱ्या पुरुषांनां सर्व उदकाला समुद्राप्रमाणें तूंच एक प्राप्य आहेस. आतां, हिरण्यगर्भाला किंचित् जीवधर्म असल्यामुळें ते जीवधर्म हैरण्यगर्भस्थ हरिहरांनांही उपासनादृढीकरणार्थ पुराणामध्यें आनुषंगिक निरूपण केले आहेत. कारणब्रह्माचें हरिहरत्वेंकरून भजन करीत असतांनां प्रथम उपासकांच्या स्थूलदर्शित्वास्तव चित्तामध्यें कार्यब्रह्मभाव येतो. आणि तो अनाग्रही पुरुषांनां यद्यपि कारणब्रह्मभक्तींत विरोध आणीत नाहीं; तथापि आग्रही पुरुषांनां कार्यब्रह्मपर करून टाकण्याला समर्थ आहे. आणि त्या आग्रहाच्या योगानें अभिहत झालेले चंचलचित्त उपासक त्यापासून मोह पावण्याचा संभव आहे. हा अनर्थ जाणूनच पुराणांत कार्यकारणब्रह्मपर निंदास्तुतिवाक्यें आहेत. त्यांतून शिवपुराणांत शिवाची स्तुति शिवाला कारणब्रह्म म्हणून केली असून विष्णूची निंदा विष्णूच्या कार्यब्रह्मत्वास्तव केली आहे. आणि विष्णुपुराणांत विष्णूची स्तुति विष्णूला कारणब्रह्म म्हणून केली असून शिवाची निंदा शिवाच्या कार्यब्रह्मत्वास्तव केली आहे. युक्ति व अनुभवदृष्टीनें पाहतां वैष्णव विष्णूला जितके कृपाळू, सर्वज्ञ व सात्विक समजतात, तितकेच शैवही शिवाला कृपाळू, सर्वज्ञ व सात्विक समजतात. तात्पर्य, ज्याप्रमाणें आईचे गुण आपल्या आपल्या आईचें ठिकाणीं सर्वच मुलें पाहतात, त्याप्रमाणें शिवभक्त शिवाचें ठिकाणीं व विष्णुभक्त विष्णूचें ठिकाणीं

कारणब्रह्मच पाहतात. पुनः, एकाच आईचीं दोन मुलें असतां एका मुलाला आई, ' तूं शहाणा आहेस, अमूक मूर्ख आहे ' व दुसरे वेळीं दुसऱ्या मुलाला, 'तूं शहाणा आहेस, अमूक मूर्ख आहे' असें म्हणते, तेव्हां तिच्या म्हणण्याचें तात्पर्य बालकाचें रडणें बंद व्हावें यांत असतें; परस्पर भावाभावांत भांडण लावण्यांत नसतें. त्याप्रमाणें विष्णुपुराणांत शिवाची निंदा व शिवपुराणांत विष्णूची निंदा वैष्णवांनां व शैवांनां इष्टउपासनादृढीकरणार्थ आहे, परस्परनिषेधार्थ नाहीं. कारण परस्परांच्या निषेधानें सर्वपुराणउच्छेदप्रसंग प्राप्त होतो. परंतु हें पुराणरूप श्रुतिमातेचें तात्पर्य न जाणून शैव व वैष्णव मूर्ख आपआपल्या मताचे अभिमानी होऊन शालशुनकन्यायानें परस्परद्वेष करितात. शालशुनकन्याय म्हणजे जसा कोणी एक कौतुकी मनुष्य आपल्या घरच्या कुत्र्याला साळ्याचें नांव ठेवून त्या साळ्याच्या नांवानें त्या कुत्र्याला आपल्या बायकोच्या समोर शिव्या देऊं लागला असतां त्याची स्त्री अशी समजली कीं, हा माझ्या भावाला शिव्या देतो, व त्यामुळें ती त्याचा द्वेष करूं लागली व दोघामध्यें कलह सुरू झाला. त्याप्रमाणेंच पुराणांचें खरें तात्पर्य न जाणून जसे मूढ पुरुष वाद करीत असतात, तसा तूं मोह पावूं नकोस. या पुराणांत कारणब्रह्मत्वेंकरून श्रीकृष्णाचें विशेषतः अवतारचरित् असल्यामुळें त्याची स्तुति आहे. आतां, कारणब्रह्मरूप विष्णुशिवात्मक परमात्माच श्रीकृष्णरूप आहे, हें पूर्वीं तृतीयसखीप्रेषणाचेठायीं निरूपण तूं ऐकिलें आहेस. म्हणूनच त्या परमेश्वराला मायासजातीय अशा स्त्रिया आपल्या विलासांनीं वश करण्याला समर्थ झाल्या नाहींत; म्हणजे परमात्म्यालाच माया वश आहे हा भाव. मूळांत तर असें म्हटलें आहे कीं, ज्याचीं इंद्रियें देखील त्या आपल्या विलासांनीं वश करूं शकल्या नाहींत. यावरून मनरूपसत्यसंकल्पापर्यंत किंवा चैतन्यापर्यंत त्यांची धांव जात नाहीं, हें सांगणेंच नको. तातही म्हणतातः—

॥ ओव्या ॥

' करितां तापसांची कडसणी । कवणु जवळा ठेविजे शूळपाणी । तोही अभिमान सांडूनि पायवणी । माथां वाहे ॥ नातरी आथिलेंपणें

सरिशी । कवणी आहे लक्ष्मियेऐशी । श्रियेसारिखिया दासी । घरीं जियेतें ॥ तिया खेळतां करिती घरकुलीं । तया नामें अमरपुरें जरी ठेविलीं । तरी न होती काय बाहुलीं । इंद्रादिक तयांचीं ॥ तिया नावडोनि जेव्हां मोडती । तेव्हां महेंद्राचे रंक होती । तिया जिया झाडाकडे पाहती । ते कल्पवृक्ष ॥ ऐसिया जियेचिया जवळिका । सामर्थ्य घरींचिया पाइका । ते लक्ष्मी मुख्यनायका । न मनेची येथ ॥ मग सर्वस्वें करूनि सेवा । अभिमानू सांडोनि पांडवा । ते पाय धुवा- याचिया दैवा ॥ पात्र जाहलीं' ॥ (ज्ञाने० अ० ९ ओ० ३७२ ते ७७.)

या तातवचनप्रमाणें । लक्ष्मियेचें ऐसें होणें । तेथ इतरां कवण जाणे । जीवदारिका ॥१७॥ म्हणोनी हा परमेश्वरू । नोहे पुण्याऽपुण्य- जन्मधरू । जो दीनजनतारण अवतारू । करुणामूर्ति ॥ १८ ॥ तथापि विषयासक्त जन । आपणासमान म्हणती कृष्ण । कूपमंडुकन्यायेंकरून । परम अज्ञान मूढमती ॥ १९ ॥ अहो! दिवाभीताचिया दृष्टी । तम दिसे सूर्याचें पोटीं । कीं जन्मांधासी सृष्टी । आंधळी जैसी ॥ १२० ॥ कीं जार ऐकतां संतगोष्टी । आपणासारिखा समजे पोटीं । तेंवी जनातें जगजेठी । विषयदृष्टी मनुष्य दिसे ॥२१॥ व्यापक असोनी परिच्छिन्न। असंगी असोनी आसक्तिमान । सकळ पाहती आपणासमान । मायेनें ज्ञान अंध ज्यांचें ॥२२॥ अभ्रानें लोकांचे डोळे झाकिती । आणि सूर्यचि झाकला म्हणती । तैसे आपले दुर्गुण भगवंतीं । आरोपिती मूढ जन २३ परी सावर्ण सघन जननयन । सविता अलिप्त प्रकाशून । तेंवी दिसोनि विषयीजनांसमान । परी अलिप्त म्हणून अवतार तो ॥ १२४ ॥

॥ गद्य ॥

**शिष्यः**— तात! माझी संपूर्ण शंका निवृत्त झाली.

**श्रीगुरुः**— तथापि अवतारशरीरांचें ठिकाणीं सांगितलेलें ऐश्वर्य भक्तिदृढीकरणार्थ कारणब्रह्माशीं ऐक्यभावानें सांगतों ऐक. ज्याप्रमाणें शरीरांत असलेलें अंतःकरण शरीरांतील विष्ठामूत्रादिकांनीं अभिभूत होत नाहीं; किंवा डोळ्यांत असलेली पुत्तलिका ज्याप्रमाणें रूपादिकाला पाहूनही रूपादिकांनीं अभिभूत होत नाहीं, तद्वत् सत्तात्रयवादांत म्हटल्याप्रमाणें मायाप्रतिबिंबित किंवा सत्ताद्वयवादांत म्हटल्याप्रमाणें

प्रतिबिंबापेक्षिक आरोपितबिंबत्वावच्छिन्न असा हा परमात्मा असूनही प्रकृतींतील सत्वादिकगुणधर्मांच्या सुखादिकार्ने अभिभव पावत नाहीं. हेंच त्याचें खरें ऐश्वर्य होय. अवतारकाळीं स्त्रियांनां वश न होणें व मूळस्थानीं ( मुळीं ) प्रकृतीला वश न होणें हे दोन्ही धर्म श्रीकृष्णांत समान असल्यामुळें तो कारणब्रह्मच आहे असें तूं समज. परंतु सत्ता-त्रयवादांत वर ज्या शंकेचें उत्तर दिलें आहे, तिचा प्रवेश उत्तराकरितां तरी होतो, व सत्ताद्वयवादांत तोही होत नाहीं, हा विशेष आहे.

॥ ओव्या ॥

कां बुद्धिमार्जी राहोनि जीव । बुद्धिधर्मीं पावे अभिभव । आणि ध्यानकालीं बुद्धींत राहे देव । परी शुद्धाशुद्धधिभावयुक्त न होय ॥२५॥ कीं साक्षी न लिंपे अनुभवें जैसा । प्रभू प्रकृतीस न लिंपे तैसा । एवं सभक्तिलक्ष्यांशज्ञानठसा । परमानंदरसा ओळखी ॥ २६ ॥ एवं परमात्मा ब्रह्म पूर्ण । त्यास विनोदें म्हणती स्त्रैण । आपुलिया मतीकरून । नेणूनि प्रमाण प्रभूचें ॥ २७ ॥ जैसी साक्षीभास्य बुद्धि अनुभवे । परी अज्ञानी म्हणती सफलवृत्तिद्वय संभवे । तैशा पत्नित्वें देहभावें । जाणोनि प्रभावें अभिभूत झाल्या ॥ २८ ॥ शेवटीं धरूनियां मौन । साक्षित्वें पाहोनि अज्ञान । साक्ष्यानंदेंदंतांऽतःकरण । प्रेमसंपन्न समर्पिलें ॥ २९ ॥ तो प्रेम ज्ञानपीयूषघुटका । हरोनि विषयविजया लटका । लावोनि शुद्धभावचुटका । बंधलयघटिका दाखवी ॥ १३० ॥ श्रीज्ञानेश्वर कृपामूर्ति । वारंवार वंदूनि प्रीतीं । पुढें अवधान द्यावें श्रोतीं । कान सर्वांगाप्रति करूनी ॥ १३१ ॥

॥ दोहा ॥

अलकावतिपतिपाउलें हृदयिं धरुनि सुकुमार ॥
नाम स्मरुनी प्रेमवशें त्यजु माया मद मार ॥ १३२ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्य-पद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे प्रियस्वपुरप्रवेशो नाम एकादशसखीप्रेषणम् ।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण १२ वें.

शौनक उवाचः-

॥ श्लोक ॥ ( अनुष्टुप् )

द्रौणिप्रेरित ब्रह्मास्त्रापासुनी रक्षिले जया ।
श्रीकृष्णें उत्तरागर्भी सूता तज्जन्म सांग तूं ॥ १ ॥
त्यागोनिया स्वराज्यातें जाहला तो विरक्त कां ।
ब्रह्मज्ञान कुठें त्याला दिधलें व्यासनंदनें ॥ २ ॥

॥ पद ॥

कमललोचना! याहो! । वारुनि मदमत्सरकोपादिक शुद्ध करा हृदया हो! ॥ ध्रु० ॥ मंगलपद सदया हो! । मधुर मनोहर भाषण करुनी न्या कलिमल विलया हो! ॥ १ ॥ वंदे गुरु सुचिदुदया हो! । अलकावतिपति जननि तात प्रभु येऊं द्या त्वरित दया हो! ॥ २ ॥३॥

॥ श्लोक ॥ ( अनुष्टुप् )

पुरोक्तयत्प्रसंगाद्यद्रौणीदंडादिविस्तरात् ।
तदेवद्वादशेऽध्यायेपरीक्षिज्जन्मवर्ण्यते ॥ ४ ॥

सूत उवाचः-

॥ गीति ॥

सूत म्हणे मुनिराया माया बाया न बाधि हरिजानां ।
वारुनि भवचिच्छाया न्याया काया परत्र तरि ज्यांनां ॥

॥ पद ॥

जगदघहरणा हरिलागीं । स्मरतां होति न भवभागी ॥ ध्रु० ॥ गिरिजावल्लभ ज्यालागीं । त्यजुनि सकलही झाला योगी ॥ १ ॥ मुनिजन कानन अनुसरले । जयाचे कारण ननु सरलें ॥ २ ॥ ध्यातां ज्ञानेश्वरचरण । आवडी व्रजपति करि भरण ॥ ३ ॥ ६ ॥

॥ गीति ॥

हा कुंतीसुत तेंवी जीवीं वित्ता न मानुनी कांहीं ।
नंदनसम जन पाळी कृष्णचरणदत्तचित्त लवलाही ॥ ७ ॥

मी राजा हा मान न मानसि कामा न देउनी थारा ।
दारादिकां न भुलुनी विसरेना पळहि त्या दिनोद्धारा ॥ ८ ॥

॥ ओवी ॥

यज्ञ तत्फळ आणि ब्राह्मण । वाजी गज दास रत्न ।
सलिल कन्या संपूर्ण । करसंपुटीं ॥ ९ ॥

॥ गीति ॥

यश गाती लोकत्रय ज्या भोगाची सुरांहि अभिलाषा ।
तें वमनासम मानी ज्येष्ठ कुंतिसुत भजोनि अविनाशा ॥ १० ॥
जठरानल तापलिया नावडती भोग पुष्पमालादी ।
तेंवी संत युधिष्ठिर हरिचरणाविण न इच्छि बालादी ॥ ११ ॥

॥ गद्य ॥

अनन्यभक्तस्ययोगक्षेमंवदतुमिच्छयाभगवान्परिक्षितमरक्षयत् । तद्यथा । गर्भगतःपरीक्षित्ब्रह्मास्त्रतेजसादह्यमानःसन्कंचित्पुरुषंददर्श ।

॥ ओवी ॥

ज्योतिष्मतिसभनुप्राप्त । जो सूक्ष्महृदयोपहित । 'छांदोग्य' ह्मणे जो डोळियां दिसत । तो अंगुष्ठमात्रस्थित परमात्मा ॥ १ ॥

॥ गद्य ॥

**अत्र श्रुतिः**— यएषोऽक्षिणिपुरुषोदृश्यतएषआत्मेतिहोवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेति तद्यद्यप्यस्मिन्सर्पिर्वोदकंवासिंचतिवर्त्मनीएवगच्छति ।

(छांदोग्य-४-१५-१)

**शिष्यः**— भगवन् ! ह्या श्रुतींत सांगितलेला डोळ्यांतील पुरुष जीव, छाया, किंवा देवता असू शकेल. तो परमात्माच आहे, हें कशावरून ?

**श्रीगुरुरुवाचः**— शृणु वत्स ! अरे, ह्या श्रुतींत कंठरवानें सांगितलेले अमृतत्वादिक गुण जरी अन्यत्र संभवतात, तरी ते शद्वाच्या गौणीवृत्तीनें संभवत असून, मुख्य वृत्तीनें ते गुण परमेश्वराचें ठिकाणींच संभवतात. ह्मणून, तो परमात्माच नेत्रांत दिसणारा पुरुष आहे. तोच हृदयांत सात्विकप्रकाशयुक्त अंगुष्ठप्रमाण असा आहे.

---

१ सदोदारा (पाठांतर)

॥ श्लोक ॥

'करारविंदेनपदारविंदंमुखारविंदेविनिवेशयंतम् ।
वटस्यपत्रस्यपुटेशयानंबालंमुकुंदंमनसास्मरामि' ॥ १ ॥
(श्रीकृष्णकर्णामृत).

ह्या स्मृतीवरून तो अनध्यस्तविवर्त असून, चैतन्यरूप उपासक-प्रीत्यनुसार चतुर्भुजाद्याकारवान् आहे. तो आतां पूर्वपुण्यगोचर भक्त्य-नुसार येथें चतुर्भुजाद्याकारानें पाहिला.

॥ ओव्या ॥

जायते अस्ति वर्धते । विपरिणमते अपक्षीयते । विनश्यति, हे षड्विकार जयातें । नसती कांहीं ॥ १३ ॥ हे विकार पांचभौतिक शरीरीं। परमात्मा अनध्यस्तविवर्त स्वाकारानुपसंहारी । यालागीं निर्विकारी । सगुणही असुनी ॥ १४ ॥ घनःश्याम वर्ण कांती गोमटी । विद्युत्प्रभासम वस्त्र कटीं । चतुर्भुज श्रीजगजेठी । चामीकरकिरीटी परमात्मा ॥ १५ ॥

॥ श्लोक ॥ (वसंततिलका.)

आरक्त लोचन गदाधर दिव्यमूर्ति ।
ज्याची अखंड वदनीं श्रुति गाति कीर्ती ।
तो व्यापुनी सकलदिक् फिरवी गदा ते ।
कौमोदकी करित जी सुजनांऽगदा ते ॥ १६ ॥

॥ ओव्या ॥

ज्या अस्त्रतेजें होता जळत । तें अस्त्रतेज समस्त । गदाप्रहारें झालें लुप्त । अकस्मात तेधवां ॥ १७ ॥ ऐसें पाहोनि हा कवण । म्हणोनि गर्भीच करी चिंतन । सुंदर सावळें सगुण । अहो! हा कवण डोळिया-पुढें ? ॥ १८ ॥

॥ गद्य ॥

**शिष्य उवाचः**— तात! श्रीमद्भागवताच्याठायीं ऐसें निरूपण केलें आहे कीं, जन्मसमयीं जीवाला अनेक जन्माचें ज्ञान होतें; आणि ते वेळीं तो परमात्म्याची स्तुति करितो. ही जर सामान्य जीवांची स्थिति आहे, तर मग जो पुण्यवान् उत्तरागर्भ, त्याच्या जन्मसमयीं परमात्मा प्राप्त होऊनही, हा कवण अशा संशयाप्रत तो किमर्थ धारण करिता झाला ?

**श्रीगुरुरुवाचः**– श्रवण कर. जन्मसमयीं जीवाला जें अनंत जन्मांचें ज्ञान होतें, तें योगबलानें होत नसून, स्वाभाविक प्रगट झालेल्या सत्वामुळें होत असतें. तसेंच या सत्वानें मरणसमयीं गमनमार्गदर्शन होतें, हें 'बृहदारण्यकीं' बोलिलें आहे. तेव्हां बुद्धिसत्व अभिव्यक्त होऊन, परमात्मा जगत्कारण कोणी तरी सर्वज्ञ आहे, या प्रकारचें अनुमान मात्र होत असतें. जसें--वामनानें ह्मटलें आहे कीं:–

॥ श्लोक ॥

'नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी ।
हरी जो तापातें उचलुनि कृपासिंधुलहरी ॥
हरी वाटे काळा करिस विपती मृत्युभुजगा ।
जगाचा जो आहे धनि कवण तो पाव मज गा '॥ १ ॥

( वामन पंडित.)

याप्रमाणें गर्भामध्यें अनुमानिक ज्ञान सामान्य निर्गुणात्मक होतें. परंतु हा परमात्मा साकार पाहिल्यामुळें, हा कवण अशा प्रकारचा उत्तरागर्भ वितर्क करिता झाला.

॥ ओव्या ॥

एवं वाक्यद्वयसमन्वय । बुद्धयनुसार बोलिला होय । येथील न्यून पूर्ण ठाय । जाणे बापमाय परमात्मा ॥ १९ ॥ 'प्रमेयपरिच्छेदें । प्रमाणत्व नांदे । तें कायी स्वतःसिद्धे । वस्तुच्याठायीं' ॥ (अमृतानुभव प्रकरण ५ ओवी १७ ).

॥ गद्य ॥

एवं तातवचनावरून ज्याला कोणतेंच प्रमाण जाणण्याला समर्थ नाहीं, कारण तीं प्रमाणें त्याच्याच प्रकाशानें प्रकाशित आहेत; किंवा प्रत्यक्ष पाकसदनीं पाहिलेला जो वन्ही, त्या व्याप्तीवरून मला पर्वतावरील वन्हीचें अनुमान होतें. एवमादिप्रमाणें जीव प्रकाशानें प्रकाशित असून, तो अहंकारही साक्षिप्रकाशानें प्रकाशित आहे. ह्मणून त्याचें ठिकाणीं कोणत्याच प्रमाणांचा प्रवेश नाहीं. अशा प्रकारचा तो परमात्मा अनध्यस्तविवर्त असा, अज्ञाचा उपसंहार करून त्या दशममासप्राप्त गर्भासमोर पाहतां पाहतांच अंतर्हित झाला.

॥ ओवी ॥

तदनंतर शुभग्रहानुकूलता । सकल सुयोग असतां ।
पांडुवंश वाढविता । पंडुसम तत्वतां जन्मला बाळ ॥ २० ॥

॥ गद्य ॥

तदाप्रीतमनाराजाधौम्यकृपादिभिःएवंमंगलंवाचयित्वातस्यजातकंकारयामास । सुवर्णगांमहींग्रामान्हस्तिनोऽश्वान्स्वन्नंचब्राह्मणेभ्योददौ ।

॥ अभंग ॥

केशव माधव गोविंद गोपाळ । नामें हा मंगळ पंडुवंश ॥ १ ॥ विष्णु भगवान गरुडवाहन । कल्याणनिधान नारायणू ॥ २ ॥ मंगलमंगल कमललोचन । कामनामोचन कामतात ॥ ३ ॥ रामकृष्णहरी मंगळस्वरूप । गुरु माय बाप ज्ञानेश्वर ॥ ४ ॥ २१ ॥

॥ पद ॥

शिव देवो शिव सकळाला । त्राता जो भवीं विकळांला ॥ ध्रु० ॥ कृत मथन दनुजबल काला । श्रित मदाकिनि अलकाला ॥ १ ॥ तव करुणाकर शशिभाला । स्पर्शो गिरिशा! शिशुभाला ॥ २ ॥ करि शमवुनि त्रिगुणउबाळा । सुखि अलकावतिपतिबाला ॥ ३ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

एवं कल्याणगीतें वदुनि निजमनीं तुष्ट होवोनि दानीं ।
सिद्ध ब्रह्मर्षि राया विनययुत अशा बोलती योग्य वाणी ।
दैवें त्वद्वंश जातां सुत यशुमतिजें दत्त ऐसें गणावें ।
यालागीं यास येथोनिच सकल जनीं विष्णुराता ह्मणावें ॥२३॥

॥ वसंततिलका ॥

होईल हा जगतिं थोर यशोनिविष्ट ।
या मानितील नरपाल सदा वरिष्ट ।
आणीक दास हरिचा गुरुमाउलीचा ।
होईल हा निजबळें शमिता कलीचा ॥ २४ ॥

॥ ओव्या ॥

युधिष्ठिर ह्मणे हो विप्रवर्या । आमुचिया वंशींची पूर्वचर्या । सकल राजर्षि धैर्यौदार्या । साधुवादकार्या दक्ष होते ॥ २५ ॥ तैसा होईल कीं हा बाळ । हें सांगा होवोनि कृपाळ । हा एकुलता ह्मणोनी उतावेळ । पुसावयाची मजलागीं ॥ २६ ॥

॥ कटाव ॥

तैं द्विजवर म्हणती राया! । ऐके गुण निजपौत्राचे ॥ ध्रु० ॥ इक्ष्वाकूसम प्रजापालनीं । विप्र भक्त आणि सत्य लालनीं । दाशरथी रामासम मानी । शिबिनरपतिसम शरण्य दानी । भरतासम निजयश-विस्तरणीं । युगुलार्जुनसमान धनुधरणीं । दु:सह जेंवि वन्हि वा तरणी । नदिपतिसम अति दुर्घट तरणीं । विक्रमिं केवळ केसरि जेंवी । सेवनिं योग्य हिमालय जेंवी । क्षमा यास कुंभिनिची जैसी । सहनशीलता जननीऐसी । समदर्शी हा विधिसम राया । शिवसम शक्त प्रसाद कराया । आश्रय सकलां भूतां द्याया । होइल सम हा लक्ष्मिवरा या । कृष्णसमानाचि सद्गुणिं महिम । रंतिदेवसम उदार परम । ययातिसम आचरेल धर्म । धैर्यधारणा बलिसम कर्म । कृष्णभजन शिकवाया नेटें । कयाधुनंदनसमान वाटे । वृद्धसेवनीं अति मन याचें । करिल तीन वाजिमेध साचे । हा राजर्षीस जन्मदाता । कुमार्गगामीशासन-कर्ता । करुनि कलिप्रमुखकुजनरोधा । गंगातटिं शुकमुखगत बोधा । पावुनि मिळल सुसुख चिदनंता । यास्तव सोड सकळ भय चिंता । चाल। उकलुनियां पल्लव आह्मीं । वदलों नृपविधिसूत्राचे ॥ तैं द्विजवर ह्मणती राया । ऐके गुण निजपौत्राचे ॥ २७ ॥

॥ ओवी ॥

एवं परिसूनि भूसुरवाणी । युधिष्ठिर आनंदला मनीं ।
उचित पूजा विप्र पावोनी । सुखें निजसदनीं पातले ॥ २८ ॥

॥ गद्य ॥

नन्वयंकृष्णभक्तोभविष्यतीतियद्ब्राह्मणैःप्रोक्तंतत्किंज्योतिषानुसारेणाहो-स्विद्योगानुसारेण । द्वयोरपिभाविष्यानुसारिणीबुद्धिःस्वीक्रियते । तथात्वे प्रयत्नोपदेशनाशापत्तिरितिचेन्न । 'बहूनांजन्मनामंतेज्ञानवान्मांप्रपद्यतइति प्रियोक्तेः । इयंयोजना । नहिसत्प्रवृत्तिरपिप्रयत्नेनहंतव्येतिविधिरस्माकम् । अतःपूर्वकर्मानुसारेण बुद्धिनिबंधनंभवतीचेन्नतत्प्ररोधयेदितिब्राह्मणभविष्य-वचनार्थः । अन्यथातुप्ररोधयेदितिनिष्कर्षः । अत्रानुमानमपि । इतरेजीवा-गर्भेपरमेश्वरंस्तुत्वाबहिरागमनानंतरंतंविस्मरंति । अयंतुगर्भेरक्षितारंपरमे-श्वरंपरीक्षन्ननुध्यायत्यतोभविष्यत्ययंनिश्चयेनकृष्णप्रियः । अनुध्यानमेवम् ।

॥ पद ॥

कोठें तो आहे ? ॥ध्रु०॥ जो या जगता व्यापुनि असतो । हरि अंतर्बाहे ॥ १ ॥ निर्गुण निगमीं परि सगुणचि मी । जननिउदरिं पाहे ॥२॥ येथिल नरजनभूतकठिणपण । ज्याचि तनु न साहे ॥ ३ ॥ श्रवण नयन मन पवन उगे परि । जिवाचि उरलाहे ॥ ४ ॥ अलकावतिपति जननी कळवी । हृदयिं जसा राहे ॥ ५ ॥

॥ ओव्या ॥

युधिष्ठिरादिकीं कृतपालन । बाळ वाढे शुक्लोडुपसमान । जातिद्रोहपापनाशाकारण । अश्वमेधकरण धर्मे इच्छी ॥ ३० ॥ परी दंडें वा करग्रहणें पुढतीं । द्रव्य घेतां वाढेल रजःसंपत्ती । पीडा देवोनी दुजियांप्रती । युक्त न वाटे यज्ञ करणें ॥ ३१ ॥ ऐसे युधिष्ठिराचे मनोरथ । जाणोनियां जगन्नाथ । उत्तर दिशेस पाठवीत । युधिष्ठिरातिरिक्त पांडवा ॥ ३२ ॥ मरुतरायाचें त्यक्त धन । तें सकळही आणोन । श्रीकृष्णातें बोलावोन । धर्मे यज्ञें करून पूजिलें ॥ ३३ ॥ तेथचि राहोनि कांहीं दिवस । आज्ञा घेवोनि हृषीकेश । हृदि स्थित वाढवीत प्रेमोल्हास । निजपुरास पावले हरी ॥ ३४ ॥

॥ दोहा ॥

श्रीज्ञानेश्वरमाउलीचरण मनोहर सार ।
पुढत पुढतिं अति वंदुनी तुच्छ करूं संसार ॥ ३५ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे परीक्षिज्जन्माद्युत्कर्षो नाम द्वादशसखीप्रेषणम् ।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण १३ वें.

॥ पद ॥

मानसा! मंगल गोविंदनाम ॥ ध्रु० ॥ साठि घड्यांतुनि घडि तरि ध्यावें। सोडुनि संसृतिकाम ॥१॥ अंतीं राहिल जेथिल तेथचि। बांधव धन सुत ग्राम ॥ २ ॥ अलकावतिपतिवचनें मिळवी। रामीं आत्माराम ॥ ३ ॥ १ ॥

॥ पद ॥ [ राग-भूप. ताल-झंपा. ]

जय भगवती सकलदनुजगददलनी ॥ ध्रु० ॥ अंब जगदंब करुणाघने तारके। तुहिनतनुनंदिनी शंभुरमणी ॥१॥ त्रिपुरसुंदरी शिवे विश्वसंमोहिनी। मदनदतितीर्षुणां पूर्णतरणी ।२। ज्ञानदेवात्मजा याचते मेऽच्युमे। नंदनंदनकरे देहि जननी ॥ ३ ॥ २ ॥

सूत उवाचः— ॥ श्लोक ॥

विदुरस्तीर्थयात्रायांमैत्रेयादात्मनोगतिम् ॥
ज्ञात्वाऽगाद्धास्तिनपुरं तयाऽवाप्तविवित्सितः ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

सूत ह्मणे मुनिवर्या। विदुरें प्रश्न करोनि मैत्रेया। भगवति भक्ति प्राप्त झालिया। पुसणें लवलाह्या सोडिलें ॥ ४ ॥ तंववरीच प्रश्नोत्तर। जंव हृदयीं न बैसे शार्ङ्गधर। प्रमाणयुक्तिदृष्टांतबिढार। अवघें तोंवर जाणिजे ॥ ५ ॥ अगा! अन्न आणि भूक। पाशीं असलियाही देख। मग तृप्ति होईल कीं नाहीं हा निःशंक। प्रश्न करी कवण ऐसा ? ॥ ६ तेंवी जवळी असतां सद्गुरुराय। आंगीं साधनचतुष्टय। आणि हृदयीं यादवराय। मग काज काय प्रश्नाचें ॥ ७ ॥ तांदूळ आणिले कोठून। ऐसे भुकेला न करी प्रश्न। पात्रीं वाढितां योग्य अन्न। करी भोजन आवडी ॥ ८ ॥ तैसें सृष्टी झाली कवणेरीती। हे प्रश्न न सुचती मुमुक्षुप्रती। गुरुमुखें महावाक्यगती। जाणोनि हरिभक्ती भगवंत होय ॥९ एवं विदुरें करोनि प्रश्न। हृदयीं धरोनि नारायण। मग श्रीगुरुचरणीं प्रेम ठेवून। पुसणें संपूर्ण सोडिलें ॥ १० ॥

॥ गद्य ॥

ततस्तंविदुरमागतंदृष्ट्वाबंधुभिःसहधर्मोधृतराष्ट्रोयुयुत्सुःसंजयःकृपःपृथा गांधारीद्रौपदीसुभद्रादयश्चहर्षेणसम्मुखंजग्मुः । ततआलिंगनादिभिरभि-संगम्यप्रेम्णाश्रूणिमुमुचुः । ततोधर्मआसनेउपविष्टंभुक्तवंतंविदुरंपूजयित्वा प्राह ।

॥ ओव्या ॥

युधिष्ठिर ह्मणे ताता । आम्हां निजपक्षछायाऽऽश्रिता । प्रभो! करुणावशें स्मरतां । कल्याण चिंतिता सर्वदा ॥ ११ ॥ दीनांचें करावया कल्याण । सृष्टीवरी समर्थ कवण? । आपणाऐसे साधुजन । वाटते संपन्न मजलागीं ॥ १२ ॥ देव दीनांचें कल्याण करिती । ऐसें ह्मणतां नये चित्तीं । देवचि दीनता आणविती । फळें देती दुष्कृतांचीं ॥ १३ ॥ देव दुर्जनांचा द्वेष करिती । तैसी नोहे साधूंची गती । ते दुर्जनांते उपे-क्षिती । इच्छा चित्तीं काहिं तरी तरो हा ॥ १४ ॥ साधू द्वेषितील जरी दुर्जनां । तरी कल्प कल्प नव्हे सुधारणा । परी ही वृत्ती सज्जनां । स्पर्शेचि न कधीं ॥ १५ ॥

॥ श्लोक ॥

' देवानामेवचरितंदुःखायचसुखायच ।
सुखायैवहिसाधूनांत्वादृशामच्युतात्मनाम् ' ॥ १ ॥

[ भागवत. ]

॥ गीति ॥

अल्प अनुग्रह करिती देव परी केलिया सदा यजन ।
नमितां एकचि वेळीं दीनां तारिति दयार्द्र साधुजन ॥ १६ ॥

॥ ओव्या ॥

नातरी सर्वस्वीं कल्याणकर्ता । ह्मणिजे पिता किंवा माता । तरी हें हीं न घडे सर्वथा । साक्षी तत्वतां मदनुभव ॥ १७ ॥ जवळीं नसतां शेषशायी । आह्मी सांपडलों लाक्षागृहीं । आपण आधींच व्यवस्था करोनि पाही । मातेसहित लवलाही सोडविलें ॥ १८ ॥ आह्मांसाठीं आपणालागुनी । धृतराष्ट्रें दिधलें होतें काढुनी । परी तो सकलापमान साहुनी । रक्षिलें निर्वाणीं महाराजा! ॥ १९ ॥ विषादिक नाना अप-घात । सुचवूनि चुकविले समस्त । आपण एक नसतां येथ । तरी

असतों स्वर्गात सकळ एऱ्हां ॥ २० ॥ अहो! सज्जनांचा स्वभावचि ऐसा । दीनोद्धरणीं वैष्णवीठसा । आपपरदृष्टिवळसा । नये सहसा निजमनीं ॥ २१ ॥ वरी आपुलिया छायेतळीं । आह्मीं जाहलों अतुर्बळी यालागीं कृपात्वें कृपा आगळी । आह्मां सरळी सांपडली ॥ २२ ॥ इतुका वेळ आह्मां सोडुनी । गेला होतास तीर्थाटणीं । तरी जें जें आश्चर्य देखिलें नयनीं । कृपा करोनी वद सर्व ॥ २३ ॥ तीर्थी करोनि स्नान दान । फळ मिळविलें बहु जन्मेंकरून । तो हृदयीं नारायण । असलिया तीर्थप्रयोजन नसे ॥ २४ ॥

॥ संमतिश्लोक ॥

' स्नातंतेनसमस्ततीर्थसलिलेदत्ताऽपिसर्वाऽवनी ।
यज्ञानांचकृतंसहस्रमखिलादेवाश्चसंपूजिता: ।
संसाराश्चसमुधृता:स्वपितरस्त्रैलोक्यपूज्योऽप्यसौ ।
यस्यब्रह्मविचारणेक्षणमपिस्थैर्यंमन:प्राप्नुयात् ' ॥ १ ॥

॥ ओवी ॥

निश्चयें सिद्धासि कहीं । साधनांची अपेक्षा नाहीं ॥
परी तीर्थाटणीं जावोनि लवलाही । पवित्र करिती तीर्थातें ॥ २५ ॥

तीर्थीकुर्वंति तीर्थानि सुकर्मीकुर्वंति कर्माणि सच्छास्त्रीकुर्वंति शास्त्राणि ॥
[ नारदभक्तिसूत्र. ]

॥ ओव्या ॥

मग जे कां निखिल साधुजन । तीर्था जावया काज कवण । परी होतसे सज्जनांचें दर्शन । केणें भगवान खेळत ॥ २६ ॥ व्यष्टिहृदयीं प्रादेशमात्रमूर्ती । तोचि झालिया सत्संगती । समष्टिहृदयीं त्रैलोक्यकीर्ती । घनश्याम मूर्ती पुढें ठाके ॥२७॥ अथवा ब्रह्म जें एक कळलें । आणि जीवन्मुक्तपणें प्रारब्ध उरलें । तेंही शद्बें ब्रह्म केलें । जें मिळणें जाहले सत्समुदायीं ॥ २८ ॥ आपुलिया प्रारब्धभोगेंकरून । जरी उद्धरतील मुमुक्षुजन । तरी उगेंचि धरोनि मौन । सेवूनि सदन कां राहावें? ॥ २९ ॥ लोकांची तीर्थी श्रद्धाऽत्यंत । मार्ग न मिळे ह्मणोनि

तेथ । मुमुक्षूही येती बहुत । ते उद्धरती संतउपदेशें ॥ ३० ॥ यालागीं आपणा ऐसे सुजन । नित्य करिती तीर्थाटण । जो सर्वदा परोक्ष भगवान । तो तीर्थी अपरोक्ष तुह्मी जातां ॥ ३१ ॥

'संतीं वसविला गांवो । तोचि पुण्य पवित्र ठावो' ।

असें एका प्राचीन संताचें वचन आहे.

॥ ओव्या ॥

तैसें आणखी एक आहे पुसणें । जें तुम्हांस अवश्य ज्ञात असणें । जयाचिया प्रेमपाल्हाणें । होत पाळणें विश्वाचें ॥ ३२ ॥ तो जगन्मोहन यदुपती । द्वारकाधीश कृपामूर्ती । आपुलिया हृदयीं वस्ती । व्यक्ताऽव्यक्तस्थिति करी ॥ ३३ ॥ यालागीं द्वारकेंत तो श्रीहरी । नांदताहे कवणेपरी । संवेष्टित यादववीरीं । देखिला काय सांगा हो ॥ ३४ एवं युधिष्ठिराचे प्रश्न । विदुरें समग्र ऐकोन । उत्तरें दिधलीं क्रमेंकरोन । अंत्य प्रश्न गाळोनी ॥ ३५ ॥ सकळांचें प्रिय करावया समग्र । कांहीं दिवस राहिले विदुर । धृतराष्ट्रायाप्रति साचार । शुद्धोपदेश करितची ॥ ३६ ॥

॥ गद्य ॥

**शिष्यः**— ननु ' शूद्रयोनावहंजातोनातोऽन्यद्वक्तुमुत्सहे ' (महाभारत उद्योगपर्व.) येथें विदुरानें उपदेश करण्याचा अधिकार नाहीं ह्मणून कबूल केलें असून प्रस्तुत उपदेश केला; या दोन्ही वाक्यांचा परस्पर विरोध आहे.

**श्रीगुरुः**— ऐक. तुझ्या ह्मणण्याप्रमाणेंच 'वर्णानांब्राह्मणोगुरुः' 'अंत्यादपिपरंधर्मं' या दोन स्मृतींचाही विरोध येतो. परंतु ह्याचा समन्वय असा आहे कीं, ज्याप्रमाणें अत्यंत तृषाक्रांत झालेल्या पुरुषाला नादेय किंवा वापेय या जलाविषयीं पूर्तकृतिवाक्य निषेध करूं शकत नाहीं, तद्वत् अत्यंत तीव्र मुमुक्षूला देहाभिमानीबोधक वर्णाश्रमविषयक वाक्य निषेध करूं शकत नाहीं. आतां, विदुराच्या दोन वाक्यांत जो तूं विरोध दाखविलास, त्याचा वास्तविक परिहार तर असा आहे, जोंपर्यंत वास्तविक मुमुक्षा उत्पन्न होत नाहीं, तोंपर्यंत जवळच्या मनुष्यांनीं

केलेला बोध केव्हांही पटत नाहीं. त्यांत मी तर जाणूनबुजून ह्यांच्याहून लहान असून शूद्रयोनींत उत्पन्न झालों आहे, आणि हाही धर्मवेत्ता असून पुत्रमोहानें ग्रस्त झाला आहे; ह्मणून या वेळीं हा माझें वाक्य ऐकणार नाहीं. बरें, ह्याला नाहीं सांगत ह्मटलें तर पांडवांपेक्षां ह्याचा माझ्ें ठिकाणीं प्रेम कमी आहे, असें वाटेल. ह्मणून धर्मशास्त्रानुसारेंच आतां उत्तर देणें भाग आहे. अशा अभिप्रायानें प्रथम वाक्य विदुरानें उच्चारिलें; व नंतर सनत्कुमारांचें ध्यान करून त्यांच्याकडून त्याला बोध करविला. परंतु आतांची धृतराष्ट्राची स्थिती तशी नाहीं. सर्व पुत्र मृत्युमुखीं पडून, ज्यांच्यावर आपण विष व अग्नीसारखे भयंकर प्रयोग केले, त्यांच्याच हातून आपल्याला तुकडा खावा लागतो; व भीम वरच्यावर कुत्सित शब्दांनीं टोचीत असतो; यामुळें संसारांत जें दुःख असतें, त्याचा त्याला अनुभव आला आहे; व त्यामुळेंच आतां मला कोणी तरी ज्ञानोपदेशकर्ता मिळावा, ही मुमुक्षाही तीव्र होणें साहजीक आहे. ह्मणूनच विदुरांनीं उपदेश केला. अतः, पूर्वोत्तरवाक्यांचा विरोध नाहीं. शिवाय, विदुर हा भगवान यमधर्मच होता. तो मांडव्य ऋषीच्या शापानें शूद्रयोनींत उत्पन्न झाला असतां, पापी लोकांना दंड देण्याचें काम अर्यमानामक पितर करीत होता. ह्मणून त्या महापुरुष विदुराचें चित्त वर्णाश्रमादिसंस्कारनिमित्तक अल्पभावनाभिभूत नव्हतें. याही दृष्टीनें त्याला उपदेशकाधिकार आहे.

**शिष्यः**— तात! मला आतां शंका राहिली नाहीं. परंतु धृतराष्ट्राला उपदेश कसा केला, तो ऐकण्याकरितां श्रवण उत्सुक आहेत. आपल्या कृपामृताचें प्राशन करीत होतसातां तृप्ती मानणाराही मी अभाग्यवान समजतों. कारण, 'आसुप्तेरामृतेःकालंनयेद्वेदांतचिंतया' या श्रुतीवरून सर्वदा वेदांतश्रवण विहित आहे; आणि 'श्रवणंगुरुशास्त्राभ्याम्' या वार्तिकावरून अर्थातच गुरुसमागमही विहित आहे. हे दोन्ही सोडून देऊन एक वेळ वेदांत श्रवण करून ब्रह्मज्ञानानें तृप्ति मानली असतां रसास्वाद विघ्न उत्पन्न होते. कारण, एकवेळ झालेल्या ब्रह्मज्ञानानें जी तृप्ति होते, तें ब्रह्मज्ञानच पुनः नको, ह्मणजे ब्रह्मानंदाचेंच ठिकाणीं अलंबुद्धि झाली म्हणावयाची. वारंवार विषयसुख ग्रहण करूनही तेंच तें विषयी पुरुष

पुनः ग्रहण करीत असतात. तद्वत् ब्रह्मानंदाचें ठिकाणीं नवी नवी रुचि घेणें, हेंच जीवन्मुक्तीचें रहस्य आहे. अन्यथा, विषयानंदापेक्षांही ब्रह्मानंद नीच होऊं लागेल. तात ह्मणतात:-

॥ ओवी ॥

'पढियंते सदा तेंचि । परी भोगीं नवी रुची ।
ह्मणोनि हा उचितुचि । अनुवादु सिद्ध ॥ १ ॥'

(अमृतानुभव प्र० १० ओ० १०)

**आचार्य उवाच:-**

पुढें काळ बहु अनिष्ट । विदुर जाणोनिया स्पष्ट ।
एके समयीं प्रबोधगोष्ट । उचित वचनें बोलतू ॥ ३७ ॥

॥ पद ॥

विदुर ह्मणे कुरुराया । आलें भय हें नयनीं दिसे । अझुनि कां जडलें तुज भवपिसें? ॥ ध्रु० ॥ गेले तव नंदन दशदश जे तरुणपणीं कनकसे । अझुनिया उमजे ना हें कसें? ॥ आठवुनी तव विगुण भीम तुज वाटे तें वदतसे । खासि तूं देति अन्न ते तसें ॥ यत्न करुनि यन्नि-राकरण नच होये कवण्या मिषें । अझुनि कां जडलें तुज भवपिसें । विदुर ह्मणे० ॥ १ ॥ जननि जनक बंधू ज्या काळें नेले ओढुनि किती ॥ तोचि हा नेइल आपणांप्रती ॥ एकांतीं हरिभजनावांचुनि न चुके याची गती । केलिया सुरवरजनसंगती । ज्ञानेश्वरप्रभुवचन मनोहर मेळवि चितिसुखरसें । अझुनि कां जडलें तुज भवपिसें?॥ विदुर ह्मणे० ॥ २ ॥

॥ संमतिश्लोक ॥

'जन्मदु:खंजरादु:खंनित्यदु:खंपुन:पुन: ।
संसारसागरेदु:खंतस्माज्जागृहिजागृहि ॥ १ ॥'

॥ ओवी ॥

येच विषयीं संतवाणी । तीचि आणोनि प्रमाणीं ।
कांहीं तरी बोध मनीं । श्रोते सज्जनीं ठसों द्यावा ॥ ३९ ॥

॥ कटाव ॥

सज्जन हो! निजगुज आपुलें उमजाना। हरिलागीं भजाना ॥ ध्रु० ॥ नऊ मास गर्भांत सांपडे, मूत्रमलादिक फार सांकडे, तनुसि तोडिती जंतू कीडे, बहु श्रमानें बाहेर पडे, स्मरण मुळींचें सर्व विसरला, सोहं

कोहं रडूं लागला, दिवसा मासा वृद्धि पावला, क्षणक्षणां अपघात चुकला, धनमदगर्वें फार दाटला, अहंपणाचा पूर लोटला, पांचा विषयांमाजि वाटला, पापाचरणें मनीं काटला, भला थाटला, संसार अपार, थोर करितो कारभार, महाल मुलुख जाहागीर इजारा, कमाविसदारी, भारि पसारा, सावकारी, हत्ती घोडे सैन्य शिबीका, बा पोशाख कानि चौकडा, सुंदर वनिता प्रिया नवोढा, शहाणपणाचा गर्व गाढा, मनसोब्याचा करी निवाडा, वाडा रंगित रंगमाहाल, सोनेरि बैठका, जरी भर्जरी तमाम ऐने, काम मुलायम, फिरंगाणि बिल्लोरि फाणसें, मिनेगारि किनखापी पडदे, खणोखणीं रेशमी गालिचे, बागबगीचे, रागरंगामधिं गुंग बेटा, निसंग मोठ, अभिमानाचा चढला ताठा, जार चोरटा उन्मत्त खोटा, धर्मविषयीं फार करंटा, त्याच्या बंधुनि धरिल्या वाटा, अग्नी तस्कर करिति चपेटा, आटापीटा, राजदंड ऊर्दंड उदेले, भंड निघाले, लंडपणें प्रचंड भोगिले, परोपरीची छीथू अवघी, मारामारी, जेरबंद, कडाकड सोटे मारी, कमचा पाठीं उडती भारी, या यापरिचे जाच शरीरीं, हृदयीं मस्तकिं शीळा भारी, ओढितां जड खोडा बेडी, पायिं रोकडी प्राप्त देहुडी, तरि येईना कबूल कवडी, अधिकारी घरदार सावडी, सर्वहि नेलीं घोडीं पीडीं, उरली नाहीं एकहि कवडी, पहिली होती बिनी वांकडी, शालजोडिला शेला जोडी, देव द्विज गुरु तडी तापडी, त्यांसीं क्रोधें फार झडाडी, ईश्वर त्याची मस्ती मोडी, आतां कैची उप्पर माडी, देशधडीवर गुढी लाविली, दुष्कर्माचीं अभ्रें दाटलीं, पहा! पहा रे! डोळे उघडुनि, पुढें यातना यमलोकीच्या, नानापरिच्या जाणोनि येथेंचि कां सावध व्हाना ॥ हरिलागीं भजाना ॥ सज्जनहो! निजगुज० ॥ [ अमृतराय. ]

॥ गद्य ॥

धृतराष्ट्रः— भगवन्! आपण प्रयत्नानें सर्वच निराकरण होतें ह्मणतां, आणि ह्या काळाची कोणाकडूनच प्रतिक्रिया होत नाहीं असें ह्मणतां, हें काय?

विदुरः— राजा! ज्यांचे विषय संपूर्ण नाहींसे झाले आहेत, जे ब्रह्मज्ञानी असून रस किंवा योग ह्याच्या योगानें ज्यांनीं हरगौरीसृष्टींतील

नूतन देह उत्पन्न करून घेतला आहे, त्यांच्या काळाचें प्रयत्नानें हरण होतें, असें कदाचित् मी ह्मणेन; परंतु तुझ्यासारख्या ' वर बुकी व खालीं ग्रास ' अशा परिस्थितींत पुत्रासाठीं झळफळत असणाऱ्या विषयांधाचा-ही काळ हरण होईल, असें मात्र मी ह्मणत नाहीं. पुनः, रसादिकप्रयो-गानें हरगौरीसृष्टींतील मिळालेला देहही येथील प्रारब्ध क्षीण झाल्यानें क्षीण झालाच पाहिजे. अन्यथा, एक हरगौरीसृष्टींतील मिळालेला देह नित्य, आणि ब्रह्म नित्य, अशी द्वैतापत्ती होईल. आतां, सर्वच ब्रह्म आहे अशी शंका करशील तर ग्रहणत्यागादिक क्रियाही ब्रह्मच असल्या-मुळें त्यागक्रिया प्रतिकूल आणि ग्रहणक्रिया अनुकूल असें मानणें तुला ब्रह्मनिष्ठाच्या दृष्टीनें शोभत नाहीं. पुनः, प्रारब्ध ज्याप्रमाणें मनुष्य आपल्या व्यष्टिकर्मानें तयार करितो, तद्वत् काळ हा व्यष्टिस्थितीनें तयार झालेला नव्हे, तर तो समष्ट्याविर्भावासह भगवन्नियतिरूपच झाला असल्यामुळें व्यष्टिप्रयत्नानें त्याचें हनन होणें दुस्तर आहे. म्हणून ब्रह्मज्ञानही व्यष्टि प्रयत्नानें होणें नाहीं, असें मात्र ह्मणूं नको. कारण, व्यष्टि समष्टि हे दोन्ही भ्रमरूप असून आपल्या व्यावहारिक किंवा प्रातिभासिक सत्तेतच ते निग्रहानुग्रह करण्याला समर्थ आहेत. परंतु चैतन्य हें व्यष्टिसमष्टींचें समान अधिष्ठान असून, रज्जुसर्पपुच्छाचें ठिकाणीं जरी रज्जुज्ञान झालें तरी जशी सर्व सर्पाची विनिवृत्ति होते, तद्वत् व्यष्ट्यधिष्ठान-ज्ञानानेंच ससमष्टिप्रपंचविनिवृत्ति होते. येवढ्याकरितांच संसाराकरितां प्रयत्न करणें दुस्तर असून, परमार्थाकरितां प्रयत्न करणें सुलभ अस-ल्यामुळें तूं वैराग्य धारण कर.

॥ ओव्या ॥

तरि झडझडोनि वहिला निघ । इये भक्तीचिये वाटे लाग । जिया पावसी अव्यंग । निजधाम हरीचें[1] ॥ असो, परमार्थी विरक्ती नाहीं तुज । परी संसारींही न दिसे लाज । श्वानवृत्ति धरोनि काज । पोटाचें पाहसी ॥ ४० ॥

१ टीपः—ही ओवी ज्ञानेश्वर महाराजांची असून, संदर्भाकरितां 'हरीचे' हा शद्व घातला आहे.

॥ ओव्या ॥

अरे! जिया पांडवाप्रती । लाक्षागृहीं घातलें निश्चिती । विषाचे लड्डू भीमाप्रती । करूनी दीधलें ॥ ४१ ॥ धर्म द्यूतांत हरतां जाण । त्वांही पुसिलें काय जिंकिलें ह्मणोन । त्यांचेंचि आवडी भक्षितां अन्न । न लाजे मन कांहीं तुझें ॥ ४२ ॥ ज्ञानें अथवा वैराग्यगुणीं । लाजेनें अथवा भयेंकरोनी । आवडी भजतां शार्ङ्गपाणी । पावती निर्वाणीं निजसुख ।४३ ऐसेंही असोनि राया । तुज जरा प्राप्त जाहालिया । जीविताची आशा वाया । न सुटे अझोनिया आश्चर्य ॥ ४४ ॥ मंडुक गिळतां फणिवरें । आशा तयाचिया अंतरें । कीं मी सुटोनि जाईन कवण्याप्रकारें । स्थिति निर्धारें तैसी तुझी ॥ ४५ ॥ जो जन्मतांचि जाण । जिंकोनियां इंद्रिय-गण । हृदयीं चिंती नारायण । तो एक धन्य महीवरी ॥ ४६ ॥ पुढें आपणा गिळेल काळ । यास्तव ज्ञानार्थ उतावेळ । अहर्निशीं गुरूसाठीं तळमळ । तो एक धन्य महीवरी ॥ ४७ ॥ विषयसर्पें देतां मिठी । तडफडी सुटावयासाठीं । क्षणोक्षणीं बाहे जगजेठी । तो एक धन्य महीवरी ॥ ४७ ॥ तरुणपण गेलियापाठीं । जराग्रस्तां कैंचा जगजेठी । यालागीं आधींच सावध पोटीं । तो एक धन्य महीवरी ॥ ४९ ॥ बाळपणीं न लगतां संसार । तंव ही वासना अतिदुस्तर । मग लागलिया स्त्रीपुत्रादिसंसार । कदापि साचार सुटेना ॥ ५० ॥ ऐसा विचार करोनि मनीं । तीव्र चिंता दिवसरजनी । कोण तारेल भवांतुनी । तो त्रिभुवनीं अति धन्य ॥ ५१ ॥ अनंत जन्मीं विषयप्राप्ती । झालियाही नाहीं तृप्ती कंटाळला ह्मणे भोगू किती । तो महीवरुती अति धन्य ॥ ५२ ॥ तनू रोड झाली स्त्र्यादिपोषणें । परी यमगृहीं मज एकले जाणें । यास्तव आधींच सावध होणें । ऐसें धरी मनें तो धन्य ॥ ५३ ॥ संसार करोनी आटलें रक्त । परी दु:ख वाटोनी न घेती किंचित । यास्तव स्मरावा जगन्नाथ । ऐसा विरक्त तो धन्य ॥ ५४ ॥ मायाकल्प संसार कोटी । अवचितां झालिया संतभेटी । मानी कंचनदिनी अमृतदृष्टी । ब्रह्मांड पोटीं धन्य तो ॥ ५५ ॥ स्त्री गणिका कीं पतिव्रता । येथ श्रद्धाचि ठेविती तत्वतां । मग ईश्वरावरी श्रद्धा ठेवितां । लाज चित्ता कां वाटे? ॥ ५६ ॥ चालणार नाहीं संसार । यास्तव श्रद्धेनेंचि पाळी

निजदार । तैसा श्रद्धेनें परमेश्वर । मी पाळीन हें अंतर धन्य ॥ ५७ ॥ जंव जंव आपुलें आयुष्य वाढे । तंव तंव काळ समीप जोडे । हें जाणोनि सोडी वैभव रोकडें । तो उत्तम तो अतिधन्य ॥ ५८ ॥ अनंत जन्मीं फसविणार । ते लाथ मारोनी सारी दूर । नयनजळें न्हाणी शार्ङ्गधर । देऊनि करीं कर तो धन्य ॥ ५९ ॥ आपुलिया बुद्धि वैराग्यसंपन्न । आत्माकार वृत्ति करी होऊन । हृदयीं धरी नारायण । त्रिभुवनीं पूर्ण तो धन्य ॥ ६० ॥

॥ पद ॥

येथें कोणाचें काय बा गेलें । ज्याचें त्यानेंच अनहित केलें ॥ध्रु०॥ संतीं सांगितलें ऐकेना । स्वतां बुद्धीही असेना । वृत्ति निवरली पीकेना । मूढ कोणाचें ऐकेना । येथें कोणाचें० ॥ १ ॥ अन्य यातिचे संगतिं लागे । साधुजनांमध्यें न वागे । केल्यावीण पराक्रम सांगे । जेथें सांग तेथेंचि भीक मागे । येथें० ॥ २ ॥ नीत टाकुनि अनीत चाले । भडभड भलतेंच बोले । मंद होउनी उन्मत्त डोले । अखेर फार वाईट झालें । येथें० ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं नेम । चित्तीं न धरी अधम । सांग पडलासे भ्रम । अंतिं कुटील त्यासी यम । येथें कोणाचें० ॥ ४ ॥ ( तुकाराम महाराज. )

॥ ओव्या ॥

तूं माझा सुहृत् ह्मणोनी । मी उपदेशितों कळवळोनी । तूं नायकसी जरी कानीं । तरी उपदेश निर्वाणीं करितसों ॥ ६४ ॥ आणि मी यमचि आहे ह्मणोन । मज प्रत्यक्ष कळे दंड शासन । यालागीं तुझें कर्म गहन । भज नारायण झडकरी ॥ ६५ ॥ मी यमराज तूं गंधर्वपती । पूर्वजन्मसंबंध नसतांही निश्चिती । अवचिता तुज सुहृत्प्राप्ती । झाली यास्तव बोध ऐके ॥ ६६ ॥ गृहदार सोडोनि वीरेशा । जवळी घेवोनि हृषीकेशा । तत्काळ जाई उत्तरदिशा । ब्रह्माभिलाषा वागवुनी ॥ ६७ ॥ स्वार्थरूप ही तनू सकळ । केव्हां गिळोनि टाकील काळ । यालागीं होई उतावेळ । श्रीगोपाळ मिळवाया ॥६८॥ तो अजमीढवंशीं राजशार्दूल । प्रज्ञाचक्षूचि केवळ । दोन्ही पक्षीं पाहतां प्रबळ । सिद्धि ज्याची ॥ ६९ ॥ प्रगत

ज्ञानवयसा । पूर्वी प्रज्ञाचक्षू सहसा । तोचि प्रकृष्टज्ञानचक्षू ऐसा । विदुरोपदेशें सहसा जाहला ॥ ७० ॥ डोळे कान दाबोनि पाहणें रंग । हा चर्मचक्षूंचा सोडोनि योग । भक्ति ज्ञान आणि विराग । प्रज्ञाचक्षुयोग धरियेला ॥ ७१ ॥ मग हा माझा बंधु लहान । न वागावें याच्या उपदेशाप्रमाण । हा सर्व सांडोनि अभिमान । झाला गमन करिता तो ॥ ७२ ॥ मग ती गांधारी पतिव्रता । पति मोक्षमार्गी जातां । होवोनि संगपरित्यक्ता । बरोबरी तत्वतां निघाली ॥ ७३ ॥ यद्यपि धर्मार्थ आणि काम । स्त्रीपुरुष मिळोनि होती परम । मोक्षमार्गी तंव सुगम । आपआपला अधिकार ॥ ७४ ॥ तथापि वानप्रस्थाश्रम जोंवरी । मैथुनवर्ज्य वनितासहाधिकार तोंवरी । क्षत्रियां वानप्रस्थविधि निर्धारी । ह्मणोन गांधारी सवें गेली । ७५ । इकडे मित्रप्रिय करूनी । अग्निहोत्रादि सारोनी । ब्राह्मणांतें नमन करूनी । गुरुवंदनार्थ सदनीं धर्म आला ॥ ७६ ॥ तंव पितर विदुर धृतराष्ट्र दोन्ही । आणि गांधारी पतिव्रता जननी । न पाहोनियां आपुलिये नयनीं । खिन्न मनीं अति झाला ॥ ७७ ॥ मग अति उद्विग्न अंतर । संजयास ह्मणे नृपवर । कोठें गेले धृतराष्ट्र विदुर । कोठें गांधारी पतिव्रता ॥ ७८ ॥ तयाचे बंधू पुत्र पावले मरण । आणि अन्याय झाला कीं काय आह्मांकडून । ह्मणून तिहीं गंगेत प्राण । दीधला काय तो सांगे ॥ ७९॥ आमुचा पंडु पिता पावला मरण । तैं तिहींच केलें आमुचें रक्षण । आणि आतां आह्मां सोडोन । सांग कवण स्थान सेविलें ? ॥ ८० ॥ ते चुलते परी मी बापचि ह्मणे । नाना संकटीं रक्षिलें जेणें । तयांसचि माता पिता ह्मणणें । जन्मदातियाहूनि वरिष्ठ ते ॥ ८१ ॥ जन्मदाते करिती रक्षण । ते आपुला मोह ह्मणून । परी सज्जन जें करिती रक्षण । तें केवळ कल्याण चिंतोनी ॥ ८२ ॥ यालागीं तो विदुर महाशय । जो नाना संकटीं आह्मां रक्षक होय । तयाचे येथ न दिसती पाय । सांग लवलाहे कुत्र गतः ? ॥ ८३ ॥ जयाचे आंधळे असूनि नयन । आह्मीं मारिले शत नंदन । तो पतिव्रता मातेस घेऊन । कवण्या वनीं पैं गेला ? ॥ ८४ ॥ युधिष्ठिराचा ऐकोनि प्रश्न । संजयही

झाला अत्युद्विग्न । निजस्वामीतें न पाहून । साश्रुनयन बोलत ॥ ८५ ॥ ह्मणे महाराजा युधिष्ठिरा । मी नेणे गांधारी धृतराष्ट्र विदुरा । गमनकारणही भूमीश्वरा । कळलें नाहीं मजलागीं ॥ ८६ ॥ तेचिसमयीं नारद मुनी । जो अहेतुकदयाळू कैवल्यदानी । सवें तुंबरू घेऊनी । धर्मसदनीं पातले ॥ ८७ ॥ तेचि सकळ तपांचें फळ । तेचि अमृताची वेळ । जेव्हां सज्जन कृपाळ । पडती दृष्टीं ॥ ८८ ॥ सकळ सुखा अधिष्ठान । महापुरुषांचें चरणदर्शन । जयांचें हृदय नारायण । अर्धक्षण विसंबेना ॥ ८९ ॥ जो देवर्षिमार्जी मुकुटमणी । दीनदयाळू जेंवी जननी । तो विधिनंदन आला ऐकोनी । लागला चरणीं युधिष्ठिरू । ९० । मग देवोनि उचितासन । उभा राहिला कर जोडून । पित्रव्यार्ति मनीं धरोन । करी प्रश्न आवडी ॥ ९१ ॥ युधिष्ठिर ह्मणे भगवंता । मी नेणे कोठें गेला पिता । आणि तपस्विनी गांधारी माता । कवण्या पथा पैं गेली ? ॥ ९२ ॥ जियेचे शत पुत्र मृत । म्हणोनी अनाथ अत्यंत । तरी पाळोनि पातिव्रत्यव्रत । कवण पंथ अनुसरली ? ॥ ९३ ॥ आम्हीं अज्ञान मंदमती । कळेना दुःखपरतीरगती । वास्तव आपणांऐसे यती । पार करिती दीन जनां ॥ ९४ ॥ जयांचें दिशा हेंचि वस्त्र । अंजलीच अन्नपात्र । वासना नामें स्वतंत्र । मोक्षाचीही नसे जया ॥ ९५ ॥ ऐसे निस्पृह जे मुनी । आपणासमान कैवल्यदानी । त्या धुंडावया अवनीं । कारण मनीं तर्केना ॥ ९६ ॥ परी त्रिविधतापें पोळले जन । तयां निववावें दृष्टीकरून । याचिलागीं गमनागमन । नित्य सज्जन करिताती ॥ ९७ ॥ आमुचिया भाग्यवशें आज । दर्शन झालें महाराज । तरी दुःखपार जावया जहाज । कृपा करोनि दावावें ॥ ९९ ॥ एवं युधिष्ठिरप्रश्न ऐकोनी । बोलते झाले नारदमुनी । राया चिंता न करी मनीं । जगत् जाणोनी ईश्वरवश ॥ ९९ ॥ लोक आणि लोकपाळ । यदीक्षणें संजात सकळ । भूतसंयोगवियोग केवळ । आधीन तया प्रभूच्या ॥ १०० ॥ ॥ गद्य ॥

**शिष्यः**— भगवन् ! आपण जें सर्व जगत् ईश्वरवश म्हणून सांगतां, त्यांत प्रयत्नाची हानी होतेसें दिसतें; आणि केलेल्या कर्मांचें फळ जर परमात्मा देतो, तर तो नैर्घृण्यवैषम्यदोषादियुक्त असला पाहिजे.

**श्रीगुरुः**— बाळा ! या शंकेचें समाधान मागें मी पुष्कळ वेळां केलें आहे; तथापि तुला पुनः पुनः शंका येतात. कुतर्केंकरून ज्याची बुद्धि दूषित असते, तो कनिष्ठ अधिकारी शास्त्रांत म्हटला आहे. तथापि शंका रोधल्यानें ती शांत होत नाहीं; म्हणून समाधान श्रवण कर.

यत्न ह्मणून जो तूं स्वीकार करितोस, तो काय जड स्वीकार करितोस? कीं चैतन्यस्पंद स्वीकार करितोस? प्रथम पक्षीं ईश्वर चैतन्य असल्यामुळें तुझ्या यत्नाचा परिणाम त्यावर कांहींच चालणार नाहीं. आणि द्वितीय पक्षीं, व्यष्टिचैतन्यस्पंद म्हणजे यत्न म्हणतोस? किंवा, समष्टिचैतन्यस्पंद ह्मणजे यत्न म्हणतोस? कारण, व्यष्टिसमष्टिभेद हे चैतन्यांत नसून, चैतन्याचें ठिकाणीं उपाधिना आरोपित आहेत. तथापि अंत्यपक्ष स्वीकार करशील तर सर्व प्रयत्न त्वां ईश्वराकडेच दिला. मग तुझा प्रयत्न पृथक् न राहिल्यामुळें त्याविषयीं शोक करणें तुला युक्त नाहीं; आणि आद्य पक्ष स्वीकारला तर व्यष्टिप्रयत्नाचा समष्टिप्रयत्नावर परिणाम होत नसल्यामुळें तुझी शंका घटत नाहीं.

**शिष्यः**— तात ! मी आपणाला वादी या रीतीनें विचारीत नाहीं; किंतु अशा अडविण्यामुळें माझी जिज्ञासा शांत होत नसल्यामुळें पुनः आज्ञा मागून विचारण्याचें मी धैर्य करितों.

**श्रीगुरुः**— श्रवण कर.

'आत्मावाइदमेकएवाग्रआसीन्नान्यत्किंचनमिषत्सईक्षतलोकान्नुसृजाइति ॥ १ ॥ सइमाँल्लोकानसृजतअंभोमरीचीर्मरमापोऽदोऽम्भःपरेणदिवंद्यौः प्रतिष्ठाऽन्तरिक्षंमरीचयः । पृथिवीमरोयाअधस्तात्ताआपः ॥२॥ सईक्षतेमेनुलोकालोकपालान्नुसृजाइति' ॥ ( ऐतरेय, प्रथमखंड. )

तस्माद्वाएतस्मादात्मनआकाशःसंभूतः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यःपृथिवी । पृथिव्याओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः । सवाएषपुरुषोऽन्नरसमयः । ( तैत्तिरीय, ब्रह्मानंदवल्ली २ )

'यतोवाइमानिभूतानिजायंते । येनजातानिजीवंति । यत्प्रयंत्यभिसंविशंति । तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रह्मेति । ( तैत्तिरीय, भृगुवल्ली ३ )

'तस्माद्यज्ञात्सर्वहुतऋचःसामानिजज्ञिरे । छंदांसिजज्ञिरेतस्माद्यजुस्तस्मादजायत' ।

इत्यादि श्रुति जगत् परमेश्वरवश सांगत असून,

'विश्वानिदेवसवितर्दुरितानिपरासुव । यद्भद्रंतन्नआसुव '(यजुर्वेदसंहिता, देवसविताध्याय.)

ही श्रुति, व 'धियोयोनःप्रचोदयात्' हें वेदमातेचें तृतीयपद यावरून ईश्वर सहाय घेऊन जीवाला प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य आहे. हा परस्परविरोध प्राप्त झाला असतां, त्याचें निराकरण असें आहे कीं, लोक व लोकपाल ईश्वरेक्षणरूप असल्यामुळें आणि सृष्ट्युत्पत्ति जीवांच्या कर्मफलार्थच असल्यामुळें फलभोगकालीं संयोग आणि वियोग परमेश्वराच्याच आधीन असतो. परंतु कर्मकर्तृकालीं मात्र जीवाचा प्रयत्न चालत असतो. याविषयीं वास्तविक समाधान असें आहे कीं, ज्याप्रमाणें ईश्वरानें ही सृष्टि उत्पन्न केली आहे, त्याप्रमाणें जीवानेंही उत्पन्न केली आहे. ईक्षणापासून प्रवेशापर्यंत सृष्टि ईश्वरानें केली असून, जागृतीपासून मोक्षापर्यंत संसार जीवानें कल्पित आहे; व त्याचप्रमाणें सृष्टीवर ममताही जीवानेंच कल्पित केली आहे. जशी ईश्वरनिर्मित स्त्री एकच असून, पुत्राच्या कल्पनेनें ती माता होते, व पतीच्या कल्पनेनें ती पत्नी होते, तद्वत् ईश्वरसृष्टींत मनोमय सृष्टि जीवाची असल्यामुळें मनोमय सृष्टीला आधीन करण्यास जीवाचा अधिकार आहे. आणि वास्तविक बाह्यप्रपंचापेक्षां मनोमय प्रपंचच जीवांच्या सुखदुःखाला कारण आहे. उदाहरणः— एखादा पशु जोंपर्यंत आपल्याजवळ नसतो तोंपर्यंत त्याच्या मरणाविषयीं किंवा जिवंत राहण्याविषयीं आपल्याला कांहींच वाटत नाहीं. परंतु कांहीं कारणानें त्या पशूवर मनोमय आपलेपणा स्थापन केला म्हणजे मग त्या पशूपासून आपल्याला सुखदुःखें उत्पन्न होतात. ही मनोमय सृष्टि जशी जीवाला करितां येते, तशीच त्याला ती मोडण्याचाही अधिकार आहे. म्हणूनच आपली वासना जिंकण्याविषयीं प्रयत्नाचा जीवाला अधिकार आहे. पण हें मत सत्तात्रयवादियांचें आहे. सत्ताद्वयवादांत समाधान

याहून विशेष आहे. तें असें कीं, सर्व प्रपंच जीवकल्पितच असून, प्रातिभासिक आहे. ब्रह्माची पारमार्थिक सत्ता व प्रपंचाची प्रातिभासिक सत्ता आहे. व्यावहारिक सत्ता म्हणून कांहीं नाहीं. तथापि अधिष्ठानानुमोदनावांचून कल्पित वस्तूला सत्ता नसते, ज्याप्रमाणें रज्जूचें दीर्घत्वादिक धर्म नसतांनां सर्पाचा अध्यास आपल्या भ्रमानें होणें संभवनीय नाहीं. यद्यपि रज्जुज्ञानानें सर्पाची निवृत्ति होते, तथापि रज्जुसत्तेनें सर्पाची निवृत्ति होत नाहीं; कारण रज्जूच्या असण्यानेंच सर्पाची निवृत्ति मानली, तर जेव्हां सर्प भासतो, तेव्हांही रज्जूचें अस्तित्व आहे; परंतु तेवढ्यानें सर्पनिवृत्ति होत नाहीं; उलट रूपाला भासण्याला सहाय होतें; तद्वत् ब्रह्म सत्तामात्ररूपसामान्य असल्यामुळें सत्तामात्रज्ञानानें प्रपंचनिवृत्ति होत नाहीं, तर जशी रज्जूच्या विशेष ज्ञानानें सर्पाची निवृत्ति होते, तद्वत् वेदांतश्रवणमनननिदिध्यासनपूर्वक अन्वयव्यतिरेकांनीं विशेषचैतन्यसाक्षात्कार झाला असतां प्रपंचविनिवृत्ति होते. आतां, असा प्रपंच ब्रह्मावर भासतो म्हणून रज्जुसर्पन्यायानें जगत्सादृश्यादि दोष ब्रह्माचें ठिकाणीं प्रपंचाध्यासास्तव स्वीकारावे लागतील, अशी शंका योग्य नाहीं. कारण, कोणत्याच प्रकारानें सादृश्य नसतांही आकाशाचें ठिकाणीं जो नीलताध्यास होतो, त्यांत यद्यपि द्रष्टृभ्रमदोष आहे, तदपि आकाशसत्ता अनुमंत्री असून अवकाशादि विशेषधर्मावच्छिन्न आकाशज्ञानानें त्याची निवृत्ति होते. तद्वत् ब्रह्मसत्ता प्रपंचानुमंत्री असून, नित्य, शुद्ध, मुक्त इत्यादि विशेषस्वरूपचैतन्यज्ञानानें त्याची निवृत्ति होते. तथापि व्यसनामध्यें अतिशय गढून गेलेली वासना निघण्याला जसा कांहीं काल लागतो, तद्वत् अधिष्ठानानुमोदनपूर्वक जीवकल्पनातीव्रसंवेगजन्य कर्मफल विनिवृत्त करण्यालाही कालावश्यकता आहे; आणि ह्मणूनच फल प्राप्त होण्याच्या आधीं प्रयत्न केला असतां, फलसमयीं त्याचा परिणाम होण्याचा संभव आहे. परंतु फल प्राप्त झाल्यावर प्रयत्नारंभ केला असतां, तो भावी उत्तमपरिणामी होईल. परंतु सध्यां जो भोग मिळतो तो मिळतोच. भुक्तभोगाविनिवृत्तीविषयीं प्रयत्न करणें व्यर्थ आहे. वर्तमानभोग तर भोगून राहिलों आहोंत. येवढ्याकरितां भविष्यत्भोगविनिवृत्तीविषयींच प्रयत्न

केला पाहिजे. ह्याविषयीं 'हेयंदु:खमनागतम्' हें योगसूत्र प्रमाण आहे; आणि असा प्रयत्न करण्यांत दुसऱ्या सद्गुणांचेंही भूषण प्राप्त होतें. तें असें कीं, भुक्तदु:खांविषयीं शोक करूं नये, वर्तमानदु:खांविषयीं सहनशीलता मिळवावी, आणि अनागतदु:खनिवृत्तीविषयीं धैर्य धरून प्रयत्न करावा. असा गुणसंपन्न पुरुषच भगवदनुमोदनानें हातावर हात मारून पार जातो. ह्मणून आपणच दृढ केलेल्या व्यसनाला आपणच केव्हां तरी सोडूं, तद्वत् आपणच कल्पिलेला प्रपंच केव्हां तरी आपल्याच हातून सुटेल, असें धैर्य धरून निराश न होतां मोक्षाविषयीं सारखा प्रयत्न कर. ह्याविषयीं 'कृतप्रयत्नापेक्षस्तुविहितप्रतिषिद्धावैय्यर्थ्यादिभ्य:' (ब्रह्मसूत्र. अ. २ पाद ३ सूत्र ४२) हें ब्रह्मसूत्र प्रमाण आहे. परंतु व्यसन सुटावें या इच्छेनें व्यसनच दृढ करणें जसें युक्त नाहीं, तद्वत् सुखाच्या इच्छेनें दु:ख देणाऱ्या प्रपंचाविषयीं यत्न करणें युक्त नाहीं. भगवान ह्मणाले, युधिष्ठिरा, तुझ्या बापानें जें तुला सोडलें, तें अर्थातच तुझ्या पूर्व कर्मांच्या फलकालीं असल्यामुळें तुझ्या तीव्रसंवेगानेंच अधिष्ठानानुमोदनांत जाऊन भगवद्वशतेनें झालें आहे. म्हणून त्याविषयीं तुला आतां शोक करणें उचित नाहीं. पुढें उत्तम गति मिळण्याविषयीं तूं यत्न कर. राजा! गायी जोंपर्यंत वनांत असतात, तोंपर्यंत आपल्या इच्छेनें तृण भक्षीत असून, दामबद्ध झाल्या म्हणजे मात्र स्वामीच्या इच्छेनेंच त्यांनां वागावें लागतें. तद्वत् जीव कर्तृकालीं स्वतंत्र असला तरी फलभोगकालीं भगवदीक्षणानुसारच वागणें भाग पडतें. आतां, भोजनामध्यें जशी करक्रियेची अपेक्षा आहे, तद्वत् फलभोगकालीं प्रवृत्तीची अपेक्षा आहे. आणि फलभोग तर ईश्वरतंत्र आहे. म्हणून फलभोगाला लागणारी प्रवृत्तिही ईश्वरतंत्र आहे. यास्तव तेव्हां प्रयत्न संभवत नाहीं, असें ह्मणसील तर सत्य आहे. परंतु त्याही वेळीं फल भोगण्याविषयींच्या प्रवृत्तीला लागणारें जें अहंदेहात्मक अज्ञान, तें परमात्म्यानें दिलेलें नसून, अनादि व ज्ञाननाश्य आहे. म्हणून फलभोगकालिन् प्रवृत्तीच्या वेळींही मी ह्या प्रवृत्तिनिवृत्तीहून वेगळा आहे, अशा प्रकारच्या अज्ञाननिवर्तक ज्ञानाविषयीं प्रयत्न संभवतो. तात्पर्य, फलकालीं कां होईना? परमेश्वराकडून भोगप्रयत्नांतच प्रतिबंध होणें

शक्य आहे; मोक्षप्रयत्नांत प्रतिबंध होणें शक्य नाहीं. भोगाच्या दृष्टीनें पाहिलें तर फलकालीं बाहुल्यांचा संयोग व वियोग जसा खेळणारावर अवलंबून असतो, तद्वत् भूतांचा संयोगवियोग परमेश्वरइच्छेवर अवलंबून असतो. आतां, बाहुल्या मोडतांनां किंवा करितांनां जसा बाळांनां दोष लागत नाहीं, तद्वत् मिथ्या जीवांनां सुखदु:खांत टाकतांनां परमेश्वराला दोष लागत नाहीं. ह्मणून जीवांनां अत्यंत परतंत्र मानावें अशी शंका करणाऱ्यानें परमेश्वराला लहान लेकराच्याच कोटींत घातलें असल्यामुळें त्यांच्यांशीं बोलणेंच व्यर्थ होईल. साधारण राजाचें करणें जर निरर्थक नसते, तर परमेश्वराचें करणें निरर्थक कसें स्वीकारावें ? मग 'लोकवत्तुलीलाकैवल्यम्' ( ब्रह्मसूत्र प्रयोजनवत्त्वाधिकरण अ० २ पाद १ सूत्र ३३ ) या सूत्राचा अर्थ काय ? असें म्हणशील तर ऐक. व्यर्थ कर्म करून अलिप्त राहणें, हें बाळांचें लक्षण असून, सार्थ कर्म करून अलिप्त राहणें, हें परमेश्वराचें लक्षण आहे. कल्पक भ्रमांत अधिष्ठान अनुमंतृ असलें तरी जसें अलिप्त असतें, तद्वत् जीवकल्पित प्रपंचांत परमात्म्याचें अनुमोदन सार्थ असून समानसत्ताक नसल्यामुळें तो अलिप्त आहे.

**शिष्यः**— भगवन्! माझ्या शंका निवृत्त झाल्या. आतां पुढें युधिष्ठिराला भगवान ब्रह्मनंदन काय म्हणाले, तें आपल्या मुखांतून ऐकण्याविषयीं श्रवण उत्सुक आहेत.

**श्रीगुरुः**— याप्रमाणें युधिष्ठिराचा शोक भगवंतानें निराकरण करून पुन: दुसऱ्या दृष्टीनें युधिष्ठिराचा शोक निराकरण करावा, म्हणून किंचित् स्थूल दृष्टीचा स्वीकार करितात.

॥ ओव्या ॥

पाहतां कवण्याही दृष्टीं । तुज शोक करणें अनुचित गोष्टी । हें कैसें न जाणसी पोटीं । शास्त्र कोटी अभ्यसुनी ॥ १ ॥ जग जरी सत्य मानसी पाहीं । तरी आलें गेलें कांहींच नाहीं । जें तें आहेचि लवलाही । मग शोक कासया करावा ? ॥ २ ॥ बरें, जग जरी मानिसी मिथ्या सकळ । तरी तें झालेंचि नाहीं केवळ । मग आलिया गेलियाचा प्रबळ ।

शोक व्यर्थ कासया ? ॥ ३ ॥ अनिर्वचनीय मानतां जग । तरी हें योग्य हें अयोग्य । ऐसें म्हणणें नव्हें श्लाघ्य । यालागीं शोक करूं नको ॥ ४ ॥ यालागीं जे भगवत्पर । तयांचा योगक्षेम चालवी यदुवीर । जो गर्भीतचि असतां करुणाकर । दुग्ध निर्मी जननीस्तनीं ॥५॥ वैद्यशास्त्रीं दोष तीन । परी षड्रस निर्मी नारायण । औषधी रोगांच्या द्विगुण । हें दयालूपण हरीचें ॥ ६ ॥ याचकजनां कवण पाळिते । यालागीं निर्मिले उदार दाते । खादाड गज त्यासाठीं अनंतें । नृप जगन्नाथें निर्मिले ॥ ७ ॥ गर्भी जड मूढ होता जेव्हां । हरीवरी भरंवसा होता तेव्हां । आतां पावोनि शक्तिस्वभावा । वासुदेवा विसरला ।८।

॥ पद ॥

तूं हरि आमुचा नाथ । यदुपते ! तूं हरि० ॥ ध्रु० ॥ अक्षय पालक बहिण बंधु गुरु । गोत जननि आणि तात ॥ १ ॥ सकल समर्था सोडुनि आतां । धरुं कवणाचा हात ॥ २ ॥ दूध दिलें हरि करुणा करुनी । जेव्हां नव्हते दांत ॥ ४ ॥ आतां देशिल केंवि न कुटका । देउनि वदनीं दांत ॥ ४ ॥ ज्ञानेश्वरकन्या अंकित ज्याची । दिनरजनी त्या गात ॥ ५ ॥ १०९ ॥

॥ गद्य ॥

**शिष्यः—** हे भगवन् ! भगवंताचें ठिकाणीं अशक्तौ दुग्धनिर्मातृतेवरून जें आपण दयालुत्व सांगितलें, ती काय परमेश्वराची स्तुति केली, किंवा अनुमानप्रमाणगम्य आहे ? पहिल्या पक्षीं, वादाची आवश्यकता नाहीं. परंतु दुसरा पक्ष आपल्याला अभिप्रेत असल्यास परमेश्वराकडे नैर्घृण्य वैषम्य प्राप्त होत नाहीं काय ?

**श्रीगुरुः—** वेदांत जो उपदेश केला आहे तो परमेश्वरानें दयाळुपणानेंच केला आहे. आतां परमेश्वराचें न्यायीत्व कसें ? अशी शंका करशील तर गर्भ किंवा बाल्यकालाच्या दृष्टीनें पाहिलें असतां, आई दयाळू असून, मुलगा जशा गुणांचा पुढें निघेल, त्याप्रमाणें त्याच्याच कल्याणार्थ शिक्षा किंवा प्रेम दाखवावा लागतो. तद्वत् जीवसामान्यतापक्षीं परमात्मा दयाळू असून, जो जसें कर्म करितो, त्याचा उत्तम परिणामच व्हावा ह्मणून त्याला न्याय करावा लागतो. ज्याप्रमाणें

आई क्रूर आहे, ही गोष्ट मुलगाच आपल्या गुणानें आपल्यावर ओढून घेतो, त्याप्रमाणें परमात्मा स्वभावत: दयालू असूनही जीवच आपल्या कर्माच्या योगानें त्याचें ठिकाणीं न्यायीत्व, यमत्व वगैरे स्थापन करितो. एखादें लहान लेंकरूं विहिरीकडे जात असतांना त्याला कळत नाहीं ह्मणून कोणीही त्याला परावृत्त करितो; परंतु जाणता मनुष्य विहिरीकडे जात असतां आत्महननापराध-निवर्तक शासनान्वयें राजदूतांच्या हातून त्याला शिक्षा करावी लागते. तद्वत् गर्भकालीं सर्वस्व परमात्मा रक्षण करीत असून, जाणता झाल्यावरही प्राणी पापकर्माचेठायीं प्रवृत्त होईल, तर श्रौतशासनान्वयें यमदूतांकरवीं प्रेम आपआपसांतच ठेवून, कल्याणार्थ त्याला शिक्षा करणें भाग पडतें. दृष्टिसृष्टिवादांत हा विषय कसा स्थापित करावा, ही शंका येण्याचें कारण नाहीं. कारण, ज्याप्रमाणें कल्पितसर्पाधिष्ठान व कल्पितसर्पत्वाधिष्ठान रज्जूच असतो, तद्वत् जीवकल्पितकर्मजन्यविशेषप्रपंचाधिष्ठान व सामान्य-सकार्याध्यासाधिष्ठान ब्रह्मच असल्यामुळें सामान्य दयालुत्वादिक त्याचें ठिकाणीं जीवकृतआवश्यकारोपजन्य असून, न्यायीत्वादिक कल्पना-रोपजन्य आहेत. जसें, भ्रमाधार रज्जु आहे. आधारावांचून भ्रम घटत नाहीं. हा आवश्यकारोप असून, एकाला रज्जूचेठायीं सर्प, दुसऱ्याला जलधारा, व तिसऱ्याला दंड इत्यादि भासणें, कल्पनारोप आहे. किंतु कल्पनारोपही अत्यंत तीव्र झाला असतां, आवश्यकारोपतुल्य दृढ होतो. यद्यपि आवश्यकारोपाचें निवारण ज्ञानानें व कल्पनारोपाचें निवारण प्रारब्धभोगानें होत असून भक्तीनें त्याचा अभिभव होतो, तथापि परमेश्वराच्या दयालुत्वाविषयीं मात्र असें नाहीं; कारण तो आरोपच विद्यानिमित्तक आहे व विद्येचा आणि ज्ञानाचा विरोध नाहीं. यद्यपि प्रारब्धाचा आणि ज्ञानाचाही विरोध नाहीं, तथापि प्रारब्धाला अनुकूल ज्ञान नाहीं; आणि विद्येचें तर तें स्वरूपच आहे म्हणून मुक्त झाल्यावरही भगवंताचें दयालुत्व असतेंच. याकरितां जिज्ञासुदशेंत किंवा ज्ञानीदशेंत तूं परमेश्वरावलंबी राहून, तुझा व जे त्याचें भजन करण्याकरितां गेले, अशा विदुरादि-

कांचा तोच प्रभु मायबाप असल्यामुळें, ह्या वृद्ध अनाथांनां वनामध्यें कोण रक्षण करील, अशा प्रकारची विकळ वृत्ति तूं सोडून दे. कारण, ती अज्ञानानेंच भासत आहे. राजन्! विषमिश्रित अन्न पुढें आलें असतां, तें अन्न सोडून देण्याचा प्रयत्न करणें जसें सुलभ आहे, तद्वत् तें अन्न बलेंकरून भक्षण केलें असतां अमृत करण्याचा प्रयत्न करणें सुलभ नाहीं. तद्वत् काल, कर्म आणि त्रिगुण ह्यांचा झालेला पंचभूतात्मक देह, त्यावरून अभिमान सोडणें जसा सुलभ आहे, तसा देहाचा लोभ धरून त्याला चिरजीवी करणें सुलभ नाहीं. तात! नियमसाधनकाळ, जन्मनिमित्त कर्म आणि उपादानभूत प्रकृतीचे सत्वादिगुण, त्याच्यापासून निर्माण झालेला जड देह ईश्वरभक्तीला लागल्यावांचून रक्षण करून कोणताच उपयोग होत नाहीं. म्हणून परमार्थाचें साधन करणाऱ्या विदुरादिकांविषयीं अंगविक्लव सोडून रमारमणचरणारविंदांचें ठिकाणींच चित्त अक्षय स्थापन कर.

॥ पद ॥

माधवीं मन ठेवीं । मनुजा! माधवीं० ॥ ध्रु० ॥ मानुनियां भव विभव यथार्थचि । व्यर्थ भ्रमसि केंवी ? ॥ १ ॥ कधिं तरि जीवित नेइल रविसुत । लुब्धक मृग जेंवी ॥ २ ॥ अलकावतिवल्लभपददासा । आशा नच गोंवी ॥ ३ ॥ ११० ॥

॥ ओव्या ॥

जयातें नसती हात पाय । ऐसा तृणादिसमुदाय । जे मनुष्य पश्वादि करचरणाश्रय । तयांचें भक्ष्य होय हा ।११। एवं जीवांची उपजीविका । जीवाचिवरी नृपनायका । याचा अर्थ हा अवलोका । कीं अंत करी सर्वही ॥ ११२ ॥ 'अहस्तानित्यादि' मूळ पदाहून । मूढ काढिती अनुमान । कीं विहित केलें जीवहिंसन । परी तें मिथ्या जाण सर्वथा ॥ ११३ ॥ ईश्वरेण विहिता वृत्तिः । सर्वत्र सुलभैवेति । श्रीधरस्वामीची अवतरणोक्ती । पाहतां भ्रांती ही गळे ॥ ११४ ॥ ईश्वरें विहित केलियावीण । क्षुधेनें जाऊं नये प्राण । ह्मणोनी जें विहित अन्न । तेंचि तेंचि पूर्ण ईश्वरीं ॥ ११५ ॥ क्षुधादिवृत्तीवांचूनि आणिक । चित्तीं जे रागादिक । तद्योगें अन्न मानिती मूर्ख । तें जगन्नाय-

कविहित नोहे ॥ ११६ ॥ क्षुधादिवृत्तीचियासाठीं । पुरे गोधूमादि-धान्यकोटी । परी निषिद्धराग कटकटी । मूर्ख पोटीं मांस भरिती ॥ ११७ ॥ अहो ? ययांचें ऐसें मत । कीं मनुष्यभक्ष्य पशु भगवद्विहित । तरी मनुष्यही व्याघ्रभक्ष्य हरिविहित । मग स्वरक्षण व्यर्थ कां कीजे ? ॥ ११८ ॥

॥ अभंग ॥

'वाघें उपदेशिला कोल्हा । सुखें खाऊं देरे मला ॥ १ ॥ देह जाणार जाणार । परी घडो परोपकार ॥ २ ॥ सिंह ह्मणे भला भला । तुझ्याच तोंडीं निवाडा झाला ॥ ३ ॥ गांठ पडली ठका ठका । त्याचें वर्म बोले तुका' ॥ ४ ॥ ( तुकाराम महाराज. )

॥ ओव्या ॥

ऐसीच मूढ जनांची स्थिती । पूर्वापर ग्रंथ न पाहती । आसु निवृत्तिरिष्टेत्यादि' मूलोक्ती । हिंसावृत्तिनिषेधक ॥ १९ ॥ प्रवृत्ति अनुराग-मात्र आहे । ह्मणोनी तें कथन विधि नोहे । निवृत्ति कर्तव्यताशेष होय । यालागीं तियें विधित्व ॥ २० ॥ आणि गुणत्रयेंकरून । अन्नाचे भाग होती तीन । सत्वगुणें निफजे मन । शुक्र जाण रजोगुणें ॥ २१ ॥ तमोगुणें होय मांस । तेंवी जलाचेही भाग विशेष । सत्वगुणें पुष्टि प्राणास । रजोगुणें रक्तपुष्टी ॥ २२ ॥ तमोगुणें मूत्रोत्पत्ती । म्हणोनी मांस तामस निश्चिती । 'आमेध्यं तदन्नं तामसप्रियमिति' । जाग्रच्छ्रुति बोलिली ॥ २३ ॥ एवं मांस परिणाम तमाचा । तो भक्षिलिया मग तयाचा । निकृष्टतम साचा । परिणाम होय ॥ २४ ॥ म्हणोनी मांस-भक्षणें कहीं । मानसपुष्टी सर्वथा नाहीं । सर्वानुसंधान जडे देहीं । मनःसोयी विसरोनी ॥ २५ ॥ दृढ देहाचें अनुसंधान । मनःशक्तीचें अभिभवन । यालागीं पावलिया मरण । करिती गमन स्थावरादियोनी ।२६। रजोगुणें अन्नरजभाग मांस होय । एवं कोठें जरी पद समुदाय । तथापि तोही इष्ट न होय । सत्वाविण ॥ २७ ॥ एवं रजस्तमवृत्ति । हिंसा विहित न करी श्रीपती । जो सकलकल्याणकरुणामूर्ति । अक्षय कीर्ती जयाची ॥ २८ ॥ आणि तृणधान्यादि भक्षण । तेंही क्षुन्निवृत्ति-कारण । तेथही अनुराग सोडोन । केवळ हरिभजनार्थ प्राण वाचवावा

॥ २९ ॥ 'अतोऽहस्तानि'त्यादि पदें । नाहीं योजिलीं हिंसानुरोधें । तयांचा अभिप्राय हाचि बोधें । कीं, सर्वविनोदें काळग्रस्त ॥ १३० ॥ अहो! ब्रह्मक्षेत्र ओदन । ऐसी श्रुति आहे ह्मणोन । काय मनुष्यीं मनुष्यभक्षण । स्वीकारावी ? ॥ ३१ ॥ श्रुत्यभिप्राय ऐसा । कीं सर्वलयकारण जगन्निवासा । येथही मूलाभिप्राय तैसा। श्रुत्यन्वयें सहसा ग्रहण कीजे ॥३२॥ 'अत्ता चराचरग्रहणादिति'। सूत्रें परमेश्वराप्रती । लयत्वकारणत्वसंमती । उपादान विवक्षया ।३३। तेंवी 'जीवो जीवस्य जीवनं' या पदावरून । सर्वचि जीवकल्पित ह्मणोन । उपादानविवक्षया लयकारण । जीवचि दृष्टिसृष्टिवादें ॥ ३४ ॥ अथवा प्रतिबिंबापेक्षीबिंबत्वावच्छिन्न । बिंबरूप ब्रह्म जीवाधिष्ठान । तोचि आरोपें लयकारण । हें बोधिती पूर्ण लयपदें ॥ ३५ ॥

॥ पद ॥

यदुनंदन ह्मणा । वदनीं । यदुनंदन० ॥ ध्रु० ॥ नेणति शिव कमलासन तो व्रजीं । यशुमतिसुत चिमणा ॥१॥ मंजुळ वेणु खांकित, सुजनां । दाखवी आत्मखुणा ॥ २ ॥ अलकावति पतिनंदिनिरमण- । चरणनख चिंति मना ॥ ३ ॥ १३६ ॥

॥ पद ॥

भाजिये श्रीभगवंत ॥ ध्रु० ॥ जिनकि प्रभा जगरूप भई है । सत्यज्ञानमनंत ॥ १ ॥ जाननहारे पगलपटानें । अविकल श्रुति मुनि संत ॥ २ ॥ अलकावतिपतिनंदिनिप्रियकर । व्यापि रहे बहिरंत ॥ ३ ॥ ३७

॥ अभंग ॥

सकल मोहासी कारण हा भेद । विस्तार अगाध अविद्येचा ॥ १ ॥ यास्तव निगमवचनें अव्यंग । जग राधारंग देखावें कीं ॥ २ ॥ जें जें दृष्टि विश्व तें तें गोपीनाथ । टळती अनर्थ तेव्हां सारे ॥३॥ आळंदींचा राणा होतां कृपावंत । निर्भय हा पंथ होय तेव्हां ॥ ४ ॥ ३८ ॥

॥ पद ॥ ( फटक्याचे चालीवर. )

अंतरिं हरि परि समजायाला भावें सद्गुरुचरण धरी । ह्मणुनि राम निष्काम भवांबुधिमाजिं चालवी नाव तरी ॥ ध्रु० ॥ भाव धरुनि त्यज राव विनवणी हाव सोडुनी विषयांची । दृश्यजात अज्ञात सत्य नच

यास्तव रोधी मति साची । जाया माया जाया काया शेवटिं होइ न कोणाची । गाइं मुखीं गोविंद सोडुनी अंधवृत्ति तनुजधनाची । न करुनि भवनदिसलिलीं मज्जन सज्जन पाही नयनभरी । ह्मणुनि० ॥ १ ॥ अझुनि कसें उमजेना तुजला अंगीं जडले रिपु नाना । पैसे तोंवरि ह्मणती ऐसे बाबा काका आणि नाना । यमदंडाला नेणुनि धुंडिसि मिळवाया अवनीं माना । देह अमर मानुनी कापिसी कुटुंबभरणा जनमाना । पाप करुनि अनुताप नच कसा झाला तुजला आजवरी । म्हणूनि० ॥ २ ॥ निगमगदित निजधर्माचरुनी आधिं करावें शुद्ध मना । चित्तवृत्ति दाबाया करणें शंकरकेशवउपासना । वाणि नाममय करुनि पवनमय मिळवुनि साधी सगुणपणा । संतवचन ऐकसील ना तरि काळभुजग मारील फणा । दीनविनवणी ऐकुनि बापा ज्ञानेश्वर प्रभु घे पदरीं ॥ ह्मणूनि० ॥ ३ ॥ ३९ ॥

॥ पद ॥

दृश्य दिसे तें राम । मनुजा! दृश्य० ॥ ध्रु० ॥ भोक्ता भोग्य न भेद मिळे परी । माया वाढवि काम ॥ १ ॥ अस्ति भाति प्रिय त्रय एकपणीं । जाणुनि त्यज रुप नाम ॥ २ ॥ अलकावतिपतिनंदिनिपति-पदीं । घे अक्षय विश्रीम ॥ ३ ॥ १४० ॥

॥ ओव्या ॥

मग मुनि ह्मणे ऐक राया । नानात्व भासे हरीची माया । ब्रह्मादि-कां नये आया । बंधन वायां वाढवी ॥ ४१ ॥ सच्चिदानंद नारायण । आपणपें तो नव्हे भिन्न । परी भोक्तृभोग्यचिन्ह । भासे ते जाण अवि-द्या ॥ ४२ ॥ जैसें शुक्तिकेवरी रजत । निरखोनि पाहतां न दिसे तेथ । तैसें दृस्यनाकलनीय समस्त । विश्वजात ओळखें ॥ ४३ ॥ येचविषयीं उपपत्ती । अधिष्ठूनी निजानुभूती । तुज सांगेन यथामती । असों दे पुढतीं अवधान ॥ ४४ ॥ ‘ सत् तेंचि चिद् । चिद तेंचि आनंद । वस्तु नोहे त्रिविध । एकपद निजानंदें’ ॥ (स्वात्मानुभव एकनाथ.) ‘ सत्ता प्रकाश सुख । या तिहीं तिहीं उणें लेख । जेंवी विषपणेंचि विख । विखा नाहीं ’ । ‘मवाळ कां उजाळ । कीं उजाळ तेंचि मवाळ । कीं दोन्ही ना परिमळ । मात्र जें ॥ ऐसें एके कापुरपणीं । तिन्ही इयें तिहीं

उणीं । इयेपरी आटणी । सत्तादिकांची ॥ एऱ्हवीं सच्चिदानंदभेदें । घालिलीं तिन्हीं पदें । परी तिन्हीं उणी आनंदें । केली येणें ॥ सत्ताचि कीं सुख प्रकाशु । प्रकाशुचि सत्ता उल्हासू । हें न निवडे मिठांशू । अमृतीं जेंवी ॥ (अमृता० प्र० ५ ओ० १ व ४ ते ७.) ऐसीं मदीय-जननीवचनें । जीं ब्रह्मानंदगंधसुमनें । युक्त्या अभिप्राय येणें । पिकले आथी ॥ ४५ ॥ अहो आनंद आणि चेतन । सत्तेहून मानतां भिन्न । तरी तो अयथार्थ ह्मणोन । अग्राह्य कीं ॥ ४६ ॥ तैसें चैतन्य आणि सत्ता । आनंदाहून जरी अन्यथा । तरी तया दु:खरूपता । अग्राह्यता वास्तव ॥ ४७ ॥ वास्तव सत्ता आणि आनंद । जरी पावती चिद्भेद । तरी जडता होईल सिद्ध । अग्राह्य अशुद्ध वास्तव ॥ ४८ ॥ एवं सच्चि-दानंद तिन्ही । एकरूप ही तातवाणी । आतां अनुभवा आणी । वृत्ती ऐसी ॥ ४९ ॥ प्रथम अंश स्पष्ट ज्ञान । मग पूर्णपणीं संयोजन । शद्ब तंव समाश्रयण । शद्बार्थभेदा ॥ १५० ॥ भोग्यामाजीं उमटे सत्ता । चिद्विशिष्ठ भासे भोक्ता । सच्चिदानंदैकसमता । साक्षी सर्वथा भासत ॥ ५१ ॥ तथापि सत्ता कळे । ऐसा जो अर्थ उजळे । ती सत्ता अज्ञात कळे । कीं ज्ञानरूपें? ॥ ५२ ॥ अज्ञान-रूपें कळेल सत्ता । तरी कळणें नि:शेष होईल वृथा । कळणें एक सत्य होतां । तरी अज्ञातत्व वृथा पैं होय ॥ ५३ ॥ अहो! मिथ्या मानितां कळतेपण । तरी मग सत्य होईल अज्ञान । आणि सत्य आहे अज्ञान । हें मिथ्या ज्ञान जाणें केंवी? ॥ ५४ ॥ मिथ्या ज्ञान जाणे सत्य अज्ञान। येथ युक्ति वा अनुभव काय प्रमाण? । आतां सत्यज्ञान जाणे अज्ञान । हेंही भाषण व्यर्थेची ॥ ५५ ॥ बाधक वस्तुवरी तत्वतां । अवलंबुनी बाध्य सत्ता । तरी विरोध झाला वृथा । पूर्वपक्षसिद्धांता एकपण ॥ ५६ ॥ म्हणाल अद्वैतीं विरोध नाहीं । तरी अज्ञानशद्बार्थ वदिजे कायी? । शद्बा अर्थी लवलाही । भेद नाहीं ज्ञानपणें ॥ ५७ ॥ शब्द श्रवणवृत्तिगोचर । अर्थ मनोवृत्तिगोचर । साक्षीभास्य प्रकार । दोन्ही-ठायीं ॥ ५८ ॥ शिकोनियांही वेदांत । उगेंचि आश्रयिती द्वैत । भगव-त्प्रेम सांडोनि यथार्थ । हेंचि आश्चर्य वाटतें ॥ ५९ ॥ आतां दीपक भासक भास्य घटू । तैसा साक्षीभास्य जगत्पटू । हे सत्तात्रिविधवाक्पटु

बोलतातां ॥ १६० ॥ तरी हा विषम दृष्टांत । कारण पूर्ण सिद्धांतानुस्यूत । जो असे सिद्धांतांशानुस्यूत । त्यास दृष्टांत ह्मणताती ॥ ६१ ॥ यद्यपि दृष्टांत आशंकनीय । तथापि पाहिजे दृष्टांत जातीय । जातिच्छेदें सहज होय । व्यक्तिशून्य ॥ ६२ ॥ दीपयोगें घट भासे । येथ दीप आणि घटज्ञान उमसे । ज्ञानाविरोधी अज्ञान कैसें ? । यास्तव जें भासे तें ज्ञान ॥ ६३ ॥ एवं भोग्यामाजीं सत्ता । तेथही उमटली आहे चित्ता । ह्मणोनि चैतन्यविशिष्ट भोक्ता । तोचि पैं भोग्य ॥ ६४ ॥ आतां परमप्रेमास्पद भोक्ता । आनंदाविरोधी भोग्य सर्वथा । मग साक्षित्वें भोग्य भोक्ता । सच्चिदानंदैकता न पवती कां? ॥ ६५ ॥ तथापि जैसा अंधकार। औष्ण्यविरोधी नव्हे साचार । तरी प्रकाश पडतां निर्धार । नाशोनि जाय ॥ ६६ ॥ तैसें अनादि भावरूप अज्ञान । तेंवी भेद चैतन्यविरोधी पूर्ण । तथापि सत्ताविरोधी नाहीं ह्मणोन । मिथ्यावगमन होत असे ॥ ६७ ॥ मग अपेक्षुनी अज्ञानवृत्ती । व्यतिरेकबाधाभावविशिष्ट सत् म्हणती । वृत्तिविशिष्ट चैतन्य गणती । आणि प्रीत्यादिवृत्त्यवच्छिन्न आनंदू ॥ ६८ । एवं सिद्धदृष्टीं अज्ञान नाहीं । साधक पुसेल जरी कांहीं । तरी ही रीति लवलाही । उपयोगी तयां ॥ ६९॥ इया प्रक्रियया निदिध्यासन । 'निदिध्यासनप्रकाशीं' पहावें पूर्ण । मग आनंदें वारूनि तीनपण । सुखान्वयें भजन करावें ॥ १७० ॥ एवं अद्वैत भगवद्भक्ति । इजपुढें तुच्छ वाटे मुक्ति । जे प्रतीत नाहीं बंधनोचिति । ह्मणोनियां ॥ ७१ ॥ आतां अनुभवाचेनि योगें । चैतन्य उमजे अवघें । परी तरंगानुकूल तरंगें । भेद भासे । ७२ अहो ! सागराचें पाणी । स्थूलदृष्टीं घन स्वस्थानीं । परी तरंगप्रत्यय होतांचि क्षणीं । तरंगसंधींत गगन उमटे ॥ ७३ ॥ एऱ्हवीं पाणी आणि तरंगांत । स्थूलदृष्टींचि भेद भासत । तैसेंचि उमटे येथ । विश्व विख्यात स्थूलदृष्टीं ॥ ७४ ॥ अहो ! ज्ञानाचे जे तरंग । त्याचेंचि नांव वृत्तिभाग । ज्ञानामाजीं पाहतां चांग । भेद नुमटे सर्वथा ॥ ७५ ॥ परी ज्ञानतरंग उठतां वृत्ती । वृत्तिसंधींत आकाशप्रतीती । 'तस्माद्वा एतस्मादात्मनआकाशःसंभूतः' ही श्रुति । हेंचि बोधी ॥ ७६ ॥ तरंगावरी दृष्टि जाय । तैं तरंगसंधींत आकाश होय । तैसी वृत्तीवरी दृष्टि जाय । तैं वृत्तिसंधींत होय गगन ॥ ७७ ॥ वृत्तिसंधि ब्रह्म केवळ ।

परी तेंचि भासे गगन प्रबळ । आणि वृत्तीचे जे तरंग सबळ । वायू तो ॥ ७८ ॥ एवं शिष्यास्थित अज्ञानेंकरून । संधिगत ब्रह्म तेंचि गगन । आणि वृत्तिरूप गगन तोचि पवन । वृत्तिकल्लोळ अनल तो ॥ ७९ ॥ मग वृत्तिकल्लोळाचेनि योगें । वृत्त्याघातप्रवाहसंगें । तया नांव बोलिजे सवेगें । आप ऐसें ॥ १८० ॥ तया वृत्तीचें तीव्रपण । वृत्ति जेथ संधिगत विसरे गगन । तेंचि गा पृथ्वीलक्षण । निश्चयें जाण कुरुराया ॥ ८१ ॥ अहो! ब्रह्म जेव्हां विसरलें । ह्मणोनि संधीचें आकाश झालें । आणि आकाश जेव्हां विसरलें । तेव्हां तीव्रपणें होऊं लागलें पवनभान ॥ ८२ ॥ पवनामाजीं सुलभ संधी । तेथही जाहलिया विस्मृत्यवधी । पृथ्वीपर्यंत प्रसिद्धी । विस्मृतीची ॥ ८३ ॥ एवं वृत्तीवरी दृष्टि जातां । तरी उपजों लागे विश्वसत्ता । आतां ज्ञान जाहलियावरी तत्वतां । जरी वृत्ति भक्तिपंथा जाउं लागे ॥ ८४ ॥ तरी चैतन्याचेनि दाटपणें । योग्य नाहीं वृत्ति स्तंभणें । परी वृत्ति उठतां प्रमाणें । उठेल गगन कां ह्मणीं? ॥ ८५ ॥ यालागीं वृत्ति ब्रह्म जरी । परंतु गगनप्रतीति होईल तरी । वृत्ति व्यापितां विश्वभरी । ह्मणीं गगनप्रतीति होय ॥ ८६ ॥ ते गगनप्रतीति न होआवी म्हणून । वृत्ति उठतांही झालिया ज्ञान । तरी वृत्तीनें न द्यावें अवकाशपण । राहावें होऊन एकवट ॥ ८७ ॥ याचिलागीं ब्रह्मानंद । संध्यवकाश न देतां प्रसिद्ध । वृत्तिरूपें जे व्यक्ति सिद्ध । अवतार विषद या नांव ॥ ८८ ॥ तरंगाचे तुह्मिन करितां । तरी संधींत न भासेल अवकाशता । तैसें ज्ञानानंतर वृत्ति एकवटतां । तरी ब्रह्माची गगनता होईलना ॥ ८९ ॥ तैसें वृत्तितरंगाचें घन । भगवच्छरीर करितां जाण । ज्ञानानंतर ब्रह्म गगन । न भासे कदा ॥ १९० ॥ जरी नाहीं गगनप्रतीति । तरी कैसी होईल सृष्ट्युत्पत्ती । यास्तव भक्तिवांचोनि विदेहमुक्ति । न होय निश्चितो ज्ञानप्राप्ती ॥ ९१ । एवं ज्ञानानंतर देशप्रतीति । न व्हावी ह्मणून पाहिजे भक्ति । तैसी ज्ञानानंतर कालप्रतीति । न व्हावी यास्तव भक्ति इष्ट ॥ ९२ ॥ ब्रह्मरूप झालिया ज्ञान । तेव्हां ब्रह्मरूपचि अंतःकरण । मग एक वृत्ति उठोन । दुसरी वृत्ति उठावी ॥ ९३ ॥ एका वृत्तीचा लय होवावा । ह्मणजे तेवढा ब्रह्मांश लया जावा । दुसरा वृत्तिभाव यावा । तेव्हां

उदया यावा ब्रह्मांशू ॥ ९४ ॥ अखंडैकरसचेतनीं । अंशकल्पना लाजिरवाणी । आणि वृत्ति तंव उठलियावांचोनी । न राहे हा अनुभवो ॥ ९५ ॥ वृत्ति उठों न देतां । तरी वृत्तिरोधनश्रम तत्वतां । वृत्तिरोधश्रम करितां । तरी न येईल मुक्तता आत्मप्रीति ॥ ९६ ॥ श्रम आणि प्रेम । हे दोन्ही विरुद्ध परम । ज्ञानानंतर वृत्तिरोधश्रम । तरी कुंठित आत्मप्रेम होईल कीं ॥ ९७ ॥ एवं ज्ञानानंतर वृत्ति रोधितां । तरी आत्मप्रेमोल्हाससंकोचता । आणि ज्ञानानंतर वृत्ति न रोधितां। तरी ब्रह्मांशुउत्पत्तिलयता उगी भासे ॥ ९८ ॥ एक वृत्तिरूप ब्रह्मांश हारपावा । दुसरा वृत्तिरूप ब्रह्मांश निघावा । ऐसा प्रत्यय आघवा । सांपडे करीं ॥ ९९ ॥ एवं दोहीं पक्षीं निग्रहण । त्यास उपाय एकचि जाण । वृत्ति करितां सगुणमय घन । तें लया सगुण न जाय प्रेमें ॥ २०० ॥ येणें ब्रह्मांश लया जाणे । या कालप्रत्यया निःशेष खाणें । आणि सगुण प्रेमचि म्हणोनी न संकोचणें । आत्मप्रेमा कदापि ॥ १ ॥ मूळामाजीं 'अद्य' पद । तयाचा अर्थ नित्य वर्तमानबोध । आणि जें कां असे 'भगवान्' पद । तें आत्मप्रेम न संकोची ॥ २ ॥ म्हणोनी अखंड राहावें सगुण । हेंचि ज्ञानानंतर कालप्रत्ययखंडन । आतां कालद्वेष न व्हावा म्हणून । तोचि भगवान काळरूप ॥ ३ ॥ 'सः' याचें मूळ तत्पद । तें अपरोक्षचि प्रसिद्ध । यालागीं 'अयं' पद । ठेविलें असे ॥ ४ ॥ तत्पद अपरोक्ष परम प्रीति । तोचि या भूमीवरी अवतरला निश्चिती । येथ अपरोक्ष हृदयवृंथी । बोधिली आहे ॥ ५ ॥ 'अस्याम्' येणें पदेंकरून । अपरोक्ष हृदयभूमिबोधन । 'सोऽयं' या पदेंकरून । बोधिली तत्पदअपरोक्षता ॥ ६ ॥ अहो! व्यष्टिहृदय तनुसंस्थिती । समष्टिहृदय द्वारावती । व्यष्टिहृदयीं जी प्रेमवृत्ति । ती कृष्ण व्यक्ति समष्टिहृदयीं ॥ ७ ॥ यालागीं हे माझी वाणी । रूपक न म्हणावी सज्जनीं । सन्निवेशें दिसे नयनीं । चक्रपाणी अविनाशू ॥ ८ ॥ आत्मयाच्या विरुद्ध कहीं । विषमसत्ता उपजली नाहीं । हाचि अभव लवलाही । सुरद्रूपांचा ॥ ९ ॥ जें सुरद्विषां नाहीं भव । यालागीं ऐसा अनुभव । आत्मप्रेम झालिया सावेव । मग जो हा भव तो अभवची ॥ २१० ॥ कालरूप भगवान । म्हणावया हेंचि कारण । कीं नित्य

काळापुढें जाण । तत्वाश्व भव नित्य नुमटे ॥ ११ ॥ अहो! व्यष्टि-सद्वृत्तिविरोधी कामक्रोध । समष्टिसद्विरोधी दैत्य प्रसिद्ध । जे तीव्र जाहले कामक्रोध । तेंचि शरीर असुरांचें ॥ १२ ॥ दृष्टिसृष्टिवादें-करून । मन तेंचि शरीर जाण । यालागीं कामक्रोधाचें तीव्रपण । असुर आपण जाहले ॥ १३ ॥ आणि व्यष्टिसद्वृत्तीची तीव्रता । तोचि देव-समुदाय तत्वतां । आणि व्यष्टिहृदयीं प्रेमात्मसत्ता । तीचि तीव्रता कृष्णतनु ॥ १४ ॥ या तीव्रआत्मप्रेमहरिलनुपुढें । तीव्रकामादि-असुर बापडे । नाश पावताती फुडें । तद्रुपचि होउनी ॥ १५ ॥ काम-क्रोधादिक पूर्ण । धर्मानुकूल होतां जाण । तरी तेचि करोनि देती ज्ञान । मुक्तेश्वरवचन येविषयीं ॥ १६ ॥ ' काम असावा ईश्वरभजनीं । क्रोध असावा इंद्रियदमनीं । ' ऐसी मुक्तेश्वरभारतवाणी । आणि ऐसेंचि चक्रपाणीही बोलिले ॥ १७ ॥ ' धर्माविरुद्धोभूतेषुकामोऽस्मिभरतर्षभ ' ( भ० गी० अ० ७ श्लो० ११ ) धर्माविरुद्ध जो काम । तो मी स्वयें पुरुषोत्तम । तोचि मी विष्णु परम । बोलिजे ऐसा ॥ १८ ॥ धर्मा-विरुद्ध जो काम निश्चिती । तेणेंचि चाले जगत्स्थिति । धर्माविरुद्ध जी क्रोधस्थिती । तो काळरूपें भगवंत मी ॥ १९ ॥ यास्तव धर्माविरुद्ध ज्यांची प्रीति । ते देवरूपें मजमाजीं मिळती । तीव्रक्रोधदैत्य जरी धर्म-वश होती । तरी ते मिळती काळरूपीं माझ्या ॥ २२० ॥ एवं देवां असुरां दोहीं मुक्ती । जयाचिया शुद्धभक्ती । ब्रह्मनंदन म्हणे कुरुपती । तीचि ही मूर्ति अविनाश ॥ २१ ॥ एवं तीव्रसद्वृत्तिकार्य सारिलें । तीव्राऽसद्वृत्ति संहारिलें । आतां अविशेष राहिलें प्रेमवर्धन ॥ २२ ॥ येथ कित्येकांचें मत । कीं देवकार्या अवतार होत । तयांसी पुसणें निश्चित । एक असें ॥ २३ ॥ कीं देवकार्या अवतारधारण । तरी तें देवांच्या पुण्येंकरून । आणि असुरांच्या पापेंकरून । असुरसंहारण सहज होय ॥ २४ ॥ परी येथ एक दोष । देवांच्या पुण्यें अवतार विशेष । तरी अवताराचें प्रारब्ध निःशेष । देवपुण्य जाहलें ॥ २५ ॥ तें देवकार्य संपादितां । तरी देवपुण्य संपेल तत्वतां । मग निवटोनि जाईल अवतार-सत्ता । प्रारब्ध क्षीण म्हणोनिया ॥ २६ ॥ श्रीकृष्ण तंव दिसे अर्जुनी । यालागीं तो नव्हे कार्यदानी । स्वयें अवतरला प्रेमवर्धनीं । निश्चयेंकरोनी

ओळखे ॥ २७ ॥ देवासी तंव नाहीं कर्म । विरोधाभास अलंकारें परम । लावावयाचे असले धर्माऽधर्म । तरी भक्तप्रेमचि कर्म देवांचें ॥ २८ ॥ आणि भक्तप्रेमीं प्रसिद्ध । आत्मप्रीतीचा अविरोध । आत्मप्रीति नित्य शुद्ध । यालागीं नित्य प्रेमप्रारब्ध देवांचें ॥ २९ ॥ असो एवं कवणिये रीती । प्रेमवर्धक श्रीकृष्णमूर्ति । व्यष्टिसमष्टिहृदयीं निश्चिती । तुम्ही कुरुपति हो ! अवलोका ॥ २३० ॥ 'भवेद्यावदिहेश्वर' इति । मूळांतील चतुर्थपदोक्ति । तयाचा अर्थ निश्चिती । ऐसा आहे ॥ ३१ ॥ 'ईश्वर' या वचनेंकरून । बोलिलें आहे नित्यपण । 'इह' या वचनेंकरून । अपरोक्ष समष्टिहृदयस्थान बोधिलें ॥ ३२ ॥ 'भू' धातु सत्ताबोधक । यालागीं 'भवेत्' हें सत्तार्थक । हृदयीं नित्य ईश्वर निश्चित । तैसा नित्य पाहे समष्टिहृदयीं ॥३३॥ नित्य प्रेम व्यष्टिहृदयीं । नित्य कृष्ण समष्टिहृदयीं । यालागीं अवतारहनन नाहीं । निजधामगमन पाही हृदयद्योतक ॥ ३४ ॥ 'यावत्' हा तंव अलंकारू । नित्यानुरागें भजावा ईश्वरू । एवं ब्रह्मनंदनोद्गारू । सप्रेमप्रणवाकारू उमटला ॥ ३५ ॥ कर्ममय प्रणव ॐकार । भक्तिमय प्रणव साधूद्गार । यालागीं कृष्ण गोविंद हे उद्गार । सप्रेमप्रणव बोलिजे ॥ २३६ ॥

॥ दिंडी ॥

बंधुसहित धृतराष्ट्र कुरूराया । सवें गांधारी घेउनिया जाया ।
हीमवंताच्या दक्षिणेस पाहे । सन्मुनींच्या आश्रमीं सुखें राहे ॥ ३७ ॥

॥ ओवी ॥

'शुचित्वें शुचि गंगा होय' । ऐसें बोलिले आलंदीराय ।
ती सप्तप्रवाहें जेथ होय । सप्तऋषींच्या प्रीतिसाठीं ॥ ३८ ॥

॥ पद ॥

जय जय मंदाकिनि जननी । माते ! जय जय ॥ ध्रु० ॥ मलिन मंदमति जलकण पिउनी । पडति न जनिमरणीं ॥ १ ॥ जडजलसम भाससि परि सेविती । चेतन सुजन मुनी ॥ २ ॥ शूद्र जनक परि हरिपदपावन । माय ! तुझेनि गुणीं ॥ ४ ॥ श्री ज्ञानेश्वरचरणामृत महीं । उदित दुरितशमनीं ॥ ४ ॥ ॥ ३९ ॥

॥ ओव्या ॥

तया सप्तश्रोततीर्थीं । राया ! तुझे आप्त वसती । आतां तयांची

योगगती । ऐक निश्चिती सांगेन ॥ ४० ॥ अहो ! ज्ञानानंतरही चांग । भक्तिमिश्राष्टांगयोग । प्रारब्धाभिभवार्थ अव्यंग । अभ्यासिती ब्रह्मवेत्ते ॥ ४१ ॥ केवळ वासनालय जीवन्मुक्ति । सप्राणवासनालय विदेहमुक्ति । 'नतस्यप्राणाउत्क्रामंति । इहैवसमवलीयंते' श्रुति ऐसी ॥ ४२ ॥ विदेहमुक्तींत राहे भक्ती । 'निदिध्यासनप्रकाशीं' मद्वचनोक्ति । आणि श्रुत्यनुसारिण्यपरोक्ति । प्रमाण आहे. ॥ ४३ ॥

॥ श्लोक ॥

' सरूपनष्टचित्तासुजीवन्मुक्तउदाहृतः ।
अरूपनष्टचित्तासुप्राप्तकैवल्यमुच्यते ' ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

परी तो प्राण ब्रह्मीं लीन । व्हावया करावा क्रियाहीन । याचिसाठीं ज्ञानोत्तराभ्यसन । प्रारब्धाभिभवन अवांतर ॥ ४४ ॥ परी तो प्राण क्रियाहीन । झालिया हृदया प्रेतपण । प्रेतीं तंव आहे तमोगुण । यालागीं सत्वसंपन्न प्राण कीजे ॥ ४५ ॥ ह्मणाल ज्ञानोत्तर नाहीं गुणस्थिती । तरी मी विचारी येणेंरीती । ज्ञानोत्तर गुणद्वेषस्थिती । असावी कां ? ॥ ४६ ॥ गुण झालिया सच्चिदानंद । सहजचि होय अभेद । परी प्रतीत होय जरी प्रारब्ध । तरी सत्वशुद्धप्रत्यय न कां ? ॥ ४७ ॥ चंचळ एक रजोगुण । अवशिष्ट स्थिर असती दोन । अप्रकाशस्थिर तमोगुण । सप्रकाशस्थिरपण तें सत्व ॥ ४८ ॥ विदेहमुक्तांचा प्राणलय । मग तमोमय व्हावें हृदय । हें नवल कीं स्वयें । आधीं असे ॥ ४९ ॥

॥ चूर्णिका ॥

अहो ! जलस्थप्रतिबिंबें सूर्य व्हावें । परी सूर्यकांतीं येवोनि तृणजाळावें । तैसें जीवन्मुक्तें विदेहमुक्त व्हावें । परी हृदयसूर्यकांतीं येवोनि जाळावे जगदोष ॥ २५० ॥

॥ ओव्या ॥

आधीं सात्विक केलिया प्राण । तो सहजचि स्थिर होय आपण । परी हृदय सात्विक होय ह्मणून । प्रकाशे चेतन त्यांतुनी ॥ ५१ ॥ मग तया चेतनाचेनि योगें । भजकजन पूर्ण होवों लागे । यालागीं विदेहमुक्ताची सवेगें । समाधि कीजे ॥ ५२ ॥ आळंदीवल्लभ समाधिवासी । ते स्वयें

मुक्तिचि निश्चयेंसी । परी मुक्तिप्रभा हृदयसूर्यकांतासी । मिळुनि उपदेशी दीन जनां ॥ ५३ ॥ समुद्रीं मिळालिया संपूर्ण । मेघ जरी नेईल त्यांतुन । तरी प्रतिबंधीना जीवन । तयापरी ॥ ५४ ॥ तैसे विदेह-मुक्त जाहले । आणि हृदयसूर्यकांतीं ज्ञान प्रगटलें । तें इतरां उजळोनि मुक्तिद झालें । तरी आह्मीं ना न ह्मणों ॥ ५५ ॥ अविरोधी ह्मणोनि भेद नाहीं । इतरांचें कार्य सर्वदांही । यालागीं समाधिस्थ ज्ञानेश आई । गुरुरूपें अनादि अनंत ॥ ५६ ॥ नित्यचि चैतन्य विख्यात । आणि जो हृदयसूर्यकांत । तत्स्थप्रभा जनकार्य करीत । मग निवटाया समर्थ कवण असे ? ॥ ५७ ॥ यालागीं अनंत अनंत । आळंदी हें मुख्य तीर्थ । आणि उपदेशक तात । अखंडची ॥ ५८ ॥ परी ते परमेश्वराचि ह्मणोनी । सिद्ध सूर्यकांत सूर्यस्थानीं । इतर जे कां मुक्त कोणी । ते साध्यसूर्यकांतीं सिद्ध सूर्य ॥ ५९ ॥ सिद्ध सूर्य-रूप चिद्घन । प्राण केलिया सत्वगुण । आपुलें जें हृदय पूर्ण । तें साध्य सूर्यकांत होय ॥ ६० ॥ आतां प्राण करावा सात्विक । तयाची युक्ति आहे एक । कारण होतांचि सात्विक । कार्य सात्विक सहज होय ॥ ६१ ॥ झालियाही ज्ञानप्राप्ती । सत्वमयप्राणकरणरीती । तरी प्राणांचें कारण जें निश्चिती । तें सात्विक असावें ॥ ६२ ॥ 'आपोमयः प्राण' ह्मणोनी । प्रेमें वदे श्रुति जननी । तें आप असलिया रजोगुणी । गमनागमनीं प्राण उमटे ॥ ६३ ॥ तें सत्वगुणी आप मिळतां । तरी प्राणासी येईल सात्विकता । आणि सत्वगुणी आप तत्वतां । तीर्थीं असती ॥ ६४ ॥ सामान्य बोधीं अनुमान । विशेष न कळे शद्वावीण । यालागीं पाहिजे सात्विक जीवन । हें अनुमानेंकरून सिद्ध झालें ॥६५ ॥ परी कोणतें सात्विक जीवन । येथ श्रुतिचि एक प्रमाण । आणि गंगामहिमा स्वयें आपण । श्रुति सांगे ॥ ६६ ॥

॥ श्लोक ॥

'सिताऽसितेसरितेयत्रसंगतेयत्राऽऽप्लुतासोदिवमुत्पतंति।
यत्रगंगाचयमुनाचयत्रप्राचीसरस्वती' ॥ ( ऋग्वेद )

॥ ओव्या ॥

सात्विकपणा सर्वे तीर्थी । परी गंगेसी विशेषता । तेथ सत्व असोनी सचेतनता । यालागीं 'सिता' ह्मणे श्रुति ॥ ६७ ॥ 'सिता' ह्मणजे अतिनिर्मळा । निर्मळास्तव चित्कळा । चित्कळा ह्मणोनी प्रेमळा । निःसीमची ॥ ६८ ॥ त्या मातेचिया कृपें स्नान । झालिया याचि लोकीं पूर्ण । शरीर होय संपन्न । देवांहून सत्वमय ॥ ६९ ॥ एकाग्रभूमिकेंत देवांचें चित्त । आणि जे कीं गंगास्नानयुक्त । त्यांचें सहजपणें चित्त । निरुद्धभूमिगत होउं पाहे ॥ ७० ॥ स्नान मात्र एक करितां । तरी देवदेह जल देत तत्वतां । आणि जलांतर्वर्ती जी सत्ता । ते व्यानद्वारां चित्ता शुद्ध करी ॥ ७१ ॥ याहीवरी घडतां पान । तरी गंगामय पंचप्राण । मग तेथेंचि शरीर ठेवितां जाण । होय आपण गंगामय ॥ ७२ ॥ हें नव्हे मम पदरीचें वचन । बोलिले आचार्य भगवान। तोचि श्लोक प्रमाण । सावधान ऐकावा ॥ ७३ ॥

॥ श्लोक ॥

कुतोवीचिर्वीचिस्तवयदिगतालोचनपथं ।
त्वमापीतापीताम्बरपुरनिवासंवितरसि ।
त्वदुत्संगेगंगेपततियदिकायस्तनुभृतां ।
तदामातःशातक्रतवपदलाभोऽप्यतिलघुः ॥ १ ॥

( पंडित जगन्नाथराय )

॥ ओव्या ॥

अहो! पाप तें तंव अदृष्ट । तुझें सात्विक जल दृष्ट । दृष्ट तीव्र ह्मणोनी अदृष्ट । राहिल कोठें? ॥ ७४ ॥ यालागीं तुज पाहतां नयनीं । कोठें नरक नायके कानीं । माझा विश्वास एवढा जननी । तूं येथ ह्मणूनी त्रिभुवनीं दुःख नसे ॥ ७५ ॥ याचिलागीं आचार्य आपण । 'कुतोवीचि' वेदती वचन । ह्मणजे नरक हा शब्दार्थ पूर्ण । शशशृंग जाहला ॥ ७६ ॥ माये! तुझें घडलिया पान । तरी पीताम्बरपुर करिसी दान । ह्मणजे पीताम्बर जेथ राहे तेथ जाण । पीताम्बरपुर ॥ ७७ ॥ तो पीताम्बर आहे विष्णुशरीरी । यालागीं तोचि येतो करीं । एवढी जीवनकणपानथोरी । तुझी जननी! ॥ ७८ ॥

तुझे ओसंगीं देह पडतां । तरी शातक्रतवपद तत्वतां । अतिलघु वाटे पाहतां । जननी माते ॥ ७९ ॥ शतक्रतूचा संबंधी ह्मणून । शातक्रतव बोलिजे वचन । ह्मणजे उपेंद्र ह्मणती जयालागून । तो हा विष्णू ॥ २८० ॥ ह्मणोनी विष्णुपद जें कांहीं । तें तुच्छ वाटे मज आई । येथ अर्थ करितील लवलाही । ऐसें कोणी ॥ ८१ ॥ कीं, शातक्रतव ह्मणजे सहस्रनयन । परी हें योग्य नाहीं बोलण । विष्णुपद मिळे करितां पान । आणि ओसंगाग्रहणें स्वर्गकल्पना ॥ ८२ ॥ पानेंचि मिळे वैकुंठ जरी । उत्संगग्रहण अधिक त्यावरी । ह्मणोनी स्वर्गाची तंव कुसरी । कल्पनाचि नये ॥ ८३ ॥ यालागीं तयाचा हाचि अर्थ । जें वैकुंठही तुच्छ वाटत । ऐसें ह्मणतील कोणी येथ । कीं अर्थवाद हा असे ॥ ८४ ॥ तरी तैसें सर्वथा नाहीं । कृष्ण आणि गंगा ब्रह्म पाही । परी कृष्ण व्यक्ति ह्मणोनि राहे हृदयीं । आणि गंगा जलमयी ह्मणोनि सर्वांगीं राहे ॥ २८५ ॥ एवं शरीर आणि हृदय । आत्मा दोहींठायीं होय । तैसे गंगा आणि यादवराय । भिन्न विपायें न होती ॥ ८६ ॥ कीर्तनें काया हरिगुणमय । प्रसादामाजीं अन्न हरिमय । गंगास्नानीं जल हरिमय । हरिरूप होय सर्वत्र ॥ ८७ ॥

॥ श्लोक ॥

मीना यदीयसलिलप्रभवाः सजीवाः ।
भोगानलंधनसुरान्किमु नो हसंति ।
मुक्तो शिवोऽपि परगावशो जटायां ।
यां स्थापयन्भवतु सैव पयःप्रदा मे ॥ ८८ ॥
भीतो दिवाकरसुतं मतिमज्जनोऽयं ।
योगव्रतक्रतुगतिः श्रयते बताकं ।
पीयूषतोऽपि तनुजान्कृपया स्वन्नन्तीम् ।
भूमौ तवोदकमयीं प्रतिमामरुळ न् ॥ ८९ ॥
लालासुधाञ्जगुरुदत्तधियांस्वर् ॥:: ।
स्वर्गे वसंत विवशस्तरवः फलंतु ।
जायेम तेंऽकपरिलालनमीनयोनौ ।
यस्यां सदास्तु तव जीवनजीवनन्नः ॥ २९० ॥

पर्यंकतत्वविदुषामपि नैव मातः ।
शौर्यं विभाति मम वाहनवाहकानाम् ।
पादैस्त्वदीयतटगा विधना हि धन्याः ।
ये लीलया तव लवांबुविमुक्तमोहाः ॥ ९१ ॥
तीव्रं पापफलं तनुं प्रदहति दृग्गोचरं सर्वदा ।
तत्तापं प्रवदंति वेदमतयः प्रारब्धभूतं महत् ।
त्वन्नीरं पिबतां न ताप इति चेद्दृष्टं मया जान्हवी ।
मातः पापविनाशके तव बले नो विस्मयो नो वृथा । ९२ ।
इदं गंगापंचरत्नं प्रातरुत्थाय यः पठेत् ।
हरिस्तद्धृदये भूयाद्ज्ञानेश्वरकृपालवात् ॥ ९३ ॥

॥ ओव्या ॥

अथवा बुद्धि हरिमय कीर्तनीं । अन्नमय मन ह्मणोनी । प्रसादें हरिगुणमय निर्वाणीं । मन होय । ९४ । आपोमय प्राण ह्मणून । गंगास्नानें हरिमय प्राण । संत ब्रह्ममूर्ति म्हणून । सत्संगें काया हरिमय । ९५ । यास्तव तुझा पिता आधीं । स्नानें करोनि महती शुद्धी । अग्निनारायण यथा विधी । पूजोनि कर्म सोडिलें । ९६ । कर्म सोडिलियाहीवरी जाण । अक्षय शांत ऐसा होऊन । भक्षी गंगेचें जीवन । वासना सोडून सर्वेही । ९६ । गंगास्नानें हरिसम काया । करोनि कर्मे त्यजिलीं राया । मग गंगाजलपानें कैवल्य व्हाया । सात्विक प्राणें हृदया सूर्यकांत करी ॥ ९८ ॥ मग अहिंसादियमा । आणि जपादि नियमा । साधन करोनी मनोधर्मा । जिंकिलें जेणें ॥ ९९ ॥ गंगास्नानें विदग्धकर्मा । आणि चित्त दत्त यमनियमा । यालागीं विघ्नगरिमा । कदा नव्हे ॥ ३०० ॥ मग निवटाया व्याधिअंतराय । तैसें आसन जिंकिलें होय । मग निःशेष करावया मनोलय । प्राणालागीं संयमी ॥ १ ॥ मग सकल इंद्रियवृत्ति । मनासहित निरोधी निगुती । हरिगुणप्रेमसमाधिस्थिती । वाढवी बहु । २। तिया भगवच्चरणधरणें । आत्मरूप तमा मारणें । तैं तेथ ध्यानें । धरिलें मना ॥ ३ ॥ तया ध्यानैकाग्रसत्ववृत्ति । गेली रजचांचल्यख्याती । मग ध्यातृध्यान विसरोनि वृत्ति । ध्येयमात्र राहिली ॥ ४ ॥ तया ध्येयमात्रयोगेंकरून । अवघाचि निमाला सत्वगुण । मन बुद्धीमाजीं

लीन । बुद्धि साक्षींत लपविली ।। ५ ।। आणि दृश्याचि जंव नाहीं । तरी द्रष्टृत्व असावें कायी । जैसें घट फुटलिया सर्वेही । महाकाशची ।। ६ ।। तैसें आघवेंचि परब्रह्म । सकार्यमायेचा नाहीं उगम । करामलकवत् परम । अपरोक्ष जाहालिया ।। ७ ।। श्रवणादौ जें परोक्षज्ञान । अथवा विद्युतवदपरोक्षयुतश्रवण । तेंचि हा समाधि पावोन । सूर्यसम अपरोक्ष सुये ।। ८ ।। ऐसी विद्यारण्यवाणी । 'तत्वविवेकीं' शोभा आणी । तुझा पिता तेंवी होवोनी । अचल राहिला स्थाणु जैसा ।। ९ ।। आजपासोनि पांचवे दिवशीं । योगाग्नि जाळील तद्देहासी । त्वन्माता गांधारी निश्चयेसी । त्याचि अग्नींत प्रवेशेल ।। ३१० ।। तरी विदुरातें आणावया । जावें हें मनीं येईल तुझिया । परी तोही साश्चर्य हर्ष पावोनिया । तीर्थाटणा निघेल ।। ११ ।। महाभारतीं ऐसी कथा । कीं धर्मादि भेटले कुरुनाथा । परी कल्पभेदें व्यवस्था । समन्वयीजे ।। १२ ।। नाना कल्पांचिया स्थिती । द्रष्टे ऋषी प्रकट करिती । यालागीं विचित्र पाहोनि चित्तीं । शंको नये ।। १३ ।। तंव शिष्य ह्मणे भगवंता । 'धाता-यथापूर्वमकल्पयत्' या श्रुत्यर्था । पाहिलिया विचित्रता । न सांपडे । १४ तरी ययाचें हें उत्तर । कारण सदृशसमप्रकार । कार्यसृष्टिप्रकार । बहुविध होय ।। १५ ।। परी ज्या कर्मातें भोगस्थिति । ती न नाशे कार्यत्वजाती । विधातिया कर्मस्मृति । सकल असे ।। १६ ।। परी तेथही अविद्यावशें । एखादें कर्म मध्येंचि विलसे । तरी क्रमही भासे । अन्यथाही ।। १७ ।। जैसें बीजकोठींत धान्य नवीन । टाकोनि मोजलिया जाण । तरी तें धान्याचें होय गणन । परी क्रमनिर्धार करवेना ।। १८ ।। पुनः पुनः धान्य मोजतां । तरी तेचि दाणे येती तत्वतां । परी क्रमाची वार्ता । भिन्न होय ।। १९ ।। तैसे नानाकल्पीं क्रम नाना । परी कर्मफळांच्या समान खुणा । जैसें वृक्षबीज नियतिगुणा । शाखाकार वेगळाले । ३२० । कीं सकल असोनी वृक्षपर्ण । कोठें पातळ कोठें घन । तेंवी कर्मफळ असोनी समान । कथाक्रम भिन्न भासे ।। २१ ।। विदेहमुक्तही जे होती । परी तयांतें जे भजती । ते तत्समान उपजविती । पुढील कल्पीं ।। २२ रज्जु न पाहतां सर्प दिसे । रज्जु पाहतां तो न भासे । तेंवी ब्रह्मज्ञानें हें कांहीं नसे । एऱ्हवीं विलसे हरिमाया ।। २३ ।। एवढा समन्वयही

ऐकोन। जरी तुझें नोहेल समाधान । तरी खोटें वाटेल निरूपण। कल्पादिकांचें ॥ २४ ॥ तरी तैसेंचि पैं वाटो। ही सृष्टि मिथ्याचि घटो। तुझें तुज झगटो। शुद्ध ज्ञान ॥ २५ ॥ जागृतीं स्वप्नीं आणि सुषुप्तीं। तुझी नाहीं तुज विस्मृती। एऱ्हवीं स्वप्नादि नाना स्थिती। होती जाती त्या मिथ्या ॥ २६ ॥ स्वप्नीं हें ऐसें जाहालें। तैसें काय ह्मणोन न देखिलें। हे वासनेचे प्रश्न वाहिले। यांसी वासनेचें उत्तर ॥ २७ ॥ एऱ्हवीं मिथ्या जी माया। तेथ क्रम असावा कासया। अधिष्ठान पाहिजे यया। हा मात्र नियमू ॥ २८ ॥

॥ चूर्णिका ॥

एवं शिष्यसंशय छेदोनी। युधिष्ठिराचें सांत्वन करोनी। तुंबरासह नारदमुनि। हृदयस्वर्गीं चढोनि गौप्येव झाले ॥ २९ ॥ मग अखंड सद्गुरुवचन। युधिष्ठिरराय हृदयीं धरून। भूत भविष्य वर्तमान। शोक त्यागोन सुखी झाला ॥ ३३० ॥ मज ज्ञानेश्वर जनक जननी। स्वचरणा शोका तळीं घेवोनी। प्रेमपुष्टि भरोनी। पूर्णत्वें देवो ॥ ३१ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे विदुरसमागमादिवर्णनं नाम त्रयोदशसखीप्रेषणम्।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण १४ वें.

॥ चूर्णिका ॥

मानसा त्या हरिला भज रे। ज्याच्या करुणें भेटुनि सद्गुरु। सहज कळे निज रे ॥ मानसा ॥ ध्रु० ॥ जयजय मुकुंद सच्चिदानंद जगदंकुरकंद इंदिराहृदयारविंदामिलिंद गोविंद नंदीवाहनध्येय ब्रह्मानंद नारदादि-

मुनिवृंदवंद्येंद्रादिवृंदारक वंदिति ज्या वृंदावनविहारीपदा तयांस बंदीहूनि सोडविता, भववारणपंचानन स्वजनापदानिवारणशील प्रमदापल्लव स्कंधीं वाहतो, ज्याचें पूर्णपण जाणावया मांडुक्य सांगे प्रणवचतुश्चरण, जो सर्वांत:करण साक्षी होऊनि पाहतो आणि नंदराणीपाणिस्थित पाणियानें नाहतो, जया चक्रपाणीचे चरणीं पितामह तनुमन वाहतो, तो वाणीनें दे लोणी अयि जननी ! कहीं देशील दही इत्यादिवचनीं बाहतो, करितांचि यत्स्मरण निवारी जनिमरण सकरुण भगवंत अनंत दीनान्याय साहतो, निजरूपीं कदापि नच बाधा परि राधाधरसुधालुब्ध स्तब्धता लाहतो, परब्रह्म परमात्मा ऐसा महात्मानुभवसाक्ष महावाक्यलक्ष्य यन्निगमा गरिमा न कळे, वर्षवाततपहिमा साहुनी मुनि वर्णिति महिमा तो दासकामद चिद्विलास रचुनि रास पुरवि आस गोपिकांची, तेथ साची प्रीति ठेवुनी अंतरीं बाहेरीं अलकावतिवल्लभकरुणें सहज सुलभ निर्गुण सगुण ब्रह्म उमज रे । मानसा त्या हरिला भज रे ॥ १ ॥

॥ गीति ॥

जय जय म्हणुनी वाणी अक्षय रतसिल अलंदिपतिनामीं ।
तरि माये तव करुणें पुढति कदापिहि पडे न भविं ना मी ॥ २ ॥
विनवित मी तुज पवना श्वासोच्छ्वासांत गाइ गुरुनावें ।
न्याया भवपरतटिं मग अधिकारीगण समस्त भरुं नावें ॥ ३ ॥
प्राणसख्या चित्ता त्वां हरिचरणाविण न अन्य कामावें ।
अयि मति हृदि तव करुणें न सुजन निजपदवदान्य कां मावे । ४ ।

॥ ओव्या ॥

भक्तहृदयीं भागवतीं । कलिमल हराया निश्चितीं । प्रवेशलीया यदुपती । पांडव भगवंतीं मिळाले ॥ ५ ॥ कीं पंढरीं आलिया जगज्जीवन । पांडव लाधलिया हरिचरण । प्रजापालक उत्तरानंदन । जाहला ब्राह्मणानुग्रहें ॥ ६ ॥

॥ गद्य ॥

**शिष्य उवाचः**— भगवन्, आपण हा प्रियलीलामहोत्सव भागवतानुरोधानें मला सांगत असल्यामुळें ह्यांतील निजधामगमनकथेचा

विपर्यास करण्याचें कांहीं प्रयोजन असेल असें मला वाटत नाहीं. आतां, उपासनेमुळें करावें लागतें असें ह्मणाल तर भागवतदृष्ट्या व्यासांनांही कृष्णोपासना नव्हती असें नाहीं आणि इतिहासाचा उपासनेनें लोप करणेंही उचित नाहीं.

**गुरुरुवाचः**– योग्य विचारलेंस. उत्तर मात्र चित्तैकाग्र्यानें श्रवण-कर ह्मणजे झालें. भगवन्निजधामगमनकथेचा मी विपर्यास करीत नाहीं, परंतु भगवन्निजधामगमनकथेविषयीं तुला पक्ष घेण्यास तरी काय प्रमाण आहे? केवळ व्यासवचन, असें ह्मणशील तर बरोबर नाहीं. कारण वाक्य प्रमाण घेतांनां तें मुख्य आहे किंवा गौण आहे याचा अवश्य विचार करावा लागतो. ज्या वाक्याची स्वविषयाहून अन्यत्र गति होत नाहीं त्याला मुख्य ह्मणतात; आणि ज्याची स्वविषयाहून अन्यत्र गति होते त्याला गौण म्हणतात. जसें, विष्णुदत्ताच्या घरीं समारंभांत देव-दत्ताला तेथील एका मनुष्यानें सांगितलें कीं ‘ तुम्ही मंडळीला तांबूल वाटा’, इतक्यांत दुसऱ्या एकानें सांगितलें कीं ‘ब्राह्मण पात्रावर बसले आहेत आणि घृताची अडचण आहे, घृत आपल्या हातांत असल्यामुळें आमचा कांहीं इलाज चालत नाहीं’. या दोन वाक्यांमध्यें जेवणारे ब्राह्मण क्षणभर थांबूं शकत असले तर दुसऱ्या वाक्याची अन्यत्र गति होते आणि थांबूं शकत नसले तर पहिल्या वाक्याची अन्यत्र गति होते; किंवा अशी कल्पना कर कीं एका मालिनी नांवाच्या स्त्रीला तरलिका हांक मारून ह्मणाली, ‘बाई, आपलें मूल रडतें त्याला पाजा’ आणि इतक्याच अवकाशांत सुरुचीनें हाक मारून सांगितलें कीं ‘आपले पती उन्हांतून येत असतां घाबरे होऊन दारांत मूर्छित पडले आहेत, आपण त्यांच्या मुखांत पाणी घालून गोड शब्दांनीं त्यांनां सावध करावें’. या दोन्ही वाक्यांचा विचार करतांनां असें दिसतें कीं मुलाला घडीभर खेळविलें असतांनां तें उगें राहूं शकेल परंतु घाबरून गेलेला प्राण परत येणार नाहीं. ह्मणून पहिल्या वाक्याची उपेक्षा करून दुसऱ्या वाक्याकडे धांव घेणें उत्तम. कारण दुसऱ्या वाक्याची स्वविषयाहून अन्यत्र गति नाहीं. तद्वत् व्यासवाक्यांतही मुख्य वाक्य कोणतें व गौण वाक्य कोणतें याचा तुला विचार केला पाहिजे होता. कारण

दोन्ही प्रकारचीं परस्परविरोधी अशीं व्यासवाक्यें आहेत. त्यांत एक कृष्णनिधनबोधक वाक्य तुला ठाऊकच आहे आणि त्याच्याच विरोधी दुसरें गर्भस्तुतींत एक वाक्य आहे. ' स्वयंसमुत्तीर्यसुदुस्तरंद्युमन्भयार्णवंभीममदभ्रसौहृदः । भवत्पदांभोरुहनावमत्रतेनिधाययाताःसदनुग्रहोभवान्' । या श्लोकांत संसारांतून पार झालेले असे भगवज्जन त्वच्चरणकमलरूपी नाव मागें ठेवून कैवल्यपदवीस प्राप्त होतात असें देवांनीं ह्मटलें आहे. आतां, शरीरारहित नुस्ते पाय कांहीं रहावयाचे नाहींत ह्मणून तुझें अवतारशरीरच तें स्थापन करून जातात असें म्हटलें पाहिजे असें ह्मणणें म्हणजे अवतार निजधामास पाठविणाऱ्या कथेचा विरोधच करणें होय. परंतु वाक्यमुख्यगौणव्यवस्थेनें विरोधपरिहार होतो. पहा, श्रुति, शास्त्र व संत सर्वांनां भवपार होण्याकरितांच उपायदर्शक आहेत. त्यांचे ते उपाय मिथ्या झाले म्हणजे अर्थातच संसारपरतीर पावणें अशक्य आहे. येथेंही अवतारशरीररूपी नाव सत्पुरुष ठेऊन जातात असें म्हटलें आहे. तें अवतारशरीर जर नाश पावेल तर सत्कथित उपाय मिथ्या झाल्यामुळें मुमुक्षु लोकांनां तरणोपायच राहणार नाहीं. म्हणून शद्वप्रमाण मानावयाचें असल्यास गर्भस्तुतींतील वाक्याची स्वविषयाहून अन्यत्र गति होत नाहीं असें तुला मानलेंच पाहिजे. तसें मानलें म्हणजे अर्थातच तें वाक्य मुख्य झालें. आतां, कृष्णकथेचें-ही वाक्य मुख्य मानशील तर मुख्य वाक्यामध्यें परस्पर विरोध येणें याला उन्मत्तप्रलाप म्हणतात. व्यासांनां उन्मत्त ठरविण्याइतकी कांहीं तुझी विद्या दिसत नाहीं. याला उदाहरण तूं मला शंका विचारतोस हेंच आहे. तस्माद्भगवन्निजधामगमनवाक्य गौण मानलें पाहिजे. आतां त्या वाक्याचाच विचार करूं. भगवच्छरीर नित्य आहे म्हणून तुला वारंवार मागें सांगितलेंच आहे. आतां भावकार्याला नित्यता नसल्यामुळें भगवच्छरीर नित्य नाहीं अशी खुळी शंका काढणें योग्य नाहीं. कारण भगवंताचें शरीर भूतकार्य नसून कारणरूप मायाकार्य किंवा अनध्यस्तविवर्त आहे हेंही तुला मागें सांगितलें. पुन्हा, भावकार्य नित्य नसतें असें यद्यपि नैय्यायिक ह्मणतात तथापि योगज प्रज्ञेनें अनागत ज्ञान कसें होतें याचें उत्तर देतां येत नाहीं. ह्मणूनच सांख्यानें

सत्कार्यवादाचा स्वीकार करून सूक्ष्मावस्थेंत असलेलें कार्यच त्यांनां दृग्गोचर होतें असें समाधान केलें आहे. मी जो कार्यसत्यतेचा निषेध केला आहे तो ब्रह्मसमसत्तेचा केला असल्यामुळें त्यावरून शंका काढण्याला येथें अवसर नाहीं. याप्रमाणें जीवसंयोगी प्रकृतिकार्य जर सत्य आहे, तर समस्तजगदनुग्राहक भगवत्संकल्परूपी शरीर सत्य नाहीं हें म्हणणें अप्रमाण व अयुक्तिक आहे. बरें, भगवन्निजधामगमन-वाक्यें तरी भागवत भारतांतच प्रसिद्ध आहेत. पद्मपुराणांतर्गत भागवत-महात्म्यांत परमेश्वरांनीं निजधामाला न जातां भागवतांतच प्रवेश केला असें एक वाक्य आहे. आणि 'द्रौपदीचपरित्रातायेनकौरवकश्मलात् । पालितागोपसुंदर्यःसकृष्णःक्वापिनोगतः' । असेंही तेथेंच म्हटलें आहे व त्याचप्रमाणें वरील पुराणांतर्गतच वृंदावनमहात्म्यांत श्रीकृष्णा-सहित रास वृंदावनांत अझून गुप्त होत असतो असें ह्मटलें आहे. हीं सर्व पुराणें व्यासांनींच केलेलीं आहेत. अर्वाचीन क्षेपकवादी यांनीं कदाचित् चार पांच व्यास काढले तर आमचा उपाय नाहीं, परंतु एकाच व्यासाचें हें वाक्य समजून जर आमच्याकडून व्यवस्था लागूं शकते तर उगीच क्षेपकवादाचा आह्मी स्वीकार कां करावा? ती व्यव-स्था अशी कीं पद्मपुराणांतील वाक्य मुख्यवाक्यानुसार असल्यामुळें अधिक प्रमाण आहे. आतां गौण वाक्याची व्यवस्था काय? असें विचारशील तर सांगतों ऐक. श्रीकृष्णनिजधामबोधक जीं गौण वाक्यें आहेत त्यांची अन्यत्र गति अशी आहे कीं, श्रीकृष्णासारखें जरी वैभव प्राप्त झालें तरी त्याचा शेवटीं नाश झाला म्हणून ईश्वरासारखें जरी ऐश्वर्य प्राप्त झालें तरी त्यांत आसक्त होऊं नये असा दृढ वैराग्यबोध करणेंच त्या वाक्याचें तात्पर्य आहे, इतिहास तात्पर्य नाहीं. कपिलांनीं-ही सांख्यसूत्रांत ऐश्वर्यांत वैराग्य उत्पन्न व्हावें ह्मणून ईश्वराचें खंडन केलें असून भागवतांत देवहुतीला ज्ञान सांगतांना ईश्वराची भक्ति सांगितली आहे. ह्मणून सूत्रांतील वाक्य यथार्थ ईश्वरखंडनपर नसून जविवैराग्यबोधपर आहे. अशी त्याची अन्यत्र गति असल्यामुळें जसें तें भागवतवाक्यापेक्षां गौण होतें तसें येथीलही भगवन्निजधामबोधक वाक्य अन्यत्रगतिमत्वात्तत्र पद्मपुराण व गर्भस्तुतींतील वाक्यापेक्षया

गौण होतें. आतां पद्मपुराण हा दुसरा ग्रंथ आहे, त्यांतील वाक्याचा गर्भस्तुतींतील वाक्याशीं समन्वय करण्यापेक्षां भागवतरूप एकाच ग्रंथांत असणाऱ्या निजधामवाक्याचा उपसंहार करणें वरें असें ह्मणणें योग्य नाहीं. कारण सन्निधिमात्रेंकरून कांहीं गौण वाक्याचा उपसंहार मुख्य वाक्यांत होत नाहीं. जसें:- ब्रह्मविद्या प्रतिपादन करणाऱ्या अथर्वण उपनिषदांतच 'भिंधि भिंधि छिंधि छिंधि' इत्यादि अभिचारबोधक मंत्र आहेत ते जरी एकाच ग्रंथांत आहेत तरी भिन्नविषय असल्यामुळें केवळ सन्निधिमात्रेंकरूनच त्या ग्रंथांतील ब्रह्मविद्येंत आभिचारिक मंत्रांचा उपसंहार भगवान् शारीरकसूत्रकार करीत नाहींत. तसेंच आह्मीही भगवन्निजधामबोधक वाक्यें जरी एकाच ग्रंथांतील आहेत तरी गर्भस्तुतींतील भगवच्छरीरनित्यत्वविद्येंत त्यांचा उपसंहार करीत नाहीं. तस्मात् आमचे प्रियतम आह्मास सोडून केव्हांच जावयाचे नाहींत हें सिद्ध झालें.

**शिष्य उवाचः**— भगवन्! माझ्या शंकेचा त्रैकालिक बाध झाला आतां प्रभुवचनपीयूषपिपासा आहे.

**श्रीगुरुरुवाचः**— श्रवण कर.

॥ ओव्या ॥

इरावती नामें आपुली तनया । उत्तरें अर्पिली परीक्षिद्राया । ती जनमेजयादि चार तनया । जन्मवोनि झाली वीरमाता ॥ ७ ॥ गुरु करोनी कृपाचार्य । तीन अश्वमेध करी राय । बहुत दक्षिणा वांटी स्वयें । गंगातीरीं धर्ममति ॥ ८ ॥ नंतर दिग्विजयकाळीं । नृपें निग्रहिला कळी । जो शूद्रशरीरें विटाळी । राजचिन्हातें ॥ ९ ॥ गोवृषभाचिये मागें । मारावया धांवत वेगें । तंव ऋषी ह्मणती सूता सांगे । कलीतें राय निग्रही कां ॥ १० ॥ कवण ती गाय वृषभ कवण । हें सर्वेचि करी निरूपण । परी निघावें येथून । हरिकथानुसंधान कांहीं तरी ॥ ११ ॥ श्रीकृष्णकथा जेथ नाहीं । असें सांगोनियां काई । वाळू घुसळोनि कहीं । तैल न निघे ॥ १२ ॥ अति अज्ञान पशुजन । तयांच्या चरित्रीं काज कोण । विषयासक्त मनुष्यगण । तेंही वर्णन योग्य नोहे ॥ १३ ॥ ह्मणशील वर्णूं स्वर्गलीला । तरी ते अयोग्य सूतबाळा । देवांचाही काळ गळा । विषयसाधनें आवळिला ॥ १४ ॥ जैसें श्वान घरोघरीं । फिरे

पहावया भाकरी । भुंके आल्यागेल्यावरी । विण्मूत्रमय धरित्री हुंगे ।१५ श्वानाचें नांवही जाण । भोजनकाळीं न घेती जैन । ऐकलियाही जाती उठोन । भोजन सोडून तात्काळ ।। १६ ।। तैशा विषयी जनांच्या कथा। मुमुक्षुमानसा देती व्यथा । मग दैविक लौकिक सर्वथा । कोणीही असो ।। १७ ।। घडी घडी स्त्रियेचें मुख देखणें । अधरामृत ह्मणोनि लाळ चोखणें । धनासाठीं टाकणें । धरिलें व्रत ।। १८ ।। नाना धर्मांची आटाआटी । सत्याची कांस ही गोमटी । केवळ जगन्मानासाठीं धरिती जे ।। १९ ।। करोनियां उत्तम सत्र । स्वर्गीं रंभेचें सूत्रपात्र । तथापि ऐसियांचें चरित्र । वर्णुनी सार काय मिळे ।। २० ।। जिनें नवमास वाहिलें पोटीं । रात्रंदिन स्तन लाविलें होटीं । ती मायही स्त्रियेच्या योनीसाठीं । टाकिती त्यांच्या गोष्टि नको ।। २१ ।। आमुचा यज्ञप्रयत्न सूता । ऐकावया हरिकथा । येथ यमराया भगवंता । आणिलें आह्मी ।। २२ ।। जोंवरी यमराय या ठायीं । तोंवरी कोणी मरणार नाहीं । सकळ सृष्टि ऐको लवलाही । फणिशायीकथामृत ।। २३ ।। तंव शिष्य ह्मणे श्रीगुरुराया । मज झडपू पाहे आशंका माया । ती ज्ञानखड्गें मारोनियां । दीनरक्षण करा प्रभो ।। २४ ।। जोंवरी यज्ञीं सूर्यनंदन । तोंवरी कोणा नाहीं मरण । परी प्रारब्ध संपलिया जाण । देह पडे नियम हा ।। २५ ।। प्रारब्धभोगावीण पाहीं । देहातें आश्रयो दुसरा नाहीं । मग मृत्यु यज्ञीं असोनि काई । नियम मोडूं शकेल ।२६। श्रीगुरु ह्मणती भला रे भला । श्रोता तुजऐसा जोडला । ह्मणोनि माझा उल्हासला । बोधसिंधू ।। २७ ।। तूं साधनचतुष्टयसंपन्न । यास्तव थोड्याचि बोधें पूर्ण । परी लोकोपकाराकारण । नाना प्रश्न करितोसी ।। २८ ।। तरी ऐके समाधान । ऋषींचें ऐसें आहे वचन । कीं कथा ऐकतां यावी ह्मणोन । आणिला सूर्यनंदन येथ आह्मी ।। २९ ।। येथ पशूही ऐसेचि असती । ज्यांची सहज समीप अंतःस्थिति । ते यज्ञसन्निध निश्चिति । उत्तमगति जातील ।। ३० ।। त्वां केला जो प्रश्न । तरी ऐसें तत्समाधान । कीं मरणार नाहींत विषयीजन । हा अभिप्राय नाहीं मुनिवचनीं ।। ३१ ।। जे विषयालागीं लाळ घोटिती । वासनाडाकिणी आलिंगिती । ते यमें न बोलावितांचि जाती । मृत्युसदनीं

॥ ३२ ॥ पतंगीं यावें माझ्या भेटी । ऐसा डांगोरा दीप न पिटी । परी जावोनि पडती शेवटीं । रूपविषयें आपणची ॥ ३३ ॥ तैसा मृत्यूही नसतां । विषयीजन मरती तत्वतां । विषयप्रयत्नबळें क्षणापुरता । अभिभव करिती दैवाचा ॥ ३४ ॥ किंवा पिशाचयोनींत पूर्ण । ते फळ भोगिती आपण । अथवा विषयवासना तीव्र करोन । टाकिती भोगोन प्रारब्ध ॥ ३५ ॥ एवं विषयी जनांची रीती । तयांचा मृत्यु टाळायाप्रति । परमेश्वरा नाहीं शक्ति । हें अलंकारोक्ति मी ह्मणे ॥ ३६ ॥ परी सकळ विषय सोडोनि जाण । हरिचरित्रीं अनुसंधान । तयांचें वाढावया जीवन । यज्ञीं सूर्यनंदन आणिला ॥ ३७ ॥ मुमुक्षूच्या सत्वप्रयत्नेंकरून । आणि साधूंची दया साह्य घेऊन । तीव्र झालिया मुमुक्षाप्रयत्न । मिळे आधिकारिकपण क्षणापुरतें ॥ ३८ ॥ तितुकिया क्षणामाझारीं । लोक अंतरीं जपोत मुरारी । यालागीं जेथ सांपडे हरी । ऐसें चरित्र वद सूता ॥ ३९ ॥ श्रीहरिप्राप्तीवीण कर्म । तोचि तयां पडला श्रम । हरिप्राप्तीवीण धर्म । तोचि अधर्म मी ह्मणे ॥ ४० ॥ हरिप्राप्तीवीण विद्या । तरी अवघी ह्मणावी अविद्या । हरिजन न जन्मता वंध्या। माय त्याची ॥ ४१ ॥ कृष्णप्राप्तीवीण तप । तो पूर्वजन्मीचें भोगी पाप, कृष्णप्राप्तीवीण योगसंकल्प । खटाटोप वाउगा ॥ ४२ ॥ नवल या जनांची रीती । असलें आयुष्य दवडिती । रोग चिंतेनें आणिती । नसले घरां ॥ ४३ ॥ रोग आहे शेजारीं । हें जाणोनि स्मरावा पूतनारी । परी ते सोडोनि उलटे शरीरीं । रोग भाविती आपुल्या भयें ॥ ४४ ॥ रात्र जाये निद्रा भरिता । दिवस जाये कष्ट करिता । दोही पक्षीं सुखाची वार्ता । नाहीं परि कथा नायकती ॥४५॥ न भजावया शेषशायी । अहो काय शक्ति आपुल्या देहीं । काय आजाचि लोकीं तिहीं । निश्चिंती झाली? ॥४६॥ काय संपलें जनांचें पाप । काय अग्नीनें सोडिला ताप । काय आघवे विंचु सर्प । मरोनि गेले? ॥ ४७ ॥ थरारे नाहीं कापणार धरणी । ऐसा लेख दिधला कोणीं । कीं बोलल्या वेळे वर्षते पाणी । येते अनुमानी पीक कई ॥ ४८ ॥ बाळ तारुण्य आणि जरा । यांचा काय मोडला थारा । माशा चिलटादिक घरां । नाहींत काय ? ॥४९॥ नाना यंत्रादिकें करिती । तेथ चुकीनें काय कोणी न मरती । काय बहुत

भक्षितां निश्चिती । अजीर्ण न होय ? ॥५०॥ काय जाहले वज्रशरीरी । काय पडलें अमृत वक्त्रीं । कोण्या सुखें पूतनारी । हृदयाभीतरीं येईना? ॥ ५१ ॥ जो भक्तवत्सल जगन्मोहन । जो जगद्रक्षक करुणाघन । तो मायबाप सांडोन । कोणत्याधारें बैसती ? ॥५२॥ पूतना वैरही करोन । माराया आली विषस्तन भरोन । ती सुखी केली मातृगति देऊन । तो सांडोनि कवण भजावा? ।५३। यास्तव सूता तुजप्रती । विनवीतसों पुढत-पुढती । जो श्रीकृष्ण वेधक मूर्ती । त्याचीच कीर्ति वाखाणी ।५४। सूत ह्मणे मुनिवर्या । धन्य तुमची सच्चर्या । कृष्णकथेवीण आर्या । भूषण नाहीं दूसरें ॥ ५५ ॥ तरी कृष्णरक्षणें परीक्षिता । प्राप्त जाहली जी सत्ता । तीचेंही वर्णन पाहतां । कृष्णकथा पोषक ॥ ५६ ॥ असो तो राय परी-क्षित । निजदेशीं कलीं वागत । ही वार्ता ऐकतां विस्मित । अत्यंत झाला ॥ ५७ ॥ सकळपापमुकुटमौळी । तो प्रविष्ट मत्पालितभूमंडळीं । ऐकोनियां तयेवेळीं । धनुष्य धरता जाहला ॥ ५८ ॥ मी कुरुवंशवन-केसरी । कृष्णकृपामृतें वाढलों वरी । तें नेणोनियां दुराचारी । कली महीवरी पातला ॥ ५९ ॥ ऐसें मानोनि तेधवां । तया परगणइभसिंहा । नीतिमय क्रोध बरवा । नावरे कीरू ॥ ६० ॥ मग श्यामतुरगसिंह-ध्वजयुत । ऐसिया रथीं राव चढत । दिग्विजया सेनेसहित । स्मरोनि अनंत निघाला ॥ ६१ ॥ मग भद्राश्व केतुमाल भारत । किंपुरुषादि समस्त । वर्षे जिंकोनि सांभाळित । करभार सकळ ॥ ६२ ॥ तियें तियें वर्षीं । पांडवयश ऐके विशेषीं । जयांचा साह्य हृषीकेशी । जगदी-श्वरू ॥ ६३ ॥ द्रौण्यास्त्रापासून । आपुलें गर्भीं कृतरक्षण । कुंतीपांडव-प्रेमपूर्ण । प्रजेवरील ॥ ६४ ॥ तैसी भगवंताच्याठायीं । पांडवभक्ति अगाध पाही । ऐकुनी हृदयीं । तुष्टला रावो ॥ ६५ ॥ मग तेथिलीया जनां । दिले उत्तम वस्त्र आणि धना । जैसा बापू भेटोनि नंदना । पुरवी कोड ॥ ६६ ॥ एवं पांडवांचा सारथी । स्नेहें जाहला श्रीपती । हें अचाट ऐकूनि परीक्षिती । ठेवी प्रीती हरिचरणीं ॥ ६७ ॥ आधींच आवडता गोपाळ । आणि कुळदेवही केवळ । गर्भीं माझें कष्ट प्रबळ । वारिले जेणें ॥ ६८ ॥ तया भगवंतावांचुनी । आन नसावें माझे मनीं । ऐसें राव जीवीं धरोनि । श्रीकृष्णचरणीं प्रीति ठेवी ॥ ६९ ॥ उचित

पूर्वजनानुकूल । चालत असतां नृपाळ । शीघ्राचि आश्चर्य देखिलें प्रबळ । ऐकावें तें ॥ ७० ॥ धर्म वृषभरूप धरून । एक्या पायीं करी गमन । पृथ्वी धेनुरूप धरून । करी रूदन विशेषें ॥ ७१ ॥

॥ गद्य ॥

धर्मवासनायांजगत्कल्याणरूपभगवदनुग्रहांशशुद्धसात्विकपुण्योपहित-चैतन्यमधिदैवसृष्टौधर्मसंज्ञामवाप । 'धर्मोऽहंवृषरूपधृगि'तिप्रियोक्तेस्तदेव अनुग्राह्यजनानिमित्तंशोचतिनस्वनिमित्तं । जनेपरमनुग्राह्यमनुसरति । तद्व-द्वीसमष्ट्यंत:करणांशभूतजगत्पालनधारणारूपपृथ्व्यंत: सत्वोपहितंचैतन्य-मधिदैवसृष्टावुर्वीसंज्ञामवाप । सत्वसाम्याद्धर्मानुसारीजनपालकधेनुवृषभ-चिन्हान्वितशरीरंकृत्वापरमाश्चर्यंनृपंदर्शयामास । धर्मोऽपितद्वदेव ।

॥ ओव्या ॥

ते आश्चर्य दाविती कैसे । परस्पर बोलोनि ऐसें । मृदुवचनें वृषभ पुसे । धेनुलागीं ॥ ७२ ॥ अयी जननी तव मुख म्लाना । पाहो-नि वाटे तूं दु:खितमना । तरी दु:खाचिया कारणा । सांगे माते ॥ ७३ ॥ मी तीन पाय सोडोनी । चालताहे एक्या चरणीं । तें दु:ख अंतरीं वाटोनी । दु:खी जाहलीस काय सांगे ॥ ७४ ॥ किंवा पुढें वृषलजन । भोगितील ह्मणोन । पीडा पावलीस दारुण । काय सांगे ॥ ७५ ॥ किंवा देवांचे यज्ञभाग । दैत्यीं हिरोनि नेले चांग । ह्मणोनि तुझें अंतरंग । दु:खित झालें कीं जननी ? ॥ ७६ ॥ यज्ञ न केलिया देवरावो । वृष्टी न करी स्वयमेवो । ह्मणोनि शोचिसी सावेव । काय सांगे ? ॥ ७७ ॥ कीं अपराध कांहीं नसतां । पती सोडिती वनिता । तिया दीन पाहोनि तत्वतां । रडसी काय? ॥७८॥ कीं धनाचियासाठीं । ह्मातारिया कन्या अर्पिती गोमटी । ऐसिया हिंसक बापासाठीं । शोचिसी पोटीं काय सांगे ? ॥ ७९ ॥ कीं साबरी मंत्र पढती ब्राह्मण । शूद्र करिती वेदपठन । हा निषिद्धाचार पाहोन । रडसी काय जननीये ? ॥ ८० ॥ कीं वेदविद्ये निश्चिति । ब्राह्मण योजिती भलते अर्थी । एवं कुमार्गी रत सरस्वती । पाहुनी शोचिसी काय माते ? ॥ ८१ ॥ किंवा सोडोनि तपज्ञानानुभवा । ब्राह्मण करिती नीचसेवा । हा आचार न वाटोनि बरवा । रडसी

बळ पूर्ण । जीवकर्मे अंतर्यामित्वेंकरून । निज वर्तमान सर्व देखे ॥ १७ जो गुणकर्मविभागेंकरून । निर्मी ब्राह्मणादि वर्ण । तथापि अकर्तृपण । न मोडे ज्याचें ॥ १८ ॥ पंचभूतें आपसांत । वैरी असोनि समस्त । देहीं वर्तती मैत्रीयुक्त । हें पाटव अघटित जयाचें ॥ १९ ॥ जयाच्या पोटां आला रतिपती । तयाची कवणा वर्णवे कान्ती । जयाच्या धैर्यें धर्मस्थिर्ता । त्रिभुवना ॥ १२० ॥ जयाचें एवढें मृदुपण । आपुलें सोडोनि निर्गुण । भक्तानुग्रहाकारण । झाला सगुण जगदात्मा ॥ २१ ॥ प्रगल्भता आणि शीळ । विनय ओज आणि बळ । हें ऐश्वर्य सकळ । असे विमळ यदाश्रयीं ॥ २२ ॥ तेंवी गंभीरता आणि स्थिरपण । आस्तिक्यें त्रिकालाबाध्य आपण । कीर्ति मान्यता आणि निरभिमान । हे आणि इतरही गुण अखंड पूर्ण जेथ वसती ॥ २३ ॥ मूळ 'नित्य' पदावरून । न नाशे यदनध्यस्तविवर्तपण । तो गुणपात्र श्री भगवान । गेला टाकोन मजलागीं ॥ २४ ॥ अतिचंचल सिंधुनंदिनी । तीस बैसला अंकीं घेउनी । मी जड ह्मणोनी काय मोक्षदानी । गेला टाकोनि मजप्रति ॥ २५ ॥ लोकांसहित कलीच्या हातीं । मज देवोनियां श्रीपती । कोणत्या पापें कैवल्यमूर्ती । सोडोनि मजप्रति गेला हो ॥ २६ ॥ मज विरहदुःख अतिदारुण । तुझेंही कोणी न करी रक्षण । देवर्षि पितर आश्रम वर्ण । शोच्य संपूर्ण वाटती ॥ २७ ॥

॥ पद ॥

तो मज टाकुनि गेला श्याम ॥ ध्रु० ॥ यत्पदकमला सेवी कमला । सोडुनि स्वकमलधाम ॥ तो मज ० ॥ १ ॥ ब्रह्मादिक बहुदिन तप तपती । मनिं यत्करुणाकाम ॥ तो मज० । २ । ती सागरनंदिनी जयाचा । चरण आठवी वाम ॥ तो मज० ॥ मिळवाया पुढती मी जपते । ज्ञानेश्वरगुरुनाम ॥ ४ ॥ तो मज० ॥ २८ ॥

॥ ओव्या ॥

ध्वज अंकुश आणि पंकजनन । इत्यादि जयाचें चरणभूषण । तत्पादनिक्षेपें चिन्ह । हृदयीं माझ्या शोभती ॥ २९ ॥ तया पादचिन्हालंकृती । एवढी शोभा मजप्रति । मी मर्त्याश्रिता अमृतवती । झाहली स्वयें ॥ १३० ॥ मजवरी राहती जे जे जन । तया अवश्य आहे मरण । परी

पाहोनि गोविंदचरण । पावती पूर्ण अमृतत्व ॥ ३१ ॥ भगवच्चरणरज-संपत्ती । मज मिळालिया निरुती । शोभा त्रिलोकापरौती । पावली माते ॥ ३२ ॥ स्वर्गीतूनि पुण्य क्षीण । झालिया देव होती पतन । तें पाहोनि मम विस्मित मन । जगज्जीवनसंगतीं ॥ ३३ ॥ ऐसी गर्वान्विता अखंड । भगवच्चरणयोगिनी प्रचंड । परी शेवटीं पावलें दंड । अभिमानाचा ॥ ३४ ॥ ऐसें मी गर्वान्वित पोटीं । ह्मणोनि परमात्मा जगजेठी । सोडोनि गेला शेवटीं । विरहकाठी हाणोनी ॥ ३५ ॥ तो अंतरतां मन-मोहन । मी जाहलें हतप्राण । आतां कोणाचे पाहूं चरण । या शोकें मन दुःखित ॥ ३६ ॥

॥ शुद्धकामदा ॥

असुरवंश जे सर्जिती मैला । बहुत भार तो साहिना मला ।
विनवितां तदा येउनी हरी । त्वरित जो बळें दुष्ट संहरी ॥ ३७ ॥

॥ ओव्या ॥

अक्षौहिणीशतांचीं शतें । वीर पाडोनि मृत्युगर्तें । निजप्रयत्नें जेणें तूतें । चतुष्पाद पैं केले ॥ ३८ ॥ अभिप्रावो या वचनाचा । ऐसाचि असे साचा । कीं युगायुगीं धर्माचा । ऱ्हास होय ॥ ३९ ॥ तेव्हां निजप्रयत्नें-करून । धर्म होऊं शके पूर्ण । हेंचि साभिप्राय वचन । बोलिलें मूळीं ॥ १४० ॥ धर्माचे चारी चरण । कृतयुगीं संपूर्ण । तो द्वापारीं हीन । द्विपाद झाला ॥ ४१ ॥ तेव्हां अवतरोनि जगन्निवास । पौरुष्यें पूर्ण केलें धर्मास । यालागीं कालबळीविश्वास । न करावा कोणीं ॥ ४२ ॥ भगवत्सहायें प्रयत्नाधीन । कालही वश होय पूर्ण । यालागीं कलियुग आहे ह्मणून । धर्मखंडन न कीजे ॥ ४३ ॥ 'सामर्थ्य आहे चळवळी-चें । जो जो करील तयाचें । परी तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे' ॥ ४४ ॥ या श्रीसमर्थवचनीं । विश्वास ठेवावा आवडीकरूनी । बळेंचि मन इंद्रियें रोधुनी । आणावा धरणीं जगत्पती ॥ ४५ ॥ युगाचें पाहो-नि बळ । सज्जनीं यत्न करावा प्रबळ । तेणें अवश्य वैकुंठपाळ । प्रगटे हृदयीं ॥ ४६ ॥ मग जो व्यष्टिहृदयीं प्रगटे । तोचि समष्टिब्रह्मांडीं थाटे ।

---

१ मळाला.

तेथ कालबल नेटे । कांहीं न करी ॥ ४७ ॥ ह्मणोनी कालदैवादिवाद । स्वयें जाणोनि असिद्ध । भगवत्सहायें प्रयत्नवाद । नित्य सिद्ध आश्रयिती ॥ ४८ ॥ ऐसी जयाची ख्याती । तो परमात्मा जगत्पती । सोडोनि मज अबलेप्रती । अदृष्य निश्चिती जाहला ॥ ४९ ॥

॥ गीति ॥

कोण सहन तद्विरहा करिल स्त्री यत्स्वरूप पाहोनी ।
श्रुति मुनिवर कामान्वित आलिंगिति गोपिजन्म लाहोनी ॥ १५० ॥

॥ ओव्या ॥

जयाचें प्रेमें अवलोकन । पाहोनी मोहे मुनींचें मन । आणि सुंदर हास्यवदन । पद निर्वाण लाजवी ॥ ५१ ॥ तया हास्यवदनीं ऐसा भावो । कीं मद्भक्तितृप्ता अपवर्ग वावो । यालागीं धरी सावेव । प्रेमावलोकू ॥ ५२ ॥ निद्रेंत निर्मिले वेद । जे श्वासोच्छ्वास प्रबंध । तेथ तीन वर्णांतें शुद्ध । अधिकार कीरू ॥ ५३ ॥ यालागीं स्त्रीशूद्रा प्राणियां । मधुर मधुर बोलोनियां । उदित निजपद द्याया । करुणान्वित ॥ ५४ ॥ मधु बोलिजे विषयरस । तेथ जियांचा मान विशेष । मधुमानिनी त्या स्त्रियांस । बोलिजे कीरू ॥ ५५ ॥ त्या मधुमानिनींची स्थिरता । विषयीं पाहोनि सर्वथा । जो मधुर भाषणेंचि तत्वतां । निष्काम करी ॥ ५६ ॥ स्त्रियांचें विषयस्थैर्य मोडुनी । चित्त स्थापी आपुले चरणीं । मूळ 'समान' पदाचा ध्वनी । कीं काम निर्वाणी हरि नव्हे ॥ ५७ ॥ कामविकारा विषमता । तेथ न शोभेचि समता । आणि समान ऐसिया अर्था । मूळ द्योती ॥ ५८ ॥ ह्मणोनि स्त्रियांचें कामस्थैर्य । स्वयें मोडोनि यादवराय । उच्चनीचता हरुनी अपाय । निजभक्तिउपाय दाखविता ॥ ५९ ॥ परी येथ ऐसें करिती कोणी । धर्मासी ह्मणे कुंभिनी । जो तुज स्थापी अवतरोनी । तो मोहुनी घेईल कामिनी हें कल्पांतीं घडेना ॥ १६० ॥ परी हा नेणोनि अभिप्रावो । मूढ विषयी ह्मणती माधवो । परी स्त्रियांचा शुद्ध स्वभावो । करावया सावेव कृष्णलीला ॥ ६१ ॥ सकलशरीरसमर्पण । स्त्रियांनीं आधीं पतीस करून । प्रेम जिंकावा तेथून । जेणें सत्वगुण

वाढता ॥ ६२ ॥ पतिविरुद्ध विकारप्राप्ती । न उठावी ऐसी स्थिती । झालिया एकाग्रमती । भूमिका सांपडे ॥ ६३ ॥ मग वाढलिया सत्वगुण । पतीचा मांसमय देह पूर्ण । तेथ प्रेममय भावना करून । जावें विसरून निजदेहा ॥ ६४ ॥ तो निजदेह विसरतां । न भासे पतीची मांसमयता । मग प्रेममूर्तीचि तत्वतां । प्रगट होय ॥ ६५ ॥ तया प्रेममूर्तीमाझारीं । सत्वास्तव प्रगटे हरी । एवं पतिभक्ति करतां दूसरी । कृष्णभक्ति सांपडे ॥ ६६ ॥ मग लागलिया श्रीहरिभजनीं । विसरे नर आणि कामिनी । परी अत्यंत चित्तावेश चेतनीं । विरहा-वांचुनी घडेना ॥ ६७ ॥ जरी झालें भगवद्दर्शन । तरी भगवदाकार नोहे मन । तेंचि विरहेंकरून । हरिमय पूर्ण होतसे ॥ ६८ ॥ संयोगीं वियोगोपलालन । तें हें शुद्धप्रेमलक्षण । तयाचा विरह कवण । करील सहन सांग धर्मा ॥ ६९ ॥ पृथ्वीवचनीं भाव ऐसा । कीं मी स्त्री समष्टिठसा । मज विरह साहिना सहसा । तरी व्यष्टि स्त्रिया केंवि साहती ॥ १७० ॥ मज आवडे जगज्जीवन । ह्मणोनि मजवरी जितुके जन । तितुकियालागीं रमण । गोंविंदचरण जाणपां ॥ ७१ ॥ 'कोण' या प्रश्नस्थिती । धर्मास ऐसें सांगे क्षिती । कीं मी विरहिणी तैशा युवती । सकलही असती हरिप्रिया ॥ ७२ ॥ 'वासुदेवपुमानेकःस्त्रीरूप-मितरज्जगत् ' ही अवलंबितां स्मृती । कृष्ण पुरुष विश्व युवती । जो कधींच न विसरे आपणाप्रती । पुरुष निश्चिती तोचि ह्मणे ॥ ७३ ॥ पुरुष असती बुद्धिवश । यालागीं नारी ह्मणिजे जनांस । पती परमात्मा जगन्निवास । पावोनि होणें तद्रूप ॥ ७४ ॥ तयाच्या सरळ आंगोळिका । चालतां मजवरी समुद्रिका । उमटती सामुद्रिक रेखा । तेणें उत्सव देखा मम मनीं ॥ ७५ ॥ 'सस्यादि ' मिषेंकरून । मी रोमांचित पूर्ण । माझें आनंदाश्रुजीवन । प्रवाह जाण नदीचे ॥ ७६ ॥ एवं दृष्ट भौतिक स्थिती । वस्तु अदृश्य अधिदैवतीं । पृथ्वी सांगे धर्मा-प्रति । मज ही स्थिती कोठवरी ॥ ७७ ॥ विरहें संतप्त जाहलें मन । शोकें आरक्त लोचन । भेटलीयावीण कृष्ण । दुःखमोचन कदा नव्हे ॥ ७८ ॥ ऐसा धर्मपृथ्वीचा । संवाद ऐकतांचि साचा । पूर्व-वाहिनी सरस्वतीचा । करी आश्रय कुरुक्षेत्रीं ॥ ७९ ॥ सकळ सौख्या

अधिष्ठान । श्रीसद्गुरुज्ञानेश्वरचरण । तेथ चौदावें सखीप्रेषण । असो समर्पण सद्भावें ॥ १८० ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे प्रिय-
लीलामहोत्सवे आमंत्रणविलासे धर्मपृथ्वीसंवादादिवर्णनं
नाम चतुर्दशसखीप्रेषणम् ।
॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण १५ वें.

॥ ओव्या ॥

सकळ मंगळामाजीं मंगळ । श्रीगुरूचें चरणकमळ । जे स्मरतांचि विमळ । जाऊनि किडाळ बुद्धि होय ॥ १ ॥ तेंचि सुलग्न सुदीन । तारा शशि दैव बल पूर्ण । जो आळंदीवल्लभचरण । प्रेमेंकरून आठवी ॥ २ ॥ त्रासोनियां जीवपणा । यावया आपुलिया स्थाना । ईश्वरही करूनि प्रार्थना । मुहूर्त पुसे जयातें ॥ ३ ॥ योग सांख्य आणि वेदांत । या महावनीं जो वसंत । जयाची कृपा अखंडित । ब्रह्मकरी जीवाचें । ४ । असतां नसतां जगत्सत्ता । जयाच्या चरणां अखंडता । तेथ वाहोनि तनु मन वित्तां । नमन केलें साष्टांग ॥ ५ ॥ सूत ह्मणे ऋषीप्रती । पुढें अवधान असावें प्रीतीं । ही भागवतकथा सरस्वती । ब्रह्ममय मती सकलां दे ॥ ६ ॥ तया सरस्वतीतीरीं । एक देखिला दंडधारी । जो राज-चिन्हित शूद्रशरीरी । पीडित निर्धारी गोवृषभा ॥ ७ ॥ एकपाद वृषभ होय । रुदित देखिली गाय । तें पाहोनि आश्चर्य । परीक्षिद्राय पावला ॥ ८ ॥ मग रथारूढ धनुर्धारी । स्वयें पुसत निर्धारी । कोण तुम्ही रूपधारी । देव द्विज कीं मनुष्य ॥ ९ ॥ दूर गेलिया नारायण । मी करीत असतां गोरक्षण । तुम्हां हें दुःख दारुण । तरी धिक् धिक्

जीवित पैं माझें ॥ १० पतिव्रता आणि गुणवती । ऐसी लाधोनियां युवती । जरी पोशीना मूढ पती । तरी धिगायुःस्थिती तयाची ॥११॥ गृहीं जागा असोनि अपार । जो पांथस्था न दे बिढार । तरी तयाचें श्मशान घर । हा निर्धार ओळखे ॥ १२ ॥ जवळीं आहे अन्नपात्र । घरां अतिथी आलिया पवित्र । जो भरोनि राहे उदरमात्र । असो धिःकार तदायुषा ॥ १३ ॥ जिणें नव मास पाळिलें पोटीं । पयःपाजोनि दिली पुष्टी । ते माय सोडी स्त्रियेसाठीं । धिक् धिक् शेवटीं जिणें त्याचें ॥ १४ ॥ आयुष्य असतां क्षणभंगुर । अन्न खावोनि पोखी शरीर । घरांत रडती नारी पोर । असो धिःकार तदायुषा ॥ १५ ॥ वेद न पढे असोनि विप्र । दीन न पाळी असोनि शूर । दान न करी चालोनि व्यापार । असो धिःकार तदायुषा ॥ १६ ॥ शूद्रजन्म पावोनि बरवा । गर्वें न करी गोविप्रसेवा । धरी वेदबाह्यठेवा । धिःकार जीवा तयाच्या ॥ १७ ॥ हा सकळ धिःकारसमुदाय । तया एकाच्या शिरीं होय । जो कमलसौरसीं गुंतूनि ठाय । न दे आश्रय परागा ॥ १८ ॥ भोगासाठीं श्रीमंत । भोग पशुयोनींतही प्राप्त । यालागीं असो शक्त वा अशक्त। भावें भगवंत भजावा ॥१९॥ केवळ भक्षोनियां तृण। पशूनें चित्त समाधान । लक्ष्मीवंत भोगोनि बहु धन । बंधुबंधूंत वैर करी ॥ २० ॥ शीत ऊष्ण करितां सहन । दरिद्रियांचें समाधान । बाहेर निघतां लक्ष्मीवान दीन दुःखित बहु होती ॥ २१ ॥ इतरांच्या स्कंधावरुती । धनिक शिबिकेंत बैसूनि जाती । परदुःख नेणोनि विषयीं गुंतती । आणि दरिद्री असती सावध ॥२२॥ ऐसा श्रीमान आणि श्वान । मी स्वयें लेखे समान । सनातनब्रीद हें ह्मणोन । करावें हनन दीनदुःख ॥२३॥ रडतिया पाहोनि तान्हिया बाळा । मायेस न सांवरे कळवळा । तैसा दीन पाहोनि प्रेमउमाळा । तो भूमंडळा पुरुष धन्य ।२४। यास्तव माझी जोंवरी सत्ता । तोंवरी वाहोनि तनुमनवित्ता । मी जीवेंभावें निववीन आर्ता । जैसे सुता बापमाय ॥ २५ ॥ यालागीं नरनारायण । जरी गेले पृथ्वी सोडोन । तरी अभय असो तुम्हांकारण । मी वधीन या वृषलातें ॥ २६ ॥ तुम्ही दुःखित अति आर्त । वरी दिसतां कृष्णभक्त । मीही हरिपदमुद्रांकित । यास्तव त्वरित भय सोडा ॥ २७ ॥ मग म्हणे वृषलाप्रति । कोण तूं

असती दुर्मती । तुझेनि दीन दुखावती । माझेनि हातें मरशील ॥२८॥ मग वृषभा म्हणे पुढतीं । तव पादत्रयोच्छित्ती । करणार कोण क्षितीं । ते मजप्रति निरोपी ॥ २९ ॥ पांडवें करोनि महीरक्षण । कृष्णकृपें मज देऊन । श्रीकृष्णमय आपण । पुण्यसंपन्न ते झाले ॥ ३० ॥ तया राज्यांत तुमच्या नयनीं । अश्रुप्रवाह निरखोनी । अत्यंत दुःख वाटे मनीं । दीनरक्षणीं ब्रीद माझें ॥ ३१ ॥ निरपराधी जन असतां । कोणीं बळें तया छळितां । तरी तो होकां सुरावरौता । तया मी शास्ता शास्त्रशस्त्री ॥ ३२ ॥ ऐसी परीक्षिद्रायवाणी । ऐकोनि धर्म कल्याणदानी । म्हणे राया पंडुवंशालागुनी । उचित निर्वाणी वदसी तूं ॥ ३३ ॥ तो जीव एक भाग्याचा । जया जन्मग्रहणसमयीं मायबापाचा । सत्संग मिळोनि साचा । अज्ञात परिणाम चित्तीं होय ॥ ३४ ॥ तो परिणाम ज्ञात होऊन । वंश उद्धरिती नंदन । धर्मनिष्ठ तुझे वरिष्ठ ह्मणून । तद्वीर्यसंगेन तूं तैसा ॥ ३५ ॥ त्वां कोण ह्मणोनि पुसिलें माते । तरी ऐके सावधचित्तें । मजसाठीं तत्ववेत्ते । वाद निर्मिती अनंत ॥ ३६ ॥ येथ पैं माझिया-साठीं । विकल्पयुक्त होवोनि पोटीं । आपुलाल्या मतें गोष्टी । संशय गांठी आश्रयिती ॥ ३७ ॥ कोणी जे कीं नास्तिक । ते ईश्वर न मानोनि एक । आणि निषेधोनि कर्म सम्यक । कामहेतुक विश्व ह्मणती ॥ ३८ ॥ कोणी पूर्वमीमांसक । ते कर्म मानिती जीवतंत्रक । निषेधिती जगन्नायक । वाचाबळें ॥ ३९ ॥ जोतिषी एक होती कोणी । ते ग्रह मानिती कर्मफळदानी । दैववाद अधिष्ठुनी । सकाम मनीं सर्वदा ॥४०॥ नैय्यायिक ह्मणती ईश कर्ता । पौराणिक जगत्पिता । मनोवागगोचर वेदान्ता । ज्ञान ब्रह्म ॥ ४१ ॥ सांख्य स्थापिती पुरुषप्रकृती । पाशुपत ह्मणती पशुपती । शाक्त स्थापिती भगवती । निज निज मतीअनुसार ॥ ४२ ॥ ऐसे नाना मतभेद । मज जाणावया सिद्ध । परी एखादाचि विशद । ओळखे माते ॥ ४३ ॥

॥गद्य॥ **शिष्य उवाचः**—भगवन् हीं सर्व मतें परस्परविरुद्ध असल्या-मुळें प्रतिषेधपर्यवसायी आहेत. ह्मणून कोणतें खरें हा निश्चय होत नसल्यामुळें मला वाटतें वैणयिकमताचा, स्याद्वादाचा किंवा अज्ञेय-वादाचा स्वीकार करणें बरें.

**श्रीगुरुरुवाचः**— तुझ्या शंकेचें समाधान झालें नाहीं तर पुढें या तीन मतांतून एकाद्याचा स्वीकार कर. परंतु प्रथम माझें उत्तर ऐकण्याकरितां अवधान असूं दे. वैणयिकांचें मत असें आहे कीं विरुद्ध विरुद्ध भाषण करणारेही सर्वच आप्त आहेत. हें मत सृष्टींतच आतां नामशेष झालें आहे. समंतभद्रांनीं गंधहस्तीमहाभाष्याच्या आप्तमीमांसा' नामक उपोद्घातांत खंडनार्थ त्याच्या मताचें दिग्दर्शन केलें आहे; आणि वसुनंदींनीं आपल्या देवागमवृत्तींत स्पष्ट केलें आहे. या वैणयिक मतांत सिद्धांत स्थापन करतांच येत नाहीं. केवळ आपल्या कोत्या बुद्धीमुळें सर्वांवरते पूज्य बुद्धि ठेवून यानें हें मत प्रसिद्ध केलें असावें. दुसरें, स्याद्वादी लोकांचें ह्मणणें तूं अंगिकारूं पाहतोस तेंही बरोबर नाहीं; कारण प्राचीन स्याद्वाद स्ववचनविहत आहे आणि अर्वाचीन स्याद्वाद ज्ञातृनिश्चयविहत आहे. प्रथम प्राचीन स्याद्वादी जैन आहेत. त्यांनीं आपल्या स्याद्वादाचें निरूपण तत्वार्थसूत्र, आप्तमीमांसा, व स्याद्वादमंजरी इत्यादि ग्रंथांचें ठिकाणीं केलें आहे. तेथें असें ह्मटलें आहे कीं, वस्तूचें ठिकाणीं एक धर्म राहत नसून अनेक धर्म राहतात; परंतु कांहीं स्याद्वादी सर्वथा अनेक धर्म राहतात असें ह्मणतात. एकाच ठिकाणीं परस्परविरूद्ध धर्म राहूं शकत नाहींत. प्रकाश व आंधार, जीवनमरण, आणि सुखदुःख एकाच ठिकाणीं राहूं शकत नाहींत. ही कोटी प्रविष्ट होऊं नये म्हणून नवीन आर्हतवादियांनीं स्वकाल, स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वभाव या अपेक्षेनीं जो धर्म राहतो त्याच्या विरुद्ध धर्म परकाल, परद्रव्य, परक्षेत्र, परभाव यांच्या अपेक्षेनीं राहतो अशी कोटी लढविली.

**शिष्यः**— महाराज! मला याचा अर्थ समजला नाहीं.

**श्रीगुरुः**— ऐक तर. स्पष्ट करून सांगतों. सन्मुख हा घट आहे. हा जेव्हां आहे, तेव्हां आहे; घट आहे, ह्मणून आहे; जेथें आहे, तेथें आहे; जो आहे, तो आहे. परंतु मागच्या कालाच्या अपेक्षेनें किंवा

---

१ समंतभद्र हे जैनांचे आचार्य होऊन गेले. २ वसुनंदी हे त्यांचे टीकाकार होते.

ध्वंसावच्छिन्न भविष्यत्कालाच्या अपेक्षेनें तो नाहीं, आणि पटाच्या अपेक्षेनेंही तो नाहीं, पटाच्या ठिकाणीं नाहीं, आणि पटत्वाच्याअपेक्षेनेंही नाहीं. समजलेंना तुला?

शिष्यः– बरें, पुढें यापासून काय निष्कर्ष निघतो?

श्रीगुरुः– निष्कर्ष कांहींही निघो. तुझ्या ध्यानांत आलें याचेंच मोठें आश्चर्य वाटतें. मी तुला विचारितों, भूत किंवा भविष्यत् कालाच्या अपेक्षेनें घट नाहीं व वर्तमान कालाच्या अपेक्षेनें घट आहे, ह्या दोन्ही वृत्ती एकसमयावच्छेदेंकरून तूं मनांत कशा आणतोस ? किंवा वर्तमान कालांतही पटावच्छिन्न वर्तमान कालाच्या अपेक्षेनें घट नाहीं व घटावच्छिन्न वर्तमान कालाच्या अपेक्षेनें घट आहे, हें तरी तुझ्या मनांत कसें येऊं शकतें? कारण, वर्तमान कालाचा अवच्छेद्यभेदसाधक घटपट संभवत नाहींत; कारण घटपट वर्तमानकालावच्छिन्न आहेत आणि वर्तमान काल घटपटावच्छिन्न आहे, असें मानलें म्हणजे अन्योन्याश्रय होतो. द्रव्य, क्षेत्र, भाव हे एका वस्तूचें चित्तांत आले ह्मणजे दुसऱ्या वस्तूचें चित्तांत येईपर्यंत तदाकारवृत्तीचा स्वीकार करावा लागतो.म्हणून तदाकारवृत्तींत अन्याकारवृत्तीची अपेक्षा संभवत नाहीं। आणि सर्वच गोष्टींत सर्वापेक्षा नाहीं. कारण तसें मानलें तर मनुष्याच्या पुत्रोत्पत्तीसाठीं कदाचित् मकरवीर्याचीही अपेक्षा लागावी; किंवा शस्त्र तयार करण्याला वंध्यापुत्राच्या अस्थीचीही अपेक्षा लागावी. आतां, वंध्यापुत्र नाहीं ह्मणून त्याची अपेक्षाच नाहीं, असें कांहीं जैनमत ध्यानांत आलेल्या तुला ह्मणतां यावयाचें नाहीं; कारण वंध्यापुत्रखपुष्पादिक यद्यपि तुमच्या अपेक्षेनें नसतील तथापि ते स्वकालादिअपेक्षेनें आहेतच;आणि अपेक्षाही कदाचित् असेल नसेल. तर मग अनेकांतच कशाला पाहिजे? असावा एकांतही. तात्पर्य, संशयाप्रमाणें अप्रमाण ह्या अनेकांतवाद संमत नाहीं. 'नैकस्मिन्नसंभवात्' या ब्रह्मसूत्रांत व त्याच्या भाष्यांत अनेकांतवादाचा निरास केला आहे. अनेकांतवादाचा स्वीकार केला म्हणजे जैनमतांतील पदार्थसिद्धीही संभवत नाहीं. जैनमतांत संक्षेपतः जीव आणि अजीव असे दोनच मुख्यतः पदार्थ आहेत. तथापि बालबोधाकरितां विस्तारानें उमास्वामी-

कृत तत्वार्थसूत्रांत पदार्थ सातच बोलिलें. 'जीवाजीवास्रवबंधसंवरनिर्जरामोक्षास्तुतत्वम्' । ( तत्वार्थसूत्र अध्याय १ सूत्र ३ ) जीव ह्मणजे मी मी म्हणणारें चेतन. अजीव म्हणजे ज्याला पुद्गल म्हणतात असा जड समुदाय. आस्रव म्हणजे खाले पडणारे पदार्थ. बंध म्हणजे संसार. संवर, निर्जरा स्पष्ट आहेत. मोक्ष म्हणजे ज्ञानावरणीयादि कर्मांचा नाश होऊन आर्हतगतीला प्राप्त होणें. आतां, अनेकांतवादाप्रमाणें कदाचित् मोक्षाला बंध व बंधाला मोक्ष ह्मणण्याला कोणता प्रत्यवाय आहे? सारांश, हा प्राचीन स्याद्वाद संमत नाहीं. या स्याद्वादखंडनानेंच पंचास्तिकायवादाचें खंडन झालें. आतां, अर्वाचीन जो संशयवाद त्यांत कांहींच अर्थ नाहीं. कारण हा संशय आहे अशा प्रकारची संशयाला जाणणारी वृत्तीही संशयच आहे काय ? संशय असेल तर अनवस्था येते, आणि अनवस्था मानाल तर आंधारानें जसा आंधार दिसत नाहीं, तसा अनवस्थेनें अनवस्थेचा निर्धार होऊं शकत नाहीं; आणि निश्चय मानला तर संशयवादाची समाप्ती होते. याप्रमाणें तूं काढलेला अज्ञेयवादही योग्य नाहीं; कारण अज्ञेयाचा ज्ञाता अज्ञेय आहे असें म्हणणें म्हणजे ज्ञात्याला ज्ञेयाच्या कोटींत आणून पाहण्यासारखें होतें. आणि ज्ञातृभिन्न वस्तु अज्ञेय आहेत तर त्यांचें अज्ञेयत्वही अज्ञेय आहे काय ? अज्ञेयत्व अज्ञेय मानण्याइतका तूं मूर्ख नसलास तर अज्ञावच्छिन्न ज्ञेय अशा त्या वस्तु आहेत असें ह्मणणें भाग आहे. आणि असें एकवेळ म्हटलें ह्मणजे वेदान्ताचा मायावाद बळेंकरूनच गळीं आला. मायेला सामान्यचैतन्य स्फूर्ति देणारें आहे व चैतन्याविकांवांचून सत्तेची प्रतीति नाहीं. म्हणून सच्चिदानंदस्वरूप असें जे जाणतात त्यांचाच निश्चय खरा आहे. हें धर्मोच्या म्हणण्यांतील तात्पर्य समजलास ?

**शिष्य उवाचः**— भगवन्, माझ्या सर्व आक्षेपांचें निराकरण झालें, तथापि वचनपीयूषपिपासामय शुद्ध जिज्ञासा प्रभुवांचून कोण शांत करील?

**श्रीगुरुरुवाचः**— सर्वांग श्रोत्रमय करून श्रवण कर.

॥ ओव्या ॥

धर्म ह्मणे दुःखदाता । कोण मी नेणें नृपनाथा । तूं विचारूनि आपुले चित्ता । उचित तत्वतां करावें ॥ ४४ ॥ अथवा सुखदुःख देया- वया । अघटितघटनापटु हरिमाया । अनिर्वचनीय ह्मणोनि तिया । भूत जाणावया असमर्थ ॥ ४५ ॥

॥ गीति ॥

ऐकुनि वचन तयाचें राय ह्मणे तूंचि धर्म कळलासी ।
नाशकाहि सुखचिंतक मौन धरुनि करुणजलद वळलासी ॥४६॥
तूं भगवत्सत्वतनू विचरसि घेवोनि रूप वृषभाचें ।
निजकरुणेच्या योगें कल्याणचि कारिसि नित्य ऋषभाचें ॥ ४७ ॥

॥ ओव्या ॥

तपःशौच दया ऋत । हे पाय तुझे चार यथार्थ । कृतयुगीं समर्थ । परमार्थदाता तूं एक ॥ ४८ ॥ त्रेतायुगीं गर्वेंकरून । तुझा तपःपाद झाला क्षीण । द्वापरयुगीं आसक्ति वाढून । शौचचरण क्षीण झाला ॥ ४९ ॥ पुढें दयापाद मदेंकरून । देखत देखत झाला क्षीण । एक सत्यपाद अवस्थान । राहिला असे ॥ ५० ॥ या सत्याचेनि योगेंकरोनी । आत्मतृप्त होवोत प्राणी । किंवा धर्म साधोनी । घेवोत फळ यथातथा ॥ ५१ ॥ परी तोही अनृतेंकरून । पाद करावया क्षीण । हा शूद्र गृहीतराजचिन्ह । मियां कली आपण वळखिला ॥ ५२ ॥ ही माय ओळखिली धरणी । पुढें शूद्र मज भोगितील ह्मणूनी । अश्रू आणूनियां नयनीं । दीनवाणीं रडतसे ॥ ५३ ॥ परी माझें हें हृदय । जंव वसवीत यादवराय । तंव तुह्मा मी सांगे स्वयें । असावें निर्भय सर्वदा ॥ ५४ ॥ एवं धर्म आणि पृथ्वीप्रती । आश्वासूनीयां भूपती । खड्ग घेउनियां हातीं । मारावया कलीवरती धांवला ॥ ५५ पाहुनि रायाचा उद्यम पूर्ण । कलीनें घातलें लोटांगण । तें पाहूनि राय आपण । ह्मणे भय मजपासोन तुज नाहीं ॥ ५६ ॥ धरा सोडील धरणीधर । पश्चिमे उगवेल सहस्रकर । परी सोमवंशीचे नरवीर । शरणागता व्याघ्र न होती ॥ ५७ ॥ ऊष्ण होईल रोहिणीवर । शीतल होईल वैश्वानर । परंतु अर्जुनसुतकुमर । शरणागतसंहार न करिती

॥ ५८ ॥ परी एक आइके माझें वचन । तुवां एथ न करावें स्थान । या ब्रह्मावर्तीं सकळ जन । धर्मेंकरून वर्तती ॥ ५९ ॥ यज्ञ दान हरि-भजन । येथ अवघे करिती सुजन । तूं तंव अधर्माची खाण । यास्तव हें स्थान त्यजावें ॥ ६० ॥ तैं कली ह्मणे कुरुराया । मी सोडितों स्थाना यया । परी मज राहावया । स्थान कोणी दाखवी ॥ ६१ ॥ महाराज तव आज्ञेंकरून । मियां वसवावें कवण स्थान । मग स्त्री हिंसा द्यूत मद्यपान । दिधले दाखवून रायें तया ॥ ६२ ॥ स्वर्ण दिधलें तयाप्रति । दंभ मद मान वैरवृत्ति । त्याबरोबरी पुढतीं । दिधली तया ॥ ६३ ॥ यास्तव मद्यपान द्यूता । हिंसा आणि कनक कान्ता । कोणीं सेवूं नये सर्वथा । कल्याणआस्था धरूनी ॥ ६४ ॥ मग तपादिकांची प्रवृत्ति । भूपाळें करूनि पुढतीं । चतुष्पाद धर्माप्रति । देऊनि कीर्ति वाढविली ॥ ६५ ॥ या कथेचा अभिप्राय । कीं युग-स्थापिता होय राय । ऐसी महाभारतीं सोय । कुंतिवचनाची ॥ ६६ ॥

॥ श्लोक ॥

'कालोवाकारणंराज्ञःराजावाकालकारणम् ।
इतितेसंशयोमाभूद्राजाकालस्यकारणम्' ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

कुंति ह्मणे धर्मातें । राव कारण काळातें । कीं काळ कारण रायातें हा संशय चित्तें धरूं नको ॥ ६७ ॥ कृत त्रेत द्वापार । कलियुगादि करणार । रावचि एक निर्धार । चित्तीं धरी ॥ ६८ ॥ जेव्हां सद्धर्मी नृप जाण । धर्में करी प्रजापालन । तेव्हां कृतयुगनामें आपण । प्रवर्ते काळू ॥ ६९ ॥ आपुलाले धर्म आचरती वर्ण । परी द्वेषें न मळे अंत:करण । सुखी असती सर्व जन । सदा प्रसन्न अंतरीं ॥ ७० ॥ सर्व ऋतु निरामय । दीनां सर्वत्र बापमाय । किंबहुना दैन्यचि होय । वाचारंभणमात्र कीं ॥ ७१ ॥ तंव शिष्य करी प्रश्न । कृतयुगीं आप-ण स्थापिले वर्ण । आणि एकादशस्कंधीं हंसवर्ण । एक होता हें नि-रूपिलें ॥ ७२ ॥ तैं सद्गुरु ह्मणती शिष्यराया । धन्य तुझी प्रज्ञा-चर्या । तरी श्रोत्रमय काया । करूनि ऐके ॥ ७३ ॥ दंडें राव कृतयुग

प्रवर्ती । तेव्हां वर्णचतुष्टयें राहे कृतस्थिती । 'दंडनीत्यांयदा' ही उक्ती । यासाठीं भारतीं बोलिली ।। ७४ ।। दंडाविण स्वयें जरी । लोकीं स्वत्व वाढे भारी । बाह्य व्यवस्था नलगे तरी । ऐसिया कृतीं निर्धारी हंसवर्ण ।। ७५ ।। एवं भारतभागवतसमन्वय । तुज यथामती सांगितला होय । असो ऐसाचि त्रेतायुगही राय । प्रवर्तवी निजचर्या ।। ७६ ।। द्वापर आणि कलियुग । हेही रावचि प्रवर्तवी अंग । जैं सद्गुण चतुर्थांश करी त्याग । तैं त्रेतायुग प्रवर्ते ।। ७७ ।। अर्ध सद्गुण सोडी जेव्हां । द्वापर प्रवर्ते तेव्हां । प्रजा पिळोनि द्रव्य काढी जेव्हां । कली तेव्हां प्रवर्ते ।। ७८ ।। कृतयुगातें प्रवर्तवितां । तरी अक्षय सौख्य नृपनाथा । त्रेतायुगातें प्रवर्तवितां । किंचिन्यून सुख मिळे ।। ७९ ।। द्वापारातें प्रवर्तवितां । यथाभाग स्वर्गसत्ता । कलियुगातें वर्तवितां । नरक सर्वथा चुकेना ।। ८० ।। एवं महाभारतप्रमाणार्थ । तुज निरूपिला यथार्थ । याचा हाचि मुख्यार्थ । कीं कालबल अनृत होय यत्नें ।। ८१ ।। येथ रावपरीक्षितउदाहरण । जयानें कलि निग्रहून । धर्मपृथ्वीचें सांत्वन । केलें तो अजून गजपुरीं वसे ।। ८२ ।। जो श्रीकृष्णकृपें गर्भी पाळिला । युधिष्ठिरें सिंहासनीं बैसविला । तो महात्मा सकरुण भला । हास्तिनपुरीं नांदतो ।। ८३ ।। तुह्मी दीक्षावंत ब्राह्मण । सत्र करिता आवडीकरून । तें तयाचेंचि प्रभावें पूर्ण । चाले निर्विघ्न महर्षी हो ।। ८४ ।। ऐसिया कलिनिग्रहकाचें । आणि कृतप्रवर्तकाचें । आत्मयत्नवर्धकाचें । आयुष्य वाढो गुरुकृपें ।। ८५ ।। श्री ज्ञानेश्वर जगज्जननी । चिदानंदसुधाखाणी । प्रेमसूत्रीं कवितामणी । गुंफोनि तच्चरणीं वाहते ।। ८६ ।।

।। गीति ।।

अलकावतिपतिराया ज्ञानेश्वर गुरु अखंड सुखदाता ।
दासी दीन विनवितें जन्म जन्म चरणिं ठेविजे ताता ।। ८७ ।।

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे कलिनिग्रहोनाम पंचदशसखीप्रेषणम् ।

।। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।।

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

# सखीप्रेषण १६ वें.

॥ ओव्या ॥

मना सुखाचें अधिष्ठान । एक श्रीगुरुचे चरण । गुरुकृपेवीण पूर्ण । साधक जाण कदा नव्हे ॥१॥ भोगोनिया नाना कष्ट । शास्त्रें पढोनि अचाट । वैराग्यावीण ज्ञानोत्कट । नोहे हें स्पष्ट कां न कळे ॥ २ ॥ तूं विसरोनि आपआपणा । करिसी देहबुद्धि वल्गना । शेवटीं श्रीगुरुराणा । आठविसीना नवल हें ॥ ३ ॥

॥ छंद ॥

शिशु था तब तैं मन खेल कियो निजमीतनसूं लरिके लरिके ।
धनकामिनिलोभ कियो अति यौवन मान हृदें भरिके भरिके ।
अब पाय जरा नित रोवत है रुजतानलमो जरिके जरिके ।
सठ ग्यान सुरेशकृपाबिन तूं कईबेर भयो मरिके मरिके ॥ ४ ॥

॥ अभंग ॥

माता पिता बंधु सर्व गुरुराव । आणिक तो भाव असूं नये ॥ १ ॥ गुरु ब्रह्मदेव गुरु नारायण । पार्वतीरमण गुरु माझा ॥ २ ॥ गुरु हरि दोन्ही मानुनी समान । करावें भजन परप्रेमें ॥ ३ ॥ ज्ञानेश्वरकन्ये देवाहूनि गुरू । श्रेष्ठ हा विचारू मानवला ॥ ४ ॥ ५ ॥

॥ ओवी ॥

माझा आळंदीवल्लभू । लीलावतारी स्वयंभू ॥
माहेरीं सासरीं हृदयभू । शोभवी पितृपतित्वें ॥ ६ ॥

तें वर्णितां नव्हे वहिलें । सार्थक कदा ॥ २१ ॥ जयाचें करितां वर्णन । वाणी पावे श्रौतभूषण । तैसा एक रमारमण । कल्याणनिधान करुणाब्धि ॥ २२ ॥ मरणकथेचें तात्पर्य थोर । कीं अनित्य आहे संसार । तें आह्मा कळलें समग्र । परी शार्ङ्गधरयश सोडवेना ॥ २३ ॥ जो नित्यमुक्त भक्तार्थ संसारी । जयावीण वैराग्य नरकदरी । तो भक्तवत्सल पूतनारी । स्तोतुंयोग्य सर्वत्र ॥ २४ ॥ वक्ता ह्मणे तुह्मी चतुर । जगत् जाणोनि असार । कृष्णयशावीण इतर । नेणता विषय ॥ २५ ॥ जयाच्या यशेंकरून । व्यापिलें असतां मन। अंतकाळीं गंगातीरीं देह ठेवून । मुक्त झाला परीक्षिती ॥ २६ ॥ परीक्षितीतें अनुताप झाला । ह्मणोनि साध्वपराधदोष गेला । वरी श्रीशुकाचा लाधला । कृपाहस्त ॥ २७ ॥ तेणें निःशेष संचित निमालें । शुकमुखें जें ज्ञान जाहलें । तेणें कर्तृपण निमतां गेलें । क्रियमाणही ॥ २८ ॥ आतां विप्रशाप तक्षकदंशरूपप्रारब्ध । तें भोगोनियां प्रसिद्ध । कृष्णस्मरणें होवोनि शुद्ध । विमुक्त झाला ॥ २९ ॥ ह्मणाल सर्पविषें विघटे स्मृति । मग विमुक्त कैसा परीक्षिती । परी सत्वमय भगवत्स्मृति । तिणें विषतमःपरिणती जिंकली ॥ ३० ॥ 'तरी ऐसिया हो ध्वनी । झणी थारा देशी मनीं । परी नित्य सेविला मी निदानी । सेवकू होय ' ॥ ३१ ॥ ॥ हें श्रीमंतवचन प्रमाण । जो नित्य करी श्रीकृष्णयशगान । तया बाधूं न शके मरण । सत्य सत्य त्रिवाचा ॥ ३२ ॥ ह्मणोनि तुह्मी जें बोलिलें । तैसेंचि ऋषींनीं सूता पुसिलें । तें ऐकावें वहिलें । सावधान ॥ ३३ ॥

॥ अभंग ॥

**ऋषयऊचुः**— त्यावरी न येवो आघात सर्वथा । माझ्या कृष्णनाथा आवडे जो ॥ १ ॥ कल्पकल्प तोचि राहो चिरंजीव । जयास माधव आवडतो ॥ २ ॥ सर्वकाळ तया असावें कल्याण । गोपिकारमण प्रिय ज्याचा ॥ ३ ॥ त्याची होवो सर्व त्रिभुवनीं कीर्ति । जो कां यशमूर्ति कृष्ण गाय ॥ ४ ॥ इतुक्या गुणांचा तूंचि सूता एक । फळोत अनेक फळ तुला ॥ ५ ॥ ज्ञानेश्वरकन्याकांत गोपिराणा । आयकवि काना यश त्याचें ॥ ६ ॥ ३४ ॥

॥ ओव्या ॥

आम्हां मर्त्यां अमृतदाता । सूता तूंचि एक त्राता । या यज्ञास पवित्रता । श्रीकृष्णयशें ॥ ३५ ॥ येऱ्हवीं या कर्माचेठायीं । सर्वथा फळाचा निश्चय नाहीं । जें आंतबाहेरीं लवलाहीं । अभद्रची ॥ ३६ ॥ आधीं लोपोनि आत्मशुद्धि । जेव्हां होय कर्तृबुद्धि । तेव्हां या कर्माची सिद्धि । अगुण प्रसिद्धि ठाउक ॥ ३७ ॥ देह तितुके पांचभौतिक । तयासी ब्राह्मण मानोनि देख । भ्रमें प्रवृत्त कर्म सकलंक । होईल सम्यक कवणेरीती ॥ ३८ ॥ वरी शामित्रकर्म तेंही गहन । जेथ अहिंसेचें संकोचन । आणि देहसौंदर्यही धूमेंकरून । व्यापिलें सकळ । ३९ । ऐसेंही असोनि अहंकारें । पारखे वाटे सुफळ सारे । येथ तुवां भिषग्वरें । नवल केलें अघटित ॥ ४० ॥ मधुरिपुपदकमळमधुरासव । पाजोनि पुष्टि देशी हरुनि भवदव । उपेक्षुनि यास्तव सुरपुनर्भव । सत्संग सर्वस्व आवडे आम्हां ॥ ४१ ॥ आवडीचें मुख्य लक्षण । असंतुष्ट ऐकतां प्रियगुण । सकळ रसांचें अधिष्ठान । तो प्रिय आपण परमात्मा ॥ ४२ ॥ जो अगुण अविकार अखंडित । जो अनंतकल्याणगुण अनध्यस्तविवर्त । शिवब्रह्मादि योगी समस्त । जयाचा अंत नेणती ।४३।

॥ गद्य ॥

**शिष्यः**— भगवन्, योगेश्वर भगवद्गुणके अंतको जानते नहीं यह मैं समीचीन समझा. काहेतें चित्तकी क्षिप्त , मूढ, और विक्षिप्त भूमिकाओमें चित्त सर्वथा ब्रह्मविषे अज्ञात रहे है, और एकाग्र भूमिकामें यद्यपि चित्तको योगका संस्पर्श होवैहै तौभी तहां चित्त अव्यापक रहे हैं. काहेतें व्यापक वस्तूमे एकाग्रता होती नहीं. और चंचलताभी होती नहीं. यद्यपि सांख्यभाष्य और योगभाष्यमें विज्ञानभिक्षुने चित्तको व्यापक कहाहै तथापि भूतोंकी अपेक्षा व्यापक, यह तिन भाष्यवार्तिकोंका अर्थ है, भगवदपेक्षया चित्त व्यापक नहीं. अगे निरुद्धभूमिकामे यद्यपि योग संपूर्ण होवे है तथापि विवेकख्यातिबलतें पुरुषविमुक्तिस्तव संस्कारावशिष्ठ चित्तभी अपने धर्मनकूं त्यागेहै, ताते भगवत्कल्याणगुणका पार जीवयोगिनकूं मिलता नहीं. परंतु शिव अरु ब्रह्मा तो ईश्वररूप है तातें तेभी जाणते नहीं, यह वाक्य विरुद्ध है या नहीं?

**श्रीगुरुरुवाचः**— इतर योगी जाणत नाहींत हें तुला चांगलें समजलें. आतां शिव आणि ब्रह्माही कसें जाणत नाहींत तें ऐक. शिव आणि ब्रह्मा ज्या मताचेठायीं कार्यब्रह्म आहेत, त्या मताचेठायीं कारणब्रह्माचे गुण ते जाणण्याला समर्थ नाहींत असें उत्तर आहे. त्यांत शिवविष्णु समान असल्यामुळें शिव कार्यब्रह्म नाहीं हें भारतवचनावरून सिद्ध होतें; व हिरण्यगर्भालाही ईश्वरता अद्वैतकौस्तुभकारादिकांनीं प्रतिपादिली आहे; परंतु त्या मतांतही ते शिवादिक कारणब्रह्माचें स्वरूपच असल्यामुळें स्वान्त जाणणारा स्वतःच विनाशी होईल म्हणून आपल्या अनंत कल्याणगुणाला जाणण्याची त्यांनां अपेक्षा नाहीं असा अभिप्राय समज. आतां तुझें समाधान झालें असेल तर मुनीचें बोलणें श्रवण कर.

**शिष्यः**— आज्ञा भगवन्.

॥ पद ॥

सूता सांग तदीय यशा ॥ ध्रु० ॥ यद्भव मानस भवभवसागरीं । शोभवि सकल दिशा ॥ १ यत्पद सेवुनि सुजन न गणती ; कोठें दिवस निशा ॥ २ ॥ ज्ञानेश्वरबाला यत्करुणें । चुकविति कालकशा ॥ ३ ॥ सूता सांग तदीय यशा ॥ ४४ ॥

॥ गद्य ॥

त्वयापरीक्षिन्मरणंनोक्तंतदिष्टंकिन्तुकथमसावुत्तमोधिकारीशुकवचनंश्रुत्वैवापवर्गमयंयोगनिष्ठः सन्गोविंदपदंगतवान्तत्पुण्यपावनमाख्यानंबोधप्रदं शंसनः ।

॥ गीति ॥

सूत म्हणे मुनिराया नीचवर्णजन्य माझि ही काया ।
परि गुरुसेवामहिमें सिद्ध भवत्संगिं कृष्णगुण गाया ॥ ४५ ॥

॥ गद्य ॥

यन्महतांलौकिकभाषणरूपसंबंधोऽपिदौष्कुल्यनिमित्तंमनस्तापंपरिहरतिकिंपुनरनंतस्यनामगृणतःपुंसःदौष्कुल्यंअपनयतीतिवक्तव्यम् ।

॥ पद ॥

तो यदुनाथ भजा ॥ ध्रु० ॥ त्यागुनि सकला कमला ज्याची । करिते पादपुजा । तो यदुनाथ० ॥ १ ॥ यत्पादोदक शिव धरि शिरिं

तो । सर्वेश्वर उमजा । तो यदुनाथ० ॥ २ ॥ त्या ज्ञानेश्वरचरणांवाचुनि । कहिं अन्यत्र न जा । तो यदुनाथ० ॥ ४६ ॥

॥ साकी ॥

पावति निजपद धीर जया पदिं प्रेमा ठेउनि भावें ।
तत्पदकमलीं रुंजि घालुनी मनमधुपा मधु प्यावें ॥ ४७ ॥

॥ ओव्या ॥

आपण असोनि ज्ञानतरणी । पुसता मजवरी कृपा करूनी । तरी यथाबुद्धि वदेन वाणी । प्रेमें श्रवणीं ऐकावे ॥ ४८ ॥ धन्य तो राव परीक्षित । अनुतापें परम तप्त । लोकीं पीडितांही असती शान्त । अखंड संत महीवरी ॥ ४९ ॥ साधकाचें हेंचि लक्षण । देहाहून वेगळें मन । शाप वर देहासी जाण । मी वेगळा त्याहून हें राव भावी ॥ ५० ॥ आणि सिद्धांचें तंव ऐसें मत । आत्मा नित्य सर्वांसी अलिप्त । यद्ज्ञानें मिथ्या काल होत । तेथ शापाची मात कायसी ॥ ५१ ॥ एवं शुकापूर्वी आणि शुक भेटतां । समाधान रायाच्या चित्ता । सावधान होवोनि आतां । तेचि कथा ऐकावी ॥ ५२ ॥

॥ अमृतध्वनी ॥

पाही त्वरेंकरुनि राही सदा हृदयिं वाहीन मी शिर पदीं ।
नाहीं असाहि भव दाही तुझ्याविण न कांहीं कळे श्रुतिपदीं ।
बाही धरोनि लवलाही गणोनि मज मा, ही सुझाकि पदरें ।
साही निवारि रिपु साही समस्त कटुताही दयाजलद रे ॥ ५३ ॥
गंगाधरा सुजनरंगानुगा कुभवभंगा तुझें पद करो ।
तंगा भया षडरि दंगा मिटाय करि चंगा हृदैं मम करो ।
अंगा तुझ्या रजतरंगान्विता बघुनि संगास वांछि मन मे ।
कंगालकी सुन कुरंगांगशेखर दुरंगार लागि तनमें ॥ ५४ ॥

॥ दोहा ॥

निजकृत करि नरपालको भया परम अनुताप ।
हा कष्ट ! मैं अधमने क्या कीन्ह्यो यह पाप ॥ ५५ ॥
तेजोमय मुनिवर्यनें कछु न कीन्ह अपराध ।
मैं फनि डार्‍यो तदपि गले नृपमति कियो प्रमाद ॥ ५६ ॥

निरपराध निष्काम मुनितेज हृदय अनजानि ।
पांवर जो छल कपट करे ताकि नियत अति हानि ॥ ५७ ॥
तनुज तदीय कृपाल यदी देवेंगो मोहि शाप ।
तबहि अनुग्रह मानुहूं छूटि जायगो पाप ॥ ५८ ॥

॥ **गीति** ॥

देवा कृतापराधा फळ होइल सर्व कांहिं नियमानें ।
परंतु विनवणि ही कीं भोगावें शीघ्र याचि देहानें ॥ ५९ ॥
करुणाकर हरि माझा रक्षक मज दुःख किमपि देइल ना ।
तरि मी दंडचि मागे ज्यायोगें कधिं कुकर्म होइल ना ॥ ६० ॥

॥ **अभंग** ॥

राज्य बळ धन माझें हें सकळ । विप्रकोपानळ शीघ्र जाळो । १ । जयायोगें पुढें न होय ही मती । द्विजदेवाप्रति छळक जी ॥ २ ॥ यासी काल आतां नको नारायणा । पाहूं दे नयना समीपची ॥ ३ ॥ वळतां दयाळू ज्ञानेश्वरतात । आघात ते हितरूप होती ॥ ४ ॥ राज्य बळ धन माझें० ॥ ६१ ॥

॥ **ओवी** ॥

ऐसें चिंतित असतां मनीं । तंव शमिकप्रेषित शिष्य येउनी ।
सांगे राया सातवे दिनीं । तक्षकापासोनि मृत्यु तुज ॥ ६२ ॥

॥ **अभंग** ॥

ऐकुनियां ऐसी ब्राह्मणाची वाणी । संतोषला मनीं भूमिपाळ ॥ १ ॥ ह्मणे आजि भलें झालें नारायणा । आठवण मना राहील कीं ॥ २ ॥ तक्षकविषाग्नि तो मज चंदनू । भोगदग्ध तनु निववाया ॥ ३ ॥ कृपावंत होतां ज्ञानेश्वरराव । दुःख तेंही सर्व सुख वाटे ॥ ४ ॥ ऐकुनियां ऐसी ब्राह्मणाची वाणी । संतोषला मनीं भूमिपाळ ॥ ६३ ॥

॥ **ओव्या** ॥

राव विचारी आपुलें मनीं । पाप जाईल शापेंकरूनी । परंतु पुण्यभोगेंचि मनीं । पुढतीं होईल मत्तता ॥ ६४ ॥ नाना कटू औषधें देउनी । बाळव्याधी जाती निघोनी । परी रसना मोकळी करूनी । पुनः प्रमादें

होति ते ॥ ६५ ॥ कीं खर धुतला नानारीती । मोकळा होतांचि लोळे क्षितीं । तैसें शुद्ध जाहलियाही चित्तीं । भोगप्राप्ती घातक ॥ ६६ ॥ ह्मणोनि हा लोक स्वर्गलोक । दोहींठायीं परम दुःख । जेणें दुरावे लक्ष्मीनायक । सर्व तें पातक तात वदती ॥ ६७ ॥ 'आणि मजचिमाजीं असतां । जेणें मी दुऱ्हावे पांडुसुता । तें पुण्य ऐसें ह्मणतां । जीभ न तुटे काई' ॥ ६८ ॥ एऱ्हवीं विचारें पाहतां । स्वर्गी या लोकाहूनि बद्धता । येथ स्त्री भेटे पतिव्रता । स्वर्गी भुक्ताप्सरा भेटती ॥ ६९ ॥ यज्ञांत राहोनि अति पवित्र । फळ मिळे रंभामूत्रपात्र । धनराग तंव येथ परत्र । दुःखदायक सारिखा ॥ ७० ॥ ऐसें वाटे माझ्या मतीं । धन्य दरिद्रियांची स्थिती । व्यवहारीं आणि परमार्थीं । सारिखी शक्ती यदंगीं ॥ ७१ ॥ दरिद्र्याच्या स्कंधीं आपण । देवोनियां सुखासन । राजे बैसोनि करिती गमन । दरिद्राधीन जिणें त्यांचें ॥ ७२ ॥ शीतऊष्णसहनशील । दरिद्र्याचा देह सकळ । धनवान सर्वदां चिंताशीळ । समाधानविरहित ॥ ७३ ॥ दरिद्रिया श्रमेंकरून । भूक लागतां रुचे अन्न । धनवंतासी सदा अजीर्ण । गोड अन्न भक्षुनी ॥ ७४ ॥ धनाचिया अभावेंकरूनी । दरिद्री न वांछी तनय कामिनी । भक्तीनें अथवा भयेंकरूनी । अंतःकरणीं हरी स्मरे ॥ ७५ ॥ ह्मणोनि ऐसें माझें मत । कीं निर्धना अनुकूल दैव समस्त । आणि जो परमात्मा रमाकान्त । त्या नांव निष्किंचनप्रिय ॥ ७६ ॥ नवल निर्जीव असोनि धन । सजीवा प्रमाद करी उत्पन्न । हें हरिमायेचें विंदान । भजनावीण तुटेना ॥ ७७ ॥ धनेंचि भेटे अन्नपाणी । ऐसें मूढ बोलती वाणी । पशुपक्षीही निर्धन असूनी । सुखी वांचुनी विचरती ॥ ७८ ॥ जो परमात्मा करुणाघन । स्तनीं दुग्ध करी उत्पन्न । तो समर्थ करितां रक्षण । कां जड धन प्रार्थावें ॥ ७९ ॥ अथवा न भेटतां अन्न । क्षुधेनेंचि होईल मरण । तरी तेंही आवडीकरोन । श्रेष्ठ वाटे मजलागीं ॥ ८० क्षुधा शमेल देह खाउनी । वासना न शमे प्राण जाउनी । ती कामादि सहांची कामिनी । जिता मरणीं न सोडी ॥ ८१ ॥ धनाचिया आश्रयें। करून । कामादि राहिले जीव धरून । जड धन इच्छी असूनि चेतन । प्रमादलक्षण हेंचि कीं ॥ ८२ ॥

॥ अमृतध्वनी ॥

वित्तावरी उगिच चित्ता अशी प्रबळ सत्ता गड्या करिसि कां ।
लत्ता पुढें रविजदत्ता तिथें सहनवत्ता बरी धरिसि कां ।
पित्ता नको ज्वलवुं वृत्तासता भजुनि मत्ता निजोनि भवनीं ।
चित्ता विवेचुनि विरक्तावपि प्रभु सुदत्ताप्रति स्मर वनीं ॥ ८३ ॥

॥ ओव्या ॥

माय पोशी दुग्ध पाजोन । नारी मारी वीर्य पिळून । स्त्रियेस भजे माता सोडोन । मुख्य अज्ञान तेंचि कीं ॥ ८४ ॥ कावळा जरी छिद्र पाहत । तया देहावरील दिसत । परमनोदोष धनवंत । पाहे यास्तव अतिनीच ॥ ८५ ॥

॥ अमृतध्वनी ॥

त्रागा मना अजुनि कागा नसे विषयिं हा गाढवा चुकशि कां ।
भोगांगनाभगकुरागामधें षडरिनागासवें तुकसि कां ॥
योगानुगा भज वियोगानुगा त्यज विरागा गदाश्रय सदा ।
वागादिका जिणुनि बा! गाइ तूं सुजनतागामि माधवपदा ॥ ८६ ॥

॥ ओवी ॥

कामें जाहली पुत्रोत्पत्ति । त्या पुत्रापासोन होय मुक्ति ।
मेल्ल पेरोन सुधाप्राप्ति । तैसी ही उक्ति मी ह्मणें ॥ ८७ ॥

॥ अमृतध्वनी ॥

दारा नको तनु विदारावया अधिक मारानियुक्त करिते ।
हाराप्रती बघुनि जारासवें मतिविकारास नित्य धरिते ॥
दारापुढें उगिच वारावया व्यजन वारांगनासमचि ये ।
तारावया मज निवारावया भव उदारा हरे त्वरित ये ॥ ८८ ॥

॥ ओव्या ॥

यास्तव चिंतोनि यादवराय । साक्षात्करावे युगुलपाय । आणिक पुरुषार्थ श्रेष्ठ काय । भेटतां माय सद्गुरू ॥ ८९ ॥ माझी तंव ऐसी गती । सातवे दिनीं पापनिष्कृती । परी एकचि तळमळ वाटे चित्तीं । नाहीं यदुपति दृष्टिपुढें ॥ ९० ॥ नेणो कवणिया पापेंकरून । निज-

१ कुत्सित. २ सोमल.

धामा गेला मनमोहन । मज ठेविलें धर्मरक्षणाकारण । तों हा प्रमाद म्यां केला ॥ ९१ ॥ कीं माझिया वडीलीं बळेंकरून । सारथी केला रमारमण । त्या पापें मज येतांही मरण । नाहीं श्रीकृष्ण दृष्टिपुढें ।९२। परी तो दयाळू जगत्पती । सहज ताराया दीनाप्रती । निजचरणतीर्थे भागीरथी । ठेवितो क्षितीं आवडी ॥ ९३ ॥ त्या माउलीचे तटीं । मी तक्षकासी घेईन भेटी । शत्रूवरीही मित्रदृष्टी । करीन तज्जलप्रभावें ।९४। ऐसें विचारसबीज मन । सत्वांकोलिस्नेहेंकरून । सुद्रुमरूप होवोन तूर्ण । गंगागमनपणें फळलें ॥ ९५ ॥

॥ गीति ॥

गंगे जगदघभंगे गिरिजाहृन्नीररुहमधुपरमणी ।
घे झडकारि मज पदरीं शिशुकृत अन्याय आणुनी न मनीं ॥९६॥

॥ ओव्या ॥

ऐसा सप्रेमअंत:करण । गंगातीरीं नृपनंदन । राहिला राज्यभार सोडोन । शौनकालागोन सूत सांगे ॥ ९७ ॥ सूत ह्मणे जी ब्रह्मवर्या । गंगा साक्षात् कृष्णकाया । पानाचमनें माया । निजभक्तांची नाशी जी ॥ ९८ ॥

॥ श्लोक ॥

यस्यास्तिद्विविधंरूपंनिर्गुणंसगुणंपुन: ।
निर्गुणेनजगद्व्याप्यसगुणेनपुनातिवै ॥ ९९ ॥
निर्गुणस्यतरंगास्यु:कोटिशश्चित्तवृत्तय: ।
सगुणस्यतरंगास्युर्जलमारुतसंगमा: ॥ १०० ॥
तरंगाकारयोगेऽपिजहातिनयथाजलं ।
तथावृत्तिस्वरूपत्वेनजहातिपरंपदम् ॥ १ ॥
यस्यैतन्निर्गुणंलब्धंगुरोस्तीर्थनिषेवणात् ।
कृष्णपादोदकत्वेनसगुणंलभ्यतेपुन: ॥ २ ॥

॥ ओवी ॥

तुलसीशोभा कृष्णचरणीं । तेथील उत्कृष्ट घेऊनि पाणी ।
वाहवोनिलोक तीन्ही । करी पावन सर्वदा ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

निर्गुणेनस्वरूपेणगंगेयंजगदंतरं ।
पुनातिसगुणेनैवबहिर्भूतमयंवपुः ॥ ४ ॥
अथवास्नानमात्रेणदेहंप्राणान्पुनातिहि ।
पानयोगेनवैसाक्षादंतरंप्रपुनातिच ॥ ५ ॥

॥ ओवी ॥

ऐसी सोडोनि सदय जननी । कोण अभागी वसळ भुवनीं ।
'मरिष्यमाण' या वचनेंकरूनि । हें निर्वाणी सूचित ॥ ६ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

संसारीं सुतकामिनीधनमदें जाते घडी जेवढी ।
कालातें बहु तुष्टता निजमनीं होते गड्या तेवढी ॥
यालागीं फिरुनी समस्त अवनी सत्संगता लाहिजे ॥
गोविंदेति मुदा जपोनि हृदयीं गंगातटीं राहिजे ॥ ७॥

॥ दोहा ॥

विश्वद्रोहकृत पातकी जन्हुकुमरि आधार ॥
पावुनि झाले सुकृतमय करिति आनउद्धार ॥ ८ ॥

॥ गीति ॥

खळखळशब्देंकरुनी दे जे लोकत्रयींहि अभय जना ॥
तेथें राहुनि नरपति भावें करि अंगकांतिनभयजना ॥ ९ ॥

॥ ओव्या ॥

शिष्य ह्मणे श्रीगुरुनाथा । संशय वाटतो एक चित्ता । स्तंभमंदिरीं वास परीक्षिता । केला ही कथा भारतीं ॥ ११० ॥ येथ तंव तें दिसे भिन्न । यांतील कोणती प्रमाण । सद्गुरु ह्मणती सावधान । करी श्रवण कुमारा ॥ ११ ॥ ॥ कल्पभेदेंकरोनी । इतिहास बोलिले पुराणीं । ऐसें जाणोनि सज्जनांनीं । मोहजाल त्यजावें ॥ १२ ॥ ह्मणाल कल्पांतरींच्या कथा । या कल्पांत सांगणें वृथा । तरी तयाचें ऐक तत्वतां । प्रयोजन ॥ १३ ॥ कथेचें जें निरूपण । तें नोहे उगेचि मनरंजन । जेणें बोधेल जीवाचें मन । तोचि प्रयत्न मुनींचा ॥ १४ ॥ नानाकल्पींचे संशय । वासनेमार्जी असती स्वयें । ज्या कल्पींचा उठेल संशय । त्या तत्कल्पींचा संशय हरी ॥ १५ ॥ मरण येतां

प्रयत्न कार्य । हा भारतकथाअभिप्राय । नियतायुर्वाद होय । खंडिला येथ ॥ १६ ॥ घडिघडि मरण समीप जाणुनी । यत्नें सेवावा चक्रपाणी । हाचि अभिप्राय करुणालय मुनी । वदले या स्थानीं शिष्यराया ॥ १७ ॥ वेद पुराण इतिहास । वाटोनि दिले लोकत्रयास । कोण्या कल्पीं कोण्या लोकास । इतिहास जाय भलताही ॥ १८ ॥ अथवा यावदनादि माया । तावत् दृष्टिसृष्टौ शिष्यराया । एकाहंकारें नानाकाया । चेष्टती ते जाणती मुनी ॥ १९ ॥ या अनंत विश्वामाजीं जाण । सदृश विसदृश लीला गहन । हे प्रातिभासिकसत्कार्यखूण । घेवो मन पैं तुझें ॥ १२० ॥ बृहदारण्यकीं आणि वासिष्ठीं । समानासमान बोलिली सृष्टी । एकाचे आकार नानाकोटी । सम विषम दाविले ॥ २१ ॥ तैसे परीक्षिदाकार । दोन पाहोन साचार । इतिहासीं दोन प्रकार । सत्यवतीकुमार बोलिले ॥ २२ ॥ आणि कायव्यूह होतां । चित्तासी येत द्विविधता । एक मुख्य चित्त गौण चित्ता । अभिप्रायमात्रें चेष्टवी ॥ २३ ॥ हें कैवल्यपादीं समग्र । योगसूत्रकृत् आणि तद्भाष्यकार । बोलिले तें प्रमाणतर । जाणोनि अंतर नीववी ॥ २४ ॥ तद्यथाः—

**योगसूत्रः**—‘ प्रवृत्तिभेदेप्रयोजकंचित्तमेकमनेकेषाम् ’

**भाष्यः**—‘ बहूनांचित्तानांकथमेकचित्ताभिप्रायपुरःसराप्रवृत्तिरितिसर्वचित्तानां । प्रयोजकंचित्तमेकंनिर्मिमीतेततःप्रवृत्तिभेदः ’ ।

॥ ओव्या ॥

परीक्षिताच्या वासना दोन । जैं मुनि छळिला सर्प घालून । तेव्हांचि ती वासना गौण । तीव्र होवून साकार जाहली ॥ २५ ॥ अर्ध शुद्धचित्त असतां । वासना उठे ते पावे तीव्रता । ही निरूपिली वार्ता । शुक्रोपाख्यानीं वासिष्ठीं ॥ २६ ॥ पुढें ययाची अनुतापवासना । तेही तीव्र होवोनि जाणा । परीक्षिदाकारें नंदना । परिणाम पावली ॥ २७ ॥ त्यांतील अनुतप्ता मुख्य जाण । छलक वासना सभय गौण । वासनारूप आकार दोन । मुनी पाहोन बोलिले ॥ २८ ॥ गौणाकारासी शाप कळतां । तो भयें स्तंभीं गृह झाला बांधता । यास्तव महाभारतीं तत्वतां । बोलिली कथा तैसीच ॥ २९ ॥ मुख्याकारा शाप कळतां ।

तेणें राज्य हें मानोनि वृथा । गंगातीरीं राहिला तत्वतां । ते व्यासोक्त कथा भागवतीं ॥ १३० ॥ ऐसें ऐकोन श्रीगुरुवचन । सच्छिष्य प्रेमें धरी चरण । ह्मणे वाणीजीवनेंकरून । मम संशयदहन विझाला ॥ ३१ ॥ पुढें सूत बोलिला काय । ह्या वचनप्रसाद करी गुरुमाय । श्रीगुरु ह्मणती सावध होय । सूताभिप्राय सांगतों ॥ ३२ ॥ जया ध्यात एकांतीं फणिभूषण । जो कमलोद्भवाचें देवतार्चन । तेथ ठेवोनी अंत:करण । रायें राज्यधन सोडिलें ॥ ३३ ॥ जी सनकादिकांची ध्येय मूर्ती । जे नारदाची गेय कीर्ती । तेथ अर्पोनि सकलवृत्ती । रायें आसक्ती सोडिली ॥ ३४ ॥ भक्तां वैरिया सारिखी गती । देत ऐसी यत्साम्यस्थिती । तो चिंतामणी धरोनि चित्तीं । वैभवासक्ति सोडि राय ॥ ३५ ॥ जो देह जाहला अपराधी । तेथ पुन्हा न व्हावी अहं-बुद्धि । यालागीं राव वैराग्यनिधी । प्रायोपवेषणा बैसला ॥ ३६ ॥ रायें निश्चय केला मनीं । कीं सकल अपराधांची खाणी । धुंडिताही त्रिभुवनीं । आसक्तीवांचुनी मिळेना ॥ ३७ ॥ ऐसें स्मृतीचेंही वचन । संग सकलदु:खकारण । तेंचि घेवोनि प्रमाण । सावधान असावें ॥ ३८ ॥

॥ श्लोक ॥

**स्मृति:**— ' नि:संगतामुक्तिपदंयतीनांसंगादशेषा:प्रभवंतिदोषा: ।
आरूढयोगोऽपिनिपात्यतेऽध:संगेनयोगीकिमुताल्पसिद्धि:' ॥

॥ ओव्या ॥

किती सांगावें पुढतपुढतीं । जरी जीवास पाहिजे मुक्ति । तरी शपथ वाह्योनि विषयासक्ति । दूर निश्चिती करावी ॥ ३९ ॥ जैसा उत्तम घट केला । तो एकेस्थानीं जरी फुटला । तरी जलसंचय आघवा गेला । एक्याच द्वारें सांडुनी ॥ १४० ॥ तैसें सकल इंद्रिय जरी जिंकिले । किंचित् मन विषयीं गुंतलें । तरी ज्ञानतप हारपलें । बद्ध जाहले थोर थोर ॥ ४१ ॥ थोरथोरांची ऐसी गती । पूर्णयोगी जे निश्चिती । तेही सांपडले मायावृत्ती । विषयासक्तिसंयोगें ॥ ४२ ॥ येचविषयीं स्मृति-वचन । श्रोते परिसावें सावधान । श्रेष्ठ अलिप्तही असून । परी सावधा-नार्थ तन्निंद्यकथा ॥ ४३ ॥ येथ मूर्ख जे कां होती । ते श्रेष्ठांचें दुराचरण घेती । आणि तयांची महती शक्ती । ते न आणिती मनामाजीं ॥४४

श्रीशिवाचें विष भक्षणें । श्रीकृष्णाचें अग्नि गिळणें । हें न ओळखोनि मनें । श्रेष्ठदुराचरणें मूर्ख फसती ॥ ४५ ॥ केव्हां केव्हां अलेकाचरण। जें घडलें श्रेष्ठाकडून । तयाचा अभिप्राय हा पूर्ण । कीं न फसावे जन इतर विषयीं ॥ ४६ ॥ तथाचोक्तम्ः—

॥ श्लोक ॥

' विश्वामित्रपराशरप्रभृतयोवातांबुपर्णाशनाः ।
तेऽपिस्त्रीमुखपंकजंसुललितंदृष्ट्वैवमोहंगताः ॥
शाल्यन्नंसघृतंपयोदधियुतंभुंजंतियेमानवाः ।
तेषामिंद्रियनिग्रहोयदिभवेद्विंध्यस्तरेत्सागरम् ' ॥ १ ॥

॥ ओवी ॥

या स्मृतीचा हाचि अर्थ । कीं विषयीं असोनि न बकावा वेदांत ।
याचि अभिप्रायें एकनाथ । बोलिले आहाती ॥ ४७ ॥

॥ पद ॥

'अच्छा भांड बनो रे । माया छांड चलो जी ।ध्रु०। ब्रह्मदेव बेद पढा माया लागी मीठी । सरस्वतीके पीछे लागा वाकी गांड फाटी । अच्छा० ।१। श्रीविष्णूके गांडपिछे हैं मायाका धंदा । खेल खेला फिसल पडा मीठी लागी वृंदा । अच्छा भांड० ॥२॥ महादेव बडादेव सब देवनका बाबा। भिल्लिणीके पिछे लागा करता तोबा तोबा । अच्छा भांड ०॥३॥ अहि-ल्याके देखनकूं इंद्र भूल मदें । गौतमनें गांड मारी आंगपर हुवे फोदे । अच्छा भांड ० ॥ ४ ॥ सीताकी चोरी करी रावनकूं धक्का । हनूमाननें नंगी करके जला दियी लंका । अच्छा भांड ० ॥ ५ ॥ हनूमान तो ब्रह्मचारी जपे रामनाम । स्त्रीराज्यमो बायका गाभन करताहै बेफाम ॥ अच्छा भांड० ॥ ६ ॥ विश्वामित्र तप करे भये अनुष्टानी । मेनकासे वश भये हुवी धुलधानी ॥ अच्छा भांड ० ॥ ७ ॥ नारदनें किसनसे एक औरत मांगी । नारदकी नारदी भई पोंगडे जनन लागी। अच्छा भांड० ॥८॥ सोला सहस्र नारी कान्हा गोकुलमें खेले । राधि-काकूं छोडके रीसनीकूं भूले । अच्छा भांड ० ॥ ९ ॥ जनार्दन साई मेरा सब खेल खेला । एकनाथ भांड होके उनके चरण मिला ॥ अच्छा भांड० ॥ १० ॥'

॥ ओव्या ॥

एवं विषयाचिया पृथा । वरिष्ठांची ही अवस्था । तेथ मूढांची काय कथा । यालागीं सर्वथा विरक्त व्हावें ॥ ४८ ॥ पाहोनि मोठ्यांचें निषिद्धाचरण । तैसेंचि करूं जाती आपण । ते दीपसंयोगीपतंगासमान । पावती पतन निश्चयें ॥ ४९ ॥ एऱ्हवीं महात्म्यांचियाठायीं । विश्वभाव जन्मला नाहीं । परी बद्धासी सावध करावया पाही । ऐसें वर्णन तयांचें ॥ १५० ॥ कित्येकांचें ऐसें मत । कीं प्रपंचीं करावा परमार्थ । तरी तयांच्या वचना दृष्टान्त । मद्यपानार्थ स्वर्ग वाटे ॥ ५१ ॥ कोकशास्त्रा जाणोनि पोटीं । वेदान्तफळाच्या सांगे गोष्टी । कीं एरंड पेरोनि वृक्षवाटी । वाटींत मागे इक्षुरस ॥ ५२ ॥ प्रपंचीं परमार्थकरण । त्याचा तव अभिप्राय भिन्न । सुख दुःख व्हावें समान । तेव्हां प्रपंचीं परमार्थ ॥ ५३ ॥ विष्ठा आणि मालतीगंध । पुरणपोळी आणि निंब प्रसिद्ध । येथ समता येईल शुद्ध । तेव्हां प्रपंचीं परमार्थ ॥ १५४ ॥ शेण आणि चामीकर । भिकारी आणि लक्ष्मीवर । जरी वाटतील बरोबर । तरी प्रपंचीं परमार्थ ॥५५॥ ' जैसी लेखणी करावी । तैसी अंगोळी चिरावी । ऐसी समता होआवी । तरी प्रपंचीं परमार्थ ' ॥ ५६ ॥ वाम पाद मंचकावरीं । दक्षिण पाद खदिरांगारीं । इतुक्यांतही आनंद वाटेल उदरीं । तेव्हां प्रपंचीं परमार्थ ॥ ५७ ॥ हें न साधोनिया स्थिति । न सोडवे स्त्रीपुत्रासक्ती । सांगे परमार्थाच्या उक्ती । तो चांडाळ निश्चिति स्मृति ह्मणे ॥ ५८ ॥

॥ श्लोक ॥

' गृहकर्मसमासक्तंब्रह्मज्ञोऽस्मीतिवादिनम् ।
कर्मब्रह्मोभयोभ्रष्टंतंत्यजेदंत्यजंयथा ' ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

मुखीं सांगे अति वेदान्त । जिभेनें स्त्रियांची लाळ चाटत । तया-ऐसा दुर्भाग्यवंत । नाहीं नाहीं त्रिभुवनीं ॥ ५९ ॥ श्रीरामनाम नाहीं वदनीं । ब्रह्म बोंबले तांबूल भक्षुनी । तयाची जिव्हां महासर्पिणी । घात करी बहुतांचा ॥ १६० ॥

॥ अभंग ॥

' विषयीं अद्वये । त्यासी आह्मीं सिवो नये ॥१॥ देव तेथूनी निराळा । असे निष्काम वेगळा ॥ २ ॥ वासनेची बुंथी । तेथें कैंची ब्रह्मस्थिति ॥ ३ ॥ तुका ह्मणे असतां देहीं । तेथें नाहीं जमती ' ॥ ४ ॥ इति तुकारामवचनप्रामाण्यात् ।

॥ ओव्या ॥

कोणी ऐसेंही करिती । न पावोनि ब्रह्मस्थिति । लोकभयें साधन उघड न करिती । तेंही अयोग्य नाथोक्ति ऐसी ॥ ६१ ॥ श्रीरामनाम आवडे मानसीं । स्मरण न करीच अति आळसी । वांझ गाय कपिला जैसी । जाणा तैसी ते भक्ती ॥ ६२ ॥ श्रीरामनाम आवडे पोटीं । बाहेर नामेवीण टवाळ गोष्टी । तेही आवडी समूळ खोटी । ओस देठीं फूल जैसें ' ॥ ६३ ॥ किंवा नाम वदनीं गाय । आवडी संतासी निंदिता होय । तयाचा वैरी यादवराय । निर्दाळील अवश्य ॥ ६४ ॥ दैत्यांनीं द्वेषिला हरी । तेही पावले मोक्षपुरी । परी संतद्वेषी बुडाले अघोरीं । कल्पांतवरी दुरात्मे ॥ ६५ ॥

॥ अभंग ॥

' ह्मावेली माहारें । त्याचीं व्यालीं असे पोरें ॥ १ ॥ करिति संताचा मत्सर । कोपें उभारोनी कर ' ॥ २ ॥ ऐसी तुकारामवाणी । ज्ञानेश्वरकन्या मानी ॥ ६६ ॥

॥ ओव्या ॥

कीं नाम सांगोनि दुर्जनासी । हस्ते परहस्ते पीडी लोकांसी । तेंही नावडे भगवन्मानसीं । निश्चयेसी ओळखा ॥ ६७ ॥ कीं उमावर आणि रमावर । यांत भेद पाहे जो नर । तोही पापी अति दुर्धर । ऐसें श्रीधर बोलिले ॥ ६८ ॥ 'शिव थोर विष्णू लहान । हरी विशेष हर गौण । ऐसें ह्मणती तयालागून । आणोनि नरकीं घालावें' । तैसेंचि नामबळें न मानी वेदा । नामबळें उल्लंघी शास्त्रमर्यादा । नामबळें सद्गुरुपदा । नमन न करी ॥६९॥ नामें पातकें समस्त जाती । या वचनासी ह्मणणें स्तुती । नाम जपोनि निषिद्ध प्रवृत्ति । विहित कृती सोडित ॥ १७० ॥ भूत प्रेत आणि यदुनाथ । समान मानी बकोनि वेदान्त । ऐसे नाना-अपराधयुक्त । ते पट्टाभिषिक्त कुंभिपाकीं ॥ ७१ ॥ म्हणोनि परमार्थ

पाहिजे जरी । विषया लाथ मारोनि तरी । अनन्यभावें स्मरावा हरी । भवभय दुरी तैं ठाके ॥ ७२ ॥ जयासी वाटे परमार्थ करावे । तेणें उठोनि चालते होआवे । हें समर्थ बोलिले बरवें । अन्यथा नोहे सर्वथा ॥ ७३ ॥ अथवा गृहस्थही असून । परोपकारीं झिजावें तनमनधन । सकळ करोनि कृष्णार्पण । अलिप्तपण अंतरीं ॥ ७४ ॥ सकळ त्यागोनि वनीं जावें । तेणें एकांतीं हरीतें भजावें । अथवा गृहींच राहोनि परोपकार करावे । चित्तीं असावें अलिप्त ॥ ७५ ॥ गृहस्थ अथवा सन्यासी । अंतस्त्याग सारिखा दोघांसी । परी राव विचारी मानसीं । कीं अपराध गृहीं मज घडला ॥ ७६ ॥ यालागीं सोडोनि सर्वसंग । भक्तभवभंग पांडुरंग । अनन्यचित्तीं धरोनि अव्यंग । सेवीत जल गांग राहिला ॥ ७७ ॥ तेचि वेळीं तया स्थानीं । शिष्यासह पातले मुनी । ते कृतकृत्यही असूनी । लोकानुग्रहार्थ धुंडती ॥ ७८ ॥ त्यांच्या हृदयीं जगन्मोहन । त्यांचे पाय गंगामूळस्थान । म्हणोनि जेथ जेथ जाती सज्जन । तें तें स्थान वाराणसी ॥ ७९ ॥ किंवा विष्णुचरणाचें तीर्थ । मानोनि गंगा शिव शिरीं धरित । आपण शिवरूप व्हावया संत । गंगा तीर्थ सेविती ॥ १८० ॥ कीं संत धरिती भगवच्चरण । तेथोनीच जान्हवीजनन । यास्तव हें भावंड मिळून । तारित जन उल्हासें ॥८१॥ तैं शिष्य म्हणे भगवंता । शंका उपजली कृपावंता । तीतें आपणावांचूनि ताता । अपनोदिता अन्य नाहीं ॥ १८२ ॥

॥ गद्य ॥

**श्रीगुरुरुवाचः**— मी तुझ्या मनांतील इंगित समजलों. सर्व आपआपल्या कर्मानुसार फळें भोगीत असल्यामुळें साधूंच्या दयेचें तेथें कांहीं चालत नाहीं हेंच ना? तर आतां उत्तर ऐक. बाळा! भोग म्हणजे सुखदुःख. त्यांतील पुण्याचा भोग सुख व पापाचा भोग दुःख आहे. पुण्याच्या भोगामध्यें बुद्धींत स्वातंत्र्य असलेंच पाहिजे. नाहीं तर उरावर बसून रंभालिंगन करविणें म्हणजे लोखंडाची स्त्री तापवून भेटविण्यासारखीच आहे. अशा सुखाचें नांव जर पुण्यभोग असेल तर ब्राह्मणाचें जेवण झालें असतांही त्याच्या पोटांत लांकडानें ठोसून ठोसून लाडू नरड्यांतून घालून त्याचा प्राण घेतला असतांही पुण्याची

उत्पत्ति व्हावी. म्हणून ज्याप्रमाणें सेवकानें ताट वाढून आणलें असतांही तें ताट श्रीमंतांना भूक लागेपर्यंत थांबवून ठेवतां येतें, त्याप्रमाणें पुण्यभोग भोगणारांनांही इच्छा नसल्यास भोगांना थांबवून ठेवितां येतें.

**शिष्यः**— तर मग कितीही वर्षे कर्म राखून ठेविलें तरी भोगलेंच पाहिजे याचा काय अर्थ ?

**श्रीगुरुः**— अरे पण प्रयत्नानें प्रारब्धाला जिंकतां येतें ह्या वचनाचा काय अर्थ ?

**शिष्यः**— महाराज! मला दोहोंचाही अर्थ समजत नाहीं.

**श्रीगुरुः**— त्या दोहोंचाही अर्थ ऐक. प्रयत्न न करणाऱ्याविषयीं पहिलें वचन लागू असून दुसरें वचन प्रयत्न करणाऱ्यांना लागू आहे. याविषयीं तुला एक दृष्टान्त देतों. समज कीं विष्णुदत्ताचीं देवदत्त व यज्ञदत्त हीं दोन्ही मुलें फार सुखी आहेत. त्यांतील पहिला मुलगा आपल्याला कोणाचें काय करावयाचें म्हणून पलंगावर झोंप घेतो; व दुसरा मुलगा आपल्याला ज्याअर्थीं हें निरोगी शरीर प्राप्त झालें आहे, त्याअर्थीं दुसऱ्याचें कार्य करावें म्हणून सदोदित उद्योग करितो. या कल्पित ऐतिह्याप्रमाणें महात्मे आपल्या पुण्यजन्य स्वातंत्र्यास्तव दयेनें सदैव परोपकार करीत असतात. आतां, यद्यपि दुःखी जन हे पापकर्मफलास्तव परतंत्र असतात म्हणून त्यांना साधुदयाकृत फल मिळूं शकत नाहीं, तथापि ह्यांत कांहीं रहस्य आहे, तें हें कीं कोणतेंही कर्म सर्वथा पुण्यरूप किंवा सर्वथा पापरूप नसतें; त्यामुळें पापी पुरुषाच्या हातून किंचित घडलेलें सत्कर्म महात्म्यांच्या अनुग्रहानें तीव्र होऊन अनुकंप्यांतःकरणसत्वप्रतिबंधापहनन करून त्यास प्रयत्नयोग्य करितें.

**शिष्यः**— भगवन्! नेणो कोणत्या दोषामुळें आपण सांगितलेलें रहस्य माझी बुद्धि नीट ग्रहण करूं शकत नाहीं.

**श्रीगुरुः**— मला वाटलेंच होतें कीं तुझी छिद्रान्वेशी बुद्धि अशा सुलभ सांगण्याला मानणार नाहीं ह्मणून. तर आतां हें रहस्य वाद-

पूर्वक विस्तारानें श्रवण कर. पूर्वकृत वासना व कर्मे यांच्या योगा-नेंच देव, मनुष्य, तिर्यक् इत्यादि जातींमध्यें जन्म, त्या जन्मांतील आयुष्य व त्यांतीलच सुखदु:खें मिळत असतात. नुसत्या वासनेनें किंवा नुसत्या कर्मानें जन्म, आयुष्य व भोग हा तिन्ही प्रकारचा विपाक होऊं शकत नाहीं. यद्यपि मानसकर्मानेंच लवणादिकाला फल मिळालें अशी कथा बृहद्वासिष्ठांत आहे, व स्वप्नादिकांत मानसकर्मानेंच फल होतें असें महाभारतांत सांगितलें आहे, व मानसकर्म म्हणजेच वासना, तथापि केवळ वासनेनेंही लवणाप्रमाणें जागृत फल होऊं शकेल ही शंका बरोबर होणार नाहीं. कारण वासनेंत व मानसकर्मांत किंचित् भेद आहे. यद्यपि तीव्र वासनाच कर्मरूप होते असा भागवतवचनावरून अभिप्राय निघतो, तथापि वासना व मानसकर्मांत किंचित् भेद इष्ट आहेच. वासना ह्या संस्कारजन्यस्मृतिमूलक असून मला अमुक वस्तु पाहिजे इतक्याच स्वरूपानें असतात; व त्यांनां जेव्हां अहंकाराचें साह्य मिळून वृत्त्यनुसार यत्न होतो तेव्हां त्या यत्नाला मानसिक कर्म ह्मणतात. उदाहरणार्थ, परमेश्वर पाहिजे ही वासना व तदनुसार ध्यान करणें हें मानसकर्म. लवणानींही स्वर्ग पाहिजे अशा वासनेनें स्वर्ग न मिळवून मनाचेच ब्राह्मण वगैरे कल्पून मनानेंच यज्ञ केला; व त्या मानसकर्मामुळेंच त्याला फल प्राप्त झालें. आतां, वासनेचें फल स्वप्नामध्यें होतें खरें, परंतु तेव्हांही थोडें चिंतनरूप कर्म उत्पन्न होत असतें, असा संध्यधिकरणावरील शांकरभाष्याचा आशय आहे; परंतु मानस कर्माचें जागृतींतही फळ होतें असें शतश्लोकींत आचार्यमंत्र व ईशप्रसादाविषयीं श्रीमत् शंकराचार्यांनींच प्रतिपादिलें आहे. स्वाप्निक शुक्रपाताचा अनुभव जागृतींत पुष्कळ कामी लोकांनां आहे. पुष्कळ तीर्थे पाहूं इच्छिणाऱ्यानें ज्या तीर्थाला जातां येत नाहीं अशा तीर्थाला मनानेंच जावें हें महाभारताचें वचन आहे. ह्या मानसिक तीर्थाटनाचें फळ जागृतींतच होत असलें पाहिजे. कारण स्वप्नाकरितां कांहीं कोणी विधि करून ठेवीत नाहीं. ह्मणूनच योगवासिष्ठांत मानसिक कर्माचें फळ शारीरिक कर्मापेक्षां पुष्कळ पट अधिक लिहिलें आहे. यद्यपि समाधिपादांत स्वप्नज्ञानालंबनरूप वैकल्पिक विधि पतंजलींनीं सांगि-

तला आहे, तथापि तो कर्मरूप असून जागृत किंवा तूर्यफलावसायी आहे; स्वप्नफलावसायी नाहीं. असो. याप्रमाणें वासनेंत व मानसकर्मांत जसा भेद आहे तसा तो वासनेंत व शारीरिक कर्मांतही आहे. ह्याविषयीं " यन्मनसास्मरतितद्वाचावदति । यद्वाचावदतितत्क्रियया करोति । यत्क्रिययाकरोतितदभिसंपद्यते " । ही श्रुति प्रमाण असून "वृत्तीऐसें मन धरिती । मनाऐसी क्रिया करिती । केलियाऐसी वरिती । मरोनि देहें" ( ज्ञाने० अध्या० १७ वो० ९८ ) हें तातवचनही प्रमाण आहे. तात्पर्य, वासना व कर्म ह्यांच्याच योगानें विपाक होतो ह्मणणें समीचीन होते. अन्यथा पूर्वप्रज्ञा व पूर्वकर्म सांगणाऱ्या श्रुतींशीं विरोध येतो. पण ह्या कर्माच्या विपाकोत्पादनाविषयीं **चार विकल्प** उत्पन्न होतात. काय एक कर्म एक जन्म देतें कीं अनेक जन्म देतें ? दुसरें, अनेक कर्मे अनेक जन्म देतात कीं एक जन्म देतात ? पैकीं पहिला पक्ष संभवत नाहीं. कारण एक कर्म जर एकच जन्म देतें तर पूर्वसंचितकर्म अनंत असल्यामुळें प्रथम याच कर्माचें फळ होईल हा नियम दाखवितां येत नसल्यामुळें व एक वेळ आपण पापकर्मानें दिलेल्या पापजन्ममय प्रवाहांत सांपडलों ह्मणजे हातून अधिक अधिक पाप घडून आतां केलेलें शुभकर्मही नहुषाप्रमाणें नष्ट होणार. नहुषाच्या स्वर्गरूपप्रारब्धकर्माचा देखील अभिभव झाला तर संचिताची काय कथा ? याप्रमाणें अविश्वासामुळें शुभकर्माचें ठिकाणीं कोणाची प्रवृत्ति होणार नाहीं. असें होणें अनिष्ट आहे. कारण यावज्जीव शुभकर्मे करावीं असें ईशावास्याच्या दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे. हा दोष येऊं नये ह्मणून दुसऱ्याही पक्षाचा अंगिकार आपल्याला करितां येणार नाहीं. कारण एकच कर्म जर अनंत जन्म देणारें होईल तर बाकीचीं कर्मे तशींच पडून राहतील; व बाकीच्याच कर्माची जर कांहीं गती नाहीं तर एखादें कर्म तरी अनंत फळ जन्म देतें हें कशावरून ? याप्रमाणें कर्मवादच निराधार ठरून सर्वथा अविश्वास उत्पन्न होईल. तोही इष्ट नाहींच. ह्मणून तिसरा पक्ष घेतला तरी कोठें निर्वाह होतो ? कारण अनेक कर्मे अनेक जन्म देतात तीं काय युगपत कीं क्रमानें ? पैकीं युगपत जन्म देणें तर संभवत नाहीं; कारण ब्राह्मणाचा व

कुत्र्याचा एकदमच जर एखाद्या मनुष्याला जन्म झाला तर होम करणें व विष्ठा खाणें दोहोंचाही एकाच काळीं प्रसंग येईल; व तसा प्रसंग कोणीं पाहिला किंवा ऐकिला सुद्धां नाहीं. बरें, आतां क्रमानें अनेक कर्में अनेक जन्म देतात झटलें तर पहिल्या पक्षावर आलेले सर्व दोष येतात. झणून विचित्र पुण्यपापरूप अनेक कर्में एके ठिकाणीं मिळून एकच जन्म देतात हाच पक्ष शेष राहतो. यालाच **एकभविककर्माशय** झणतात. हा एकभविकवाद असा आहे कीं जोंपर्यंत प्रारब्धकर्म प्रतिबंधक असतें तोंपर्यंत संचित कर्में दिसत नाहींत; व मरणकाळीं प्रारब्धरूप प्रतिबंधाचा नाश झाल्यामुळें सर्व संचित कर्में एकदम पुढें येतात; व पुढील जन्माचा आरंभ करितात. हा कर्माशय एकभविक असून ह्याच्या वासना मात्र अनादि आहेत. हा एकभविकवाद यद्यपि योगभाष्यांत व्यासांनीं स्वीकारला आहे तथापि तो सर्वत्र लागू पडत नाहीं. कारण "**तद्यइहरमणीयचरणाअभ्याशोहयत्तेरमणीयांयोनिमापद्येरन्ब्राह्मणयोनिंवाक्षत्रिययोनिंवावैश्ययोनिंवाथयइहकपूयचरणाअभ्याशोहयत्तेकपूयांयोनिमापद्येरन्श्वयोनिंवासूकरयोनिंवाचांडाल--योनिंवा ॥**" (छांदोग्य ५।१०।७) श्रुत्यभिप्राय:-पुण्य करणारे फळ भोगून झाल्यानंतर ब्राह्मणादिपुण्ययोनींत व पापकरणारे फळ भोगून झाल्यानंतर श्वानादिपापयोनींत जन्म घेतात. हा जन्मानें वर्ण मानणाऱ्याप्रमाणें अर्थ असून गुणकर्मानें वर्णव्यवस्था मानणारे या श्रुतीचा असा अर्थ करितात. श्रुतीमध्यें जे श्वानसूकर शब्द आहेत त्याविषयीं तर विवाद नाहीं. परंतु ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाल इत्यादि जे वर्णपर शब्द आहेत ते गुणकर्मपरच लाविले पाहिजेत. कारण ब्राह्मण जातींत जन्म घेऊनही जो चांडालाप्रमाणें वागतो अशाच्या पोटीं येऊन पुण्यवंताला रमणीय लाभ काय होणार ? तात्पर्य, सद्गुणी पुरूषाच्याच पोटीं पुण्यवान जन्म घेतो; व झणूनच त्यांना पूर्वशिक्षण तसेंच मिळते. असो. या श्रुतीवरून 'कृतात्ययाधिकरणांत' स्वर्ग भोगल्यानंतर कर्माचा अनुशय म्हणजे अवशेष घेऊनच जीव या लोकीं जन्म घेतात असें व्यासांनींच सांगितलें आहे. म्हणून ब्रह्मसूत्रांत व योगभाष्यांत स्वत:च व्यास परस्परविरुद्ध बोलिले आहेत असा भास होतो. कारण 'कृता-

त्ययाधिकरण' एकभविकवादाच्या अगदीं विरुद्ध आहे. एवढ्याकरितां एकभविक कर्माशय कचित् ठिकाणीं घेतला ह्मणजे दोन्ही वाक्यांचा समन्वय होतो.

**शिष्यः**— कां ? स्वर्ग भोगून झाल्यानंतर कर्मशेष राहतो या विषयीं जशी तुह्मी श्रुति सांगितली तशी कर्मशेष राहत नाहीं या विषयींही श्रुति आहे. "**तस्मिन्यावत्संपातमुषित्वाथैतमेवाध्वानंपुनर्निवर्तते**" [ छांदोग्य ५-१०-५. ] श्रुत्यभिप्रायः— यावत् कर्माचा क्षय होईपर्यंत फळिया[1] स्वर्गलोकांत राहून नंतर खालीं येतो. ह्या श्रुतीवरून निरनुशयच पुनरागमन सिद्ध होत असल्यामुळें सर्वत्र एकभविकवादाची हानी होत नाहीं.

**श्रीगुरुः**— काय रहस्य न जाणून 'विद्यांविवादाय' या ह्मणीचें सार्थक करण्याकरितांच वेदाध्ययन केलें आहेस? अरे! 'यावत्संपातम्' या श्रुतींतील वचनावरूनच सर्व कर्माचा क्षय काय ह्मणून घ्यावा? 'यावत्' या शद्बाचा अर्थ सर्वच घ्यावयाचा असेल तर मग 'यावज्जीवमग्निहोत्रंजुहूयात्' या सर्व जन्मभर होम सांगणाऱ्या श्रुतिवाक्यांनीं मलविसर्ग करितांनां देखील होम करण्याचें विधान केलें असलें पाहिजे.

**शिष्यः**— अहो! तुमचें ह्मणणें काय तें तरी सांगा?

**श्रीगुरुः**— असा थोडा मार्गावर येऊन विचारशील तर निर्णय करण्याचा आमचा बाणा आहेच. आह्मी ह्मणतो कीं 'यावत्' शद्ब सर्व कर्मास लावावयाचा नसून जितकें कर्म स्वर्गलोकीं भोगलें जातें तितक्यासच तो लावणें चांगलें. ह्मणूनच आह्मी 'रमणीयचरणा' ह्या श्रुतीला मुख्यत्व देतों. पुण्यलोक भोगून योगभ्रष्ट पुनः या लोकांत जन्म घेतो अशी जाग्रत्स्मृतीही असून स्वर्ग भोगून शेषकर्मानेंच जन्म घेतो अशा स्पष्ट अर्थाची आपस्तंब स्मृतीही आहे. पुनः, कोणत्याही प्राण्याला यालोकीं जन्मापासूनच भोग असतात असें सर्वानुभूत आहे. एकभविक-

---

१ फळ भोगणारा.

वादाप्रमाणें तर या लोकांतील सर्व कर्मांनीं स्वर्गलोकांत भोग भोगून त्या सर्व कर्मांचा क्षय झाला आहे, व स्वर्गलोक केवळ भोगभूमी असल्यामुळें तेथें कर्म उत्पन्न होत नाहीं, असें एकभविकवाद समर्थन करणाऱ्या योगभाष्यकारांनींच ' इहैवतेकर्मकवयोवेदयन्ते ' ही श्रुति प्रमाण देऊन मानलें आहे; आणि मनुष्यलोकांतच कर्म निष्पन्न होणारी ही वर्णव्यवस्था आहे असें श्रीमत् शंकराचार्यांनीं गीताभाष्यांत स्पष्ट सांगितलें आहे. यद्यपि देवताधिकाराधिकरणामध्यें ज्ञानाधिकारी कर्मांचा देवांनां अधिकार सांगितला आहे, आणि ब्रह्मज्ञानार्थ ब्रह्मदेवाजवळ जाऊन इंद्रानें गुरुशुश्रुषा व ब्रह्मचर्यरूप तप केलें अशी छांदोग्यश्रुति आहे, तथापि तेथें देवांनां ब्रह्मविद्याधिकारच सांगण्याची प्रतिज्ञा आहे. कर्माधिकार तर देवांनां नाहीं; कारण देवांनां दुसरे देव नाहींत म्हणून. जसें ऐंद्रयागामध्यें दध्यादिक द्रव्यांचा इंद्रासाठीं त्याग करावा लागतो. त्याग म्हणजे स्वत्वाची निवृत्ति. परंतु इंद्राला दुसरा कोण इंद्र आहे कीं ज्याच्याकरितां तो दध्यादिक द्रव्यांचा त्याग करील? तात्पर्य, स्वर्गादिभोग देणाऱ्या कर्माचेठायीं देवांनां अधिकार नाहीं. यद्यपि स्वरक्षणार्थ भगवत्स्तुत्यादिकर्माधिकार पुराणांत इंद्रादिकांनां सांगितला आहे, तथापि तो दैत्यसामर्थ्याभिभूत मनुष्यवत् दुर्बलमानस झाल्यामुळें आहे. पुनः, मनुष्यजन्माला येण्याचें कर्म तर देवयोनींत संभवतच नाहीं. कारण मनुष्यजन्म देवापेक्षां नीच असल्यामुळें मनुष्यजन्माला येण्याला देवांनां पापकर्म करावें लागेल; व तसें कर्म सांगणारें एखादें शास्त्र जीवंत नाहीं. यद्यपि मनुष्यजन्म होण्याची देव इच्छा करितात अशीं कोठें कोठें वचनें आहेत तथापि तीं वासनापर समजावींत; कर्मपर समजूं नयेत. देवलोकांतील भोगांचा क्षय होतांनां पुनः कर्में करून हा भोग मिळवावा अशी त्यांनां वासना होणें साहजिक आहे. परंतु तेथें कर्म करण्याचा अवकाश नाहीं. कर्म करण्याचा अवकाश मानला तर तो क्षीणपुण्य मनुष्यलोकांत येण्याचें कर्म कशाला करील? तेथल्या तेथेंच देवलोक मिळविण्याचें कर्म कां करणार नाहीं? व तसेंही मानलें तर देवांनीं यज्ञ करण्याला पुनः दुसरे देव आणावे कोठचे? अशा स्थितींत तुमच्या म्हणण्याप्रमाणें सर्व कर्म भोगून झाल्यामुळें मनुष्यजन्मारंभक

कर्मच राहत नाहीं व ज्ञानावांचून मोक्ष होत नाहीं. अशा स्थितींत काय क्षीणपुण्य पुरुषांनीं झोंप घ्यावी ? चांगदेवाच्या जन्मनिमित्तानें जरी कांहीं ग्रंथांत इंद्रांनां कारागार सांगितला आहे तरी तें इंद्राच्या पूर्वजन्मांतील फळ समजावें. नाहींतर सर्व श्रुतींचा विरोध प्राप्त होईल. सारांश, कर्माचा अनुशय शेष राहत असल्यामुळें सर्वत्र एकभविकवाद लागू करणें योग्य नाहीं, तर तो क्वचितच लागू करावा. तो असा:- **कर्म दोन प्रकारचें आहे. एक नियतविपाकी व दुसरें अनियतविपाकी.** पैकीं नियतविपाकी कर्मासच हा एकभविकवाद लागू होतो. जसें नंदीश्वराला एकभविक पुण्याशयानें देवशरीर मिळालें व नहुषाला एकभविक पापाशयानें तिर्यक्शरीर मिळालें. परंतु नियतविपाकी कर्मही क्रममुक्तिप्राप्तिविषयीं अत्यंत लागू पडत असून इतरांविषयीं अनुमापकरूपानें अंगुलीनिर्देशमात्र समजावें. हा नियतविपाकी कर्माशय बहुधा दृष्टजन्मवेदनीय असून क्वचित् अदृष्टजन्मवेदनीयही असूं शकतो. राहिलेल्या **अनियतविपाकी कर्माची तीन प्रकारची गती** आहे. पक्व न होतां नाश होणें ही पाहिली. या गतीविषयीं श्रुतिप्रमाण आहे. '**द्वेद्वेहवैकर्मणीवेदितव्येपापकस्यैकोराशिः पुण्यकृतोऽपहन्तितदिच्छस्वकर्माणिसुकृतानिकर्तुमिहैवतेकर्मकवयोवेदयन्ते**'। श्रुत्यभिप्राय:—पापपुण्य अशा दोन प्रकारचें कर्म असून पापाच्या मोठ्या समुदायाचा पुण्याचा मोठा समुदाय नाश करितो. ह्मणून ईश्वर ह्मणतो 'हे जीवा, तूं शुभकर्म करण्याची इच्छा कर. कारण या मनुष्यलोकांतच तुला कर्में आहेत.' विश्वामित्रानें केलेला त्रिशंकूद्धाराचा इतिहास येथें प्रमाण समजावा. अनियतविपाकी कर्माची दुसरी गती ह्मणजे प्रधानकर्मण्यावापगमन. ह्मणजे एखाद्या मुख्य कर्माच्या ठिकाणीं अंगभूत होऊन अविरुद्ध फल देणें किंवा दुःख दिलें तरी सहन करण्यासारखें देणें. माझें पुण्य पुष्कळ आहे ह्मणून येथें मला थोडेंसे पाप घडलें तर तें माझी स्वर्गांत फारच थोडी हानी करील अशा अर्थाची श्रुति आहे ती ही. '**स्यात्स्वल्पःसंकरःसपरिहारःसप्रत्यवमर्षः कुशलस्यनाऽपकर्षायाऽलमकस्मात् । कुशलंहिमेबह्न्यदास्तियत्रायमावापगतःस्वर्गेऽप्यपकर्षमल्पंकरिष्यति**। यज्ञांत केलेली पशुहिंसा

अशा प्रकारचें फल देतें अशा अर्थाचें पंचशिखाचार्यांचें सूत्रही आहे. आतां, अनियतविपाकी कर्माची तिसरी गती ह्मणजे एखाद्या बलवान नियत कर्माच्या योगानें पुण्यकर्म दडपून राहणें ही होय.

**शिष्यः**— भगवन! असें एखाद्या बलवान पापाच्या योगानें पुण्यकर्म दडपून राहिलें ह्मणजे कसें करावें?

**श्रीगुरुः**— त्या पुण्याला नियतविपाकी करावें.

**शिष्यः**— नियतविपाकी ह्मणजे काय?

**श्रीगुरुः**— त्याच्या फल देण्यामध्यें कोणतेंच विघ्न आड न येणें.

**शिष्यः**— हें कशानें होतें?

**श्रीगुरुः**— तीव्र यत्नानें.

**शिष्यः**— तीव्र यत्न कसा करावा?

**श्रीगुरुः**— सर्व कर्मांचा तीव्र यत्न सांगण्याला तर अनंतकल्प पुरणार नाहींत परंतु शक्य तेवढी शास्त्रीय शुभकर्मांच्या **तीव्र यत्नाची रीति** सांगतों:—

हा तीव्रयत्न दोन प्रकारचा आहे. एक स्वतःची भावना तीव्र करून व दुसरा शुभवस्तुशक्तीचें सहाय घेऊन. पैकीं पहिल्याप्रकारचा फार कठिण असून भवप्रत्ययेयोगियांनां साध्य होण्यासारखा आहे; व दुसऱ्या प्रकारचा सर्वांकरितां असून बराच सुलभ आहे. ह्याचीं आतां कांहीं उदाहरणें देतो, जसें:— घरीं केलेलें दान अनियतविपाकी असलें तर तेंच रविग्रहणीं कुरुक्षेत्रीं दान केलें असतां नियतविपाकी होतें. किंवा **गंगास्नानानें** इतर सर्व क्षेत्रकर्में नियतविपाकी होतात. घरीं केलेल्या अनियतविपाकी श्राद्धापेक्षां गयेंत केलेलें श्राद्ध नियतविपाकी होतें. अथवा **भगवन्नामस्मरणानें सर्व प्रायश्चित्त व सर्वकर्में नियतविपाकी होतात.** सारांश, विषयाभिभूत अशुद्ध चित्तानीं केलेलीं कर्में बहुशः अनियतविपाकी असून विषयानभिभूत शुद्ध चित्तानीं केलेलीं कर्में बहुशः नियतविपाकी असतात. अभिप्राय हा कीं **वामतंत्रानुसार झालेलीं अथवा विगीतवृद्धव्यवहारानुसार श्रद्धेनें झालेलीं अनियतविपाकी व निगमस्मृतिपुराणानुसार झालेलीं कर्में नियतविपाकी समजावीं. त्यांतही परमेश्वराला अर्पण केलेलीं कर्में अत्यंत नियतविपाकी म्हणजे**

**कैवल्यज्ञानयोग्यजन्मादिप्रद समजावीं.** ह्मणूनच तुकाराम महाराजानें उपासनेविषयीं ' हा तो नोहे कांहीं निराशेचा ठाव। ' असें म्हटलें आहे. याप्रमाणें नियतविपाकी कर्माशयच एकभविक आहे खरा; परंतु येथेंही थोडासा भेद आहेच. क्रममुक्तिप्राप्तिविषयीं एकभविक कर्माशय तर उत्सर्गरूप आहे; आणि इतरांच्या नियतविपाकी कर्माचें ठिकाणीं क्वचित् एकभविकाला अपवाद आहे. पवमानाचें पठन केलें असतां सात जन्म ब्राह्मणाचे होतात इत्यादि अपवाद समजावा. ह्या सर्व विवेचनाचें सार एवढेंच कीं गंगास्नानभगवन्नामस्मरणादिकाप्रमाणें **सज्जनांचा दयारूप अनुग्रह लोकांच्या अनियतविपाकी पुण्याशयास नियतविपाकी पुण्याशयरूप करितो. सत्संग जरी इतर योग्य सहायक वस्तुशक्तिसमान आहे तथापि इतर वस्तुशक्ति महावाक्योपदेश दृष्यरूपानें करूं शकत नाहीं; व सज्जन करूं शकतात.** हाच महात्म्यामधील विशेष आहे. भगवदाश्रयत्वास्तव सज्जन, गंगा व नाम हे एकच समजावे. परंतु त्यांतील सज्जनांचा उपदेश दृष्य व गंगा आणि नाम या दोहोंचा अदृष्य असून सर्वांच्या फलांत यत्किंचितही अंतर नाहीं.

पुन:, दयावान पुरुषाला सर्वत्याग सहजच साधतो. **परक्यावर दया केली असतां ज्याप्रमाणें खरा त्याग होतो त्याप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही उपायानें होत नाहीं.** कारण विषयांचें ग्रहण रागानें होत असून त्यांचा परित्याग द्वेषानें होतो. ते दोन्हीही न व्हावेत ह्मणून **सर्वांवर निरपेक्ष प्रीति करणाऱ्या पुरुषालाच सर्वत्याग मिळतो;** व त्यामुळें विश्वांत असूनही अलिप्त राहतां येते; व दुसरेही दयेनें आपल्यासारखे करितां येतात. ह्मणून **कर्मवाद हा दयेला घातक नसून उलटा साधक आहे.** एवढ्याचकरितां महात्मे तीर्थाचें ठिकाणीं नित्य आगमन करीत असतात. ते सर्व महात्म्या परीक्षितीला वैराग्य झालें हें जाणून तेथें प्राप्त झाले. एवढ्यानें तुझी शंका निवृत्त झाली असेल तर पुढें ग्रंथ श्रवण कर.

**शिष्य:**– आज्ञा भगवन् !

॥ ओव्या ॥

श्रीगुरुः– तीर्थांचेंही पवित्रपण । तो परमात्मा जगज्जीवन । तयाचेंही अधिष्ठान । कोमल हृदय साधूंचें । ८३ । ह्मणोनि तीर्थांस तीर्थरूप करिती । ऐसी सज्जनांची स्थिती । लोकीं साधुत्वाभिमान न धरावा चित्तीं । यालागीं न्हाती तीर्थीं स्वयें ॥ १८४ ॥ ऐसे महाराज मुनिजन । तेथ आले कवण कवण । तेंही ऐके सावधान । पूर्णसमाधानचंद्रा ॥ ८५ ॥ ज्यांच्या तपःसामर्थ्यें करोनी । पोटीं जन्मले देव तीन्ही । तो दत्तात्रेयतात अत्रिमुनी । अनुसूयाजानी पातला ॥ ८६ ॥ ज्यानें आपुल्या ज्ञानेंकरून । शिष्यत्वा आणिला नारायण । तो ब्रह्मर्षिवर्य ब्रह्मनंदन । वसिष्ठ भगवान पातला ॥ ८७ ॥ अरिष्टनेमी अंगिरा च्यवन । शरद्वान पराशर गाधीनंदन । भृगु उतथ्य इध्मबाहू आपण । राम इंद्रप्रमद तेहि आले ॥ ८८ ॥ मेधातिथी देवल आर्ष्टिसेन । भारद्वाज गौतम पिप्पलाद सुजन । मैत्रेय और्वकवश कुंभजनन । पातले दयाघन सर्वेही ॥ ८९ ॥ तोडोनि कुमतांचे वाद । जेणें समन्वयीले वेद । तो महाराज कृपासिद्ध । द्वैपायन पातला ॥ ९० ॥ जेणें भक्तिसूत्र निर्मुनी । भगवद्भक्ति स्थापिली जनीं । तो भगवान देवर्षिमुकुटमणी । नारदमुनी पातला ॥ ९१ ॥ देवर्षि ब्रह्मर्षि राजर्षि । अवघे पातले कनकादिवशीं । रायें पूजोनि अतिविशेषीं भावें चरणासी लागला ॥ ९२ ॥ महात्मे बैसलीया श्रेष्ठासनीं । मग राय पुनः प्रणाम करोनी । उभा राहिला बद्धपाणी । मंजुळ वाणी बोलत ॥ ९३ ॥ महाराज प्रायोपवेषण । उचित किंवा अनुचित करण । अपराधासी योग्य शासन । सर्वज्ञावीण न दावी ॥ ९४ ॥

॥ अभंग ॥

त्रिभुवनीं तोचि वाटत भाग्याचा । आवडी संताचा दास झाला ॥ १ ॥ विसरला सारें कूळ घर दार । संतपायावर लोटांगणी ॥ २ ॥ आणिक नाहींच सर्वथा उपाय । जीव ब्रह्ममय करावया ॥ ३ ॥ ज्ञानेश्वरप्रभू सज्जनभूपाळ । राहो माझें भाळ नित्य पायीं ॥ ९५ ॥

॥ दिंडी ॥

ह्मणे राजा सर्वत्र धन्य झालों । मूर्तिमंत पाहोनि संत धालों ।
सर्वलोकीं आधार हाचि मोठा । संतमहिमें भगवंत होय गोटा¹ ॥ ९६ ॥

॥ ओव्या ॥

कोणत्याही रूपेंकरून । दीना पदरीं धरिती सुजन । असो मज ब्रह्मशाप दारुण । परी अनुग्रह पूर्ण वाटतो ॥ ९७ ॥ आह्मी क्षत्रिय परम मत्त । आह्मा करावया विरक्त । शापदाता ऋषिवर्यसुत । सद्गुरुनाथ मज झाला ॥ ९८ ॥ धन्य धन्य रायाची स्थिती । इष्टानिष्ट नाहीं ज्या क्षिती । एकवेळ वैराग्य झालिया चित्तीं । मग दुःख तेंही सुख वाटे ॥ ९९ वैद्य भेटतां कृपावंत । सर्पविषही औषध होत । कीं अग्निसंगें अमेध्यजात । परि ते होत शुद्धची ॥ १०० ॥ सुखदुःखांचे भार कोटी । राहती विषयसुखांच्या पोटीं । त्या विषयांतूनि निवतां दृष्टी । सुधामय सृष्टि भासत ॥ १ ॥ असो सूत ह्मणे मुनिराया । राव ह्मणे विप्रवर्या । तक्षक येवोनि माझी काया । अवघी लवलाह्या गिळो का ॥ २ ॥ माझ्या प्रभूचें शेषशयन । तत्कुलविषें मज येतां मरण । थोर नाहीं अमृत याहुन । जें रंभावचनबेडिं गोवी ॥ ३ ॥ ही माता भगवच्चरणनंदिनी । विमला मलहा मंदाकिनी । ही मज उत्संगीं घेवो जननी । मग जावोत निघोनि असु सुखें ॥ ४ ॥ मातेच्या अंकीं जातां प्राण । तरी माय प्रार्थी नारायण । मग जगन्माताअंकीं जातां प्राण । कळवळा तिचा न वर्णवे ॥ ५ ॥ पापी जे नरकपट्टाभिषिक्त । ते माते तव जल पीतां त्वरित । होवोनियां वैकुंठनाथ । इतरां समर्थ ताराया ॥ ६॥ आणि मज शरणागता आपण । आपुलें ह्मणा अवघे मुनिजन । रामकृष्णहरी ह्मणतां प्राण । जावो निघोन आवडी ॥ ७ ॥ गंगापानें हरिरूप प्राण । सत्संगें काया नारायण । हरिनामें हरिरूप झालें मन । आत्मा भगवान तोचि तो ॥ ८ ॥ मातें नावडे मोक्ष मुक्ति । होईल ज्या योनीची प्राप्ति । त्या त्या योनींत गोपिकापती । सर्वदा चित्तीं वसावा

---

१ गोटा भगवंत होय असा अन्वय. ह्मणजे पाषाणमूर्तीमध्येंही प्राणप्रतिष्ठापनादिकांच्या योगानें देवत्व येतें; किंवा प्रल्हादादिकृत स्तंभादि स्थावरांतील भगवत्प्रगटण उदाहरणार्थ घेईजे.

॥ ९ ॥ गंगास्नान भगवत्भजन । आणि आपुलें ह्मणोत सुजन । ऐसें सर्व कृपाळुकृपेंकरून । पावेन हें बोलून नमी चरणा ॥ १० ॥ ऐसा उत्तरमुख दर्भासनीं । राजा वदे बद्धपाणी । तयाची प्रशंसा करोनि मुनी । वरमय वाणी बोलिले ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥

सोडोनि बंधु जननी विषयप्रसक्ती ।
झाला विरक्त नरपाळ वरील मुक्ती ॥
द्याया तयास अनुमोदन देव सारे ।
वर्षोनियां सुमन वाजविती नगारे ॥ १२ ॥
ज्ञानांत विघ्न करिती सुर हे प्रसिद्ध ।
ती विष्णुभक्ति करितां पळती अविद्ध ।
यालागिं राव करि माधवसाधनाला ।
जाणोनि देति सुरही अनुमोदनाला ॥ १३ ॥

॥ ओव्या ॥

देवांचिया अनुमोदनें । हारपलीं अदृष्ट विघ्नें । जीं होताति प्रतिबंधनें । चित्तशुद्धीस ॥ १४ ॥ आतां ऋषींच्या अनुमोदनें । बाधूं न शकती दृष्ट विघ्नें । जीं समाधीविषयीं प्रतिबंधनें । कामक्रोधासंभावनादी ॥ १५ ॥ रायास वैराग्य पाहोनि दृढ । मुनी आशिर्वाद देती उघड । अंतरीं जो भाव होय सुघड । तेचि सामुग्री होय तया ॥ १६ ॥ मूर्खलोक ऐसें ह्मणती । सद्गुरू न भेटे आह्मांप्रती । विषयवैराग्य नाहीं चित्तीं । बळें भक्षिती मिष्टान्न ॥ १७ ॥ पूर्ण वैराग्य होतां अंतरीं । सद्गुरुसमुदाय येतो घरीं । राव विरक्त होतांचि गंगातीरीं । ऋषिसमुदाय पातला ॥ १८ ॥ 'वैराग्यावांचूनि कहीं । ज्ञानासी तगणेंचि नाहीं । हें विचारोनि ठायीं । ठेविलें देवें' ॥ १९ ॥ वैराग्य होतां ध्रुवबाळास । नारदमुनी भेटले त्यास । वैराग्य होतां परीक्षितीस । ऋषी तयास भेटले ॥ २० ॥ वैराग्य होतां श्रुतदेव ब्राह्मणा । भेटी जाहली जगजीवना। वैराग्य विदुरास होतां जाणा । मैत्रेय मुनी भेटले ॥ २१ ॥ विरक्त होतां देवहुती । गर्भी कपिल जाहली विष्णुमूर्ति । वैराग्यबळें तुकारामाप्रति । स्वप्नीं सद्गुरू भेटले ॥ २२ ॥ बैसोनि उच्च मंचकावरी । कामि-

नीस्तन आलिंगूनि उरीं । गुरू न भेटती हे वल्गना करी । दिवस रात्रीं दर्दुरसम ॥ २३ ॥ जेव्हां सुटेल विषयासक्ति । जेव्हां अंतरीं उपजेल भक्ति । तेव्हां येवोनि महंत भेटती । शपथ निश्चिती श्रीहरीची ॥ २४। असो द्विज ह्मणती कुरुराजवर्या । तुझी हरिपदानुसरणचर्या । हरिभक्ताचें चित्त विषया । वश लवलाह्या कदा नसे ॥ ३५ ॥ जया लेंकुरा घेत माय । तया कडिये रहावयाची संवय । मग खेळणें देतां नाना उपाय। घेतल्यावीण शांत नव्हे ॥२६॥ तैसी अंतरीं श्रीहरिभक्ति । उचंबळलिया प्रेमस्थिती। विषय खेळणें लोटोनि लातीं। पाय देती मोक्षमाथां ।२७। कीं क्षुधा वाढली जयाचें पोटीं । तो न पुसे तंडुळ पेरणें गोष्टी । तैसा आवडो लागतां जगजेठी । तर्ककटकटी आटती ॥ २८ ॥ रोगें पीडिला मागे अमृत । सर्पसंदष्ट मंत्री शोधित । तैसा संसारीं दोष जो पाहत । तोचि विनटत हरिचरणा ॥ २९ ॥

॥ पद ॥

जीवित खाइल काळ । कधिं तरी ॥ ध्रु० ॥ वृद्धहि मरती तरुणहि मरती । मरति लहानसे बाळ ॥ जीवित० ॥ १ ॥ मागें गेले जातिल पुढतीं । जाणुनि भज यदुपाळ ॥ जीवित० ॥ २ ॥ अलकावतिवल्लभपदकमळा । वाहि प्रेममय माळ ॥ जीवित० ॥ ३ ॥ २३० ॥

॥ पद ॥

'इस तनधनकी कवन बराई । देखत नैनोमें मट्टि मिलाई ॥ ध्रु० ॥ दहि दुध खाकर पिंड जमाया । वहि पिंड लेकर महिमें लाया ॥इस०॥ ॥ १ ॥ हाड जले जैसी लकडेकी मुलिया । बाल जले जैसी घांसकी पुलिया ॥ इस० ॥ २ ॥ मट्टी खोद खोद महेल बनाया । आपहि जाकर जंगल सोया ॥ इस० ॥ ३ ॥ कहत कबीरा सुनो मोरि मुनिया । आप मुये पाछे डूब गयी दुनिया ॥ इस तनधनकी कवन० '॥४॥ [कबीर.]

॥ पद ॥

सीताराम भजो मनमें । जबलग सास रहे तनमें ॥ ध्रु० ॥ कोइ दिन खावे दूधमलीदा कोइ दिन सीरापूरी । कोइ दिन ऐसा आन पडेगा नहिं मिलनेको ज्वारी ॥ सीताराम भजो० ॥ १ ॥ कोइ दिन बैठे गाडी घोडा कोइ दिन पालखि हत्ती। कोइ दिन ऐसा आन गिरेगा नहि

मिलनेकी जूती ॥ सीताराम० ॥ २ ॥ कोइ दिन ओढे शालदुशाला कोइ दिन सफेद खादी । कोइ दिन ऐसा आन परेगा नहि मिलनेकी चिंधी ॥ सीता० ॥ ३ ॥ कहत कबीरा सुनभइ साधू बार बार नहि आवे । ऐसी करनी करले यारो जनम मरन मिटि जावे ॥ सीता राम० ॥ ४ ॥

[ कबीर. ]

॥ पद ॥

राम हरि राम हरि बोल सूवा ॥ ध्रु० ॥ तो सही चतुर सूजान पर बीन अति परे जनि पींजरे मोहकूवा । पाय उत्तम जनम लायले चपल मन गाय गोविंदगुन जीत जूवा । आपही आप अग्याननलिनी बंध्यो बिना प्रभुबिमुख कैबेर मूवा । दास सुंदर कहे परम पद तो लहे राम हरि राम हरि बोल सूवा ॥ राम हरि० ॥ १ ॥ ( सुंदरदास.)

॥ ओव्या ॥

'अहा कटकटा हें वोखटें । इये मृत्युलोकींचें उफराटें । एथ अर्जुना जरी अवचटें । जन्मलासि तूं ॥ तरी झडझडोनि वहिला निघ । इये भक्ती-चिये वाटे लाग । जिया पावसी अव्यंग ! निजधाम माझें' ॥ ( ज्ञाने० अध्या० ९ ओ० ५१५--५१६ ) एवं श्रीमंतादिवाणी । विचारोनि आपुल्या मनीं । धनकामिनीवरी थुंकोनी । चक्रपाणी आठवावा ॥ ३१ । ह्मणोनि राया तुझ्याठायीं । वैराग्याचें आश्चर्य नाहीं । आनुवंशिक शील लवलाही । तुझेंचि हें ॥ ३२ ॥ इंद्र लागे जिच्या चरणीं । ती लक्ष्मी अभिमान सांडुनी । पाय धूत मृदु करेंकरोनि । तो हरि सांडोनि राज्य इच्छी कवण ? ॥ ३३ ॥ युधिष्ठिरादि तव पूर्वज समस्त । राज्यादि मानोनि तृणवत । हृदयीं धरोनि राधिकाकान्त । अनर्थनिवृत्त जाहले३४

॥ अभंग ॥

जरी मना लागे गोविंदाची गोडी । हारपती खोडी इंद्रियाच्या ॥ १ सांडावे वाटती प्राण ओवाळूनी । पाहतां लोचनीं श्याममूर्ती ॥ २ ॥ स्फुरेना कदापि जीविं जीवपण । ईश्वराभिमान तोही नाहीं ॥ ३ ॥ ज्ञानेश्वर स्वामी माझा कृपावंत । प्रेम राहो तेथ जन्मजन्म ॥४॥ ३५ ॥

॥ ओव्या ॥

ऐसे महाराज मुनिदेव । जयांचा लोकानुग्रह स्वभाव । तिहीं आश्वा-सिला राव । मार्दवमनेंकरोनी ॥ ३६ ॥ मग आपसांत बोलती वाणी ।

आह्मी यद्यपि निष्काम मुनी । तथापि जोंवरी हा न मिळेल हरिचरणीं । तोंवरी याचि स्थानिं राहूं ॥ ३७ ॥ अगाध संतांची भूतदया । जीवें विनटती दीनकार्या । निर्मोय असोनि दीनाची माया । आश्चर्य लवलाह्या हें वाटे ॥ ३८ ॥ बोधावया मुमुक्षूजन । वाट पाहती रात्रंदिन । आसन भोजन आणि शयन । दीनाकारणें त्यागिती ॥ ३९ ॥ वास्तवीक ज्यांच्या दृष्टि । ब्रह्मावांचून नाहीं सृष्टी । तथापि दीनास्तव होती कष्टी । हेंचि आश्चर्य वाटते ॥ ४० ॥ निजात्मानुभवेंकरून । झाले देहासहित नारायण । तथापि प्रेमें करोनि भजन । तारिती दीन नवल हें ॥ ४१ ॥ हा हरिरूपीं मिळेपर्यंत । आह्मी अवघेचि राहूं येथ । ऐसें वचन ऐकोनि नृपनाथ । संतुष्टचित्त जाहला ॥४२ ॥ तुज भेटेल नारायण । ऐसें साधूंचें आश्वासन । मिळालिया आणीक त्याहून । भाग्य नाहीं चतुर्दश भुवनीं ॥ २४३ ॥

॥ गीति ॥

'तरला ययाति राजा दर्शन होतांचि संतरायाचें ।
सद्दर्शनचि सुदर्शन पळवी चट कटक अंतरायाचें ॥ २४४ ॥'
[मोरोपंत.]

॥ पद ॥

'प्रीति प्रचंड लगे परब्रह्महि । और सबे कछु लागत फीको ॥ शुद्ध हृदे मन होई सुनिर्मल । द्वैतप्रभाव मिटे सब जीको ॥ गोष्टिरु ज्ञान अनंत चले जहं । सुंदर जैसो प्रवाह नदीको ॥ ताहिते जानि करो निशि बासर । साधुको संग सदा अति नीको ॥ १ ॥' ( सुंदरदास. )

॥ पद ॥

जारे हरि परम उदार ॥ असशीं० ॥ ध्रु० ॥ तरि देई बळ अवसर जेणें । झाडिन सज्जनद्वार ॥ अस० ॥ १ ॥ सत्पदजीवन पिउनी वाटो । तुच्छ धन सदन दार ॥ अस० ॥ ३ ॥ ज्ञानेश्वरीं अनुराग देई नित । मग बुडवी वा तार ॥ अस० ॥ २४५ ॥

॥ ओव्या ॥

ऐसिया सज्जनांची वाणी । रायें ऐकोनियां श्रवणीं । पूर्ण निवाला अंतःकरणीं । चक्रपाणीचरणचित्त ॥ ४६ ॥ जैसा वनांत पेटवोनि अग्नी ।

व्याधें रोधिली कुरंगिणी । तंव कृपाळू जलद वळोनि गगनीं । शीतल जीवनीं वर्षला ॥ ४७ ॥ कीं प्राण जातां मिळालें अमृत । कीं क्षुधिता भेटला अन्नपर्वत । कीं तान्हिया बाळा अकस्मात । प्रेमळ माता भेटली ॥ ४८ ॥ तैसें पक्षपातरहित । सत्य आणि प्रसादभरित । वचन ऐकोन नृपनाथ । घाली दंडवत चरणावरी ॥४९॥ जो परमात्मा कैवल्यदानी । यच्चरणकन्या मंदाकिनी । तयाचें चरित्र ऐकाया कानीं । मधुरतर वाणी विनवि रावो ॥ २५० ॥ राव विचारी आपुलें मनीं । संतीं आश्वासिलें मजलागुनी । यास्तव मम मुक्ततास्थानीं । संशय नाहीं ॥ ५१ ॥ परंतु गोड मुक्तीहून । जया प्रभूचे असती गुण । जेथ मुनी मधुप होवोन । रुंजी घालती सदैव ॥ ५२ ॥ तयाची अमृतमय लीला । जो कदाही नाहीं प्याला । तरी अपवर्गी तयाला । काय आहे कळेना ॥ ५३ ॥ अहो बंधन केव्हांच नाहीं । तन्मोक्षआशा करोनि कायी । जो आनंद-मय शेषशायी ।त्याचे पायीं लोळावें ॥ ५४ ॥

॥ गीति ॥

मग बोले मुनिवर्या कंचनमय आजिचा असे सुदिन ।
निश्चय तुटेल भव मम द्विजवरवचनासि काळिमा कधिं न ॥ ५५ ॥

॥ श्लोक ॥

प्रतापलों मी परमानुतापें । प्रशांत झालों तुमच्या प्रतापें ॥
तथापि वांछी मन हें स्वभावें । यदूत्तमाचे गुण आयकावे ॥ ५६ ॥

झालों जरी परम जाणुनि मुक्त आजी ।
ही एक आवडि असेचि तथापि माझी ॥
सारथ्य जो करुनि रक्षि पितामहातें ।
यत्पादजीवनिं गिरीशजटा नहाते ॥ ५७ ॥
त्याचेंच वर्णन करा गुण सर्व संत ।
माझ्यास्तव प्रकटला श्रुति मूर्तिमंत ॥
जाणोनि पूर्ण वदती जगदर्थ वाणी ।
ती वेद कोण न म्हणेल महाभिमानी ॥ २५८ ॥

॥ ओव्या ॥

'तयाचे बिसाट शद्ब । सुखें ह्मणोंयेती वेद । सदेह सच्चिदानंद । कां नोह्यावे ते ॥ ' ( ज्ञा० अ० १८ । १६४६. ) ऐसें आळंदीवल्लभवचन । मूर्तिमंत वेद संतजन । यास्तव तया श्रीहरीचे गुण । आवडी श्रवण करूं इच्छी ॥२५९॥

॥ श्लोक ॥

छाया तरूस न मिळे परि देत आहे ।
पाणी नदीस न मिळेचि तथापि वाहे ॥
लोकीं तिहीं किमपि वांछिति ना महंत ।
तच्छील दीनजनतारण हेंऽनुसंत ॥ ६० ॥

॥ गीति ॥

यास्तव विनवितसे मी हरिगुणमहिमा अखंड गावोनी ।
निववा भवदवतप्ता मज निजवचनामृतासि देऊनी ॥ ६१ ॥

॥ ओव्या ॥

निश्चयें प्राणियापाठीं मरण । ह्मणोनि मज आवडे हरिस्मरण । आपण सर्वज्ञ कृपाघन । माझें कल्याण ठावें तुह्मा ॥ ६२ ॥ भूक दाखवावया रडणें । इतुकें बालकें मात्र करणें । मग कंचुकी उघडोनि स्तन मुखीं घालणें । हें जननी जाणे सर्वही ॥ ६३ ॥ तेंवी संसारा देऊनि पाणी । येवोनि लोळावें संतांगणीं । आतां हिताहिताची काहणी । आह्मा निर्वाणी कळेना ॥ ६४ ॥ ओहळें गंगेमाजीं मिळतां । जावें गंगा नेईल त्या पथा । तेंवी समर्थें स्वीकारिलें आतां । मी नेणता सर्वस्व ॥ ६५ ॥

॥ अभंग ॥

दीनबंधू मायबापा । गोड बोला किंवा कोपा ॥ १ ॥ दोहि पक्षीं माझें हित । जन्ममरण नाशत ॥ २ ॥ पायीं गुंतलों नेणता । माझी असो तुह्मा चिंता । आळंदीशा ज्ञानेश्वरा । दिसे उचित तें करा ॥ ६६ ॥

॥ ओवी ॥

ऐसें ऐकोनि नरेंद्रवचन । उपाय सांगती मुनिजन ।
कोणी तप कोणी दान । व्रतध्यानयोगादि ॥ ६७ ॥

॥ गीति ॥

नवल परम हें वाटे न कळुनि नृपराज पुण्यतरु फळला ।
मूर्तिमंत प्रणवचि तो ब्रह्मरूप शुक कृपानिधी वळला ॥ ६८ ॥

॥ ओव्या ॥

नातरी गंगा समुद्रीं जाय । जनाची तृषा हरिती होय । परंतु अभिमानास ठाय । नेदि चित्तीं ॥ ६९ ॥ तैसे परब्रह्मसंपन्न । कांहीं नसोनी प्रयोजन । सहज महीवरी फिरतां सज्जन । तरती जन मुमुक्षू ॥ आपुल्या इच्छेनें मेघ वळत । परी जनांचें कल्याण होय बहुत । तैसे स्वेच्छें कुंभिनी अटती संत । पामर अनंत उद्धरती ॥ ७१ ॥ इतुक्या गुणीं मंडित पूर्ण । भगवान पराशरसुतनंदन । जयाचा वैराग्यदुंदुभी ऐकोन । घाली मदन दंडवत ॥ ७२ ॥ जयास जन्मापासोनि कहीं । संसारवासना शिवलीच नाहीं । जयाचा सद्गुरू भुजगशायी । जो भुलला नाहीं सर्वथा ॥ ७३ ॥ तो महाराज अवधूतवेषी । बालब्रह्मचारी ज्ञानराशी । तो अकस्मात अनभिलाषी । मुनिसभेसी पातला ॥ ७४ ॥

॥ गद्य ॥

**शिष्यः**— भगवन् ! आपलें वचन श्रवण करूनही मला वारंवार शंकापंक मज्जन करूं पाहतो, ह्यांत आपला अपराध नाहीं; केवळ माझा कनिष्ठ अधिकारच ह्याला कारण आहे. परंतु मिळविणारीं व घरीं बसणारीं दोन्ही मुलें आईला जशीं समान असतात, तद्वत् उत्तममध्यमाधमाधिकारी स्वामीला समान आहेत. ह्मणून मी विचारण्याचें धैर्य करितों. आपण आतांच भगवान शुक बालब्रह्मचारी असें सांगितलें आणि देवीभागवतांत तर शुकाचा विवाह सांगितला आहे; या मुळें दोन पुराणांचा परस्परविरोध आहेसें मला वाटतें.

**श्रीगुरुः**— अरे ! तुझ्या ह्मणण्यास एक देवी भागवतच प्रमाण असून आमच्या ह्मणण्यास योगवासिष्ठ, महाभारत व श्रीमद्भागवत अशीं तीन प्रमाणें आहेत.

**शिष्यः**— असले ह्मणून काय झालें? एका पुराणाला जर अप्रामाण्य प्राप्त होईल तर दुसऱ्या पुराणालाही तें प्राप्त होण्याला कांहीं प्रत्यवाय येणार नाहीं.

**श्रीगुरुः**— वत्सा ! आह्मीं जें सांगितलें तें अपय्यादीक्षितांप्रमाणें असल्यामुळें आमच्या पदरचें नव्हतें. अपय्यादीक्षितांनीं ब्रह्म कारण न सांगणारी लेशमात्र श्रुति सांपडते, तशी विष्णूचा महिमा सांगणारी-

हीं एखादी श्रुति असली तरी पुष्कळ श्रुतिवाक्यामुळें शिवच वरिष्ठ आहे असें शिवतत्त्वविवेकाच्या टीकेंत म्हटलें आहे. ह्यालाच अनुसरून आम्हींही सांगितलें. मला वाटलें होतें कीं तूं दीक्षितासारखाच जडबुद्धि असशील, परंतु तूं आपलें बुद्धिवैभव प्रकट केलें असल्यामुळें आतां युक्तीनें श्रवण कर. पुष्कळ लोक कल्पभेद सांगून हा कथाविरोध दूर करीत असतात. परंतु खरें रहस्य हें आहे कीं " तस्यतावदेवचिरम् " ह्या श्रुतिप्रमाणावरून ज्ञान झालें तरी प्रारब्ध भोगावें लागतें. योगी-पुरुष कायव्यूहाच्या योगानें प्रारब्ध एकाच क्षणीं भोगून टाकतो खरा; परंतु ज्ञानावांचून मुक्ति नसल्यामुळें ज्ञानरहित योगियाकडून खरें प्रारब्ध भोगलें जात नसून अनंत जन्माचें संचितच मात्र भोगलें जातें; पण ज्ञानी आणि योगी पुरुषाची स्थिती तर अशी होते कीं:—

॥ श्लोक ॥

ज्ञानकृषानु निज संचित सर्व दाही ।
कर्तृत्वगर्व सुटतां क्रियमाण नाहीं ॥
प्रारब्ध भोगिति करोनिहि कायव्यूहा ।
श्रीकृष्णपायिं मिळती निवटोनि मोहा ॥ ७५ ॥

॥ ओवी ॥

जेवढीं शरीरें योगी निर्मिती । तितुक्यासही चित्त देती ।
मुख्य चित्त आपुलें ठेविती । गौण घालिती कायव्यूहीं ॥ ७६ ॥

॥ गद्य ॥

तथापि ज्ञान मात्र निर्माण केलेल्या अनंत चित्तांत योगी निर्माण करूं शकत नाहींत. कारण **ज्ञान निर्माण करणें हें कोणत्याही क्रियेच्या स्वाधीन नसून महावाक्यानेंच त्याचा प्रकाश पडतो.** योगी इतर शरीरें व त्यांतील गौणचित्त या सर्वांनां प्रारब्ध भोगण्यासाठीं यद्यपि उत्पन्न करूं शकतो, तथापि ज्ञान निर्माण करण्याचें त्याचें सामर्थ्य नाहीं. कारण ज्ञान हें वस्तुतंत्र असून योग चित्तवृत्तीच्या निरोधाची संज्ञा असल्यामुळें निरोध अर्थातच कर्तृतंत्र आहे. त्या निरोधानें व्युत्थानदशेंत येणाऱ्या शक्ती तिन्ही कालीं बाध न होणाऱ्या अशा परब्रह्मरूपी ज्ञानास कशा निर्माण करूं शकतील? यद्यपि दाम, व्याल,

कट व भीम, भास, दृढ असे आसुरी मायेनें उत्पन्न केलेले दैत्य योगवासिष्ठांत सांगितले आहेत; व त्यांतील दाम, व्याल, कट यांनां यद्यपि वासना होती, तथापि भीम, भास, दृढ वासनारहित होते व अर्थातच ते मुक्त असल्यामुळें विष्णूंनीं आपल्या रूपांत त्यांनां मिळवून घेतलें. मुक्त नसते तर त्यांनां मरणाची दाम, व्याळ, कटाप्रमाणें प्रतीति झाली असती अशी शंका काढणें योग्य नाहीं; कारण निर्वासनिक स्थिती सुषुप्तींतही असूं शकते व तशी त्यांची स्थिती दैत्यांनीं उत्पन्न केली असली तर किंवा त्यांत चैतन्य असल्यामुळें आपल्यांत मिळवून घेण्याच्या भगवदनुग्रहानें तत्काल ज्ञान प्राप्त होऊन ते भगवत्स्वरूपीं मिळाले असले तर विरोधपरिहार सहज होतो. ह्मणून शुकाचा विवाह व शुकाचें ब्रह्मचर्य ह्या दोन्ही कथांचा अर्थ असा आहे कीं, देवीभागवतांतील विवाहित शुकशरीर प्रारब्धभोगार्थ असून दुसरें हें श्रीमद्भागवतांतील ब्रह्मचारी शुकशरीर ज्ञानरूप आहे. ' यावदधिकारमवस्थितिराधिकारिकाणाम् ' (ब्रह्मसूत्र अध्या० ३ पाद ३ सूत्र ३२ ) अर्थ— जोंपर्यंत अधिकार आहे तोंपर्यंत आधिकारिक राहतात. हा न्याय प्रसिद्धच आहे. म्हणून देवी भागवत व श्रीमद्भागवत यांचा विरोध नाहीं.

यद्यपि गूढार्थदीपिकेंत मधुसूदनस्वामींनीं आधिकारिकत्व उपासकांनांच येऊं शकतें असें म्हटलें आहे, तथापि त्यांचा अभिप्राय उपासना सात्विक असल्यामुळें प्रारब्धही सुखरूपच असलें पाहिजे असा निघतो; आणि ब्रह्मसूत्रावरील वेदांतसौरभ नामक निम्बार्कभाष्यांत जे पुराणांतून श्लोक घेतले आहेत, त्या श्लोकांवरून आधिकारिकांनां दुःखही होत असतें असें दिसतें. वसिष्ठाचे शतपुत्र मरण पावले असतां त्याविषयीं त्यांनीं शोक केला हें प्रसिद्धच आहे. या विरोधावरून अनुमानें निघतात तीं अशीं:— एकतर उपासना शुद्धसात्विक नसली पाहिजे; ह्मणूनच रजोगुणात्मक दुःख वसिष्ठादिकांनांही प्राप्त झालें. दुसरें, वसिष्ठादिक ज्ञानी जरी होते तरी योगी नसले पाहिजेत. कारण त्यांचें जन्मांतर शांकरभाष्यादिकांत वर्णन केलें आहे. ते जर योगी असते तर कायव्यूहानें सर्व प्रारब्ध भोगून टाकणें त्यांनां शक्य होतें अथवा कायव्यूह

शक्य आहे हें योगशास्त्राचें ह्मणणें तरी खोटें असलें पाहिजे. ह्मणून कायव्यूहसिद्धांतानें विवाहितशुकजन्म व ब्रह्मचारीशुकजन्माचा विरोध- परिहार होणें शक्य नाहीं असें पूर्वपक्षी ह्मणूं शकतो. तथापि तें सम्यक् नाहीं. कारण उपासना ज्याची करावयाची तो परमात्मा असल्यामुळें त्याचें ठिकाणीं रज:प्रवृत्ति संभवत नाहीं ह्मणूनच उपासनेनें समाधिस्थ झालेल्या पुरुषांचें ठिकाणींही रज:प्रवृत्ति संभवत नाहीं. ह्मणून उपासनेनें आधिकारिकत्व मिळणाऱ्यांचें प्रारब्ध सुखरूपच असतें. आतां, त्यांच्या दु:खाविषयीं जीं कांहीं पुराणांत वचनें आहेत त्यांचा अभिप्राय असा आहे कीं आधिकारिक असून देखील ममतावश असल्यास वसि- ष्ठादिकांप्रमाणें दु:ख पावतो. ह्मणूनच त्यांनीं दु:खी लोकांप्रमाणें लीला करून दाखविली आहे. तर मग अवतारांत व यांच्यांत कांहीं भेदच राहिला नाहीं. कारण अवतारही तशीच लीला करून दाखवि- तात असें मात्र ह्मणतां येत नाहीं. आधिकारिक दु:खभोगाविषयींच मात्र लीला करून दाखवितात. परंतु आपल्या सुख प्रारब्धाचे ते वृत्ति- दृष्टीनें भोक्तेच असतात. परमेश्वरावतार तर सुख व दु:ख या दोहोंनां- ही लीलेनेंच दाखवितो. कोणत्याही दृष्टीनें भोक्ता होत नाहीं. आपल्या- च हातानें रावणापासून सोडवून आणलेल्या सीतेचा लोकांच्या म्हण- ण्यावरून त्याग, व काळयवनापासून रक्षण केलेल्या यादवांचा एकादश स्कंधांत सांगितल्याप्रमाणें स्वसंकल्पानेंच घात, या रामकृष्णांच्या कृत्यां- वरून आमचें वरील म्हणणें सिद्ध होतें. आतां, त्यांनीं कायव्यूह करून प्रारब्ध सगळें भोगून कां टाकलें नाहीं? या शंकेचें उत्तर असें आहे कीं प्रारब्ध दोन प्रकारचें आहे. एकजन्मारंभक व अनेकजन्मारंभक. जें कर्म एकाच जन्मापुरतें फलोन्मुख होऊन पूर्वी सांगितलेल्या क्वाचित्क एकभविककर्माशयाप्रमाणें असतें तें पहिलें व दुसरें अनेकजन्मारंभक कर्मही दोन प्रकारचें आहे. जसें "सप्तजन्मभवेद्विप्रोधनाढ्योवेदपारग:" या वचनांत जें पवमानपठनाचें फल सांगितलें आहे त्यावरून पवमानपठनकर्म फलोन्मुख झाल्यास तें सातजन्म दिल्यावांचून रहात नाहीं. यासारखीं अनेकजन्मारंभक कर्में पुष्कळ आहेत. दुसरें अनेकजन्मारंभक कर्म असें कीं पूर्व कल्पांतील विशेष तपांनीं वेदद्रष्टे जे

होतात त्यांचें तें कर्म परमेश्वरदत्ताधिकारामुळें सृष्टिनियमनसहकारी होतें, ह्मणून सृष्टिकार्यास्तव त्यांनां अनेक जन्म घ्यावे लागतात; व तें कर्म भोगण्यांत त्यांनां दुःख होत नाहीं; आणि परमेश्वरांनीं हा अधिकार दिला असल्यामुळें कायव्यूह करून तें कर्म एकदम भोगून टाकतां येत नाहीं. कारण योग परमेश्वराराधनाधेय असतो व आराधना आराध्यावर चढू शकत नाहीं. पहिल्या प्रकारचें अनेकजन्मारंभक कर्म मात्र कायव्यूह करून भोगून संपवितां येतें परंतु पूर्व कल्पांतील कांहीं विशेष कर्मामुळें लोकानुग्रहसहायार्थ आधिकारिकांचाही केव्हां केव्हां कायव्यूह असतो. बृहद्वासिष्ठाच्या मुमुक्षुप्रकरणांतील एका व्यासाच्या बत्तीस आकारांची कथा ह्याचें उदाहरण आहे. तें वाक्य असें— “इमंव्यासमुनितत्रद्वात्रिंशंसंस्मराम्यहम् । यथासंभवविज्ञानदृशासंदृश्यमानया ॥” ( सर्ग ३-२१ ) ह्या आमच्या उत्तरावरून पूर्वपक्षाचें अर्थातच सर्व ह्मणणें निरर्थक झालें आणि कोणत्याही अनेकजन्मारंभक कर्माच्या योगज व्यवस्थेनुसार शुकाचे ब्रह्मचारी व विवाहित जन्म सांगणाऱ्या पुराणांचा विरोधपरिहार होतो.

॥ गीति ॥

**शिष्यउवाचः—**

शंकाप्रताप शमला स्वामींनीं प्रेरितां वचनपवन ।
परि विनवी शुकमहिमा ऐकाया अंग जाहलें श्रवण ॥ ७७ ॥

**श्रीगुरुरुवाचः—**

वत्सा किति वर्णावें ज्या पापा नरक सातही दरती ।
तीं आचरुनिहि अंतीं सज्जनमहिमाचि ऐकुनी तरती ॥ ७८ ॥

॥ ओव्या ॥

जयाचिया ज्ञानेंकरून । देहासही आलें ब्रह्मपण । ह्मणोनि वर्णाश्रमचिन्ह । देहावरी दिसतीना ॥ ७९ ॥ आत्मयावांचोनि कांहीं । कल्पिता अधिष्ठान नाहीं । आणि कल्पितत्व तेंही । आत्माचि दुसरा ॥ २८० ॥ उपाधीच्या निमित्तेंकरून । आकाशीं शशी दिसती दोन । तथापि भ्रमजन्यशशीकारण । तिमिरसादृश्य नसेची ॥ ८१ ॥ सूर्यबिंब सूर्यसदृश । तैसी उपाधी निर्मी जगास । तथापि अधिष्ठान आत्मा ह्मणोनि त्यास ।

आत्मसदृशता येत असे ॥ ८२ ॥ ब्रह्मीं नाहींत आश्रम वर्ण । ब्रह्मरूपचि देह म्हणून । तेथ नाहीं वर्णाश्रमचिन्ह । न दिसे पूर्ण शुकातें ॥ ८३ ब्रह्माचा देह कर्मे निर्मिला । हा बोल बोलतां वायां गेला । वर्णाश्रमविभाग कर्मे केला । तो ब्रह्माचा देह होऊं न शके ॥ ८४ ॥ म्हणोनि वर्णाश्रमचिन्ह । शुकदेहीं न दृश्यमान । किंवा शुकाचा अभिप्राय ऐसा पूर्ण । कीं आश्रमवर्ण भूतकार्या ॥ ८५ ॥ मज ईश्वरा नाहीं भेद । मग माझा देहही अवतार सिद्ध । तो भौतिक नाहीं हें कराया सिद्ध । वर्णाश्रमचिन्ह त्यागिलें ॥ ८६ ॥ अथवा मी जाहलिया उंचवर्ण । मज अवघे करितील नमन । मग स्त्रीपुरुष मातापितयासमान । हें बाल्य जाण साधेल ना ॥ ८७ ॥ सर्वांच्या शेवटीं बाळ होत । ऐसा श्रुतिमातेचा सिद्धांत । तें बाल्यचि रहावें अखंडित । म्हणोनी वर्णाश्रमचिन्ह नको ॥ ८८ ॥ आंगीं येतां वरिष्ठपण । दिसतील दुसऱ्याचे दोषगुण । बालवृत्ति धरितां जाण । ही कटकट आपण सहज चुके ॥ ८९ ॥ जनाचा जया उद्वेग नाहीं । जन जयातें न भीती कहीं । तो मज प्रिय म्हणे शेषशायी । हें बाल्यावीण नाहीं साधत ॥ २९० ॥ अथवा साधूंचियाठायीं । उच्चनीचत्वभाव नाहीं । हें दाखवावया लवलाहीं । आश्रम वर्ण त्यागिले ॥ ९१ ॥ अथवा मीचि नारायण । ब्रह्मा माझिया नाभीपासुन । तयासह यज्ञोपवीत उत्पन्न । तें मी चिन्ह धरूं कां? ॥ ९२ ॥ असो ऐसा अवधूतवेष । निर्विकार परिणतवयास । स्त्रिया आणि बाल जयास । परम प्रेमें वेढिती ॥ ९३ । शुक तोचि श्रीकृष्ण । स्त्रिया पाहती पुत्रासमान । गर्भयातना न होऊन । यशोदापण पावल्या त्या ॥ ९४ ॥ सज्जन बंधुस्नेहाचे उमाळ । ते भोंवते बाळचि गोपाळ । दुसरा अर्जुन परीक्षितभूपाळ । यास रक्षाया पातले ॥ ९५ ॥ जियांचिया स्पर्शेंकरोनी विस्मया पावली फणिशिरमाणिनी । कीं जेव्हांपासूनि मी कृष्णविरहिणी । हा स्पर्श तैंपासुनी अपरिचित ॥ ९६ ॥ कीं माझीच पाहूनि ग्लानी । परतोनियां आले कैवल्यदानी । ऐसें अनुमानुनी मनीं । आपणा धरणीं धन्य म्हणे ॥ ९७ ॥ अंगीं वैराग्यतेज लखलखीत । चरणस्पर्शें मी सकाम शांत । कीं तीव्रत्वा कंटाळूनि संज्ञाकांत । तळवे आरक्त जाहला ॥ ९८ ॥ नखीं शशांककोरी सुढाळ । जेथें स्नेहें खेळ-

ती आर्तभाळकमळ । वरी अभय द्यावया स्नेहाळ । सुकुमार पाणी ॥ ९९ ॥ तया सुकुमारीची तीव्रता । पाहूनि विहाली प्रलयव्यथा । मग आश्रय मागोनि पर्वता । दडाली आंत ज्वाळा होउनी ॥ ३०० ॥ जेथुनी बोधगंगेचे उमाळे । गोविंदनामाचिया कल्लोळें । उठती तें कोंवळें । वदनकमळ ॥ १ ॥ तया दोहीं ओठांचिया तीरीं । दोहीं कपोलांचिया अनुकरी । कृपाकटाक्षें विलसणारी । पुतळिका दोन्ही ॥ २ ॥ मुमुक्षुक्षुधेचा आवांका । पाहूनि द्रवली करुणांबिका । ते मागें पुढें रक्षावया देखा । द्विधा जाहली दोहि नयनीं ॥ ३ ॥ आर्तांचे उद्वार भगीरथ । तया श्रोत्र दाविती पथ । तंव दोन्ही अंबिका समर्थ । धांवती रक्षावया ॥ ४ ॥ पुत्र घेईल एकटी अंबिका । हाचि मत्सर धरूनि निका । ओष्ठतीरांमधूनि सुरेखा । बोधगंगा निघे ॥ ५ ॥ एकें एका विसंवता । क्षणी विलंब होईल आर्त निववितां । म्हणूनि नयनीं अंबिका मुखीं सिता । एकवटल्या सोहंशिवीं ॥६॥ कधीं आर्तांचें वांकडें वचन । नाहींच ऐकिलें म्हणून । दोहींकडे दोन्ही कर्ण । सुंदर आपण शोभती ॥ ७ ॥ कीं समोरील आर्तांसाठीं । कृपावंत आहे दृष्टी । परी आडिलिया आर्तांसाठीं । पाहिजे कोणी ॥ ८ ॥ म्हणोनि दोहीकडे दोघेजण । विचारी श्रोत्र बैसले आपण । भूतदयेचें भूषण । लेवूनि आंगीं ॥ ९ ॥ तया कर्णनेत्रांची मैत्री । साधावया मध्यतंत्री । भ्रुकुटिया पुरंध्री । दिसती दोन्ही ॥ ३१० ॥ कां कृपादृष्टि चहूंकडे जाईल । मग आर्त केंवी हा निवेल । म्हणूनि प्रतिबंध होईल । तरीच बरें ॥ ११ ॥ मग दोन्ही कृपाकिरण सुरेख । आणि आर्तांवरीच जातील देख । हा उपकार मनीं धरूनि सम्यक । नयनऊर्ध्वाश्रय घेति भ्रुकुटी ॥ १२ ॥ आणि तिहींचें एकपण । म्हणूनि एकचिअधिष्ठान । हें सुरेखान्वित शोभन । कंठकमल ॥१३॥ जेथुनी करुणागंगानिर्झर । हृदयांबुनिधी अतिगंभीर । त्रिवलीललित शोभे उदर । अत्यंत साचार रम्य जें ॥ १४ ॥ कीं आर्त येतां भलतीकडूनी । प्रतिबंध न व्हावा तन्नयनीं । यालागीं वस्त्राची गवसणी । निःशेष टाकुनी दिली कृपें ॥ १५ ॥ विरक्ताही या सुंदरवेषा । निर्भय आलिंगिती दिशा । शेखीं बाल्यभाव पाहतांसरिशा । वस्त्रचि होती ॥ १६ ॥ तीं विवर्णे पाहूनि जांवळें । अप्सरांचेंही चित्त

सोंवळें । होऊनि मातृपणाचे डोहळे । उठती तया ॥ १७ ॥ सकळ देवांमाजीं गोविंद । तैसाचि शुकवर्ण प्रसिद्ध । श्यामसुंदर भक्तमोद । करुणावृंद अवतरला ॥ १८ ॥ तें तारुण्य परी स्त्रीमनास न कळे । सदानंदभरी हास्य मोकळें । कीं हें विश्वपुण्याचें ओतलें । एकचि अंग ॥ १९ ॥ जें तारुण्य पाहूनि निश्चिती । रंभा लांचावली होती । परी वैराग्यश्रियेनें हाणूनि लाथीं । लाजूनि पुढतीं पाठविली ॥ ३२० ॥ उमा दक्षगृहीं गेली ह्मणून । गंगेनें मोहिला फणिभूषण । तैसी शुका ह्मणि मोहील अन्य कामिन । वैराग्यश्री ह्मणून सोडिना ॥ २१ ॥ तारुण्य पाहून युवतिवृत्ति । धांवूनि जातां मातृत्वें परिणमती । ही सोळाचि वरुषांची मूर्ती । परी जाहली बुंथी विश्ववात्सल्या ॥ २२ ॥ ते पुण्य-पुंजमय आर्तजननी । निष्कंचन परी अभयदानी । पाहोनि उठले अवघे मुनी । आदर करिती सद्भावें ॥ २३ ॥ रावही आतिथ्य प्रेमें करी । आत्मा वाहिला चरणांवरी । उच्चासनीं करुणालहरी । पूजाद्युपचारीं शोभला ॥ २४ ॥ देव ब्रह्मर्षि आदिकरुनी । सर्व आनंदले मुनी । महाराज सर्वज्ञ शुकमुनी । श्रेष्ठासनीं बैसले ॥ २५ ॥ मग रायें घालोनि लोटांगण । साभिप्राय अंतःकरण । उभा राहिला कर जोडून । लावोनि ध्यान मुनिचरणीं ॥ २६ ॥ जया चरणतेजेंकरून । पराजय पावले रंभा मदन । तें पाहोनि समाधान । राय अत्यंत पावला ॥ २७ ॥ तंव शिष्य ह्मणे श्रीगुरुनाथा । जंव जंव ऐकावी संतकथा । तंव तंव आनंद देउनी अतृप्ति चित्ता । वाढली राहे ॥ २८ ॥ नवल वाटे माझें चित्तीं । आनंद आणि अतृप्ति । विरोधी असोनि एके पांतीं । केंवी श्रवणार्थी तिष्ठत ॥ २९ ॥ शुकमहिमेचें अमृतपान । स्वामी करवितील कृपा करून । तरी विश्वाचें मरणहनन- । श्रेय संपूर्ण येईल पदा ॥ ३० ॥ श्रीगुरु ह्मणती तुझी मती । निर्मळ जाहली सर्वस्थिति । ह्मणोनीच उपजली रती । संतमहिमा ऐकावया ॥ ३१ ॥ शुकमहिमा अतिसुंदर । वैराग्यभरित मनोहर । तुज सांगतों समग्र । सावधअंतर ऐक पां ॥ ३२ ॥ जन्मतांचि मिथ्या संसार । मानोनि घेतलें वनांतर । तंव व्यास होउनी विरहातुर । हे पुत्र ह्मणोनि पाठिं लागे ॥ ३३ ॥ तेव्हां तरुपाषाणांतून । प्रत्युत्तर दे कृपानिधान । तो महाराज व्याससनंदन । भावेंकरून नम-

स्कारू ॥ ३४ ॥ नदीपार निघोनि जातां । नदींत नग्नस्त्रीसमुदाय होता । पुढें व्यासही तेथ येतां । वस्त्र नेसल्या स्त्रिया सकळ ॥ ३५ ॥ तेव्हां व्यास पुसे स्त्रियांलागुनी । माझा पुत्र यौवनखाणी । येथोनि जातां तुह्मी कामिनी । निर्भय नग्न राहिल्या ॥ ३६ ॥ मी ह्मातारा विकार-हीन । वस्त्रें कां नेसलां मज देखून । तैं स्त्रिया बोलिल्या प्रतिवचन । तुमचा नंदन निर्विकारी ॥ ३७ ॥ वस्तू वस्तुत्वें समसमान । भूत भूतत्वें समान जाण । तेथ कोठिला नर कोठिली कामिन । अनर्थ पूर्ण आघवा ॥ ३८ ॥ ज्ञानदृष्टीं आत्मा एक । त्यासी नाहीं द्वैतओळख । आणि स्त्री जरी पाहिली आहे एक । तरी ती माता ॥ ३९ ॥ ह्मणोनि अंतर्दृष्टि तयापाशीं । विकार नाहीं अंश त्यासी । बाह्यदृष्टिं पाहतां निःशेषी । तरी मातृप्रेमावीण अन्य नाहीं ॥ ४० ॥ ह्मणोनि पाहोनि तुमच्या बाळा । आह्मीही जाहलों मतिनिर्मळा । नग्न कीं विवस्त्रा सवस्त्रा सकळा । ही आठवण विसरलों ॥ ४१ ॥ तुह्मी वेदांचें गुह्य जाणोन । सुतापाठीं धांवता ममता धरून । आह्मी वस्त्रें नेसलों ह्मणून । कीं ओळख आहे तुह्मांतें ॥ ४२ ॥ ऐसी ऐकोनि स्त्रियांची वाणी । चित्तीं आश्चर्य करी मुनी । पुढें जन तारावयालागुनी । तपीं शुकमुनी बैसला ॥ ४३ ॥ तपा लोटले कांहीं दिवस । इंद्रियनिग्रहें ध्यानमानस । आत्मा ब्रह्मरूपीं समरस । पूर्वीचाची ॥ ४४ ॥ गर्भीं प्रभूचा उपदेशिला । लोकहिता जो तपा बैसला । पाहोनि इंद्र भांबावला । कीं पद घेईल आपुलें ॥ ४५ ॥ नवल रजोगुणाची करणी । इंद्र सात्विक देवयोनी । तथापि त्रिगुणातीत मुनि । त्या तत्करणी कळेना ॥ ४६ ॥ या सकाम लोकांची रीती । कामनेसाठीं साधूस वंदिती । फळ न मिळतां पुनः द्वेषिती । ह्मणोनि यती उदास ॥ ४७ ॥ जयाचा सुगर वा देखे । तयाचाचि गुरुमंत्र शिके । विष्णूवांचोनि दैवतें जितुके । ते सकाम लोकें माजविले ॥ ४८ ॥ जाखाई जोखाई जखिणी । आसरा मेसको मलिनी । भूतिनी लटिनी पद्मिणी । निर्मिल्या यक्षिणी सकामें ॥ ४९ ॥ खंडोबा मुंजोबा भैरव । ह्मसोबा पिरोबा जुलादेव । वेताळ सटवी खुटाव । सकामलोकीं निर्मिले ॥ ५० ॥ आपुल्या वस्तूच्या भयेंकरून । निरुपद्रवा पीडिती सकामजन । इंद्राचा हा पाहोनि गुण । स्वर्गास कोण विटेलना ॥ ५१ ॥

असो कराया शुकनियमभंग । उपाय धुंडाळी शचिरंग । जवळीं बोलावूनि रतिरंग । विचार पुसे आवडीं ॥ ५२ ॥ मदन ह्मणे सहस्रनेत्रा । मज ठाऊक आहे शिवाचा दरारा । हा त्याहूनि विरक्त खरा । निज अंतरा कळोंदे हें ॥ ५३ ॥ शिवासी उमा बायको असून । तेणें मज जाळिलें क्रोध करून । हा तंव ब्रह्मचारी जन्मापासून । येथ अघटमान प्रवेश माझा ॥ ५४ ॥ इंद्र चिंताग्रस्त मनीं । तंव रंभा बोले पुढें येउनी । मजसारिखी दिव्य कामिनी । असतां मनीं कां चिंता ॥५५॥ वन शृंगारावें वसंतीं । सवें असावें मन्मथीं । मी ठकवोनि आणीन सभेप्रति । निश्चय चित्तीं असों द्या ॥ ५६ ॥ साठीसहस्र वरुषें तपला । तो विश्वामित्र म्यां येथ आणिला । हा थोडिया दिवसांचा गणिला । आहे कवणी ॥ ५७ ॥ जरी सत्य न करीन आपुलें वचन । तरी काळें होवो हें वदन । इंद्र हर्षला ऐकोनि वचन । मग गौरवोनि पाठविली ॥ ५८ ॥ वसंतें शृंगारिलें वन । जवळीं भीत भीत उभा मदन । कीं आपुल्या ताता हृदयीं पाहोन । पुढें पाऊल घालिना ॥ ५९॥ तात विराजे शुकाचें हृदयीं । तेथ माझा निर्लज्ज रिघाव नाहीं । म्हणोनि मागें मागें सरोनि पाही । राहे लवलाही उभा तेथ ॥ ३६० ॥ इकडे रंभा कामभरित । सुस्वर गाणें गावोनि नाचत । गाणें ऐकोनि जड पदार्थ । सकाम जीवंत जाहले ॥ ६१ ॥ गाणें अतिसुरस ऐकुनी । शुक विचारी अंतःकरणीं । कीं व्यष्टि अनाहत नाद येक्षणीं । पाहिला होता ॥ ६२ ॥ हा समष्टि अनाहत नाद प्रगटला । तो अंतर्बाह्यें वाटे भरला । कीं हृदयींचा श्रीकृष्ण व्यापक झाला । तो वाजवूं लागला चहूंकडे वेणू ॥६३॥ यास्तव उघडोनि पाहि डोळे । तंव पुढें रंभारूप देखिलें। तें श्रीकृष्ण म्हणोनि नमस्कारिलें । तटस्थ ध्यान संवरित ॥ ६४ ॥ रंभेस वाटलें आपुल्या मनीं । कीं कार्य साधेल सहज क्षणीं । म्हणवूनि परम कोमल वाणी । स्वयें विनवणी आरंभी ॥ ६५ ॥ मदन पाहे विलोकून । ह्मणे जरी यानें उघाडिले नयन । तरी तात हृदयीं दिसती अझून । रंभाअनुमान समूळ मिथ्या ॥६६॥ हृदयीं लोपल्यावीण भगवंत । विकारप्रवेश नाहीं तेथ । बाह्यभाव धरुनी तेथ । रंभा व्यर्थ अनुमानी ॥६७॥ असो शुकाचें ध्यान रंभेचे चाळे । आश्चर्यें पाहती मदनाचे डोळे । मग

रंभेनें स्तवन आरंभिलें । जय जय मुनीश्वर म्हणोनी ॥ ३६८ ॥

॥ पद ॥

जय जय जय मुनिवर वर पाहि मजकडे । तप करुनी जाळिसि कां तरुण रूपडें ॥ ध्रु० ॥ पाहोनियां सोंग तुझें तात तव रडे । दिधल्याविण सौख्य त्यास धर्म ना घडे ॥ जय० ॥ १ ॥ उगिच अशी सुंदर तनु करुं नको मढें । पिउनि गोड अधरसुधा अमर हो पुढें ॥ जय० ॥ २ ॥ कुलिन परि मी पायिं तुझ्या लागलें गडे । ज्ञानेश्वर तीहि स्नुषा पाहतिल पुढें ॥ जय जय जय० ॥ ६९ ॥

॥ ओवी ॥

गार्हस्थ संपादिल्याविणि । कोण्या शास्त्रीं सन्यास घेण ।
फेडल्यावीण पितृऋण । मुक्त कैसा होशील तूं ॥ ७० ॥

॥ गीति ॥

बोले मुनिवर तेव्हां कवण इथें पातलीस तूं सटवी ।
नाहिं तुझ्या वदनावर भगवत्प्रेमाचि किमपिहि टवटवी । ७१ ।

॥ पद ॥

कासयासि व्यर्थचि मी पाहुं तुजकडे । अज अजीत मुळिंहुनि मज माग ना पुढें ॥ कासयासि० ॥ ध्रु० ॥ तात मात माझ्यास्तव कोणि ना रडे । ध्याया सुखचि जगा करि सुतप रोकडें ॥ कासयासि० ॥ १ ॥ सुंदरता नाहीं तनुत अवधि लांकडें । आज उद्यां जड तनु ही निश्चयें मढें ॥ कासयासि० ॥ २ ॥ मर्त्य तसा स्वर्ग तुच्छ नीघ माकडे । चरण धरुनि मरण देशि जाणलें फुडें ॥ कासयासि० ॥ ३ ॥ शपथ काळिं तिहिं मी तुझ्या मोहिं ना पडे । वश तुज जे यमपुर त्या सहज सांपडे ॥ कासयासि० ॥ ४ ॥ ज्ञानेश्वर तात मला नित्य सवंगडे । तुजसमान चावट सुन त्यास नावडे ॥ कासयासि० ॥ ५ ॥ ७२ ॥

॥ ओव्या ॥

ज्या दिवशीं येईल विरक्ती । त्या दिवशीं सोडावें गृहाप्रति । ऐसी निश्चयें आहे श्रुती । अन्यथा उक्ति असे तुझी ॥ ७३ ॥ एक आत्मा सर्वांठायीं । मातापिता बाळक देहीं । शत्रुमित्र भिन्न नाहीं । आत्मया-

हूनि निश्चयें ॥ ७४ तो आत्मा माझिया हृदयीं । तोचि आत्मा पितया-च्याठायीं । आत्मऋण फिटतां लवलाहीं । पितृऋणही फेडिलें म्यां ॥ ७५ ॥ तिन्ही काळीं माझ्याठायीं । बंधनाची वार्ता नाहीं । तेथ मुक्तीची आशा लवलाही । स्पर्श किमपिही करों न शके ॥ ७६ ॥

॥ अभंग ॥

रंभा ह्मणे तूज जरि नको मुक्ति । तरी गृहासक्ति सोडिशी कां ॥ १ ॥ एकवेळ घेई सुंदर चुंबन । करी समाधान अधराचें ॥ २ ॥ हातामाजि हात हृदया हृदय । योग साधि स्वयें आलिंगनीं ॥ ३ ॥ सुरतसमाधि सुखाचिया गोडी । चढे घडिघडि कामपंथें ॥ ४ ॥ अनिर्वाच्य तृप्ति पावोनि माजिरी । सोडोनि दे पुरी विरक्तता ॥ ५ ॥ ज्ञानेश्वरबाळ कैसा निश्चयाचा । जया विषयाचा वारा नाहीं ॥ ७७ ॥

॥ गीति ॥

सोडुनि मृदुकुचमर्दन तप करिता व्यर्थ कां मरायाला ।
मद्वचनें आचरितां तृप्ती होईल कामरायाला ॥ ७८ ॥
सोळासहस्र उरिंचे ग्रंथी बळकट जया करें खचले ।
तदपि ब्रह्मचारिता तच्छिष्या कंवि तें न एक चले ॥ ७९ ॥

॥ अभंग ॥

मुक्ति नको तैसा नलगे संसार । ब्रह्मीं हे साचार दोन्ही मिथ्या ॥ १ ॥ लाळेनें माखलें वदन समस्त । ह्मणतां अमृत नष्टा तुह्मी ॥ २ ॥ तुह्मी कवटाळीणी कवी भुलवून । आपुलें वर्णन करविता ॥ ३ ॥ तुह्मा हातीं हात सांपडला ज्याचा । नैवेद्य मृत्यूचा तोचि एक ॥ ४ ॥ मिळतां तुमच्या हृदयालिंगनीं । वासनाडाकिणी चित्तीं शिरे ॥ ५ ॥ सुरतसमा-धी निश्चयें समाधि । कामपंथें व्याधि जन्मजन्म ॥ ६ ॥ अनिर्वाच्य माया सदा सौख्यहीन । भोगितां आंदण नरक दे ॥ ७ ॥ प्राप्त परी नेघे मिथ्या भवगोडी । ह्मणोनी न सोडी विरक्ती मी ॥ ८ ॥ ज्ञानेश्वर मायबाप पाठिंपोटीं । निवारीत कोटी जाळें तुह्मी ॥ ८० ॥

॥ गीति ॥

कृमिभरित पलग्रंथीं कुच पाहुनि घाण वांति येइल कां ।
तृप्तिस्तव प्रेतालिंगनी कार्ष्णी काम धांव घेइल कां ॥ ८१ ॥
सोळासहस्र वृत्ती ज्या हृदयीं हरिमय स्वयें झाल्या ।
समष्टिहृदयीं त्याची तीव्र युवति लोक तारण्या आल्या । ८२ ।

॥ श्लोक ॥

श्रीकृष्णनाथ पति तो निजभावनेनें ।
तो देव कामिनि सुतादिक नांव नेणे ॥
आह्मीच कृष्णरमणी ह्मणुनी कदाही ।
त्याची कथा भवव्यथा गणणार नाहीं ॥ ८३ ॥

॥ गीति ॥

आत्मत्वें एक तरी वृत्तिदृष्टि थोर कांत सुखकारी ।
यास्तव तत्कृत कर्णीं नाहीं व्युत्थीत कोणि अधिकारी ॥ ८४ ॥

॥ ओव्या ॥

ऐसी ऐकोनि शुकाची वाणी । रंभा संतापली मनीं । ह्मणे जाळ न वाळतां मुखावरुनी । धिःकारिशी कोण तूं ॥ ८५ ॥ मिथ्या ह्मणसी संसार । तरी तद्वेषें कां भरलें अंतर । लालापूरित माझें वक्त्र । न जाणोनि बोलसी ॥ ८६ ॥ प्रेतशरीर मांसग्रंथी । न जाणोनि ह्मणसी माझी कुंथी । तपस्वी असूनि तुजप्रति । खोटें बोलणें योग्य नव्हे ॥ ८७ ॥ तुझिया तपाची सिद्धी मोठी । परंतु जाणिलें नाहीं काय मम पोटीं । सुखा न पाहोनियां दृष्टि । व्यर्थ गोरटी धिःकारिसी ॥ ८८ ॥ शृंगऋषी तुजऐसाचि होता । तोही आम्ही केला जाणता । तूं चार दिवसांचा बैसलासी आतां । न जाणोनि तत्वता धिःकारिसी ॥ ८९ ॥ऐसें ह्मणोन क्षुब्धान्तर । क्रोधें कांपे अतिथरथर । मग करीं घेवोनियां शस्त्र । चिरिलें उदर निजहातें ॥ ९० ॥ तंव आंतोनि उठला सौरभ थोर ।

---

१ कुत्सिता.

जणुं अंतरीं होता कर्पूरगौर । कीं रंभापोटींचा कर्पूर । भरी अंबर सुगंधें ॥ ९१ ॥ सुख देणें सत्वलक्षण । सुगंधें सौख्य होय जाण । म्हणोनि विषय तरी किंचित् सत्वसंपन्न । सुगंध घ्राणिपे ॥ ९२ ॥ पूर्ण सत्वाचें शरीर । ते तंव ब्रह्मलोकादिस्थानीं परिकर । त्याहोन न्यून सत्वशरीर । ते दिव्यविषयरूप मानवातें ॥ ९३ ॥ म्हणोनि रंभेचिया पोटीं । सौरभभांडाराचिया कोटी । देव मधुकर होवोनि वासासाठीं । पाठोपाठीं धांवती ॥ ९४ ॥ अनंत वर्षें तप करून । ज्यांनीं घेतलें अप्सराचुंबन । तेही आंतील नेणतेचि होते जाण । सुवास पाहोन धांवले ॥ ९५ ॥ कीं रंभेच्या उदरांतून कर्पूर निघाला । तया सुवासें शिव मोहिला । तो जावोन रंभापोटीं राहिला । तंव गौर झाला सर्वांगें ॥ ९६ ॥ यालागीं नांव कर्पूरगौर । भूतें जाहली कर्पूराकार । सौरभें कोंदाटलें अंबर । पृथ्वी जाहली गंधवती ॥ ९७ ॥ मग म्हणे तप-गर्विष्ठा । न जाणोनि वरिष्ठप्रतिष्ठा । आमुच्या उदरीं भरली विष्ठा । म्हणत होतासि अभिमानें ॥ ९८ ॥ तरी फेडुनी आपुली भ्रांती । न पडोनि संशयध्वांतीं । सत्वर चढे सौख्यप्रांतीं । मी वर निश्चितीं तुज देतें ॥ ९९ ॥ ऐसें ऐकोनि वचन । शुक उभा ठाकला कर जोडून । म्हणे अहा हें त्रैलोक्यरत्न । आजचि निधान देखिलें ॥ ४०० ॥ ऐसी ऐकोनि स्तुती । हर्ष वाटला रंभेप्रती । परी मदन म्हणे तिजप्रती । तात दिसती हृदयीं याच्या ॥ १ ॥ जोंवरी ज्ञानेश्वरचरण आवरण । नाहीं तोंवरी शपथ घेऊन । मूळमायाही करितां यत्न । भक्त जाण वश न होती ॥ २ ॥ शुक म्हणे मिथ्या म्हणोन । द्वेष न करावा हें साच बोलण । परी रागही धरितां जाण । अतिबंधन चुकेना ॥ ३ ॥ बारा-वर्षें गर्भी राहिलों । विष्ठामूत्राच्या दाथरीं कढलों । मग जन्मतांची पळोन आलों । पुढतीं संसार नको हा ॥ ४ ॥ मिथ्या असोनि तयाचा द्वेष । हेंचि कारण जन्म घेण्यास । अनंत जन्म गर्भवास । पावोनि आतां वीटलों ॥ ५ ॥ ठाऊक असतें ऐसें जरी । कीं माते सुगंध तुझे उदरीं । तरी येथें बैसोनि निर्धारीं । तप करितों अनंत ॥ ६ ॥ जिणें नवमास पाळिलें उदरीं । तीस सोडुनि आलों वनांतरीं । गर्भवासाचे कष्ट भारी । सत्यसम अंतरीं मानोनी ॥७॥ माते तुझ्या उदरीं असतों ।

तरी तुझ्या गर्भवासा न विटतों । आणि कृतघ्नही न होतों । मातेलागीं ॥ ८ ॥ गर्भवासदु:ख फळलें फार । म्हणोनि झुगारिला मातेचा उपकार । तुझ्या उदरीं असतों साचार । तरी तुझा उपकार न विसरतों । ॥ ९ ॥ पूर्ण मातृत्व तुझ्या पोटीं । जे तपस्वी लोलुप होते तुजसाठीं । ते बाहेरचि राहिले शेवटीं । फाडिलें मजसाठीं उदर त्वां ॥४१०॥ मी सत्यचि अल्पज्ञ मुनी । काहींच्या उदरीं विष्ठा पाहुनी । मातृभाव व्यर्थ जनीं । ऐसा मनीं ह्मणत होतों ॥ ११ ॥ सर्व सुख सुगंधाची खाणी । तुज ऐशा आहेस जगज्जननी । हें मुख्यतत्व विसरोनी । गर्भी कष्ट पावलों ॥ १२ ॥ माते मी तव स्तनांप्रति । ह्मणत होतों मांसग्रंथी । त्याची क्षमा असोदे चित्तीं । कळलें मजप्रति निश्चयें ॥ १३ ॥ उदरीं सुगंध येवढा थोर । तरी स्तनीं दुग्ध असेल अमृताकार । तें मज पाजी धांवोनि सत्वर । क्षुधा थोर लागली ॥ १४ ॥ ऐसें ऐकतां शुकाचें वचन । रंभा जाहली अभिमानहीन । साष्टांग घाली लोटांगण । गेली विसरोन देहभावा ॥ १५॥ संतसंगाचा महिमा थोर । रंभा विसरली देवशरीर । कीं उदरींचा जो सुगंध थोर । तेणें व्यासकुमर पूजी ॥ १६ ॥ कीं संतसंगें स्वर्गास विटली । ह्मणोनि भूमीवर केळी जाहली । वृक्षरूपें विलसों लागली । सुख देवोनी सकळांतें ॥ १७ ॥ कीं शुकपक्षी हिंडती वनांत । आपण केळी जाहली तेथ । शुकनांव असावें चित्तांत । हाचि हेत धरूनी ॥ १८ ॥ मग जोडोनी दोन्ही पाणी । म्हणे भक्तवत्सल शांतिपाणी । त्राहे त्राहे कृपा करोनी । स्नेहजीवनीं सिंची मातें ॥ १९ आह्मी सत्वयोनी म्हणवितो अप्सरा । परी कल्पकल्प काम नव्हे पुरा । तुझाऐसिया तपस्वी विप्रा । छळोनि निर्धारा भुलवितो ॥ ४२० ॥ भय कलह आणि चिंता । नित्य आहे आमुच्या माथां । तूं माय माउली आम्हां अनाथा । रक्षी श्रांता दीनबंधो ॥ २१ ॥ महाराज तुझें करिता छळण । समूळ विराला अभिमान । हारपलें माझें रंभापण । धरितें चरण आवडी ॥ २२ ॥ जळो माझी सुंदर काया । क्षणभंगुर देह पावोनिया । भोगिलें नानापरी विषया । नाहीं हरिपाया विनटलें ॥ २३ ॥ महाराज गुरू तूं कृपावंत । बोलिलासि कीं माझा सुत । तरी वात्सल्ययोगें होकां निश्चित । मज पावन करी दीनबंधो ॥ २४ ॥

तुम्हाऐसे संतजन । स्त्रियांस पावन करिती वात्सल्य सांगोन । पुरुषांस पावन करिती उपदेशून । आपण नारायण स्वयें होती ॥ २५ ॥ मग रंभेस बोले भगवंत । तूं भय सांडूनि देई समस्त । स्वर्गी जाई आनंद-भरित । चित्तीं यदुनाथ आठवीं ।२६। तुमचें प्रारब्ध अतिदुस्तर । आयुष्य आहे कल्पभर । तें भोगिलियावीण साचार । सुटका नाहीं सर्वथा ।२७। परी अंतरीं आठवावा व्रजपाळ । मी माझें सांडोनि द्यावें सकळ । मग वचन ऐकोन चरणकमळ । नमोनि रंभा निघाली ।।२८।। उगीच स्वर्गी येऊनी । निश्चित बैसली आपुल्या सदनीं । तंव देव सांगती इंद्रालागुनी । कीं गर्वरहित होवोनि आलि रंभा ॥ २९ ॥ टाळ्या पिटती ऋषी समस्त । अभिमान वाहत होती बहुत । आम्हां विप्रांसी भुलवाया निश्चित । बरी गर्वरहित झाली ॥ ४३० ॥ मन्मथ इंद्रासी बोले वचन । त्याच्या हृदयीं करुणाघन । माझा तात कल्याणनिधान । एकही क्षण न विसंबे ॥ ३१ ॥ तुजसहित स्वर्गभोगखाणी । तया मुनीच्या नखावरूनी । एकाचि वेळ कुरवंडी करूनी । द्यावी सांडोनि मज वाटे ॥ ३२ ॥ मग इंद्रें रंभेस पाचारून । सहज पुसलें वर्तमान । तंव ते बोले कर जोडून । भय संपूर्ण सांडा जी ॥ ३३ ॥ तयांचीं पाउलें पडतील जेथ । चारी मुक्ती लोळती तेथ । तुच्छ स्वर्गभोगाची मात । अंगणींही निश्चित उभी न ठाके ॥ ३४ ॥ ऐसें ऐकोनि रंभेचें वचन । हर्षे दाटला सहस्रनयन । म्हणे लवे संपत्ति घेवोन । तें कैवल्यनिधान पूजूं चला ॥ ३५ ॥ करूनी तयाचें चरणपूजन । अवघा स्वर्ग निर्माल्य करून । सज्जननिर्माल्याचें करितां अवघ्राण । मग तुष्टेल रमारमण आपणां ॥ ३६ ॥ असो योग्य तें घेवोनी । तयास्थानीं जाउनी । प्रेमभावें शुका पुजोनी । चरणा नमोनी गृहीं आले ॥ ३७ ॥ सद्गुरु म्हणती शिष्यराया । जयाची एवढी सुखद चर्या । तो उपदेशावया परीक्षिद्राया । पातला लवलाह्या निजभाग्यें ।३८। तो पूजित होवोनि सिंहासनीं । राव भावें लागला चरणीं । उभा ठाकला बद्धपाणी । नम्रवाणी बोलत ॥ ३९ ॥ जीवनातें शीतळपण । जयाच्या शांतीचें महिमान । बुद्धीसही बोद्धव्य जाण । जयाचें चैतन्य चेतवी ॥ ४० ॥ तो महाराज सर्वज्ञमुनी । रावही भागवत धर्मखाणी । सप्रेमें उभा बद्धपाणी । आवडीकरोनी बोलत ॥ ४१ ॥

॥ पद ॥

आजि मम भाग्योदय झाला ॥ ध्रु० ॥ क्षत्रियकुळिं कृति अधम करोनिहि । पाहत सुजनाला ॥ आजि मम० ॥ १ ॥ निजकरुणेनें केलें पावन । वारुनि कुभयाला ॥ आजि मम० ॥ २ ॥ ज्ञानेश्वरप्रभु अतिथी करिती । तीर्थमय जनाला ॥ आजि मम० ॥ ३ ॥ ४४२ ॥

॥ ओवी ॥

घडतां सज्जनांचें चिंतन । बारा वाटां पळती विघ्न ।
वाराणसी होय सदन । उमारमण जीव होय ॥ ४३ ॥

॥ अभंग ॥

अवचीता त्यांची भेटी । पुण्यकोटी अगण्य ॥ १ ॥ पादस्नान पादपूजा । नये ओजा बोलता ॥ २ ॥ आज सान्निध्य जोडलें । लया गेलें पातक ॥ ३ ॥ विष्णु पाहोनी दानव । देती जीव ज्यापरी ॥ ४ ॥ तैसें भवत्सान्निधान । त्रिभुवन प्रकाशी ॥ ५ ॥ व्यासकल्पतरुफळ । दृष्टमूळ कैवल्या ॥ ६ ॥ प्रभु ज्ञानेश्वरनाथा । पायीं माथा वाहतें ॥ ४४ ॥

॥ ओव्या ॥

मी क्षत्रियांमाजीं अधम पूर्ण । उगेंच छळिलें तपोनिधान । तथापि भेटले संतसज्जन । तरी नारायण तुष्टला ॥ ४५ ॥ अग्नीनें पोळतां मेघपर्वत । दरिद्र येतां कल्पद्रुम प्राप्त । मरणसमयीं जोडेल अमृत । तरी भगवंत तुष्टला ॥ ४६ ॥ पतिव्रता पत्नी स्वेच्छाधन । आज्ञाधारक स्नुषा नंदन । इतुक्याहीवरी साधुसेवन । तरी नारायण तुष्टला ॥ ४७ ॥ शरीरारोग्य मिष्टान्नप्राप्ती । विश्वासू मित्र मान्यता जगतीं । इतुक्यांतही भेटती संतमूर्ती । तरी श्रीपति तुष्टला ॥ ४८ ॥ थू थू केलें सकळ जनीं । पुण्यें गेलीं डावलोनी । आणि अवचिता अंगिकारिलें सज्जनीं । तरी चक्रपाणी तुष्टला ॥ ४९ ॥ तया ह्मणती पांडवपाळण । त्यांच्या कुळींच मी उत्पन्न । आपुलें ब्रीद पाळावयाकारण । मज जगन्मोहन तुष्टला ॥ ४५० ॥ वंशपरंपरा आमुचा । पाठिराखा तोचि साचा । कळवळा पाहोनि मज दीनाचा । सहाकारी धांवला तो ॥ ५१ ॥ तो तुष्टलियां करुणाघन । मग मरण तेंही परम कल्याण । मी अवचिता पाहतों तुमचे चरण । यास्तव रमारमण तुष्टला ।५२। उभा न राहे एक मुहूर्त । जो मोक्षाचें स्वरूप विख्यात । तो अवचिता पातला शुक भगवंत । तरी वैकुंठनाथ

तुष्टला मज ॥ ५३ ॥ एऱ्हवीं आपुली अव्यक्तीं गती । जन्मदकर्मरहित स्थिति । प्रारब्ध नाहीं ज्ञानियाप्रति । ऐसें आचार्य बोलती 'विवेकचूडामणौ' ॥ ५४ ॥ तथापि तुमचें व्यक्तदर्शन । हेंचि आश्चर्य अतिगहन । कीं तुह्मी प्रत्यक्ष ब्रह्म पूर्ण । आणि नारायणकृपा तनु तुमची ॥ ५५ ॥ तीचि होवोनियां व्यक्त । मजपुढें माउली उभी तिष्ठत । मज मरण आलिया अमृत । हें अवचित सांपडलें ॥ ५६ ॥ पळपळ मृत्यूचिया हातीं । ऐसिया आह्मा जनांप्रति । आपुली भेटी पीयूषप्राप्ती । ह्मणोनि वाटे श्रीपती तुष्टला ॥ ५७ ॥ आह्मी भिकारी याचक थोर । आपण करुणासागर उदार । मी शापदग्ध असतां पामर । कोणतें सुकृत असेल नकळे ॥ ५८ ॥ सुकृत असेल असो कोणीकडे । माझें मन सांगे रोकडें । तुमचीं पाउलें पाहतां फुडे । तरी वळला मजकडे भगवंत ॥ ५९ ॥ योगियांमाजीं परमगुरू । म्हणजे तुह्मिच शार्ङ्गधरू । 'सपूर्वेषामपिगुरुः । कालेनानवच्छेदात्' या सूत्रें ॥ ४६० ॥ यास्तव तूंचि आह्मां जनकजननी । ह्मणोनि आतां भीड सांडोनि । विचारावें वाटतें मनीं । तें कृपा करोनि सांग माते ॥ ६१ ॥ तुमचिया दर्शनेंकरून । मी तंव निःशेष जाहलों पावन । येथ संशय असेल जरी मजकारण । तरी आण श्रीहरीची ॥ ६२ ॥ परंतु मृत्यु येतां जीवा । तेणें कवणाची करावी सेवा । कोण्याकर्में संसारगोवा । तुटेल सहज ॥ ६३ ॥ कोणतिया कर्मेंकरून । जीवासी राहील हितस्मरण । कां कोणाचें करावें आवडी भजन । जवळीं मरण ठाकतां ॥ ६४ ॥ कोण जप करावें काय । आणिक काय करूं नये । हें अवघें सांग सद्गुरुमाय । कृपा करोनी दयाळे ॥ ६५ ॥ तूं बाळासी सर्वदा कृपावंत । तथापि मोहें न मळे चित्त । यालागीं दुर्लभ दर्शन यथार्थ । अमोघही निश्चित असोनी ॥ ६६ गोदोहनमात्रही काळ । गृहस्थां दुर्लभ तुह्मा मेळ । यास्तव मी फार उतावेळ । वचनमौक्तिक सुढाळ ल्याया ॥ ६७ ॥ सूत ह्मणे शौनकाप्रति । ऐसी अंतःकरणीं धरोनि प्रीती । रायें पुसिलें शुकाप्रति । तो देत महामती उत्तर ॥ ६८ ॥ सखी परीक्षितीप्रश्नोक्ती । ती आजवरी प्रेषिली होती । आतां उत्तरें प्रगटतील यादवपती । तो पुढतीं 'आगमनविलासू' ॥ ६९ ॥ संतहृदयीं वसत रमण । सखी पाठविली हेंचि जाणोन ।

आतां उत्तररूपें हृदयीं येवोन । करो अधिष्ठान नाथ तो ॥ ४७० ॥ साक्षीरूपें सर्वदां हृदयीं । तथापि अनध्यस्तविवर्त पाहीं । तो संतकरुणें लवलाहीं । यावा हृदयीं ही आशा ॥ ७१ ॥ ग्रंथकर्त्री ज्ञानेशकन्या । विराहिणी आणि संयोगी मान्या । आले नारायण या हर्षवाण्या । मानीत धन्या आपणा ॥ ७२ ॥ आतां हा एवढा सुंदर । ऐसा कासया देऊं परिहार । आदिमध्यांतीं ज्ञानेश्वर । ग्रंथही साचार तोचि तो ॥ ७३ ॥ तदाकार मन झालियावीण । उत्कंठेसी विषय कोण । उत्कंठेनें आमंत्रण यालागीं आहे श्रीकृष्ण हृदयीं ॥ ७४ ॥ आमंत्रण तेंचि आगमनादिक । ही सगुणलीला सकाळिक । यालागीं हाही विलास निष्कलंक । येथेंही पूर्ण सुख असे ॥ ७५ ॥ हें षोडश खणांचें वृंदावन । येथ तुळसी सप्रेमअंतःकरण । तळीं बैसला मनमोहन । भाविकजनपूजक ॥ ७६ ॥ तया भाविकांची रजधूळ । मस्तकीं धरोनी केवळ । बोबडिया वचनांची करूनी माळ । घननीळचरणीं वाहूं ॥ ७७ ॥ ही स्वल्प सेवा सर्वथा । प्रीति पावो आळंदीनाथा । श्रीज्ञानेश्वर नाम जपोनी आतां । आगमनलीला आरंभू ॥७८॥ सर्वांगाचे करोनी कान । श्रोतीं होआवें सावधान । 'आगमनविलास' प्रेमेंकरून । करोनी श्रवण अनुभवावा ॥ ७९ ॥

॥ दोहा ॥

परब्रह्मअनुभवसुखीं पावत वचनविराम ।
तदपि प्रेमव्यक्तसुखीं मुखिं ज्ञानेश्वरनाम ॥ ४८० ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे
गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे
सद्गुरुशुकसमागमो नाम षोडशसखीप्रेषणम् ।
॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

समाप्त.